नागेश विनायक बापट लिखित

# चरित्रे





महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ

# नागेश विनायक बापटलिखित
# चरित्रे

श्रीमंत बाजीराव बल्लाळ,
श्री महाराणी जमनाबाई साहेब गायकवाड
आणि लिक्लेअर

**नागेशराव विनायक बापट**

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई

⏩ **पुस्तकाचे नाव :** नागेश विनायक बापटलिखित चरित्रे
श्रीमंत बाजीराव बल्लाळ, श्री महाराणी
जमनाबाई साहेब गायकवाड आणि लिक्लेअर

⏩ **लेखक :** नागेशराव विनायक बापट

⏩ **प्रथमावृत्ती :** २०१८

⏩ **प्रकाशक :**
सचिव,
महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ,
रवींद्र नाट्य मंदिर इमारत, दुसरा मजला,
पु. ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी आवार,
सयानी रोड, प्रभादेवी, मुंबई-४०००२५.

⏩ **संपादक : - डॉ. नीळकंठ बापट**

⏩ © **प्रकाशकाधीन**

⏩ **मुद्रक :** व्यवस्थापक,
शासकीय फोटोझिंको मुद्रणालय,
पुणे ४११ ००१.

⏩ **किंमत :** ₹ 351

⏩ या पुस्तकात व्यक्त केलेली मते स्वत: लेखकाची असून, या मतांशी साहित्य आणि संस्कृती मंडळ व महाराष्ट्र शासन सहमत असेलच असे नाही.

# अध्यक्षांचे निवेदन

महाराजा सयाजीराव गायकवाड हे गुणग्राहक राजा होते, तसेच ते साहित्य, कलांचे आश्रयदाते होते. अनेक लेखक-कलावंतांना बडोद्यातून प्रोत्साहन मिळत गेले. बडोदा सरकारची वाङ्मय प्रसाराकरिता सतत मदत मिळत आलेली आहे. एकोणिसाव्या शतकाच्या मध्यास मुंबईत साहित्य प्रसारास मदत करण्यासाठी 'दक्षिण भाषेत पुस्तके प्रकाशित करणारी मंडळी' या संस्थेस सुरुवात झाली. या संस्थेस बडोदानरेश श्री. गणपतराव गायकवाड यांनी १८४९ साली पाच हजार रुपयांची मदत केली. ग्रंथोत्तेजनासारख्या कार्यास कर्त्या माणसाने मदत केली पाहिजे या ग्रंथ व्यवहारास मदत करण्याच्या परंपरेकडे महाराजा सयाजीराव गायकवाड यांनी सांस्कृतिक जबाबदारीने पाहिले. एवढेच नाही, तर अनेक लेखकांना लिहिण्यास प्रोत्साहन देऊन, त्या ग्रंथ प्रकाशनास त्यांनी सढळ हाताने मदत करून ते ग्रंथ, ग्रंथकार आणि प्रकाशकांचे पोशिंदे झाले. बडोदा हे महाराष्ट्राच्या वाङ्मयाचे प्रमुख केंद्र झाले. साहित्य सेवकांना लेखनासाठी सढळ हाताने येथून मदत आणि राजाश्रय मिळत असे. ग्रंथ प्रकाशन आणि ग्रंथ वितरणासाठी संस्था काढावी, असा विचार सयाजीराव करू लागले आणि यातून इ. स. १८९७ ला ग्रंथ संपादक व प्रसारक मंडळी बडोद्यात सुरू झाली. लेखन गुण असलेल्या लेखकांना नवनवीन विषयांवर लेखन करण्यास सयाजीराव प्रोत्साहन देऊ लागले, सूचना करू लागले. अशा लेखकांपैकी होते रा. नागेशराव विनायक बापट, जे मराठीतील हरी नारायण आपटेंच्या समकालीन एक महत्त्वाचे ऐतिहासिक कादंबरीकार होते. रा. बापट हे बडोद्यात मामलेदार पदावर काम करत होते. त्यांनी 'पानपतची मोहीम' ही ऐतिहासिक कादंबरी लिहिली. बडोद्याच्या ग्रंथसंपादक व प्रसारक मंडळीने ती इ. स. १८९७ साली प्रकाशित केली.

रा. नागेश बापट हे इंग्रजी शिक्षण घेऊन, मराठीसोबत संस्कृत, हिंदी, कानडी, गुजराती असे बहुभाषिक लेखक होते. त्यांनी विविध प्रकारचे दहा ग्रंथ लिहिले.

या खंडामध्ये नागेशराव बापट यांच्या श्रीमंत बाजीराव बल्लाळ,

श्री महाराणी जमनाबाई साहेब यांचे चरित्र, लिक्लेअर या चरित्रांचा समावेश करण्यात आला आहे. पहिले बाजीराव पेशवे या ऐतिहासिक पराक्रमी पुरुषाची चरित्रकथा लेखकाने रंजक आणि प्रत्येकाने विचार करावा अशी लिहिली आहे. त्याचप्रमाणे श्री जमनाबाई साहेब यांचे चरित्र लिहून त्यांच्या अंगच्या अनेक थोर गुणांचे वर्णन फारच सुंदर रीतीने केले आहे. उद्योजकतेला आणि उद्यमशीलतेला प्रेरणा देणारी लिक्लेअर ही लघु कादंबरीही मुळातून वाचण्यासारखी आहे.

या व्यतिरिक्त कै. नागेशराव बापट यांच्या 'श्रीमंत बाजीराव बल्लाळ' या पुस्तकाला त्या काळी 'दक्षिणा प्राईझ'चा पहिला पुरस्कार मिळाला होता. या पुरस्कार देणाऱ्या संस्थेबद्दल सविस्तर माहिती या खंडात देण्यात आली असून ही माहिती परिशिष्ट या भागात देण्यात आली आहे.

गेली काही वर्षे महाराजा सयाजीराव गायकवाड यांच्या संबंधी लेखन करण्याच्या निमित्ताने डॉ. नीळकंठ बापट यांची ओळख होत गेली. मराठीतील एक महत्त्वाचे कादंबरीकार आणि चरित्रकार असलेल्या बापटांचे निवडक साहित्य महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाने प्रकाशित करावे, अशी कल्पना पुढे आली. डॉ. नीळकंठ बापट यांनी हे काम एक सांस्कृतिक जबाबदारी म्हणून स्वीकारले. त्यांनी परिश्रमपूर्वक रा. नागेश बापट यांचे दुर्मिळ ग्रंथ मिळविले. मंडळासाठी संपादनाची जबाबदारी स्वीकारली. यातील 'नागेश विनायक बापटलिखित चरित्रे - श्रीमंत बाजीराव बल्लाळ, श्री महाराणी जमनाबाई साहेब गायकवाड आणि लिक्लेअर' हा दुसरा खंड प्रकाशित करत आहोत. गेल्या शतकातील महत्त्वाच्या लेखकाचे अक्षरधन या निमित्ताने वाचकांना उपलब्ध होत आहे, याचे मंडळास समाधान होत आहे.

**बाबा भांड**
**अध्यक्ष**
महाराष्ट्र राज्य साहित्य
आणि संस्कृती मंडळ
मुंबई

## अनुक्रमणिका

श्रीमंत बाजीराव बल्लाळ /५१-२२८
श्री महाराणी जमनाबाई साहेब यांचे चरित्र /२२९ ते ३४४
लिक्लेअर /३४५ ते ३७७
परिशिष्ट - दक्षिणा प्राईझ /३७९ ते ४४८

# नागेश विनायक बापट यांचा अल्पपरिचय

एकोणिसाव्या शतकातील प्रथितयश साहित्यिक कै. नागेश विनायक बापट (१८३९-१९०२) यांनी १८७८ ते १९०२ या काळात एकूण दहा पुस्तके लिहिली. ती प्रामुख्याने ऐतिहासिक व प्रेरणादायी स्त्री-पुरुषांची चरित्रे आहेत आणि ऐतिहासिक घटनांवर आधारित कादंबऱ्या व कथा आहेत. त्यांची काही पुस्तके आज २१व्या शतकातही तेवढीच ताजी वाटतात हे त्यांच्या लेखनशैलीचे वैशिष्ट्य आहे यांत शंका नाही. त्यांची ‘पानपत’ ही कादंबरी संपादन करीत असताना बापटांविषयी आजच्या पिढीला माहिती होणे आवश्यक असल्यामुळे आपण त्यांचा थोडक्यात परिचय करून घेऊ.

**पूर्वेतिहास**

बापट हे कोकणस्थ ब्राह्मण. चित्पावन ब्राह्मण या नावानेही ते ओळखले जातात. ते मूळचे कोकणातले. सिंधुदुर्ग, रत्नागिरी, रायगड (कुलाबा) जिल्ह्यांत यांची वस्ती विखुरलेली आहे. समुद्र हटवून राहण्यासाठी योग्य भूभाग निर्माण करणे व तेथे मनुष्यवस्ती करणे याचे आद्य प्रवर्तक म्हणून श्रीपरशुराम यांचे नाव घेतले जाते आणि तेच चित्पावनांचे आद्य पुरुष असल्याचे मानले जाते. भारताच्या पश्चिम किनाऱ्यावरील या भूभागास अपरांत या नावानेही ओळखले जाते.

‘एके दिवशी श्रीपरशुराम यांना या अपरांत भूमीत काही मृतावस्थेतील मानवी शरीरे आढळली. तेव्हा त्यांनी आपल्यातील दैवी सामर्थ्याने त्या मृतांना सजीव केले,’ अशी पुराणकथा आहे. नवीन जीवन प्राप्त झालेले हे जीव चित्पावनांचे मूळ पूर्वज समजले जातात.

चित्पावन ब्राह्मणांची साठ आडनावे प्राचीन अशी समजली जातात. ती एकूण चौदा गोत्रांत विभागली आहेत. त्यातील ‘वसिष्ठ’ हे एक गोत्र आहे. त्यात बारा आडनावे आहेत. त्यातील ‘बापट’ हे एक नाव आहे. ऋग्वेदी व यजुर्वेदी अशा ब्राह्मणांच्या दोन प्रमुख शाखा आहेत. बापट हे कृष्ण यजुर्वेदी आहेत. मुख्यत: चित्पावन ब्राह्मणच आहेत. त्यांचा उल्लेख

पाचव्या शतकातील ताम्रपटातही आढळतो.

बापट या नावासंबंधी काही प्राचीन संदर्भही उपलब्ध आहेत.

१. काश्मीरचा कवी कल्हण याने लिहिलेल्या 'राजतरंगिणी'त बापट हे नाव सापडते.

२. बापट हे एका राणीचे नाव दिले आहे.

३. बापट हे सेनट यांचे पूर्वज व ते सेनापती असल्याचा त्यात उल्लेख आहे.

प्रा. ताकाखान यांच्या मते कोकणस्थांची नावे ग्रीक नावापासून आली आहेत. त्यात बापट यांचे नाव बापटे १) पेंटर्स, २) प्रीस्टस् ऑफ थारियन गॉडस् असे आहे; परंतु बापट हे नाव कसे प्रचारात आले याविषयी नक्की माहिती मिळत नाही.

बापटांचे मूळ गाव गुहागर मानले जाते. रत्नागिरी जिल्ह्यातील या तालुक्याच्या गावात व्याडेश्वराचे मंदिर आहे. व्याडेश्वर हे बापटांचे कुलदैवत, मूळ गाव सोडून बापटांची वस्ती अन्य चित्पावन घराण्यांप्रमाणे इतरत्र पसरत गेली. गेल्या तीनशे वर्षांतील बापट घराण्यांच्या वंशावळी आता 'बापट कुलवृत्तांत' या ग्रंथात उपलब्ध आहेत. त्या ग्रंथाच्या दोन आवृत्त्या १९५७ व २००८ साली प्रकाशित झाल्या. त्यात एकूण ११५ बापट घराण्यांची माहिती दिली आहे.

बापट कुटुंबीय आपले मूलस्थान गुहागर सोडून कोकणातील व देशावरील अनेक गावांमधून स्थायिक झाले. त्यामुळे व्याडेश्वर, गुहागरशिवाय अन्य ठिकाणची दैवतेही बापटांनी कुलदैवत म्हणून स्वीकारलेली आढळतात. उदा. पालशेत, वेळणेश्वर, आंजर्ले, गणपतीपुळे, नरसोबाची वाडी, वाई, औंध, गोळप, मेणवली, घाऊलवल्ली, देवाचे गोठणे, बेळगाव, इचलकरंजी इत्यादी.

नागेश विनायक बापट हे गुहागर तालुक्यातील पालशेत शाखेत जन्मले. पालशेत हे गाव गुहागरपासून सहा मैल दूर आहे. या घराण्याचे मूळ पुरुष विश्वनाथ (सन १७१८) हे होत. या वंशातील पहिल्या चार पिढ्यांतील सभासदांच्या व्यवसायांविषयी फारशी माहिती उपलब्ध नाही. बहुतेकजण शेती, वैद्यकी, पौरोहित्य असे व्यवसाय करत असावेत.

नागेश विनायक यांना तीन भाऊ होते. सर्वात मोठे वामन, नागेश

दुसरे, गोपाळ तिसरे व कृष्ण सर्वांत लहान. कृष्ण हे वाईत राहत. गोपाळ हे नोकरीनिमित्त विदर्भात गेले. ते अमरावती येथील सरकारी शाळेत मुख्याध्यापक होते. त्यांना राजाराम, रामचंद्र व व्यंकटेश हे तीन मुलगे होते. सर्वात मोठे वामन. त्यांना दामोदर हा मुलगा, तसेच अन्नपूर्णा तथा काशीताई (आपटे) व मनू (वेलणकर) या दोन मुली अशी तीन अपत्ये होती. नागेश यांना अपत्य नव्हते. म्हणून त्यांनी वामन यांची मुलगी मनू हिला दत्तक घेतले. नागेशांच्या आईचे नाव मथुरा व वडिलांचे नाव विनायक होते. फाटक कुटुंबातील उमा ही त्यांची पत्नी.

नागेश विनायक यांचे पणजोबा यशवंत रामचंद्र तथा नानाशास्त्री हे वेदविद्या व धर्मग्रंथ यांचे मोठे अभ्यासक होते. ते पेशव्यांचे सरदार रास्ते यांच्या आश्रयास होते. धर्मनिर्णयासाठी पेशव्यांकडून त्यांना पालखी येत असे. नागेशांचे आजोबा बाबूराव यशवंत हे औंध संस्थानात कारभारी होते. त्यांचा मुलगा विनायक बाबूराव हाही आपल्या वडिलांच्या निधनानंतर औंध संस्थानातच कारभारी म्हणून रुजू झाला. नोकरी जरी संस्थानच्या व्यवस्थेसंबंधी असली तरी विनायक बाबूराव एक विद्वान व रसिक गृहस्थ म्हणून प्रख्यात होते. चंपूकार विठ्ठलअण्णा दफ्तरदार हे थोर कीर्तनकार होऊन गेले. ते शीघ्रकवी व संस्कृत साहित्याचे अभ्यासक होते. त्यांच्या चरित्रात विनायकशास्त्रींविषयी उल्लेख येतो.

नागेश विनायक बापट यांचा जन्म व मृत्यूविषयी बापट घराण्यातील कागदपत्रांवरून काही माहिती मिळाली नाही किंवा त्यांच्या कुटुंबातील हयात व्यक्तींकडूनही माहिती मिळाली नाही. गं. दे. खानोलकरांनी त्यांच्या वाङ्मयसेवक या ग्रंथात त्यांची जन्मतारीख दिलेली नाही; परंतु सन १३ मे १८७३ रोजी बापटांनी मुंबईच्या गव्हर्नरला पत्र लिहिले आहे, त्या पत्रात ते आपले वय ३४ असल्याचे नमूद करतात. या पत्रावरून बापटांचा जन्म १८३९ साली झाल्याचा अंदाज करता येतो.

बापट हे बडोदे संस्थानात नोकरीस होते. तेथील सेवापुस्तकातील नोंदीवरूनही जन्मतारीख समजू शकली. हे सेवापुस्तक नोकर लोकांच्या हकीकतीचे पत्रक या नावाने प्रसिद्ध होत असे. या पत्रकात अधिकाऱ्याचे नाव, जात, उमर, राहणार, पगार, पगार वाढल्याची तारीख, नोकरी सुरू होण्याची तारीख, कुल नोकरीची मुदत, कायम जागेवर नोकरी तारीख,

पगार व हुद्दा असा तपशील दिलेला आहे. दि. ३१ जानेवारी १८९८ रोजी बापटांसंबंधी नोंद अशी होती.

वय ५८ वर्षे ६ महिने, नोकरी सुरू होण्याची तारीख १७ मे १८७६. नोकरीची मुदत २२ वर्षे ८ महिने १५ दिवस. या माहितीवरून असे समजते की, ३१ जुलै १८९९ रोजी त्यांचे वय ६० वर्षे होणार होते. त्यांची एकूण सेवा २३ वर्षे २ महिने १५ दिवस एवढी होती. नागेशरावांचा जन्म ३१ जुलै १८३९ या दिवशी झाला असावा हे अनुमान यावरून करता येते.

बापटांच्या मृत्यूविषयीही निश्चित माहिती उपलब्ध नाही, गं. दे. खानोलकर बापटांचा मृत्यू १९०२ साली झाल्याचे नमूद करतात, पण तारखेचा उल्लेख करत नाहीत. बापटांच्या नातेवाईकांनाही त्याची माहिती नाही. त्यावेळच्या वर्तमानपत्रात त्यासंबंधी काही बातमी आली होती का याचा शोध घेतला. त्यावेळच्या केसरीची मूळ प्रत पाहायला मिळाली नाही; पण केसरी कार्यालयाने त्याची संगणक प्रत उपलब्ध करून दिली. मार्च महिन्याच्या मंगळवारी प्रसिद्ध होणाऱ्या अंकात बातमी होती की, 'बापटांचे नुकतेच निधन झाले.' तेव्हा बापटांचा मृत्यू मार्च १९०२ मध्ये झाला हे अनुमान निघते.

**बापटांचे शिक्षण**

बापटांचे शिक्षण तीन स्तरांवर झाल्याचे दिसून येते. ते म्हणजे घरी, शाळेत आणि कॉलेजात. बापट हे जातीने कोकणस्थ ब्राह्मण. त्या काळातील चालीप्रमाणे त्यांचे संस्कृत भाषा, वेदविद्या, पौरोहित्य यांचे शिक्षण घरीच झाले. बापटांना मोठा कौटुंबिक वारसा लाभला होता. त्यांच्या पणजोबांना धर्मनिर्णसासाठी पेशव्यांची पालखी येत असे. आजोबा व वडील औंध संस्थानात उच्चपदावर अधिकारी होते. ते नुसतेच अधिकारी नव्हते, तर ते रसिक, व्युत्पन्न ब्राह्मण होते. त्यांच्याविषयी मनात असलेला आदरभाव त्यांच्या पुस्तकांच्या अर्पणपत्रिकांवरून समजतो.

असा कौटुंबिक वारसा नागेश विनायकांना मिळाल्यामुळे त्यांचा संस्कृत व मराठी ग्रंथांचा अभ्यास सखोल झाला होता. त्यामुळेच निर्णयसागर प्रेसने जेव्हा ऋग्वेद छापण्याचे ठरवले तेव्हा त्यांच्या संपादनात नागेश विनायक बापट यांचा मोठा सहभाग असल्याचे दिसते. तसेच त्यांच्या

साहित्यकृतीत एखादा मुद्दा अधिक स्पष्ट करण्यासाठी त्यांनी दिलेले अनेक संदर्भ व अवतरणे त्यांचा सखोल आणि विस्तृत अभ्यास दर्शवतात. त्यांचे एक भाऊ कै. वामन विनायक हे वैदिक शास्त्री होते. दुसरे भाऊ कै. गोपाळ विनायक हेही अमरावती येथील म्युनिसिपल प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक म्हणून निवृत्त झाले व तिसरे भाऊ कै. कृष्णाजी विनायक हे अग्निहोत्री होते. थोडक्यात, घरातून पारंपरिक पद्धतीने बापटांना मिळालेले शिक्षणही अत्यंत सकस व मोलाचे होते.

बापटांचे शालेय शिक्षण हे सातारा येथील सरकारी इंग्लिश नॉर्मल शाळेत झाले. जुन्या पद्धतीच्या पाठशाळा बंद पडत होत्या. इंग्रजांनी नवीन शिक्षण पद्धती अवलंबिली होती. नॉर्मल स्कूल ही अशीच एक संस्था. तिचे वैशिष्ट्य म्हणजे ही शाळा त्यावेळच्या ट्रेनिंग कॉलेजला संलग्न होती. पारंपरिक शिक्षणाबरोबर आधुनिक काळात सुसंगत, विशेषत: ब्रिटिश राजवटीस अनुकूल व उपयुक्त असे शिक्षण देणे तेव्हा सुरू झाले होते. या शाळेत शिक्षण घेण्याची संधी बापटांना मिळाली. शिक्षणासाठी आपले मूळ गाव वाई सोडून ते सातारला येऊन राहिले. हा काळ १८५०च्या आसपासचा. जमखंडी संस्थानचे कारभारी धोंडो कृष्ण कानेटकर यांनी कोल्हापूरच्या ब्रिटिश रेसिडेंटला लिहिलेल्या पत्रात बापट सातारच्या शाळेत आपले विद्यार्थी होते असे नमूद केले आहे.

शालेय शिक्षण संपल्यावर पुढील शिक्षणासाठी बापट पुण्यास गेले. पेशवाई बुडून (१८१८) पुण्यात ईस्ट इंडिया कंपनीचे राज्य सुरू झाले होते. 'कंपनी राज्य' स्थिर झाले होते; पुणे हे त्या काळातील उच्च शिक्षणाचे प्रमुख केंद्र होते. मुंबई विद्यापीठ अजून अस्तित्वात यायचे होते.

**महत्त्वाच्या नोंदी**

१. नागेश विनायक बापट यांचा जन्म 'वाई', जिल्हा सातारा येथे दि. ३१ जुलै १८३९ रोजी झाला.
२. शालेय शिक्षणासाठी बापट यांनी सातारा येथील शासकीय शाळेत प्रवेश घेतला.
३. साताऱ्यातील शाळेतून प्राथमिक शिक्षण पूर्ण केल्यानंतर पुढील शिक्षणासाठी बापट पुण्यामध्ये सुमारे १० वर्षे (१८४९-५० ते १८५९-६०) राहिले.

४. शिक्षण पूर्ण केल्यावर बापटांना 'पोस्ट' खात्यात सरकारी नोकरी मिळाली. तत्कालीन कारवार जिल्ह्यातील 'कलटगी' नावाच्या गावात ते सन १८६६ पर्यंत राहिले.

५. सन १८६६ मध्ये पोस्ट खात्यातील नोकरी सोडून ते शिक्षण खात्यात डेप्युटी एज्युकेशन इन्स्पेक्टर म्हणून रुजू झाले.

६. सन १८७१ मध्ये त्यांची बेळगावला बदली झाली. याच वर्षी त्यांच्यावर कामात हलगर्जीपणा केल्याचे बालंट आले व त्यांना इंग्रज सरकारची नोकरी सोडावी लागली.

७. सन १८७२ ते १८७४ या काळात त्यांनी जमखंडी संस्थानची नोकरी केली व जमखंडीतच वास्तव्य केले.

८. सन १८७४ ते ७६ या काळात बापटांना बेकारीला तोंड द्यावे लागले. इंग्रज सरकारकडे ते या काळात आपल्यावर झालेल्या अन्यायाविरुद्ध दाद मागत होते. या निमित्ताने ते पुणे-मुंबई या शहरांना वारंवार भेटी देत.

९. सन १८७६ मध्ये बापटांना बडोदा संस्थानात नोकरी मिळाली. सन १९०१-०२ मध्ये बापट या नोकरीतून निवृत्त झाले. या नोकरीदरम्यान ते नवसारी, व्यारा, दामनगर, अमरोळी, कोडिनार, सिनोर, दहेगाव व खुद्द बडोदे अशा अनेक लहान-मोठ्या गावांत राहिले.

१०. निवृत्त झाल्यानंतर बापट सन १९०१-०२ साली फलटण येथे, आपल्या विवाहित कन्येच्या घरी (२२९, कसबा पेठ, फलटण, जिल्हा सातारा) राहावयास गेले; परंतु त्यानंतर अल्पकाळातच हृदयविकाराने मार्च १९०२ मध्ये त्यांचा आकस्मिक मृत्यू झाला.

**'वाई'**

बापटांना त्यांचे जन्मगाव वाई बालवयातच सोडावे लागले. वयाच्या १०-१२ वर्षांपासून ते मृत्यू होईपर्यंत ते महाराष्ट्र, कर्नाटक, गुजराथ या प्रदेशांमधील अनेक गावांत-शहरांत राहिले; परंतु त्यांच्या जन्मगावाबद्दल त्यांना वाटणारे प्रेम कधीच कमी झाले नाही. वाई हे केवळ त्यांचे जन्मगाव नव्हते, तर त्यांच्या पूर्वजांची वस्ती तिथे तीन पिढ्यांपासून तरी होती. बापटांचे वडिलोपार्जित घरही वाईलाच होते. बापटांनी लिहिलेल्या पुस्तकांमध्ये लेखकाचे नाव 'नागेश विनायक बापट-वाईकर' असे आवर्जून छापलेले

आढळते.

पुण्यातील शिक्षण पूर्ण झाल्यावर, पुढे काय? हा प्रश्न बापटांसमोर नक्कीच उभा राहिला असणार. वेदविद्या आणि संस्कृत यांच्या ज्ञानावर चरितार्थ उत्तम रीतीने चालवणे दुरापास्त झाले होते. बापटांचे वडील विनायकराव औंध (जि. सातारा) संस्थानात कारभारी म्हणून नोकरीस होते. त्यांना पगारही चांगला असणार; परंतु असे दिसते की, याच काळात कधीतरी विनायकरावांचे निधन झाले. त्यांच्या बंधूंची नेमणूक औंधच्या राजेसाहेबांनी कारभारीपदावर केली. पितृछत्र हरपले आणि मासिक वेतनही बंद झाले. नागेशराव बापटांना आता आपल्या कुटुंबासाठी अर्थार्जन करणे आवश्यक होते. त्यासाठी सर्वात उत्तम मार्ग इंग्रज सरकारची नोकरी करणे हाच होता!

नागेशरावांना पुण्यापासून दूर, ३५० कि. मी. वर असलेल्या कलटगी या गावी पोस्ट ऑफिसात नोकरी मिळाली (सन १८५९). कलटगी या गावी इंग्रज सरकारची लष्करी छावणी होती. इंग्रज घोडदळाचा मुक्काम या गावी असे. एकेकाळी मुंबई इलाख्यात असलेले हे गाव आता कर्नाटकातील कारवार जिल्ह्यात आहे. कलटगी या गावात बापट सुमारे आठ वर्षे राहिले. पोस्टातील त्यांचे काम त्यांच्या वरिष्ठ इंग्रजी अधिकाऱ्यांच्या पसंतीस उतरले. किंमटन, अँड्र्यूज या अधिकाऱ्यांनी त्यांना प्रशस्तिपत्रकेही दिली.

कलटगीस असताना बापटांना एक बढतीही मिळाली. जवळच असलेल्या कारवार या मोठ्या गावात बदली करण्याचे आश्वासनही मिळाले. बापटांसाठी मात्र ही बदली थोडी अडचणीची ठरली. त्या काळात कारवारमध्ये हिवतापाचा (मलेरिया) फार प्रादुर्भाव होता. या तापावर आता परिणामकारक औषधे सहज, स्वस्त व मुबलक उपलब्ध आहेत. त्या काळात मात्र हिवताप एकदा अंगात शिरला की माणसाची पाठ सोडत नसे. एकंदर परिस्थितीचा विचार करून बापटांनी ही बढती व बदली नाकारली.

याच काळात कर्नाटक भागातील एक वरिष्ठ शिक्षणाधिकारी मेजर वॅडिंग्टन यांचा बापटांशी परिचय झाला. बापटांचे शिक्षण, व्यक्तिमत्त्व व कार्यक्षमता वॅडिंग्टन साहेबांच्या पसंतीस उतरली असावी. त्यांनी बापटांना इंग्रज सरकारच्या शिक्षण खात्यात डेप्युटी एज्युकेशनल इन्स्पेक्टर हे पद देऊ केले. आताप्रमाणे सरकारच्या एका खात्यातून दुसऱ्या खात्यात

बदलीवर न जाता बापट आपल्या पोस्टातील नोकरीचा राजीनामा देऊन शिक्षण खात्यात रुजू झाले. त्यांना धारवाड येथे जाऊन आपला कार्यभार स्वीकारण्यास सांगण्यात आले. सन १८६६ मध्ये बापट कलटगी सोडून धारवाडला स्थायिक झाले.

आताच्या सारखी बस किंवा रेल्वेची सुविधा त्या काळात उपलब्ध नव्हती. पक्के रस्तेही फारसे नव्हतेच. लांबचा प्रवास करायचा तर बैलगाडीमधून किंवा घोड्यावर बसून. प्रवासाच्या प्रत्येक टप्प्यावर वाहन बदली करावे लागे. बऱ्याच वेळा काही अंतर पायीही चालावे लागे. एकूणच प्रवास ही मोठ्या दगदगीची, खर्चाची आणि काही प्रमाणात धोक्याचीही बाब होती. बापटांना त्यांच्या आयुष्यात असे लांबचे प्रवास अनेक वेळा करावे लागले.

धारवाड हे आजच्या कर्नाटक राज्यातील जिल्ह्याचे ठिकाण आहे. पूर्वी हा भाग पेशव्यांच्या ताब्यात असल्याने इथे मराठी भाषक लोकांची वस्तीही मोठ्या प्रमाणात होती. कलटगीसारख्या गावातून धारवाडला झालेल्या बदलीने बापटांना मोठाच दिलासा मिळाला असेल. त्यांची नवी नोकरीही अधिक प्रतिष्ठेची होती. डेप्युटी एज्युकेशनल इन्स्पेक्टर हे राजपत्रित अधिकारी पद होते. शिक्षण खात्यात भारतीय माणसाला इंग्रजांच्या राजवटीत त्या काळात मिळू शकणारा हा सर्वोच्च अधिकार होता. खेड्यापाड्यांमध्ये हिंडून नव्या शाळा काढणे, त्यासाठी लोकवर्गणी जमा करणे, शाळांच्या इमारतींच्या बांधकाम व देखभालीवर लक्ष ठेवणे, शाळा तपासणे अशी अनेक जबाबदारीची कामे बापटांना या पदावर राहून करावी लागणार होती. त्यात बापटांसमोर मुख्य अडचण अशी होती की, ते मराठी भाषक होते आणि ज्या भागात त्यांना शिक्षण प्रसार करण्याचे काम मिळाले होते तो कानडी भाषकांचा होता. बापटांचे अनेक सहकारी व त्यांच्या हाताखाली काम करणारे कर्मचारी कानडी होते, तर बापटांचे वरिष्ठ अधिकारी इंग्रजी होते. परकीय अमलाखाली असलेल्या परभाषिक प्रदेशात आपल्या कार्यालयामध्ये संघभावना निर्माण करून चांगले काम करून दाखविणे अवघडच होते. सन १८७१ पर्यंत बापटांनी धारवाडला काम केले. त्यानंतर त्यांची बदली बेळगाव इथे झाली.

शिक्षण खात्यामधील नोकरीत बापटांना त्यांच्या सहकारी कर्मचाऱ्यांकडून फार त्रास झाला. या संदर्भात त्यांना अनेक वेळा कोर्ट-कचेऱ्याही कराव्या

लागल्या. शक्यता अशी वाटते की, या काळात बापटांच्या सहकाऱ्यांनी वरिष्ठ इंग्रज अधिकाऱ्यांचे कान फुंकण्याचे कामही केले असावे. बेळगावला बदली झाल्यावर थोड्याच काळात बापटांवर कामात हलगर्जीपणा केल्याचा आरोप ठेवण्यात आला. शिक्षण खात्यामार्फत त्यांची चौकशी होऊन त्यांना नोकरीवरून दूर करण्यात आले. सन १८७२ मध्ये या प्रतिष्ठेच्या नोकरीमधून दूर केल्यावर बापटांना जमखंडी या छोट्या संस्थानच्या गावात कमी पगाराची नोकरी स्वीकारावी लागली.

जमखंडी संस्थानचे कारभारी धोंडो कृष्ण कानेटकर हे पूर्वी सातारा येथील शाळेत बापटांचे शिक्षक होते. त्यांच्या ओळखीने इंग्रज सरकारची गैरमर्जी झालेल्या बापटांना जमखंडीमध्ये नोकरी मिळाली. जमखंडी आता कर्नाटक राज्यात असले तरी त्याचे संस्थानिक पटवर्धन मराठी होते. त्यांनी बापटांना असा आधार देऊ करण्यात काही वावगेही नव्हते; परंतु ही कमी पगाराची व प्रतिष्ठेची नोकरीही बापटांना शांतपणे करता आली नाही. जमखंडी संस्थानच्या इंग्रज पॉलिटिकल एजंटचा ससेमिरा बापटांच्या मागे लागला. इंग्रज सरकारने नोकरीतून काढून टाकलेल्या व्यक्तीला संस्थानच्या नोकरीत ठेवण्यासाठी पॉलिटिकल एजंटची संमती आवश्यक असे. अशी परवानगी देण्यास इंग्रज एजंट तयार नव्हते. कदाचित बापटांच्या राजकीय मतांविषयी या इंग्रज अधिकाऱ्यांच्या मनात काही संशय असू शकेल. सन १८५७ चा उठाव होऊन जेमतेम पंधरा वर्षे होत होती. या उठावाचा एक प्रमुख सूत्रधार नानासाहेब पेशवा हा जातीने कोकणस्थ ब्राह्मण व पुण्याच्या परिसराशी लागेबांधे असलेला! त्यामुळे तत्कालीन इंग्रज अधिकारी पुण्याच्या व आजूबाजूच्या गावांमधील नवशिक्षित कोकणस्थ ब्राह्मण तरुणांकडे, त्यांच्या हालचाली व राजकीय मतांकडे बारकाईने लक्ष ठेवूण असणे स्वाभाविक होते. कदाचित बापटांवर नोकरीत झालेले आरोप व त्यानंतर जमखंडीसारख्या छोट्या (शहराची लोकसंख्या तेव्हा सुमारे १५,०००) संस्थानातही नोकरी करण्यावर इंग्रज सरकारने घेतलेला आक्षेप ही एक राजकीय खेळी असू शकेल. सन १८७४ मध्ये म्हणजे सुमारे दोन-तीन वर्षांतच बापटांना ही नोकरीही सोडावी लागली.

सन १८७४ ते १८७६ या काळात बापटांनी कोणतीच नोकरी केली नाही. या काळात ते इंग्रज सरकारने आपल्यावर केलेल्या अन्यायाविरुद्ध

दाद मागण्याचा प्रयत्न करीत होते. अखेर हा प्रयत्न यशस्वी होणे शक्य नाही याची जाणीव त्यांना झाली असावी. सन १८७६ मध्ये बापटांना बडोदा संस्थानात नोकरी मिळाली. यावेळी बापटांचे वय सदतीस वर्षांचे होते.

वयाच्या विसाव्या वर्षी बापट पुणे सोडून कलटगीला गेले. पुढील पंधरा वर्षे ते कानडी मुलुखात राहिले. त्यानंतरची दोन वर्षे मुंबई-पुणे-वाई इथे राहून ते आता पुन्हा एकदा दूर गुजराथी मुलखात निघाले होते. त्यांच्यासोबत पत्नी उमाबाई होत्या. आपल्याला आता मूलबाळ होण्याची शक्यता नाही हे बापटांना या वेळेपर्यंत जाणवलेच असेल. कर्नाटकातील आठवणी कटूच होत्या. जन्मगावाचे प्रेम वगळता बांधून ठेवणारे कोणते पाशही नव्हते. दूर गुजराथमध्ये कोल्हापूरच्या पॉलिटिकल एजंटचा जाच होण्याची शक्यता धूसर होती. बापट एका नव्या उमेदीने, नवा डाव मांडण्यासाठी बडोद्याला निघाले.

आपल्या आयुष्याची पुढची पंचवीस वर्षे त्यांनी मोठ्या निष्ठेने बडोदा संस्थानची नोकरी केली. त्यांच्या सुदैवाने त्यांना महाराज सयाजीराव गायकवाडांसारखा उमदा, गुणग्राहक आणि सुधारणावादी धनी भेटला. बापट लेखक म्हणून उदयाला आले आणि प्रतिष्ठा पावले, ते त्यांच्या या नोकरीच्या काळात! इथेही त्यांच्या अनेक बदल्या झाल्या. संस्थानच्या विविध सरकारी विभागांमध्ये त्यांना काम करावे लागले; पण राज्यकारभार मराठी भाषेमधूनच होत असल्याने भाषिक विद्वेष नव्हता. बापटांना आपली नोकरी सांभाळून व्यासंग वाढवता आला. सयाजीरावांनी त्यांच्या लेखनाला सक्रिय प्रोत्साहन दिले.

सन १९०१ मध्ये बापट बडोदा संस्थानच्या सेवेमधून निवृत्त झाले. या दरम्यान त्यांनी आपल्या बंधूची मुलगी मनुताई हिला दत्तक घेतले होते. मुलगा दत्तक न घेता त्यांनी परंपरा तर बाजूला ठेवलीच होतीच; पण आपली सुधारणावादी मते प्रत्यक्ष अमलात आणून दाखवण्याचे धाडसही केले होते. आपल्या या दत्तक कन्येचे लग्न बापटांनी फलटण शहरातील वेलणकर घराण्यात लावून दिले होते. बापटांच्या जावयांचे नाव लक्ष्मणराव. निवृत्तीनंतर बापट फलटण येथे आपल्या मुलीच्या घरी राहू लागले. त्यानंतर लवकरच मार्च १९०२ मध्ये बापटांचे फलटण इथे निधन झाले.

बापटांच्या पत्नी उमाबाई त्यानंतरही आपल्या लेकीकडेच राहिल्या. त्यांचेही निधन फलटणलाच झाले.

नोंद करण्यासारखा मुद्दा असा की बापटांच्या, ‘पानपतची मोहीम’ या सर्वात प्रसिद्ध पुस्तकाच्या अनेक प्रती फलटण संस्थानचे राजा व प्रजा यांनी आवर्जून खरेदी केल्या होत्या. मराठी माणसाच्या इतिहासप्रेमाचा तो जणू दाखलाच होता!

**बडोदे संस्थानातील नोकरी**

बडोदा किंवा बडोदे या संस्थानची स्थापना छ. शाहू महाराजांच्या काळात पिलाजी गायकवाड या सरदाराने केली. पेशवाईच्या अंतानंतर ब्रिटिश अंमल सुरू झाला. बडोदा संस्थानचे स्वातंत्र्य संपुष्टात येऊन ते ब्रिटिश राज्याचे एक मांडलिक संस्थान म्हणून अस्तित्वात राहिले. इंग्रजी काळात त्याचे नामकरण बरोडा असे झाले. मूळ गाव वडोद्रा असे होते आणि सध्या तेच नाव प्रचलित आहे. भारताला स्वातंत्र्य मिळाल्यावर बडोदे संस्थान भारतीय संघराज्यात सामील झाले. सुरुवातीला ते मुंबई प्रांताचा एक भाग होते. त्यानंतर मुंबई प्रांताचे विभाजन होऊन गुजराथ, महाराष्ट्र व कर्नाटक असे तीन भाग झाले. आज बडोदा हे गुजराथ राज्याचा एक भाग आहे.

बापटांना कोल्हापूरच्या पोलिटिकल एजंटने घेतलेल्या हरकतींमुळे जमखंडी संस्थानातील नोकरी सोडावी लागली. काही काळ बापटांना बेकारीला तोंड द्यावे लागले. शेवटी बेळगाव, धारवाड, जमखंडी या कानडी मुलखापासून दूर गुजराथमध्ये जाण्याचे बापटांनी ठरवले. बडोदे संस्थानचे अधिपती मराठी भाषक होते. बापटांना बडोदे संस्थानात अल्प पगारावर का होईना पण नोकरी लागली.

चीफ मॅजिस्ट्रेटच्या ऑफिसात १७ मे १८७६ रोजी ते इंग्रजी क्लार्क म्हणून नोकरीवर रुजू झाले. पुढे १७ मे १८७७ ला त्यांना कायम स्वरूपाची नोकरी लागली. नोकरीच्या काळात त्यांनी वेगवेगळी पदे भूषविली. जकात इन्स्पेक्टर, वहिवाटदार, इंग्रजी क्लार्क, अकौंटंट, दरोगे, ऑडिटर, हेड क्लार्क इत्यादी. बडोद्यात त्यांनी शिक्षणखात्यात नोकरी केली नाही. त्यामुळे पोलिटिकल एजंटचा त्रास टळला. नवसारी, व्यारा, दामनगर, अमरोळी, कोडिनार, सिनोर, दहेगाव इत्यादी लहान-मोठ्या गावात त्यांनी

नोकरी केली. पुढे कायमस्वरूपी नेमणूक मिळाल्यावर पगार कमी होत असे. उदा. बडोदे येथे त्यांना कायमस्वरूपी वहिवाटदाराची नोकरी मिळाली व त्यांचा पगार १२५ रु. ऐवजी १०० रु. झाला. नोकरीच्या सुरुवातीला बापटांना रु. ४० पगार होता. निवृत्तीच्या वेळी पगार रु. १०० झाला. ब्रिटिश अमदानीत बापटांना पगार चांगला होता (रु. १००); पण ती नोकरी सुटली आणि जमखंडीला महिना रु. ३० या पगारावर समाधान मानावे लागले. बडोदे येथेही नोकरीची सुरुवात रु. ४० (दरमहा) ने झाली. पण पुढे त्यात वाढ झाली. सन १८८३ मध्ये बापटांना नोकरीत बढती मिळाली. वहिवाटदार ही मुलकी खात्यातील प्रतिष्ठेची नोकरी होती. ती त्यांना ८३ सालापासून मिळाली. या नोकरीचा भाग म्हणून त्यांना खेडोपाडी फिरावे लागे. वहिवाटदार म्हणून जमिनीबाबतचे अनेक अधिकार असत. त्यामुळे ग्रामीण भागात वहिवाटदार तथा मामलेदाराला मोठा मान असे.

बडोदे संस्थानचा कारभार अनेक खात्यांमध्ये विभागलेला होता. हुजूर, राज्यकारभार, मुलकी, खजिना, जंगल, जकात, अबकारी, अफीम, स्टॅम्प, इनसाफ, नोंदणी, पोलीस, जेल, शाळा, दवा, इमारत, सुधराई इत्यादी. बापटांनी त्यांच्या कार्यकाळात राज्यकारभार, मुलकी, खजिना, अबकारी या खात्यांमध्ये नोकरी केली. जास्त करून मुलकी खात्यात वहिवाटदार म्हणून काम केले. १७ मे १८७६ रोजी त्यांनी बडोदे संस्थानात नोकरी सुरू केली व पंचवीस वर्षे दोन महिने पंधरा दिवसांनी म्हणजे ३१ जुलै १९०१ रोजी निवृत्त झाले.

**बापटांचे इंग्रजी लिखाण**

बापटांचे पारंपरिक पद्धतीने संस्कृतचे शिक्षण घरी झाले होतेच. सन १८५२ पासून पूना कॉलेजमध्ये इंग्रजी शिक्षणाची व्यवस्था झाली. बापट या संस्थेतील सुरुवातीच्या विद्यार्थ्यांपैकी एक होते. त्या काळात इंग्रजी शिक्षण घेतलेल्या भारतीयांची संख्या अर्थातच अत्यल्प होती. त्यामुळे इंग्रजी लिहिता-वाचता येणाऱ्या इसमाला इंग्रज कंपनी सरकार किंवा भारतीय संस्थानिक यांच्या पदरी सहज नोकरी मिळत असे.

पूना कॉलेजमधील इंग्रजीच्या अभ्यासक्रमात इंग्रजी जोडलिपीतील (running script) लिखाणाचा समावेश होता. अचूक स्पेलिंग, चांगले व्याकरण आणि वळणदार अक्षर यांची आवश्यकता शासकीय सेवेत अभिप्रेत होती.

पत्रलेखन हासुद्धा शासकीय कर्मचाऱ्याच्या सेवेचा आवश्यक भाग होता. त्यामुळे अभ्यासक्रमामध्ये या गोष्टींना निश्चितच महत्त्वाचे स्थान असणार.

बापटांचे इंग्रजी लिखाण म्हणजे त्यांनी त्यांच्या नोकरीच्या निमित्ताने विविध अधिकाऱ्यांशी केलेला पत्रव्यवहार आहे. यातील काही पत्रे आजही उपलब्ध आहेत. त्या काळात टाईपरायटरसुद्धा अस्तित्वात नसल्यामुळे ही पत्रे अर्थातच 'हस्तलिखित' आहेत. या पत्रांवरून असे लक्षात येते की, बापटांचे हस्ताक्षर ठसठशीत, स्वच्छ आणि सुवाच्य होते. पत्राचा कच्चा मसुदा आधी लिहून ठेवण्याची पद्धत असावी, कारण पत्रांमध्ये खाडाखोड अजिबात नाही. अक्षर वळणदार आणि ओळी सरळ रेघेत आहेत. दोन ओळींमधील अंतरही सारखेच राखले आहे. हे झाले बापटांच्या इंग्रजी हस्तलेखनाचे बाह्यरंग.

बापटांनी नरगुंद येथे शास्त्री मंडळींची मोठी सभा भरवली होती. इंग्रज सरकारकडे शिक्षणाधिकारी म्हणून काम करीत असताना बापटांनी कोणत्या हेतूने परंपराप्रिय शास्त्रपंडितांना एकत्र बोलावले असेल? हा विचार करण्याजोगा मुद्दा आहे. कदाचित त्यांना या सनातनी मंडळींना आधुनिक शिक्षणाचे महत्त्व पटवून देऊन त्यांचे सहकार्य मिळवायचे असेल, स्त्री शिक्षणाला असलेला त्यांचा विरोध कमी करायचा असेल. खुद्द बापटांचे घराणेही या शास्त्री-पंडित परंपरेमधीलच होते. कदाचित बापटांना आपल्या 'वैभवशाली' इतिहासाचे स्मरण त्यांना करून द्यायचे असेल!

**प्रेरणा**

बापटांनी एकूण दहा पुस्तके लिहिली. त्यांचे हे लेखन निर्हेतुक नव्हते. त्यामागे काही सुस्पष्ट विचार होते. काही हेतू त्यांनी स्वत:च सांगितले आहेत, तर काही त्यांच्या लेखनामधून आपल्या समोर येतात.

पारंपरिक वैदिक शिक्षण घेतलेला हा सातारा जिल्ह्यातील वाईसारख्या सनातनी गावात जन्मलेला तरुण पुण्यासारख्या इंग्रजांच्या प्रभावाखाली असलेल्या मोठ्या शहरात शिक्षणासाठी आला. पेशवाईचा अस्त नुकताच झाला होता. नवीन राजवट इंग्रजांची होती. त्या राजवटीशी कसे वागावे हेच लोकांना कळत नव्हते. पराभूत समाजाची मन:स्थिती जाणून घेतल्याशिवाय बापटांच्या लेखनामागील प्रेरणांचा शोध घेता येणार नाही. धर्म, भाषा, संस्कृती, तंत्रज्ञान, नवीन शासन पद्धती या प्रत्येक बाबतीत सगळीकडे

अस्वस्थता होती. हजारो वर्षे समाज ज्या 'सनातन' धर्माचे पालन करीत होता, त्याच्या अस्तित्वालाच आता आव्हान दिले जात होते. हे आव्हान मुसलमानांनी केलेल्या मूर्तिभंजनाच्या आणि सक्तीच्या धर्मांतरांच्या प्रयत्नांहून वेगळे होते.

ख्रिस्ती धर्माचा प्रसार करणारे मिशनरी पुण्याच्या चौका-चौकातून उभे राहून हिंदू धर्माची नाचक्की करीत होते. प्रत्यक्ष देवाच्या पुत्राने सांगितलेल्या सद्धर्माची महती गात होते. लोक आपल्या धर्माच्या खरेपणाविषयी आणि देव-देवतांच्या अस्तित्वाविषयी साशंक झाले होते. राजवट इंग्रजांची होती. ख्रिस्ती मिशनऱ्यांचा प्रतिवाद करण्याचे धाडस पराभूत मनोवृत्ती करू शकत नव्हती. लोकहितवादीसारखे नवशिक्षित स्वधर्मीयही शतपत्रांमधून स्वत:च्या पराभूत धर्माची खिल्ली उडवीत होते. जी गत धर्माची तीच गत भाषेचीही झाली होती. 'संस्कृत' भाषेला ज्ञानभाषा म्हणून संपूर्ण भारतात मानाचे स्थान होते. नव्याने उघडलेल्या शाळा-कॉलेजांमधून संस्कृत हळूहळू हद्दपार होत होती. शिक्षणतज्ज्ञ, कलेक्टर-कमिशनर यांसारखे वरिष्ठ शासकीय अधिकारी संस्कृतचे शिक्षण देण्याला प्रखर विरोध करीत होते.

'गेली पंचवीस वर्षे संस्कृत शिक्षणावर ब्रिटिश शासनाने पुरेसा खर्च करूनही ते शिक्षण घेतलेला एकही विद्यार्थी ब्रिटिश शासनात नोकरीसाठी आला नाही.'

ही या अधिकाऱ्यांची प्रमुख तक्रार होती. आयुष्यातील पंधरा वर्षे व्याकरण, तर्कशास्त्र आणि वेद पाठांतर करण्यात घालवली तर प्रत्यक्ष जीवनात त्याचा काय उपयोग? संस्कृत भाषेला अभ्यासक्रमातून बाहेर हुसकावण्यात आले. संस्कृत शिकलेले आणि शिकवणारे ब्राह्मण बेकार झाले. त्यांच्यात असंतोष निर्माण झाला. पेशवाईच्या काळात शासकही ब्राह्मणच होते. अन्यायाची दाद पुण्यातच लागत होती. आता शासक परधर्मीय, परभाषिक होते. अन्यायाविरुद्ध दाद मागण्यासाठी मुंबई-कलकत्त्याला जावे लागत होते. अंतिम निवाडा परदेशात-लंडनमध्ये होत होता.

इंग्रजांनी आणलेल्या तंत्रज्ञानाने तर सगळ्यांचेच डोळे दिपून गेले होते. रुळावरून धावणारी रेल्वे, मुंबईतील प्रशस्त रस्त्यांवरून धावणाऱ्या ट्रामगाड्या, क्षणात दूरवर संदेश पोहोचविणारी तारायंत्रे, माणसांची आणि निसर्गाची हुबेहूब प्रतिकृती उतरविणारी छायाचित्रे (Photographs) छपाई करणारी

यंत्रे, प्रकाशित होणारी दैनिके, साप्ताहिके, पुस्तके आणि या तंत्रज्ञानाच्या पाठीमागे उभी असणारी बलवान सैनिकी शक्ती आणि खंबीर शासन-व्यवस्था या सगळ्यांचा एकत्रित परिणाम होऊन लोक आपले आत्मभान हरवून आणि आत्मसन्मान गमावून बसले होते. १८५७ मध्ये दिल्लीचा बादशहा आणि नानासाहेब पेशवा यांनी केलेला उठाव व्यर्थ ठरला होता. झाशीची राणी लक्ष्मीबाई, तात्या टोपे आणि हजारो असंतुष्ट सैनिकांनी केलेले बलिदान वाया गेले होते. ज्याच्या आधाराने इंग्रजासमोर ताठ मानेने उभे राहावे असा मानबिंदूच समाजाला सापडत नव्हता.

नव्याने शिक्षण घेतलेल्या तरुणांकडे समाजाचे नेतृत्व जाणे स्वाभाविक होते. अशा तरुणांचा एक मोठा गट समन्वयवादी होता. त्यांना समाजापुढे असणारे प्रश्न आणि त्यांचे गांभीर्य समजत होते; पण त्याचबरोबर इंग्रजांशी दोन हात आजच न करता त्यांनी विद्या आत्मसात करून घ्यावी, आधुनिक शिक्षण घेऊन आपली कार्यक्षमता सिद्ध करावी, आपल्या धर्मात कालानुरूप सुधारणा कराव्यात, म्हणजे धर्मांतरे आपोआप थांबतील. आपल्या मातृभाषेत नवी पुस्तके लिहावीत, तिला समृद्ध करावे. आपल्या गौरवशाली इतिहासाची ओळख लोकांना करून द्यावी. त्यांचा वकूब वाढवावा. असे झाले म्हणजे आपल्या अंगी न्यायाने राज्यशासन करण्याचे सामर्थ्य येईल. मग इंग्रज आपणहूनच इथून निघून जातील अशी त्यांची धारणा होती. न्यायमूर्ती महादेव गोविंद रानडे अशा विचारवंतांचे अग्रणी होते.

याचवेळी नव्याने सुशिक्षित झालेल्या तरुणांचा दुसरा एक गट समाजाचे नेतृत्व करण्यासाठी पुढे सरसावत होता. या तरुणांना स्वदेश, स्वधर्म आणि स्वभाषा यांचा प्रखर अभिमान होता. इंग्रजांच्या न्यायबुद्धीवर त्यांचा विश्वास नव्हता. त्यांना पारतंत्र्यात राहणे मानहानीकारक वाटत होते आणि स्वराज्य-स्वातंत्र्य मिळवण्याची तळमळ त्यांना लागली होती. विष्णुशास्त्री चिपळूणकर आणि लोकमान्य टिळक या तरुणांचे नेते होते.

नागेश विनायक लेखक म्हणून घडले ते याच काळात. रानडे आणि टिळक या दोघांच्याही विचारांचा प्रभाव बापटांच्या लिखाणावर निश्चित पडलेला दिसतो. वैचारिकदृष्ट्या बापट न्यायमूर्ती रानड्यांच्या अधिक जवळचे असावेत. आपले प्रत्येक पुस्तक लिहून झाल्यावर बापट त्या हस्तलिखिताची एक प्रत न्यामूर्तींकडे अभिप्राय देण्यासाठी आवर्जून पाठवत असत. 'पानपतची

मोहीम' हे पुस्तक वाचून झाल्यावर न्यायमूर्ती लिहितात -

'हल्लीचा ग्रंथ (पानपतची मोहीम) सर्वांहून अधिक मान्यतेस प्राप्त होईल अशी त्याची रचना व भाषा साधली आहे. याकरिता ग्रंथकर्त्यांची तारीफ करावी तेवढी थोडीच आहे...पुस्तक सर्वांच्या आदरास प्राप्त असून बायका व पुरुष यांचे हाती जावयास हरकत नाही.'

बापटांच्या विचारांचा कल सुधारकांच्या बाजूने असला तरी इंग्रजांचे राज्य हे न्यायाचे राज्य आहे अशी त्यांची समजूत होणे शक्य नव्हते. त्यांच्यावर इंग्रज सरकारने नोकरीच्या काळात जे आरोप ठेवले, इंग्रज पॉलिटिकल एजंटने त्यांना जो त्रास दिला तो सहन केल्यावर, स्वदेश, स्वधर्म आणि स्वभाषा ही त्रिसूत्री त्यांच्या लेखनाचे प्रेरणास्थान बनणे अपरिहार्य होते. आपले विचार लोकांपर्यंत पोहोचविण्यासाठी बापटांनी आपला इतिहास, पुराणे आणि धर्मग्रंथ यांचा आधार घेतला. आपण निवडलेल्या कथांमधून आपल्याला अभिप्रेत असलेला बोध वाचकांपर्यंत पोहोचविता येईल अशी त्यांची धारणा होती.

'टिटवी'सारखी प्राचीन कथा असो किंवा 'चित्तुरगडचा वेढा'सारखे मध्ययुगीन कथानक असो, बापट त्यांचा संदर्भ सभोवतालच्या परिस्थितीशी लावण्याचा प्रयत्न करतात.

**बापटांची ग्रंथनिर्मिती**

बापटांनी एकून दहा पुस्तके लिहिली. त्यातील नऊ पुस्तकांचा शोध लागला. 'सुरस वाक्य रत्नावली' या पुस्तकाची प्रत मात्र कुठे मिळू शकली नाही. कै. सं. ग. मालशे यांनी आपली ग्रंथसंपदा एस. एन. डी. टी. विद्यापीठ, मुंबई यांना भेट म्हणून दिली. त्यांच्या पुस्तक यादीत 'सुरस वाक्य रत्नावली'चा उल्लेख आहे; पण पुस्तक मिळू शकले नाही. दाते सूचीत त्याचा संदर्भ मिळतो. 'वक्तृत्व' हे लेखन बालांकुर मासिकात प्रसिद्ध झाले. हे लेखन म्हणजे त्यांनी बडोदे येथे याच विषयावर दिलेल्या व्याख्यानांचा वृत्तांत आहे. अन्य लेखन कथारूपात आहे. 'वाक्य रत्नावली' व 'वक्तृत्व' हे कथाबाह्य लिखाण आहे. 'वाक्य रत्नावली' या नावावरून हा लेखनास साहाय्यभूत होणारा वाक्यसंग्रह असावा.

बापटांच्या लेखनाची एकूण पृष्ठसंख्या १४९१ इतकी आहे. बाजीराव पेशवे यांचे चरित्र हे त्यांचे पहिले पुस्तक. सन १८७८-७९ मध्ये ते प्रसिद्ध

झाले. त्याची पृष्ठसंख्या २३३ आहे. बाजीराव पेशव्यांवर लिहिलेले ते पहिले पुस्तक. त्याला त्यावेळचे प्रतिष्ठित 'दक्षिणा प्राईज' पारितोषिक मिळाले. ते निर्णयसागर या प्रसिद्ध प्रकाशन संस्थेने प्रसिद्ध केले. जावजी दादाजी (चौधरी) या उत्साही उद्योजकाने निर्णयसागर हा छापखाना व प्रकाशनगृह सुरू केले. एकोणिसाव्या शतकातील ते पहिले व्यावसायिक प्रकाशन होते. या पुस्तकाच्या अनेक आवृत्त्या निघाल्या. १९०३ च्या पाचव्या आवृत्तीची किंमत बारा आणे होती. पुस्तक २८ प्रकरणात विभागलेले आहे. १९२९ मध्ये त्या पुस्तकाची आठवी आवृत्ती निघाली.

'दादोजी कोंडदेव चरित्र' हे बापटांचे दुसरे पुस्तक. त्यालाही लोकांकडून उदंड प्रतिसाद मिळाला. आकाराने हे छोटे पुस्तक आहे. ४६ पृष्ठांचे हे पुस्तक पाच भागात विभागले आहे. त्याची पहिली आवृत्ती १८८१ मध्ये प्रसिद्ध झाली. पुढे त्याच्या सहा आवृत्त्या निघाल्या. १९१७ मध्ये त्याची सहावी आवृत्ती निघाली. हेही पुस्तक निर्णयसागरने प्रकाशित केले.

छत्रपती संभाजी महाराज यांच्या जीवनावर बापटांनी त्यांचे तिसरे पुस्तक लिहिले आहे. निर्णयसागर प्रेसने त्याची पहिली आवृत्ती १८८४ मध्ये प्रसिद्ध केली. पुस्तक २५२ पृष्ठांचे असून ते १५ भागात विभागले आहे. या पुस्तकाच्या पुढे आणखी दोन आवृत्त्याही निघाल्या.

१८९२ मध्ये 'सुभद्राहरण' हे पुस्तक प्रसिद्ध झाले. तेही 'निर्णयसागर' प्रेसने प्रकाशित केले. महाभारतातील कथानकावर आधारित हे पुस्तक लिहिलेले आहे. श्रीमद्भागवत दशमस्कंधापैकी अध्याय ८६ च्या आधारे हे पुस्तक लिहिले आहे. सुभद्रेचे लग्न कौरवपुत्र दुर्योधन याच्याशी करण्याचे तिचा भाऊ बलराम ठरवतो; परंतु ही गोष्ट श्रीकृष्णास मान्य नसते. त्याच्या मनाने सुभद्रा व पांडुपुत्र अर्जुन यांचे लग्न व्हावे असे असते. अर्जुनाची इच्छा तीच असते, अर्जुन यती वेशात डोंगरात उपासनेला बसतो. तेथे सुभद्रा देवदर्शनास आली असताना अर्जुन तिला रथात बसवून पळवून नेतो, अशी ही कथा आहे. पुस्तक २२ पानी असून त्याची किंमत १ आणा होती.

'टिटवी' ही एक प्राणीकथा आहे. ती बोधपर कथा असून श्रीधर कवीच्या जैमिनी अश्वमेध या ग्रंथातील आहे. टिटवीसारख्या एका लहान पक्षिणीने जिद्द, शहाणपण आणि एकीच्या बळावर समुद्रालासुद्धा हरवले व

आपली पिल्ले परत मिळवली. हे पुस्तक निर्णयसागर प्रेसने १८९३ मध्ये प्रसिद्ध केले.

१८९५ मध्ये लिक्लेअरचे चरित्र प्रसिद्ध झाले. लिक्लेअर हा फ्रान्स देशातील पॅरिसचा नागरिक, तो व्यवसायाने रंगारी होता. आपल्या उद्योगात त्याने आपल्या हाताखाली काम करणाऱ्यांनासुद्धा सामावून घेतले. धंद्याच्या मालकीत त्यांना सहभागी करून घेतले. आपल्या नफ्यातील वाटाही त्यांना दिला. सहकारी संस्था ही संकल्पना उद्योगधंद्यात रुजवली. २३ पानांचे हे छोटे चरित्र आहे. 'सहविचारिणी सभा' या संस्थेने ते प्रकाशित केले.

१८९५ मध्ये बापटांनी बडोदे येथे एका सभेत 'वक्तृत्व' या विषयावर व्याख्यान दिले. त्यावर आधारित 'वक्तृत्व' या विषयावर बालांकुर मासिकात निबंध प्रसिद्ध झाला.

'पानपतची मोहीम' हे आठवे पुस्तक. ते १८९७ मध्ये प्रसिद्ध झाले. या पूर्वीची पुस्तके निर्णयसागर प्रेस, मुंबई यांच्या मार्फत प्रकाशित झाली. हे पुस्तक मात्र बडोदे येथून 'दामोदर सावळाराम आणि मंडळी' यांनी प्रकाशित केले. श्री. यंदे यांनी पुढाकार घेऊन हे प्रसिद्ध केले, त्याची किंमत साडेतीन रुपये होती व पृष्ठे ६०० होती. पुस्तक प्रकाशनापूर्वी बापटांनी अनेक गावात पानिपत येथील युद्धसंग्राम या विषयावर व्याख्याने दिली. प्रकाशनपूर्व नोंदणी करणाऱ्यास सवलतीच्या दरात पुस्तक उपलब्ध करून दिले. वाचकांकडून त्यास अभूतपूर्व प्रतिसाद मिळाला. या पुस्तकाची दुसरी आवृत्ती १९२५ साली पुणे येथील सरस वाङ्मय मंडळी यांच्यामार्फत प्रसिद्ध झाली. त्याची किंमत सात रुपये होती. तिसरी आवृत्ती पुण्याहून ह. अ. भावे यांनी 'वरदा बुक्स'मार्फत १९९५ साली प्रसिद्ध केली. त्याची किंमत रु. १६० होती.

'पानपतची मोहीम'ची पहिली आवृत्ती ग्रंथसंपादक आणि प्रकाशक मंडळी यांनी प्रसिद्ध केली. ग्रंथप्रेमी लोकांनी एकत्र येऊन ही संस्था उभारली. त्याचा उद्देश असा होता.

''आमच्यात पुष्कळ विद्वान होतकरू मंडळी आहेत. ग्रंथ लिहिण्याची हौसही पुष्कळ आहे; परंतु द्रव्याच्या अडचणीमुळे आणि इतर दगदगीमुळे कोणी ग्रंथ लिहीत नाहीत. कोणी लिहिलाच तर त्यांच्याकडून प्रसिद्ध होऊ शकत नाही व कोणी छापून प्रसिद्ध केलाच, तर तो खपविण्याची व खर्च केलेली रक्कम वसूल करण्याची दगदग त्यास होत नाही, अशा अनेक

अडचणींमुळे आमच्या देशी भाषेत चांगले ग्रंथ निघू शकत नाहीत. ही अडचण दूर व्हावी हा या मंडळीचा मुख्य उद्देश आहे.

दुसरी गोष्ट अशी की, पुष्कळ ग्रंथप्रकाशक पुस्तकांची किंमत जास्त ठेवीत असल्यामुळे त्याचा लाभ सर्वांस सारख्या रीतीने घेता येत नाही. ही अडचणही होईल तितकी दूर करावी असा हेतू आहे. हल्ली मंडळी आपल्या कायमच्या वर्गणीदारास आपले ग्रंथ आठ पृष्ठास तीन पै या दराने देते; परंतु वर्गणीदारांची संख्या दोन हजारावर झाल्यास तीन पैत १२ पृष्ठेसुद्धा देऊ शकेल.''

अशा या ग्रंथउत्तेजक मंडळीने ग्रंथपरीक्षक मंडळी नेमली. त्याचे अध्यक्ष रा. रा. ब. संपतराव गायकवाड, एफ. आर. एस. एल., एफ. आर. जी. एस. बॅरिस्टर अॅट लॉ होते. त्यांना मदत करण्यासाठी वीस सभासद होते.

नागेश विनायक बापट हे त्यापैकी एक सभासद होते. दामोदर सावळाराम यंदे हे व्यवस्थापक होते. पानपतची मोहीम व महाराणी जमनाबाई गायकवाड ही बापटांची दोन पुस्तके ग्रंथ-संपादक व ग्रंथप्रकाशक मंडळी यांच्यामार्फत प्रकाशित झाली. 'पानपतची मोहीम' १८९७ मध्ये व 'जमनाबाई गायकवाड यांचे चरित्र' १९०० मध्ये प्रसिद्ध झाले.

१८९९ मध्ये निर्णयसागर प्रेसमार्फत 'चित्तूरगडचा वेढा' हे ९२ पृष्ठांचे पुस्तक प्रसिद्ध झाले. अकबराने १५६१ मध्ये चित्तूरगडला वेढा दिला व तो जिंकला. त्या लढाईत किल्लेदाराची पत्नी गुलाबबाई हिने धीराने, शौर्याने अकबराशी दोन हात केले. त्याचा वृत्तांत लघुकादंबरी रूपात बापटांनी दिला आहे.

**व्यासंग भाषेचा**

बापटांचा काळ हा १८३९ ते १९०२ आहे. बापट हे एका व्युत्पन्न ब्राह्मण कुटुंबात जन्मले. परंपरेने ते वैदिक ब्राह्मण होते. वेदाभ्यास हा कुटुंबात अनेक पिढ्या चालू होता. त्यामुळे संस्कृत भाषा ते चांगले जाणत होते. पारंपारिक शिक्षणाबरोबरच इंग्रजी अमदानीत सुरू झालेले शाळा कॉलेजात उपलब्ध झालेले शिक्षणही त्यांना मिळाले होते. इ. स. १८२१ मध्ये सुरू झालेल्या पूना कॉलेजमध्ये त्यांना शिक्षण घेता आले, त्यामुळे त्या काळात प्रतिष्ठित असलेल्या संस्कृत व इंग्रजी या दोन्ही भाषांचा अभ्यास करण्याची संधी त्यांना मिळाली. सन १८५७-५८ च्या सुमारास

पूना कॉलेजातील शिक्षण त्यांनी पूर्ण केले. मुंबईच्या निर्णयसागर प्रेसने ऋग्वेदाचे प्रकाशन केले. ही त्या काळातील अभूतपूर्व घटना होती. त्याच्या संपादनात बापटांचा प्रमुख सहभाग होता. पूना कॉलेजात शिकवले जाणारे विविध विषय (न्याय, व्याकरण, स्मृतिग्रंथ, काव्यशास्त्र, तर्कशास्त्र, ज्योतिष, आयुर्वेद) यामुळे त्यांची संस्कृत भाषेची जाण प्रगल्भ झाली. त्यांनी लिहिलेल्या पुस्तकात उद्धृत केलेली, संदर्भ दिलेली संस्कृत वचने हीही त्यांचा संस्कृत भाषेचा व्यासंगच दर्शवतो. कालिदासाची नाटके (शाकुंतल) रघुवंशासारखे काव्यग्रंथ, गीतेसारखे धर्मग्रंथ, वराहमिहीर यांसारखे ज्योतिर्विद, शिवचरित्रकार पुरुषोत्तम कवी, आयुर्वेद ग्रंथातले संदर्भ हे त्यांची संस्कृतची जाण दर्शवते. त्या संदर्भांमुळे त्यांच्या लिखाणालाही प्रतिष्ठा लाभली आहे. त्यांची सौंदर्यदृष्टी, साहित्यप्रेम, आपले लिखाण एककल्ली न ठेवता त्यात बहुश्रुतता दिसावी या जाणिवेनेच बापटांचे लिखाण संपन्न होताना दिसते.

बापटांचा इंग्रजी या नव्याने उदयाला आलेल्या भाषेशीही घनिष्ठ संबंध आलेला दिसतो. ते बारा वर्षे इंग्रजी नोकरशाहीत उच्च पदावर काम करत होते आणि तेही शिक्षणासारख्या विभागात. त्यांच्या काळात प्रशासकीय व्यवहाराची भाषा इंग्रजी होती, वरिष्ठांशी करावयाचा पत्रव्यवहार, अधिकृत अहवाल पाठवणे या गोष्टी इंग्रजी भाषेत होत्या. नोकरीत असताना त्यांच्यावर बालंट आले आणि त्या निमित्ताने त्यांना कोर्ट-कचेरी करावी लागली, वरिष्ठांना पत्रे लिहावी लागली, शिक्षण विभागाच्या चौकशीला सामोरे जावे लागले व शेवटी लंडन येथील 'सेक्रेटरी ऑफ स्टेट' यांच्याशीही पत्रव्यवहार करावा लागला. हे सर्व इंग्रजी भाषेतच करावे लागले. त्या पत्रव्यवहारावरून त्यांचे इंग्रजी भाषेवरील प्रभुत्व दिसून येते. कायद्याची भाषा, इंग्रजी पत्रव्यवहाराची भाषा त्यांना चांगली अवगत झाली होती. त्यांनी इंग्रजी शिक्षण पूना कॉलेजात घेतले व त्यात प्रावीण्य मिळवले, त्यांच्या इंग्रजीतील प्रावीण्याचा उल्लेख केलेला आहे. इंग्रजीतील प्रावीण्यामुळेच त्यांना जमखंडी व बडोदा येथे इंग्लिश क्लार्क म्हणून नोकरी मिळाली. त्यांचे इंग्रजी पुस्तकांचे विशेषत: कथा, कादंबऱ्या, वैचारिक लेखन यांचे विस्तृत वाचन होते. त्यांच्या लेखनात इंग्रजी साहित्यिक व विचारवंत यांचा उल्लेख येतो व त्यांच्या प्रसिद्ध इंग्रजी साहित्यासारखे दर्जेदार साहित्य मराठीत निर्माण व्हावे अशी इच्छा व्यक्त करतात. विशेषत: स्कॉट,

रेनॉल्डस् या लेखकांचा ते आवर्जून उल्लेख करतात. असे असले तरी बापट आपल्या कथा, कादंबऱ्यात संस्कृत व मराठी पूर्वलक्षी लेखकांची अवतरणे देतात; पण इंग्रजी लेखकांची अवतरणे क्वचितच देतात. पण आपल्या लेखनासाठी इंग्रजी लेखकांच्या साहित्यकृतींचा त्यांनी सढळपणे उपयोग केला आहे. 'पानपतची मोहीम', 'चित्तूरगडचा वेढा', 'लिक्लेअरचे चरित्र' यासारखे लेखन हे मूळ इंग्रजी पुस्तकांवर आधारित आहे.

मराठी ही बापटांची मातृभाषा. शाळा, कॉलेजात शास्त्रशुद्धरीत्या मराठी भाषा शिकवण्याची प्रथा त्या काळात नव्हती. संस्कृत वा इंग्रजीसारखी त्या काळातील मराठी ही ज्ञानभाषा नव्हती व त्यात फारसे साहित्यही नव्हते. जे होते ते मुख्यत्वेकरून संतसाहित्य होते. ते मात्र संपन्न होते. संतांनीही मुख्यत्वेकरून आपले लिखाण पद्यात केले आहे. पद्य मराठीच्या मानाने गद्य मराठीची संपन्न अशी परंपरा नव्हती. बापटांचा संत साहित्याचा चांगला अभ्यास होता. त्यामुळे ते ज्ञानेश्वर, तुकाराम, रामदास, वामन पंडित, मोरोपंत, श्रीधर कवी, चंपूकाव्य इत्यादी काव्यातील अवतरणे बापटांच्या लेखनात प्रकर्षाने आढळतात. लावणी, पोवाडे यासारख्या लोकसाहित्याचा त्यांचा अभ्यास होता. आपल्या कथानकात त्यांनी त्याचा विपुल उपयोग केलेला आहे. एकोणिसाव्या शतकात बखर वाङ्मयही प्रसिद्ध होऊ लागले. बापटांनी आपल्या लेखनासाठी 'बखर' साहित्याचा पुष्कळ अभ्यास केलेला दिसून येतो. 'काव्येतिहास संग्रह' यासारख्या संशोधनपर साहित्याला वाहिलेल्या मासिकांचा ते आवर्जून उल्लेख करतात. त्याकाळी आजच्यासारखी संपन्न ग्रंथालये नव्हती वा प्रकाशित स्वस्त पुस्तकांची संख्याही फारशी नव्हती. जमखंडी किंवा गुजराथमधील राहण्याची व नोकरीची, नवसारी, डभई यासारखी ठिकाणे ही लहान गावे होती. वाहतुकीची साधने नव्हती. अशा अनेक अडचणी असतानाही बापटांनी आपल्या वाचनाचा व अभ्यासाचा छंद जोपासला होता व त्याला त्यांनी लिहिलेल्या 'पुस्तक' रूपाने फळही चांगलेच आले.

बापट कानडी भागात बारा वर्षे नोकरीनिमित्त राहिले व त्यांनी खेडोपाडी प्रवास केला. त्यांना कानडी भाषाही चांगली अवगत होती. कोर्टात कानडी लोकांनी दिलेल्या साक्षी, कानडी भाषेत प्रकाशित होणारे 'शालापत्रक' हे मासिक व अन्य वर्तमानपत्रे व मासिके त्यांच्या वाचनात होती. प्रो. ब्युहलर

या जर्मन प्राध्यापकास कानडी शिलालेख व ताम्रपट त्यांनी मिळवून दिले. खेड्यातील कानडी लोकांशी संपर्क साधून त्यांच्याकडून लोकवर्गणी जमवून खेडोपाडी शाळा बांधल्या. 'बाजीरावाचे चरित्र' या पुस्तकात बाजीरावाने जेव्हा कानडी प्रांतावर हल्ला केला तेव्हा त्या भागातील आपले अनुभव कानडी भाषेत व्यक्त केलेले आहेत.

बापट हे आपल्या आयुष्यातील पंचवीस वर्षे गुजरात प्रांतात कार्यरत होते. संस्थानच्या नोकरीत असताना ते अनेक लहान-मोठ्या गावात राहिलेले आहे. नवसारी, बडोदे, सुरत, डभई, कडी इत्यादी गावांत वेगवेगळ्या हुद्यावर काम करत होते. अनेक ठिकाणी ते मामलेदार म्हणून काम करत होते. त्यामुळे त्यांचा खेडोपाडी असलेल्या सामान्य शेतकऱ्यांशी संबंध येई. त्यांना त्यांच्या या कामामुळे गुजराथी भाषेची चांगली ओळख झाली. त्यांचे अधिकारी गुजराथीभाषक असत. काही अधिकाऱ्यांचे त्यांनी आपल्या पुस्तकांवरचे अभिप्राय मिळवले होते व ते गुजराथीतील अभिप्राय संबंधित पुस्तकात प्रकाशित केलेले आहेत.

बापटांनी त्यांच्या पुस्तकात अनेक ठिकाणी हिंदी, उर्दू, वाक्प्रचार वा कविता उद्धृत केलेल्या आहेत. कबीराची सुवचने अनेक ठिकाणी दिलेली आहेत. हिंदीचा परिचय त्यांना शाळा-कॉलेजातून मिळालेल्या शिक्षणाद्वारे झालेला नाही, तर अनेक प्रांतात त्यांनी केलेल्या प्रवासातून व संपर्कात आलेल्या व्यक्तींद्वारे झालेला आहे. बडोदा संस्थानचे अधिपती सयाजीराव महाराज यांच्याबरोबर बापट प्रवास करत. त्यांचे महत्त्वाचे काम म्हणजे महाराज ज्या ज्या ठिकाणी जात तेथील भेटलेले लोक, प्रसंग व ठिकाणांचे वर्णन करणे हे होते. त्यांच्या लेखनात या भेटींचे उल्लेख येतात. आपण या ठिकाणाला भेट दिली आहे. तेथील वास्तू, निसर्ग, लोक यांचे ते आस्थेने वर्णन करतात. त्यांनी महाराजांबरोबर केलेल्या प्रवासांचे अहवाल आजही गुजराथच्या पुराभिलेख खात्यात उपलब्ध आहेत. प्रबोधनकार ठाकरे यांनी 'लालन बैरागिण' या शिरीष पै यांच्या पुस्तकाला दिलेल्या प्रस्तावनेत याची नोंद आहे. प्रबोधनकार बापटांचे वर्णन 'शब्दचित्रकार' असे करतात. बापटांची पुस्तकेच ते वर्णन किती यथार्थ आहे हे दर्शवितात.

**- डॉ. नीळकंठ बापट**

**संपादक**

# संपादकांची प्रस्तावना

एकोणाविसावे शतक हे मराठी राज्याच्या दृष्टीने अत्यंत घातक व दुर्दैवी ठरले. १८१८ मध्ये पेशवे व इंग्रज यांच्यात युद्ध झाले व त्यात पेशव्यांचा पराभव झाला. मराठी राज्याचा अंत झाला, लोक संभ्रमात पडले. झाले ते चांगले की वाईट या विचारांच्या गदारोळात लोक संभ्रमात पडले. परिणामस्वरूप कालांतराने लोकांचा आत्मसन्मान हरवण्यात होऊ लागला. समाजाचा हरवलेला आत्मसन्मान परत कसा मिळवून द्यायचा हा काही विचारी लोकांना प्रश्न पडला. त्यातील बापटांसारख्यांचा विचार असा होता की, लोकांना आपला उज्ज्वल इतिहास सांगावा व त्यांचा स्वत:वरचा हरवलेला विश्वास पुन्हा मिळवून द्यावा. इतिहासात सामान्य लोकांनी रस दाखवावा यासाठी तो रंजक करावा असेही त्यांचे मत होते व त्या अनुषंगाने त्यांनी दहा पुस्तके लिहिली. प्रत्येक पुस्तक हे हेतूपूर्वक लिहिलेले आहे. पुस्तकाच्या शेवटी वा जिथे आवश्यक आहे तिथे समाजाचे गुण-अवगुण चर्चिले आहेत. विशेषत: त्यांच्या काळचा समाज व ब्रिटिश राज्यकर्ते यांची चिकित्सा केली आहे.

बापटांच्या पूर्वकाळात गद्यलेखन फारसे झालेले नव्हते. त्या काळच्या गद्य लेखनावर परकीय, विशेषत: इंग्रजी साहित्याचा परिणाम झालेला दिसतो. एकोणिसाव्या शतकातील गद्य मराठी साहित्य हे इंग्रजी साहित्यावर अवलंबून असल्याचे आढळते. त्यात ऐतिहासिक माहितीवर आधारित ललित लिखाण फारच अल्प होते. मोचनगड यासारख्या ऐतिहासिक कादंबऱ्या बापटांच्या लेखनापूर्वी प्रसिद्ध झाल्या होत्या; पण त्यात ऐतिहासिक

घटना वा ऐतिहासिक व्यक्तींचा संदर्भ नव्हता. बापटांच्या कादंबऱ्या मात्र ऐतिहासिक व्यक्ती व घटना यावर आधारित आहेत. मराठी भाषेत ऐतिहासिक कादंबरीचे जनक म्हणून बापट यांना गौरवणे योग्य होईल.

या दुसऱ्या खंडात बाजीराव पेशवे आणि श्री महाराणी जमनाबाई साहेब यांचे चरित्र घेतले असून त्याच बरोबर पेशव्यांनी सुरू केलेल्या दक्षिणाप्राईझ या शैक्षणिक पुरस्काररूपी उपक्रमाची इत्थंभूत माहिती वाचकांना व्हावी म्हणून त्या विषयी विस्तृत माहिती दिली आहे. या चरित्रांबरोबरच लिक्लेअर या अराजकीय क्षेत्रातील व्यक्तीचे छोटेसे चरित्रही यात घेतले आहे.

**बाजीराव पेशवे**

'थोरले बाजीराव पेशवे यांचे चरित्र' हे बापटांचे पहिले पुस्तक आणि तेही 'दक्षिणा प्राईझ' या त्यावेळच्या अग्रगण्य पुरस्काराने सन्मानित झालेले. त्यामुळे या पुस्तकाने बापटांच्या पुढच्या साहित्य प्रवासाची दिशा ठरवली. पुस्तकातील भाषा कशी असावी, विषय कोणता असावा, त्याची मांडणी कशी असावी, त्यापासून काय बोध घ्यावा, याविषयीची प्रमाणे कोणती ही या पुस्तकाने ठरवली. छत्रपती शिवाजी महाराजांनी स्थापन केलेल्या स्वराज्याचा पुढे विस्तार करण्यात ज्यांचा हातभार लागला, त्यातील 'थोरले बाजीराव पेशवे' हे अग्रगण्य. आपली 'अस्मिता व आत्मसन्मान' हरवलेल्या एकोणिसाव्या शतकातील मराठी समाजाला आपल्या इतिहासातून स्फूर्ती मिळवता येईल, अशा नायकाची जरूरी होती. छत्रपती शिवाजी महाराज मराठा साम्राज्याचे संस्थापक व थोरले बाजीराव पेशवे त्याचे विस्तारक हे दोघे ती गरज भागवू शकत होते. बापटांनी बाजीरावाच्या चरित्राद्वारे 'स्वभाषा, स्वधर्म, स्वदेश' या त्रिसूत्रीचे महत्त्व लोकांपर्यंत पोहोचवण्याचा प्रयत्न केला. बापट बाजीरावांकडे एक लोकनेता म्हणून पाहतात आणि एका लोकनेत्याकडे आवश्यक असणारे गुण बाजीरावात कसे आहेत हे सांगतात.

शिवाजी महाराजांनंतर नाव घेण्यासारखा शहाणा व पराक्रमी पुरुष म्हणजे बाजीराव. तो स्वदेशहिताचे ब्रीद धारण करणारा, इभ्रतदार, शहाणा व शूर होता. तो उपजत बुद्धिवान होता आणि त्यास उणे उत्तर कोणाचे सोसत नसे. बुद्धिकौशल्यामध्ये त्याने आपणावर कोणाचीही कधी छाप बसू

दिली नाही. पेशवा झाल्यावरही त्याने आपले आयुष्य ऐषारामात, चैनबाजीत आणि विषयसुखात घालविले नाही. विसाव्या वर्षी पेशवेपद मिळाले तरी अनुभविक पुरुषाप्रमाणे मोठे सैन्य जमा करून तो स्वराज्य वाढविण्याच्या कामास लागला आणि तोच क्रम मरणकाळापर्यंत अखंड चालविला. दुसऱ्याची राज्ये छिनावून आपण अपार संपत्ती मिळवावी आणि तिजवर मजा करावी ही कल्पना त्याच्या स्वप्नीही आली नाही. शौर्य, साहस आणि शहाणपण हेच सर्वांत श्रेष्ठ आहे हे त्याचे ठाम मत होते.

बाजीराव मोकळ्या मनाचा होता. त्याने एखाद्याला मित्र मानला म्हणजे तो कायम मित्र राही. आपल्या शिपायांसही तो प्रेमाने व मानाने वागवी व त्यांच्याबरोबर भोजनसुद्धा करी, त्यांच्यासारखेच जेवी. त्याने राजसुख कधी भोगले नाही. त्याने वैयक्तिक कामासाठी फार मोठा लवाजमा ठेवला नाही.

सैन्याला योग्य बंदोबस्तात तो ठेवी. शस्त्रात, विद्येत तरबेज राहील याची तो काळजी घेई. युद्धात स्वत: भाग घेई व शिपायांना उत्तेजन देई. कर्ज काढावे लागले तरी बाजीराव कर्ज काढून शिपायांचा पगार करी. कधी आर्जव करून, कधी धमकी देऊन, कधी पोटात शिरून व कधी नि:स्पृहता दर्शवून आपल्या बिथरलेल्या शिपायांची मने वळवी. स्वदेशोन्नतीचे त्याला बाळकडू होते. स्वदेश हा त्याचा देव. महान संकटे भोगून अनेक लढाया मारून व नवीन मुलूख काबीज करून हिंदू लोकांत त्याने स्वदेशाभिमान, स्वदेशबंधुप्रीती आणि स्वधर्मश्रद्धा वाढविली. मुसलमान इत्यादी परधर्मी राजे एतद्देशीयांस गांजत असल्याचे त्याला कळले की, त्यास सोडविण्यासाठी तो धावत जाई. स्वदेशमातेस परकी राजांच्या हातून सोडवून स्वराज्याचा जरीपटका हिमालयावर नेऊन उभा करायचा, अशी त्याची महत्त्वाकांक्षा होती आणि ती तृप्त होण्याकरिता तो लढाया देत देत पुढे चालला. त्याला अनेक सरदारांनी विरोध केला, त्याचा द्वेष केला तरी बाजीरावाने त्याची गादी कायम राखिली. तो न्याय नि:पक्षपाताने करी. त्यामुळे सर्व प्रजा त्याजवर लोभ करी. राज्य संरक्षणास जे कायदेकानू पूर्वजांनी करून ठेवले होते त्यांचा तो आदर करी. तो अल्प वयात वारला. पण छी!थू होऊन म्हातारपणी मरावे त्यापेक्षा अब्रूने तारुण्यविकासात मरावे हे फार चांगले. रामदासांचे सुवचन बापट मुद्दामहून उद्‌धृत करतात.

*काया बहुत कष्टवावी । उत्कट कीर्ती उरवावी ॥*
*चटक लावूनी सोडावी । काही एक ॥*

स्वधर्म, स्वभाषा व स्वदेश याविषयी बाजीरावांच्या चरित्रातून जो बोध घ्यायचा त्यासाठी चरित्रात ठिकठिकाणी बापटांनी त्या घटना अधोरेखित केलेल्या आढळून येतात. यासाठी त्यांनी बाजीरावांचे वडील बाळाजी व मराठी साम्राज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांच्या चरित्रातलेही दाखले दिले आहेत. बाजीरावांचे पूर्वज मूळ कोकणातील. तेथील लोक हाडाचे मजबूत, इमानी, सांगितलेले काम झटून करणारे. शिवाजींसारखा हिंमतदार म्होरक्या मिळाल्यावर त्यांचा खेळवड बावळेपणा, अजागळपणा जाऊन तलवारीच्या धारेवर व भाल्याच्या टोकावर त्यांनी देशचे देश काबीज केले. मोगल, पोर्तुगीज, डच व शिद्दी यांना त्यांनी जर्जर केले. बापट लिहितात, कोकणची जमीन नादान, घाटाशी खडकाळ, समुद्रकाठाशी रेताळ, डोक्यावर अनंत आकाश, परसात अफाट समुद्र, अंगणात उंच सह्याद्री अशा काळात सापडलेले कोकणे उद्योगी, धैर्यमान व साहसी होते. शरीरसंपत्ती, समृद्धी, विद्वत्ता व कीर्ती या उद्योगाच्या कन्या त्यास सहज प्राप्त झाल्या.

बाळाजी हा रूपसंपन्न, मनमिळाऊ, शहाणा, तैलबुद्धीचा, फर्डा कारकून, धैर्यवान, उद्योगी, साहसी, वेदधर्मपरायण, नीतिमान व चौकस होता. तो हिंमतबहाद्दर होता. त्यास महाभारत, भागवत, रामायण व धर्मशास्त्र हे वाचण्याचा छंद होता व हे ग्रंथ स्वतःच्या संग्रही ठेवले होते. त्याला हिंदू राज्याचा, हिंदू धर्माचा आणि हिंदू ज्ञातीचा मोठा अभिमान असे. हिंदूंचा छळ झाल्याचे तो वाची, तेव्हा तापलेल्या सांडसाने काळीज ओढल्याप्रमाणे त्यास वेदना होत. बाळाजीची पत्नी राधाबाई ही गरोदर असताना तिला कशाचे डोहाळे लागले आहेत असे बाळाजीने विचारले असता घरी घोडी बाळगावी, वसंतपूजा करून ब्राह्मणास दक्षिणा वाटाव्यात, वेदशास्त्रांच्या शाळा घरी ठेवाव्यात, मराठे गडी रावना, भिवबा यांना कडी-पागोटी द्यावी हे उत्तर दिले.

बाळाजीजवळ जुनी बखर होती. त्यातील छत्रपती शिवाजी महाराजांनी त्यांचे सावत्र बंधू व्यंकोजी राजे यांना लिहिलेले पत्र वाचले व त्यावरूनही त्यांचे स्वदेशप्रेम जागृत झाले. पत्रात शिवाजी महाराज लिहितात, ''तुम्ही

निरिच्छ होऊन पहिल्याप्रमाणे आपल्या शरीरास जपत नाही, तुम्हांस मनोत्साह नाही, तुमचे लष्कर उगीच बसले आणि तुम्ही राज्यकारभार टाकून विरक्त झालात. आळस टाका, तारुण्य बहुत उपयोगाचे आहे. यात वैराग्य कामाचे नाही.''

बाजीराव हे समुद्रकाठच्या काळ्या रेतीच्या विस्तीर्ण मैदानात सापडलेले नररत्न होय. त्याने स्वदेशाचे हित केले. स्वधर्म रक्षणार्थ स्वप्राणांचे स्वाहास्वधाकार केले. परदेशस्थ भस्मासुर राजांच्या तावडीतून स्वदेशबंधूंची सुटका केली. तन, मन, धनाने स्वजनांत ऐक्य वाढविले, अशी स्तुती बापट करतात व लिहितात की, ''लहानपणापासून बाजीरावाला धर्माभिमान होता. गावातील हिंदू पोरांना मुसलमानांची पोरे चोपताना तो पाही. तेव्हा त्यांच्या अंगावर तो चित्त्यासारखा धावून जाऊन त्यास यथेच्छ मुष्टीमोदक देई.'' मुसलमानांनी केलेल्या अत्याचारांची ते जंत्रीच देतात. भोतात घालून कडेलोट करणे, समुद्रात ढकलून देणे, सुंता करणे, तोंडात गोमांस कोंबून बाटविणे, काकडीसारखे चिरणे, अंगाचे टवके काढणे, कानखडे व कोलदांडे घालणे, हातपाय बांधून हत्तीच्या पायी देणे, तापलेल्या सांडसाने वर्मस्थानी डागण्या देणे, शिशाचा रस घशात ओतणे, शिरच्छेद करणे, कर्मद्वारी व अपानद्वारी मेखा मारणे, अंगाचे कातडे सोलणे, शिरा कापणे इत्यादी. बाजीरावांच्या कुटुंबास या अत्याचाराचा अनुभवही आला होता. त्याचा चुलता जानोजी विश्वनाथ यास धरून शिद्दीने त्यास भोतात घालून समुद्रात बुडविले.

स्वदेशप्रेमाचा एक भाग म्हणजे राजसत्तेशी आत्यंतिक प्रामाणिकपणा. छत्रपती शाहू महाराजांनी पेशवाईची वस्त्रे बाजीरावास दिली. त्यावेळेस बाजीरावाने जे उत्साहजनक भाषण केले त्यात त्याने व्यक्त केलेले विचार त्याचा प्रामाणिकपणाच दर्शवतो. त्याच्याच शब्दात ''आज दरबार भरून मला वस्त्रे मिळाली आणि महाराजांनी उपदेशपर आज्ञा केली ती मला शिरसावंद्य आहे. ती मी कधी विसरणार नाही. राजबल, द्रव्यबल, मनुष्यबल, बाहुबल व बुद्धिबल या पाच बलांचे साहाय्य घेऊन हा देह सदोदित या गादीच्या एकनिष्ठ सेवेत झिजवावयाचा असा माझा कृतसंकल्प आहे. सर्व हिंदू राजे पिंजऱ्यातले पोपट बनून राहिले आहेत. मुसलमान देतील ते खावे व ते मागतील ते त्यास द्यावे, अशी हिंदूंची अवस्था झाली आहे.

स्वजनकल्याणासाठी आमचे पाऊल पुढे पडले पाहिजे. नवीन प्रांत काबीज करून राज्याचा विस्तार वाढला पाहिजे. शत्रूस पादाक्रांत केल्याशिवाय विश्रांती घ्यायची नाही.''

एकोणिसाच्या शतकात महाराष्ट्रात हिंदूधर्मीय पेशव्यांचे राज्य जाऊन ख्रिश्चन धर्मीय इंग्रजांचे राज्य आले. हिंदू धर्मावर अन्य धर्मांकडून विशेषत: ख्रिश्चन मिशनऱ्यांकडून जोरदार हल्ले सुरू झाले. त्यामुळे अनेक प्रतिष्ठित हिंदू धर्मीयांचीच धर्मावरील श्रद्धा डळमळीत झाली. त्याचे तत्त्वज्ञान, कर्मकांड, धर्मस्थळे, धर्मनेते, रीतिभाती, धर्मग्रंथ, खुद्द हिंदू हा शब्द. जे जे हिंदू धर्मासंबंधी होते त्यांची टिंगलटवाळी करण्यात स्पर्धा लागली होती. अशा वेळी हिंदू धर्माविषयी आदर निर्माण होईल असे लिखाण होणे स्वाभाविक होते. यासाठी बापटांनी राजकारणात यशस्वी झालेल्या बाजीरावाचे धर्मगुरू ब्रह्मेंद्रस्वामींची निवड केलेली आहे. ब्रह्मेंद्रस्वामींचे कार्यस्थळ व निवासस्थान असलेल्या धावडशीचे नितांत सुंदर, निसर्गरम्य वर्णन केलेले आहे. ते वाचून एका पवित्र वातावरण असलेल्या धर्मस्थळाची ओळख होते.

*''मठातील भूमिका झाड सारव करून स्वच्छ केल्या आहेत. मठाच्या आत व बाहेर अमंगल पदार्थाचे नाव नाही. त्याच्या सभोवती दर्भ, दूर्वा, तुळशी व फुलझाडे फुलली आहेत. त्यावर वसंत ऋतू स्वैच्छ क्रीडत आहे. मठाच्या समोर एक लहानसा ओढा असून, त्याचे स्वच्छ निर्मळ पाणी झुळझुळ वाहत आहे. बालार्काचे आरक्त किरण मठद्वारातून स्वामींच्या पायापर्यंत पसरले आहेत. व्याघ्रांबरावर हे सुवर्णकांती महापुरुष पद्मासन घालून अधिष्ठित झाले आहेत, केळीच्या पानांवर ठेवलेल्या तुळशी फुलांचा घमघम सुवास सुटला आहे.''* अशा वर्णनांनी धर्मस्थळाची पवित्रता अधोरेखित केली आहे. पुढे धर्मेंद्रस्वामींनी केलेला उपदेशही विस्ताराने दिला आहे व त्याचे 'बोधामृतसार' या पुस्तकातील उपदेश उद्धृत केल्यामुळे धर्मनेत्यांविषयी निश्चितच आदर निर्माण होईल.

स्वधर्म व स्वदेश याविषयी असलेली कळकळ बाजीरावांच्या वीरश्रीयुक्त भाषणातून दिसून येते. शाहू राजे प्रस्थापित झाल्यावर भविष्यकाळात राज्यविस्तार उत्तरेकडे करायचा का दक्षिणेकडे, याविषयी संभ्रमावस्था निर्माण झाली व त्यावेळी श्रीपतराव प्रतिनिधींचा पक्ष दक्षिणेकडील विस्तारास

अनुकूल होता, तर बाजीरावाचा पक्ष उत्तरेकडील चढाईस अनुकूल होता. शाहू महाराजांसमोर दोघांनी आपापली बाजू मांडली. त्यातील बाजीरावांचे भाषण अर्थातच अधिक उठावदार झाले. त्यांनी मांडलेली मते बोधप्रद होती ती अशी -

''हृदयात दु:खाग्नीचा भडका होतो. त्यांनी सोरटीसोमनाथची मूर्ती फोडली, सुंता करून जुलमाने हिंदूंचे मुसलमान केले, गावचेगाव जाळून फस्त केले, हिंदूंची राज्ये बुडविली, स्त्रियांच्या पातिव्रत्याचा भंग केला. कित्येक स्त्रिया अब्रूखातर अग्निकाष्ठे भक्षण करून मरून गेल्या, हिंदूंची धर्मपुस्तके जाळून टाकली, स्थंडिलांचे विध्वंस केले. पुढे भगवत् कृपेने आमच्या शिवाजी महाराजांनी हिंदूंचा कैवार धरिला. विजापूर, गोवळकोंडे व अहमदनगर ही मुसलमानांची राज्ये त्यांनी पादाक्रांत केली. औरंगजेबास जेरीस आणून त्यास आपले प्रभुत्व कबूल करविले. प्रजेच्या सुखासाठी कायदेकानू केले. स्वराज्य उभे करून हिंदू धर्माची संस्थापना केली.

मोगल हा एक आपल्या देशात विशाल वृक्ष वाढला होता. त्याच्या फांद्या शिवाजी महाराजांनी छाटून टाकल्या; परंतु त्याचे मूळ अजून दिल्लीस कायम आहे. पुन:पुन्हा त्यास नवे फाटे फुटून ते आपल्यास अडचण करतात. या करिता या जखड वृक्षाच्या बुडाशी कुऱ्हाडीने घाव घालून त्याची पाळेमुळे खणून टाकू. हे काम शेवटास नेले म्हणजे फिरंगी, शिद्दी ही बांडगुळे सहज काढून टाकू.

आपली स्वदेशप्रीती तथा राजप्रीती, स्वामीभक्ती, निष्ठा बाजीरावांच्या भाषणातच दिसून येते. तो म्हणतो, ''या देहावर माझा वारसा नाही, तो मी स्वामीसेवेस अर्पण केला आहे. आता याला कोणी भजोत, भाजोत, बाणांचे प्रहार करोत, वार करोत, हात तोडोत वा पाय मोडोत जोपर्यंत अवयव शाबूत आहेत तोपर्यंत ते सार्थकी लागोत.''

बाजीरावाने काही महत्त्वाची कामे केली. ताराबाईंच्या दत्तक मुलाशी असलेला कौटुंबिक कलह मिटवला, माळवा प्रांत जिंकला, त्यामुळे उत्तरेवर नियंत्रण आणता आले, शिंदे, होळकर यासारखे नव्या दमाचे सरदार तयार केले.

अशी देशभक्ती आणि अशी स्वामीभक्ती सापडणे विरळाच. हा स्वधर्म आजच्या काळातही तेवढाच आवश्यक आहे आणि पुढेही राहणारच.

कारण तोच खरा सत्यधर्म आहे. सत्य हे बदलत नसते. ते पृथ्वीच्या जन्मापासून ते अंतापर्यंत तसेच राहणार आहे. म्हणूनच आजच्या तरुणांनी काळानुसार देशकार्यासाठी नि:स्वार्थ सेवाभाव ठेवून पुढे आले पाहिजे ही गरज आहे, आणि हे चरित्र त्यांना नक्कीच प्रोत्साहित करील याची खात्री आहे.

या चरित्रात काही भाग काल्पनिक आहे. उदा. कोकणातील लहानपणचे वर्णन, ब्रह्मानंद स्वामींच्या मठाचे वर्णन, मस्तानी ही निजामाच्या दरबारात मिळाली (ती छत्रसालच्या दरबारात मिळाली) आदी. बापटांच्या काळात चरित्र व कादंबरी, कथा, लघुकथा यांतील सीमारेषा अस्पष्ट होत्या. त्यामुळे चरित्रात काल्पनिक गोष्टीही आढळतात.

**श्री महाराणी जमनाबाई साहेब**

इ. स. १९०० मध्ये लिहिलेले 'श्री महाराणी जमनाबाई गायकवाड, बडोदा' हे बापटांचे शेवटचे पुस्तक. इ. स. १८७६ ते १९०१ अशी पंचवीस वर्षे बापटांनी बडोदा संस्थानात वेगवेगळ्या पदांवर नोकरी केली. त्यामुळे संस्थानातील राजकारण व व्यवस्थापन, ब्रिटिश रेसिडेंटचे राजकारण, राजवाड्यातील व राजघराण्यातील प्रश्न यांचे समग्र ज्ञान बापटांना होते. जमनाबाई गायकवाड (१८५३-१८९८) ह्या बडोदा संस्थानच्या राणीसाहेब. यशस्वी संस्थानिक मा. सयाजीराव गायकवाड यांच्या त्या मातोश्री. अशा या जागतिक कीर्ती लाभलेल्या यशस्वी राजाच्या जडणघडणीत आईचा वाटा हा निश्चित मोठा होता. म्हणूनच प्रत्येक यशस्वी पुरुषाच्या मागे एक स्त्री असते हे सत्य लोकांपर्यंत पोहोचवावे व मुलाच्या व्यक्तिमत्त्व विकासात आईचे योगदान मोठे असते, हीच गोष्ट बापटांना विशेष जाणवली. बाजीरावांची आई व पत्नी, टिटवीसारखी जिद्दीची पक्षीण, अकबरासारख्या सम्राटाशी रणांगणावर लढणारी गुलाबबाई, पानपतच्या युद्धात मराठ्यांना मदत करणारी लालन बैरागीण, अर्जुनासारख्या वीरावर प्रेम करणारी सुभद्रा या स्त्रियांच्या कर्तबगारीतून काय बोध घ्यायचा, हे बापटांनी यापूर्वी विशद केलेले आहे. स्त्रियांच्या या विविध रूपांतील बोध सांगितल्यावर मोठ्या यशस्वी राजाच्या आईचे चरित्र लोकांपुढे मांडावे या हेतूने बापटांनी जमनाबाई गायकवाड यांचे चरित्र लिहिले आहे.

सातारा जिल्ह्यातील रहिमतपूर या छोट्या गावातील माने घराण्यात

जमनाबाईंचा १८५३ मध्ये जन्म झाला. त्यांचे माहेरचे नाव तान्हीबाई. बडोद्याचे महाराज खंडेराव गायकवाड यांची जमनाबाई ही तिसरी पत्नी. त्यांचे लग्न १८६६ मध्ये म्हणजे जमनाबाईंच्या तेराव्या वर्षी झाले. खंडेरावाने ब्रिटिशांना मदत केली होती. त्यामुळे बडोद्याच्या गादीवर खंडेराव विराजमान झाले. त्यांना ब्रिटिश सरकारने अनेक सवलती, विशेषत: गायकवाडांच्या घराण्यात वारस नसल्यास दत्तक घेण्याचा अधिकार दिला. लग्न झाल्यावर खंडेरावांनी जमनाबाईंच्या शिक्षणाची व्यवस्था केली. लेखन, वाचन व गृहिणी म्हणून आवश्यक असणारे कलाकौशल्य व स्वयंपाकघर व्यवस्थापन याचेही यथायोग्य शिक्षण मिळाले. थोडक्यात, संस्थानची राणी म्हणून आवश्यक ते कौशल्य त्यांनी प्राप्त करून घेतले. राजवाड्यातील जीवन बाहेरून जरी आकर्षक दिसले तरी तेथील जीवन अस्थिर असते. कोणावर काय आपत्ती येईल याचा भरवसा नसतो. विशेषत: स्त्रियांच्या जीवनात काय आपत्ती येईल हे सांगता येणे कठीण. जमनाबाईंच्या आयुष्यात असेच झाले. इ. स. १८७० मध्ये खंडेरावांचे आकस्मिक निधन झाले. विवाहानंतर ६-७ वर्षांतच जमनाबाईंना वैधव्य आले. राजघराण्यातल्या स्त्रीवर वैधव्य आले म्हणजे तिची दयनीय अवस्था वर्णन करण्यापलीकडची आहे. खंडेरावांनंतर जमनाबाईंचा दीर मल्हाररावांना राजेपद मिळाले आणि जमनाबाईंना राजवाडा सोडावा लागला. एवढेच नव्हे तर परिस्थिती इतकी बिघडली की, त्यांना बडोदा सोडून पुण्याला जाऊन राहावे लागले. त्यांच्या जीवाला भीती निर्माण झाली. खंडेरावांच्या मृत्यूच्या वेळेस जमनाबाई गरोदर होत्या. तेव्हा त्या नव्या जीवाची जबाबदारी त्यांच्यावरच आली. पुढे काळ बदलला आणि त्यांचे राणीपद परत मिळाले. शिवाय दत्तक घेण्याचीही परवानगी मिळाली. सन १८७५ मध्ये त्यांनी सयाजीरावांना दत्तक घेतले. योग्य मुलाची निवड करणे व त्याच्या शिक्षणाची व्यवस्था करणे हे अत्यंत महत्त्वाचे होते. राजवाड्यात अल्पवयीन राजपुत्राला बिघडवण्यासाठी विविध गटांत स्पर्धाच असते. विशेषत: तो व्यसनाधीन होण्याची शक्यता फार. तेव्हा अल्पवयीन राजपुत्राला या वाईट राजकारणापासून दूर ठेवणे हे अत्यंत महत्त्वाचे होते व जमनाबाईंनी ते यशस्वीरीत्या पूर्ण केले. त्यासाठी त्यांना संस्थानचे दिवाण सर टी. माधवराव व ब्रिटिश रेसिडेंट मिड यांचे सहकार्य मिळाले. जमनाबाईंवर ही जबाबदारी पडली तेव्हा त्यांचे वय फक्त

बावीस वर्षांचे होते. लोकांशी आदब ठेवून; पण प्रेमळपणे वागणे. त्यांच्या मदतीला संकोच न करता धावून जाणे, लोकांच्या धार्मिक भावना न दुखावणे, सार्वजनिक कार्यात रस घेणे व राजपुत्र सयाजीराव सज्ञान होईपर्यंत संस्थानचा कारभार पाहणे महत्त्वाचे होते. या कार्याचे दृश्य फल किंवा मोजमाप काही नव्हते; पण संस्थानच्या व त्यावेळच्या समाजस्वास्थ्याच्या दृष्टीने हे अमूर्त काम लाखमोलाचे होते. या चरित्राद्वारे बापटांना हेच विदित करायचे आहे की, भारतीय स्त्री ही संधी मिळाल्यास यशाचे शिखर गाठू शकते. कर्तबगार भारतीय स्त्रियांची चरित्रे उपलब्ध नव्हती. त्यांच्या कर्तृत्वाविषयी शंका व्यक्त केल्या जात. जमनाबाईंच्या चरित्राचा बोध हाच की, स्त्री व त्यातही भारतीय स्त्री जागतिक पातळीवरही इतरांएवढीच कर्तृत्ववान आहे. आजची स्त्रीही तेवढीच कर्तबगार आहे हे स्त्रियांनी दाखवून दिले आहे. शिक्षण असो, नोकरी-व्यवसाय असो, घरची आणि दारची जबाबदारी असो, स्त्रिया कुठेही कमी नाहीत हे त्यांनी दाखवून दिली आहे. जमनाबाईंच्या चरित्रातून आजची स्त्री खूप काही घेऊन खंबीर होऊ शकणार आहे यात शंका नाही.

### लिक्लेअर

बापटांनी ज्या चरित्रात्मक कादंबऱ्या लिहिल्या त्यातील बरेचसे नायक-नायिका ही राजकीय व्यक्तिमत्त्वे होती. ते सर्व जन कोणत्या ना कोणत्या निमित्ताने राजकीय सत्ता, स्पर्धा, युद्ध, राजनीती या संबंधित आहेत; पण यापेक्षा सामान्यांचे हित विचारात घेऊन काम करणाऱ्या नायकाचेही चरित्र बापटांनी रंगवले. एकोणिसाव्या शतकातील त्यांच्या भोवतीचे वातावरण व समाज यांच्या हिताची वृद्धी व्हावी हे त्यावेळच्या लेखकांना जाणवत होते व त्यावर त्यांनी वेळोवेळी भाष्य केलेले आढळते. युद्धकथा, राजकीय सत्तास्पर्धा, एकमेकाला शह देणारे नायक त्यांनी रंगवले व त्यात इंग्रज किंवा मोगलांच्या तुलनेत आपण मागे का पडलो, याची चिकित्सा त्यांनी जरूर केली; पण त्याचबरोबर युरोपियन शत्रूंमधील उद्योजकता, नवे शोध, नवी यंत्रसामग्री व त्याबरोबर मालक-मजूर या संबंधांविषयी नवे विचार, नवे संघटन प्रकार, काम करवून घेण्याच्या नव्या पद्धती, नियम, कायदेकानू ह्यांचा आदर करणे, हिंसक संघर्ष टाळणे या विषयीची युरोपात प्रसार झालेली नवी तंत्रे व विचार हेही

बापटांसारख्या लेखकांना भावलेले आढळतात आणि ते विचार बोलके करावेत व लोकांपर्यंत पोहोचवावेत म्हणून त्यांनी एकोणिसाव्या शतकातील एका फ्रेंच उद्योजकाचे चरित्र लोकांपुढे मांडले.

इ. स. १८०१ साली फ्रान्समध्ये जन्मलेल्या एका चांभाराच्या मुलाचे हे चरित्र आहे. लिक्लेअर हे त्याचे नाव. घरची अत्यंत गरिबी, फारसे शिक्षण नाही, समाजाच्या खालच्या स्तरातील सामान्य कुटुंबाची पार्श्वभूमी असलेला लिक्लेअर नोकरीच्या शोधार्थ पॅरिसला येतो. सुरुवातीला एका रंगाऱ्याकडे काम करतो. अनुभव मिळवतो व रंगाची मोठाली कामे आपल्या हिमतीने मिळवतो. त्यात त्याला नफा मिळतो आणि श्रम, कार्यक्षमता व प्रामाणिकपणा या जोरावर तो मोठा रंगारी होतो. कामगार सहकार्य मिळवण्यासाठी मानवी सहसंबंधाबद्दल नवे तंत्र विकसित करतो. इथेच तो व इतर उद्योजक यामधला फरक जाणवतो.

लिक्लेअरला स्वत:चे मूलबाळ नव्हते; परंतु त्याच्या पोटातील मायेचे, प्रेमाचे झरे आटले नव्हते. आपल्याबरोबर काम करणाऱ्या कामगारांबद्दल त्याच्या मनात नितांत प्रेम व सहानुभूती होती. आपण एकट्यानेच नफा मिळवावा व श्रीमंत व्हावे असा कोता, स्वार्थी विचार न करता धनीपणाचा आनंद व संधी सामान्य कामगारांनाही मिळावी असे त्याला वाटले व त्याने कामगारांनाही आपल्या उद्योगात मालक म्हणून सहभागी करून घेतले. त्यामुळे ते अधिक व प्रामाणिकपणे काम करू लागले. त्यांची उत्पादकता वाढली. एकवटून काम केल्याने बंधुप्रीतीचा मोड हृदयभूमिकेत उगवतो हे धर्माचे तत्त्व त्याला चांगले कळले होते आणि हेच तत्त्व हरघडीला त्याला यशप्राप्ती करून देत होते.

लिक्लेअरचा समाजहितासाठी झटण्याचा दुसरा हेतू असा होता की, आपल्या मजुरांना वृद्धापकाळी त्यांचे हातपाय थकले म्हणजे अन्न-वस्त्राची ददात पडू नये व कारभारी नवे-जुने झाले तरी मजूर लोक उघडे पडू नयेत यासाठी त्याने विचारपूर्वक योजना आखली व त्यासाठी 'अन्योन्य साहाय्यकारिणी' अशी नवी संस्था काढली. मजूर व मालक यांच्या वर्गणीतून त्याने निधी उभारला व त्यातून औषधपाणी व पेन्शनची व्यवस्था केली. कामगारांना उद्योगाच्या नफ्यात व मालकीत सहभागी होऊ दिले आणि एक नवीन उपक्रम सुरू केला.

आपली योजना पूर्णपणे पारदर्शक असावी यादृष्टीने त्याने जाहीर सभा बोलावली; पण त्यावेळच्या फ्रेंच राज्यकर्त्यांना लोकांनी एकत्र येण्याची भीती वाटत होती. एकत्र येऊन ते राजाविरुद्ध कारवाया करतील, असे त्यांना वाटे. पॅरिसमधील अन्य मोठ्या उद्योगपतींनीही त्यांच्या या मजुरांना मालकी हक्क देण्याच्या संकल्पनेला विरोध केला. त्यांनाही भीती वाटली की, आपल्या कारकारखान्यातील कामगार बिथरतील व मालकी हक्काची व नफ्यातील वाटा मागतील. लिक्लेअरच्या कारखान्यातील काही जण त्याच्याविषयी भलताच संशय घेऊ लागले; पण आपण शुद्ध बुद्धीने हे लोककल्याणाचे काम हाती घेतले आहे, अशी मनाची पूर्ण निष्ठा असल्याने व आपल्याच सहकाऱ्यांवर विश्वास असल्याने हाती घेतलेले काम निश्चयाने चालवले. आपल्या हेतूविषयी शंका राहू नये म्हणून त्याने संस्थेला झालेल्या नफ्यातील काही भाग रोख रूपात कामगारांना वाटला. तेव्हा लोकांचा त्यावर आपोआप विश्वास बसला.

कामगारांच्या बचतीमधून उद्योगाच्या मालकी हक्कात कामगार सहभागी झाले. संस्थेचे भागभांडवल वाढतच गेले. लिक्लेअरने कारखान्यातील आपल्या वाट्याचा नफा स्वत: न घेता त्यातील काही भाग कारखान्यातच ठेवला. हा त्याचा मोठा त्याग होता. त्यामुळे इतर कामगारांनीही आपला नफा संस्थेतच ठेवला व संस्थेच्या भागभांडवलात मोठी भर पडली. ‘अन्योन्य साहाय्यकारिणी’ असे संस्थेचे नाव ठेवले. मृत्यूसमयी त्याने आपल्या सहकाऱ्यांना लिहिलेले पत्र त्याची समाजाशी असलेली बांधिलकी किती घट्ट होती व सामान्यांसाठी आपण कष्ट करणे ही आपली जबाबदारी आहे हेच दर्शविते. तो लिहितो की, ‘जोपर्यंत खालच्या प्रतीच्या लोकांमध्ये खऱ्या ज्ञानाचा फैलाव होऊन अज्ञान नाहीसे होत नाही तोपर्यंत त्यांना वर काढण्यासाठी आम्ही आपला हात दिलाच पाहिजे. असे केल्याशिवाय सुखात असलेले श्रीमंत लोक आणि दु:खसागरात असलेले गरीब लोक यांच्या मधला द्वेषभाव नाहीसा होणार नाही.’

पेशवाईच्या अस्तकाळात महाराष्ट्रात जी दुरवस्था व अनागोंदी कारभार झाला तीच परिस्थिती फ्रान्समध्येही झाली होती. तेव्हा त्याचा आढावा बापटांनी घ्यावा हे रास्तच होते. ‘फ्रान्स देशात समाजस्थिती बिघडून मोठी राज्यक्रांती झाल्या दिवसापासून जिकडे तिकडे निर्नायकी माजली होती.

द्रव्यसंचय, देवधर्म लोकांना नकोसा झाला होता. बळी तो कान पिळी, कायदेबियदे चट सारे गुंडाळून ठेवून लोक मन:पूत वागू लागले होते. अनीतीचे मार्ग खुले झाले होते. कोण कोणाची बायको व कोण कोणाचा नवरा, अशी सर्व देशभर स्वतंत्रता हाती दिवटी घेऊन नाचू लागली होती. मद्यपानाचा तर तालच राहिला नव्हता. तरीपण लिक्लेअरच्या सतत परिश्रमाने, अचाट बुद्धीने, कौशल्याने मजूरवर्गाची स्थिती काहीशी सुधारणेच्या मार्गाला लागली. मजूरलोक कायदेकानूला मान देऊ लागले. आपली पशूवृत्ती टाकून घरदार करून प्रपंचसुखाचा अनुभव घेऊ लागले. सुधारणेचा जसजसा प्रसार होत चालला तसे समाजकल्याण होत चालले. हा अमृत सिद्धीयोग लिक्लेअरच्या योगाने प्राप्त झाला.'

लढाया, राज्यकारस्थाने यामुळे मनुष्यांचे बळी घेऊन रणांगणी रक्ताच्या नद्या वाहावयास लावल्या व अपार संपत्ती भोगून अखेर काळाच्या जबड्यात जाऊन पडले, त्यांची वर्णने इतिहासात वाचावी, त्यापेक्षा अशा लोककल्याणकारी पुरुषांची चरित्रे लिहिली, वाचली व ध्यानात ठेवली, तर लोकसमाजाचा किती फायदा होईल? असे बापट लिहितात.

थोडक्यात, बापटांनी लिक्लेअरच्या चरित्राद्वारे नव्या संकल्पना वाचकांपुढे ठेवल्या. उद्योजकता, मालक-मजूर संबंध कामगारांचा उद्योगांच्या मालकीत व नफ्यात सहभाग, सहकार हा नवा संघटन प्रकार, औद्योगिक कामगार या नव्या समाजाची ओळख व त्यांचे व्यवस्थापन, व्यक्तीपेक्षा सामाजिक हित अधिक महत्त्वाचे हे विषय लोकांचे प्रबोधन करण्यास त्यांनी निवडले व समर्थपणे त्यांची चिकित्सा केली.

वरील तीनही चरित्रे समाजातल्या प्रत्येक घटकाला, स्त्री, पुरुष, कामगार, मालक या सर्व घटकांना प्रेरक आणि मार्गदर्शक अशीच आहेत. ती वाचून वाचकांना नक्कीच उत्साह आणि सकारात्मक विचारांची देणगी मिळेल यात शंका नाही.

### दक्षिणाप्राईझ

माझे पणजोबा कै. नागेश विनायक बापट (१८३९-१९०२) हे एकोणिसाव्या शतकातील एक प्रथितयश साहित्यिक होते. त्या काळात त्यांनी दहा पुस्तके लिहिली. त्यातील 'पहिल्या बाजीरावाचे चरित्र' व

'पानपतची मोहीम' ही दोन पुस्तके विशेष गाजली. त्यांचे चरित्र लिहावे या उद्देशाने मी त्यांच्याविषयी माहिती मिळवत होतो. तेव्हा मला दोन नोंदी मिळाल्या १) बाजीरावाचे चरित्र या पुस्तकाला दक्षिणा प्राईझ हा पुरस्कार मिळाला, २) ते त्या वेळच्या मुंबई इलाख्यात डेप्युटी एज्युकेशन इन्स्पेक्टर म्हणून कार्यरत होते. त्यांच्या सेवा पुस्तकात ते पूना कॉलेजात शिकले अशी नोंद होती. या दोन्ही नोंदींविषयी अधिक माहिती मिळविण्याच्या उद्देशाने मी थोडे इतिहास संशोधन केले. त्यातून मिळालेली माहिती फार उद्बोधक होती. तीच दक्षिणा या लेखातून जनतेपर्यंत पोहोचविण्याचा प्रयत्न केला आहे. हा भाग परिशिष्टात जोडला आहे.

मराठी समाजाचे शिक्षण व साहित्य याविषयी मला विशेष उत्सुकता निर्माण झाली. पेशवाईचा अंत व इंग्रजांचा उदय, या काळात मराठी समाजापुढे कोणते प्रश्न होते व ते कसे सोडवले गेले, याची माहिती ही अनेक सामाजिक समज-गैरसमज यांना छेद देणारी होती. विश्वकोश, ज्ञानकोश, संस्कृती कोश यासारख्या ग्रंथातून थोडीफार माहिती मिळाली; पण त्यापेक्षा अधिक मौल्यवान माहिती डिपार्टमेन्ट ऑफ आर्काईव्हज्, महाराष्ट्र शासनाकडे उपलब्ध असलेला ब्रिटिश काळातील ब्रिटिश अधिकाऱ्यांचा पत्रव्यवहार हा फारच महत्त्वाचा व मौल्यवान होता. कै. रा. वि. परुळेकर या शिक्षण शास्त्रज्ञाने तो तीन खंडांत पन्नास वर्षांपूर्वी प्रसिद्ध केला आहे. त्याचा आधार घेऊन मी हे लेखन केले आहे.

आज सार्वजनिक समज असा आहे की, पेशवे हे नुसतेच भोजनभाऊ होते व ते पुण्यातील पर्वतीच्या पायथ्याशी असलेल्या रमण्यात हजारो ब्राह्मणांना भोजन देत असत, ब्राह्मणांना लाखो रुपयांची दक्षिणा वाटत असत व पैशाची उधळमाधळ करीत. तसेच ब्रिटिश काळापूर्वी येथे शिक्षणाची काही सोय नव्हती व समाज रानटी अवस्थेत होता; परंतु प्रत्यक्ष परिस्थिती यापेक्षा वेगळी होती. ब्रिटिशांच्या दृष्टीने भारत ही एक प्रयोगशाळा होती. इंग्लंड हे आकाराने एक छोटे बेट होते. तेथे एकधर्मीय, एकवंशीय, एकभाषिक राज्य होते. या उलट हिंदुस्थान व महाराष्ट्र हे बहुधर्मीय, बहुभाषिक, बहुवंशीय एक मोठा भूपप्रदेश होता. प्राचीन काळापासून येथे अनेक परंपरा निर्माण झाल्या होत्या. त्यांची पूर्ण माहिती नसल्याने त्यांनी अनेक गैरसमज करून घेतले, ते पसरवले आणि ते आजपर्यंत चालत आले

आहेत.

ब्राह्मणांना दक्षिणा देण्याची पद्धत ही पूर्वापर चालत आलेली प्रथा आहे. ती पेशव्यांनी सुरू केलेली नाही. शिवाजी महाराज, संभाजी महाराज, राजाराम महाराज व शाहू महाराज यांच्या काळातही ब्राह्मणांना दक्षिणा दिली जात असे. पुढे पेशवे काळात राज्यविस्तार झाल्यामुळे ही प्रथा अधिक विकसित झाली. दक्षिणा हा दानधर्म नव्हता. ज्ञानार्जन, ज्ञानसंवर्धन, ज्ञानसाठवण व ज्ञानप्रसार यात गुंतलेल्यांना शासनाने दिलेली आर्थिक मदत होती. त्या काळात ज्ञानार्जन व ज्ञानप्रसार करण्याचे काम परंपरेने ब्राह्मणांकडे होते, म्हणून दक्षिणा ही ब्राह्मणांना दिली जाई. ती ज्ञानप्रसार कार्यात सहभागी झालेल्यांना दिलेला मोबदला असे. म्हणून दक्षिणेवरचा खर्च हा शासनाने शिक्षणावर केलेला खर्च आहे, हे एकदा समजून घेतले म्हणजे पेशवे काळातील पंधरा-वीस लाख रुपयांचे दक्षिणा वाटप व तेही तीस-चाळीस हजार ब्राह्मणांना, की जे काशी ते रामेश्वरपासून आलेले होते, याचे महत्त्व लक्षात येते. दक्षिणा वाटप समारंभ एका अर्थाने विद्वानांचे संमेलन होते. तो काही पूजापाठ सांगणाऱ्यांचा मेळावा नव्हता. चार वेद, तर्कशास्त्र, खगोलशास्त्र, धर्मशास्त्र, व्याकरण, काव्यशास्त्र, आयुर्वेद अशा दहा-बारा शास्त्रांत प्रावीण्य मिळवलेल्यांची ती कॉन्फरन्स होती. तीस-चाळीस हजार लोकांनी एकत्र येऊन ज्ञानाचे आदान-प्रदान करण्याची संधी होती. अशा एकत्र आलेल्यांची परीक्षा घेऊन त्यांच्या कार्यक्षमतेप्रमाणे दक्षिणेची रक्कम ठरवली जाई. हॉटेल्स व रेस्टॉरन्टस् नसलेल्या काळात एकत्र आलेल्या तीस-चाळीस हजारांच्या निवासाची व भोजनाची व्यवस्था करणे ही पेशव्यांची म्हणजेच राज्यकर्त्यांचीच जबाबदारी होती. त्यामुळे हजारो ब्राह्मणांच्या जेवणावळीचे त्या काळातील लेखनात सापडणारे उल्लेख व टीका ही अनाठायी व विपर्यस्त होती. खुद्द इंग्लंडमध्येही एवढ्या मोठ्या प्रमाणात त्याकाळी विद्वानांचे संमेलन भरवले जात होते की नाही या विषयी शंका आहे.

ब्रिटिशपूर्व काळात शिक्षणाचा प्रसार नव्हता व शिक्षण बहुजनांना उपलब्ध नव्हते हेही तितकेसे खरे नाही. पेशवाईनंतर ब्रिटिशांचे राज्य सुरू झाल्यावर ब्रिटिशांनी आपले शिक्षण धोरण ठरवण्यापूर्वी येथील शिक्षण पद्धतीचा अभ्यास करण्यासाठी ब्रिटिश अधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नेमली होती. कोकणातील कारवार, रत्नागिरी या जिल्ह्यांच्या पाहणीत त्यांना

आढळून आले की, येथे शिक्षणाचा प्रसार चांगला झाला आहे व जिल्ह्यात दोनशे पाठशाळा कार्यरत आहेत, येथील शिक्षण प्रसार त्या वेळच्या इंग्लंडमधील शिक्षण प्रसारापेक्षा चांगला आहे. अठराव्या शतकात इंग्लंड काही फार शिक्षित राष्ट्र नव्हते. इंग्रजांचे राज्य आल्यावर येथील निरक्षरता कमी न होता वाढली आणि त्याचे कारण इंग्रजांनी अवलंबिलेले शिक्षण धोरण होते. महात्मा गांधींनीही हा मुद्दा गोलमेज परिषदेत उपस्थित केला होता. त्याला समाधानकारक उत्तर इंग्रज अधिकाऱ्यांना देता आले नव्हते. भारतातील शिक्षण पद्धती ही ब्रिटिशांना समाधानकारक वाटत होती. या शिक्षण पद्धतीचा बेल या ब्रिटिश अधिकाऱ्याने चांगला अभ्यास केला होता व त्यातील चांगल्या पद्धतीचा त्याने इंग्लंडमध्ये परत गेल्यावर शिक्षण प्रसारासाठी उपयोग केला. इंग्लंडमधील एकोणिसाव्या शतकातील शिक्षण प्रसाराला भारतीय शिक्षण पद्धतीचा उपयोग झाला होता.

भारतीय शिक्षण बहुजनांस खुले नव्हते, असाही समज प्रचलित आहे; पण ते तितकेसे बरोबर नाही. फक्त दलितांना ते शिक्षण उपलब्ध नव्हते. इतर सर्व सवर्णांना ते उपलब्ध होते. ब्रिटिशांनी केलेल्या सर्वेक्षणात तसे आढळून आले होते. पुणे जिल्ह्यातील एका तालुक्यातील आठशे विद्यार्थ्यांपैकी निम्मे विद्यार्थी ब्राह्मणेतर होते. एकूण संख्येच्या मानाने त्यांचे प्रमाण कमी होते. याचे कारण शिक्षण अनुत्पादक आहे, असे त्यांचे मत होते, म्हणून शेतीतून वेळ काढून तो शिक्षणासाठी देणे अपव्यय आहे, असे त्यांना वाटे. जे व्यावसायिक शिक्षण होते ते कुटुंबात वंशपरंपरेने मिळत असे. त्या शिक्षणाचे सार्वजनिकीकरण झाले नव्हते. ते प्रामुख्याने ट्रेनिंग होते. उपलब्ध विद्यार्थ्यांचे अल्प प्रमाण, व्यावसायिक शिक्षण जातिबद्ध असणे व छपाईसारख्या तंत्रज्ञानाचा अभाव यामुळे व्यावसायिक शिक्षणाला सार्वत्रिक स्वरूप आले नव्हते. ब्रिटिश काळात छपाईचे तंत्रज्ञान उपलब्ध झाल्यानंतरच सार्वत्रिक शिक्षण (व्यावसायिक) ही संकल्पना लोकांपर्यंत पोहोचली.

पेशवाई काळात दक्षिणारूपाने पंधरा लाख रुपये शिक्षणावर खर्च होत होते. पेशवाई बुडाली आणि हा खर्च थांबला. शिक्षण क्षेत्र पोरके झाले. पेशव्यांच्या सर्व आर्थिक जबाबदाऱ्या आपण घेऊ असे ब्रिटिशांनी जाहीर केले; पण प्रत्यक्षात तसे केले नाही. तेव्हा पुण्यातील ब्राह्मणांनी आंदोलन केले व ब्रिटिश शासनास त्या जबाबदाऱ्या स्वीकारायला लावल्या. ब्रिटिशांनी

पंधरा लाखांऐवजी दोन लाख रुपये खर्च करू असे मान्य केले; पण प्रत्यक्षात पन्नास हजारच दिले. त्यातील फक्त निम्मेच म्हणजे पंचवीस हजार रुपये दक्षिणारूपाने वाटले व उरलेल्या पैशातून चार शैक्षणिक उपक्रम सुरू केले. त्या दक्षिणा फंडातून संस्कृत कॉलेज तथा पूना कॉलेज हे पेशव्यांच्या विश्रामबाग वाड्यात सुरू केले. त्या कॉलेजच्या प्राध्यापकांना दक्षिणा फंडातून पगार दिला. शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना दक्षिणा फेलोशिप सुरू केली. मराठीत साहित्य निर्माण करण्यासाठी दक्षिणा प्राईझ सुरू केले. पुस्तके छापता यावीत म्हणून छापखाना सुरू केला. अशा रीतीने आधुनिक संस्थात्मक शिक्षणाचा पाया रोवला गेला. पूर्वी शिक्षण पाठशाळांतून, शिक्षकाच्या घरी दिले जाई. ते आता सर्वांना सोयीच्या जागेत सुरू झाले. तेथे विद्यार्थी व शिक्षक एकत्र येत. संस्था ही व्यक्तीच्या जीवनावर अवलंबून न राहता तिला स्वत:चे स्वतंत्र जीवन प्राप्त झाले. त्यामुळे शिक्षणात सातत्य राहिले. शिक्षणावर राजसत्तेचे प्रत्यक्ष नियंत्रण राहू लागले. तेथे कोणी शिकावे, केव्हा शिकावे, कोणत्या भाषेत शिकावे यावर शासनाने नियंत्रण ठेवले म्हणून विद्यार्थ्याने शिक्षण घ्यावे, अर्थार्जन होईल या आशेने शिक्षकाने शिकवावे व समाजावर नियंत्रण ठेवण्याच्या आपल्या कार्यात शिक्षण क्षेत्रातून प्रशिक्षित कामगार मिळावेत ही नव्या शिक्षणाची ध्येय-धोरणे ठरली. महाराष्ट्रातील पहिले कॉलेज पूना कॉलेज दक्षिणा फंडातून सुरू झाले. त्यात काय शिकवत, कोण शिकवत, त्याचे व्यवस्थापन कसे होते, तेथे कोणती पुस्तके अभ्यासली जात हा या अभ्यासाचा उद्देश आहे. ज्ञानवृद्धी व ज्ञानप्रसार ही प्रत्येक समाजाची गरज असते आणि त्यामुळे या कार्यात गुंतलेल्यांचा योग्य तो मान ठेवला जातो. दक्षिणा या संकल्पनेचा उदय व प्रसार ह्या जाणिवेतून झालेला दिसतो. ज्ञान सतत वाहते असते. जुने टाकून द्यावे लागते व नवे स्वीकारावे लागते. या प्रक्रियेत जुन्या ज्ञानींना वाली राहत नाही. जुने ज्ञानी सहजरीत्या नवे ज्ञान व कौशल्यही प्राप्त करू शकत नाही. पूर्वी ज्ञानी लोकांना दक्षिणा देऊन गौरव केला जाई. या गौरवाचे रूप सतत बदलत गेलेले दिसते. या प्रकारचे प्रश्न आजच्या समाजातही दिसतात. उदा. नवे तंत्रज्ञान आत्मसात करू न शकलेले गिरणी कामगार व धरणग्रस्त यांचे प्रश्न व एकोणिसाव्या शतकातील वैदिकांचे प्रश्न एका अर्थाने एकाच स्वरूपाचे आहेत. नवे स्वीकारताना

जुन्यांची नीट व्यवस्था न लावल्यामुळे समाजात विनाकरण असंतोष निर्माण होतो. गेल्या तीनशे वर्षांचा दक्षिणा या संकल्पनेचा अभ्यासही आपणास हेच दर्शवतो, नवीन स्वीकारताना जुन्याचे काय करायचे हा नुसता शैक्षणिक प्रश्न नसून सामाजिक प्रश्न आहे. समाज हा किती कार्यक्षमतेने तो हाताळतो, यावरच समाजस्वास्थ्य अवलंबून राहते.

दक्षिणाप्राईझ आणि त्यावेळची शिक्षण व्यवस्था समजून घेणे आजही तेवढेच आवश्यक आहे आणि त्याचा आपल्या समाजस्वास्थ्यासाठी उपयोग हाईल यात शंका नाही.

**डॉ. नीळकंठ बापट**
**संपादक**

**महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळ पुरस्कृत**
**कै. नागेश विनायक बापट यांच्या पुस्तकांची प्रकाशन योजना**
संपादक डॉ. नीळकंठ बापट यांचे

# दोन शब्द

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ ही संस्था एक अत्यंत स्तुत्य योजना राबवते. या योजनेअंतर्गत दुर्मिळ पुस्तकांचे पुन:प्रकाशन केले जाते. या योजनेअंतर्गत एकोणिसाव्या शतकातील प्रथितयश साहित्यिक कै. नागेश विनायक बापट (१८३९-१९०२) यांची पुस्तके प्रसिद्ध करण्याचे काम हाती घेतले आहे. बापटांनी १८७८ ते १९०२ या काळात एकूण दहा पुस्तके लिहिली. ती प्रामुख्याने ऐतिहासिक व प्रेरणादायी स्त्री-पुरुषांची चरित्रे आहेत आणि ऐतिहासिक घटनांवर आधारित कादंबऱ्या व कथा आहेत. त्याचप्रमाणे सुभद्राहरण व टिटवी यासारख्या पौराणिक कथाही यात समाविष्ट आहेत.

यापैकी निवडक सात पुस्तके मंडळातर्फे प्रकाशित करत आहोत. ती सात पुस्तके अशी -

१) पेशवे पहिले बाजीराव यांचे चरित्र, प्रकाशक-निर्णयसागर, १८७८
२) सुभद्राहरण, प्रकाशक-निर्णयसागर, १८८२
३) टिटवी, प्रकाशक-निर्णयसागर, १८९३
४) लिक्लेअरचे चरित्र, प्रकाशक-सहविचारिणी सभा, १८९५
५) पानपतची मोहीम, प्रकाशक-दामोदर सावळाराम कंपनी, १८९७
६) चितूरगडचा वेढा, प्रकाशक-निर्णयसागर, १८९९
७) महाराणी जमनाबाई गायकवाड यांचे चरित्र, प्रकाशक-दामोदर सावळाराम कंपनी, १९००

आज ही पुस्तके बाजारात उपलब्ध नाहीत; पण आता मंडळाच्या उपक्रमामुळे ती उपलब्ध होत आहेत. मंडळाचे उत्साही, साहित्यप्रेमी व इतिहासाची जाण असणारे अध्यक्ष श्री. बाबा भांड यांच्या अथक प्रयत्नांमुळे काळाआड गेलेल्या पुस्तकांना प्रकाश दिसत आहे. त्यांनी मुख्य संपादक म्हणून माझी नेमणूक केली. त्यांचे आभार मानावेत तेवढे थोडेच आहेत.

पुस्तकांचे प्रकाशन जरी आज २०१८ मध्ये होत असले तरी याची तयारी गेली २५ वर्षे चालू आहे. या २५ वर्षातील संपादकांचे अनुभव त्यांच्या 'नागेश विनायक बापट यांचे चरित्र व साहित्य' या पुस्तकात वाचावयास मिळतील. ते वाचकांना उद्‌बोधक वाटतील ही आशा. त्यात बापटांची वैयक्तिक माहिती व त्यावेळच्या सामाजिक व राजकीय परिस्थितीचे विश्लेषण केले आहे व त्याचा हा खंड समजून घेण्यास मदत होईल. संक्षिप्त स्वरूपात रावसाहेब बापट यांच्याविषयीची माहिती सोबतच्या लेखात दिली आहे.

बापट यांनी जी दहा पुस्तके लिहिली, त्यामागे राजकीय व सामाजिक प्रेरणा होत्या. स्वधर्म, स्वभाषा व स्वदेश या प्रत्येकास एकोणिसाव्या शतकात विशेषत: १८१८ मध्ये पेशवाईचा अंत झाल्यावर जबरदस्त आव्हाने निर्माण झाली होती. समाजाने आत्मसन्मान, आत्मविश्वास हरवला होता. लोकांच्या मनात प्रश्न पडे, की मराठी राज्य बुडाले व परदेशी इंग्रजांचे राज्य आले हे चांगले की वाईट? हरवलेला आत्मसन्मान परत मिळवून देणे समाजधुरिणांचे काम होते. अनेकांनी साहित्याद्वारे हे काम हाती घेतले. बापटांनीही त्यात लक्षणीय भर घातली. प्रत्येक पुस्तकातील घटनांपासून आजच्या समाजाने काय बोध घ्यावा याची ते चिकित्सक परीक्षा करतात व उपाय सुचवतात.

त्यांच्या पहिल्या पुस्तकास (बाजीराव पेशवे यांचे चरित्र) त्यावेळचे मानाचे बक्षीस-दक्षिणाप्राईज-हे मिळाले व साहित्य क्षेत्रातील मान्यवरांनी त्या पुस्तकाची प्रशंसा केल्याने त्यांना अधिक लेखन करण्यास स्फूर्ती मिळाली व त्यांनी दहा पुस्तके लिहिली. या पुस्तकांच्या प्रकाशनाला करवीरचे महाराज व बडोदा संस्थानचे अधिपती सयाजीराव गायकवाड यांचा नैतिक व आर्थिक पाठिंबा मिळाल्याने बापटांचा आत्मविश्वास अधिकच वृद्धिंगत झाला.

एकोणिसाव्या शतकापूर्वी मराठी साहित्य मुख्यत्वेकरून पद्यमय होते. गद्य साहित्य फारच थोडे होते. एकोणिसाव्या शतकातील गद्य मराठी साहित्य इंग्रजी साहित्यावर अवलंबून असल्याचे आढळते. त्यात ऐतिहासिक माहितीवर आधारित ललित लिखाण फारच अल्प होते. मोचनगड यासारख्या ऐतिहासिक कादंबऱ्या बापटांच्या लेखनापूर्वी प्रसिद्ध झाल्या होत्या; पण

त्यात ऐतिहासिक घटना वा ऐतिहासिक व्यक्तींचा संदर्भ नव्हता. बापटांच्या कादंबऱ्या मात्र ऐतिहासिक व्यक्ती व घटना यावर आधारित आहेत. मराठी भाषेत ऐतिहासिक कादंबरीचे जनक म्हणून बापट यांना गौरवणे योग्य होईल.

**- डॉ. नीळकंठ बापट**



# श्रीमंत बाजीराव बल्लाळ

ऊर्फ पहिले बाजीराव साहेब पेशवे

# श्रीमंत बाजीराव बल्लाळ

## ऊर्फ पहिले बाजीराव साहेब पेशवे.

हा ग्रंथ,

जुन्या बखरी, जुने दाखले आणि कितीएक इंग्रजी

ग्रंथ, यांच्या आधारानें,

**नागेशराव विनायक बापट वांईकर,**

पूर्वीं डेप्युटी एज्युकेशनल इन्स्पेक्टर, जिल्हा धारवाड आणि

बेळगांव व हल्लीं बडोदें राज्यांतील मामलेदार,

यांनीं

**दक्षिणा प्राइझ् कमिटीच्या जाहिरातीवरून**

तयार करून पाठविला,

**तो सदरहू कमिटीनें पसंत केला.**

आवृत्ति ।चवी.

मुंबईत,

जावजी दादाजी यांच्या

"निर्णयसागर" छापखान्याचे मालक तुकाराम जावजी

यांनीं छापून प्रसिद्ध केला.

इ० स० १९०३.

हा ग्रंथ

**रावबहादूर लक्ष्मणराव जगन्नाथ वैद्य**

माजी असिस्टंट रेव्हेन्यू कमिशनर उत्तर भाग व हल्ली बडोदे राज्याचे सरसुभे साहेब

आणि

**कै. रावबहादूर धोंडो कृष्ण कानेटकर**

माजी डेप्युटी कलेक्टर आणि मॅजिस्ट्रेट, जिल्हा रत्नागिरी व दक्षिण महाराष्ट्र प्रांतांतील जमखिंडी संस्थानचे कारभारी

यांस

**कृतज्ञतापूर्वकबुद्धीने ग्रंथकर्त्याने**

नजर केला आहे

# दक्षिणा प्राईझ कमिटीच्या चिटणीसांच्या रिपोर्टातील वेचे

**पहिल्या भागात मावळ्यांच्या स्थितीचे वर्णन केले आहे त्याविषयी :**

''शिवाजीच्या पूर्वी व पुढे शिवाजीसारखा वाट दाखविणारा मिळाल्यावर मावळ्यांची स्थिती कशी होती तिचे ग्रंथकर्त्याने एक सुंदर चित्र उभे केले आहे.''

**तिसऱ्या भागात बाजीराव व चिमणाजी यांच्या बाल्यदशेचे वर्णन केले आहे त्याविषयी :**

''ह्या ग्रंथकर्त्याने या दोघा भावांच्या बाल्यदशेचे फारच उत्कृष्ट वर्णन केले आहे. बाजीरावाच्या लहानपणाची सांगितलेली गोष्ट मोठी मनोरंजक असून ती अद्‌भुतरसाचा आविर्भाव उत्पन्न करणारी आहे.''

**नवव्या भागात धावडशीच्या महापुरुषाचे व त्याच्या मठाचे वर्णन केले आहे त्याविषयी :**

''त्या साधूच्या मठाचे आणि त्याच्या आसपासच्या स्थळाचे वर्णन या ग्रंथकर्त्याने अतिशय मनोरंजक, मनात ठसण्याजोगे आणि बोधप्रद असे केले आहे. ह्या प्रसंगाची त्याची भाषा आणि त्याचे विचार फारच शोभायमान दिसतात. या वर्णनात असा काही चमत्कार आहे की, हे वाचताना अंत:करणात महापूर येऊन ते ब्रह्मानंदात पोहत आहेत की काय असे वाटते. ही हुबेहूब उभी केलेली तसबीर अगदी साधी, भव्य, छानदार आणि मोठ्या थाटमाटाची आहे. या विद्वान कारागिराचे परिश्रम या स्थळी उत्तम सफल झाले आहेत. या वर्णनात खोट्यानाट्या गप्पा, अतिशयोक्त्या किंवा मोठमोठे रूपकालंकार वगैरे घातलेले नाहीत. गुरूने शिष्यांस केलेला बोध अपूर्व वैराग्यजनक, संकलित आणि मनात बाणून जाण्यासारखा आहे. तो अद्‌भुतरसाने ओतप्रोत भरला आहे. तरी हा उपदेश अगदी खरा आहे, असे मानून तो स्वीकारण्यास मन अगदी आशंकत नाही.''

**बाराव्या भागात शिंदे-होळकर इत्यादी सरदारांचा मूळ वृत्तांत दिला आहे त्याविषयी :**

''या ग्रंथात त्यांच्या थोर घराण्याचे विश्वास ठेवण्यासारखे आणि मनोहर असे इतिहास स्थळोस्थळी दिले आहेत. अक्कलकोटकर फत्तेसिंग भोसले यांचा कुलवृत्तांत ग्रंथकर्त्याने दिला आहे. तो मोठा मौज वाटण्यासारखा आहे.''

**तेराव्या भागात बाजीरावाने प्रतिनिधीस उत्तर देताना जे भाषण केले त्याविषयी :**

''त्या भाषणाची शैली मोठी पाणीदार आणि जोराची आहे. ते पेशव्याचे वीरश्रीयुक्त भाषण ऐकून दरबारातील सरदार व शाहूमहाराज यांच्या अंगी शौर्याचा संचार होऊन त्यांनी लागलीच आपापल्या तरवारीस हात घातले आणि त्या त्वेषाच्या झपाट्यात 'चला, आपण आताच उठून शत्रूच्या नरडीचा घोट घेऊ!' असे बोलू लागले. 'छी: आमची (मराठी) भाषा काय! ओबडधोबड! तिच्यात काही जीव नाही,' असे म्हणण्याचा प्रघात पडला आहे; परंतु ग्रंथरचनेचे हे सुंदर मासले दिले आहेत त्यावरून लेखणी हुशार लिहिणाराच्या हाती असली म्हणजे केवढी करामत करून दाखविते हे उघड दिसून येते.''

**बाजीरावाने आपल्या पुत्रास राज्यकारभाराची माहिती व्हावी म्हणून एक लेख तयार केला होता. त्यातील वेचे अठराव्या भागात दिले आहेत, त्याविषयी :**

''त्यातील ह्या शूर व राजनीतिकुशल पुरुषाचे विचार पाहून तो लेख त्याला व ज्या देशात तो जन्मला त्या देशाला खरोखर भूषणास्पद आहे. स्वदेशाभिमान, उद्योग, औदार्य, शहाणपण व स्वकर्तव्य हे गुण शिकावे, आणि जड जोखिमीची कामे करावी असा त्याने स्वपुत्रास सदुपदेश केला आहे. त्यात त्याचे व्यवहारचातुर्य दिसून येते. आमच्या प्रत्येक राजाने तो वाचून त्याचे मनन करावे; इतकेच नव्हे, तर तो उपदेश प्रत्येकाने आपल्या अंत:करणरूप पटावर लिहून ठेवण्यासारखा आहे.''

**शेवटल्या भागात बाजीरावाच्या गुणांचे वर्णन केले आहे त्याविषयी :**

''या वर्णनाची भाषा फार सुंदर आणि शुद्ध आहे. या थोर पुरुषाच्या अकालिक मृत्यूपासून पुढे जे जे परिणाम घडले त्यांजवर ग्रंथकर्त्याने जे आपले विचार प्रगट केले आहेत ते अगदी रास्त आहेत.''

**त्याच भागात बाजीरावाने शिंदे-होळकरांस अंतकाली उपदेश केला त्याविषयी:**

''हा भाग वाचताना प्रौढप्रताप हामिलकार व त्याचा पराक्रमी पुत्र हानिबाल यांचे आपोआप स्मरण होते. स्पार्टन् माउलीची हिंमत अंत:करणात उभी राहते. त्या वीरमातेचा आपल्या पुत्रास उपदेश हा असे की, बाबा, मार किंवा मर, यापैकी कोणते तरी एक कर.''

**त्याच भागात राजेरजवाड्यांस केलेल्या उपदेशांविषयी :**

''या भागाच्या अखेरीस या पृथ्वीच्या पाठीवर जे अजागल, बेबंद, अनीतिमान, उधळे आणि मूर्ख राजे असतील त्यांनी हे रसाळ, स्तुत्य आणि मनोरंजक चरित्र ध्यानात धरून तसे गुण आपल्या अंगी धारण करण्याची वांछा धरावी आणि सर्वांनी हाच कित्ता गिरवावा, असा ग्रंथकर्त्याने फार उत्तम बोध केला आहे, तो अगदी रास्त आहे.''

# प्रस्तावना

इतिहास, बखरी व चरित्रे ही मनुष्याच्या अनुभवरत्नांची भांडारे होत. ती 'पुढच्यास ठेच, मागला शहाणा' या न्यायाने सर्वांस अत्यंत हितावह आहेत.

अमूक राजा अमक्या देशांत अमक्या वर्षी जन्मला, अमक्याने अमूक लढाया मारल्या, अमक्याने अमूक राजाचा पराभव केला, अमक्याला अमूक पुत्र होते, अमक्याला अमूक रीतीने राज्य मिळाले किंवा अमक्याचे राज्य अमूक कारणाने लयास गेले, या कर्मकथांचे पातडे लिहून लोकांपुढे मांडावे इतकाच ग्रंथकार व चित्रकार यांचा मूळ उद्देश नसावा. तसेच दुनियेतल्या घडामोडी इत्थंभूत कळल्यानेच इतिहास वगैरेची इतिकर्तव्यता संपली असे नाही. हा भवसागर मनुष्याने मानवकोटीतच राहून तरून जावा लागतो, यास्तव मनुष्यांमध्ये मनुष्याने वागावे कसे, हे कळले पाहिजे. ते कळण्यास मानव स्वभावाचे उत्तम ज्ञान त्यास अवश्य असले पाहिजे. एरव्ही येथे कधीही सौख्य व्हावयाचे नाही. यासाठी या पृथ्वीच्या पाठीवर, अनंत मनुष्यांच्या, अनंत स्वभावांची, अनंत प्रसंगी, अनंत तऱ्हांची जी स्वरूपे दृष्टीस पडतात, त्यांची ग्रंथकार, कादंबऱ्या व इतिहास यांनी पुरी ओळख करून दिली पाहिजे.

पूर्वी कोणी कसे आचरण केले, त्याचा परिणाम काय झाला, नवीन राज्ये कशी उदयास येतात, त्यांची भरभराट कशी होते, ती कोणत्या कारणाने अस्तंगत होतात, सदाचरणाचे फळ काय, दुराचरणाचा परिणाम काय होतो, अति लोभाने काय होते, चतुर व नीतिमान पुरुष संकटातून कसे पार पडतात, सज्जनांची कीर्ति कशी फैलावते, दुष्टांची दुर्दशा कशी होते, विषयांध, मदांध व राज्यांध प्राणी, आपले प्राण व प्रतिष्ठा यांस कसे आंचवतात, गर्विष्ठाचा मीपणा कसा नष्ट होतो, आणि संपत्ती किती अशाश्वत आहे, ही मीमांसा, इतिहास व कादंबऱ्या यांच्या ज्ञानाने कळते. म्हणून रामदास स्वामी बोध करितात की –

**ज्ञानाविण जे जे कळा । ते ते जाणावी अवकळा ।।**
**दास म्हणे ज्ञानाविण । प्राणी जन्मला पाषाण ।।**

इतिहासादिकांच्या अवलोकनापासून आणखी हे फायदे आहेत की, त्यांच्या योगाने मन विकसित, शांत, प्रसन्न आणि प्रशस्त होते. इतकेच नव्हे, तर कल्पनाशक्ती, विचारशक्ती, स्मरणशक्ती इत्यादी मानसिक शक्ती प्रफुल्लित होऊन, लीनता, सहनशीलता, शौर्य, चातुर्य, औदार्य, दीर्घदृष्टी आणि –

**जगाचा जनिता कृपेचा सागर ।**
**दीनां दयाकर दुष्टां काळ ।।**

असे ज्याचे तुकाराम साधूने वर्णन केले आहे, त्या परमेश्वराचे ठायी अनन्य भक्ती, या सद्‌गुणांची किंमत कळते.

आता कोणी असे म्हणेल की, सगळ्या जगाचा साद्यंत इतिहास शिकवेल कसा व ध्यानात धरवेल कसा? होय, गोष्ट खरी आहे. 'रात्र थोडी आणि सोंगे फार' यामुळे अथपासून इतिपर्यंत सर्व जगाचा संपूर्ण इतिहास कोणाच्यानेही शिकवणार नाही, हे सत्य आहे. पृथ्वीवरील सर्व लोकांची कुराणे, पुराणे उलथीपालथी करून त्यांची मीमांसा करण्यास एका मनुष्याचे सबंध आयुष्य पुरावयाचे नाही, हे वास्तविक आहे; पण इतिहास व ऐतिहासिक कादंबऱ्या हा एक असंख्य चरित्ररत्नांचा बडा जामदारखाना आहे, त्यात असंख्य पुरुषांची असंख्य आख्याने भरलेली आहेत. त्यापैकी ज्या देशांशी ईश्वरेच्छेने आपला निकट संबंध जडला आहे, अगर ज्या देशात आपण जन्मास आलो, त्या देशातील काही विख्यात पुरुषांची चरित्रे व गोष्टी आपण लक्षपूर्वक वाचल्या तरी बस आहे. सगळ्या ग्रंथमहासागराचे मंथन केले पाहिजे असे नाही.

या देशांतही आजपर्यंत नावाजण्यासारखे बरेच पुरुष होऊन गेले. त्यापैकी कित्येकांची चरित्रें व गोष्टी मराठीत लिहिल्या आहेत व काहींचे मूळ ग्रंथ इंग्रजीत असून त्यांची मराठीत भाषांतरे झाली आहेत, तरी त्यांचे भोक्ते फारसे आढळत नाहीत. याचे कारण बहुधा :–

**स्वदेशजातस्य नरस्य नूनं गुणाधिकस्यापि भवेदवज्ञा ।**
**निजांगना यद्यपि रूपराशिस्तथापि लोकः परदारसक्तः ।।**

या सभातरंगकाराच्या म्हणण्याप्रमाणे आपले ते वाईट आणि दुसऱ्याचे ते

चांगले हे असावे किंवा आपल्या देशात झालेल्या विख्यात व पराक्रमी पुरुषांची वाचण्याजोगी रसाळ रसाळ चरित्रे, ऐतिहासिक कादंबऱ्या व इतिहास लिहिलेले नाहीत, यामुळे मराठी भाषेकडे लोकांचे दुर्लक्ष, हे असावे. यापैकी कोणतेही कारण खरे असले तरी महाराष्ट्र भाषेची हेळसांड होत आहे ही गोष्ट फार शोचनीय होय. त्या मराठी भाषेची प्रौढी श्रीधर कवींनी पुढील ओव्यांत

**मराठी वचनें निश्चित । परी अत्यंत रसभरित ।।**
**मधुमक्षिकांचे मुखींहून स्त्रवत । अति सुरस जैसा ।।**
**गीर्वाण हे शशिमंडळ अद्भुत । त्याची प्रभा हे प्राकृत ।।**

अशी वर्णन केली आहे, त्या भाषेला पुळपुळीत, रानटी, दरिद्री, निर्जीव, निरस व शुष्क असे म्हणणे जरा गैरवाजवी आहे. आपल्या भाषेत मनोरंजक व ज्ञानवर्धक अशा ग्रंथांची मोठी वाण आहे, ती दूर करण्यासाठी सर्व मराठी भाषानिज्ञांनी मनापासून झटले पाहिजे. अडाणी सोनाराच्या हातून दागिन्यांचा घाट सुरेख न बनला तर ती कसून सोन्याची, की सोनाराची? हाच दृष्टांत भाषा व ग्रंथकर्ते यांजकडेसही का न लावावा?

मराठी भाषेत एखाद्या ऐतिहासिक पुरुषावर ग्रंथ लिहून स्वभाषेची यथामति सेवा करावी, असे बरेच दिवस या ग्रंथकर्त्याच्या मनात घोळत होते; परंतु त्या इष्ट हेतूचा अंकुर हृदयभूमीच्या बाहेर न पडता आतल्या आत थबकून राहिला होता. पुढे पहिले बाजीरावसाहेब पेशवे यांच्या कारकीर्दीवर ग्रंथ लिहिण्याबद्दल 'दक्षिणा प्राईझ कमिटी'कडून जाहिरात लागली. तेव्हा तो अंकुर वाढीस लागून त्याचा हा ग्रंथरूप वृक्ष बनला. कमिटीची जाहिरात पाहिली, त्या वेळेस फक्त ८/९ महिन्यांची मुदत उरली होती, तरी 'यत्ने कृते यदि न सिद्ध्यति कोऽत्र दोष:' असा विचार करून, जुने मराठी दाखले, जुन्या मराठी बखरी, कित्येक इंग्रजी इतिहास व वृद्ध वृद्ध लोकांच्या तोंडच्या विश्वसनीय गोष्टी या साधनांची जुळवाजुळव करून, त्यांच्या साह्याने मुदत भरण्याच्या आत हा ग्रंथ लिहून कमिटीकडे पाठविला. तेव्हा तो तडीस नेण्यास श्रम व त्वरा किती करावी लागली असेल याची अटकळ सुज्ञ वाचक करतीलच. तरी त्याच्या शीघ्र यत्नास ईशकृपेने पूर्ण यश मिळाले हे कळविण्यास संतोष वाटतो.

पहिले बाजीरावसाहेब पेशवे हा थोर पुरुष अजमासे १५० वर्षांपूर्वी या

भरतखंडांत होऊन गेला. या पराक्रमी पुरुषाची इतिहासकर्त्यांनी सन्मणिमालेत गणना केली आहे, ती योग्यच आहे. त्याचे चरित्र खरोखर मोठे मनोरंजक आणि ध्यानात धरण्यासारखे आहे. या उद्योगी पेशव्याचा कित्ता या भूमंडळावरील केवल राजेरजवाड्यांचेच हित करील असे नाही, तर त्याच्या योगाने सर्व संसारी मनुष्यांसही आपापल्या कुटुंबाचे हित साधिता येईल. तर हे ऐतिहासिक कादंबरीच्या धर्तीवर लिहिलेले रसाळ चरित्र सर्वांनी लक्षपूर्वक वाचावे, त्यातील मर्म ध्यानात आणावे, त्यापासून सद्बोध घ्यावा आणि आपले व आपल्या देशाचे हित साधावे, अशी ग्रंथकर्त्याची मनापासून इच्छा आहे. ती जगन्नियंता विश्वंभर सफल करो.

ही स्वभाषेची अल्प सेवा मराठी भाषेचा उत्कर्ष इच्छिणारे यांस मान्य होऊन त्यांचे अंतरात्मे अंशत: तृप्त झाल्याचे व हे पुस्तक छापून प्रसिद्ध करणारे यांस उदार आश्रय मिळाल्याचे, ग्रंथकर्ता सुदैवेकरून ऐकेल तर त्याच्या सर्व श्रमांचे साफल्य झाले असे तो मानील.

जानेवारी, सन १८७९ **- ग्रंथकर्ता**

ग्रंथकार



रा. सा. नागेशराव विनायक बापट,

बडोदें.

## अनुक्रमणिका


१. उपक्रम/६५
२. अभ्युदय/६९
३. बाल्यदशा/७३
४. सुशिक्षण/७८
५. पितृवियोग/८३
६. अंतर्बाह्य स्वरूप/८७
७. दरबार/९३
८. दरबारचे भाषण/९६
९. महापुरुष/९९
१०. बोधामृतसार/१०४
११. देशस्थिती/१०९
१२. माळवा प्रांतावर स्वारी/११४
१३. वाक्‌युद्ध/११९
१४. गोदावरीच्या पलीकडे निजामाशी युद्ध/१२९
१५. बडोद्याजवळची लढाई/१३५
१६. सेनापती दाभाड्याची गादी कायम राखली/१४०
१७. कोल्हापूरकर संभाजीचे प्रकरण/१४५
१८. राज्यकारभार/१५१
१९. बुंदेलखंडावर स्वारी/१५८
२०. महंमदखान बंगषाचा पराभव व
छत्रसाल राजाची सुप्रसन्नता/१६३
२१. शिद्दीचा पराजय/१६९
२२. दिल्लीवरची स्वारी/१७५
२३. पोर्तुगीज लोकांवर स्वारी/१८१
२४. लढाईची तयारी/१८७
२५. ताल भोपाळची लढाई/१९२
२६. नादिरशाहावर स्वारीची तयारी/१९९
२७. वैभवोन्नती/२०५
२८. ३उपसंहार/२१३

भाग-१

# उपक्रम

दक्षिण हिंदुस्थानाच्या पश्चिमेस तापी नदीपासून तहत कन्याकुमारीपर्यंत दक्षिणोत्तर जी आडवी डोंगरांची रांगची रांग पसरली आहे, तो सह्याद्रिपर्वत. त्याच्या घाटमाथ्यावर व पायथ्याशी मावळात मावळे लोकांची वस्ती. त्यांच्या पराक्रमावर राजा शिवाजी याने मराठी राज्याचा व्यूह रचिला. ते मावळे, डोंगरकठडे घोरपडीसारखे झराझर चढत आणि दऱ्याखोऱ्यांतल्या चोरवाटा दाखवीत. ते हाडाचे मजबूत, इमानी पहिल्या प्रतीचे, धनी म्हटला म्हणजे त्याच्या जीवासाठी आपला प्राण देणारे व सांगितलेले काम झटून करणारे असे होते; परंतु जोपर्यंत त्यांस शिवाजीसारखा कोणीही हिंमतदार म्होरक्या मिळाला नव्हता तोपर्यंत, त्यांचा उपजत अंगस्वभाव उदयास आला नव्हता. स्वदेशाभिमान, स्वातंत्र्य, स्वधर्मश्रद्धा, स्वराजनिष्ठा आणि स्वदेशबंधुप्रीति ही त्यांच्या गावीही नव्हती. नाचण्याची नुसती लाल भाकर व कालवण अंबील किंवा हुलग्याचे माडगे, हे त्यांचे रुक्ष खाणे. तेही पोटभर नाही, त्यामुळे ते पोटम्हातारे झालेले. नेसायास नुस्ती लंगोटी, अंगावर एक मळकेसे रगटे, तेही धड नाही; राहण्यास लहानसे गवती खोपट, त्यात ना थाळा, ना पितळी; सर्व गाडग्यामडक्यांशी व्यवहार. अर्थात ते वस्त्रपात्रकलाहीन मावळे पूर्वी वेडेबिद्रे, मूर्ख, बावळे व अजागळ दिसत. पुढे शिवाजीचा रोजमुरा घेऊन त्यास ते रोज मुजरा करू लागले. तसे त्यांचे पहिले स्वरूप पालटले. नेसायाला मांडचोळणा, कमरेला कांचा, अंगाला रुदार अंगरखा, डोईला पागोटे आणि पोटाला भरपूर अन्न, ही

सामग्री मिळू लागली. तसे हे हळूहळू रणशूर शिपाई बनले. ढाल, तरवार, बंदूक, भाला, बर्ची, तीरकमान इत्यादी हत्यारे ते बाळगू लागले आणि धन्याच्या आज्ञेत राहून तरवारीच्या धारेवर व भाल्याच्या टोकावर त्यांनी देशचे देश काबीज केले. मोगलास जर्जर केले व पोर्तुगीज, डच आणि हबसाणचा शिद्दी यांस अनेक वेळा हात दाखविला. मावळ्यांना बरोबर घेऊन शिवाजी जवळ जवळ आला असे कळले की, व्यापाराच्या बहाण्याने या देशात राहिलेल्या परकी लोकांच्या अंगात कापरे भरे.

या सह्याद्रिपर्वतातून कृष्णा, वेण्या, कोयना, सावित्री इत्यादी अनेक नद्या झुळुझुळु वाहतात. त्यांच्या अमृततुल्य मधुर उदकाने संपूर्ण महाराष्ट्र देश सुपीक, सुखी व समृद्ध झाला आहे. त्यांच्या दुथडीवर व आसपास सहस्रावधी गावे, क्षेत्रे, शहरे, खेडी व वाड्या वसल्या आहेत. आणखी, स्वराज्याचा बचाव होण्यासाठी या पर्वतराजावर प्रतापगड, रायगड, वसंतगड इत्यादी अनेक मजबूत किल्ले बांधले आहेत.

सह्याद्रीच्या मावळत्यास, समुद्रतीरापर्यंत जो प्रदेश ती कोकणपट्टी. शिवाजीने आपल्या लष्करात हेटकरी ठेवले होते, ते मूळचे येथीलच म्हणजे तळघाटचे राहणारे. शिपायीगिरीचे कामात हे मावळ्यांचे सख्खे बंधू. बंदुकीने हटकून नेम मारावा असा यांनीच. कोकणची जमीन बहुधा नादान, घाटाशी खडकाळ आणि समुद्रकाठाशी रेताळ. याप्रमाणे पायाखाली रखरखीत खडकाळ जमीन, डोक्यावर अनंत आकाश, परसात अफाट समुद्र आणि अंगणात उंच सह्याद्री. अशा काचात सापडलेले कोकण उद्योगी, धैर्यमान व साहसी असणे हे साहजिक आहे. शरीरसंपत्ती, समृद्धी, विद्वत्ता आणि कीर्ती या उद्योगाच्या कन्या होत. त्या त्यास सहजी प्राप्त झाल्या. त्यांच्या योगाने भानू, मोरे, काळे, शिर्के, गोखले, साळवी, रास्ते, फडके, पालकर, आठवले, पटवर्धन, वाडीकर, देशमुख, भट, इचलकरंजीकर घोरपडे इत्यादी घराण्यांची नावे चौघांत प्रसिद्धी पावून बहुमुखी झाली. सुपीक आणि मृदू असलेले लोक नरम असतात. त्यांच्या अंगी उद्योग व साहस नसते. असले तरी थोडे असते.

कोकणाचे विभाग दोन. एक दक्षिण कोकण व दुसरे उत्तर कोकण. उत्तर कोकणात कुलाबा जिल्हा आहे. त्याला कुलाबा म्हणतात, तरी त्याचे मुख्य कचेरीचे ठिकाण अलिबाग आहे. पूर्वी शिवाजी राजाच्या कारकीर्दीत लढाऊ

आरमारावर जे मराठ्यांचे दोन मोठे सरदार होते. त्यापैकी आंग्र्याच्या ताब्यात कुलाबा किल्ला होता. तो समुद्रतीरी असून अद्यापि पाहण्यालायक आहे.

या जिल्ह्याखाली समुद्रकाठी जंजिरा म्हणून एक हबसाणच्या शिद्द्याचे संस्थान आहे. ते मोगलांच्या कारकीर्दीत प्रबल व प्रसिद्ध असून राजा शिवाजी याने आजवर नऊ वेळा स्वाऱ्या केल्या, तरी ते पुरतेपणी हस्तगत झाले नव्हते. शिद्द्याच्या अमलाखाली समुद्रतीरी श्रीवर्धन म्हणून टुमदार गाव आहे. त्यास 'श्रीवर्धन' हे श्रीमंती डौलाचे नामाभिधान कसे व कोणत्या काळी प्राप्त झाले ते 'ईश्वरो वै वेत्ति.' अयोध्या, मथुरा, सातारा, म्हैसूर, इंदूर, ग्वाल्हेर, बडोदे इत्यादी स्थळे इतिहासप्रसिद्ध आहेत, तसेच श्रीवर्धनाचे नाव मराठ्यांच्या इतिहासात दाखल व्हावे, असा योगायोग होता. इसवी सन १६९५ चे सुमारास तेथे एक प्रौढप्रतापी वीर जन्मला. तो पुरुष या ग्रंथाचा मुख्य नायक होय.

श्रीवर्धनची खानेसुमारी अदमासे ६०० घरांची आहे. त्यांत सुमारे दोनशे ब्राह्मणांची व चारशे परभू, भंडारी, मुसलमान वगैरे इतर जातींची आहेत. एकंदर जनसंख्या ३०००च्या आसपास आहे. कोकणच्या संप्रदायाप्रमाणे येथेही केळी, नारळी, पोफळी, फणस व आंबे पुष्कळ होतात. श्रीवर्धनचे पोफळ प्रसिद्ध आहेत. ती सुपारी पांढरी सफेत असून जिभेस गोड, मृदू आणि रुचकर लागते. ती 'श्रीवर्धनी रोठा' या नावाने चोहीकडे प्रख्यात आहे आणि घाटांवर व घाटाखाली व्यापाराकरिता व फर्मास म्हणून ती तेथून बाहेर जात असते.

तेथे इसवी सन १६७५ मध्ये म्हणजे अदमासे २०० वर्षांपूर्वी एक कुलशीलसंपन्न चित्पावन गृहस्थ राहत असे. त्याचे नाव विसाजीपंत. तो तेथचा देशमुख. त्याकडेस तेथील कुळकरणाचे काम होते. त्याचे उपनाम भट. तो घरचा खाऊनपिऊन बरा होता.

विसाजीपंताचा मुलगा बाळकृष्ण. त्याला बाळाजीपंत म्हणत. बापाप्रमाणेच तो रूपसंपन्न, मनमिळाऊ, शहाणा, तैलबुद्धीचा, फर्डा कारकून, धैर्यवान, उद्योगी, साहसी, वेदधर्मपरायण, नीतिमान आणि चौकस होता. भट या आडनावाप्रमाणे तो हिंमतबहाद्दर होता. त्यास भारत, भागवत, रामायण व धर्मशास्त्रही वाचण्याचा व ऐकण्याचा छंद असे. हे समग्र ग्रंथ त्याने

आपल्या संग्रही ठेविले होते. याशिवाय शिवाजीमहाराज, मोगल, शिद्दी, आंग्रे व विजापूर आणि दिल्ली येथील बादशहा यांचे अर्वाचीन इतिहास व बखरीही त्याने मिळविल्या होत्या. गावचे हिशेबठिशेब होऊन फुरसद सापडे ती तो वाचण्याकडे लावी. त्याला स्वभावत: हिंदू राज्याचा, हिंदू धर्माचा आणि हिंदू ज्ञातीचा मोठा अभिमान असे. मुसलमान वगैरे परधर्मी लोकांकडून हिंदूंचा छळ झाल्याचे तो वाची किंवा ऐके, तेव्हा तापलेल्या सांडसाने काळीज ओढल्याप्रमाणे त्यास वेदना होत. अतीत अभ्यागत कितीही येवोत, त्यांस देशमुखाच्या घरी अन्नाविषयी कधी ना नसे. अशी अन्नशांती त्या गावात कोठेही नसे. काही पांथस्थ तेथे दोन दोन महिने डेरा देत. त्यात काही दूरदेशांतरावरचेही असत. त्यांजपाशी बाळाजीपंत राज्याची हालहवाल पुसून घेई. संभाजी कसा धरून नेला? त्याचा भाऊ राजाराम गादीवर बसला तो खुशाल आहे ना? औरंगजेबाचे सैन्य किती आहे? धनाजी जाधव, संताजी घोरपडे व इतर मराठे सरदार यांच्या पदरी मावळे किती आहेत? पुरंदर किल्ला कोणाच्या स्वाधीन आहे? असे नाना प्रकारचे पूर्वपक्ष करून तो आपली शहानिशा करून घेई. आणि ती सर्व माहिती कागदावर टाचून ठेवी.

बाळाजीपंतांची पत्नी राधाबाई. ती मल्हार दादाजी बर्वे म्हणून एक कुलीन गृहस्थ होता, त्याची कन्या. तीही रूपवती, गुणवती, उदार स्वभावाची, जरा रागीट पण सुशील, पातिव्रत्यधर्मपरायण आणि परम नम्र असे. ती पतिसेवेत तत्पर असे. स्त्रियांस पतिमनोगतानुरूप वर्तन हा मोक्ष, आणि पतिआज्ञाभंग हाच नरक असा तिच्या मनाचा निर्धार असे. बाळाजीपंतावर राधाबाईचे अति प्रेम असे. त्याचीही तिजवर अत्यंत प्रीति असे. याप्रमाणे तो राधा-बाळकृष्णाचा जोडा श्रीवर्धनात आनंदाने राहत होता.

♦♦

भाग- २

# अभ्युदय

**बा**ळाजीपंताने राधाबाईस एक दिवस विचारिले की, ''आताशा तू अशी कोमेजलेली का दिसतेस? तुला काही झालेबिले तर नाही ना? तुला का कोणी रागे भरले? का कोणी तुझे ऐकिले नाही? काय असेल ते सांग. सांगितल्याशिवाय लोकांनी काय समजावे? आता सहावा सरून सातवा लागला. त्यात तू पहिलटकरीण. एकदा हातीपायी सुटका झाली म्हणजे मी निसूर झालो. तुला हवे असेल ते माग. संकोच करू नको. मन खुलें करून बोल.'' हे ऐकून राधाबाईने संकोचवृत्तीने सलज्ज उत्तर दिले, ते असे - ''माझ्या मनात बाई आताशा भलभलतेच येते. असे वाटते की, आपल्या घरी घोडी बाळगावी; वसंतपूजा करून ब्राह्मणांस दक्षिणा वाटाव्या; वेदशास्त्रांच्या घरी शाळा ठेवाव्या; आपले मराठे गडी रावबा, भिवबा यांना कडीपागोटी द्यावी; गावात मुसलमान राहू देऊ नये.''

''डोहाळ्यांवरून मुलाची परीक्षा होते अशी म्हण आहे, ती खरी असल्यास चिन्हे तर बरी दिसतात. ईश्वरेच्छा असेल तसे घडेल!'' असा विचार करून तो उगीच राहिला. पूर्ण मास भरल्यावर राधाबाईला प्रसूतिवेदना होऊ लागल्या. आवडती बायको गरोदर असली आणि तिला नऊ महिने भरत आले म्हणजे प्रीतिवंत आणि कोमल अंत:करणाच्या नवऱ्याची स्थिती कशी होते आणि त्याच्या मागे किती काळजी असते, हे सांगावयास नकोच. बायको हातीपायी सुटून घरात आली म्हणजे डोक्यावरचे जसे काय ओझे हलके झाले, असे त्याला वाटते. पाहा, मानवस्वभाव कसा आहे!

इजा कोणाला आणि विव्हल होतो कोण! त्या समयी बाळाजीपंताची अशी चित्तवृत्ती उद्विग्न होऊन तो आतबाहेर खेपा घालू लागला. शेवटी करमणूकची करमणूक होऊन मन दुसरीकडे लागावे म्हणून, तो आपला बखरीचा रुमाल काढून बसला. त्यातले बंद चाळता चाळता हे पुढे दाखल केलेले पत्र त्याच्या दृष्टीस पडले. ते राजनीतिनिपुण शिवाजी महाराजाने आपला सावत्र बंधू व्यंकोजीराजा कर्नाटकात तंजावरी राज्य करीत होता, त्यास इसवी सन १६७७ च्या सुमारास उपदेशार्थ लिहिले होते. व्यंकोजी विरक्तासारखा होऊन त्याचे राज्यकारभारावरचे मन उडाले आणि राजधर्मास विरुद्ध अशी त्याने अवधूतवृत्ती स्वीकारली, असे त्याने ऐकून लिहिले होते. ते असे -

*'श्री'*

*''चिरंजीव राजश्री व्यंकोजीराजे भोसले यांस अनेक आशीर्वाद, विशेष. तुम्हांकडून फार दिवस पत्र नाही, येणेंकरून चित्तास सुख वाटत नाही. तुम्हांविषयी राघोपंतांनी लिहिलेले आहे की, तुम्ही निरिच्छ होऊन पहिल्याप्रमाणे आपल्या शरिरास जपत नाही. तुम्हांस मनोत्साह नाही. तुमचे लष्कर उगीच बसले, आणि तुम्ही राज्यकारभार टाकून विरक्त झाला. येणेंकरून मला मोठी चिंता वाटते. चमत्कार वाटतो की, आपले वडील किती सावध होते आणि तुमचा असा स्वभाव कसा झाला! हे योग्य नव्हे. आता हा विरक्तपणा टाकून दक्षतेने प्रजेचे पालन करावे आणि आपले सैन्य तयार ठेवून उत्तम कामामध्ये मन असावे. कारभारी यांजपासून काम घेऊन आपली प्रतिष्ठा सांभाळावी. तुम्ही माझे कनिष्ठ बंधू. तुमची स्तुति मी कानाने ऐकेन तर मला बहुत आनंद होईल. रघुनाथपंत माझ्याप्रमाणे तुमच्या उपयोगी पडतील. जे करणे ते त्यास विचारून करावे. सारांश, आळस टाका. तारुण्य बहुत उपयोगाचे आहे. यात वैराग्य कामाचे नाही. आता सावधगिरीने राहिल्याचा प्रत्यय दाखवा. हे आशीर्वाद.''*

'अहाहा! केवढी या प्रभूची योग्यता! थोर ते थोरच! हा उपदेश राजापासून रंकापर्यंत, लहानापासून वृद्धापर्यंत आणि ज्ञानशून्यापासून बृहस्पतीपर्यंत सर्वांनी घेण्यासारखा आहे. असा धर्मप्रभू मिळण्यास महद्‌भाग्यच पाहिजे. आम्ही हतभाग्य म्हणून त्यांच्या पश्चात आमची अशी दुर्वह स्थिती झाली. या प्रभूचा नातू शाहू मोगलांच्या सापळ्यात आहे. तो मोकळा होऊन ईश्वरकृपेने आपल्या पराक्रमी आज्याच्या सिंहासनावर येऊन बसेल

तर त्याजकडे मी डोक्यानें जाईन, त्याच्या सेवेत हा देह झिजवीन आणि यासमयी मला पुत्र झाल्यास त्यासही असाच उपदेश करून राजकार्यात निष्णात करीन. ही माझी इच्छा विश्वंभर सफल करो.' असे मनात म्हणून बाळाजीपंत आणखी पुढे बखर वाचीत चालला. मग शिवाजीच्या कारकीर्दीत बाजी या नावाचे जितके पराक्रमी पुरुष होऊन गेले त्यांची एक वेगळी बखर स्वदस्तूरची लिहून ठेविली होती, ती वाचण्यास त्याने आरंभ केला. प्रथम बाजी परभू, जावळीचा देशपांड्या; नंतर बाजी मोहिता; मग बाजी घोरपडा मुधोळकर; नंतर बाजी परभू, महाडचा देशमुख आणि मग बाजी शामराज. इतके झाल्यावर शेवटी शिवाजीचा जिवलग शूर मित्र बाजी फसलकर सरनोबत व वाडीकर सावंत या उभयतांमध्ये कोकणात मोठी निकराची लढाई झाली, ती वाचण्यात त्याचे मन गढले होते, इतक्यात पुत्र झाल्याची वार्ता त्यास कळली. तो आनंद मग काय विचारावा? गगनात माईना. पुत्रप्राप्तीचा आनंद कसा असतो तो पित्यासच पुसावा, इतरांस कळावयाचा नाही.

बाजीपुरुषांची बखर वाचीत असता त्यास पुत्रलाभ झाला, हीच शकुनगाठ बांधून बारशाच्या दिवशी त्याने त्याचे नाव 'बाजीराव' असे ठेविले. तो इसवी सन १६९५ त जन्मला. हाच पुरुष आमच्या या लेखाचे प्रधानपात्र होय. तो स्वपित्याचे पश्चात 'श्रीमंत बाजीराव बल्लाळ पेशवे पंतप्रधान' या नावाने प्रसिद्ध झाला. हा हिंदुस्थानचा तारा सातारच्या राजाचा मुख्य प्रधान होऊन वीस वर्षे चमकत होता. ताराबाईचा सातारा किल्ला औरंगजेबाने इसवी सन १७०० त सर केला, तेव्हा त्यास त्याने 'अजिमतारा' हे नाव दिले; पण हा आमचा तेजोराशी अजबतारा स्वदेशबंधूंस स्वोन्नतीची वाट दाखवीत सर्व हिंदुस्थानभर एकसारखा फिरत होता.

पुढे बाजीरावाच्या पाठीवर दोन-तीन वर्षांनी बाळाजीपंतास आणखी एक मुलगा झाला. तो धाकटा म्हणून त्याचे नाव 'चिमणा' असे ठेविले. तोच पुढे चिमणाजी किंवा चिमाजी अप्पा हे नामभिधान पावला. त्याजवर अंतरा-अंतराने दोन मुली झाल्या. एक भिऊताई आणि दुसरी आनुताई. याप्रमाणे या दाम्पत्यास दोन पुत्र आणि दोन कन्या झाल्या. समुद्रकाठच्या काळ्या रेतीच्या विस्तीर्ण मैदानात कधी-कधी एखाददुसरे रत्न चमकते, त्या तोडीची ही शहाजोग मानवरत्ने होती, असे पुढील वृत्तांतावरून दिसून

येईल. मोरोपंतांनी नलाख्यानांत म्हटले आहे की -

**नररत्न तोचि तूंचि स्त्रीरत्न उदंड आडनांवांची**
**न बुडविति न वा तारिति चित्रें बरवींहि आडनावांची**

खरे आहे. आडनावी नररत्ने या भूमंडलावर मागे उदंड झाली, हल्ली आहेत व पुढेही होतील. ती खायला काळ आणि धरणीला भार मात्र. ती अन्नदात्या भूमीस आणि जन्मदात्या मातोश्रीस वृथा भार आणि शीण मात्र देण्यास कारण होतात. ज्यांनी स्वदेशाचे हित केले, ज्यांनी स्वधर्मरक्षणार्थ स्वप्राणांचे स्वाहास्वधाकार केले, ज्यांनी परदेशस्थ भस्मासुर राजांचे तावडीतून स्वदेशबंधूंची सुटका केली, ज्यांनी तन, मन, धन यांहीवरून स्वजनांत ऐक्य वाढविले, तीच नररत्ने खरी! त्यांनीच नरजन्माचें सार्थक केले! तेच धन्य पुरुष होत! आणि तेच मानवसृष्टीचे अलंकार होत! असा हा बाजीराव होता. तो बाळाजीपंताच्या मागे शाहूराजाचा पेशवा झाला. त्याच्या कारकीर्दीत हिंदुप्रजेचा उत्कर्ष झाला, ही हिंदुस्थानवासी लोकांनी गर्व वाहण्याजोगी गोष्ट झाली. तुकोबारायाचा एक अभंग आहे की -

**'पुत्र व्हावा ऐसा गुंडा । ज्याचा तिहीं लोकी झेंडा ।।'**

♦♦

भाग- ३

# बाल्यदशा

सृष्टिक्रमानुसार बाळाजीपंताचा प्रपंचवृक्ष वाढत चालला. कुळकरणाच्या रडक्या उत्पन्नावर त्याचा चांगलासा उदरनिर्वाह चालेना. दुसरा काही धंदा बघावा तर कोकणची वस्ती. जिकडे नजर फेकावी तिकडे खडकांशी गाठ. घरचा थोडासा रोठा निघे, त्याची दे-घे खालीच चटणी उडे. जमिनीची जिवापलीकडे मेहनतमशागत करावी तेव्हा नाचण्या-वऱ्यांसारखे रुक्ष धान्य पाच-चार महिन्यांपुरते उत्पन्न होई. चोहीकडे मोगलांचे स्वार हिंडत, त्यामुळे सर्वत्र धावपळ चालली होती. घाटाखाली त्याचा धनी शिद्दी व आंग्रे या दोघांमधून विस्तव जाईनासा झाला होता. दोघे एकमेकांवर चालून जाण्याच्या तयारीत होते. कोणाचा पायपोस कोणाच्या पायात नव्हता. जो बळी तो कान पिळी. ज्याच्या मनगटात जोर त्याने कमजोरवाल्याचे घरदार खुशाल लुटावे, मनाई नाही. अशा कचाटीत राहण्यापेक्षा मुलेबाळे घेऊन देशासारखा वेश घेऊन दूर जाऊन कालक्षेप करावा, असे त्यांच्या मनात आले.

गावात एक रेम्याडोक्या पंतोजी होता. त्याच्या शाळेत बाजीराव व अप्पा हे लिहिणे-वाचणे शिकले. पुढे गुरुजीबावांची पुंजी संपली. मग विहिरीतच नाहीसे झाल्यावर पोहोऱ्यात कोठून येणार! दोघे मुलगे खुबसुरत आणि होतकरू होते. एक बावनकशी सोने आणि दुसरा एक दोन कस कमी, इतकाच हेरफेर त्या चिमखड्या दोघा भावांत होता. त्यांच्या बुद्धीचे अंकुर फुटू लागले, तेव्हा बाळाजीपंताने गृहशिक्षणाचा क्रम आरंभिला. भीती जाऊन त्यास धैर्य उपजावे म्हणून वाघ, अस्वल, चित्ते अशा क्रूर

पशूंच्या तसबिरी हातात देऊन, त्यांचे स्वभाव असे आहेत म्हणून त्यास सांगे. अंगात कुवत यावी म्हणून त्यास शेळीच्या दुधाचा रतीब लाविला. दहा-दहा, बारा-बारा वर्षांच्या वयातच त्यास दोन-दोन तास डोंगरात फिरवी. येणेकरून आळस झडून ते चपळ दिसू लागले. रामायण-महाभारतातले त्यास वरचेवर लहान लहान चुटके सांगे. केव्हा रामलक्ष्मणांची बंधुप्रीती, केव्हा पांडवांचा वनवास व अज्ञातवास, केव्हा भीष्मार्जुनांचे युद्ध, केव्हा द्रोणाचार्यांचे कौशल्य, केव्हा कर्णाची राजनिष्ठा, केव्हा रामरावण युद्ध, केव्हा भीमदुर्योधनांचे मल्लयुद्ध आणि केव्हा द्रौपदीचा छळ असा त्याने घरी शिक्षणक्रम ठेविला. पुन: त्यांजकडून त्या गोष्टी सांगवी. घरी बखरीचे रुमाल होते, त्यातून एकेक बखर काढून त्याजकडून वाचवी. यामुळे अक्षरओळख होऊन त्यांस चोहींकडचे देश, राजे, राज्य यांची माहिती झाली. सातारा, पुणे, दिल्ली, माळवा, खान्देश, नर्मदा, कोल्हापूर, सुरत, मोंगल, शिवाजीमहाराज, संभाजी, विजापूर ही नामावली त्यांस गायत्रीतुल्य पाठ झाली. संभाजीचा महाक्लेशदवध, औरंगजेबाच्या स्वारीचा अमिरी थाट, शिवाजीचा देशाभिमान आणि शौर्य, विजापूर शहराची सुंदर रचना, हे देखावे त्यांच्या डोळ्यांपुढे तरंगू लागले. जिज्ञासा ही तीव्र बुद्धीची कन्या आणि ज्ञानाची मातुश्री असे म्हटलेले खरे आहे. बखरीत वाचलेले गाव, डोंगर, नद्या व राज्यें पाहण्याची त्यांस उत्कंठा होऊ लागली. हे चांगले खरे; परंतु ही त्यांची इच्छा तृप्त होईना आणि त्यांच्याकडून जास्ती अभ्यास करविण्यास उत्तम गुरूची वाण होती, ती दूर करण्यास मार्ग नव्हता. मग त्यास दुसरा छंद लागला. ते दिवसानुदिवस हूड होत चालले. अष्टौप्रहर त्यांचे खेळात मन. नारळीपोफळींवर सरडा-खारीसारखे सरासर चढत. वरून धपाधप उड्या टाकीत. गुडघे फुटत, खोका पडत. त्या बऱ्या करिता-करिता आई-बाप टेकीस आले. ‘बाळांनो, असे करू नये’ म्हणून त्यांनी पुष्कळदा सांगून बघितले. माराचा धाक घातला, तरी काही नाही. गावातली पोरे जमवून समुद्रात पोहावयास जावे. दोन-दोन प्रहर पाण्यात डुंबावे. गटांगळ्या खाव्या. बरोबर पाच-पंचवीस मुले घेऊन समुद्राच्या वाळवंटात जाऊन तिथे विटीदांडू, चेंडू, लगोऱ्या, हुतुतु खो-खो हे खेळ खेळावेत. त्या सगळ्या खेळांत बाजीरावाचा हातखंडा. त्याच्या हातात डाव आला म्हणजे एक-एक, दोन-दोन तास टोमणे मारावेत, हुकूच नये.

शेवटी दुसऱ्या बाजूची पोरे रडकुंडीस येत. तेव्हा त्यांच्याकडे डाव जाण्यासाठी तो मग मुद्दाम हुके. मुसलमानांच्या पोरांना ओणवी करून त्यांची कुरघोडी करून त्यास पळायास लावी. थांबली म्हणजे त्यांच्या कुल्यांवर सपासप छड्या ओढी. कुस्त्या करून त्यांना चीत करी. मागून चिमाजी अप्पा हळूच जाऊन त्या पोरांच्या फराफर तंगड्या ओढी. ब्राह्मण, कुणबी, माळी, हेटकरी या पोरांवर त्याची मर्जी, प्यार असे. यांना मुसलमानांची पोरे चोपिताना पाही, तेव्हा त्यांच्या अंगावर तो चित्त्यासारखा धावून जाऊन त्यांना यथेच्छ मुष्टिमोदक देई. त्यांच्याभोवती आपल्या पोरांचे कोंडाळे करून आपण आत शिरे. लगेच दादाच्या मागे अप्पा दत्त म्हणून उभाच. मग ज्याच्या श्रीमुखात दादाने लगाविली त्याला मागून अप्पाची बुक्की आहेच. त्या पोरांची धड चिरगुटे होऊन, लकतऱ्या पांघरलेल्या हिंदू सवंगड्यास ती देऊन टाकी. मग मुसलमानांची पोरे मुळुमुळु रडत आपापल्या घरी जात. या धांदलीत त्याचा कोणी सोबती पडून झडून रक्तबंबाळ झाला, तर त्यास उठवून बाजीराव आपल्या अंगरख्याने त्याचे डोळे पुशी, त्याला उगा करी, खोंक पडल्या ठिकाणी दगडाची पूड करून बसवी, अशी त्याची शुश्रूषा करून त्यास घरी लावून देई.

याप्रमाणे गावात पोरांच्या दोन फळ्या झाल्या. एक मुसलमानांची व दुसरी हिंदूंची. त्यांनी प्रलय मांडिला. देशमुखाच्या घरी बाजीरावाच्या कागाळ्या आल्याशिवाय एक दिवस सुना जाईना.

चिमाजी अप्पा व बाजीराव या दोघा भावांची एकजूट असे. दादाची पाठ अप्पा सोडीत नसे आणि अप्पा दिसेनासा झाला की, दादाचा जीव घाबरा होई. आईने एकाच्या हातावर खाऊ ठेविला तर तो ते दोघे वाटून घेत. मारामारीची फिर्याद घरी आली म्हणजे मांजराचा पाय कुत्र्यावर करून एकमेकांस हिकमतीने सोडवून बापाचा मार चुकवीत. पुढेही यावज्जीव त्यांचे प्रेम कायम होते. याचे नाव बंधुप्रीती! असे प्रेम विरळा आढळते. एकमेकांशी भाषण नाही, नाव नाही, मधून विस्तव फिरकावयाचा नाही, एकाचा उत्कर्ष दुसऱ्यास सहन व्हावयाचा नाही, एकाचा हो तर दुसऱ्याचा ना, असेच मासले बहुतकरून घरोघर आढळतात. असले पाजी बंधू स्वदेशबंधूंची बाजी काय राखणार? कडू वृंदावनाच्या बीजापासून आंब्याचे रोप कधी तरी उगवेल? असो. मुलांचा असा अल्लड स्वभाव होत चालला,

यामुळे बाळाजीपंतास बहुत काळजी लागली. तेव्हा त्यातून त्याने मथित सार काढिले की, ''यात मुलांकडे दोष नाही. मुलांची बुद्धी सर्वोत्कृष्ट आहे; पण त्यास गुरुमुख चांगले पाहिजे. ही सोय शहरात राहिल्याशिवाय निघत नाही. त्यांना शिक्षण मिळाले तर लौकिकास चढण्याजोगे आहेत. ईशकृपेने ते भाग्यवान् व पराक्रमी निघाले तर उभय कुलांचा उद्धार करतील. त्यास गळ्याशी बांधून उपयोग नाही. त्यांच्या विद्याभ्यासाकरिता देशांतर केले पाहिजे,' असे त्यांच्या मनात पुरे भरले. त्यास राधाबाईचेही अनुमोदन मिळाले.

तरी तो घराला सोडीना आणि घर त्याला सोडीना. कोणालाही एकाएकी आपली वस्तू सोडवत नाही; पण अडचणींवर अडचणी येऊ लागल्या म्हणजे त्याला घर सोडून जाणे भाग पडते. त्याप्रसंगी त्याला घर सोडल्यावाचून निर्वाहच नाही असे होते. मग तो हटवादी घरादाराची आशा सोडून मुकाट्याने चालता होतो. अशी बाळाजीपंताची अवस्था झाली.

चमत्कार असा झाला की, आंग्रे आणि शिद्दी यांचा वैमनस्याग्नी भडकत चालला. हबशाला कोणी असे कळविले की, 'बाळाजी विश्वनाथ हा तुमचा ताबेदार असून तो आतून आंग्र्याशी मसलती करितो आणि त्याच्या सल्ल्याने आंग्र्या तुम्हांवर स्वारी करण्याच्या तयारीत आहे.' हबशी पितळ्या कानाचा असल्यामुळे त्याला ती खबर खरी वाटली. तो क्रोधाग्नीने तांबडालाल झाला आणि 'आता एका देशमुखाचे दोन देशमुख करून टाकितो.' असे बोलला. हे वर्तमान बाळाजीपंतास समजल्याबरोबर तो थराथरा कापू लागला. त्याच्या तोंडचे पाणी पळाले. हबशाच्या राज्यात 'करील ते कारण आणि बांधील ते तोरण' असा न्याय होता. तो म्हणेल तो कायदा आणि करील ती शिक्षा होत असे.

भोतात घालून कडेलोट करणे, समुद्रात ढकलून देणे, सुंता करणे, तोंडात गोमांस कोंबून बाटविणे, काकडीसारखे चरचरा चिरणे, अंगाचे टवके काढणे, कानखडे व कोलदांडे घालणे, हातपाय बांधून हत्तीच्या पायी देणे, तापलेल्या सांडसाने वर्मस्थानी डागण्या देणे, शिशाचा रस घशात ओतणे, शिरच्छेद करणे, कर्णद्वारी व अपानद्वारी मेखा मारणे, अंगाचे कातडे सोलणे, शिरा कापणे, इत्यादी क्रूर शिक्षा तो अपराध्यांस देत असे. त्याचा बाळाजीपंतास अनुभवही आला. त्या चांडाळाने त्याचा भाऊ जानोजी

विश्वनाथ यास धरून भोतात घालून समुद्रात बुडविले. त्यासमयी त्याच्या डोळ्यांपुढे त्रिभुवन दिसू लागले. 'हा आता मला व माझ्या कुटुंबातील माणसांना जलसमाधी देईल. या 'अंधेर नगरी व झोटिंग पाच्छाईत' आता राहून उपयोग नाही. घराला शेवटचा रामराम करून जिकडे वाट फुटेल तिकडचा रस्ता धरावा;' असा त्या स्त्री-पुरुषाचा निश्चय झाला. प्रभातकाली सूर्योदयाच्या प्राक् अरुणोदयाची लाल कांती धरित्रीवर पसरते तद्वत् भाग्योदयाचे पूर्वी त्याच्या अंत:करणात प्रस्थानबद्धीची स्फूर्ती झाली, असे बाळाजीपंताच्या पुढील हकिकतीवरून ध्यानात येईल. असो. मग तो सहकुटुंब सहपरिवार आपला उंबरघाट सोडून निघाला. घर सोडताना त्याच्या नेत्रांतून खळखळा अश्रुधारा चालल्या. पाहा, प्रिय वस्तूंचे विरहदु:ख कसे आहे! मार्गक्रमण करीत करीत तो सासवडला आला. तेथे अंबाजीपंत पुरंदरे या नावाचा एक सद्गृहस्थ राहत होता, त्याने त्यास आश्रय दिला. मग ते दोघे साताऱ्यास गेले. त्यासमयी ११/१२ वर्षांचे बाजीरावाचे आणि ९/१० वर्षांचे अप्पाचे, याप्रमाणे त्या दोघा मुलांची वये होती.

♦♦

भाग-४

# सुशिक्षण

इसवी सन १७०७ मध्ये बाळाजीपंताने साताऱ्यात पाय ठेविला, तेव्हापासून मुलांच्या भाग्योदयाने त्याचा भराभरा उत्कर्ष होत चालला. अंबाजीपंत पुरंदरे व परशुराम त्र्यंबकराव प्रतिनिधी यांच्या वशिल्याने त्याला सेनापती धनाजीराव जाधव यांचा आश्रय लाभला. कर्मधर्मसंयोगाने त्याच वेळेस शाहू राजा औरंगजेबाच्या कैदेतून मुक्त होऊन सातारच्या गादीवर बसला. त्याने स्वराज्यातील जमाबंदीचे व वसुलाचे काम धनाजीरावाकडे सोपविले. त्या कामासाठी धनाजीने बाजीरावाचा बाप बाळाजी विश्वनाथ व अंबाजीपंत पुरंदरे हे दोघे कारकून ठेविले. बाळाजीपंताने जमाबंदीची उत्तम शिस्त लावून दिल्यामुळे धनाजीची त्याजवर पूर्ण मर्जी बसली. तो राजापुढे त्याची वारंवार तारीफ करू लागला. शेवटी राजदरबारात त्याचा एवढा पगडा बसला की, धनाजी निवर्तल्यावर दप्तरदारीचे सर्व काम स्वतंत्रपणे बाळाजीपंतास पाहावयास सांगितले.

साताऱ्यास आल्यापासून त्याचे मुलगे हुशार होत चालले. त्यांचा बाळअल्लडपणा सुटला. बाजीरावाची मधुर वाणी, तरतरी आणि मुखश्री पाहून धनाजीराव व शाहू राजा हे संतोषभरित होत. धनाजीचा चंद्रसेन मुलगा होता, त्याच्याबरोबर बाजीरावासही त्याने घोड्यावरचा फेरफटका शिकविला. भाला, बर्ची, बोथाटी, तलवार, नेम मारणे, या शिपायीगिरीच्या कामात तो चांगला प्रवीण झाला. बाजीरावासारखा बुद्धिमान शिष्य आणि त्याचा गुरू खुद्द सेनापती धनाजीराव जाधव, तोही रणांगणांत कसलेला.

मग काय विचारावे? 'अधिकस्याधिकं फलम्!' बाजीरावाची बसण्याची व बोलण्याची ढब पाहून राजाच्या पोटात हर्षाच्या गुदगुल्या होत. तो त्याला आपल्याजवळ बसवून त्याच्याशी दोन-दोन घटका बोले.

बाजीराव व चिमाजी अप्पा यांची लग्ने झाली. बाजीरावाची बायको काशीबाई. ती चासकर जोशी या घरंदाज गृहस्थाची कन्या. ती धीर उदार, गंभीर, थोडी स्वाभिमानी आणि लावण्याची केवळ खाण असे. तिचे त्याजवर आणि त्याचे तिजवर अप्रतिम प्रेम असे. चिमाजी अप्पाची बायको रखुमाबाई. ती विश्वनाथपंत पेठे यांची कन्या. बाजीरावास दोन बहिणी असून त्याही सुस्थळी पडल्या. बारामतीकर बापूजी नाईक जोशी यांचा बंधू आबाजी नाईक यास भिऊताई दिली. तो कोट्यधीश सावकार होता. पुण्यास शुक्रवारपेठेत त्याचा एक वाडा आहे. त्याला 'बारामतीकरांचा वाडा' असे म्हणतात. बाजीरावाचे वेळेस पैशाची मदत त्याजकडून बहुत होत असे. दुसरी अनुताई, ती इचलकरंजीकर जहागीरदार नारायणराव घोरपडे यास दिली. तिचा मुलगा व्यंकटराव, बाजीरावाच्या हाताखाली सरदार होता. त्याचे नाव इतिहासात आले आहे. हे संस्थान प्रस्तुत कोल्हापुराखाली आहे.

श्रीवर्धन सुटले, तेव्हा बाजीरावावरचे शिद्द्याचे मोठे विघ्न टळले. पुन: आणखी त्याजवर पुष्कळदा विघ्ने आली, त्यातूनही तो पार पडला. यावरून जो पुरुष पुढे महत्पदास पावावयाचा असतो त्याने साहस, धैर्य, चातुर्य इत्यादी विद्या शिकाव्यात म्हणून अवघड प्रसंग या विश्वेश्वराच्या घरच्या पाठशाळा अथवा तालीमखाने असावेत असे वाटते.

मोगलांच्या प्रांतांतून चौथाई, सरदेशमुखी आणि घासदाणा हे हक्क तहाप्रमाणे वसूल होत नव्हते. तो ऐवज आणण्यासाठी राजाने जुना माहीतगार बाळाजीपंत व चंद्रसेन जाधव सेनापती यास बरोबर फौज देऊन रवाना केले. चंद्रसेन बाळाजीपंताचा द्वेष करी. तो द्वेष त्याने त्या वेळेस उगविला. दोघांचे स्वार मृगया करीत असता काही कुरापत काढून चंद्रसेनाने आपले स्वार बाळाजीपंताच्या पाठीस लाविले. तो जिवाच्या भयाने बाजीराव व चिमणाजी अप्पा यास बरोबर घेऊन काही निवडक स्वारांनिशी पांडवगडाकडे पळाला. तिकडेही ते यमदूत त्याची पाठ सोडीनात. चंद्रसेन राजाने विक्रमाचा छळ केल्याची शनिमाहात्म्यात कथा आहे, तसा इकडे हा चंद्रसेन

बाळाजीपंताच्या हात धुऊन पाठीस लागला. शेवटी निरुपाय होऊन पांडवगडच्या भयाण रानात त्याने पांडवासारखा काही दिवस अज्ञातवास काढिला. त्याच्या बरोबरच्या शिलेदारांत पिलाजीराव जाधव आणि नाथाजीराव धुमाळ ही एक इमानी जोडी होती. ती त्या संकटकाली बाळाजीपंतास म्हणाली, 'धनीसाहेब, या मुलांकडे पाहून आमच्या काळजाने ठाव सोडिला आहे. यांचे प्राण जगले म्हणजे आम्ही मोठी मिळविली. या बच्च्यांचे हाल आमच्याने पाहवत नाहीत. चला आता, जेथे तुमचा जोडा तेथे आमचे शिर. आमच्या कुडीत प्राण असे तोपर्यंत तुमच्या केसास धक्का लागू देत नाही. हरतऱ्हा करून तुम्हाला या समूरच्या पांडवगडावर नेऊन पोचवितो.'

हे ऐकून बाजीराव म्हणाला, 'बाबा, हे जाधव व धुमाळ म्हणतात त्यास आपण रुकार द्यावा. असल्या रानात राहून वाघ, अस्वलांच्या तोंडी पडावे, त्यापेक्षा प्रसंगी दोन हात करून मरून जावे हे बरे. झटापटीत कदाचित् आम्ही हटलो तर त्यात काय? आमचा पक्ष निर्बळ तर खराच; पण देवाच्या दयेने ते जर हटले तर आमची वाहवा होऊन छत्रपती महाराज आमची पाठ थोपटतील. दुसरा हा फायदा आहे की, शिपाई तलवार कशी चालवितात, दुसऱ्याचा वार कसा चुकवितात, बंदुकीचा नेम कसा धरितात, हे आम्ही पाहू.'

असा मुलांचासुद्धा हिय्या पाहून बाळाजीपंत निघाला. वाटेने दोन-चार वेळा चकमकी झडल्या. असे करीत करीत ते कसेतरी किल्ल्यावर जाऊन पोचले. याप्रमाणे बाजीराव युद्धशाळेत ही पहिली कक्काची बाराखडी शिकला असे म्हटले पाहिजे. हे वर्तमान इ.स. १७१३ मध्ये घडले.

त्या पिलाजीराव जाधवाला पुढे बाजीरावाने आपल्या कारकीर्दीत मोठ्या योग्यतेस चढविले. तो त्याचा एक आवडता व विश्वासू सरदार होता. सुज्ञ पुरुष इमानी नोकराला विसरत नसल्याचे हे एक उदाहरण होय. तिकडे बेइमानपणामुळे चंद्रसेनावर राजाची इतराजी झाली. मग तो स्वपक्ष सोडून शत्रूस म्हणजे मोगलास जाऊन मिळाला. पाहा, बाप तसा पुत्र असा! ज्या धनाजीराव जाधवाने शिवाजीच्या वेळेस विजापूरच्या लष्करावर तलवार चालवून ख्याती मिळविली, ज्या धनाजीरावाने मोगलांच्या मुलुखात स्वाऱ्या करून लुटालूट करून देश उद्ध्वस्त केला, ज्या धनाजीरावास त्याचा पराक्रम पाहून राजाराम राजाने 'जयसिंगराव' हा किताब दिला, ज्या

धनाजीरावाचा मोगलास असा दरारा की, घोडा पाणी पिईना तर त्यास ते म्हणत, 'क्यंव बेटा, पानी क्यंव पिता नहीं? उसमें धनाजी नज्जर आता है? कैसा क्या?' ज्या धनाजीची एक मांडी समरांगणी जखमी झाली, ज्या धनाजीरावाला स्वराज्योत्कर्षाचा एवढा अभिमान, त्या शूराच्या पोटी हा अमंगलनिधी चंद्रसेन उत्पन्न झाला आणि स्वराज्याशी निमकहरामपणा करून कुऱ्हाडीचा दांडा गोतास काळ झाला! मराठ्यांचा हाडवैरी जो मोगल त्यास तो जाऊन मिळाला! असो.

निजामउल्मुल्खाचे मोठे सैन्य सरलष्करावर चालून येत आहे, अशी खबर लागली तेव्हा बाळाजीपंतास 'सेनाकर्ते' असा किताब व काही फौज देऊन त्याच्या मदतीस राजाने पाठविले. त्याचा व त्या सैन्याचा पुरंदर किल्ल्याजवळ सामना होऊन, मोगलांचा पराभव झाला. बाळाजीपंतास जय मिळाला. मग त्याजबरोबर तह करून बाळाजीपंत साताऱ्यास आला.

पण त्या समयी इकडे स्वराज्यात एकी नसून बेबंदी वाढली होती, कोणी शाहूला धरून राहिले, कोणी कोल्हापूरच्या संभाजीकडे गेले, कोणी मोगलास मिळाले आणि कोणी तिघांकडेही न जाता आपणच राजे बनले.

हे बंड मोडून स्वस्थता करण्याचे कामावर राजाने पुन: बाळाजीपंताची योजना केली. बरोबर फौजफाटा व सामग्री देऊन त्याची बाहेर रवानगी केली. प्रथमत: त्याने दमाजी थोरातावर रोख धरिला. तो पूर्वी कोल्हापूरकरांचा अंकित असून, पुढे हिंगणगावच्या गढीत राजा होऊन बसला. गढीच्या आसमंतात २० कोसपर्यंत तो सत्ता चालवू लागला. तो स्वभावाने क्रूर व द्वाड असे. बाळाजीपंताची फौज आलेली पाहून तो गांगरला आणि त्याने हळूच तहाचे बोलणे लाविले, करारमदार करण्यासाठी त्याने त्यास किल्ल्यात बोलाविले. तुमच्या केसालाही धक्का लागणार नाही, असे बेलभंडार उचलून त्याने सांगितले. त्यावरून बाळाजीपंत सहकुटुंब सहपरिवार आत गेला, तो दगाफटका! बाळाजीपंत, राधाबाई, अंबाजीपंत, पुरंदरे, बाजीराव व अप्पा हे सारे त्याचे कैदी झाले. त्याला बेलभंडाराची आठवण दिली; पण बंडखोराला कसचा बेल आणि कसचा भंडार! तो म्हणाला, 'बेल म्हणजे झाडाचा पाला, तो काय माझे करणार? भंडार हा तर मी रोज भाजीपाल्यात खातो.' त्याचा पैसा हा देव आणि त्याचा तो भक्त. त्याने लगेच पाच असामींच्या तोंडात राखेचे तोबरे ठेविले आणि निक्षून सांगितले की, अनेक

दिवसांत अमुक ऐवज पटला पाहिजे. मग राजाने तितका भुर्दंड भरून त्यास बंधमुक्त केले. किती भयंकर प्रकार हा! बाजीरावावरचा हा एक अपमृत्यूच टळला. पुढे बाळाजीपंत पेशवा झाल्यावर तो व हैबतराव सरलष्कर यांनी थोरातावर स्वारी करून त्याचा धुव्वा उडविला. तोफा लावून त्याची गढी जमीनदोस्त करून टाकिली आणि थोरातास चतुर्भुज बनवून ते राजाकडे घेऊन गेले.

**'कर्म करावे भोगावे रडत तेंचि परिणामीं'** - मोरोपंत

दमाजी थोराताने पंतसचिव यास अटकेत ठेविले होते. त्याला बाळाजीपंताने युक्तीने सोडवून आणिले. हा उपकार म्हणून त्याची मातुश्री येसूबाई हिने बाळाजीपंतास पुणे परगण्यातील आपले सर्व हक्क राजीखुशीने बक्षीस दिले व पुरंदर किल्लाही त्याच्या स्वाधीन केला.

दुसरा एक ब्राह्मण बंडवाला शंभुमहादेवाच्या डोंगरावर राहत होता. त्याचे नाव कृष्णराव खटावकर. त्याला दरबारातून 'राजा' असा किताब मिळाला होता. पंतप्रतिनिधीचा पुत्र श्रीपतराव व बाळाजीपंत चालून गेले. आउंद गावाजवळ दोघांचे तुमुल युद्ध झाले. खटावकर राजा जेरीस येऊन शरण आला. त्याला राजाने कृतापराधाची क्षमा करून खटाव गांव वंशपरंपरेने इनाम दिला. तो अद्यापि त्याच्या वंशात चालत आहे. राजकुल आता इतके वाढले आहे की, या खटल्यात जितके पुरुष तितके राजे आणि जितक्या बायका तितक्या राण्या! राजाच्या घरी शागीर्द राजाच आणि राणीची दासीही राणीच, अशी अवस्था झाली आहे. पुढे बाळाजीपंताने आंग्र्यावर स्वारी केली हे वर्तमान पुढे सांगू.

♦♦

भाग-५

# पितृवियोग

**को**कणात आंग्र्या प्रबळ होत चालला. तो आपणास कोल्हापूरचा अंकित म्हणवीत असे आणि सातारच्या गादीस जुमानीत नसे. साताऱ्यावर स्वारी करण्याचा त्याचा रोख आहे, असे कळल्यावरून राजाने फौज देऊन बहिरोपंत पिंगळा त्याजवर पाठविला; परंतु पिंगळ्याचा पराभव होऊन, आंग्र्याने त्यास कैद केले. त्याला सोडवून आणण्यासाठी राजाने बाळाजीपंतास प्रमुखत्व देऊन पाठविले. त्याने युक्तीने एकही माणूस जायबंदी न करिता त्याजबरोबर तह केला; परंतु त्या तहाने मराठ्यांचा फायदा झाला. शिद्द्याचा काही मुलूख सातारच्या राजाकडे या तहामुळे गेला, म्हणून तो लढाईस प्रवृत्त झाला. तेव्हा आंग्रे व बाळाजीपंत हे दोघे मिळून त्याच्या पारिपत्यास निघाले. त्यांचा पराक्रम पाहून शिद्दी शरण आला.

अशी मोठमोठी कामे करून बाळाजी विश्वनाथ साताऱ्यास परत आल्यावर शाहूराजा फार खुश झाला. तो त्यास राजाने आपला मुख्य प्रधान म्हणजे पेशवा केला. बाळाजीपंताच्या विनंतीवरून शाहूराजाने त्याचा मित्र बाजीपंत पुरंदरे यास पेशव्याच्या दिवाणगिरीची वस्त्रे दिली. तसेच रामचंद्रपंत भानू यास त्याची फडणविशी दिली. हा प्रसिद्ध नाना फडणीस याचा मूळपुरुष. पुरंदरे हे सासवडचे पुरंदरे या नावाने प्रसिद्ध आहेत.

याप्रमाणे इ.स. १७१४ मध्ये बाळाजी विश्वनाथ पेशवा झाला. पाहा नशिबाची तार कशी आहे! जो पुरुष लहानसा खर्डेघाशा कारकून होता, तो सहा वर्षांमध्ये सातारच्या राजाचा मुख्य प्रधान झाला! प्रभूचा कृपालव काय न करील?

पुणे परगण्यांत मोगलाचा बाजी कदम अधिकारी होता, त्याला वश करून तिकडचाही मुलूख बाळाजीपंताने आपल्या हाताशी घातला. त्या प्रांती त्यासमयी चोरटावा बहुत होता, त्याचा बंदोबस्त करून तो प्रजेचे पालन चांगल्या रीतीने करू लागला. शिवाजीच्या कायद्यांच्या धोरणानेच त्याने राज्यकारभार चालविला. कारणपरत्वे राजाची आज्ञा घेऊन त्याने कित्येकांस इनामेही दिली.

त्यासमयी दिल्लीच्या दरबारी बरीच गडबड चालली होती. तेथे दोघे सय्यदबंधू होते, तेच अहिमही होऊन बसले. नामधारी बादशहा होता, तो आतून त्यांचा नाश करण्याचा उद्योग करू लागला. सय्यदांस कोणाची तरी कुमक पाहिजे होती, म्हणून धाकटा सय्यद हुसेन अल्लिखान याने शंकराजी मल्हार म्हणून सातारा प्रांताचा राहणारा एक हुशार वकील त्याच्या जवळ होता, त्याच्या मार्फतीने शाहूराजाकडे फौजेची मदत मागितली. मग बाळाजी विश्वनाथ व सय्यदबंधू यांचे करारमदार होऊन त्यास कुमक देण्याचे ठरले. राजाने या मोहिमेवर पेशव्यांची योजना केली. मग तो १० हजार फौज घेऊन दिल्लीकडे गेला. बरोबर खंडेराव दाभाडे सेनापतीही होता. तिकडील दरबारची व देशाची माहिती करून देण्यासाठी बाळाजीपंताने आपला थोरला मुलगा बाजीराव बरोबर नेला. बाळाजी विश्वनाथ दिल्लीस गेल्यावर सय्यदांचे सर्व हेतू पूर्ण झाले. त्यांना अडथळा आणणारा बादशहा, याचा सय्यदांनी फडशा उडविला. कराराप्रमाणे बाळाजीपंताच्या हाती चौथाई, सरदेशमुखी आणि स्वराज्य, या तीन सनदा पडल्या. स्वारीखर्चाचा रोख ऐवज पडला. शाहूराजाची राणी, त्यांची मातुश्री येसूबाईसाहेब व सावत्र बंधू मदनसिंग, ही माणसे दिल्लीत अडकून राहिली होती ती सोडवून आणिली. या मसलतीत जयपूरचा राजा जयसिंग हा फार उपयोगी पडला. त्याचा व बाजीरावाचा तेथे अत्यंत स्नेह जडला. त्याने बाजीरावाला तिकडे तिरंदाजी, भाला वगैरे शिपायगिरीची विद्या बरीच पढविली. याप्रमाणे बाळाजी विश्वनाथ फत्ते मिळवून साताऱ्यास माघारा आला.

पुढेही तो स्वस्थ बसला नाही. राज्याच्या वसुलातून कोणास किती भाग द्यावयाचे याचे निर्बंध ठरलेले नव्हते, यामुळे वारंवार तंटे पडत, म्हणून फार श्रम घेऊन बुद्धी खर्चून त्याने नवीन कायदेकानून केले. यामुळे व्यवस्था बरोबर चालू झाली.

अतिश्रम केल्याने बाळाजी विश्वनाथची प्रकृती बेआराम झाली. काही दिवस विश्रांती घेण्यासाठी राजाची आज्ञा घेऊन तो सासवडला गेला. तेथेच इ.स. १७२० चे ऑक्टोबर महिन्यात तो मृत्यू पावला. त्यासमयी बाजीरावाचे वय २५ वर्षांचे होते.

याप्रमाणे इ.स. १७०७ पासून १७२० पर्यंत १३ वर्षांत बाळाजीपंताने कामे केली ती बितपशील - (१) कारकुनी केली, (२) कित्येक लढायांत प्रमुख होता, (३) राजकारणाच्या मसलती केल्या, (४) मराठी राज्यास हितावह असे तह केले, (५) देशातला बंडावा मोडून सर्वांचे एकचित्त केले, (६) त्याला कित्येक मिराशी हक्क व एक किल्ला मिळाला, (७) राजाची मर्जी सुप्रसन्न झाली, (८) काही नवीन मुलूख काबीज करून स्वराज्यास जोडिला, (९) चोरांचा बंदोबस्त करून प्रजेचे यथान्याय पालन केले, (१०) सेनाकर्ते, पंतप्रधान या पदव्या मिळविल्या, (११) आप्त व सुहृद्संबंधीयांस ओळखून त्यांच्यावर उपकार केले, (१२) शाहूराजाची मोगलांच्या दरबारात प्रतिष्ठा वाढविली, (१३) उत्तरेकडचा मुलूख पाहून तिकडची बाजीरावाला माहिती करून दिली, (१४) जयपूरवाल्यासारखे हिंदू राजे होते त्यांच्याशी स्नेहभाव जोडिला, तो पुढे बाजीरावास फार उपयोगी पडला, (१५) शाहूराजाचा परिवार दिल्लीत अटकेत होता, तो सोडवून आणिला, (१६) मोगलांकडून सरदेशमुखी वगैरे हक्काच्या सनदा घेतल्या, (१७) राज्यकारभाराचे काम सुरळीत चालण्यास नवीन निर्बंध व नियम घालून दिले, (१८) सर्व सरदारांच्या नेमणुका व वेतने कायमची ठरवून दिली. इतकी कामे त्याने एका तपाच्या अवकाशात केली. यावरून त्याची बुद्धी, दक्षता, तारतम्य, दूरदृष्टी आणि धैर्य कसे होते याची अटकळ सहज करिता येईल.

तात्पर्य, बाजीराव पित्याच्या सन्निध असे. त्याच्या डोळ्यांपुढे या सर्व गोष्टी घडल्यामुळे त्यास राज्यकारभाराची ही एक तालीमच मिळाली, असे म्हटले पाहिजे. असो.

बाळाजी विश्वनाथ कैलासवासी झाल्याचे वर्तमान ऐकून शाहूराजा बहुत कष्टी झाला. आज माझा उजवा हात गळाला, असे त्याला वाटले. राजा, रंक कोणी असो, मृत्यूपुढे कोणाचा इलाज नाही. राजा कितीही हुशार व दक्ष असला तरी त्याला मंत्री चांगला पाहिजे. राज्याची सूत्रे चतुर पुरुषाच्याच

हाती पाहिजेत. कारण, कारभारी हा, राजा आणि प्रजा या उभयतांच्या दरम्यानचा वकील आहे. तशात शाहूराजासारख्या राजविलासी राजांच्या राज्यात तर उत्तम प्रधानाशिवाय राज्यकारभार कधीही नीट चालावयाचा नाही. त्याचा तरी काय दोष आहे? शाहूला औरंगजेबाकडे धरून नेले, त्या वेळेस तो ५ वर्षांचा बाळ होता. तेव्हापासून २५ वर्षांचा होई तोपर्यंत तो बादशहाच्या जनानखान्यात वाढून बेगम साहेबांच्या मेहेरबानीने तो भरगच्ची गाद्या, गिरद्या आणि उशा यांचा सुखसोहळा भोगीत होता. पुढे त्या रंगमहालातून शाहूराजाची स्वारी निघाली ती सातारच्या रंगमहालात येऊन बसली. तेव्हा अशा राजाला राज्यकारभार स्वबुद्धीने कसा करिता येईल? असो. पुढे बाजीरावास पेशवाईची वस्त्रे देण्याचे ठरले. 'वस्त्रे घेण्यास श्रीमन्महाराज छत्रपती सरकारचे हुजुरास येणे' अशा मतलबाचे आज्ञापत्र श्रीपतराव प्रतिनिधीने बाजीरावाकडे मुद्दाम रवाना केले.

♦♦

भाग-६

# अंतर्बाह्य स्वरूप

**बा**जीराव हा सुरतपाक देखणा पुरुष होता. तो सहा फूट उंच होता. या उंचीच्या मानाने असावे त्यापेक्षा त्याचे हात जरा लांब होते. शिवाजीराजाही असाच अजानुबाहू होता, असे लिहिले आहे. बाजीराव प्रकृतीने चांगला निकोप असे. त्याचा अंगलोट कसलेला, मांसल व पीळदार होता. त्याचे बोलणे ऐटदार असून अंगी शिपायगिरीची ढब होती. पाहताच मनुष्य मोहित व्हावा, असा त्याचा प्रफुल्लित व पाणीदार चेहरा होता. धैर्य आणि साहस यांचे वसतिस्थान जी छाती, ती विशाल होती. तो जातीचा चित्पावन ब्राह्मण आणि बाप पेशवा झाल्यापासून श्रीमंती भोगलेला, मग काय पुसावे? खाणे-पिणे चमचमीत आणि पिंड सुखात रुळलेला, अशा राजबिंड्याची झांक लोकोत्तर असते. तो हसतमुख असून त्याच्या रमणीय चेहऱ्यावर राजतेज झळकत असे. त्याचे नाक, डोळे, कपाळ, ओठ, भिवया, मिशा, केस हे सर्व भाग जसे असावे तसे होते. त्याच्या नखशिखांत शरीरावर कोठे व्यंग काढण्यास जागा नव्हती. एका विद्वानाने लिहून ठेविले आहे की, 'जो तसबिरीत दाखविता येत नाही तो सौदर्यांचा सर्वोत्कृष्ट भाग होय.' सत्य आहे. एकदा निजामउल्मुल्काने बाजीरावाची तसबीर काढून आणण्यास एक नामांकित चितारी पाठविला. त्या तसबिरीत त्याचे सौंदर्य हुबेहूब उतरेना, तेव्हा तो त्रासून म्हणाला, 'धिक्कार असो माझ्या या कसबाला!' मनाप्रमाणे काम उतरले नाही म्हणजे चित्रकार, चरित्रकार किंवा कादंबरीकार यांची स्थिती अशीच होते. भरजरी दुपेटे, मंदिल, शालजोड्या

अशा भपकेदार पोशाखाचा बाजीरावास इष्क नसे. त्याचा हमेशा पांढरा सफेत पोशाख असे. शरीर वस्त्राभरणांनी शृंगारण्यापेक्षा, गुणगणमंडित करणे हेच युक्त होय आणि वैभव एकप्रकारे भूषणच होय. निळा, गांगा, सारंगा व अबलक या चार रंगांच्या घोड्यांवर त्याची प्यार मर्जी असे. शिवाजीराजाच्या मागे मराठ्यांमध्ये बाजीरावासारखा नाव घेण्याजोगा पटाईत घोड्यावर बसणारा दुसरा अलीकडे कोणी झाला नाही, असे सांगतात. घोड्यावरची मांड काडीभरही न ढळता भाल्याची फेक करणे; बोथाडी फिरविणे; ढालपट्ट्याची मारपकड करणे; घोडा तिरासारखा भरधाव टाकून, बंदुकीने नेमके निशाण मारणे; युक्तीने सामनेवाल्याचा मार चुकविणे; या सगळ्या कामांत तो प्रवीण होता. लढाईत तो घोड्यावरून भाला इतक्या जोराने मारी की, समोरचा स्वार आणि घोडा एकदम जायबंदी होत!

त्याला मिजास ही कधी ठाऊक नव्हती. कधी कधी तो घोड्याचे खोगीरसामान आपल्या हाताने कशी. घोड्याजवळ जाऊन त्याच्या अंगावरून हात फिरवी. चंदी, चारा, पाणी, चाकरी याजवर तो स्वत: पैरवी ठेवी. येणेकरून मोतद्दारास धास्ती राहून खासघोड्यांस त्याची चांगली ओळख असे. हिरवे कच्चे कसलेही अन्न असो, ते त्यास पचे; अशी त्याची तीव्र पाचकशक्ती होती. तो सैन्य घेऊन बाहेर स्वाऱ्या करू लागला तेव्हा शिपायांबरोबर तोही एक-एक, दोन-दोन दिवस फुटाणे, हुरडा यांजवर काढी. मोतद्दार, शागीर्द, हुजरे हे दौडीच्या स्वारीस टिकत नसत म्हणून स्वत:च्या खिजमतीस तो पायदळ चाकरपेशा फारसा बाळगीत नसे. मेखा, आघाडीपिछाडीचे दोर, तोबरा, शेर दोन शेर चंदी, शेरभर फुटाणे, पाणदोरी व पाणलोटा इतकी सामग्री तो नेहमी घोड्यावर बाळगी. अशी एक गोष्ट आहे की, त्याची व निजामउल्मुल्काची जुंपून बरेच दिवस लोटले, तरी त्या दोघांचे इ.स.१७२८ पर्यंत समक्षासमक्ष दर्शन नव्हते. एकदा बाजीराव कसा आहे तो पाहावा, असे त्याला वाटले, म्हणून त्याने एका चिताऱ्यास सांगितले की, ‘तू जाऊन बाजीराव पेशव्यास पाहा आणि तो जे काम करीत असेल, तसे त्याचे चित्र काढून आण. तुला चांगले बक्षीस देऊ.’ मग त्याने जिवाचा धडा करून, बाजीराव मोठे सैन्य घेऊन माळव्याकडे चालला होता, त्या वेळचे त्याचे त्याने चित्र काढून आणले, ते असे होते - ‘सात-आठ विती उंचीचा खंद्या सारंगा घोडा, त्याजवर तो स्वार होऊन, भाला

अंगाशी धरून, जोंधळ्याची कणसे तळहातावर चोळून खात खात चालला आहे. डोईस शिरस्त्राण, त्याजवर एक फेटा गुंडाळलेला; अंगात चिलखत व वरून शिलेदारी बाण्याचा रुदार अंगरखा; तुमान; कंबरेस नंगी समशेर व जंबिया आणि पायबंद, दवासन व मेखा तोबऱ्यात भरून तो बरोबर बांधून घेतलेला; अशी तसबीर पाहून, चकित होऊन निजाम म्हणाला, ''अल्लापन: ये: इनसान है, लेकिन् मानिंद षैतानके है. लाजिम है के, इस्से साथ होषयारी और हीफाजतसे रहना चाहिये.'' बाजीराव दररोज हजार-बाराशे नमस्कार घाली. मुदगलाच्या जोड्या फिरविणे, बैठका मारणे कुस्त्या करणे या मल्लयुद्धाच्या कसरतीही तो करी व करवी. शरीराने बळकट असा की पाच-चार नाल एका ठिकाणी जुळून तो सहज हाताने पिरगाळी. उसाची पेरी हातच्या हाती भराभर सोडवी. तलवारीचे आणि दांडपट्ट्याचे सर्व प्रकारचे हात त्यास करामलकवत् होते. तीर, भाला, बंदूक व तलवार या चारी हत्यारांची तो युद्धात कारवाई करी. आयुधविद्येत त्याचे असे नैपुण्य होते, म्हणून त्याला त्या वेळचे लोक 'देवयोद्धा' म्हणत.

तो लिहिण्याच्या कामात मोठा चतुर होता. ऐन अडचणीच्या प्रसंगी तो आपल्या गुरुमहाराजांस स्वदस्तूरची पत्रे धावडशीस लिहून पाठवी. ती अस्सल पत्रे अद्यापि ब्रह्मेंद्रस्वामींच्या शिष्यांच्या घरी आहेत. त्याजवरून त्याचे सुवाच्य व वळणदार अक्षर आणि मतलब दिसून येतात; पण त्याचे तलवारीवर प्रेम फार असे. पांढऱ्यावर काळे करण्याचे काम तो तुच्छ समजत असे.

मधुर भाषण हा एक आणखी त्याचा स्वाभाविक गुण होता. तो सभाधीट असून, प्रसंगोपात्त भरदरबारात राजापुढे अस्खलित भाषणे करी. त्याचे रसाळ चुटके कोठे कोठे पुढे मासल्यात दिले आहेत. त्यावरून त्याचे बोलणे किती गोड आणि मोहक असे, ते ऐकून राजा खुश होऊन त्याच्या अंगी कसे स्फुरण चढे आणि रसवती वाणीच्या प्रेमरज्जूने तो सर्व मराठ्यांचे चित्त आपल्याकडे कसे ओढून घेई, हे समजेल. तो बोलू लागला म्हणजे वीररस हटकून उभा करी. त्या वेळेस पागोट्याचे झोकदार पल्ले सोडून वीरासन ठोकून बसलेल्या वीरांच्या अंगी वीरश्रीचे वारे शिरून ते आपल्या अस्तन्या सारू लागत आणि म्हणत की, ''बाजीरावसाहेब हा आमचा जीवात्मा आणि आम्ही त्याचे अवयव आहोत.'' याप्रमाणे शिपाई लोक

त्याजवर दिलआराम आणि दिलखुश असत.

त्याचे डोके आणि हात यांची, तू अधिक की मी अधिक अशी स्पर्धा चाले. त्याच्या बुद्धीचा असा हव्यास असे की, अल्पायासाने साध्य जे कार्य ते टाकून, मोठ्या आयासाने साध्य आणि ज्यात लाभही मोठा, अशा कार्यास तो हात अगोदर घाली. त्याने एखादी मसलत योजिली तर ती शेवटास नेण्याविषयी तो मोठा अभिमान बाळगी. त्यासारखा मसलत शेवटास नेणारा ब्राह्मण अलीकडे दुसरा कोणी झाला नाही.

''छानदार मुखचर्या ही मुकी शिफारस आहे,'' असे एका विद्वानाने म्हटले आहे, ते सत्य आहे. शरीराचा सुरेख बांधा, तोंडाचा डौल, उभे राहण्याचा झोक, चालण्याची ढब, बसण्याची ऐट, अंगावरचे राजतेज आणि रसाळ वाणी यापैकी एक एक गुण वेगळा पाहिला तरी जनमोहक आहे. मग त्या सर्वांचा संगम ज्याच्या ठायी झालेला असतो, तो पुरुष किती लोकप्रिय असतो हे सांगावयास नको. या अमोघ देणग्या ज्यास विश्वाचा कारागीर देतो, तो या जगतीतलावर पूज्य असतो. तो आपल्या मातापितरांच्या काळजाचा गाभा असतो. सर्व स्थळे त्यास सुगम्य असतात. राजद्वारी त्यास मज्जाव नाही. सभेला तो दिपत नाही, उलटी सभाच त्याला दिपते. त्याचे बोलणे ऐकण्यासाठी लोक लाळ घोटीत असतात. तो दृष्टीस पडला म्हणजे लोक त्याच्याकडे टकमका पाहतात.

भर पंचविशीच्या उमरीत बाजीराव असा बनून राहिला. इ.स. १७२१ चे मे महिन्यात साताऱ्यास त्याला पेशवाईची वस्त्रे मिळाली. त्या दिवशी तो निळ्या घोड्यावर बसून शहरातून राजवाड्याकडे चालला, तेव्हा त्याला पाहण्यासाठी बायका-पुरुषांचे दुतर्फा थवे उभे होते. त्यासमयी हा आमचा हितकर्ता आहे असे सर्व हिंदू प्रजेस वाटले. कुमार्गवती स्त्रियांनी आपल्या बुभुक्षित नेत्रांनी त्याच्या सौंदर्यामृताचे घोट झराझर घेतले. वृद्ध बायांच्या पोटात पुत्रवात्सल्य उत्पन्न झाले. उपवर झालेल्या सुस्वरूप मुली हात जोडून, ''जे देवा बापा, आम्हाला असाच पती मिळू दे,'' असे म्हणाल्या. बाजीरावांच्या स्वरूपसौंदर्याची एक चमत्कारिक गोष्ट एका जुन्या बखरीत वाचण्यात आली ती अशी-

इ.स. १७२८ मध्ये बाजीरावाने निजामाचे तहाचे बोलणे कबूल केले. पुढे दोघांचे तळ गोदावरीच्या काठी पडले आहेत. ऐन मध्यरात्रीचा समय

झाला आहे;  बाहेर पिठासारखे स्वच्छ चांदणे पडले आहे; पेशव्यांच्या तंबूत समया तेवत आहेत; दिवाण, फडणीस, शिंदे, होळकर वगैरे यांच्या सल्लामसलतीने, निजामाकडून तह कसा लिहून घ्यावयाचा याजबद्दल कलमबंदीचा खर्डा तयार होत आहे; इतक्यात निजामाकडून एक सरदार घोडा टाकीत आला. त्याचे कमरेस कडाबीन व पाठीस दारूगोळ्याचे तोस्दान होते. पहारेवाल्याने परवानगी घेऊन त्याला तंबूत सोडले. तो जाऊन सलाम करून बाजीरावापुढे अदबीने उभा राहिला. त्याची नोकझोक पाहून पेशवा फार खुश झाला. तोंडावरून तो १५-१६ वर्षांचा उमेदवार दिसला. येण्याचे कारण वगैरे पुसले, तेव्हा तो म्हणाला, ''जनाबे आली, बंदा निजामसाहेबके तैनात में है. मैं एक पठानका फरजंद हूं. मेरा नाम मस्तानखाँ है. हुजूरका इकबाल और तारीफ सुनके आया हूं और उम्मेद है के हुजूरके खिदमत मेें रहूं.'' तेव्हा बाजीराव म्हणाला, ''बहुत खूब; अगर तुम हमसे नेकी और इमानसे चलोगे, तो तुम्हारी अच्छी तरहसे परवरीश होगी.'' असे अभय मिळताच तो सरदार म्हणाला, ''अगरचे: मेरा ये: लिबास् मर्दका देख पडता है, तो मैं औरत की जात हूं. मुझे मस्तानी कहते है. निजामसाहेबने, मेरे वालीदको कत्तल करके, मुझे और मेरी माँ को अपने जनानखाने में रख्खा. व्हैं मैं छोटेसे बडी हो गई. आपके जवांमर्दीकी और खुबसूरतीकी तारिफ सुनके, मेरा दिल निहायत आपके तरफ मायल हुवा. बलके, कल हुजूरकी सवारि जीआफत्के वास्ते, निजामसाहेबके लश्करमें आयी थी, उस वक्त मेरी निग: हुजूरके उपर बराबर पहुंची और मैं फरेफता हुई. ये: मेरा हाल है. मैं उम्मेदवार हूं के, हुजूर मेहरबान होके आपका कौल पूरा करेंगे.'' हे ऐकून बाजीराव स्तब्ध व चकित झाला. दिलेले वचन माघारी घेता येत नाही, म्हणून सर्वांच्या विचारे तिचा त्याने अंगीकार केला. ती मस्तानी खुबसूरत आणि समंजस बायको होती. तिला पुण्यास त्याने शनिवारवाड्यात ठेविले. काशीबाई व ती एकविचाराने असत. दोघींवरही बाजीरावाचे प्रेम असे. त्या यवनीच्या पोटी बाजीरावास एक पुत्र झाला. त्याचे नाव समशेरबहादर. इ.स. १७६१ मध्ये मराठे व गिलचे यांच्या दरम्यान सोनपत-पानिपत येथे जे घनघोर रणकंदन झाले त्यात तो होता. पाहा, स्त्रीचरित्र कसे आहे! निजामालासुद्धा हार घेऊन तह करावा लागला, एवढा बलवान जो पेशवा, त्याला या अबलेने एका क्षणात जिंकून

टाकिले! ज्या गुणांनी मनुष्य स्तुतीस पात्र होतो, त्याच गुणांनी तो कधी कधी पाशबद्ध होतो! त्याचे हे एक ढळढळीत उदाहरण आहे.

पिंजऱ्यात अडकलेल्या पोपटास उद्देशून एक कवी म्हणतो की-

*'शुक पंजरबंधस्ते मधुराणां गिरां फलम् ॥'*

या पुढची मनोरंजक गोष्ट आता पुढल्या भागावर ठेवू.

♦♦

भाग-७

# दरबार

**छ**त्रपतींचे आज्ञापत्र आल्यावर चिमाजी अप्पा व अंबाजीपंत पुरंदरे, तसेच रामचंद्रपंत भानू या त्रिवर्गास बरोबर घेऊन बाजीराव साताऱ्यास आला. तो वस्त्रे देण्याचा नेमलेला दिवस उगवला. हे कालमान ज्याच्या अस्तोदयाने समजते तो गोलाकार, लालीलाल, तेज:पुंज जगच्चक्षू पूर्वेस उदय पावला. नित्यनेम सारून बाजीरावाने राजवाड्यात जाण्याची तयारी केली.

बाजीराव मूळचाच लोकोत्तर देखणा पुरुष, त्या स्वरूपाला आणखी तारुण्याची भरज्वानी आणि मनोत्सव यांची भर मिळाली. असा त्रिवेणीसंगम होऊन त्याच्या मुखश्रीवर भावी ऐश्वर्याची कांती त्यासमयी झळकू लागली.

तो वैशाख मास चालू होता. आसमंतात वसंत ऋतूची छाया पसरली होती. आकाश निरभ्र होते. झाडांस चैत्रपालवी फुटली होती. तिच्या योगाने डोंगर, किल्ला व राने सुशोभित दिसत होती. सातारच्या पश्चिमेस श्रीयौतेश्वराचा डोंगर आहे. त्याजवरची झाडे, झुडपे व वनस्पती ही मोहराफुलांनी गच्च फुलली होती. त्याजवरून सुशीतल वायू शहराकडे झुळुझुळु वाहत होता. त्याच्या सुगंधाने लोकांचे अंतरात्मे थंडगार होऊन विश्रांती पावत होते. ब्राह्मण आळीत नित्याप्रमाणे घरोघर सडासंमार्जन होऊन त्याजवर उपवर मुलींनी चित्रविचित्र रांगोळ्या घातल्या. माहुलीस वैशाखस्नाने करून पुरुष व स्त्रिया कृष्णोदकाचे गडवे हातात घेऊन घाईघाईने घरी चालल्या. शहरात त्या दिवशी जिकडे तिकडे आनंदमुद्रा चमकत होती.

असे होता होता प्रहर दिवस चढला. दोन प्रहर उलटले. राजवाड्यापुढे लोक जमू लागले. हत्ती व घोडे सज्ज होऊन उभे राहिले. स्वार, शिबंदी, पायदळ, हुद्देवाले वगैरे तमाम लष्करी लोक तयार झाले. प्रेक्षकांचे थवे इकडून तिकडे आणि तिकडून इकडे हिंडू लागले. शिंगे, तुताऱ्या, ताशेमर्फे, नौबती, चौघडे डंके वाजू लागले.

दरबाराची जागा तयार झाली. फरासांनी हिरवे, पिवळे, तांबडे वगैरे तऱ्हेतऱ्हेचे इराणी गालिचे पसरून बिछाईत घालून ठेविली. भरगच्ची पडदे, रुजामे, किनखापी अभ्रे, छते, हंड्या, झुंबरे, अयने, जयपुरी तसबिरा, यांची जेथल्या तेथे त्यांनी मांडणी करून ठेविली. मध्यभागी नक्षीदार सोनेरी मुलामा दिलेले महाराजांचे सिंहासन शृंगारून ठेविले. कचेरीच्या दुतर्फा कारंजी थुईथुई उडू लागली.

पहाऱ्यावर तिसऱ्या प्रहरचे ठोके वाजले. दरबार सुरू झाला. कलावंतिणीचे थाटमाट केलेले ताफे उभे राहून ध्रुपदे, तराणे, गझल, दादरे यांचे गोड सुस्वर आलाप त्यांच्या कंठातून निघू लागले. इतक्यात अमीर, उमराव, अष्टप्रधान, मानकरी, शिलेदार, दरकदार यांच्या स्वाऱ्या येऊन पोहोचल्या. तलवारीशी तलवार लागून राहिली. बाजीराव पांढरा शुभ्र पोशाख करून कंबरेस तलवार लटकावून आपल्या मंडळीसह तेथे आला आणि प्रतिनिधीच्या शेजारी वीरासन करून बसला. पेशव्यांचे दिवाण अंबाजीपंत पुरंदरे, फडणीस रामचंद्रपंत भानू व चिमाजी अप्पा हे बाजीरावाच्या मागे येऊन बसले.

जरा अवकाशाने छत्रपती शाहूराजाची स्वारी, भालदार चोपदार पुढे ललकारत आहेत, अशा थाटाने सिंहासनारूढ झाली. भरजरी पोशाख, हिरे, मोती, पाचू यांचे अलंकार व मस्तकावर उडणारी मयूरपिच्छांची मोर्चले अशा खाशा स्वारीचा थाट मोठा वर्णनीय होता. राजा येण्याबरोबर खडीताजीम होऊन मुजरे झाले. त्याच्या उजव्या हातास अष्टप्रधानादी बसले. ते येणेप्रमाणे- श्रीपतराव पंतप्रतिनिधी, त्रिंबकराव दाभाडे सेनापती, अंबाराम हणमंत अमात्य, नारोशंकर पंतसचिव, नारो रामचंद्र मंत्री, आनंदरावजी सुमंत, होनाजी अनंत न्यायाधीश, मुद्‌गलशास्त्री पंडितराव, दावलशी सोमवंशी सरलष्कर, कान्होजीराव भोसले, सेनासाहेब सुभे, समशेरबहादूर पिलाजीराव गायकवाड, कानोजीराव आंग्रे, आरमारावरचे सरदार; याशिवाय

शिंदे, शिर्के, मोहिते, गुजर इत्यादी पुष्कळ होते.

डाव्या हाताला जाधव, निंबाळकर, मोरे, कदम, भोसले, थोरात, पवार, कावरे, घोरपडे, महाडिक, काकडे, दळवे, घाटगे, खटावकर राजे, चव्हाण व मावळे आणि हेटकरी यांच्यावरचे अंमलदार बसले. याशिवाय सावकार, चिटणीस, वकील, सुभेदार, मोकासदार, देशमुख, देशपांडे, देसाई, पोतनीस, पागनीस, फडणीस, आनगळ वगैरे हे निराळेच.

याप्रमाणे कचेरी भरल्यावर राजाच्या आज्ञेवरून प्रतिनिधींनी भाषण केले. ते असे, ''सरदारहो, आश्विनमासी बाळाजी विश्वनाथ पेशवे कैलासवासी झाले. त्यांचा अधिकार कोणास द्यावा याजबद्दल भवति न भवति होऊन, त्यांचे ज्येष्ठ चिरंजीव बाजीराव यांस तो देण्याचे सरकारांतून ठरले. त्या समारंभासाठी हा दरबार भरला आहे. आता त्यास पेशवाईची वस्त्रे व शिक्काकट्यार महाराज देतील. आजपासून बाजीराव बल्लाळ हे छत्रपती सरकारच्या गादीचे प्रधान झाले, असे सर्वांनी समजावे.''

प्रतिनिधींचे असे भाषण झाल्यावर, बाजीरावास राजाने पेशवे पदाची सनद व वस्त्रे दिली. त्यावेळची बाजीरावाची मुद्रा, ऐट, दिव्य मुखश्री आणि राजतेज पाहून सर्वांस मोठा आनंद झाला. औरंगजेबाच्या दरबारी राहून मिठ्यामिठ्या बातांनी दुसऱ्यास खुलविण्याची विद्या शाहूराजास चांगली अवगत झाली होती. वस्त्रे देताना राजाने बाजीरावास अमुक अमुक तऱ्हेने कारभार पाहावा, म्हणून सांगितले. ते सुरस वृत्त आता पुढच्या भागात येईल.

♦♦

भाग-८

# दरबारचे भाषण

**सा**ताऱ्यास दरबार भरून बाजीरावास पेशवाईची वस्त्रे दिल्यावर छत्रपती शाहूराजा म्हणाला की, ''बाजीराव, तुम्ही आता आमचे प्रधान झाला. तुमचे तीर्थरूप बाळाजी विश्वनाथ यांचे आम्हास घडोघडी स्मरण होते. असा चतुर पुरुष विरळा. काय त्यांच्या मसलती! काय चातुर्य! किती दूरवर विचार! त्यांनी हे स्वराज्य असे घाटास आणिले, इतक्यात काळाने त्यास गट्‌कन्‌ तोंडात टाकिले. उपाय नाही. चालत्या गाड्याचा कणा एकाएकी मोडावा तशी अवस्था झाली. ते पद आता तुम्हास दिले आहे, तर वडिलांनी जो पाया घालून दिला आहे तो ध्यानात ठेवून त्यांचे आम्हास विस्मरण पाडा. या हिंदुराज्याची काळजी ठेवा. अष्टप्रधान, अमीर उमराव, मानमानकरी सर्व मिळून तुम्ही एकमेकांचे हातात हात घालून चाला आणि मुसलमानांची खोडकी जिरवा. आमच्या तीर्थरूपांचे औरंगजेबाने कसे हाल केले, ते सर्वांस महशूर आहेतच. त्या गोष्टीचे स्मरण झाले की, आमच्या अंगाचा संताप होतो. गाईब्राह्मणांस आणि एकंदर सर्व हिंदूंस मुसलमानांनी बहुत छळिले. अजूनही आमच्यावर त्यांचा डोळा आहेच, त्यांची पाळेमुळे खणून टाका. आमच्या आईसाहेब दिल्लीस अटकेत होत्या, त्यास तुमच्या वडिलांनी मोठ्या युक्तीने सोडवून आणिले. आता त्यांनी शिकविलेले डावपेच बाहेर काढा. तुम्ही परशुरामाचे वंशिक आहा, तेव्हा तुम्हास हिंमत कशी धरावी हे सांगणे नकोच. तलवारबहादरी करून 'राव' या नावाप्रमाणे करणी करा. या शिवाजीमहाराजांच्या गादीचा अभिमान धरा आणि हिंदुराज्याची

यशश्री वाढवून तुम्हांस 'श्रीवर्धनकर भट' हे नाव बरोबर शोभेल अशी कीर्ती मिळवा, दुसरे काही सांगणे नाही.''

हे राजाचे उत्साहजनक भाषण झाल्यावर बाजीरावाने विनंती केली, ती अशी, ''आज दरबार भरून मला वस्त्रे मिळाली आणि महाराजांनी उपदेशपर आज्ञा केली, ती मला शिरसावंद्य आहे. ती मी कधी विसरणार नाही. राजबल, द्रव्यबल, मनुष्यबल, बाहुबल आणि बुद्धिबल या पाच बलांचे साह्य घेऊन हा देह सदोदित या गादीच्या एकनिष्ठ सेवेत झिजवावयाचा, असा माझा कृतसंकल्प आहे. तो 'सत्यसंकल्पाचा दाता नारायण' शेवटास नेण्यास समर्थ आहे. यवन इत्यादी परकीय लोकांस घालवून देण्यास हल्लीची संधी उत्तम आहे. औरंगजेबाच्या मागे मोगलांच्या राज्यास उतरती कळा आहे. तेथे एकी नाही. ऐषोआराम वाढत चालला आहे. आपापसात भांडणे लागली आहेत. फौजेची तयारी नाही. प्रजा राजास नाराजी आहे. ते मोठेपणाची शेखी मिरवितात, त्यांच्या राज्यात अनन्वित कृत्ये बहुत होताहेत. ते भुंग्यांनी कोरल्याप्रमाणे पोकळ झाले आहे. उपासामागे पारणे आणि पारण्यामागे उपास असे राहाटगाडगे आहे. शिवाजीमहाराजांच्या पश्चात आम्ही खडखडीत उपास काढिले. आता पुन: आपले पारण्याचे दिवस आले. देवाच्या दयेने आमचे कृपाळू महाराज त्यांच्या गादीवर येऊन बसले. आपली छाप दिल्लीपर्यंत बसली. पण आमच्यात एकीची वाण आहे, ती दूर झाली पाहिजे. आपापसात वैरभाव फार खोटा. चंद्रसेन जाधव, हैबतराव निंबाळकर, रावरंभा, सर्जेराव घाटगे हे आमचे मराठे असून मुसलमानांस जाऊन मिळाले. राजघराण्यांत सातारा आणि कोल्हापूर अशा दोन फळ्या. काही लोक इकडचे आणि काही तिकडचे. ब्राह्मण, मराठे यांच्याही आतल्या आत कुरबुरी आणि फाटाफुटी. अर्थातच, सर्व हिंदुराजे पिंजऱ्यातले पोपट बनून राहिले आहेत. मुसलमान देतील ते खावे आणि ते मागतील ते त्यास द्यावे, अशी हिंदूंची अवस्था झाली आहे. स्वजनकल्याण होण्यासाठी आमचे पाऊल पुढे पडले पाहिजे. नवीन प्रांत काबीज करून राज्याचा विस्तार वाढला पाहिजे. फौजफाटा तयार पाहिजे. तो तयार लेश असला म्हणजे समरांगण गाठण्यासारखी मौज नाही. माझा तर निश्चय आहे की, शत्रूस पादाक्रांत केल्याशिवाय विश्रांती घ्यावयाची नाही. तूर्त आपल्यास दोन प्रबल शत्रू आहेत. उत्तरेस मोगल आणि

कोकणात फिरंगी, तरी चिंता नाही. कायावाचामनाने सर्वांनी मदत द्यावी, म्हणजे त्यास जेरीस आणण्यास काही उशीर नाही. या म्हणण्याचा सर्वांनी विचार करावा, अशी माझी विनंती आहे.''

इतके बाजीरावाचे भाषण झाले ते ऐकून सर्व सरदारांच्या मुखावर वीरश्रीचा प्रकाश पडला. शाहूराजाही बहुत खुश झाला. नंतर पानसुपारी, हारतुरे, अत्तरगुलाब होऊन दरबार बरखास्त झाला.

याप्रमाणे बाजीरावाला वस्त्रे देण्याचा समारंभ झाला. पुढे बाजीरावाचा प्रतापसूर्य जो-जो आकाशगामी होत चालला, तो-तो त्याची किरणे कसे पसरत चालले; त्या सूर्याला पाहून महाराष्ट्र सरोवरात उत्पन्न झालेली प्रजाकमले कशी प्रफुल्लित दिसू लागली आणि त्या कमलांचा विध्वंस करणारे मोगल इत्यादी हत्ती, यांचे मस्तक तापाने संतापून ते सैरावैरा कसे पळत सुटले; हे सुरस कथाभाग पुढे क्रमशः पाहण्यात येतील.

♦♦

भाग-९

# महापुरुष

**ज**सा दशरथाचा वसिष्ठ, रामचंद्राचा विश्वामित्र, धर्मराजाचा धौम्य व शिवाजीराजाचा रामदास, तसाच बाजीरावाचा एक परमहंस गुरू होता. तो त्यास राज्यकारभारात हमेशा उपदेश करी आणि तद्नुरूप तो वर्ते. हा वृत्तांत आता वाचणारास सादर करू.

साताऱ्यापासून दोन कोसावर मेढेखोऱ्यांत धावडशी गाव आहे. तेथे इ.स. १७०० च्या सुमारास एक परमहंस स्वामी येऊन राहिले. त्यांचे तेथे वास्तव्य होऊन बरीच वर्षे लोटली. तरी हे स्वामी पूर्वाश्रमी कोण, कोठचे राहणारे याचा कोणासही थांग लागला नाही. त्यांचे तपोबल, त्यांची ध्याननिष्ठा, त्यांचा अधिकार आणि त्यांचे तेज:पुंज वपु ही पाहून दर्शनास येणारा भक्तजन केवळ दिपून जाई. "महाराज, आपण कोण, कोठचे?" असा प्रश्न करण्याची कोणाचीही छाती होत नसे. स्वामी अनेक विषयांवर सुरस भाषणे करीत; पण त्याप्रसंगी त्यांनी आपल्या ठावठिकाणाचा कोणास कधीही अंत लागू दिला नाही. या अलौकिक पुरुषास लोक 'महापुरुष' म्हणत. साधूंच्या अंगी जे गुण असावेत ते सर्व त्यांच्यात मूर्तिमंत वसत होते. स्वामी आत्मानात्मविचारांत सदा मग्न असत. त्यांची वृत्ती शांत व सहिष्णू असे. कामक्रोधादी षड्रिपू त्यांच्या वाऱ्यासही उभे राहत नसत. या त्यांच्या सत्कीर्तिकस्तुरीचा परिमल चोहीकडे वाहत जाऊन सातारचेच काय; पण दूर देशांतराचे लोकही त्यांच्या दर्शनास मुद्दाम येत. स्वामी वेदांत इत्यादी विषयांत पारंगत होते. या अपार ज्ञानराशीकडे कोणी कसलाही

मनुष्य येवो, ते त्याजपाशी प्रेमपूर्वक संभाषण करून त्याची चित्तवृत्ती गारेगार करून टाकीत. ज्याचा जसा अधिकार तसा त्यास उपदेश करीत. त्यामुळे वेदांती, धादांती, सिद्धांती, शास्त्री, वैदिक, पंडित व राजकारणी पुरुष, असे नाना व्यवसायांचे लोक त्यांच्या दर्शनास येत. स्वहिताला लाथ मारून जगतावर उपकार करण्याप्रीत्यर्थच जो आपला देह झिजवितो, त्या महंताची महती किती वर्णन करावी!

बाजीरावाचे तीर्थरूप बाळाजी विश्वनाथ सातारप्रांती आल्यावर त्यांची भक्ती स्वामींच्या ठिकाणी अधिक जडली. बाळाजी विश्वनाथ हा पुरुष राजकार्यास सत्पात्र आहे, असे जाणून स्वामी त्यास राजनीतीचा मंत्रोपदेश करीत आणि तद्नुरूप वर्तनाने दिवसेंदिवस त्याचा उत्कर्ष होत चालला. शाहूराजा शिवाजीचे गादीवर आरूढ होऊन, बाळाजी विश्वनाथ त्याचा प्रधान झाला. 'हाती माती धरिली तर तिचे सोने व्हावे' या म्हणीप्रमाणे त्याची जलदीजलदीने चलती होत चालली. बापाबरोबर बाजीरावही स्वामींच्या दर्शनास जाई. स्वामींचे बाजीरावावर अप्रतिम प्रेम जडले. त्यासमयी लौकिकांत अशी उपश्रुती पसरली की, शिवाजीमहाराजांचा काल झाल्यावर त्यांचा पुत्र संभाजी याच्या अश्लाघ्य वर्तनाने स्वराज्य लयाच्या पंथास लागले, हिंदू धर्माचा उच्छेद होत चालला व हिंदू प्रजेस परधर्मी म्लेंच्छ वगैरे राजे अनिवार पीडा देऊ लागले. या अनिष्टांचे निरसन होऊन हिंदू धर्म आणि हिंदू राज्य यांची पूर्ववत संस्थापना व्हावी, एतदर्थ समर्थ रामदास स्वामीच पुन: या महापुरुषाच्या रूपाने सज्जनगडाहून (परळीहून) धावडशीस प्रगट झाले.

असे होता होता इ.स. १७२१ मध्ये बाजीराव पेशवाईचे पद पावला. त्यासमयी स्वामीमहाराज त्या मेढे खोऱ्यात येऊन वीस वर्षे लोटली. या वीस वर्षांत जी मुले उघडी नागडी फिरत होती किंवा मातेचे स्तनपान करीत होती, ती तारुण्याच्या भरज्वानीत येऊन संसार करू लागली; जे तरुण होते त्यांच्या मुखश्रीवर बालसफेदीची शुभ्र छाया पसरली; जे वृद्धदशेने वाकले होते ते विश्वभक्षक काळाच्या जबड्यात जाऊन पडले; परंतु या स्वामींची शरीरसंपत्ती जशीच्या तशीच कायम! ती बालाग्र ढळली नाही! काय नि:संगतेचे व तपाचे सामर्थ्य हे!

नित्यनियमाप्रमाणे वैशाखमासी एके दिवशी प्रात:काळी समाधी विसर्जन

करून स्वामी आपल्या शिष्यवर्गास मठात पाठ सांगत बसले होते. अहाहा! काय त्या स्थळाचे, त्या वेळचे वर्णन करावे! मठातील भूमिका झाडसारव करून स्वच्छ केल्या आहेत. मठाच्या आत व बाहेर अशुची किंवा अमंगल पदार्थांचे नाव नाही. त्याच्या सभोवती दर्भ, दूर्वा, तुळशी व फुलझाडे फुलली आहेत. त्यांजवर वसंत ॠतू स्वैच्छ क्रीडत आहे. मठाच्या समोर एक लहानसा ओढा असून, त्याचे स्वच्छ निर्मल पाणी झुळझुळ वाहत आहे. बालार्काचे आरक्त किरण मठद्वारांतून स्वामीच्या पायांपर्यंत पसरले आहेत. व्याघ्रांबरावर हे सुवर्णकांती महापुरुष पद्मासन घालून अधिष्ठित झाले आहेत. त्यांनी अंगास चर्चिलेल्या भस्माचा आणि दोहो बाजूस केळीच्या पानांवर ठेविलेल्या तुळशी फुलांचा घमघम सुवास सुटला आहे. गळ्यांत, हातात व दंडात रुद्राक्षांच्या माळा रुळत आहेत. हातात स्मरणी हालत आहे. कटीस कौपीन आणि अंगावर काषायवस्त्रे परिधान केली आहेत. स्नानसंध्येची काष्ठमय पात्रे पुढे मांडलेली आहेत. लाक्षारसाने रंगविलेला लाल कमंडलु स्फटिकवत् स्वच्छोदकाने ओतप्रोत भरलेला आहे. स्वामींच्या सन्मुख दर्भासने घालून ठेविली आहेत. त्यांजवर स्नानसंध्यादी ब्रह्मकर्म आटोपून शिष्यवर्ग पुढे पोथ्या सोडून बसला आहे. इतर ब्रह्मवृंद, भक्तजन व श्रोतृमंडळी यांचीही दाटी झाली आहे. स्त्रियांनी आत प्रवेश करू नये, अशी मठाची मर्यादा असे. म्हणून त्या मठद्वारातूनच पायांचे दर्शन घेत आहेत. दोही अंगास वेद, शास्त्रे, पुराणे, भाष्यें यांच्या पोथ्या भगव्या वेष्टणात गुंडाळून पाटावर एकावर एक रचून ठेविल्या आहेत, स्वामींच्या अग्रभागी सामवेदांतर्गत छांदोग्योपनिषदाची पोथी होती. तीतून 'एकमेवाद्वितीय' या महावाक्यावर त्यांचे व्याख्यान चालले आहे. त्यांची भाषण करण्याची आणि उपपादन करण्याची सर्वोत्कृष्ट शैली पाहून श्रोते चित्रासारखे तटस्थ बसले आहेत. स्वामींची मधुर वाणी उपदेशामृत स्त्रवत आहे आणि उत्कंठित श्रोत्यांचे तृषित कान त्याचे पान करण्यास्तव आ पसरून बसले आहेत. त्यासमयी त्यास असे वाटे की, सेवकजनांवर अनुग्रह करण्यासाठी स्वामींच्या जिव्हाग्री शारदा देवी, पार्श्वभागी ॠद्धि व सिद्धि आणि अग्रभागी वेदश्रुती या साक्षात आपले वरद हस्त पुढे करून बसल्या आहेत! वा! काय या मठाची योग्यता! हे रम्य स्थळ केवळ प्रतिबदरिकाश्रमच होय. संसारदुःखाने गांजलेले, नाना विपत्तींनी रंजीस आलेले आणि महदपराध करून संतप्त

झालेले पापात्मे यांस या मठात येण्याबरोबर स्वस्थितीचा व स्वकृत कर्मांचा खेद व पश्चात्ताप होऊन म्हणत, ''जळो तो संसार! पुरे ती यातायात! आग लागो त्या धनाला! आता सर्वसंगाचा परित्याग करून या वैराग्यनिधिमठातच निरंतर वास करू.''

दिनचर्येचा पाठ संपल्यावर स्वामींनी त्या दिवशी प्राकृत जनांस बोध केला, तो असा, ''जनहो, सर्वकाळ जागृत रहा; बेसावध राहिला की, तुमचे पाठीशी कामक्रोधादी षड्रिपू खडे उभे आहेत, ते तुम्हांस लाथाडून टाकितील. त्या निष्कलंक, निष्प्रपंच आणि निरपेक्ष परमेश्वराचे ठायी तुम्ही जसा भाव ठेवाल, तसा तो तुम्हांस लाभदाता होईल. हे ध्यानी धरून जी घडी तुमची आहे तीत काही नरजन्माचे सार्थक्य करा. याला उपाय एक हरिकथा. तिची तुम्ही बळकट कास धरा; म्हणजे ती तुम्हास दु:खसमुद्राच्या पैलपार करील. नारायण सर्वसिद्धिफलदाता, अज्ञानच्छेदक आणि अनाथांचे माहेरघर आहे. त्याचे ध्यान, भजन, मनन आणि पूजन करीत जा. ती साजिरी मूर्ती आपल्या हृत्कमलांत अखंड साठवा. सप्तकंचुक प्रचंड ब्रह्मांडाच्या नायकाचा आदिअंत कोणासही लागला नाही. याविषयी साक्षात् वेदश्रुती देखील टेकीस येऊन 'नेति, नेति' म्हणजे 'न कळे, न कळे' असे जनास ओरओरडून सांगत आहेत, तेथे बापड्या अल्पमती मानव प्राण्याचा पाड तो किती? विश्वबीजा, हे दीनबंधो, हे मोक्षध्वजा, असा श्रीशंकराचा अनन्यभावे धावा करीत जा, म्हणजे तो म्लेंच्छादी परधर्मी राजांच्या जाचातून तुम्हास मुक्त करील. तो निष्काम, निष्कर्म आणि निर्विकल्प जगन्निवास केवळ भावाचा भुकेलेला आहे. भक्तिपुरस्सर त्याचे नामस्मरण करा, सर्व भूतांवर यथाशक्ती उपकार करा आणि अंती तत्पदकमली लीन होऊन पंचभौतिक देहाचा त्याग करा. नाही तर,

**जन्मवरी पोट भरिले । देहाचे संरक्षण केले ।।**
**पुढें अवघेंचि व्यर्थ गेले । अंतकाळी ।।** - दासबोध

याप्रमाणे होईल.''

असा शिष्यवर्गास आणि श्रोतृजनांस स्वामींचा सद्बोध चालला आहे आणि ते सर्व जण ब्रह्मानंदात पोहत आहेत. इतक्यात बाहेर घोड्यांच्या खाड् खाड् टापा वाजल्या. राज्यात त्या वेळेस चांगलीशी स्वस्थता नव्हती. स्वार चोहीकडे हिंडत, यामुळे जे तेथे भ्याड होते त्यांची पाचावर धारण

बसली. मठाच्या बाहेर पिंपळाच्या पाराशी गडबड कसली आहे, म्हणून हळूच कानवसा घेतात, तो भालदार नजरेस पडला. बाजीराव मठाच्या दाराबाहेर जोडा काढून आत गेला. त्याच्या पाठीशीच त्याचा हुजऱ्या राणोजी शिंदा होता. तो जोडा सटकन् उचलून पुसून, धोतरात गुंडाळून काखेत मारून मठाच्या दाराशी उभा राहिला. मागून चिमणाजीअप्पा, पुरंदरे, भानू वगैरे मंडळी मठात आली. स्वामीमहाराजांस साष्टांग प्रणिपात करून सर्व खाली बसले. बाजीरावाची नम्रवृत्ती, गुरुनिष्ठा आणि दिव्य मुखश्री पाहून स्वामींस बहुत आनंद झाला. स्वामींची ध्यानमुद्रा आणि मठातला तो पूर्वोक्त वैराग्यजनक देखावा पाहून बाजीरावाच्या पोटात आनंदोर्मी उचंबळू लागल्या. त्या स्थिर झाल्यावर आपल्या गुरुमाउलीस हात जोडून बाजीरावाने विज्ञापना केली, ती येणेप्रमाणे - ''दयानिधे गुरो, छत्रपतींनी कृपाळूपणे मला प्रधानकीची वस्त्रे दिली. तसेच माझ्या हाताखाली अप्पास नायब सरदारी देऊन इतमामाबद्दल त्यास सुपे परगण्याची जहागीर दिली, अंबाजीपंत पुरंदरे यांस दिवाणगिरीची व रामचंद्रपंत भानू यांस फडणिशीची वस्त्रे मिळाली. त्याप्रसंगी यवनांचे पारिपत्य करण्यास्तव मला महाराजांची आज्ञा झाली. मीही बोललो की, हिंदूंचा छल करणारे यांस पादाक्रांत केल्याशिवाय मी विश्रांती घ्यावयाचा नाही. असा मी लहान तोंडी मोठा घास घेतला आहे. माझी योग्यता पाहिली असता कविवर्य कालिदास यांनी म्हटल्याप्रमाणे-

**'तितीर्षुर्दुस्तरं मोहादुडुपेनास्मि सागरम् ।।'**

अशी अल्प आहे. तरी थोरांच्या आश्रयाने लहानाकडूनसुद्धा मोठी कामे होतात. करवंदाएवढी शिशाची गोळी साडेतीन हात देहाचा नाश करिते, हा पराक्रम कोणाचा? तिचा नव्हे, तर नेम मारणाऱ्याचा. तसा हा आपला शिष्य अत्यल्पबल खरा; परंतु कर्तुमकर्तुमन्यथा कर्तुं समर्थ अशी ज्यांची शक्ती त्या पायांचा तो आश्रित आहे. त्यांच्याच प्रसादाने तो लहानाचा थोर झाला आहे, तर पुढेही या दीन दासाचा अभिमान धरून त्याच्या मस्तकी वरद हस्त ठेवून त्याला राज्यकारभारात यश देणे श्रीकडे आहे.''

ही प्रार्थना ऐकून महापुरुषांनी त्यास योग्य उपदेश केला तो आता पुढच्या भागात कथन करू.

♦♦

भाग-१०

# बोधामृतसार

**बा**जीरावाने महापुरुषांची प्रार्थना केली. येथपर्यंत मागच्या भागात कथा झाली. आता स्वामीमहाराजांनी बाजीरावास यथोचित उपदेश केला. तो असा - ''बाजीराव, तुम्ही आता स्वस्थचित्ताने आपला राज्यकारभार पाहावा; तुमचे तीर्थरूप बाळाजीपंत यांस आम्ही राज्यकारणांत जे उपदेश करीत गेलो, ते तुम्ही ऐकिलेच आहेत. तथापि विद्यमान काली तुम्हांस आणखी काही राजनीतीचा मंत्रोपदेश करितो तो लक्षात ठेवा.''

''प्रस्तुतकाली सुदैवाने तुम्हांस शाहूराजा हा एक शांत, सहिष्णू, सुशील, दानशूर आणि वेदधर्मपरायण असा प्रभू मिळाला आहे. त्याचा सन्मान राखून त्याची प्रीती संपादन करा. आता तुम्हांस त्याजकडून जी प्रधानकीची वस्त्रे मिळाली ती वस्त्रे नव्हेत, तर म्लेंच्छांपासून पुनरपि हिंदू प्रजेस बहुत पीडा होऊ लागली आहे, तसे न होता तिचा यथान्याय प्रतिपाल करून म्लेंछांचा नाश करण्यास्तव राजाने सर्वांच्या समक्ष ते तुमच्या हाती वीरकंकणच बांधिले असे समजा. अप्पा, पुरंदरे, भानू वगैरे मंडळी तुमचे साहाय्य करतीलच. हा तुम्हांपाशी राणू शिंदा हुजऱ्या आहे. तो मोठा हुशार, चाणाक्ष आणि स्वामीसेवेत तत्पर दिसतो. अशी गुणी माणसे असतील त्यांची पारख करून, संग्रही ठेवून, त्यांस उदयास आणा. द्रव्यार्थ प्रजेस पीडा देऊ नका. फौजफाटा चांगला तयार लेश तयार ठेवून, त्यास राजी राखून, परचक्रावर स्वाऱ्या करून स्वराज्याचा विस्तार वाढवा. रामदासस्वामींचे व आमचे विचार एकच आहेत. सबब त्यांनी शिवाजीराजास व इतर जनांस

राजधर्म व प्रजाधर्म यांजवर जे उपदेश केले त्यांचे सार काढून आम्ही 'बोधामृतसार' या नावाचे पुस्तक तयार केले आहे. हे तुम्ही नेहमी वाचीत जावे, म्हणजे तुमचे व स्वराज्याचे कल्याण होऊन तुमची बहुमुखी कीर्ती होईल. संकटकाली सर्व वर्तमान इकडे पत्राद्वारे कळवीत जावे आणि इकडून तुम्हांस आज्ञा होईल त्याप्रमाणे वर्तन ठेवावे म्हणजे जगन्निवास प्रभू तुमचे सर्व मनोरथ पूर्ण करून तुम्हांस अवघ्या कामात यश देईल.''

असे भाषण करून स्वामींनी सदरहू 'बोधामृतसार' पुस्तकांतून काही भाग वाचून दाखविला. तो येणेप्रमाणे-

**जन्मा आलियाचें फळ । कांही करावें सफळ ।।**
**ऐसें न करितां निष्फळ । भूमिभार होय ।।१।।**
**हें कांहींच न धरी जो मनी । तो मृतप्राय वर्ते जनीं ।।**
**जन्मासि येऊनि तेणें जननी । वायांच कष्टविली ।।२।।**
**आपकार्याहूनि जीवीं । परकार्यसिद्धी करावी ।।**
**मरून कीर्ति उरवावी । तो सत्वगुण ।।३।।**
**मित्रपणें परहितकारी । वाङ्माधुर्ये परशोकापहारी ।।**
**सामर्थ्यपणें परवेत्रधारी । पुरुषार्थे जगमित्र ।।४।।**
**जीवनाचें झालें अन्न । अन्नाचें झालें वमन ।।**
**परी वमनाचें भोजन । करितां नये ।।५।।**
**तैसे निंद्य सोडून द्यावे । वंद्य ते हृदयी धरावे ।।**
**सत्कीर्तीने भरावें । भूमंडल ।।६।।**
**उंदड स्थळी उदंड प्रसंग । जाणोनि करणे यथासांग ।।**
**प्राणिमात्राचें अंतरंग । होऊन जावें ।।७।।**
**पोटीं चिंता धरूं नये । कष्टें खेद मानूं नये ।।**
**समयीं धीर सोडूं नये । कांहीं केल्या ।।८।।**
**अतिवाद करूं नये । अनीति पोटीं धरूं नये ।।**
**रागें भरीं भरों नये । भलतीकडे ।।९।।**
**कठिण शब्द बोलूं नये । कठिण आज्ञा करूं नये ।।**
**कठिणता धरूं नये । कोणेविषयीं ।।१०।।**
**थोरपणें चुकूं नये । न्याय नीति सोडूं नये ।।**
**अप्रमाण वर्तो नये । कांहीं केल्या ।।११।।**

चातुर्यें शृंगारे अंतर । वस्त्रें शृंगारे शरीर ।।
दोहोंमध्ये कोण सार । बरें पहा ।।१२।।
बाह्यात्कारें शृंगारिलें । तेणें लोकांहातीं काय आलें ।।
चातुर्यें बहुतां संरक्षिलें । नानापरी ।।१३।।
जो दुसऱ्याचें अंतर जाणे । देशकाल प्रसंग जाणे ।।
तया पुरुषा काय उणे । भूमंडळीं ।।१४।।
श्रेष्ठ कार्य करी तो श्रेष्ठ । कृत्रिम करी तो कनिष्ठ ।।
कर्मानुसार प्राणि नष्ट । अथवा भले ।।१५।।
धक्कें चपेटे सोसावे । नीच शब्द सोशित जावे ।।
पस्तावोन परावे । आपले होती ।।१६।।
व्याघ्र सिंह भयानक । देखोनि भयचकित होती लोक ।।
परी त्यांचीं पिलें निःशंक । तयांपुढें खेळती ।।१७।।
कांहीं मेळवी मग जेवी । गुंतल्या लोकांस उगवी ।।
शरीर कारणीं लावी । कांहींतरी ।।१८।।
मैत्री करितां होतें कृत्य । वैर करितां होतो मृत्य ।।
बोलिलों हें सत्य कीं असत्य । ओळखावें ।।१९।।
जे सत्कीर्तीचे पुरुष । ते परमेश्वराचे अंश ।।
धर्मस्थापनेचा हव्यास । तेथेंचि वसे ।।२०।।
एक भरें एक रितें । रितें मागुतें भरतें ।।
भरतें तेंही रितें होतें । काळांतरी ।।२१।।
शुद्ध सोनें पाहोनि घ्यावे । कशीं लावूनि तावावें ।।
श्रवणें मननें जाणावें । प्रत्ययासी ।।२२।।
आधीं कष्टाचे दुःख सोशिती । ते सुखाचें फळ भोगिती ।।
आधीं आळसें सुखावती । त्यांसी पुढें दुःख ।।२३।।
बहुत लोक मिळवावे । एकविचारें भरावे ।।
कष्ट करूनि घसरावें । म्लेंच्छांवरी ।।२४।।
राज्यामध्यें सकळ लोक । सलगी देऊनि करावे साक ।।
लोकांचे मनां धाक । उपजोंची नये ।।२५।।
आहे तितकें जतन करावें । पुढें आणीक मिळवावें ।।
महाराष्ट्र राज्य करावें । जिकडे तिकडे ।।२६।।

**अहंमती लोकीं धरावी । हिंमतीची तरवार करावी ।।**
**चढती बढती पदवी । पावाल येणें ।।२७।।**
**शिवराजास आठवावें । जीवित्व तृणवत मानावें ।।**
**इहलोकीं परलोकीं तरावें । कीर्तिरूपें ।।२८।।**

हा समर्थ रामदासस्वामींचा उपदेश किती रसाळ आणि समयोचित आहे आणि हे महापुरुषांचे भाषण श्रोत्यांच्या मनास किती मधुर आणि पान्हा फुटविणारे आहे हे सांगायास नकोच. या दोघां सत्पुरुषांची प्रतिमा एकच होय. थोरांच्या अंत:करणाचे एकमेकांशी कसे सादृश्य असते पाहा! असो. स्वामींनी दिलेले पुस्तक व वरदोक्ती यांचे ग्रहण करून बाजीराव मंडळीसह आज्ञा घेऊन निघून गेला.

हे समर्थांसारखे महापुरुष प्रत्यक्ष पाहून व त्यांनी केलेली संभाषणे आणि उपदेश ऐकून अंगी थोडा तरी स्वदेशाभिमानाचा संचार होणार नाही, असा अरसिक पुरुष या नरकोटींत कोणी सापडेल का? कारण रसिकाच्या अंत:करणांत अशा अप्रतिम मूर्ती पाहून व त्यांचे उपदेश श्रवण करून वीररसानंदाची स्फूर्ती झाल्याविना राहावयाचीच नाही. स्वदेशाचा जीर्णोद्धार करणाऱ्या या राजर्षींचे ज्यांस दर्शन घडले असेल ते किती धन्य आणि किती भाग्यवान बरे! मानवसमुद्राच्या पोटी अनेक रत्ने पिकतात; पण अशा सन्मण्याचा लाभ होण्यास प्रजेचेच महद्भाग्य पाहिजे. असो.

पुढे बाजीराव व चिमाजीअप्पा हे स्वामींस स्वारीतून हमेशा पत्र लिहीत, तेही त्यांजकडे उत्तरे पाठवीत. ते अस्सल कागदपत्र अद्यापि धावडशीकर संस्थानिक यांच्या घरी आहेत. त्यातून मासल्याकरिता एक दोन उतारे येथे देतो. ही पत्रे बाजीरावाने संकटात असताना इ.स. १७३६ व १७३९ यावर्षी लिहिली होती.

''हल्लीं मी बहुतांचा देणेदार होऊन माझी कुतरओढ झाली आहे. ही मला नरकयातनाशी वाटते आणि सावकार व शिलेदार यांच्या पायां पडतां पडतां माझ्या कपाळाचें कातडें गेलें.''

हे पत्र, बाजीरावास फौज फार ठेवावी लागली आणि तो शिपायांस पगारही चांगला देत असे, यामुळे लक्षावधी रुपये कर्ज होऊन त्यास सावकारलोक मनस्वी टोचू लागले, तेव्हा लिहिले होते.

आणखी एक पत्र, स्वराज्यात, सेनासाहेब सुभा रघुजी भोसला व

प्रतिनिधी श्रीपतराव हे दोघे त्याचे न्यून पाहत होते, ते त्याची उचलबांगडी करण्यास टपले होते आणि बाजीरावाचे सारे लक्ष मोगलांच्या पारिपत्याकडे लागले होते, अशी त्यांच्या मनाची ओढाताण चालली असता मोठ्या उदासीनतेने लिहिले होते ते येणेप्रमाणे-

''आमचेच लोक आम्हांस हितशत्रू होऊन पाण्यात पाहतात. त्यामुळें मी दु:खसागरांत बुडालों आहें. आगींत तेल ओतावें याप्रमाणें मला आणखी कर्जानें ग्रासिलें आहे. मला आतां कशाचीही आस्था नाहीं. महाराज, या संकटीं मला काहीं तरुणोपाय सांगा. अशा कचाटींत राहून जगण्यापेक्षां हा आपला शिष्य विष खाऊन मरण्यास तयार आहे. या वेळेस मरण येईल तर फार बरें ''

यावरून -

**ज्याचे अंगीं मोठेपण । तया यातना कठीण ।।१।।**

**ऐरावत रत्न थोर । त्यासी अंकुशाचा मार ।।२।।**

हा तुकोबारायाचा अभंग अगदी यथार्थ आहे, असे वाटल्यावाचून राहत नाही.

या महापुरुषाला बाजीराव आपल्या मनातल्या अंत:स्थ व नाजूक गोष्टी निष्कपट वृत्तीने कळवी. चिमणाजी अप्पाही तसेच करी, सारांश, स्वामींच्या ठिकाणी ते दोघेही बंधू किती मोकळ्या मनाने वागत आणि त्यांजवर त्यांची भक्ती, निष्ठा व भरवसा किती होता, हे या पत्रांवरून स्पष्ट होते. कप्तान ग्रांट डफ साहेब मराठ्यांच्या इतिहासात म्हणतात की, ''अशी पुष्कळ अस्सल पत्रे मी पाहिली. ती फार मनोरंजक आणि बहुमोल आहेत. कांहीचे तरजुमे मात्र मला मिळाले. अस्सल कागदांच्या नकला धावडशीकर लोकांनी मला दिल्या नाहीत.''

हे सारे कागदपत्र गोळा करून त्यांचे एक पुस्तक करून छापवून, राखून ठेवण्याचे श्रेय कोणी एखादा स्वदेशभक्त घेईल तर त्याचे लोकांवर बहुत बहुत उपकार होतील.

आता इ.स. १७२१ मध्ये हिंदुस्थानात राजकीय स्थिती कशी होती तिचे निरूपण पुढील भागात कथन करू.

♦♦

भाग-११

# देशस्थिती

**इ.** स. १७२१ मध्ये बाजीराव पेशवा झाला त्यावेळी मराठ्यांचे बहुतेक सरदार एकचित्त झाले होते; पण राजघराण्यांत सातारा आणि कोल्हापूर अशी दुफळी होती. यामुळे काही शाहूराजाकडे काही संभाजीकडे अशी फुटाफूट झाली होती. बाळाजी विश्वनाथ याने दिल्लीपर्यंत आपली छाप बसवून स्वराज्य नावारूपास बरेच आणिले होते.

हिंदुस्थान हे संपत्तीचे केवळ माहेरघर आहे, अशी कीर्ती ऐकून हजार-बाराशे वर्षांपासून अरबस्थान, अफगाणिस्थान, तार्तरी, इराण वगैरे प्रदेशांकडून मुसलमानांचे जणू पेव फुटले होते. पश्चिमेकडून व उत्तरेकडून त्यांच्या झुंडीच्या झुंडी दिन् दिन् करीत हिंदुस्थानात शिरल्या. त्यांनी दिल्लीस बादशाही तख्त स्थापिले आणि आपले पोतडे भरण्यासाठी हळूहळू सर्व हिंदुस्थानभर त्यांनी सर्व प्रकारची धामधूम चालविली. असे होता होता इ.स. १७२१ मध्ये दिल्ली दरबारची स्थिती कोणत्या स्तरास जाऊन पोंहोचली होती ते पुढे लवकरच समजेल.

हिंदुस्थानात सोन्याचा धूर निघत असतो, अशी बातमी युरोपखंडातही पोहोचली. प्रथम पोर्तुगीज लोक साहस करून इकडे आले. ते व्यापार करता करता पुढे राजकारणातही शिरले. त्यांनी बराच मुलूख काबीज केला आणि काही कुरापती काढून एतद्देशीय राजांबरोबर युद्ध करू लागले. इ.स. १७२१ मध्ये मराठ्यांचे ते एक शत्रू होते. पोर्तुगीज लोकांची बढती पाहून तिकडच्या दुसऱ्या साहसी लोकांच्या तोंडास पाणी सुटले. क्रमाक्रमाने डच,

फ्रेंच आणि इंग्लिश हे हिंदुस्थानातले सोने, रुपे, हिरे, माणके व मोती गोळा करण्यासाठी धापा देत आले. टोपीवाल्यांचे समुद्रकाठी कडेंच्या कडे पडले. प्रथम एतद्देशीय राजांकडून थोडीशी उतरावयापुरती जागा मागून घेऊन दमण, दीव, गोवे, मुंबई, खंबायत, पाँडिचरी, सुरत, राजापूर, साष्टी, वेंगुर्ले, चौल, कालिकोट इत्यादी स्थळी त्यांनी व्यापाराची दुकाने थाटली. मग 'भटाला दिली ओसरी आणि भट पाय पसरी' असा त्यांनी हळूहळू क्रम आरंभिला. इ.स. १७२१ पर्यंत फ्रेंच व इंग्लिश यांनी मौन मुद्रा धारण केली होती. हातात तागडी घेऊन कोणाचे किती वजन आहे ते तोलीत बसले होते. पुढे योग्य संधी मिळताच हातातली तागडी टाकून ते एतद्देशीयांच्या राजकारणात शिरले.

इकडे मुसलमानांच्या राज्याची स्थिती कशी झाली होती ती आता सांगतो. औरंगजेबाच्या मरणापर्यंत दिल्ली दरबाराची जेमतेम चढती कमान होती. त्याच्या मागे बादशाही तक्ताबद्दल आपापसांत भांडणे लागून राज्यास उतरती कळा लागली. इ.स. १७२१ मध्ये दिल्लीस महंमदशाहा बादशहा तख्ताधिपति होता. 'बादशहा' 'राजा' या शब्दाचा दुसरा अर्थ करितात त्या मासल्याचा हा महंमदशहा होता. त्याच्या दुर्वर्तनाने मुसलमानी राज्याचा लय होत चालला आणि मराठ्यांचा उत्कर्ष होत चालला. राजेलोक ऐषआरामी झाले म्हणजे त्यांच्यावर अवदशेचा फेरा आलाच असे समजावे. अशा प्रसंगी त्यांच्या जवळ प्रधानमंडळ तरी चांगले हुशार व इमानी असावे लागते; पण तेथे मग चांगल्याची बूज नसते, यामुळे सगळी बलबलपुरी होऊन जाते. त्यासमयी औरंगजेबाच्या तालिमेत तयार झालेला एक मुत्सद्दी मुसलमान सरदार होता. तो मात्र मराठ्यांच्या पराक्रमाच्या आड येई. तो नसता तर मुसलमानी राज्य रसातळास जाऊन सर्व हिंदुस्थानभर मराठ्यांचे एकछत्री राज्य झाले असते. तो पुरुष कोणता हे सांगण्यापूर्वी महंमदशाहाची कारकीर्द दिल्लीस कशी चालत होती ती प्रथमतः सांगू.

महंमदशाहा बादशाहा सर्वकाल ऐषआरामात धुंद असे. सगळा राज्यकारभार, अप्रतिष्ठित, चैनी, पाजी, हलके व व्यसनी अशा मनुष्यांच्या हाती असे. त्यांचा अवघा वेळ खुशमस्करीत जाई. कोणाची काही तरी कुचेष्टा करावी आणि बादशाहास रमवावे, हेच आपले कर्तव्य कर्म असे ते समजत. दरबारी लोक नाच, रंग, तमाशे यात गुंग होते. हुक्का, चिलीम, नेचे,

मोतियाचे गजरे, गुडकू, याकूती, माजूम अलेकम-सलाम या पोकळ डामडौलात ते गर्क झालेले. एका रमणीने बादशाहास इतके ग्रासिले होते की, दरबारचा शिक्कामोर्तब तिच्या स्वाधीन असून, ती मन मानेल त्यास भराभर सनदा करून देई. लष्कराचा बंदोबस्त बिघडून गेला. कामगिरी केली नसून जहागिरीच्या सनदा आणि अपराध नसून फाशीच्या शिक्षा होऊ लागल्या. राज्यात चोहीकडे बंडाळी माजली. ज्याच्याजवळ घोडा व बंदूक त्याने खुशाल गरिबांच्या मुस्कटात मारावे, लुटावे, खावे आणि कुबेर व्हावे. राज्याचा वसूल बादशाही खर्चास पुरेनासा झाला. कर्जाचा बोजा वाढत चालला. पैक्याची तूट भरून येण्यासाठी प्रजेवर नवीन कर बसले, लोकांच्या कामाचे वर्षोवर्ष निकाल लागतना. अशी बेबंदपाच्छाई झाली. जसा एखादा उंच जुना झालेला राजवाडा बाहेरून सुरेख दिसतो; परंतु त्याला दागदुजी करून उपयोग नसतो, का की, तो जीर्णावस्थेने अल्पकालांत धबालदिशी जमीनदोस्त व्हावयाच्या बेतात आलेला असतो. तसे दिल्लीचे राज्य त्या वेळेस बलहीन आणि बेताल झाले होते. ते मराठ्यांच्या हस्तगत पूर्वीच झाले असते; परंतु वर सांगितल्याप्रमाणे मुसलमानांत निजाम उल्मुलूक नामेकरून एक पोक्त, वजनदार व शूर सरदार होता. तो स्वार्थ साधून नामधारी बादशाहास स्वजात्यभिमानास्तव आपल्या बुद्धिबलाचा आणि बाहुबलाचा वरचेवर नेटावा देई. हीच मराठी राज्याच्या विस्तारास आडकाठी झाली होती. इ.स. १७२१ मध्ये मराठ्यांस मोठा जबरदस्त प्रतिपक्षी काय तो निजाम उल्मुलूकच होता; सबब त्याची थोडी परिनालिका आणि बलाबल येथे सांगणे अवश्य आहे.

प्रस्तुत ज्याला हैदराबाद सरकार किंवा निजामाचे राज्य असे म्हणतात त्याचा हा मूळपुरुष. निजाम उल्मुलूकाचे मूळचे नांव मीर कमरुद्दीन ऊर्फ चिनकुलिचखान. तो इ.स. १६४४ मध्ये जन्मला. तो मोठा धूर्त, अभिमानी, मसलती, शूर, खंवट, महत्त्वाकांक्षी आणि तिरसट असे. औरंगजेबाच्या लष्करात वाढत वाढत तो मोठ्या योग्यतेस चढला होता. त्याजवर बादशाहाची कृपा असे. त्याने त्यास पाच हजार स्वारांची मनसब देऊन विजापूरच्या सुभेदारीचे जागेवर नेमिले होते. औरंगजेबाचा अवतार संपल्यावर फरुक्शेर बादशाहाने त्यास आपली वजिरी दिली आणि 'निजाम उल्मुलूक' असा त्याला नवा किताब दिला. या शब्दाचा 'उत्तम राज्यव्यवस्था करणारा' असा

अर्थ होतो. तो मग मावळ्याचा सुभेदार झाला. त्याच्या जवळ बारा हजार जंगी फौज होती आणि 'आसिफजा' हा नवा किताब आपल्या नावास जोडून दक्षिण प्रांत जिंकून स्वतंत्र होण्याची त्याने इच्छा धरिली. आज अशीरगड हस्तगत केला, उद्या बऱ्हाणपूर घेतले, परवा खान्देशसुभा पटकावला, असे त्याचे उत्तरोत्तर दक्षिणेकडे पुढे पुढे पाऊल पडत चालले. त्यासमयी त्याच्या सुदैवाने म्हणा किंवा हिंदूंच्या दुर्दैवाने म्हणा, चंद्रसेन जाधव, निंबाळकर, राव रंभा सर्जेराव घाटगे इत्यादी कित्येक निमकहराम मराठे सरदार स्वदेशाभिमान, स्वजात्यभिमान आणि स्वराजनिष्ठा टाकून आपले सैन्य घेऊन त्या परधर्मी आणि परकीय सरदारास जाऊन मिळाले. तेणेकरून निजामसाहेबांचे प्रस्थ वाढत चालले. तो पराक्रमी सरदार आहे अशी त्याची ख्याती होत चालली. त्याची आणि दिलावर अल्लीखानची बऱ्हाणपुराजवळ लढाई झाली. तीत दिलावर अल्लीखान गतप्राण झाला. तसेच औरंगाबादेस अलम अल्लीखान नामे सय्यद बंधूंचा एक अधिकारी होता, त्याचे व याचे वऱ्हाडात पैनघाटानजीक बाळापुराजवळ तुमुल युद्ध झाले. त्यात खानाचा पराभव होऊन तो मारला गेला. दिल्लीत दोन बलवान सय्यद बंधू होते, ते महंमदशाहाच्या डोळ्यात रेतीच्या कणासारखे सलत होते. त्यास निजामाने मारेकऱ्यांकरवी मारून टाकिले. मग त्याचा सर्व राज्यकारभार एकमुखी व एकहाती झाला. या कामगिरीने बादशाहाजवळ त्याची प्रतिष्ठा वाढली. त्याला हुजूरवजिरीची वस्त्रे मिळून तो ते काम पाहत असता एकदा बोलता बोलता एका खुशमस्कऱ्याने त्याची थट्टा करून बादशाहास हसविले. तो निजाम मोठा मानी, औरंगजेबाच्या वेळचा मुत्सद्दी, पोक्त, सभ्य, प्रौढबुद्धीचा आणि रागीट होता. त्याला तो अपमान सहन झाला नाही. बादशाहाचे पोरकट चाळे पाहून दरबारच्या कामातून त्याचे मन उडाले. मग तो वजिरीचे काम तात्काळ सोडून वकील मुतलख् हा दुसरा अधिकार पत्करून तेथे राहिला. त्याही कामात त्रासून, काही निमित्त करून तो इ.स. १७२३ मध्ये दक्षिणेकडे निघाला. तिकडे हैदराबादेस मवारीजखान नामे सुभेदार होता, तो बादशाहाचे गुप्त आज्ञेवरून निजामाबरोबर लढाईस उभा राहिला. त्याचे व याचे शक्करखेड्याजवळ इ.स. १७२४ मध्ये घनघोर युद्ध झाले. त्यात मवारीजखान आपल्या दोन पुत्रांसहित पतन पावला. याप्रमाणे हैदराबाद सुभा निजामास सहज प्राप्त झाला आणि

तेव्हापासून तेच त्याने आपले राहण्याचे ठिकाण कायम केले.

त्याच्या पदरी जय्यत फौज होती. तीत उत्तरेकडचे धट्टेकट्टे धिप्पाड शिपाई भरले होते. ते अंगात लोखंडाची जड चिलखते घालीत. त्यांच्या पुढे दक्षिणी लोक सुकुमार दिसत. स्वारांचे घोडे उंच आणि धष्टपुष्ट असत. शिपायांपाशी चापाच्या आणि तोड्याच्या बंदुका असत. त्यात उत्तम तिरंदाजी करणारेही पुष्कळ होते. लहान-मोठ्या तोफा पुष्कळ असून त्यांजवरचे गोलंदाज आपल्या कामात तरबेज होते. ओझी वाहणारे व लढाऊ हत्ती त्याच्या फौजेबरोबर बहुत असत. असा त्याचा जंगी सरंजाम होता. त्याचे सरदार हिंमतबहादर होते. तो जातीने मोठा धिप्पाड व तेजस्वी पुरुष होता; त्याच्या विवाहित स्त्रिया पाच-सहा असून शिवाय जनानखान्यात कित्येक उपस्त्रिया होत्या त्या निराळ्याच. गाजिउद्दीन, नासिरजंग, सलाबतजंग, निजामअल्ली, सरीफ आणि मीरमोगल असे त्याला सहा पुत्र होते. औरस कन्याही काही होत्या. हल्ली हैदराबादच्या राज्याचे क्षेत्रफळ सुमारे एक लाख औरस चौरस मैल आणि वसूल तीन कोटींच्या जवळ आहे.

इ.स. १७२१ मध्ये बाजीरावाने मराठी राज्याची लगाम आपल्या हाती धरिली. त्यासमयी हिंदुस्थानची राजकीय स्थिती अशा प्रकारची होती. यावरून वाचकांच्या लक्षात येईलच की, निजाम उल्मुलूक हा एक बाजीरावास बलाढ्य शत्रू होता. हे दोघे योद्धे दंड ठोकून रणांगणावर उभे राहिले, तेव्हा बाजीराव २५ वर्षांचा उमेदवार असून, निजाम साहेब त्याच्या तिप्पट वयाचा म्हणजे ७६ वर्षांचा म्हातारा होता. तरी त्या उतारवयातसुद्धा त्याचे बुद्धिचातुर्य आणि अंगचापल्य कायम होते. त्यांची हयातदेखील साधारण आयुर्मानाच्या बाहेर गेली होती. म्हणजे तो मेला त्या वेळेस त्याची उमर १०४ वर्षांची होती, असे इतिहासकारांनी लिहिले आहे. या दोघांची वये आणि करामतीकडे पाहिले तर अलीकडच्या काळी हे लहानसे द्रोणार्जुनच होऊन गेले, असे म्हटले पाहिजे.

♦♦

भाग-१२

# माळवा प्रांतावर स्वारी

राजाज्ञा घेऊन बाजीरावाने इ.स. १७२१ मध्ये पुणे हे आपले राहण्याचे ठिकाण केले. त्याने आपल्या कुटुंबाची माणसे सासवडाहून येथे आणून ठेविली. बापूजी श्रीपत या नावाचा पुरंदर किल्ल्याचा अधिकारी होता, त्यास पुण्याची सुभेदारी दिली. तो मोठा चतुर पुरुष होता. त्याच्या हाताखाली रंभाजी जाधवराव म्हणून एक हुशार मराठा होता त्यास नेमिले. त्यासमयी पुणे हे अगदी लहान गाव होते. त्याचे शहर बनविण्याचे काम त्याजकडे सांगितले. व्यापारी, वाणी, उदमी आणून त्यांस कौल देऊन, तेथे वस्ती वाढविण्याचे काम झपाट्याने चालविले. इ.स. १७२१ मध्ये प्रथम भुजंगशेट राशनकर, दुर्गाप्पा अथळकर व बाळाप्पा नद्वे यांजकडून दुकाने घालविली. त्यांचा कित्ता पाहून पुष्कळ नवे व्यापारी भराभर येऊन राहू लागले.

बाजीराव पेशवा झाल्यावर खान्देशातून मोकासदारांची पत्रावर पत्रे येऊ लागली की, ''सरकारचे मोकासबाबीचे वगैरे हक्क, मोगलांचे अधिकारी, बिनहरकत व सुरळीत वसूल होऊ देत नाहीत, तर याविषयी जशी आज्ञा होईल, तसे करीत असो.'' मग प्रथमची स्वारी त्याने खान्देशावरच करण्याचा बेत केला. फौज, दारू, गोळा, हत्यार, पैसा यांची सिद्धता करून, दसऱ्याच्या मुहूर्ताने तो पुण्याहून निघाला. त्यासमयी, काशीबाई चार महिन्यांची गरोदर होती. तिला पुढे प्रथमच पुत्र झाला. त्याला त्याचे आज्याचे म्हणजे बाळाजीपंत असे नाव ठेविले. तोच मुलगा पुढे बाळाजी

बाजीराव ऊर्फ नानासाहेब पेशवा या नावाने प्रसिद्ध झाला.

जामानिमा करून स्वारीवर जाताना बाजीराव व अप्पा हे आपल्या मातुश्रीच्या पायावर डोई ठेवण्यास आले. तेव्हा त्या वीरमातेने दोघास जवळ बसवून पाठीवर हात फिरवून त्यांच्या हाती तहानलाडू भूकलाडू दिले. ते नेहमीचे दळ्याबेसनाचे लाडू नव्हते, तर ते निराळ्याच प्रकारचे होते. राधाबाई म्हणाली, ''अण्णा, अप्पा तुमचे शिपाई, चाकर माणसे यांना जेवणखाण व औषधपाणी मिळाले किंवा नाही हे आधी पाहून, त्यांचा समाचार घेऊन, मग तुम्ही जेवा. प्रवासात आपल्या प्रकृतीस जपा. पूर्वी मिळविलेला नावलौकिक संभाळून त्यात आणखी भर घाला. महापुरुषांची आठवण ठेवा आणि रामलक्ष्मणाप्रमाणे एकविचाराने राहा, म्हणजे श्रीजोगेश्वरी आईच्या कृपेने तुम्ही यशस्वी व्हाल. सुखरूपतेची स्वारीतून नेहमी पत्रे पाठवीत जा.'' ही मातुश्रीची आज्ञा शिरसावंद्य करून व तिचे आशीर्वाद घेऊन ते स्वारीस निघाले.

वाटेत जेथे तेथे मोगलांचे अधिकारी हरकत करीत; परंतु त्यांना न जुमानिता बाजीराव आपले हक्क, बेधडक वसूल करीत चालला. त्यासमयी त्याच्या मनात येऊन चुकले की, माळवा प्रांत अगोदर हस्तगत करून नंतर मराठ्यांचे राज्य हिंदुस्थानांत आस्ते आस्ते वाढवीत न्यावे; परंतु त्यास प्रतिवर्षी साताऱ्यास माघारे यावे लागे. या अडचणीमुळे त्याचा तो मनसुबा पुढे बरीच वर्षेपर्यंत सिद्धीस गेला नाही. साताऱ्यास यावे लागे याचे कारण असे - राजापाशी साताऱ्यास श्रीपतराव प्रतिनिधी असे. तो मोठा बुद्धिमान यजुर्वेदी ब्राह्मण होता. बाजीरावही मोठा शहाणा, धूर्त व शूर पुरुष होता; पण तो कोकणस्थ ब्राह्मण होता. यामुळे प्रतिनिधी त्याचा मत्सर करी. कोकणस्थांचे प्राबल्य वाढू दिले तर यजुर्वेदी मागे पडतील, अशा भीतीने राजाचे मन वळवून प्रतिनिधी त्याच्या इच्छेच्या आड येई. त्या दोघांमध्ये आपसात वैरभाव उत्पन्न होण्यास हेच मूळ कारण झाले. ही मात्सर्यबुद्धी स्वराज्याच्या हानीस मूळ होईल असे श्रीपतराव प्रतिनिधीसारख्या हुशार मुत्सद्याचे लक्षात आले नाही, ही मोठी दु:खाची व दिलगिरीची गोष्ट झाली. असो.

इ.स. १७२४ पर्यंत बाजीरावाने खान्देशात एकंदर तीन स्वाऱ्या केल्या. माळव्याकडेही काही फौज पाठवून मोगलांचा प्रांत त्याने बराच उद्ध्वस्त

केला. मोगलाचा बऱ्हाणपूर येथील सुभेदार अजीमुउल्लाखान याचा दाउदखान सरदार हा फौज घेऊन कित्येक वेळा त्याजवर चालून आला. त्याचा पूर्ण पराभव करून बाजीरावाने त्यास त्राहि त्राहि करून सोडले. एका लढाईमध्ये बाजीरावाकडच्या दोघा मराठ्यांनी मोठा पराक्रम करून शौर्याची पराकाष्ठा केली. ते दोघे सरदार राणोजीराव शिंदे व मल्हारराव होळकर हे होत. त्याचप्रमाणे उदाजीराव पवारही फौज घेऊन मोगलाच्या मुलुखात शिरला, तेव्हा त्यास भिऊन मुसलमान लोक पिशाचासारिखे सैरावैरा पळत सुटले.

या प्रकारे या तिघा सरदारांची मर्दुमकी पाहून बाजीराव खुश झाला. त्याने त्यास पुढे मोठ्या योग्यतेस चढविले. त्याची विशेषकरून होळकर व शिंदे यांजवर पूर्ण कृपा असे व ते त्याच्या कृपादानास खरोखर सत्पात्र होते असे पुढील वृत्तांतावरून दिसून येईल. आता या तिघा सरदारांचे येथे संकलित कुलवृत्त दिले असता अप्रासंगिक होणार नाही, म्हणून ते येथे देतो.

माळव्यात प्रस्तुत होळकरांचे ७० लक्षांचे राज्य आहे. त्याचा मल्हारराव हा मूळपुरुष आणि इंदूर ही त्यांची मुख्य राजधानी. होळकरांच्या राज्याचे क्षेत्रफळ सुमारे ८,५०० चौरस मैल आहे. होळकर या शब्दांतील होळ या नावाचा एक गाव पुणे जिल्ह्यात निरेच्या काठी आहे. त्या गावी मल्हाररावाचा बाप चौगुला होता व तो तेथील राहणारा म्हणून त्यास 'होळकर' असे म्हणत. तो जातीचा धनगर. त्याला इ.स. १६९३ मध्ये मुलगा झाला. त्याचे त्याने मल्हारी असे नाव ठेविले. मल्हारी लहान असताच त्याचा बाप वारला, म्हणून त्याचा मामा त्याला खान्देशात आपल्या घरी घेऊन गेला. तेव्हा तो पाच वर्षांचा अज्ञान मूल होता. धनगरांच्या चालीप्रमाणे त्याने आपल्या घरी भाच्याला मेंढरे वळावयास लाविले. एका बखरीत असे लिहिले आहे की, मल्हारी एक दिवस आपल्या मेंढ्या चारणीस सोडून एका झाडाखाली हुशहुश करीत उताणा पडला असता, तेथे त्याचा जरा डोळा लागला. त्यासमयी एका मोठ्या नागाने त्याच्या मस्तकावर आपली फडा धरिली. हे एक महत्पदप्राप्तीचे सूचक चिन्ह होय, असे हिंदू लोक मानितात. असो. तो मल्हारी थोडासा मोठा झाल्यावर त्याला ते मेंढरे वळायाचे बुळके काम आवडेनासे झाले. मग तेथून जवळच नंदुरबार गावी सेनापती दाभाड्याचा सरदार कंठाजीराव कदम बांडे राहत असे; त्याच्या लष्करात त्याने प्रथम

शिपायाची नोकरी पत्करिली. पुढे लवकरच सेनापती दाभाडा कदमास घेऊन सैन्यासह गुजराथेवर उतरला. तेव्हा हा मल्हारी २५ स्वारांवरचा जमादार झाला होता. कर्मधर्मसंयोगाने त्यास संधीस बाजीराव पेशव्याची फौज माळव्यावर चालली होती. त्या दोन्ही लष्करांतील शिपायांमध्ये काही कारणाने तापीच्या काठी मोठी कलागत झाली. तिचे निवारण पुढे सरून मल्हारी जमादाराने मोठ्या चातुर्याने आणि शिताफीने केले. हे त्याचे चातुर्य बाजीराव पेशवे याचे कानी गेले. तेव्हा असा उमदा चतुर शिपाई आपल्या पदरी असावा, असे त्यास वाटून कदमाकडून मल्हारी होळकर यास त्याने मागून घेतले. तेव्हांपासून तो पेशव्यांचा अंकित झाला. त्याच्या गुणांवरून तो पुढे लवकरच पेशव्यांच्या लष्करात ५०० भालाईत स्वारांवरचा सरदार झाला. बाजीरावाचे व त्याचे बहुधा वय सारखेच होते. त्याच्या पदरी होळकर राहिला तेव्हा तो सुमारे ३०-३२ वर्षांचा तरणाबांड उमेदवार शिपाई होता. या प्रकारेकरून जो मल्या धनगर प्रथम मामाच्या घरी तुकडा खाऊन मेंढरे वळीत होता, तो पुढे मल्हारराव होळकर या नामेकरून मोठा विख्यात सरदार बनला. पाहा नशिबाची सलाबत कशी आहे!

उत्तर हिंदुस्थानात शिंद्याचे राज्य आहे. त्याचे क्षेत्रफळ सुमारे २५,००० चौरस मैल व वसूल दीड कोटीच्या जवळ जवळ आहे. त्याची ग्वालेर ही मुख्य राजधानी. या घराण्याचा राणोजीराव हा मूळ पुरुष होय. त्याचे मूळ राहण्याचे ठिकाण कण्हेरखेड. ते साताऱ्यापासून ६ कोसांवर कोरेगाव तालुक्यात आहे. त्या गावची पाटीलकी अद्याप शिंद्यांकडे आहे. तो राणोजीराव शिंदा पूर्वी मोगलांच्या चाकरीस राहून मोठ्या पदवीस चढला होता; परंतु त्याजवर पुढे अस्मानी सुलतानीचा फेरा येऊन तो रावाचा रंक झाला. शेवटी बाजीरावाच्या बापापाशी म्हणजे बाळाजी विश्वनाथाजवळ तो बारगिरीची नोकरी धरून राहिला. 'कालस्य कुटिला गतिः'. पुनः त्याचे नशीब उदयास येण्याची वेळ आली तेव्हा त्याची एकनिष्ठ सेवा, तत्परता, चलाखी आणि हुशारी पाहून बाजीरावाने त्यास आपल्या प्रथमच्याच स्वारीत शिलेदारीची असामी दिली. एका लढाईत त्याचे शौर्य, धैर्य व फौजेची टापटीप पाहून त्याला त्याने ५०० स्वारांची सरदारी दिली. पाहा, प्रारब्धाची ओहोटी-भरती कशी आहे! राणोजीराव शिंदा व मल्हारराव होळकर या दोघांमध्ये अत्यंत मित्रत्व होते.

माळव्यात धार हे एक संस्थान आहे. धारचा किल्ला पुरातन व मोठा आहे. तेथे उदाजीराव पवाराचा बाप विश्वासराव याने आपली गादी स्थापिली. त्याला रामचंद्रपंत अमात्य याने राजाराम महाराजांचे वेळेस योग्यतेस चढविले. उदाजीराव पवार पूर्वी शाहूराजाच्या हुजूर पागेवर एक मोठा सरदार होता. तो मोठा चलाख असे. त्याला ज्या ज्या कामगिऱ्या राजाने सांगितल्या त्या त्या त्याने मोठ्या हिमतीने शेवटास नेल्या. गुजराथेत व माळवा प्रांतात वरचेवर स्वाऱ्या करून मिकडचा मुलूख त्याने लुनावाडापर्यंत जाळून लुटून फस्त केला. पुढे बाजीरावाचा त्याला आश्रय मिळताच तो चौथाई व सरदेशमुखी हक्क वसूल करीत चालला. असा त्याचा पराक्रम पाहून बाजीरावाची त्याजवर फार मर्जी बसली.

या तिन्ही सरदारांस महाराजांची आज्ञा घेऊन बाजीरावाने इ.स. १७२५ मध्ये सनदा करून दिल्या. त्यात चौथाई व सरदेशमुखी हे हक्क वसूल करण्याचा त्यास वंशपरंपरेचा अधिकार दिला आणि फौजेच्या खर्चासाठी मोकासबाबीचा अर्धा वसूल त्यांजकडे लावून दिला.

वर सांगितल्याप्रमाणे माळव्यात उदाजीराव पवाराची सरशी होत चालली. गुजराथेत सेनापती दाभाडे, कंठाजीराव कदम बांडे व पिलाजीराव गायकवाड यास जयावर जय येत चालले. दिल्लीकडे महंमदशहा बादशाहा आणि त्याचा पराक्रमी सुभेदार निजाम उल्मुलूक या दोघांमध्ये वैमनस्य वाढत चालले. या गोष्टी हिंदुस्थानात मराठ्यांचे राज्य वाढविण्यास व हिंदूंच्या मुलुखांतून मुसलमानांची सत्ता अजिबात काढून टाकण्यास बहुत इष्ट आहेत असे बाजीरावाच्या लक्षात येऊन माळव्यावर मोठी स्वारी करून तो मुलूख हस्तगत करून घेण्यासाठी त्याने राजाची आज्ञा मागितली; परंतु त्यास त्यासमयी राजाच्या हुजूर श्रीपतराव प्रतिनिधी हा प्रतिपक्षी असून; तो त्याच्याशी वक्रपणाने वागे. माळव्यावर स्वारी करू देण्याची तो राजास सल्ला देईना. यामुळे राजाचा रुकार मिळेना. तेव्हा पेशव्याची व प्रतिनिधीची बरीच चुरस लागून राहिली. ‘नावडतीचे मीठ अळणी’ या न्यायाने बाजीरावाने सुचविलेल्या उत्तम उत्तम मसलती तो हाणून पाडी. असा त्यांच्यात अंत:स्थ कलह लागून राहिला. तो मराठ्यांचा शत्रू निजाम उल्मुलूक यास वारंवार कसा पथ्यावर पडे, हा वृत्तांत पुढे स्थळोस्थळी पाहण्यात येईल.

♦♦

भाग-१३

# वाक्‌युद्ध

**पे**शव्याचा उत्तरेकडे मोगलांवर स्वारी करण्याचा आग्रह आहे, तो बरोबर आहे किंवा कसे, याचा सर्वानुमते विचार करण्यासाठी इ.स. १७२५ मध्ये साताऱ्यास एक दिवस शाहूराजाने मोठा दरबार भरविला. राजाचे सर्व अष्टप्रधान, तसेच दोन-तीनशे सरदार व मानकरी ढाल-तलवार बांधून दरबारास आले. तेथे या प्रकरणाच्या साधकबाधकांचा विचार चालला असता, प्रतिनिधी व पेशवे यांचे मोठे कडाक्याचे वाक्‌युद्ध झाले. श्रीपतराव प्रतिनिधी यांनी प्रथम त्यासमयी भाषण केले ते असे-

''यासमयी पेशव्यांचा हा निव्वळ दुराग्रह आहे असे मी समजतो. त्यांनी आपल्या बलाबलाचा यत्किंचित्‌ही विचार केला नाही. तूर्त आमचा पक्ष निर्बल आहे असे कोणीही कबूल करील. स्वराज्यात स्वस्थता नाही. एखादे छोटेसे बंड मोडण्याचीसुद्धा आमच्या अंगी कुवत नाही. निजामाचे पराक्रमी सैन्य आमच्या दारापाशी येऊन ठेपले आहे. चौथाई व सरदेशमुखी हक्क सुरळीत वसूल होत नाहीत. कर्नाटक प्रांतातली मोकासबाब वसूल करण्यासाठी फत्तेसिंग भोसले यांचे हाती फौज व सनदा देऊन बरेच दिवस लोटले. तथापि, तिकडे कोल्हापूरकर व त्यांचे हितचिंतक चव्हाण, घोरपडे व सावनूरकर नबाब, हे सर्व जण अशी काही फळी धरून बसले आहेत की, आमची फौज अद्यापि कृष्णानदीदेखील ओलांडू शकत नाही. याप्रमाणे आमचे घर आमच्या ताब्यात नसता, पेशव्यांनी मोगलांवर स्वारी करण्याचा हट्ट धरणे हा वेडेपणा आहे. ते तिकडे निघाले की, इकडे एकदम बंडे उभी

राहतील. निजामाबरोबर अति वाकडे पडून त्याच्याशी आताच हातघाईचा युद्धप्रसंग करावा लागेल. माझा अभिप्राय असा आहे की, प्रथमतः आपल्या ताब्यात जो मुलूख आहे, तेथे हक्काच्या बाबी वसूल करण्यास मोकासदार नेमून नीट व्यवस्था लावावी. कर्नाटकात शिवाजीमहाराजांनी संपादिलेला प्रांत आपल्या हातातून गेला आहे तो, तिकडे स्वारी करून आपले कब्जात आणावा. इतकी व्यवस्था लागल्यावर मग उत्तरेकडे नवा मुलूख काबीज करण्याच्या कामास हात घालावा, हे उचित दिसते. हे म्हणजे मी भिऊन बोलतो असे कोणी समजू नये. जसे बाजीराव पेशवे शिपाई आहेत, तसा मीही शिपाई आहे. त्यांच्याप्रमाणेच हा प्रतिनिधी योग्य प्रसंगी पाहिजे त्या मोहिमेवर तलवार बांधून जाण्यास एका पायावर सिद्ध आहे.''

हे प्रतिनिधीचे भाषण संपताच पेशव्याने प्रत्युत्तरादाखल मोठे शौर्येतेजक, समर्पक, सुरस आणि मनोवेधक भाषण केले, ते असे-

''प्रतिनिधींनी आता जे भाषण केले ते ऐकून मोठा विस्मय वाटतो. यात संतोष मानण्याजोगी गोष्ट एवढीच आहे की, रणांगणावर मजबरोबर उभा राहण्यास प्रतिनिधीसारखा जोडीदार सरदार सिद्ध आहे. आज नाही उद्या तरी, प्रतिनिधी कमरेस तलवार बांधून सज्ज होणार हे खचित आहे; परंतु ते आजचे काम उद्यावर ढकलितात येणेकरून माझा दिल फाटून गेला आहे. या आज-उद्याच्या चालढकलीने आमची आजपावतर किती हानी झाली आहे, तिचा आपल्या मनाशी जरा हिशेब करा. आमचे रणशूर शिवाजीमहाराज यांचा वर्तनक्रम असा नव्हता. ते उद्या करण्याचे काम आज हाती धरीत, म्हणून त्यांचा सुयशोदुंदुभी अद्यापि दिगंतर दुमदुमत आहे. त्यांनी १७ व्या वर्षापासून अंतकालपर्यंत ३६ वर्षांत जी मोठमोठी अवाढव्य कामे केली, त्याचा शतांश या ४०-५० वर्षांत आमच्या हातून झाला नाही, तर ही उद्याची जपमाळ टाकून देऊन आपण आजच पुढच्या उद्योगास लागले पाहिजे.''

''खरा खरा प्रकार आहे तो आपल्या सर्वांच्या कानांवर घालण्याचा हा योग्य प्रसंग आहे. तो फुकट जाऊ दिला असता, माझ्या हुद्याचे काम मी बरोबर बजाविले नाही, असा मजवर जनापवाद येईल, म्हणून जे बोलणे भाग आहे ते बोलल्यावाचून राहवत नाही. अधिकोत्तराची प्रतिनिधींनी माफी करावी. खाजगी संबंधाने श्रीपतरावजी हे माझे परम मित्र आहेत; परंतु

मुख्य प्रधान या नात्याने मी स्पष्ट सांगतो की, प्रतिनिधीस स्वराज्याची व परराज्याची हवाल चांगलीशी कळली नाही. 'हिंदुपदपादशाहा' या बडेजाव किताबाला साजण्यासारखा आपला राज्यविस्तार केवढा असला पाहिजे, आपल्याकडे आज एकंदर मुलूख किती आहे, त्याच्या मर्यादा कोणत्या आहेत, आपले खरे मित्र कोण आहेत, खरे शत्रू कोण आहेत त्यांचे व आपले बलाबल कसे आहे, आपले हिंदू लोक सुखासंतोषात आहेत की दु:खाग्नीने होरपळत आहेत, बंड कशास म्हणावे, ते कशाने उद्‌भवते पुढे आपण काय उद्योग केला पाहिजे, या एकंदर गोष्टींचा प्रतिनिधींनी पोक्त विचार केला नाही असे वाटते. आनंदरावजी सुमंत यांजकडे परराज्यांतून नुकतीच पत्रे आली आहेत, ती पाहा. त्याजवरून मोगलास जेरीस आणण्याला हाच वक्त उत्तम आहे असे तुम्हांस वाटेल.''

''काशीपासून रामेश्वरापर्यंत यच्चयावत् सर्व मुलूख आम्हा हिंदूंचा आहे. त्याचे आम्ही खरे खरे मालक असून, मुसलमान वगैरे परकी लोक आत शिरून त्यांनी आमचे सर्वस्व हरण केले आणि तळहाताएवढे लहानसे जमिनीचे तुकडे आम्हाकडे ठेवून बाकीचा सारा मुलूख त्यांनी व्यापून टाकला आहे. तो त्यांजकडून घेण्याचा आता उद्योग करू. कोल्हापूर व कर्नाटक तूर्त मनात आणू नका. तिकडे संभाजीराजे व व्यंकोजीराजे कोणी परके नाहीत. त्यांच्याकडे असलेला मुलूख आपल्याकडेच असल्यासारखा आहे. ताटात सांडले काय आणि वाटीत सांडले काय, एकच.''

''तिकडे मोगल सध्या नाच रंग तमाशात गुंतला आहे. त्याच्या सैन्याची तयारी नाही व त्याच्या शिपायांस वक्तशीर नक्त रोजमुरा पोहोचत नसल्यामुळे ते बेदील झाले आहेत. अशा वेळेस त्यांच्यावर चालून जाण्यास काय हरकत आहे? याचा प्रतिनिधींनी शांतपणे विचार करावा. मुसलमानांकडची वहिवाट काढणे असल्यास आजच आपण कंबर बांधिली पाहिजे.''

''आम्ही विद्यमानकाळी कमकुवत आहोत, असे प्रतिनिधी म्हणतात, हे कशावरून कोण जाणे. मी तर खात्रीने सांगतो की, मराठ्यांचा पराक्रम हल्ली वृद्धिंगत होत आहे. आमच्या या सरदार मंडळीत पंचविशी फुललेले, पन्नाशी उलटलेले व युद्धप्रसंग पाहिलेले, असे शूर-वीर पुष्कळ आहेत. तिकडे गुजराथेत त्र्यंबकराव दाभाडे सेनापती, सेनाखासखेल पिलाजीराव गायकवाड, कंठाजीराव कदम बांडे वगैरे सरदार मोगलांची एकामागे एक

ठाणी उठवून, पुढे पुढे पाऊल टाकीत आहेत. मी खुद्द खान्देश व माळवा या प्रांताकडे तीन स्वाऱ्या करून आलो. चौथाई, सरदेशमुखी वगैरे बाबी गोळा करून तेथे आपला अंमल सुरू केला. जसे वाहते पाणी अडवून धरिले तर नाश करिते, तसेच निरुद्योगी लोकांस बाहेर न नेता देशातल्या देशात कोंडून ठेविले तर बंडे होतात. शिंदे, होळकर यासारखे एकनिष्ठ वीर आणि अशी धैर्यशाली फौज पदरी असल्यावर यशप्राप्तीविषयी तिळमात्र संशय धरावयास नको. मात्र, आपण सर्वांनी एकदिलाने आणि एकजुटीने चालले पाहिजे.''

''निजाम आपल्या दाराशी येऊन ठेपला आहे, असे प्रतिनिधी म्हणाले; पण 'ग्रामो नास्ति कुतः सीमा?' मुळी आमच्या घराचाच ठिकाण नाही, तर दार कोठून असणार? तेव्हा आज तो विजापुरात असला काय आणि साताऱ्यात असला काय, सारखाच. आता निजाम बलिष्ठ शत्रू आहे; तो स्वतः शूर आहे; त्याचे सैन्य पराक्रमी आहे; त्याचा तोफखाना उत्तम आहे; या सर्व गोष्टी खऱ्या आहेत; पण अशा बलाढ्य शत्रूचा पराभव केला तरच आपण लोकांत मानपात्र व कीर्तिपात्र होऊ. रावण, कंस, कौरव, मंडणमिश्र व औरंगजेब असे पराक्रमी प्रतिपक्षी नसते तर राम, कृष्ण, पांडव, शंकराचार्य व शिवाजीमहाराज यांची जगविश्रुत कीर्ती झाली असती काय? कबीराचा दोहा आहे की, 'मूरतसे कीरत बडी बिनपंख उड जाय, मूरत तो जाती रही कीरत कभी न जाय.' पण अशी कीर्ती काही अलौकिक पराक्रमाशिवाय प्राप्त होत नाही. यमुना आणि भागीरथी यांना दुआँबास वेढून टाकिले आहे, तसे निजामाला आपल्या फौजेचा गराडा देऊन जेरीस आणू. मुसलमान, फिरंगी, शिद्दी यांनी यापूर्वी जे येथे अकांडतांडव केले त्याचे स्मरण झाले की, तळव्याची आग मस्तकास पोहोचते. अंगाची लाही लाही होते. हृदयात दुःखाग्नीचा भडका होतो. एक की दोन, काय काय म्हणून सांगावे! त्यांनी सोरटीसोमनाथची मूर्ती फोडिली; सुंता करून जुलमाने हिंदूंचे मुसलमान केले; गावचेगाव जाळून फस्त केले; हिंदूंची राज्ये सफाई बुडविली; स्त्रियांच्या पातिव्रत्याचा भंग केला; कित्येक स्त्रिया अब्रूखातर अग्निकाष्ठे भक्षण करून मरून गेल्या. 'सबसे जीव प्यारा' असे जरी आहे, तरी शेकडो धर्मनिष्ठ हिंदूंनी स्वधर्मसंरक्षणार्थ आपल्या प्राणांचे बळी दिले; हिंदूंची धर्मपुस्तके जाळून टाकिली; स्थंडिलांचे विध्वंस केले. असे त्यांच्या

कालकूट कर्मांचे मोठे पातडे आहे. त्यातून या काही गोष्टी कळविल्या. याप्रमाणे सर्वत्र हाहाकार झाला. तेव्हा 'प्रभो, आता आमचा अंत पाहू नको, यातून आम्हास लवकर सोडीव;' अशी हिंदू प्रजा जिकडे तिकडे गयावया करून करुणा भाकू लागली. पुढे भगवत्कृपेने आमच्या शिवाजीमहाराजांनी हिंदूंचा कैवार धरिला. ते मोठे अक्कलवान्, शूर व मसलती होते. गोवळकोंडे व विजापूर घेण्याच्या भरीस न पडता अगोदर त्यांनी कर्नाटक प्रांत सर केला. त्या प्रभूची योग्यता काय सांगावी! ज्यांना अंगभर वस्त्र नाही; पोटभर अन्न नाही; 'कासराभर दीस चढला' ही ज्यांची हेंगाडी भाषा; त्या अडाणी व गरीब; पण शूर व इमानी मावळ्यांच्या बळावर त्यांनी स्वराज्याचा पाया रचिला. कैक वेळा ते व त्यांचे जिवलग मित्र येसाजी कंक, तानाजी मालुसरे आणि बाजी फसलकर यांनी पंचमहाभूतांच्या क्षोभाससुद्धा जुमानिले नाही. अटव्य अरण्य, झंझावात, विजांचा कडकडाट, गारांची वृष्टी, मुसळधार पाऊस, नद्यांचा खळखळाट, भुकेने पोटाची दामटी वळलेली, अशी अनेक विघ्ने आली होती, तरी हातात नंगी तलवार घेऊन आपल्या शिपायास उत्तेजन देत कित्येक अवघड किल्ले सर करून तेथे त्यांनी आपला विजयध्वज उभा केला. लढाऊ गलबते तयार केली. घे घे करीत देशचे देश काबीज केले. मोठमोठे किल्ले बांधिले. स्मरणशक्तीविषयी तर ते साक्षात् दिलदप्तर होते. राजनीतिनिपुण समर्थ रामदासस्वामी हे त्यांचे धर्मगुरू. त्यांनी त्यास राजधर्म पढविले. त्यांच्याच कृपेने विजापूर, गोवळकोंडे व अहमदनगर ही मुसलमानांची राज्ये त्यांनी पादाक्रांत केली. त्यांजवर आपला वार्षिक खंड बसविला. औरंगजेबास जेरीस आणून त्याजकडून आपले प्रभुत्व कबूल करविले. प्रजेच्या सुखासाठी कायदेकानून केले. लष्कराचा बंदोबस्त केला. स्वराज्य उभे करून हिंदू धर्माची संस्थापना केली. त्याच्या योगाने शिवाजीमहाराजांचा जिकडे तिकडे जयजयकार झाला.''

''याप्रमाणे मोगल हा एक आपल्या देशात विशाल वृक्ष वाढला होता, त्याच्या फांद्या आमच्या शिवाजीमहाराजांनी छाटून टाकिल्या; पण त्याचे मूळ अजून दिल्लीस कायम आहे. त्यामुळे पुन:पुन: नवे फाटे फुटून ते आम्हास अडचण करितात. याकरिता या जखड वृक्षाच्या बुडाशी कुऱ्हाडीचे घाव घालून त्याची पाळेमुळे खणून टाकू. हे काम एकदा शेवटास नेले म्हणजे फिरंगी, शिद्दी ही बिचारी बांडगुळे आहेत, ती तर सहज काढून

टाकू.''

'निश्चयाचे बळ, तुका म्हणे तेची फळ,' या वाक्यावर बळकट निष्ठा ठेवा. युद्ध, दान, परोपकार, दया ही अढळ कीर्तिसाधने आहेत. ती विसरून जाऊन आपल्या वाडवडिलांच्या कीर्तीवर आणि भूतदयेवर पाणी सोडू नका. आपला कुलमूळ गर्व सोडू नका. बुद्धी, वाणी आणि कृती यांचा मिलाफ ठेवून स्वराज्य वाढवा. आज आमचे राज्य जरी लहानशा ढगाएवढे छोटे आहे, तरी आम्ही मनावर घेऊन तेच अभ्र वाढवून त्याच्या जलधारांनी शत्रूस टेकीस आणून जयघोष करीत त्यांच्या मुलखात प्रवेश करू, अशी उमेद धरा. आता शेवटी महाराज सरकारास माझी हात जोडून अशी विनंती आहे की, भाऊबंदकीचे तंटे तूर्त आम्ही कानामागे टाकिले पाहिजेत. शत्रूचे पारिपत्य करून स्वराज्य वाढविणे हे सर्व कार्यांत महत्कार्य होय. हा विचार प्रतिनिधीच्या पसंतीस येत नसल्यास त्यांनी हुजूर राहूनच कारभार पाहावा आणि मला उत्तरेस जाण्याची आज्ञा व्हावी. म्हणजे मी स्वत: तिकडे जाऊन महाराजांचा यशस्वी भगवा झेंडा अटकेवर उभा करून येता. 'अर्थं वा साधतेय्, देह वा पातयेत्' असा माझा दृढ निश्चय आहे. या देहावर माझा वारसा नाही. तो मी स्वामीसेवेस अर्पण केला आहे. आता याला कोणी भजोत, भाजोत, बाणांचे प्रहार करोत, वार करोत, हात तोडोत, पाय मोडोत; परंतु जोपर्यंत हे अवयव शाबूद आहेत तोपर्यंत ते सार्थकी लागोत म्हणजे झाले.''

याप्रमाणे हे बाजीरावांचे अस्खलित आणि वीररसपर भाषण झालेले ऐकून सर्वांच्या अंगात वीरश्रीचे वारे भरले. सरदारांच्या छात्या फुगून त्यांच्या अंगरख्यांचे बंद तटातट तुटले. त्यांचा आवेश इतका अनावर झाला की, त्यांनी लगेच म्यानांतून सरासर तलवारी उपसल्या. तेव्हा सळासळ आवाज होऊन त्या नंग्या तलवारी दिव्यांच्या उजेडाने बिजलीसारख्या चमकू लागल्या. खदिरांगारासारखे लाल होऊन शिपाई लोक डोळे गरागरा फिरवू लागले. मोगलास चाऊ का खाऊ, असे त्यांस झाले. कित्येक त्यासरसे हात जोडून म्हणाले, 'सरकार, पेशवे म्हणतात तेच बरोबर आहे.' शिंदे, होळकर म्हणाले, 'त्यांच्यावर चालून जाण्यास पेशव्यांसारखे सिंह कशाला पाहिजेत? आमच्यासारखे लहान वाघ आहेत यांना मोकळे सोडावे, म्हणजे ते समद्या गलिमांच्या नरडीचा घोट घेऊन येतील.' हा ईर्षेचा प्रकार

पाहून शाहूराजासही स्फुरण चढले आणि तो म्हणाला, 'शाबास, बाजीराव शाबास, तुमचे वडील मोठे कुलीन आणि इभ्रतदार होते. त्यांचेच तुम्ही पुत्र आणि तुम्हीही तसेच आहा. तुमचा बेत आमच्या फार पसंतीस आला. अटकेच्याही पलीकडे म्हणजे कदलीखंडापर्यंत आमच्या शिवाजीमहाराजांचा भगवा झेंडा फडकवा. जी जी मदत लागेल ती ती आम्ही तुम्हास देऊ.' याप्रमाणे राजाचा रुकार मिळाल्यावर पानसुपारी, अत्तरगुलाब होऊन कचेरी बरखास्त झाली.

पुढे थोड्याच दिवसांनी इ.स. १७२६ मध्ये बाजीरावास चैत्रमासी दुसरा पुत्र झाला. तो रामनवमीचे सुमारास जन्माला म्हणून त्याचे 'रघुनाथ' असे नाव ठेवले. हाच पुरुष पुढे 'रघुनाथराव ऊर्फ राघोबा दादा' या नावाने प्रख्यात झाला. हा शिपायगिरीच्या कामात निष्णात होता. तो स्वारीस जाई तेव्हा दररोज २५-३० कोसांच्या मजला मारी, म्हणून त्यास 'राघोबा भरारी' असे म्हणतात. असे मराठ्यांकडचे वर्तमान असता दक्षिणेकडे निजाम आपला अंमल बसवीत चालला. हे त्याचे करणे दिल्लीच्या दरबारात सहन होईना. हैदराबादेस त्याने आपली स्वतंत्र गादीही स्थापिली, असे ऐकून गुजराथ व माळवा या प्रांतांवरची त्याजकडे सुभेदारी होती ती बादशाहाने काढून घेतली. गुजराथेवर सरबुलंदखान आणि माळवा प्रांतावर राजा गिरिधर बहादर, असे दोघे नवे सुभेदार नेमिले. राजा गिरिधर हा गुजराथी नागर जातीचा ब्राह्मण होता. निजाम आणि मोगल या दोघांमध्ये असा मत्सर लागला आहे, तोच आपला फायदा करून घ्यावा असे मनात आणून माळवा प्रांतावर बाजीरावाने इ.स. १७२५ चे सुमारास दोन स्वाऱ्या केल्या. राजा गिरिधर याने त्यास बरीच हरकत केली; परंतु बाजीराव कसला वस्ताद! त्याने त्यास चांगला हात दाखवून माळवा प्रांतातून खंडणी व गडगंज लूट घेऊन तो माघारा आला. तिकडे तो बुद्बळातला राजा गिरिधर नागर हात चोळीत स्वस्थ बसला.

कर्नाटकावर स्वारी केली असता तो फायदेशीर सौदा होणार नाही, असे पूर्वीपासून बाजीरावाचे मत होते, तेच खरे झाले. इ.स. १७२६ मध्ये फत्तेसिंग भोसले मोठी फौज बरोबर घेऊन तिकडे जलदीने निघाला. आता फत्तेसिंग भोसले याचा थोडा मूळ वृत्तांत सांगू -

सोलापुराजवळ सुमारे दीड लक्ष वसुलाचे अक्कलकोट संस्थान आहे,

त्याचा हा मूळ संपादक. तो शाहूराजाचा मानलेला पुत्र होता. त्याची कथा अशी आहे- इ.स. १७०७ मध्ये शाहूराजा मोगलांच्या प्रतिबंधातून सुटल्यावर सातारच्या गादीवर बसण्यासाठी येत असता ताराबाईच्या पक्षाची आणि त्याची अक्कलकोट येथे मोठी चकमक झडली. त्या गर्दीत लोखंडे या आडनावाच्या एका मराठ्याच्या बाईने आपले तान्हे मूल राजाच्या पायांवर आणून घातले. तेव्हा त्याला त्या परिसराजाचा पादस्पर्श होताच लोखंडाचे सोने बनले! राजाने त्याला अक्कलकोटची जहागीर करून दिली आणि त्या ठिकाणी राजाची प्रथमच फत्ते झाली म्हणून त्या मुलाचे त्याने 'फत्तेसिंग राजे भोसले' असे जयसूचक नाव ठेविले. वरील कर्नाटकच्या स्वारीच्या वेळेस फत्तेसिंग १८-१९ वर्षांचा तरणाबांड उमेदवार होता. त्या स्वारीत वाटेत जे जे प्रांत लागले तेथील चौथाई व सरदेशमुखीचे हक्क बाजीरावाने वसूल केले. ज्यांनी बिनहरकत पैसा दिला त्यांच्या वाटेस तो गेला नाही; परंतु ज्यांनी तक्रार केली त्यांचे गाव त्याने लुटून फस्त केले. असे करीत करीत तो श्रीरंगपट्टणास जाऊन थडकला. तेथचीही खंडणी त्यास लागलीच मिळाली. इतके झाले तथापि प्रथम जे भाकीत केले होते ते खरे झाले. असे पुढे दाखल केलेले पत्र बाजीरावाने श्री ब्रह्मेंद्रस्वामीस श्रीरंगपट्टणाहून लिहिले त्यावरून दिसून येते. या स्वारीत लाभापेक्षा हानीच फार झाली.

*"श्री"*

*"श्रीमत् ज्ञानवैराग्यतपोनिधी महापुरुष, मुक्काम धावडशी, महाराजांचे चरणसेवेशी,*

*प्रिय शिष्य बाजीराव बल्लाळ श्रीवर्धनकर यानें त्रिकाळ चरणीं मस्तक ठेवून शिरसाष्टांग नमस्कार विज्ञापना, श्री गुरुमहाराजांचे अनुग्रहेंकरून स्वारी मुक्काम श्रीरंगपट्टण येथें वर्तमान यथास्थित असो. विशेष. कऱ्हाड, करवीर, बेळगांव, धारवाड, हुबळी, चित्रकलदुर्ग या वाटेनें आम्ही इकडे आलों. बरोबर दहा हजार फौज आहे. सरदेशमुखी वगैरे बाबीचा वसूल करून चोहींकडे मोकासदार नेमीत आलों. परंतु या स्वारीत म्हणण्यासारखा फायदा झाला नाहीं. इकडची हवा कठिण व देश कंटक, यामुळे माझे शिपाई फार गत झाले. बेळगांवच्या अलीकडे महाराष्ट्र भाषेचें नांव नाही. अनुक्रमे कानडी, द्राविडी आणि तैलंगी या भाषा इकडे बोलतात. त्यांचे*

*बोलणे समजून घेण्यास मला मध्ये एक दुभाषी ठेवावा लागतो. इकडचे कडवे काटक शिपाई मला फार आवडले. त्यांच्या तरवारी आणि बंदुका फार पल्लेदार असतात. शिपायगिरीच्या कामात त्यांची वाक्‌बगारी पाहून त्यास मी चांदीची कडी व डोक्यास बांधण्याचे रुमाल बक्षीस दिले. पण ते चुलकोंबड्यासारखे एकच ठिकाण धरून राहतात. तोडले तरी बाहेर जावयाचे नाहीत. माझ्या नौकरीस राहाल का? म्हणून मी विचारले. तेव्हा ते म्हणाले, 'ईलूरी देवरू' म्हणजे हे देवाधिदेवा, नाही. आमच्यासारख्या यःकश्चित् माणसाला ते देव म्हणतात, हे बरोबर नाही. करंगळी कितीही मोठी झाली तरी हत्तीच्या अंगाएवढी ती कदाकाळी होणे नाही. शेवटी करंगळी ती करंगळी आणि हत्ती तो हत्तीच! या प्रांतीचे देसाई, देशपांडे, नाडगौडा वगैरे मोठमोठे जमेदार लोक मला कित्येक ठिकाणी येऊन भेटले. त्यांच्या आगतस्वागतावरून ते मला भले दिसले. कृष्णानदी ओलांडल्यावर घटप्रभा, मलप्रभा, तुंगभद्रा, कावेरी इत्यादी नद्या आम्हास लागल्या. या सगळ्यांमध्ये तुंगभद्रेचा तास मोठा आहे. तिच्या तीरी आम्ही दोन मुक्काम केले आणि या महानदीत आम्ही मनमुराद पोहलो. मोठमोठ्या मजला मारल्या होत्या आणि वाटेत चांगले गोड पाणी बरेच दिवस मिळाले नव्हते, यामुळे माझे शिपाई थकूनभागून गेले होते त्यास या नदीच्या काठी तळ दिल्याने विसावा सापडून नवा दम आला. फत्तेसिंग एकदा पोहत असता नदीच्या भोवऱ्यात सापडून बुडत होता, पण मी स्वतः लागलीच उडी टाकून चार हात पाणी तोडून बुडी मारून त्यास बाहेर काढिले. तो बुडतांना मल्हारजी होळकर व राणोजी शिंदे यांनी पाहिले नव्हते. ते हात टाकीत चढाओढीने पुढे पोहत निघून गेले. तुंगभद्रेसारखे मिष्ट व स्वच्छ पाणी माझ्या पाहण्यात कोठे नाही. याच कारणाने इकडे 'तुंगापान आणि कृष्णास्नान' अशी म्हण पडली आहे. बेळगाव व श्रीरंगपट्टण येथील किल्ले पाहण्यालायक आहेत. धारवाडचे अलीकडे पाण्याचे फार दुर्भिक्ष. जिकडे तिकडे काळीभोर जमीन, राक्षसी कोस, सकाळपासून दुपारपर्यंत चाललो तरी कानडी भाषेने 'कूगळती,' म्हणजे हांकभर आला, असे म्हणतात. ही हांक कोणत्या ब्रह्मदेवाची असेल कोण जाणे! चार-चार, पाच-पाच कोसपर्यंत गाव नाही, हिरवे पान नाही, पाण्याचा थेंब नाही, सुपारीएवढा दगड नाही. एकदा आम्हास एक मोठा ओढा लागला, त्याचे पाणी दुरून भिंगासारखे स्वच्छ दिसले; परंतु माझा*

*दिलप्यारा सारंगा घोडा एक घोटभरसुद्धा ते पाणी पिईना. इतके ते पाणी खारटघोट व कडू होते. त्याला 'व्यण्णि हळ्ळ' असे कानडे म्हणतात. म्हणजे त्यात दोन-दोन तीन-तीन भाले खोल लोण्यासारखा मऊ चिखल असतो वाट सोडून जरा भलतीकडे पाऊल पडले की त्यात हत्तीचे हत्ती गडप होतात असे सांगतात. अशी ती भयंकर दलदलीची जागा आहे. देश सुपीक आहे. लोकांजवळ दहा दहा वर्षे पुरण्याजोगा धान्यसंग्रह आहे. इकडचे म्हैसूरचे बाजूस रेती फार. खाण्याच्या अन्नात बारीक रेती सापडते. माझा गोविंद शागिर्द वाटेच्या कामात मोठा हुशार आहे. मी घोड्यावरून उतरून महाराजांच्या आज्ञेप्रमाणे सर्व शिपाई माणसास जागाजुगा, शिधासामुग्री, दवादारू मिळाली आहे किंवा नाही हे पाहून परत येईपर्यंत तांदुळातील रेतीबिती निवडून भाताची तपेली शिजवून गोविंदा तयार असतो. सावनुराकडे शिकारीस गेलो होतो तेथे काही रानडुक्कर व एक मोठा काळवीट मारला. त्याचे सर्व अवयव शाबूद असे सुंदर कृष्णाजिन स्वामींच्या सन्निधीस पाठविले आहे. रामनमल्लीच्या पाहाडांत मोठेमोठे पटाईत वाघ आहेत असे ऐकतो. तिकडे गेलो म्हणजे वाघाची स्वत: शिकार करून गुरुमहाराजांचे सेवेशी एक मोठे व्याघ्रांबर घेऊन येतो. सेवेशी श्रुत होय, हे विज्ञापना.''*

असो. बाजीराव बराच दूर गेला आहे असे पाहून तिकडे निजामाने कपटविद्या चालवून प्रतिनिधीस वश करून मराठ्यांच्या राज्यात खेळखंडोबा चालविला. तो वृत्तांत आता पुढच्या भागात सांगू.

♦♦

भाग-१४

# गोदावरीच्या पलीकडे निजामाशी युद्ध

**दि**ल्लीच्या बादशाहाचा नाशहेतू मनात धरून मराठ्यांच्या वाटेस न जाता निजामउल्मुलूक जागच्या जागी उगीच बसला होता; परंतु पुढे ते प्रबल होत जाऊन त्यासच उपद्रव देऊ लागले. तेव्हा तो पश्चात्तापात पडला. त्याला महंदमशाहा बादशाहाचे भय नव्हते; परंतु हैदराबादेकडील चौथाई व सरदेशमुखी हक्क वसूल करण्यासाठी मराठे प्रतिवर्षी स्वाऱ्या करू लागले, त्याच्या योगाने त्याच्या राज्यास व मुलुखास अतिशय उपद्रव झाला. काही तरी युक्ती लढवून हा मराठ्यांचा संबंध अगदी तोडून टाकावा असा विचार करून, बाजीराव पेशवा दूर कर्नाटकात स्वारीवर गेला आहे अशी संधी पाहून त्याने श्रीपतराव प्रतिनिधी यास गुप्त रीतीने वश करून त्याच्या मार्फतीने शाहूराजास दरसाल काही रोकड पैसा व इंदापुराजवळचा काही मुलूख देण्याचे कबूल केले. शाहूराजा या गोष्टीस मान्य झाला. या कामाबद्दल प्रतिनिधीस निजामाने वऱ्हाडात एक जहागीर दिली. हे अंत:स्थ कृष्णकारस्थान बाजीरावास कळून प्रतिनिधीचे करणे त्यास सर्वथैव अप्रशस्त वाटले आणि ही गोष्ट प्रतिनिधीने शत्रूला वश होऊन लोभास गुंतून केली म्हणून त्याला फार राग आला.

या प्रकारे मराठ्यांच्या दरबारात आपापसात यादवी सुरू झाली, तेव्हा आपला फायदा करून घेण्यासाठी ही संधी बरी आहे असे निजामास वाटले. मग वहिवाटीप्रमाणे मराठ्यांनी हक्काची त्याजकडे मागणी केली. तेव्हा त्याने त्यास स्पष्ट उत्तर दिले की, 'तुमचा खरा धनी कोण? शाहू की

संभाजी हे अगोदर कळले पाहिजे. याचा निर्णय ठरेपर्यंत सर्व वसूल मी अनामत ठेवितो. मग तुमचा न्याय झाल्यावर ज्याचा त्यास पैसा देईन.' असा त्याने लपंडावाचा खडखडीत जाब दिला; परंतु प्रसंग कोणाशी आहे याचा विचार निजामाने केला नाही. निजाम एक ठक होता, तरी बाजीराव सात ठक होता. त्याच्यापुढे त्याचे गौडबंगाल कसचे चालते? बाजीरावाने लागलीच राजाची भेट घेऊन सांगितले की, ''निजाम अट्टल ठक आहे. त्याने प्रतिनिधीस मध्ये घालून आपल्यास अजीबात फसविले. आमची आपसात कितीही भाऊबंदकी असली तरी याला त्या भाईबंदीची उठाठेव कोणी सांगितली होती? यात निजामाने आमचा किती पाणउतारा केला? व हे लांडग्यासारखे लांडे कारभार करून त्याने आपल्याकडे केवढे नसते श्रेष्ठत्व घेतले?'' याप्रमाणे सर्व गोष्टी बाजीरावाने शाहूराजाच्या मनात चांगल्या रसरशीत भरवून दिल्या. असा खासा ठासून बार भरला तो जोराने उडल्याशिवाय कसा राहील? स्वार्थ दाखविल्यावर लहान पाच वर्षांचे अर्भक असते तेसुद्धा वश होते, मग राजा तर चांगला प्रौढ वयाचा होता. या स्वार्थाच्या संबंधाने रामदासस्वामींचे वाक्य आहे की-

रात्रंदिवस पाहावा अर्थ । अर्थ पाहेल तो समर्थ ।।
परलोकींचा निजस्वार्थ । तेथेचि वसे ।।

याप्रमाणे निजामाने कृत्रिम राजाचे मनात पुरे बिंबल्यावर तो रागाने तत्क्षणीच समुद्रासारखा खवळला. त्याच्या अंगाचा तिळपापड झाला. शाहूराजा म्हणाला, ''बाजीराव, तुम्ही म्हणता ते खरे आहे. त्याने आम्हास फसविले खरे. त्या कपटी निजामाचे पारिपत्य करण्यास स्वत: स्वारी करण्याचा माझा निश्चय झाला आहे. यास तुमचे अनुमोदन असेल तर दसरा होताच तिकडे ढाला फिरवाव्या.'' तेव्हा बाजीराव म्हणाला, ''महाराजांचा स्वारीवर जाण्याचा हेतू स्तुत्य आहे; परंतु सिंहाने सिंहाबरोबरच टक्कर मारावी. आपण आम्हा हिंदूंचे बादशहा. तेव्हा प्रसंगोपात्त मुसलमानांच्या बादशाहावर खाशांनी स्वारी केली तर एक वेळ शोभेल. निजामाची बिशाद ती किती? मला आज्ञा व्हावी म्हणजे त्याचे पारिपत्य माझ्याकडे लागले.'' अशा रीतीने राज्याच्या रागाची शांती करून त्याने स्वारीची तयारी केली. त्यासमयी राजाज्ञेवरून जुने, घराणदार व लढवय्ये शेकडो सरदार बाजीरावाच्या जरीपटक्यास जाऊन मिळाले. पावसाळा सरला, नद्यांचे पाणी ओसरले,

तेव्हा तिकडे निजामसाहेबही औरंगाबाकडे तयारी करून आपल्या दोस्त सरदारांची वाट पाहत बसला. त्याच्या अगोदर इ.स. १७२७ चे नोव्हेंबर महिन्यात बाजीरावाची स्वारी पुण्याहून निघाली.

प्रथमत: तो जालना प्रांतात शिरून तिकडचा देश उद्ध्वस्त करीत चालला. निजामाचा बिनीवाला सरदार इवाझखान पुढे चालून आला. त्याच्याशी नोव्हेंबर महिन्यात बराच मोठा सामना झाला. त्याशी लढाई देऊन बाजीराव प्रथम माहुराकडे आणि नंतर औरंगाबादकडे एकाएकी तिरासारखा वळला. पुन: आणखी एक गरका घेऊन बऱ्हाणपुरावर जाऊन ते शहर लुटून टाकण्याचा त्याने रोख दाखविला. त्या इराद्याने त्याने खान्देशची वाटही धरिली. तिकडे इवाझखान व निजाम आपल्या पाठीशीच आहेत असे समजून त्याने त्यांना फसविण्याची एक चमत्कारिक शक्कल काढिली. ती अशी- शत्रू अजिंठ्याचा घाट उतरून अलीकडे आला असे कळल्याबरोबर त्याने आपल्या फौजेच्या एक दोन टोळ्या चक्रासारखा डावीकडे वळून मोठ्या सैन्यासह वायुवेगाने गुजराथ प्रांतात शिरला आणि तो मुलूख लुटून उद्ध्वस्त करून टाकण्यास आरंभ केला. तिकडे गुजराथेच्या सरबुलंदखान सुभेदाराला अशी थाप दिली की, ''आम्ही लुटण्याचे काम निजामउल्मुलूकाचे सल्ल्यानेच करीत आहो.''

इकडे बऱ्हाणपूरच्या वाटेवर, बाजीराव आता येईल, मग येईल अशी वाट पाहात निजामसाहेब हुक्का पीत स्वस्थ बसला. हातावर तुरी देऊन बाजीराव दुसरीकडे निघून गेल्याची त्याला वार्ताच नव्हती. असा काही दिवसपर्यंत एकाच ठिकाणी तो माशा मारीत बसल्यावर ती खबर लागून ''बाजीरावाने मला फसविले रे फसविले'' असे म्हणाला. नंतर दात ओठ चावून, ''आता दक्षिणेवर स्वारी करून बाजीरावाचे पुणे शहर जाळून खाक करून टाकितो.'' अशा निश्चयाने त्याची स्वारी अहमदनगरपर्यंत जाऊन पोहोचली. तिकडे बाजीरावाला हे वर्तमान कळले मात्र, की त्याने लगेच आपला मोर्चा निजामावर फिरविला. जसा लांडग्याच्या पाठीमागे वणवा लागतो, त्याप्रमाणे बाजीराव कासारबारीच्या घाटाने येऊन गांडापूर आणि बैझापूर हे प्रांत उद्ध्वस्त करीत करीत तो निजामाच्या पाठीशी येऊन भिडला. तेव्हा निजाम पुण्याची वाट सोडून पुन: माघारा फिरून गोदावरी ओलांडून पलीकडे गेला. तेथे बाजीरावाने त्याशी हलके हलके काही दिवस

युद्ध करून त्यास आपल्या अंगावर बरेच घेऊन घुलावीत घुलावीत त्याला अशा बिकट जागी नेले की, तेथे त्याला औषधाससुद्धा पाण्याचा थेंब मिळू नये. त्या ठिकाणी त्याला मध्ये कोंडून मुंगीचासुद्धा आत शिरकाव होणार नाही असा त्याच्या सैनाभोवती त्याने भक्कम गराडा घातला. सभोवती रान होते ते दहा-पंधरा कोसापर्यंत जाळून त्याची राखरक्षा करून टाकिली. त्याच्या लष्करात दाणा जाऊ देण्याची बंदी केली. त्याच्या तोफखान्याच्या माराने मराठ्यांची बरीच हैराणगत झाली. त्यास न जुमानता शत्रूकडील सैन्याचा टोळ्या, दाणा, पाणी इत्यादी सामग्री आणण्यास बाहेर पडत, त्यांची बाजीराव वरचेवर कत्तल उडवी, असे काही दिवस लोटले. त्यासमयी निजामाच्या लष्कराबरोबर कोल्हापूरचा संभाजी, त्याचे काही अनुयायी आणि चंद्रसेन जाधव वगैरे कित्येक मराठा सरदारही होते.

तेव्हा त्यांच्या त्यांच्यामध्ये आपापसात तेथे जी गंमत उडाली, ती सांगता पुरवत नाही. निजाम म्हणे, ‘‘तुम्ही व ते मराठे असून त्यांची क्लृप्ती तुम्हास कशी कळली नाही! यावरून तुम्ही शुद्ध नंदीबैल आहा. बाजीराव फार अकलमंद सरदार आहे. त्याच्या शतांशही तुम्हामध्ये वकूब नाही, म्हणून मी असा फसलो.’’ चंद्रसेन म्हणाला, ‘‘मी एकटा काय करू? माझ्या सैन्यात सगळे मोगल भरले आहेत. त्यांना आमच्या मराठ्यांप्रमाणे वेढा घालता येत नाही.’’ संभाजी म्हणाला, ‘‘माझे इनमीन साडेतीन लोक. त्यामध्ये माझ्या कारकुनांनी तर मला सफै बुडविले. ते ब्राह्मणांस ब्राह्मण एक होऊन आतून बाजीरावाकडे फितूर आहेत. त्यांच्या हाती माझा वाटणीचा पैसा देऊ नका. तो माझ्या शिपायांना किंवा मला न देता मधच्यामध्ये ते खाऊन टाकितील. ते माझ्या कह्यांत नाहीत.’’ कारकून लोकांस विचारिले म्हणजे ते म्हणत, ‘‘संभाजी म्हणतात हे सर्व थोतांड आहे. त्यांचा इरादा असा की, पैसा येईल तो आम्हाला किंवा शिपायांना न देता आपणच त्याचा चैनबाजीत फन्ना उडवावा.’’ सारांश, सभोवती वेढा पडला होता त्यातून आपली मुक्तता करून घेण्याचे उपाय करण्याचे सोडून, ‘‘आम्ही एवढे अरेराव असून बाजीरावाचे कैदेत सापडला कसे,’’ हे रडगाणे जो तो गात बसला. जो तो एकमेकांवर लोटू लागला. अन्नान्नगत झाली. उपासमार सोसवेनाशी झाली. बाजीरावाच्या लष्करांतून सूंसूंसूं बंदुकीच्या गोळ्या सुटून पटापट प्राण घेत. सरते शेवटी निरुपाय होऊन, ‘‘आम्ही

शरणागत आहो, आम्हास जीवदान द्या, आपण सांगाल तसा तहनामा लिहून देतो,'' असे निजामाने बाजीराव पेशव्याशी इवाझखान सरदारच्या मार्फत बोलणे लाविले. त्यास वेळेस गुजराथेत सरबुलंदखानाशी ठराव करून चौथाई व सरदेशमुखी हक्क मिळवावयाचे होते म्हणून ते निजामाचे तहाचे बोलणे बाजीरावाने कबूल केले. त्याने खानाबरोबर असे सांगून पाठविले की, ''कोल्हापूरकर संभाजीला आमचे हाती द्यावे; तुमच्या हैदराबाद मुलुखात आमचे वसूल करणारे कारकून आहेत, त्यांच्या बचावासाठी किल्ले आमचे स्वाधीन करावे आणि मागील सर्व पैशाची ताबडतोब फेड करावी. यापैकी संभाजीचे कलम खेरीजकरून दुसरी कलमे निजामाने लागलीच कबूल केली. त्यासमयी बाजीरावाने निजामास कळविले की, ''संभाजी आमच्या स्वाधीन केला तरी आम्हांकडून त्यास किमपि उपद्रव व्हावयाचा नाही. कारण, आमचे महाराज व कोल्हापूरकर हे भाईबंद आहेत. तेव्हा संभाजीही आम्हास धन्याप्रमाणेच आहेत.'' त्याबाबतीत शेवटी असे ठरले की, निजामाने त्याला पन्हाळगडावर नेऊन पोहोचवावे. नंतर शाहू व संभाजी यांनी एकचित्त होऊन आपसातला कलह मिटवावा. या कामात निजामाने हात घालू नये. याप्रमाणे ठरावबंद होऊन निजामाचा सहीशिक्का झाल्यावर बाजीरावाने त्याच्या भोवतालचा वेढा उठविला. पुढे त्यासमयी त्यांनी एकमेकांच्या मोठ्या आगतस्वागताने भेटी घेतल्या. या दोघा शूर योद्ध्यांची ही प्रथमच समक्ष भेट झाली. असा या युद्धाचा इ.स. १७२८ मध्ये निकाल होऊन गोदावरीच्या काठी दोघांचेही तळ पडले. दोघांनी एकमेकांस मेजवान्या व नजरनजराणे केले. बाजीरावाने निजामास आपल्या गोटात मोठ्या थाटाने बडा खाना दिला. निजामानेही मोठा दरबार भरवून आपल्या तंबूत नाचरंग करवून बाजीरावास एक टोलेजंग मेवामिठाईची मेजवानी दिली. मेवामिठाई, फळफळावळ व भरगच्ची पोशाक त्यास नजर केले. याचप्रसंगी बाजीरावास यवनी जातीची स्त्री मस्तानी प्राप्त झाली. ती कथा आम्ही मागे सहाव्या भागात सांगितली आहेच. हा जय मिळाल्यावर मल्हारराव होळकर व राणोजीराव शिंदे यास लष्करखर्चाकरिता बाजीरावाने बारा परगण्यांची जहागीर करून दिली.

मग तो तेथून आपले ठाणे उठवून गुजराथेत सरबुलंदखानाशी चिमाजी अप्पा लढत होता, त्याच्या कुमकेस निघाला. पुढे इ.स. १७२९ चे सुमारास

बाजीरावास तिसरा मुलगा झाला. बाजीरावाचा जनार्दनपंत या नावाचा एक चुलता होता. त्याचे नाव त्याला ठेविले. ज्याला ''जनार्दन बाबा'' असे म्हणत.

आता गुजराथेकडचे वर्तमान पुढे सांगू.

♦♦

भाग-१५

# बडोद्याजवळची लढाई

**इ.** स. १७२९ मध्ये गोदेच्या काठी नाइलाजपक्षी निजामाने बाजीरावाशी तह केला; पण तो जुलमाचा रामराम किती दिवस टिकणार? प्रसंग येईल तर बाजीरावाचा फडशा उडवीन, असा निजामाचा निश्चय होता. यास्तव बाहेरून आपले अंग न दाखविता त्याने आतून त्याच्या नाशाचा उद्योग चालविला. कोणीतरी हाताशी धरून त्याला पुढे करून आपला हेतू साधावा आणि आपण अलग नामानिराळे राहावे, अशा विचारात असता त्यास त्यासमयी त्रिंबकराव दाभाडा सेनापती हा या कामाच्या उपयोगी पडेल असे वाटले. सबब तिकडे त्याने संधान बांधिले. सेनापती दाभाडे आणि बाजीराव यांचे वाकडे पडले होते, त्याची हकीकत येणेप्रमाणे-

गुजराथ प्रांतावर मोगलाचा सरबुलंदखान सुभेदार होता. त्या प्रांतास मराठे वरचेवर उपद्रव देत. त्यांच्या बंदोबस्तासाठी काही फौज पाठवावी म्हणून दिल्ली सरकारास त्याने अनेक वेळा लिहिले; पण पालथ्या घागरीवर पाणी. तिकडून काही उत्तर येईना. बंदोबस्ताचे लक्षण दिसेना व दादही लागेना. म्हणून त्याने गुजराथेकडचे मराठे सरदार त्रिंबकराव दाभाडे, सेनापती पिलाजीराव गायकवाड, कंठाजीराव कदम बांडे इत्यादिकांस प्रांताची चौथाई बाब कबूल करून त्यांशी तहाचे बोलणे लाविले; पण ते ते मान्य करीनात, यामुळे त्याचा उपाय हरला. पुढे बाजीरावाचा भाऊ चिमाजी अप्पा, ज्याला गुजराथी लोक 'चिमणाराजा' म्हणत, तो पेशव्यांच्या आज्ञेवरून फौज घेऊन एकाएकी गुजराथेवर येऊन उतरला. त्याने पेटलादची

खंडणी घेऊन घोलका परगणा लुटला. मग त्याच्याकडे सरबुलंदखानाने तहाचे बोलणे लाविले. त्याजविषयी हो ना हो ना चालत असता चिमाजी अप्पास बाजीरावाचे पत्र आले की, ''सरबुलंदखान आम्हांस सर्व गुजराथ प्रांताची चौथा व सरदेशमुखी देण्यास कबूल असेल तर आम्ही त्याच्या मुलुखास फौज ठेवून रक्षण करू.'' सरबुलंदखानास त्या वेळी आड-विहीर झाली होती, यामुळे ते म्हणणे त्याने मुकाट्याने कबूल केले. ''सुरत खेरीजकरून सर्व प्रांतातील काळीचा व जकातीचा वसूल येईल त्याजवरचे चौथाई व सरदेशमुखीचे हक्क देत जाऊ,'' अशा मतलबाच्या सनदा, पेशव्यांच्या तर्फे बोलणे करण्यास शामराव वकील गेला होता, त्याच्या हाती त्याने दिल्या. अमदाबाद शहराबद्दलही काही रोख खंडणी देण्याचे त्याने कबूल केले. त्याबद्दल २,५०० स्वार निरंतर ठेवून मुलुखाचा बंदोबस्त राखू, असे बाजीरावाने कबूल केले. हे वर्तमान इ.स. १७२९ मध्ये घडले. हा तह सेनापती वगैरे मराठे सरदार यांच्या सल्ल्याने झाला नाही आणि त्यापासून त्यांचे काही हित झाले नाही. त्यात पेशव्यांचा मात्र फायदा झाला, असे त्यांच्या मनात पाप येऊन चुकले. हेच दाभाडे व पेशवे यांच्यामध्ये वैरभाव उत्पन्न होण्यास मूळ बीज झाले. बाजीराव सरबुलंदखानाकडून चौथाई व सरदेशमुखी या बाबींच्या सनदा पावल्या त्या घटकेपासून त्रिंबकराव दाभाडे सेनापती वगैरे सरदारांच्या अंगाचा संताप झाला. त्याला आणखी निजामउल्मुलूकाच्या स्नेहाची (तेल) कुमक मिळाली. यामुळे तो वैषम्याग्नी अधिकच भडकत चालला. सेनापतीने नवीन फौज ठेवण्यास आरंभ केला. गायकवाड वगैरे सरदार त्यास जाऊन मिळाले. निजामाने सांगून पाठविले की, ''तुम्ही दक्षिणेत शिरल्याबरोबर मी तुम्हास कुमक पाठवून देतो.'' याप्रमाणे तिकडून स्वारीची सिद्धता झाली. सेनापतीने एकंदर ३५ सहस्त्र फौज जमविली. त्याने लोकांत असे जाहीर केले की, ''आमचे धनी शाहूमहाराज यांचे राज्य बाजीरावाने घेतले. ते स्वामीचे स्वामीस देवविण्यासाठी मी दक्षिणेकडे जात आहे. या महत्कार्यास समशेरबहादूर पिलाजीराव गायकवाड, त्यांचा बंधू महादजीराव व त्यांचा पुत्र दमाजीराव, याशिवाय कुरबहादूर, कंठाजीराव व रघुजीराव कदमबांडे, उदाजीराव, आनंदराव व मालोजीराव पवार, चिमाजी दामोदर पंडित, आवजी दाभाडे वगैरे बहुत सरदार मला साह्य आहेत.'' वेळेचा चमत्कार कसा आहे पाहा!

धारकर पवार व गायकवाड या दोघांमधून पूर्वी विस्तव जात नव्हता, त्यांची यांची नेहमी युद्धे होत, असे असून या कटात पवारही सामील झाले! परधर्मी प्रजापीडक राजांच्या हातून मुक्तता करून हिंदूंची सत्ता व राज्यबल ही वाढविण्यास जो प्रभू अहोरात्र झटत होता त्या पुरुषोत्तमाच्या नाशाचा ते सर्व जण उद्योग करू लागले! या वेडेपणास काय म्हणावे!

हे वर्तमान बाजीरावास कळले तेव्हा या कटास त्याने न जुमानिता ते त्याने कसपटासारिखे मानिले; परंतु त्यात निजामही आतून सामील आहे असे कळले तेव्हा, त्याचा क्रोध त्याच्यात मावेना. त्यानेही लगेच आपल्या स्वारीची तयारी केली. त्यानेही लोकांत जाहीर केले की, ''सेनापती दाभाड्या हा हिंदू असून, हिंदूंचा हाडवैरी जो निजामउल्मुलूक याच्या नादी लागून, त्याच्या मसलतीत शिरून, त्याच्या सल्ल्याने अर्धे राज्य कोल्हापूरकर संभाजीला देऊन तो मराठी राज्याचे दोन भाग करू इच्छितो. हे कर्म आमच्या सनातन हिंदू धर्मास व राजनीतीस अगदी विरुद्ध आहे, तर यासमयी जरी माझ्याजवळ सेनापतीच्या अर्धी म्हणजे सुमारे १८ हजार फौज आहे, तरी हा न्यायाचा अन्यायाशी, सत्याचा असत्याशी व सूक्ताचा असूक्ताशी युद्धप्रसंग आहे. यात आमच्या पक्षास ईश्वर खचित यश देईल, असा भरवसा धरून, हल्ली जवळ आहे तितकीच फौज घेऊन मी सेनापती दाभाड्यावर ताबडतोब निघून जात आहे, तर हाडाचा जो खरा हिंदू असेल त्याने यासमयी मागे-पुढे न पाहता मला यथाशक्ती साह्य द्यावे.'' ही अक्षरे कानी पडताच लढायांच्या कामात कसलेले, जुने वाकबगार व ढवळ्या केसांचे असे पुष्कळ शिलेदार व मानकरी राजाच्या खासपागेत होते ते भराभर येऊन त्यांनी बाजीरावाच्या सैन्यभागाचे आधिपत्य स्वीकारिले आणि त्याजबरोबर ते मोठ्या वीरश्रीने निघाले. तिकडे सेनापती दाभाडा निघण्याच्या तयारीत होता व दक्षिणेकडे निजामाचीही चळवळ दिसू लागली. त्यांच्या अगोदर बाजीराव अतित्वरेने पुण्याहून निघाला आणि तो नर्मदा उतरून गुजराथेत शिरला. तेव्हापासून फक्त जनापवादाच्या भयाने सेनापतीकडे त्याने सल्ल्याचे बोलणे लाविले. बाजीरावाचा आवजी कावरे या नावाचा बिनीवाला सरदार फौज घेऊन पुढे चालला असता, त्याजवर पिलाजीराव गायकवाडाचा वडील पुत्र दमाजीराव घसरून एकाएकी हल्ला करून त्याने कावऱ्याचा मोड केला. बाजीराव कच्च्या धैर्याचा पुरुष असता तर त्यासमयी हा प्रथमग्रासी मक्षिकापात झाला अशी शंका घेऊन लढाईचा पसारा तसाच

टाकून मागच्यामागे पलायन करिता; परंतु तो कसला छातीचा धडेल पुरुष! तो असल्या अपशकुनास बिपशकुनास जुमानणारा श्राद्धभट नव्हता. आवजी कावऱ्याच्या पराभवाची वार्ता कळण्याबरोबर त्याला दुप्पट वीरश्री चढली आणि त्याने त्याच वेळेस प्रतिज्ञा केली की, ''आता समूर उभा राहूनच दाभाड्याचा सामना करीन.'' मग तो दरकुच दरमुक्काम करीत करीत बडोदे आणि दभई यांच्या दरम्यान एक मोठे मैदान आहे, तेथे जाऊन थडकला. त्या ठिकाणी दोन्ही सैन्यांच्या गाठी पडल्या. त्याने शिंदे, होळकर यांजकडून लगेच मोर्चेबंद्या करविल्या. इ.स. १७३१ च्या एप्रिल महिन्याच्या पहिल्या तारखेस लढाईस सुरुवात झाली. प्रात:काळी दोघांची गोळागोळी सुरू झाली. बाजीरावाच्या सैन्याच्या बंदुकांचे ताशेऱ्यांवर ताशेरे झडू लागले, तेव्हा सेनापती दाभाड्याच्या लष्करात नवे खोगीरभरतीचे शिपाई भरले होते, त्यांच्याने त्या मारापुढे टिकाव धरवेना. हातातली शस्त्रास्त्रे टाकून ते सूं पळत सुटले. ते पाहून कंठाजीराव कदमाच्या कंठी प्राण येऊन तोही पाठ दाखवून समरभूमी सोडून पळाला. आवजीराव दाभाडे गोळी लागून तत्क्षणीच पतन पावला. दुसऱ्या टोळीवरचा सरदार भालोजीराव पवार याला जबरदस्त जखमा लागून तोही घोड्यावरून पडून ठार झाला. पिलाजीरावाचा पुत्र तिसऱ्या टोळीवर होता, त्याचे व आवजी कावऱ्याचे मोठ्या निकराचे युद्ध झाले. त्यास तो शूर पुत्र गतप्राण होऊन पडला. उदाजीराव पवार व चिमाजी दामोदर पंडित यांनी ज्या टोळ्यांचे आधिपत्य स्वीकारिले होते त्यातील काही शिपाई पळाले, कित्येक ठार झाले व कोणी घायाळ होऊन पडले. शेवटी त्या दोघा सरदारांस जबर जखमा लागून ते पाडाव झाले. त्या दोघांसही कैद करून शिंदे, होळकर यांनी बाजीरावाच्या स्वाधीन केले. या गर्दीत आनंदराव पवार, पिलाजीराव गायकवाड व कुरबहाद्दर यासही मोठमोठ्या जखमा लागल्या; परंतु बाजीरावाच्या हाती न सापडता अंगातून रक्ताचे पाट चालत असता आपापले जीव घेऊन पळाले. अशी सेनापतीच्या सैन्याची दुर्दशा उडाली. नवशिके लोक होते ते आरंभीच पळाले. फक्त खंडेराव दाभाड्याच्या वेळचे पुराणे शिपाई होते ते मात्र जिवावर उदार होऊन त्याच्या पुत्राच्या संरक्षणार्थ त्यांनी रणांगण सोडिले नाही. ते तसेच नेटाने युद्ध करीत राहिले. इकडे बाजीराव खंद्या घोड्यावर स्वार होऊन आपल्या सैन्यापुढे इकडून तिकडे व तिकडून इकडे विजेसारखा फिरत राहून सर्व सरदारास उत्तेजन देत होता की, ''शाबास! वीरहो, शाबास! आणखी

थोडी कळ सोसा. आज जय तुमचाच आहे असे समजा. एक एक पाऊल पुढे टाका, मागे सरू नका. शौर्य दाखविण्यास आजच्यासारखा सोन्याचा दिवस पुढे यावयाचा नाही.'' या उत्तेजक भाषणाने त्याच्या शिपायांस अधिकच स्फुरण चढत चालले. जो तो पुढे ओढ घेऊ लागला. लढाईस प्रारंभ होऊन दोन प्रहर लोटले. ते उन्हाळ्याचे दिवस, डोक्यावर खड्या दोन प्रहरचे प्रखर ऊन, पायाखाली इंगळासारखी तापलेली जमीन, दोहींकडे शिपायांचे मुडदे प्रतिक्षणी धडाधड पडत आहेत. तरी शेवटी जय-अपजय कोणास येणार याचा अजमास कोणासही लागेना.

प्रतिपक्षाचा सेनानायक त्रिंबकराव दाभाडा हाती धनुष्यबाण घेऊन अंबारीत बसून आपले लोक कसे लढतात ते पाहत होता. हत्तीच्या सोंडेला शत्रूकडच्या चटाचट गोळ्या लागू लागल्या तेव्हा तो चिर चिर करीत माघारा वळू लागला. माहुताने थांबविण्याची पराकाष्ठा केली तरी तो जागा सोडून पळत जाऊ लागला. मग त्रिंबकराव हत्तीचे पाय लंगरसाखळदंडांनी बांधवून धैर्य धरून त्याच जागी युद्ध पाहत उभा राहिला. इकडे बाजीराव एकएक कदम पुढे पुढे सरत चालला. तो एका बाणाच्या टप्प्यात आला असे पाहून तिकडे त्रिंबकरावाने आपले धनुष्य सज्ज करून त्यास एक अर्धचंद्राकार विषारी बाण जोडून धनुष्याची दोरी आकर्ण ओढिली आणि तो प्रखर बाण त्या त्र्यंबकचापापासून सुटून एका निमिषार्धात बाजीरावाच्या नरडीचा घोट घेण्यास निघणार, इतक्यात इकडे छातीवर नेम धरून बाजीरावाने आपली बंदूक झाडिली. तीतून सूंसूं करीत गोळी निघाली ती नेमकी त्रिंबकराव दाभाड्याच्या छातीत शिरून त्याचे काळीज फोडून पार निघून गेली. सेनापतीने तात्काळ खवासखान्यात बसलेल्या हुजऱ्याच्या अंगावर मान टाकून आपला प्राण सोडिला. धन्याची अशी झालेली अवस्था पाहून दाभाड्याचे लोक निकराने लढत होते ते घाबरून माघारे पळत सुटले.

याप्रमाणे बाजीराव पेशवा समरविजयी झाला आणि सेनापती दाभाड्या पराभव पावला. या लढाईचे सविस्तर वर्तमान बाजीरावाने स्वदस्तुरची पत्रे लिहून महाराजास व बंधूस कळविले. त्यात त्याने दोहींकडच्या नाशाविषयी लिहिले की, ''आमचा खुर्दा मात्र बराच खर्ची पडला; परंतु दाभाड्या स्वत: प्राणास मुकून त्याचा खुर्दा, मोहोरा व पुतळ्याही पुष्कळ गमावल्या. माझ्या सैन्यवायूने प्रतिपक्षाच्या लोकास भुसकटासारिखे उडवून दिले.''

♦♦

भाग-१६

# सेनापती दाभाड्याची गादी कायम राखली

**मा**गील भागात सांगितल्याप्रमाणे बडोद्याजवळच्या लढाईचा शेवट झाल्यावर आपल्या नेहमीच्या परिपाठाप्रमाणे गोळ्या, मलम, अन्न, पाणी वगैरे सामग्री बरोबर घेऊन रणभूमीवर घायाळ होऊन पडलेल्या शिपायांचा परामर्ष घेण्यास बाजीराव घोड्यावर बसून निघाला. बरोबर काही सरदारही घेतले. रणवार्ता ऐकण्यासच चांगली. शूरांची कर्मे शूरच जाणत, इतरांस ती ऐकूनच मूर्च्छा येते, मग प्रत्यक्ष लढाई झालेली रणभूमी पाहिल्यावर काय वाटेल ते सांगावयास नको.

रणांगणावर आसमंतात भागी चार-पाच कोसपर्यंत प्रेतांचा एकसारखा खच पडला होता. पाय ठेवण्यासही जागा उरली नव्हती. साधारण मनुष्यास य:कश्चित माशी मारण्याचे मोठे जिवावर येते; परंतु युद्धधुरंधर शूरास रणांगणावर माणसे मारण्याचे काम भाजी चिरण्यासारखे सोपे वाटते! छिन्नविच्छिन्न झालेले अस्थिमांसाचे गोळे व नरकपाले यांनी ती रणभूमी भयाण दिसू लागली. या प्रचंड नरमेधाने ती अटव्यरणवेदिका रक्ताने तांबडी लाल होऊन रणरणरण करू लागली. आता मृत्यू येईल, क्षणांत मृत्यू येईल, घटकेत मृत्यू येईल, अशा पंथास लागलेले घायाळ शिपाई तेथे विव्हळत पडले. दारूचे शिंगडे, तोस्ताने, तोड्याच्या व चापाच्या बंदुका, तलवारी, कंकणीदार, पागोटी, तीर, कमानी, पोलादी तोस्ताने, गळपट्टे, चिलखते, टोप, ढाला, अस्ताव्यस्त पडल्या होत्या. अंगात बाण घुसून, शरपंजरी पडताच तृषेने घसे कोरडे पडून कित्येक पाण्यासाठी खुणा

करू लागले. कित्येकास काळताप भरला. कित्येकांच्या अंगातून रक्तमांसाचे गोळे बाहेर पडून लोंबू लागले. त्यांचे प्राणोत्क्रमणसमयीचे विलाप ऐकून पाषाणहृदयासद्धा दयेचा द्रव उत्पन्न झाल्याविना राहणार नाही. आपल्या बायका-पोरांच्या व वृद्ध मातापितरांच्या आठवणी होऊन कित्येकांच्या डोळ्यांतून पाण्याच्या धारा चालल्या. अशा लोळागोळा होऊन पडलेल्या व भुईस खिळून आसन्नमरण झालेल्या शिपायांपाशी जाऊन आपल्या शेल्याने त्यांच्या कपाळावरचा घाम व डोळ्यांची आसवे पुसून बाजीरावाने त्या सर्वांचे शांतवन केले. तृषाक्रांत झालेल्यास पाणी पाजिले आणि क्षुधाक्रांतांच्या तोंडात अन्न घातले. त्यासमयी तो ममतेने चारलेला घास त्यांना केशरी बर्फीपेक्षाही अधिक गोड लागला. त्यात कित्येक शूरांचे खरे बच्चे होते, ते मरणाच्या पारी होते तरी त्यांनी आपल्या मुठीतली शस्त्रास्त्रे सोडिली नव्हती. असे शूर शिपाई घायाळ होऊन उताणेपाताणे पडलेले पाहिले, तेव्हा बाजीरावाच्या डोळ्यांतून खळखळा अश्रुधारा वाहू लागल्या. आणखी जरा पुढे गेला तो कोणी दात वासून पडले आहेत, कोणी वेदना सहन न होत म्हणून मुरकुंडी घातली आहे, कोणी चक्री फिरत आहेत, कोणाची मांडी दुखावली आहे, कोणाचा पाय तुटला आहे, कोणी घोड्याखाली सापडून मेला आहे, कोणी कराकर दात खात आहे, कोणाची ढुंगणाची वस्त्रे गलित झाली आहेत, कोणी डोळ्यांवाटे व तोंडावाटे प्राण जाऊन विद्रूप दिसताहेत, कोणी खदखदा हसताहेत, कोणाच्या तोंडास फेस आला आहे, कोठे लघुशंकांचे पाट चालले आहेत, कोठे मलोत्सर्ग झाले आहेत, कोठे खा खा करून राऊत थुंकत आहेत, कोठे खोकताहेत, कोठे शिंकताहेत, कोणाच्या पागोट्याच्या पट्ट्या गळ्यात आल्या आहेत, कोणाचे अंग मल्लासारखे धुरळ्याने मळले आहे आणि कोणी घोडा व आपण दोघे बरोबरच प्राणास मुकले आहेत.

अशी ती रणांगणातली स्थिती पाहून बाजीराव विव्हळ झाला आणि आपल्या सरदार मित्रांस म्हणाला, ‘‘गडेहो, आमच्या भाईबंदांचे गळे आम्हीच कापण्याचा हा प्रसंग दाभाडे यांनी आणिला, येणेकरून मला फार वाईट वाटते. हेच आम्ही सर्व जण एकत्र होऊन स्वराज्याचे हित करितो तर आपला सुकीर्तीचा डंका दिगंतरी वाजता. असो. गतगोष्टीस उपाय नाही. आता स्वपक्ष आणि परपक्ष हा भेदाभेद न करिता. घायाळ झालेल्या सर्व

शिपायांस आपल्या गोटात नेऊन त्यांची चांगली बरदास्त ठेवून त्यास लवकर बरे करा.'' असा हुकूम करून तो आपल्या डेऱ्यात आला.

असे सेनापती दाभाड्याचे बाजीरावाने पारिपत्य केले, तरी तो एक अष्टप्रधानांपैकी सरदार होता ही गोष्ट तो विसरला नाही. त्रिंबकराव मेल्यावर त्याने राजाची आज्ञा घेऊन सेनापतीची वस्त्रे त्याचा अज्ञान अल्पवयी पुत्र यशवंतराव दाभाडे यास दिली आणि त्याची बायको उमाबाई साहेब व त्याचा सरदार पिलाजीराव गायकवाड या उभयतांकडे दौलतीचा कारभार सांगितला. गायकवाडास समशेरबहाद्दर हा पूर्वीचा किताब होताच; त्यास 'सेनाखासखेल' हे नवे पद जोडून गुजराथेचा बराच प्रांत त्याच्या ताब्यात दिला. बडोदे आणि डभई ही दोन गावे पूर्वी पिलाजीरावाकडे होती ती आपल्याकडे ठेवावी असे बाजीरावाच्या मनात होते; पण पुढे ऑगस्ट महिन्यात जो तह ठरला, त्यात ते गाव गायकवाडाकडेच राहिले. उभयतांमध्ये पुढे तंटा पडू नये म्हणून शाहूराजाच्या संमतीने एक ठरावबंद झाला. त्यावर बाजीराव व सेनापती या दोघांनी सह्या केल्या. त्यात असे ठरले की, गुजराथेत सेनापतीचा पूर्ण अधिकार असावा. माळवा प्रांतास त्याने कधी उपद्रव देऊ नये. माळवा प्रांताची पूर्ण मुखत्यारी बाजीरावाकडे राहावी. गुजराथ प्रांताचा वसूल येईल त्यापैकी अर्धा ऐवज बाजीरावाच्या मार्फत राजाच्या खजिन्यात प्रतिवर्षी भरावा आणि सरबुलंदखानाने ज्याच्या सनदा दिल्या होत्या त्या प्रांतांशिवाय इतर प्रांतातून काही बाबतीत जास्ती वसूल येईल त्यापैकी खर्च झालेला वजा करून बाकीचा पैसा सरकारपोत्यास जमा करावा.

याप्रमाणे दोघांच्या विचारे करारमदार झाले. आणखी एक त्याने धर्मकृत्य केले. त्यामुळे सर्वांस संतोष झाला. पुण्याजवळ दाभाड्याचा इनाम गाव आहे, त्यास दाभाड्याचे तळेगाव असे म्हणतात. तेथे दरसाल श्रावणमासी सेनापती ब्राह्मणांस सहस्त्रभोजन घालून दक्षिणा वाटीत असे. ती धर्मादाय नेमणूक बाजीरावाने पुण्यास चालू ठेविली. तेथे श्रावणमासी शास्त्री, वैदिक व पंडित जितके येतील तितक्यास परीक्षा घेऊन योग्यतेप्रमाणे दक्षिणा वाटण्याचा प्रघात घातला. ही दक्षिणा पेशवाई अखेरपर्यंत चालू होती व तिजबद्दल दरसाल ६०-७० हजार रुपये खर्च होई असे सांगतात. हा धर्मादाय खर्च इंग्रज सरकारनेही इ.स. १८५१ पर्यंत चालू ठेविला. पुढे नवीन लोक लागण्याचे बंद झाले. पूर्वी जे ब्राह्मण लागले ते लागले. त्यांचा

तहहयात ठराव झाला. या बंदीमुळे जो पैसा शिल्लक राहील त्याच्या व्यवस्थेसाठी सरकारने एक विद्वान लोकांची मंडळी नेमिली. तिला ''दक्षिणा प्राईझ कमिटी'' हे नाव दिले आणि मराठी भाषेत नवीन ग्रंथ लिहिणारास ग्रंथाचे योग्यतेप्रमाणे या दक्षिणा फंडातून सर्वानुमते बक्षिसे देत जावी असा ठराव झाला. (हल्लीचा ग्रंथ सदर कमिटीनेच मागविला होता. तो पसंत ठरून ठरलेले पूर्ण बक्षीस ग्रंथकर्त्यास पेशव्यांच्या या दक्षिणा फंडातूनच मिळाले.) याप्रमाणे देशभाषेच्या उत्तेजनार्थ हल्ली बाजीरावाच्या दक्षिणेचा विनियोग होत आहे. असो.

वर सांगितल्याप्रमाणे गुजराथेकडचा बंदोबस्त करून बाजीराव इ.स. १७३१ चा पर्जन्यकाळ संपल्यावर साताऱ्यास राजाच्या भेटीस निघून गेला.

हा तह झाल्यावर गायकवाडाचे गुजराथेत महत्त्व वाढले. हल्ली त्या राज्याचे क्षेत्रफळ सुमारे ८,२०० चौरस मैल आणि लोकसंख्या सुमारे चोवीस लक्ष आहे आणि वसूल सुमारे दीड कोटीच्या जवळ आहे. हा मुलूख एकसारखा सलग नाही. गायकवाडांच्या राज्यातून तापी, नर्मदा, साबरमती, मही, बनास इत्यादी नद्या वाहत जातात. नर्मदेच्या काठी भडोच शहराजवळ ''कबीरवड'' या नावाचा एक मोठा वडाचा वृक्ष आहे. त्याचा दुरून डोंगराएवढा घेर दिसतो व त्याने सात-आठ बिघे जमीन व्यापिली आहे. त्याच्या पारंब्या इतक्या घनदाट पसरल्या आहेत की, नदीला महापूर आला म्हणजे गावातले लोक त्याच्या आश्रयास जाऊन राहतात. दक्षिणेकडे स्वारी येताना बाजीरावाचा या अद्‌भुत वटवृक्षाच्या गार छायेखाली तीन-चार दिवस तळ पडला होता. त्याची बहुतेक फौज या एकाच वृक्षाच्या छायेखाली उतरली होती. केवढा या वृक्षाचा विस्तार! काय विलक्षण वृक्ष हा! गायकवाडाचे राजधानी शहर बडोदे. प्रजा हिंदू, मुसलमान व पारशी या जातीची आहे. हिंदूंमध्ये कोळी आणि भिल्ल या जातीचे लोक फार असून, ते तिरंदाजीच्या कामात निष्णात असतात. भाषा मुख्यत्वेकरून गुजराथी बोलतात.

बाजीराव गुजराथेतून परत येताच निजामाला त्याच्या कपटाचे प्रायश्चित्त कधी देईन असे त्यास झाले. निजामाने बाजीरावाच्या नाशार्थ कृत्रिम केले होते, ते सिद्धीस न जाता उलट जी खाच बाजीरावासाठी त्याने खणून

ठेविली होती. तीत तोच पडण्याची पाळी त्याच्यावर येऊन बेतली. ती अशी- गुजराथेत सरबुलंदखान सुभेदार होता, त्याला काढून टाकून त्याच्या जागेवर बादशाहाने अभयसिंग नावाचा राजपूत राजा नेमिला. तो जातीचा हिंदू; बाजीरावाची चोहीकडे छाप; बादशाहाच्या दरबारात अंदाधुंदीचा कळस; ते दरबार निजामाच्या नाशास टपलेले; बाजीरावापाशी त्याची फुटक्या कवडीची पत नाही; अशी सर्वत्र हवाल झाली होती. ''आता माझी धडगत नाही, दक्षिणेतील मुसलमानांची सर्व सत्ता लयास जाते,'' अशा नानाविध चिंतांनी निजामाचे मन व्यग्र झाले, तरी तो सामोपायाविषयी फार चतुर असे. वेळेस दाढी धरायास उशीर नाही व वेळेस पायी तुडविण्यासही उशीर नाही, अशी त्याची वर्तणूक असे. त्याने काही युक्ती करून बाजीरावाचे चित्त मोगलांकडे गुंतविले आणि आपण तह करून मोकळा झाला. त्या तहात असे ठरले की, निजामाने मराठी राज्यात बिलकूल ढवळाढवळ करू नये. बाजीरावाने दक्षिणेत स्वतंत्रपणे वागावे. माळवा प्रांतात जाताना खान्देश परगण्यास बाजीरावाने उपद्रव देऊ नये व त्याजबद्दल त्यास खंडणी देण्याचे निजामाने कबूल केले. असा ठराव झाल्यावर बाजीरावाने चिमाजी अप्पाची माळव्याकडे रवानगी केली आणि आपण काही दिवस सातारा व पुणे येथील राज्यकारभार पाहत राहिला.

तिकडे माळवा प्रांतात राजा गिरिधर या नावाचा मोगलांचा सुभेदार होता. इ.स. १७२९ मध्ये मराठ्यांशी युद्ध करीत असता मृत्यू पावला. त्याचा आप्त दायबहादर त्याच्या पश्चात सुभेदार झाला. त्याने लढाया करून बहुत वेळा मराठ्यास मागे हटविले. शेवटी चिमाजी अप्पाची स्वारी तिकडे गेल्यावर त्याच्याशी सामना करण्यास तो सुभेदार उभा राहिला. पिलाजीराव जाधव व मल्हारराव होळकर हे दोघे सरदार त्या वेळेस चिमाजी अप्पाच्या सैन्यात प्रमुख होते. इ.स. १७३२ मध्ये धारच्या किल्ल्यानजीक ताला येथे उभय पक्षांचे हटयुद्ध झाले त्यात तो बहाद्दर म्हणविणारा मृत्यू पावला. इत्थंभूत हकीकत स्वदस्तुरचे पत्र लिहून चिमाजी अप्पाने बाजीरावास कळविली. त्यात त्याने मल्हारराव होळकराच्या शौर्याची फार तारीफ केली. या मोहिमेत जो मुलूख पेशव्यांनी काबीज केला त्याचा इंदूर वगैरे बराच भाग त्यांनी होळकरास सरंजामादाखल दिला.

♦♦

भाग-१७

# कोल्हापूरकर संभाजीचे प्रकरण

**बा**जीराव पेशवा सेनापती दाभाड्याचे पारिपत्य करून साताऱ्याकडे आला, तेव्हा तेथे राजाच्या भाऊबंदकीच्या संबंधाने एक प्रकरण भिजत पडले होते. त्याचा त्याने निकाल केला. शौर्य आणि स्वराजनिष्ठा हे दोन मानपात्र गुण त्याचे ठायी पूर्ण वसत होते, यामुळे त्याची वजनदारी दिवसानुदिवस भारी वाढत चालली. सद्दी नीट असली म्हणजे सर्व गोष्टी अनुकूल होतात हे म्हणणे या प्रकरणास लागू पडते. त्या प्रकरणाची तेथे थोडक्यात हकीकत सांगतो.

इ.स. १७३० व १७३१ यात बाजीराव चिमाजी अप्पाच्या मदतीस उत्तरेकडे व गुजराथेत गुंतला असता, साताऱ्याकडे एक राज्यप्रकरण उपस्थित झाले. शाहूराजाचा चुलतबंधू कोल्हापूरकर संभाजी उदाजी चव्हाणाच्या मसलतीने चाले. भाऊबंदकीच्या वाटणीच्या बाबतीत शाहूराजाने बोलणे लाविले होते ते अमान्य करून चव्हाणाच्या चिथावणीवरून संभाजीने साताऱ्यावर स्वारीची तयारी केली. लग्नास वऱ्हाड जाते त्याप्रमाणे बरोबर परिवार व लष्कर घेऊन तो इ.स. १७३० मध्ये वारणा नदीच्या उत्तरेस येऊन उतरला आणि साताऱ्याकडचा मुलूख लुटण्यास त्याने आरंभ केला.

साताऱ्यास श्रीपतराव प्रतिनिधीशिवाय दुसरा जाडा सरदार कोणी नव्हता; परंतु निजामउल्मुलूकाशी गुप्त मसलत केल्यामुळे तो शाहूराजाच्या मर्जीतून उतरला होता. एखादे प्रकरण राजाकडे नेले म्हणजे, ''पेशवे आल्यावर त्याचा निकाल करू,'' असे तो त्यास म्हणे. पाहा, राजाचा बाजीरावावर

केवढा भरवसा होता! त्यासमयी प्रतिनिधीला वाटले की, ''संभाजीवर स्वत: जाऊन त्याचा पराभव केला असता पुन: राजाची आपल्यावर सुप्रसन्न मर्जी होईल.'' मग तो राजाची आज्ञा घेऊन संभाजीच्या छावणीवर जाऊन पडला आणि संभाजी व उदाजी चव्हाण यास त्याने पन्हाळ्याकडे पिटाळून लाविले. संभाजीची पुष्कळ मनुष्ये प्रतिनिधीच्या हाती लागली. त्यात त्याची कुटुंबाची माणसेही सापडली. ताराबाई व तिची सून राजसबाई ह्यांस सातारच्या किल्ल्यावर नेऊन ठेविले. ही प्रतिनिधीची कामगिरी पाहून शाहूराजाचे बरेच समाधान झाले. प्रतिनिधीची वाहवा झाली. स्वाभिमान या सद्‌गुणाने मनुष्य उत्तम कार्यास कसा प्रवर्तक होतो हे प्रतिनिधीच्या गोष्टीवरून दिसून येते. असो. मग संभाजीने शाहूराजाकडे तहाचे बोलणे लाविले; परंतु बाजीराव हिंदुस्थानातून परत येईपर्यंत ते प्रकरण तसेच पडून राहिले होते. ही त्याची हकीकत झाली. पुढे वर सांगितल्याप्रमाणे बाजीराव साताऱ्याकडे परत आल्यावर हे वर्तमान त्यास कळले. त्याच्या मसलतीने शाहू व संभाजी यांच्यामध्ये तह झाला. तो असा- ''कोकणचा रत्नागिरी किल्ला आणि मिरज, तासगाव, अथणी व इतर कृष्णेच्या उत्तरेकडचे गाव व विजापूराखालच्या कित्येक गढ्या संभाजीने शाहूराजास द्याव्या व त्याच्या मोबदल्यात तुंगभद्रेजवळाचा कोप्पाळ किल्ला व साळशीपासून अंकोलापर्यंत कोकणपट्टी संभाजीने घ्यावी. तुंगेच्या दक्षिणेस आणखी काही मुलूख मिळाल्यास त्यातही दोघांचा हिस्सा असावा. पिढी दर पिढीचे हक्क, इनाम जमिनी, देवस्थाने, धर्मादाय वगैरे जे जेथे खर्च चालत असतील ते पूर्वीप्रमाणे परस्परांनी परस्परांचे चालवावे. त्यास कोणी हरकत करू नये.'' असा ठराव झाला.

वारणा नदीच्या दक्षिणेस वडगावची गढी उराजी चव्हाणाच्या ताब्यात होती. तेथे लढाईत फार मनुष्ये जायबंदी झाली, सबब संभाजीकडून ती जमीनदोस्त करविली. तिचा काडीइतका मागमूस ठेविला नाही व या नुकसानीबद्दल चव्हाणास एक कपर्दिकही दिला नाही.

याप्रमाणे या प्रकरणाचा निकाल लावून दिल्यावर शाहूमहाराज बाजीरावावर फार खुश झाला. प्रतिनिधी पुढेही अशीच दक्षता ठेवीत जातील अशी बाजीरावाने इच्छा दर्शविली. इतके झाल्यावर महाराजांची आज्ञा घेऊन, निजामाचे पुरे पारिपत्य करण्याची त्याच्या मनात रुखरुख होती, सबब तो

लागलीच पुण्याकडे निघाला.

वाटेत पहिला मुक्काम चार कोसांवर पाचवडास पडला. तेथील बालआंबराईत त्याच्या बिनीवाल्याने छावणी दिली. स्वार, शिबंदी, पायदळ, वरकंदाज यांनी आपापल्या जागा नेमून तळ दिले. तंबू, डेरे, राहुट्या व कनाथी उभ्या केल्या. मैदानाची जागा पाहून तेथे दरबारचे 'दलबादल' तंबू फरासांनी ठोकले. त्यांच्या पाठीशीच गार छायेखाली खाशा स्वारीचे मुदपाकखान्याचे तंबू दिले. सकाळच्या प्रहर दहा घटिका दिवसास बाजीरावाची स्वारी छावणीत डेरेदाखल झाली. सलामीच्या तोफा झाल्या. त्या दिवशी मुक्काम तेथेच होता, पुढे जाण्याची घाई नव्हती, म्हणून अप्पा, शिंदे, होळकर, जाधव वगैरे टगे टगे सरदार बरोबर घेऊन बाजीराव आपल्या लष्कराची हालहवाल पाहण्यास निघाला. ग्रंथकार हा नायकाचा अकबरनवीसच आहे, सबब तेथे जे जे घडले व जे जे दिसले ते ते आम्ही वाचकांस सादर केले पाहिजे.

ते गुलाबी थंडीचे दिवस होते. आंब्यांच्या झाडांवर पाचेसारिखे हिरवेगार राघू चिवचिव करीत होते व इतर पक्ष्यांचा किलकिल शब्दही मधून मधून चालला होता. जिकडे तिकडे हिरवेगार गवत व दूर्वांची बेटे वाढली होती. झाडाखाली पानांच्या फटीतून उन्हाचे लहान लहान असंख्य कवडसे पडले होते. त्या जणू वाटोळ्या, लांबोळ्या व बदामी वगैरे घाटाच्या आरशाच पसरून ठेविल्या आहेत असा भास झाला. दरबारच्या तंबूवर विस्तारयुक्त पाच वडांची दाट छाया होती. त्यांच्यावर अनेक रंगांचे व अनेक जातींचे पक्षी बसून शब्द करीत होते. वारा सोसाट्याने भणभण वाही, तेणेकरून झाडांची पाने फणफण वाजत व खाली जमिनीवर उन्हाचे कवडसे पडले होते ते झराझर मागे-पुढे हेलकावे खात. त्यासमयी ती पाच वडांची गजबजलेली जमीन थरारत आहे की काय असा भास होई. पलीकडे काही अंतरावर शाळूची शेते वाढली होती. त्यातच तीळ व करडई पेरली होती. त्याजवर पिवळी व तांबूस वर्णांची फुले फुलली होती. त्याच्यापुढे काही अंतरावर कृष्णानदीचे स्वच्छ काळेभोर पाणी संथपणे वाहत होते. पलीकडे पांडवगड व दुसरे डोंगर हिरवेगार दिसत होते. त्यांच्या आसपासची सर्व जमीन हिरव्या रंगाने रंगभूमीसारखी चमकत होती. गावाच्या पाणवठ्याजवळ एक चिमणबाग होता. तेथे लिंबाच्या झाडांवर काही हिरवी, काही पाडास

आलेली व काही पिवळीजर्द कागदी लिंबे लटकली होती. गाजरे, रताळी, भुईमूग व हुरडा खाऊन गाजरासारखी लाल गुराख्यांची पोरे हिंडत होती. ती आपल्या गुरांस पाणी पाजून पोवा वाजवीत घराकडे हाकीत चालली, तेव्हा वासरांच्या ओढीने गाई शेपट्या चवरीसारख्या वर धरून चौखुरी उड्या टाकीत हंमा करीत गावाकडे धावत चालल्या होत्या. मस्त पोळ गुराख्यांचे टोणपे खात होते. तरी नीट न जाता आडवेतिडवे पळत होते, यामुळे त्याच्यांमागून धावता धावता काही गुराख्यांचे सर्वांग घामाने पाघळत होते. एक पोर एका म्हशीला बदाबद काठीने झोडपू लागले, तेव्ही ती रागाने उलटून त्याच्या अंगावर धावली, तेव्हा ते भितरे पोर घाबरून मागे कुंपणात पडले. काटे लागून त्याच्या अंगाचे लोचके निघाले. ते पाहून त्याला बाजीरावाने तात्काळ काढवून आपल्या अंगावरचे धोतर देऊन त्यास घरी लावून दिले. एक शिपाई भाकर सोडून चटणीकांद्याशी खात बसला होता. इतक्यात तेथे एक भिकारी म्हतारी बाई काठी टेकीत टेकीत येऊन गयावया करून तुकडा मागू लागली. शिपाई भुकेने अगदी व्याकूळ झाला होता, म्हणून तिला त्याने बरेच झिडकारिले व तिची काठीही हिसकावून घेतली, तरी ती जाईना. तेव्हा तो इतका संतापला की, त्या सटवीला उभी चिरावी असे मनात आणून त्याने आपल्या तलवारीला हात घातला. बाजीरावाची तिकडे नजर गेली. मग त्याने तिला जवळ बोलावून तिच्या हातावर दोन रुपये टाकले, तेव्हा ती त्याच्या पाया पडून त्याला आशीर्वाद देऊन चालती झाली.

साध्या वनभोजनात जी गंमत आहे ती राजवाड्यातील पंचपक्वान्नी मेजवानीतही नाही. कोठे चपाती-भात, कोठे खीरपुरी, कोठे चटणीभाकर, कोठे कांदाभाकर, कोठे नुसती बाजरीची गोड भाकर, तिला झुणका आहे आहे, नाही नाही, कोठे नाचण्याची लाल भाकर, हुलग्याची तांबडी उसळ, तांदुळजाची रानभाजी आणि उडदाचे पातळसे कळण, असा त्या तळावर जिकडे तिकडे जेवणाचा थाट उडाला होता. भूक चरचरीत लागून पोटात कावळे कोरू लागले म्हणजे नुसता कोंडाही मांड्यापेक्षा गोड लागतो. ओली-कोरडी भाकर खाऊन वर कृष्णेचे गोड पाणी वर तोंडे करून घटाघट प्याले तेव्हा कित्येकांच्या कानानाकात पाणी शिरून ते फडाफड शिंकले. काही लोक न्याहरी करून नदीच्या काठी घाईघाईने ओंजळीने पाणी

पिण्यास चालले तेव्हा घोड्यांच्या पायबंदात व तंबूंच्या तणावाच्या दोरांत पाय अडखळून सपशेल पडले. हा तमाशा पाहून भोवतालचे लोक खदखदा हसू लागले. आजारी होते त्यास बाजीरावाने जवळ उभा राहून अळेबळे लिंबाइतका भात चारविला. बिनीवरच्या लोकांस रात्री आलोचन जागरण झाल्यामुळे ते झाडांच्या बुंध्याशी घोंगड्या टाकून घोरत पडले होते. त्यापैकी एकाच्या पायास जखम झाली होती तेथे माशा घोंगावत होत्या. त्या जखमेवर आपल्या हाताने हळूच झाकण घालून बाजीराव पुढे चालला. पुढे एक जण हातावर हुरडा चोळून फक्या मारीत बसला होता, त्याच्या खाण्यापिण्याची बाजीरावाने चौकशी केली. तेव्हा तो म्हणाला, ''सरकार, ओलेकोरडे जसे मिळेल तसे खाऊन धन्याची निमकहलाल चाकरी करावयाची एवढे आम्हाला ठाऊक. हे पाय काय ते आम्ही जाणतो. दुसरे तिसरे काही आम्ही जाणत नाही.''

असा समाचार घेत घेत जेथे त्याचे खाजगी बसावयाचे घोडे ठाणबंदी केले होते तेथे तो आला. घोड्यांनी लगेच आपल्या धन्यास ओळखून, खाणे टाकून कान टवकारून व शिडे वर धरून ते प्रेमाने खिंकाळू लागले, जवळ येऊन आपल्या अंगावरून प्रेमाने हात फिरवावा, पुठ्यावर थापटावे व चुचकारावे म्हणून ते जमिनीवर टापा मारू लागले. खुरांनी जमीन खणू लागले. मग जवळच हिरवीगार कोवळी हरळी दाट उगवली होती ती बाजीरावाने आपल्या हाताने उपटून पदरात घेऊन दिलप्यारा, लालप्यारा, सारंगा, जरदानट अशी नावे घेऊन त्यांच्या तोंडात मूठ मूठ हरळी देऊन त्यांच्या पाठी थोपटून, त्यांच्या तोंडावरून ममतेने हात फिरवून, प्रेमाने मुके घेऊन तो निघाला. तेव्हा त्या मुक्या पण शहाण्या जनावराचे समाधान होऊन ते फुरफुरू लागले!

पुढे जरा चालला तो समोरून एक मोठा मस्त रेडा नाक फेंदारून सोसो करीत बाजीरावाच्या अंगावर धावून येत आहे असे होळकराने पाहून त्याच्या नाकाडावर त्याने आपल्या सोट्याचा असा जोराने रट्टा मारिला की, त्याबरोबर तो कोलमडून खाली पडला. त्या वेळेस काही लोक तेथे विस्तव पेटविण्याकरिता काटके गोळा करीत होते ते सूं पळाले व काही शिपाई आपल्यापुढे आरसा ठेवून कंगणीदार पागोटी बांधीत होते त्यांची धादल उडाली. पुढे काही ठिकाणी बोथाटी फिरविणे, निशाण मारणे, घोड्यास

मंडळावर धरणे व कुस्त्या खेळणे ही कामे चालली होती तीही त्याने क्षणभर उभा राहून पाहिली.

त्या दिवशी गोंविदा शागीर्दास बराच वेळ सापडल्यामुळे त्याने जेवणाचे चार पदार्थ जास्ती केले. केळीच्या लांब लांब आगोतल्या मांडून त्यावर दोन भाज्या, दोन चटण्या, कोशिंबिरी, आमटी, भात, वरण, लोणकढे तूप, चपाती, ताकतव वगैरे पदार्थ केलेले वाढले. अशा थाटाने काही सरदारास पंक्तीस घेऊन बाजीरावाने पाचवडास वनभोजन केले. भोजनोत्तर बाजीराव व अप्पा बुदबळांचे चार डाव खेळले. एका बाजूस शिंदा व दुसरे बाजूस होळकर बसून त्यांनी आपापल्या पक्षास डाव सांगितला. करमणुकीकरिता घटकाभर ही त्यांची लुटुपुटीची लढाई झाली. बुदबळे लाकडाची खरी; पण खेळणारास खेळताना खऱ्या लढाईसारखा अंगी आवेश येत असे. हा अकलेचा खेळ आहे म्हणून त्याला 'बुद्धिबळ' हे नाव यथार्थ दिले आहे.

♦♦

भाग-१८

# राज्यकारभार

**मा**गे सांगितल्याप्रमाणे बाजीराव काही दिवस पुण्यात राहून स्वत: राज्यकारभार पाहू लागला. दिवाण, फडणीस, चिटणीस वगैरे कामदारांच्या खात्यांची त्याने तपासणी केली. गावकीच्या संबंधाचे कित्येक भानगडीचे तंटे होते त्यांचा निकाल केला. बारा बलुतदार आणि बारा अलुतदार यांच्या नेमणुका व चाकऱ्या यांच्या बाबतीत काही तक्रारी पडल्या होत्या त्यांचे त्याने यथान्याय फैसले केले. जेथे जुलूम, जबरदस्ती दिसली तेथील कामदारास शासन केले. गावनिहाय फरसबंदी रस्ते व दिव्याच्या घाटासारख्या ठिकाणी, म्हणजे जेथे नेत्रस्पर्श करण्यास पाण्याचा थेंब नव्हता अशा ठिकाणी तलाव व विहिरी, आणि जेथे पायवाटा नीट नव्हत्या तेथे त्याने घाट बांधण्याचे हुकूम दिले.

जमाबंदीचे एकंदर काम कसे चालते ते त्याने पाहिले. प्रत्येक गावास गावकुसवे कशी आहेत; गावकीच्या दप्तरात प्रत्येक जमिनीचे नाव, तिचा मगदूर, तिचे क्षेत्रफळ व तिचा मालक यांची नोंदणी कुळकर्ण्यांनी कशी ठेविली आहे; इजाफत जमा, मुजाफत खर्च, दुबेर्ज्या वगैरे जमाखर्ची लिहिणे कसे ठेविले आहे; देवस्थाने, धर्मादाय, सदावर्ते, देवालये व धर्मशाळा यांची दुरुस्ती वगैरे कामे, गावखात्याच्या चिल्हर नेमणुकीतून कशी चालतात; गुन्हेगाराला पकडणे, चोरीस गेलेल्या मालाचा पत्ता लावून देणे, शेतकीच्या कामास पाटाचे पाणी वाटून देणे; फौजदारी तंट्यांचे फैसले करणे, सरकारपोत्यास जमाबंदी वसुलाचा पैसा वक्तशीर पाठवून देणे,

गावपंच बसून दिवाणी कज्जांचे निकाल करणे इत्यादी कामे गावचे पाटील, कुळकर्णी, रखवालदार वगैरे कशी करितात; याची त्याने बारकाईने तपासणी केली.

या संप्रदायाप्रमाणे बाजीराव कचेरीत राज्यकारभार पाहत बसला असता एक दिवस गोसावी, बैरागी, संत, साधू यांच्या हजार बाराशे मूर्ती वाड्यापुढे व शहरात पसरून, ''जय सीताराम, जय शंभो'' असा गोंगाट करीत फिरू लागल्या. त्यांचे चित्रविचित्र वेश, कृती, रीती, भाषणे मोठी मौज वाटण्यासारखी होती. कित्येकांनी एक किंवा दोन्ही हात वर धरून लाकडासारखे वाळविले होते. कित्येकांनी लांब लांब नखे वाढविली होती. कित्येक सुऱ्यांचे बिछाने करून त्यावर निजले. कित्येकांनी चार बाजूस चार धुम्या पेटवून सूर्याकडे नजर लावून पंचाग्निसाधन चालविले. कित्येकांनी खाली डोके वर पाय करून धूम्रपानास आरंभ केला. कित्येक स्मरणींचे मणी ओढीत बसले. कुबड्या, सांडस, चिमटे, व्याघ्रांबरे, कृष्णाजिने, सुऱ्या, झोळ्या, चिलमी, कंबरसोल व लंगोट्या असा त्यांचा थाट होता. त्यांचे ते राख फासलेले दिगंबर देह, ती बेंबीवर पडलेली दाढी, त्या आपादमस्तक जटा आणि ते भयंकर वेश पाहून एकटादुकटा मनुष्य तर भिऊन गर्भगळित व्हावयाचा.

असा मोठा मेळा पाहून त्यास बाजीरावाने विचारिले की, ''तुम्ही आला कोठून, जाणार कोठे, संकट कोणते आहे, मागणे काय आहे.'' या प्रश्नास त्यांनी उत्तर दिले की ''राजा, आम्ही तीर्थवासी रमते राम साधू काशीहून सेतुबंध रामेश्वराच्या यात्रेस जात आहोत. वाटेत तुझी कीर्ती ऐकिली की, बाजीराव पेशवा दक्षिणेत एक दयाळू हिंदू राजा आहे. त्याच्या राज्यात सदावर्ते आहेत, तेथे साधुबैराग्यास शिधापाणी मिळते; पण राजा, आमची ही पोटे पाहा रे! आम्ही तुझ्या राज्यात येऊन दोन-दोन दिवस खडखडीत उपास काढिले. पाटील-कुळकर्ण्यांनी आमची दाद घेतली नाही. अशी बेदाद आहे. राजा, धिक्कार असो तुझ्या राज्याला! तू प्रभू कशाला झालास?'' हे ऐकून बाजीराव म्हणाला, ''महाराज, तुम्ही फिकीर न करावी, आम्ही या गोष्टीचा बंदोबस्त करू.'' अशा चार समजुतीच्या गोष्टी सांगून डाळरोटीचा भरभक्कम शिधा व सरसकट एकेक रोकडा चांदवड रुपया त्यास देवविला. मग ते संतुष्ट झाले. बाजीरावाने कित्येक गोसाव्यांस

विचारिले की, ''तुम्ही असे गावोगाव भटकत फिरता यात काय फायदा? शिपायांच्या नोकऱ्या पत्कराल तर मी आपल्या लष्करात तुम्हास ठेवीन.'' कित्येकास ती गोष्ट रुचून ते लागलेच चाकरीस राहिले.

हा अंदाधुंदीचा प्रकार कानी पडल्याबरोबर त्याने लगेच दिवाणाकडून गावगन्ना सक्त हुकूम पाठविले व दवंड्या पिटविल्या की, ''गावखात्याकडे चिल्हर खर्चाची नेमणूक आहे ती गोसावी, बैरागी, भणंग, भिकार यांच्यासाठी आहे, तर असा पुन: बोभाटा आमच्या कानावर आल्यास ज्याची चूक असेल त्या गावकऱ्यांस योग्य शासन होऊन, त्यांची वतने सरकारातून एकदम जप्त केली जातील.''

त्यासमयी शनिवारवाड्याचे काम अर्धेमुर्धे तयार होत आले होते. ते व दुसऱ्या कित्येक इमारतींची मोठमोठी कामे चालली होती, त्यांजवर बाजीरावाने स्वत: पैरवी ठेविली होती. शिल्प, वैद्यक, वेद, शास्त्र, कविता, गायन, शेतकी, कापड, रंग, चित्रे, सोनेरी व मुलाम्याची कामे इत्यादी विद्यांत व कलाकौशल्यांत जे लोक निपुण होते, त्यांस उत्तेजनार्थ तो कधी कधी शालजोड्या, पागोटी, कडी वगैरे बक्षिसे देई.

बाजीराव पुण्यास राज्यकारभार पाहू लागला तेव्हा त्याचा वडील मुलगा बाळाजीराव ऊर्फ नानासाहेब १४-१५ वर्षांचा होता. त्याला राज्यकारभाराची माहिती होण्यासाठी त्यास तो कचेरीत घेऊन बसे. त्याला प्रपंच कसा करावा हे कळावे, त्याच्या अंगी राजकीय चातुर्य यावे आणि त्याला बाळबोध वळण लागावे म्हणून बाजीरावाने अनुभवशीर व बोधपर अशा काही गोष्टी लिहून त्याच्यासाठी एक लेख तयार केला आणि तो त्याजकडून नेहमी वाचवी. यावरून तो किती दूरदर्शी व उद्योगी होता व त्याची चोहीकडे कशी सारखी नजर असे हे लक्षात येते. तो निष्फल कामात एक क्षणही घालवीत नसे. आता त्या लेखातून काही गोड वेचे येथे मासल्याकरिता देतो -

''ज्या मनुष्याला स्वदेशाभिमान नाही, तो जिवंत आणि मेला सारखाच समजावा. माझ्या एकट्याच्या हातून काय होणार आहे असे रे रे करीत बसू नये.'' ''दसकी लकडी एकका बोजा'' हा न्याय लक्षात ठेवावा. जोंधळ्याच्या एका कणसात फार तर पसाभर धान्य असते. पण अशा पसा पसा धान्याची जमवाजमव केली तर राशीच्या राशी पडतात. तसेच एक एक जुळता

जुळता हजारो स्वदेशभिमानी होतात आणि त्यापासून उत्तम फळ निष्पन्न होते.''

''जे लोक आपल्यास आपल्या देशातच कोंडून घेतात, कधी बाहेर पडत नाहीत, ते सर्वदा जंगली, दरिद्री, अज्ञानी, दु:खी आणि अभागी राहतात, हे पक्के समजावे. प्रवास करण्यात पातकाचा लेश नाही. असत्य भाषण, असत्याचरण अथवा दुसऱ्यास विनाकारण दु:ख देणे असली कर्मे मात्र वर्जावी.''

''उद्योगाने सर्व काही साध्य होते. नशिबावर हवाला ठेवून स्वस्थ बसू नये. वेळ आणिल्याखेरीज येत नाही. साखर ही कधी कडू लागली आहे का? अमक्या मुहूर्तावर खाल्ली असता ती गोड व अमक्यावर खाल्ली तर ती कडू असे कधी घडत नाही. तसेच दृढनिश्चयपूर्वक चांगला उद्योग केव्हाही करा. त्यापासून सुफळ प्राप्त झाल्याविना राहावयाचे नाही, हे नि:संशय समजावे.''

''आंधळे, बहिरे, मुके, पांगळे, रोगी, धोटे, म्हातारेकोतारे अशा अनाथास आश्रय देऊन सनाथ करावे. या सत्कर्मापासून जो आनंद आहे, तो इतरास कळावयाचा नाही. ज्याने ती कामे केली असतील त्यासच तो पुसावा. आंधळ्यापुढे सुरेख तसबीर आणून मांडली अथवा बहिऱ्यापुढे खुद्द तानसेनाने मंजूळ गायन केले तर तज्जन्य सुखाचा आनंद त्या बिचाऱ्यास काय कळणार आहे?''

''जो ज्या कामात वाकब असतो, त्याला ते काम राबत्यामुळे चांगले करिता येते, गुराख्याच्या हवाली मोठी फौज केली तर तो लढाईचे काम करील का? नाही. ज्याला ज्या गोष्टीची वाक्‌बगारी त्यालाच तिची कारणे, तिचे उपयोग, ती सिद्धीस नेण्यासाठी तिचे भाग कसे पाडावे, आरंभ कोठे करावा, साधने कोणती योजावी व मधली विघ्ने कशी टाळावी हे सर्व कळते. यासाठी कोणता मनुष्य कोणत्या कामास योग्य आहे याचा आधी विचार करावा.''

''बुद्धी चांगली असली तरी तिचा विनियोग यथार्थ झाला पाहिजे. अग्नी हा पदार्थ अति उपयोगी आहे. त्यापासून पाकनिष्पति, दीपन पाचन इत्यादी सुखावह कार्ये बहुत होतात. ती करून घेण्याचे टाकून कोणी एखादा दुष्ट लोकांची घरे जाळीत सुटला तर तेथे अग्नीने काय करावे? हा दोष अग्नीचा

की आगलाव्याचा? ज्याच्या सन्निध जावे त्याला जाळावे एवढे मात्र अग्नी जाणतो. तसे बुद्धीला सुमार्ग किंवा कुमार्ग लावणे हे तुमच्या हाती आहे. ''योजकस्तत्र दुर्लभ:'' हा महाजनांचा सुबोध लक्षात ठेवून बुद्धीची योजना नीट करीत जावी.''

''एकच युक्ती सर्वत्र लागू पडते असे नाही. काल, देश, वर्तमान, पात्रापात्र वगैरे विचार पाहून साधनांची योजना करावी. दूध हा पदार्थ इतका मिष्ट व पुष्टिकारक आहे की, त्याला मृत्युलोकचे अमृत म्हटले आहे, तरी तेच दूध सर्वत्र सारखे लागू पडत नाही. 'धारोष्णममृतोपमम्' असे वैद्यशास्त्राचे म्हणणे आहे; परंतु ते अमृत कोणाला? निरोग्याला. तेच दूध ज्याला सन्निपात किंवा कफदोष झाला असेल त्याला पाजिले तर ते विषरूप होऊन तो दुखणाईत पटकन प्राणास मुकेल.''

''जर आपण एकाद्या सदुद्योगास आरंभ केला आणि तो असमंजस लोकास मानवला नाही, तर त्यामुळे हिंमत खचू देऊ नये. तेव्हा आपण आपल्याशी असा विचार करावा की, कुत्र्याला कस्तुरीचा उपयोग काय ठाऊक? का की, तिचा सुवास त्याला स्वत:स कळत नाही व इतरांनी सुवास घेतलेला त्याला समजण्याची शक्ती नाही; तेव्हा त्याजकडे त्याचा काय बोल?''

''अमुक एक संकट पडले असता अमूक अमूक युक्ती योजावी, अथवा अमूक एक उद्योग केला असता अमूक अमूक लाभ होतात, असे आपण पुष्कळांच्या तोंडून ऐकतो व अनेक ग्रंथात अनेक वेळा वाचितो व त्या युक्ती आपल्या आठवणीतही असतात; परंतु त्याचा उपयोग कोठे कोणत्या प्रकारे करावा याचे व्यवहारज्ञान नसते, यामुळे कित्येक शहाणे असून अडाणी लोकांपेक्षा ही अधिक विपत्ती भोगितात. वैद्य खासा चांगला पढीक आहे, त्याला सर्व रोगांची लक्षणे व निदाने मुखोद्‌गत आहेत; जवळ रसायनांचे बटवेचे बटवे भरले आहेत, तरी त्याच्या हातून रोगी बरे होत नाहीत, हे पुष्कळास ठाऊक आहे. तात्पर्य, नुस्ती पुस्तकी विद्या उपयोगी नाही. तिला व्यवहारज्ञानाची जोड पाहिजे.''

''दूरदृष्टि, समयस्फूर्ति, पाताळयंत्रीपणा, रसिकता, कुशाग्रता, धूर्तता इत्यादि सद्‌गुण प्राप्त होण्यास इतिहास, बखरी, काव्ये, गणित, धर्मशास्त्र, नीतिशास्त्र, तर्कशास्त्र ही अवलोकन करीत जावी, श्रवण करावी किंवा

निदान त्यांचा अनुगम तरी असावा.''

''राज्यकारभार पाहणाऱ्या लोकांनी आंगावर नानातऱ्हांचे पोषाख व अलंकार घालून नटण्यात व चट्टीपट्टी करण्यात काळ घालवू नये; आणि घडोघडी आपल्या मस्तकावर चवऱ्या, मोरचले वारून घेऊ नयेत; कारण त्याच्या योगाने स्वभाव डौली दिसतो. पोषाख साधा असावा. खाणेपिणे साधे व माफक असावे. शहराची रचना सुंदर करावी. व्यापारास उत्तेजन द्यावे. बाजार भरवावे आणि नवीन इमारती व दुकाने बांधवून नव्या पेठा वसवाव्या.''

''बायकांचे देव्हारे वाढवू नये. त्यांच्या ठिकाणी अतिलंपट होऊ नये व अतिरत असू नये. अतिकामांध पुरुषांचे स्त्रिया ऐकत नाहीत. त्यास त्या मानीनातशा होतात, व त्यास सदा आपल्या आज्ञेत वागवितात. अशा पुरुषास लोक 'स्त्रैण' म्हणतात.''

''राज्यकारभाराचा बोजा ज्याने आपल्या शिरी घेतला आहे, त्याला आपल्यावर पुष्कळ लोक प्रीति करितात असे वाटत असते; परंतु ते केवळ भ्रांतिमूलक आहे, स्वहित साधण्यासाठी कार्यवादू लोक तोंडपुजेपणा करितात व कितीएक आपले नुकसान न व्हावे म्हणून मर्जी राखितात; परंतु या अलम दुनियेत खरा मित्र शोधू गेले असता विरळा. प्रसंगी उपयोगी पडणारा असा फारच विरळा. हे आधी खरे वाटत नाही, परंतु अनुभवांती कळते. यास्तव धूर्त पुरुषाने पहिल्यापासून फार सावधगिरीने राहावे. फारसे लोकांच्या भिस्तीवर जाऊ नये. सदाचरण ठेवावे. कोणास निष्कारण दुखवू नये. स्वदेशाचे हित शोधीत जावे. हा ऐहिक पसारा व्यर्थ समजून एकाग्रचित्ताने श्रीजगदीश्वराचे स्मरण करीत जावे. ''भगवन्, मला सुबुद्धि दे,'' अशी त्याची सदैव प्रार्थना करावी, मी नरजन्मास येऊन केले काय, करीत आहे काय आणि करावयाचे काय, हे आपल्या अंतरात्म्यास अहर्निश पुशीत जावे.

'पशूके होत पन्हय्या नरका कछु नहि होय ।
नर जो आपनी करनी करे तो नरका नारायण होय ।।'

ही साधुवाणी पक्की लक्षात ठेवावी. पळे घटका, प्रहर, दिवस, महिने, वर्षे ही निमूटपणे आपणास मृत्यूच्या जबड्याकडे हळूहळू लोटीत आहेत, हे मनात वागवावे, आणि आपले आयुष्य फुकट न जाऊ देण्याचा अढळ

निश्चय धरावा. यातच नरजन्माचे सार्थक आहे.''

''मोठमोठी राष्ट्रें, राज्ये, हवेल्या, कुटुंबे व धनराशि कालचक्राखाली पिचून गेल्या, तेथे आपला पाड काय? संसार व संपत्ति ही दोनप्रहरची क्षणिक सावली आहे. ती केव्हा पाठमोरी वळेल याचा नियम नाही. सर्व क्षणिक व अशाश्वत आहे, असा विचार करून ताठा, गर्व, मीपणा व अभिमान सोडून द्यावा. तथापि, प्रापंचिकात योग्य स्वाभिमान असला पाहिजे. परमेश्वराने एकास एक धर्म करून ठेविले आहे. शेरास सवाशेर जिकडे तिकडे आहेत, मग रिकामा गर्वाचा फुगारा का धरावा? लोक आपल्या सभोवती जसे रोज मरत आहेत तसेच आपल्यालाही हा भवपसारा येथेच्या येथे ठेवून एक दिवस जाणे आहे, याचे स्मरण ठेवून यावज्जीव दु:खित लोकास यथाशक्ति साह्य देत जावे.''

''जन त्रिविध आहे. त्याची दोषांकडे जशी दृष्टि तशी गुणांकडे नसते. ह्या संसारात जनांकडून चांगले म्हणवून घेण्यासारिखे दुसरे कोणतेही काम कठिण नाही. या पृथ्वीत निंदा झाली नाही असा एकही प्राणी आढळावयाचा नाही. तर तिकडे लक्ष न देता, प्रत्येक मनुष्याने असा निर्धार करावा की, ''कदाचित् सुईच्या नेड्यांतून हत्ती पार होईल, पण मी प्राण गेला तरी नीतिच्युत होणार नाही.'' ह्या जगात चांगली वस्तु अशी थोडी. वाईटाचाच भरणा मोठा. राजकारणी पुरुषांच्या सन्निध लहान, मोठे, विद्वान, अविद्वान, उच्च, नीच, सज्जन, दुर्जन हे सर्व मासले प्रसंगोपात्त येतात, परंतु कोणावर वाग्बाण सोडू नयेत व कोणाची निंदा होत असल्यास ती एका कानाने ऐकून दुसऱ्या कानाने सोडून द्यावी. ही एक लोकप्रिय होण्याची गुरुकिल्ली आहे.''

असो. असा सुयंत्र राज्यकारभार पुण्यात राहून चालवीत असता बाजीरावाला बुंदेलखंडाकडून एकाएकी युद्धाची निमंत्रणचिठ्ठी आली. तो सुरस वृत्तांत आता पुढच्या भागी कथन करू.

♦♦

भाग-१९

# बुंदेलखंडावर स्वारी

**बा**जीराव पेशव्याचा भाऊ चिमाजी अप्पा व मोगलाचा माळवा प्रांतावरचा अधिकारी दायबहादूर या दोघांमध्ये धारच्या किल्ल्याजवळ इसवी सन १७३२ मध्ये घनघोर युद्ध झाले. त्याप्रसंगी दायबहादूर रणभूमीवर पतन पावला. येथपर्यंतची कथा मागच्या एका भागी सांगितली. पुढे त्याच्या जागेवर बादशहाने महंमदखान बंगष हा नवा मुसलमान अधिकारी नेमिला. तो पूर्वी अलाहाबाद प्रांताचा सुभेदार होता. त्याचे दिल्लीच्या दरबारी भारी वजन होते. तो फरुकाबादचा नबाब असून, त्याचे सालिना सुमारे एक कोट रुपयांचे उत्पन्न होते. त्याची माळवा प्रांतावर नेमणूक होताच सुमारे एक लाख फौज घेऊन तो तिकडे निघाला. प्रथमतः त्याची स्वारी बुंदेलखंडावर येऊन थडकली. त्या प्रांताचा छत्रसाल म्हणून परमार जातीचा क्षत्रिय राजा होता. त्या राज्यात बंगषाने आपले ठाणे देऊन त्या मुलुखास अतोनात उपद्रव देण्याचे काम आरंभिले. राजाची छत्रपूर ही राजधानी. तो जातीने वयोवृद्ध, धार्मिक आणि सरळ स्वभावाचा पुरुष होता. त्याला पुत्र दोन. एकाचे नाव राजा जगद्देव, त्याला काल्पीचा राजा म्हणत आणि दुसऱ्याचे नाव राजा हरदेव, त्याला बुंदेलखंडाचा राजा म्हणत. या छत्रसाल राजाचे सालिना त्र्याण्णव लक्ष रुपये उत्पन्न होते. त्याचे दोघे मुलगे अल्पवयस्क होते व स्वतः जाऊन महंमद बंगषाचे पारिपत्य करण्याजोगी वृद्धापकालामुळे राजाच्या अंगी कुवत राहिली नव्हती. तेव्हा हे कोसळलेले अरिष्ट टळते कसे म्हणून तो मोठ्या फिकिरीत पडला.

इतक्यात त्याच्या ध्यानात आले की, दक्षिणेकडे बाजीराव पेशवा हा एक पराक्रमी वीरपुरुष गाजत आहे. तो हिंदू धर्माचा आणि हिंदू लोकांचा मोठा अभिमानी असून, संकटात पडलेल्याचे संरक्षण करण्यास एका पायावर नेहमी सिद्ध असतो अशी कीर्ती आहे. या संकटकाली या नरसिंहाशिवाय आपणाला साह्य करण्याजोगा सगळ्या हिंदुस्थानात दुसरा कोणी समर्थ नाही, असा विचार करून त्याने बाजीरावास एक लागलेच पत्र लिहिले. त्यात त्याने आपला आतुर पक्ष अगदी उघडा करून दाखविला. आणखी त्याच्या शेवटी असे लिहिले की, ''तुम्ही हिंदूंचे पूर्ण कैवारी आहा, मुसलमानांच्या जाचातून हिंदूस मुक्त करण्यासाठी तुम्ही विडा उचलिला आहे व स्वजनहिताचा सोटा हाती येऊन हिंदूच्या उद्धारार्थ बद्धपरिकर आहां, अशी तुमची बहुमुखी कीर्ति ऐकून हा वृद्ध आणि चिंताग्रस्त हिंदुराजा पत्राद्वारे तुम्हाकडे आला आहे. तुम्ही व आम्ही हिंदू या नात्याने भाईबंद आहोत. याप्रसंगी तुम्हावाचून मला कोणी त्राता वाली नाही; तर आता एका क्षणाचाही विलंब न करिता माझ्या राज्याची व माझी मुक्तता करावी.'' पत्राच्या शेवटी राजाने हिंदी भाषेत एक खुबीदार दोहा लिहून पाठविला. तो असा-

**'जो गति ग्राहगजेंद्रकी, सो गति भई है आहे ।**
**बाजी जात है बुंदेलन्‌की, राखो बाजी लाज ।।'**

हे पत्र सांडणीस्वार घेऊन निघाला तो रात्रीचा दिवस करून सातवे दिवशी सकाळी प्रहर दिवसास पुण्यास पेशव्यांच्या वाड्यापुढे येऊन दाखल झाला. त्यासमयी बाजीराव मागच्या चौकात स्नानास बसला होता. गोविंदा शागिर्दाने गंगाळातून पाण्याचा तांब्या भरून दिला तो बाजीराव आपल्या डोक्यावर ओतणार, इतक्यात पुरंदरे दिवाण लखोटा हातात घेऊन तिथे आला. वर 'जरूर जरूर' अशी अक्षरे लिहिली होती. समक्ष लखोटा फोडून वाचून दाखविल्याबरोबर, ''तयारीचे शिंग करा,'' म्हणून बाजीरावाने हुकूम दिला. दिवाणास सांगितले की, ''आता छत्रसाल राजाची मुक्तता करून आल्याखेरीज पुण्यास भोजन करावयाचे नाही. बंगषाचे पारिपत्य करून राजाचे राज्य राजाच्या स्वाधीन करून परत आल्यावर येथे मंगलस्नान करावयाचे. आमचा आजचा मुक्काम संगमावर व्हावयाचा. तर सर्व सरदारास

आपापल्या सैन्यानिशी तयार होऊन कूच करण्याचे हुकूम द्यावे.'' मग बाजीरावाची स्वारी तडकाफडकी निघाली. पुण्याहून कूच करितांना ६० हजार फौज सज्ज झाली. ती दहा कोसपर्यंत येत एकसारखी पसरली. नौबती व डंके तुडुम् तुडुम् वाजू लागले. शिंगे व तुताऱ्या मोठ्या सनाट्याने वाजू लागल्या. स्वारीच्या पाठीमागून हत्तीवरची साहेबी नौबती पुण्याहून दडम् दडम् वाजत निघाली. तेव्हा बिनीवरची फौज पुढे वीस-पंचवीस कोसांवर जाऊन पोहोचली होती. हल्लीच्या राजेरजवाड्यांच्या फौजेची शिस्त व दीडशे वर्षांपूर्वी बाजीराव पेशवा स्वाऱ्या करी तेव्हाची त्याच्या लष्कराची शिस्त, टापटीप व बंदोबस्त यात जमीनअस्मानाचे अंतर आहे.

स्वारी तापी नदीवर पोहोचेपर्यंत पाऊण लाख फौजेची भरती झाली. ती देशातून जाऊ लागली तेव्हा गावोगावचे लोक आपली गुरेढोरे गावकुसवाच्या आत कोंडून ठेवीत व बिनीवाल्यास खुश खरेदीने सामानसुमान पुरवीत. कित्येक भित्रे गावकरी गाव सोडून भराभरा रानात पळून जात आणि फौजेची वावटळ पुढे गेल्यावर पुनः परत येत.

सैन्यास सामग्री पुरविण्याकरिता व जरूर पडेल तेव्हा गाव लुटण्याकरिता स्वारांच्या काही टोळ्या डाव्या उजव्या बाजूस चालत होत्या. लष्कर काही ठिकाणी दाट व काही ठिकाणी पातळ असे. हत्ती, उंट, घोडेस्वार, पायदळ व बैलांचे गाडे एक शिस्त धरून चालत. बरकंदाज व इतर पायदळ एका भरण्याने कूच करीत. तोफांच्या रांगा चालत तेव्हा रस्ते खडकाळ, रेताड, उंच व सखल असे असल्यामुळे गाडे कडाकड मोडून अडथळे होत. हत्तीवरचे जरीपटके व बावटे यांजबरोबर २०-२५ हजारांचे एक पृथकच पथक असे. पुढचा बिनीवाला सरदार गावलोकांबरोबर शिधासामग्रीचा बंदोबस्त करण्यात गुंतलेला असे तोपर्यंत पिछाडीचे लोक झाडाखाली, विहिरीवर किंवा ओढ्याच्या काठी बसून विसावा घेत; गुडगुडी ओढीत किंवा कांदाभाकर सोडून न्याहरी करीत. जाता जाता रानडुकरे अथवा हरणांचे कळप उठवून त्यांच्या पुढून व मागून ओरडाओरड व गलबली करीत. कोणी त्यांजवर काठ्या घालीत, कोणी नेम धरून गोळ्या टाकीत व कोणी दुसऱ्याच्या जिवाकडे न पाहता भराट्याने भरधाव घोडे सोडीत.

सैन्याबरोबर बातमी पोहोचविणारे स्वार वेगळेच असत. याप्रमाणे मजल दरमजल ती फौज बंगषाचे लष्कर जवळ जवळ करीत चालली. बुंदेलखंडात

शिरू कधी आणि बंगषाबरोबर हटयुद्ध करून त्याला हात दाखवू कधी, असा बाजीरावाच्या सर्व शिपायांस रणोत्साह चढला होता. शिंदे, होळकर यांचे बहुतेक आयुष्य रणातच गेल्यामुळे लढण्याची जागा कशी असावी, छावणी कशी असावी, अन्नपाणी मिळण्याची सोय कशी करावी, शत्रूवर हल्ला केव्हा करावा व कोणीकडून करावा, या कामांचे जसे काय ते जटापाठी व घनपाठीच बनले होते. मुक्कामास पोहोचले म्हणजे त्यांची टापटीप व व्यवस्था उत्तम असे. प्रत्येक सरदाराची व बेहेड्याची उतरण्याची वेगवेगळी जागा समजण्याकरिता सर्वांस दिसत असे उंच बावटे उभे करीत, त्यामुळे अमक्या ओळीतली आपली अमुकच जागा असे सर्वांस लागलेच कळे. फौजेबरोबर हिरव्या, तांबड्या, पिवळ्या व निळ्या पट्ट्यांचे सफेत तंबू व राहुट्या पुष्कळ असत व काही तंबूंचा फक्त एकच रंग असे. तीन बाजूंस तीन भाले जमिनीत रोवून वर एक कांबळे टाकून निर्वाह करणारे असेही त्यात कित्येक असत. बाजीरावाचे खुद्द खासा स्वारीचे 'दलबादल' म्हणून दोन मोठे विस्तीर्ण व शोभायमान रणतंबू होते. त्यांना गझनीचे पडदे व रेशमी रूदार कनाथा पुष्कळ असत.

लमाण व वणजारी लोक बहुतकरून लष्करास धान्य पुरवीत. याप्रमाणे हा सैन्यसमुद्र पुढे पुढे लोटत चाले तेव्हा त्यांचा गजबजाट, पायाखाली भूमिगर्जना, हत्यारांचा लखलखाट, जरीपटके व बावटे यांचे फडफडाट, घोड्यांचे खिंकाळणे, हत्तीच्या घंटारवाचे किणकिणाट, हत्तीघोड्यांचे बुट्टीदार गाशे व झुली, त्यांस लटकणारे जरतार गोंडे, त्यांचे सोन्या-रुप्याचे अलंकार, चांदीचे हौदे व अंबाऱ्या, पुठ्ठ्यावरच्या रेशमी व सोनेरी गेंदजोड्या व गळ्यांतल्या कुइऱ्यांच्या माळा व गंडे, सोन्या-रुप्याच्या काठ्या धरणारे भालदार व चोपदार, त्यांच्या 'आस्तेकदम' 'तफावतसे' इत्यादी मधून मधून ललकारण्या, हे सर्व चमत्कार बाजीरावाच्या स्वारीत आनंद वाटण्याजोगे असत. दरबारांच्या समयी स्वारी तंबूत दाखल होण्याबरोबर फत्तेमारी, जयंती, महाकाली या तोफांची सरबत्ती होई. बरकंदाज बेहेडा वायबार काढी. बाजीराव कधी कधी हत्तीवर बसून आपण स्वत: माहुताचे काम करी.

त्याच्या मागे-पुढे भालाईत स्वारांचे एक एक मोठे पथक चाले. स्वारीबरोबर काही भोजनभाऊ कारकून असत ते शिपायांचे लिहिणे लिहीत, वाकनिशी

करीत किंवा पागेचे लिहिणे लिहीत. अशा नाना उपायांनी ते आपली उपजीविका करीत. असो.

पुढे बंगषाला पिटाळून लावून छत्रसाल राजाला बाजीरावाने संकटविमुक्त केले, ती मनोरंजक कथा आता पुढे येईल.

♦♦

भाग-२०

# महंमदखान बंगषाचा पराभव व छत्रसाल राजाची सुप्रसन्नता

**मा**गच्या भागात सांगितल्याप्रमाणे बाजीराव पेशवा महंमदखान बंगषाचे पारिपत्य करण्यासाठी बुंदेलखंडाकडे चालला, तेव्हा त्याच्या सैन्यास भयंकर वाटांनी अंधारातूनसुद्धा जावे लागले. अंधारातून चालताना ते कडब्याची ताटे किंवा माकडीची लाकडे यांच्या चुडी पेटवीत. त्या पेटल्या म्हणजे त्यांचा मशालीपेक्षा अधिक झळझळीत उजेड पडे. मोठ्या पदवीचे सरदार मशालबुधलीच्या प्रकाशाने जात. केव्हा केव्हा ऐन दोनप्रहरी तृषाक्रांत होत्साते त्यास आगीसारख्या तापलेल्या रेतीवरून चालावे लागे. वाटेने जाताना नदीकिनाऱ्यावर, निबिड अरण्यामध्ये, डोंगराच्या माथ्यावर, ओहोळांत किंवा दऱ्याखोऱ्यांत काही ठिकाणी चुना फासलेली पांढरी सफेत देवळे दृष्टीस पडत. कोठे वटवृक्षाखाली एक देव बसवून, त्याला शेंदूर फासून, झाडावर फुलांच्या माळा टांगून, उंच डहाळ्यास छोटी-छोटी पांढरी निशाणे व पताका लावल्या होत्या व जाणारे येणारे भाविक लोक त्या देवांची भक्तिभावाने पूजाअर्चा करीत.

बरीच मोठी मजल झाल्यावर आणखी एक चमत्कार बाजीरावाच्या पाहण्यात आला तो असा- एका गावाच्या बाहेर एक मोठे देऊळ होते. त्याची बांधणी ओबडधोबडच होती. त्यात एक अक्राळविक्राळ अष्टभुजा कालिका देवी स्थापन केली होती. वाघावर आरूढ झालेली, इंगळासारखी लाल, मस्तकी सर्पांनी गुंडाळलेला मुकुट, गळ्यात रुंडमाळा व हातात त्रिशूलादी आयुधे, असे तिचे ध्यान होते. त्या ठिकाणी बगाडाची वार्षिक

जत्रा भरली होती. यामुळे ती सर्व जागा लोकांनी फुलून गेली होती. देवळापुढे हजारो बकऱ्यांचे बळी पडले होते. नवस फेडण्याकरिता कित्येक भाविक लोक पाठीस गळ टोचून घेऊन बगाडावर चढले होते. ते बगाड इतके उंच होते की, गळ घेणाऱ्याच्या पाठीस जसा हिसडा बसला तर पाठीचे चामडे तुटून तो खाली पडून त्याचा चुराडाच व्हावयाचा. त्यासमयी बाजीरावाची स्वारी तेथे येऊन थडकताच जत्रेचे भित्रे लोक भिऊन आपापली अजबाब जागच्या जागी टाकून सूं पळत सुटले.

पुढे कासारघाट, अजिंठ्याचा घाट, सप्तशृंगी, विंध्याद्री इत्यादी अवघड बाऱ्यांतून व तापी आणि नर्मदा यांच्या किनाऱ्याकिनाऱ्याने स्वारी चालली. तेव्हा बाजीरावास तेथील वनसौंदर्याची अमिरी थाटाची एक मेजवानी मिळाली ती अशी -

अरण्यामध्ये आपोआप निर्माण झालेल्या पुष्पवाटिका वाटेत पुष्कळ लागल्या. त्यांवरून मंद, सुगंध व सुशीतल वायू वाहत होता. मधून मधून स्फटिकासारख्या स्वच्छ पाण्याचे प्रवाह तापी नर्मदा इत्यादी नद्यांस मिळण्याकरिता झुळझुळ वाहत होते, त्यांचे संगम लागले. मुसलमानांनी बांधलेल्या काही जुन्या व पडक्या इमारती आणि विहिरी लागल्या. त्यांच्या भगदाडात बसलेली घुबडे भयंकर व खोल स्वराने घूत्कार करीत होती. कोल्ही लांबट स्वराने कुईकुई असे शब्द करीत होती, त्यामध्ये आणखी वाऱ्याची पिरपीर व नद्यांचे रोरावणे चालले होते. ते किर्र रान संपल्यावर पुढे काही अंतरावर मैदान मुलूख लागला. तेथे आपसुखाने उगवलेली सुंदर सुंदर झाले व रंगारंगाची फुले दृष्टीस पडली. ठिकठिकाणी आंबे, चिंचा, पिंपळ, वड वगैरे वृक्षांची दाट छाया होती. आंबराईच्या सभोवती कोठे कळकांची दाट बेटे होती. त्यांमधून वारा खेळे, तेव्हा मुरली किंवा बासरी वाजविल्यासारखा मधून मधून सुस्वर ध्वनी निघे. पुढे काही छुकती मैदाने लागली. त्यामध्ये बाजरी-ज्वारीची हिरवीगार शेते दहा दहा कोसपर्यंत एकसारखी पिकली होती. ती इतकी उंच होती की घोड्यावरचे राऊत भाल्यांसुद्धा त्यात गडप होत. काही ठिकाणी ऐन भरात आलेले आम्रवृक्ष, जाईजुईसारख्या सुवासिक टवटवीत व कृशांगी वेलींनी गुरफटून गेले होते. त्यांजवरची तांबडी, लाल, पिवळी धमक, काळीभोर, पांढरीसफेत, अशा तऱ्हेतऱ्हेच्या रंगांची फुले, कळ्या, मोहर व पालवी आणि त्या दोघांचे प्रेमालिंगन ही पाहून बाजीरावास

काय वाटले असेल याची वाचकांनीच कल्पना करावी. पुढे काही वेली पोटरीएवढ्या जाड व जोमदार होत्या. त्या आपल्या वाढीच्या जोराने एका जरठ वृक्षावरून तिसऱ्या एका टवटवीत वृक्षास घट्ट बिलगल्या होत्या! सातपुड्याच्या डोंगरात हमरस्ता नसून एक मनुष्य जाण्यापुरत्या चिंचोळ्या पायवाटा होत्या. मनुष्याचा वास नसून सर्व जंगल गगनचुंबित प्रचंड वृक्षांनी भरून गेले होते. त्यात अर्धे नंगे भिल्ल मात्र हातात तीरकमान घेऊन कोठे कोठे संचार करीत व एकटादुकटा कोणी मुशाफर आढळला की, त्याला कंठस्नान घालून त्याची चीजवस्तू बुचाडून घेत. अशी काही मजलांपर्यंत अटव्य अरण्ये लागली. पुढे पळसाचे एक मोठे रान लागले. त्याजवरची पाने उन्हानें वाळून कोळ होऊन खाली गळली होती. त्यांजवर तांबूस रंगाची फुले मात्र अवशिष्ट राहिली होती. त्यामुळे ते पलाशवन नुकतेच घोरयुद्ध झालेल्या रणभूमीसारखे लाल भडक दिसत होते. हे वनश्रीचे मिष्टान्नभोजन करून बाजीराव आकंठमर्याद तृप्त झाला. असो. आता वाचणारांची गोडाने मिठी बसली असेल. सबब हे वनभोजनवर्णन पुरे करून आपण मुख्य विषयाकडे पुन: वळू.

अशा थाटाने दरकुच दरमुक्काम करीत करीत माळवा प्रांतात चिमणाजी अप्पा व होळकर यांचे तळ पडले होते त्या ठिकाणी बाजीराव फौजेसह दाखल झाला. तेथे भेट होताच बाजीराव व अप्पा यांनी एकमेकांस प्रेमालिंगन दिले. ते दोघे बंधू एकमेकांस कडकडून भेटले. दोघांच्या नेत्रांतून प्रेमाश्रूंच्या धारा चालल्या. दोघांचे कंठ दाटून आले. दोघांसही क्षणभर बोलवेना. असे त्यांचे स्वयंवेद्य बंधुप्रेम पाहून वाल्मीकी रामायणातील भरतभेटीच्या प्रेमळ कथाभागाची कोणास आठवण होणार नाही? मागून होळकराने बाजीरावाच्या पायांवर डोई ठेविली आणि हात जोडून पुढे उभा राहिला. येथे रामचंद्राचा हितचिंतक वज्रदेही मारुती याचे स्मरण कोणास होणार नाही? माळवा प्रांतातील लढाईची सर्व हकीकत अप्पाने दादास मुखजबानीने निवेदन केली. तीत मल्हाररावाच्या शौर्याची त्याने फार तारीफ केली. मग अप्पाचे सैन्य बाजीरावाने आपल्या ताब्यात घेऊन त्याची व पिलाजीराव जाधवाची दक्षिणेकडे रवानगी केली. ''कोकणचा व सातारचा बंदोबस्त तुम्ही ठेवा,'' असे त्यास सांगितले आणि आपण स्वत: मल्हारराव होळकरास बरोबर घेऊन बुंदेलखंडावर चालला. त्या मुलुखांत शिरल्यावर

प्रथम छत्रसाल राजाच्या भेटीस न जाता अगोदर महंमदखान बंगषाचे जिकडे सैन्य उतरले होते तिकडे त्याने मोर्चा फिरविला, त्याची व याची गाठ पडताच आपल्या सैन्याकडून त्याच्या सभोवती त्याने गराडा घालविला. बंगषाला ही खबर पोंहोचली तेव्हा त्याची पाचावर धारण बसली. बाजीरावाच्या सेनेची ही प्रचंड म्हसासुर वावटळ एकाएकी माझ्या डोकीवर आली कशी, आता करावे काय, अशा विचारांत पडून तो व त्याचे उमराव अगदी गांगरून गेले. खानाने घी देखिली होती; पण बडगा कोठे देखिला होता? मग आपल्या सरदारांच्या सल्लामसलतीने जीव मुठीत धरून तो जैयतपूरच्या किल्ल्यात शिरला. तेथे भागूबाईसारखा तो काही दिवस लपून बसला. त्याच्या फौजेचे अन्नपाणी सरले. बाहेर सभोवती गराडा देऊन त्याजवर बाजीरावाने तोफांचा मारा सुरू केला. बंगषाकडे नवीन सामग्री येण्याची आशा खुंटली. यामुळे फार हैराणगत झाली. घोडी, घुशी व कुत्रीसुद्धा त्यांनी आपल्या जठराग्नीस अर्पण केली. आपली दौलत, वाडा, जनानखाना टाकून मी कोणीकडे या पंचाईतीत पडलो असे त्यास झाले. हे संकटात पडल्याचे वर्तमान त्याने गुप्त रीतीने हलकाऱ्याकडून आपल्या पुत्रास कळविले, तेव्हा आपल्या बापास सोडविण्यासाठी अफगाण लोक जितके मिळाले तितके घेऊन त्वरेने तो पितृभक्त पुत्र जैयतपुराजवळ आला. किल्ल्यात फौजेसह बाप अडकला आहे व बाहेर बाजीरावाच्या पाऊण लक्ष फौजेचा गराडा पडला आहे, असे पाहून त्याचे हातपाय गळून तो सर्द झाला, मग तो लढण्याबिढण्याच्या पंचाइतीत न पडता किल्ल्यात शिरण्यास त्याने एक चोरवाट शोधून काढिली. त्या वाटेने आत शिरून फौजेसहित रात्रीच्या काळोखातून आपल्या बापास चोरासारखा तो घेऊन चालला. ती वाट मोठी अवघड होती. यामुळे कैक शिपायांचे हात-पाय मोडले. कित्येकांनी खंदकात उड्या टाकल्या आणि काहींनी शत्रूच्या हाती सापडण्यापेक्षा आपल्याच हातांनी आपले गळे कापून घेतले. इकडे शिंदे-होळकर यांनी किल्ल्याच्या तटावर तोफांचा भडिमार चालविला. तट मजबूत असल्यामुळे आत जाण्याजोगे त्यास भगदाड पडेना. बंगषाची हालचाल पाहण्यासाठी बाजीराव स्वार होऊन स्वत: विजेसारख्या खंदकाच्या सभोवती प्रदक्षिणा घालीत होता. तो एका फेरीच्या वेळेस चोरवाटेने शत्रूच्या सैन्याची मुंग्यांसारखी रवण लागली आहे असे पाहून त्यांच्या अंगावर चालून जाण्यास आपल्या

घोडेस्वारांस त्याने इशारा केला. मग काय विचारता? मुसलमान पुढे आणि मराठे मागे अशी ससेहोलपट सुरू झाली. अशी पळधर बुंदेलखंडाच्या सरहद्दीपर्यंत पोहोचली. बंगषाचे सैन्य ''या अल्ला! या खुदा! कैसा बखत लाया,'' असे म्हणत व तोबा तोबा करीत सूं पळत सुटले. तेव्हा त्याचे स्वारदळ व पायदळ मराठ्यांनी कडब्यासारखे तुडविले. मराठ्यांनी लांडगेतोड चालविली तेव्हा खानाचे एकही माणूस बुंदेलखंडाच्या हद्दीत राहिले नाही. बाजीरावाचेही काही शिपाई त्या गर्दीत जखमी झाले; परंतु जायबंदी कोणी झाले नाही. याप्रमाणे बाजीराव विजयश्री मिळवून छत्रपुराकडे राजाच्या भेटीस निघाला. तेव्हा छत्रसाल राजा त्यास सामोरा जाऊन त्या रणशूर वीराला मोठ्या सन्मानाने तो आपल्या राजधानीत घेऊन गेला. त्या वयोवृद्ध राजाने बाजीरावास आपला तिसरा पुत्र असे मानिले; आणि तो मोठा महोत्सवाचा दिवस समजून राजाने वाड्यात बडा दरबार भरविला. आपल्या उजव्या अंगास त्याला अर्ध्या गादीवर बसवून सर्व अमीरउमरावांच्या देखत त्याची त्याने फार तारीफ केली आणि सर्वांस महशूर केले की, ''जसे माझे दोन पुत्र, तसाच हा बाजीराव पेशवा माझा तिसरा पुत्र आहे. हा हिंदूंचा पालनवाला आहे, यासाठी यास माझ्या सर्व प्रजेने मान द्यावा.'' त्यासमयी प्रसन्न होऊन राजाने बाजीरावास झांशी किल्ला व त्याच्या आसपासचा काही प्रांत बक्षीस दिला. त्याचे सालिना सवादोन लक्ष रुपयांचे उत्पन्न होते. बाजीरावाचे शिंदे, होळकर वगैरे पराक्रमी सरदार यांनाही राजाने पोशाख देऊन बहुत सन्मान केला. याप्रमाणे छत्रपुरास छत्रसाल राजाच्या वाड्यात चार दिवस यथेच्छ पाहुणचार घेऊन त्याचे राज्य निष्कंटक करून ते त्याच्या स्वाधीन करून, नवी जहागीर व नवे यश संपादून तो विजयध्वज पेशवा सर्वांच्या शाबासक्या घेत घेत साताऱ्यास शाहूराजाच्या भेटीस आला.

पुढे तो वयोवृद्ध छत्रसाल राजा सृष्टिक्रमानुसार लवकरच कैलासवासी झाला. मरणसमयी त्याने आपल्या राज्याचे समभाग तीन वाटे करून, दोन दोघा पुत्रांस ठेवून, तिसऱ्या हिश्शाची त्याने आपखुशीने बाजीरावास सनद करून दिली. ही सुमारे एकतीस लक्षांची नवीन जहागीर आपोआप त्याच्या घरी चालत आली. याचे नाव नशीब! जगदीशइच्छेने या दुनियेत अशा घडामोडी नित्यश: होत आहेत. त्याचा कृपाओघ जिकडे वळेल तिकडे

धनदौलत आपण होऊन चालत जाते आणि त्याची वक्रदृष्टी होऊन सद्दी फिरली म्हणजे तीच दौलत जागच्या जागी टाकून कित्येक हतभाग्य श्रीमंतास दूर एकांत कारागृहवासात अतिनीच प्राण्याप्रमाणे आयुष्य कंठावे लागते. याच नियमास अनुसरून त्यासमयी एका साधारण मनुष्याचे नशीब फळफळले ते असे-

बाजीरावाजवळ गोविंदा खेर या नावाचा कऱ्हाडा ब्राह्मण शागीर्द होता. त्याचे नाव मागे एक-दोन स्थळी आल्याचे वाचकांस आठवत असेलच. तो शागिर्दीच्या कामावर होता, तरी इतर धोतरबडवे शागिर्दांसारखा तो अक्षरशत्रू नव्हता. तो मोठा हुशार, चाणाक्ष, धूर्त आणि शूर होता. तो बाजीरावाच्या कसोटीस उतरलेला होता. त्याने फार दिवस आपली एकनिष्ठ सेवा केली आहे, सबब त्याला योग्यतेस चढवावे असे पेशव्याचे मनात आले. इतक्यात कर्मधर्मसंयोगाने बाजीरावास बुंदेलखंडात ही नवीन जहागीर मिळाली. त्या प्रांतावर गोविंदपंतास त्याने सुभेदार केले. याच कारणाने त्याचे ''बुंदेले'' असे आडनाव पडले. पुढे तो गोविंद बल्लाळ बुंदेले या नावाने प्रसिद्ध झाला. सोनपतपानपतच्या लढाईत तो पेशव्यांबरोबर होता व त्या भाऊगर्दीतच तो धारातीर्थी पतन पावला असे इतिहासात लिहिले आहे.

वर लिहिल्याप्रमाणे महंमदखान बंगषाची इतिश्री झाल्यावर इ.स. १७३४ मध्ये माळवा व आग्रा या दोन प्रांतांच्या अधिकारावर जयपूरवाला राजा जयसिंग याची बादशाहाने योजना गेली. ही गोष्ट बाजीरावास इष्टच झाली. जयसिंगराजाचा व बाजीरावाचा पूर्वीपासून स्नेहभाव होता. म्हणून तो तेथे आल्याने सर्व मराठ्यांस मोठा हर्ष झाला; परंतु तो त्या वेळेस बादशाहाचा अंकित असल्यामुळे बाजीरावाचे सर्व म्हणणे त्यास कबूल करता येईना. पुढे त्या उभयताची समक्ष भेट व हितगुजाच्या काही गोष्टी होऊन परस्परांत तह झाला. त्यात जयसिंगाने माळव्याचे सर्व राज्य बाजीरावास देवविले आणि बादशाहासही काही समजुतीच्या गोष्टी सांगून खुश ठेविले.

पुढे आंग्र्याच्या मदतीस बाजीराव कोकणात निघून गेला, हे वर्तमान आता पुढच्या भागात सांगू.

♦♦

भाग-२१

# शिद्दीचा पराजय

**इ.** स. १७३४ च्या सुमारास संभाजी आंग्रे हा आपला सावत्र बंधू मानाजी आंग्रे याचे पारिपत्य करण्यास्तव कुलाब्यावर चालून गेला. तेव्हा मानाजीने बाजीरावाचा आश्रय मागितला, तो त्याने दिला. मग संभाजीचा नाइलाज होऊन तो कुलाब्याचा वेढा उठवून माघारा गेला. त्या कुमकेबद्दल मानाजीने बाजीराव पेशवे यास कुतळा व राजमाची हे दोन किल्ले नजर दिले.

इ.स. १७३५ मध्ये बाजीराव माळव्याकडे असता राजाकडून त्यास आज्ञापत्र गेले की, ''तुम्हीं हजार कामे एका बाजूस ठेवून अगोदर कोकणाचा बंदोबस्त करावा. तिकडे जंजिऱ्याच्या शिद्दीने फार दांडगावा मांडिला आहे. तो आमच्या मुलुखात स्वाऱ्या करून खंडणी घेऊ लागला. त्याचा सरदार याकुबखान प्रतिनिधींनी वश करून ठेविला आहे; परंतु त्याच्या मार्फतीने काही राज्यकारणाची मसलत केली होती ती फसली. प्रतिनिधी यास बरोबर त्यांचे मुतालिक यमाजी शिवदेव, उदाजी चव्हाण व फौजफाटा देऊन कोकणात पाठविले; परंतु त्यापासून फलादेश काही झाला नाही. लढाईमुळे रयतेस पुष्कळ उपद्रव मात्र झाला. जंजिरा किल्ला अद्यापि त्यांच्या हाती लागला नाही. शिद्दीपुढे प्रतिनिधीचे काही चालत नाही. प्रतिनिधि गोवळकोटच्या किल्ल्यात शिरले, पण तो किल्ला पुढे शिद्दीने छापा घालून परत घेतला. अशी त्याने श्रीपतराव प्रतिनिधींची राळ करून टाकली आहे. तुमचे बंधू चिमणाजी अप्पा यांस त्यांच्या मदतीस जा असे वारंवार सांगितले; परंतु ते

गेले नाहीत. शेवटी आम्ही स्वदस्तूरचे त्यास आज्ञापत्र लिहिले की, तुम्ही जात नसाल तर आम्हास स्वत: तिकडे स्वारी करावी लागेल. तेव्हा त्यांनी पिलाजीराव जाधव यास पाठविले. दुसरे कोणीही सरदार तिकडे जाण्यास पुढे सरत नाहीत. प्रतिनिधी यांस कुमक न पोंचल्यामुळे ते माघारे आले आहेत. तर तुम्ही क्षणमात्र विलंब न करिता तिकडे ताबडतोब जाऊन शिद्दीचे पारिपत्य करावे. शिद्दीचा याकुबखान सरदार आम्हास अनुकूल आहे, तो तुम्हास उपयोगी पडेल. त्यानेही आमची कुमक मागितली आहे. आता विलंब लावू नये.''

असे आज्ञापत्र दाखल झाल्यावर माळव्याच्या बंदाबस्तास शिंदे, होळकर यांच्याजवळ मोठी फौज ठेविली आणि बाकीची फौज घेऊन तो इ.स. १७३५ मध्ये दक्षिणेकडे निघाला. गोदावरी नदी उतरून अलीकडे आल्यावर त्याने राजास विनंतीपत्र लिहिले की, महाराजांचे आज्ञेप्रमाणे मी फौजेसह परभारे दंडाराजपुरीकडे जात आहे. मग राजाने साताऱ्याकडे आपली खास फौज होती ती सगळी बाजीरावाचे मदतीस कोकणात पाठविली आणि शिंदे, होळकर यांचे कुमकेस हुजूर पागेपैकी काही स्वार बरोबर देऊन पिलाजीराव जाधव यास पाठविले. तिकडे बाजीराव सह्याद्रीचा घाट उतरून कोकणात शिरताच शिद्दी रहिमान व याकूबखान हे त्यास येऊन मिळाले. मग बाजीरावाने एकदम लढाई सुरू करून तळे व घोसाळे हे दोन किल्ले पहिल्या झपाट्यासरसे सर केले. मागून प्रतिनिधी व फत्तेसिंग भोसले अक्कलकोटकर हेही त्यास येऊन मिळाले. याकूबखानाने रायगडचा किल्लेदार अनुकूल करून ठेविला होता. यामुळे तो किल्ला प्रतिनिधींच्या हस्तगत होण्यास विलंब लागला नाही. याच सुमारास पेशव्याने आपला दिवाण अंबाजीपंत पुरंदरे यास स्वदस्तूरचे पत्र लिहिलेले काव्येतिहाससंग्रह पुस्तक ६ अंक ९ यापैकी पत्रे यादी वगैरे या सदराखाली पान १४२।१४३।१४४ यांजवर छापलेले पाहण्यात आले, त्याचा उतारा येथे वाचकांस सादर करितो.

**श्री**

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री अंबाजीपंत स्वामी गोसावी यांसि,

सेवक बाजीराव साष्टांग नमस्कार विनंति उपरि येथील कुशळ तागाईत ज्येष्ठ कृष्ण सप्तमी गुरुवारपर्यंत यथास्थित जाणून स्वकीय लिहिणे. विशेष

- तुमची दोन-तीन पत्रे व बाळाचे पत्र व राजश्री स्वामींची पत्रे ऐशी काही काळी परवा ऐशी पावली. त्यांत सारांश की, ''छावणी केली उत्तम केले. खर्चास व लोक राजश्री स्वामी पुरवितात. प्रतिनिधीस व सरलष्कर, कृष्णाजी दाभाडे रवाना केले. महाडास येतील. उदाजी चव्हाणाकडील कारकुनास सांगोन दोन हजार प्यादे आणविले आहेत तेही येतील. संभूसिंग चव्हाण यासही बोलाविले आहे. तेही आलियावर रवाना होतील. सचिवासही निरोप दिल्हा.'' म्हणून सविस्तर लिहिल्याप्रमाणे कळले. परंतु येथील मनसबा ऐसा आहे. शेखजी आम्हास भेटले. खोकरीची वाट मात्र त्यांनी दाखवून दिल्ही. काम करिता इतकेच केले. येथे येताच दुसरे दिवशी त्यास बोलावून हत्ती, वस्त्रे देत होतो. खर्चाची रदबदल करू लागले. तेव्हा बोली करून तूर्त दहा हजार रुपये त्यांचे पदरी घातले. बहुमानासाठी बहुतसा आग्रह केला. परंतु ते करून घेईनात. लोक कोणी त्यांजवळ राहिले नाहीत. सारे उठउठोन अप्पापले कबिले काढावयास गेले. तेव्हा गड सुटले नव्हते. आता गड सुटले. सारे कबिले मुलखातच मागती राहिले. लोकांस मागती बोलावू पाठविले आहे. येतील तेव्हा खरे. पाहिले लोक कोणी शे-दोनशे भेटले त्यास अटक करून ठेवावे तरी कौल दिल्हा कार्य होते कौलाचेच होते यास्तव त्यास अटकही करिता नये. यास्तव निरोप दिल्हा. आतील राजकारण होते ते तो पहिलेच दिवशी वारले. आता प्रस्तुत काही शेखजीच्याने कार्य होत नाही. बरेही वाटत नाही. चार महिने येथे राहिल्या उपरि मग त्यांच्याने तरतूद होईल ते करतील. खर्चास मागतील तसे देणे लागेल. गड घेतले त्यांपैकी अवचितगड त्याचे हवाली कबिले ठेवावयास करावा असे झाले. तोही त्याचे हवाली केला. न करावा तरी बेदील होतो. करावा तरी इतबारही पुरेना. परंतु करणे प्राप्त झाला. केला. या जातीचे त्याचे वर्तमान आहे. खानजादा थोरला मेला. त्याला लेक बाहेर होता तो आम्हाजवळ आहे आणि लहान भाऊ त्याचे सहा जण आहेत. हाही मूल शहाणाच आहे. आत सिद्दीसमूल व सिद्दी अंबर अफलानी ऐसे आहेत. बाराशे माणूस किलियावर आहे. पहिले थोडके होते. आलीकडे अंजनवेली व उंदेरीहून[१] मदत त्यास आली. एकून भरती झाली आहे. अंजनवेलही मजबूतच आहे.

१. उंदेरी की खांदेरी ते स्पष्ट नाही, तरी पुढील संदर्भावरून उंदेरीच असावे.

उंदेरीही मजबूतच आहे. चारी जंजिरे त्याचे बरे खबरदार मुसलमानच आहेत. अंजनवेलीस काही मराठे असतील. त्यांकडे विजयगड, गोवळचा कोट दोन आहेतच. तिसरा मंडणगडही त्याने बळाविला आहे. रायगडावर तीन चारशे माणूस मुसलमान आहेत. चारपाचशे मराठे आहेत. गड न (?) बळाविला आहे. जुंजतात. काही पैगामही वरील लागला म्हणून गेले आहेत. ते लिहितात सत्यमिथ्या त ही क क तह किंवा नाही कळले नाही. वर्तमान येईल ते लिहून पाठवून. ऐसे वर्तमान आहे. सविस्तर कळावे म्हणून लिहिले असे. लोभ असो दिजे हे विनंती. छ २२ जिल्हेज शनवार.

यानंतर शिद्दी रहिमान याचा भाऊ शिद्दी रह्यान, हा स्वारांची एक मोठी टोळी घेऊन बाजीरावावर चालून आला. लढाईस सुरुवात झाली. तीत बाजीरावाची गोळी लागून तो शिद्दी रणभूमीवर पतन पावला. दंडाराजपुरीपर्यंत बाजीरावाने त्याच्या स्वारांचा पिच्छा सोडिला नाही. जंजिरा किल्ल्यास खुष्कीचे बाजूने त्याने वेढा दिला आणि मोर्चेबंदी करून तोफांचा दणका सुरू केला. त्यासमयी तोफ डागण्याचे काम त्याने स्वत: चालविले. याप्रमाणे या बाजूने तोफांचा धोधोधो धडाका चालला आहे, तोच समुद्राच्या बाजूने आरमारावरचा सरदार मानाजी आंग्र्या याजकडून किल्ल्याला वेढा पुरा करवून त्याजकडूनही शत्रूवर तोफांचा मारा चालविला. बाजीरावाच्या डाव्या, उजव्या बाजूस व डोक्यावरून किल्ल्यावरचे गोळे धाड धाड जाऊन पडत. एक गोळा त्याच्या बसायाच्या घोड्यास लागून तो ठार झाला. तरी तो धैर्याचा पर्वत तिळमात्रही न डगमगता लागलीच दुसऱ्या घोड्यावर स्वार होऊन आपल्या शिपायांस व सरदारांस दम देत उभा राहिला. त्याच्या शौर्यापुढे शिद्दीचा इलाज चालेनासा झाला. शेवटी दांती तृण धरून आतले लोक त्यास शरण आले. बाजीरावाने असा विचार केला की, जंजिरा किल्ला फार मजबूद, मागे शिवाजी व संभाजी यांनी पुष्कळ वेळा प्रयत्न केले तरी तो पाडाव झाला नाही. जरी निश्चय धरून बसलो तरी किल्ला हाती लागण्यास महिनोगणती दिवस पाहिजेत. इकडे अशा शुष्क कामास फुकट दिवस घालवू तर तिकडे उत्तरेकडच्या मोहिमेची मोठमोठी कामे तशीच राहतील, सबब त्या वेळेस त्याने शिद्दीचे तहाचे बोलणे कबूल केले. त्यात असे ठरले की, शिद्दी रहिमान याजकडे जंजिऱ्याचे प्रमुखत्व असावे. त्याने बाजीरावाला अकरा महालांचे अर्धे उत्पन्न द्यावे. शिवाय रायगड,

तळे, घोसाळे, उचितगड व बीरवाडी हे किल्ले मराठ्यांच्या स्वाधीन करावे. याप्रमाणे युद्धाचा शेवट लावून, तो विजयी आणि विख्यात पेशवा सातार्‍यास शाहूराजाचे भेटीस गेला. तेथे त्याची फार वाहवा झाली. महाराजांनी अत्यंत खुश होऊन नवीन मिळालेला रायगड वगैरे मुलूख बाजीरावाकडेच ठेविला. नंतर राजाची आज्ञा घेऊन तो पुण्यास गेला. तेथे पोहोचल्यावर त्याची लावण्यलतिका उपस्त्री मस्तानी प्रसूत होऊन तिला दिव्य पुत्र झाला. हबसाणच्या शिद्द्यावर समशेर गाजवून राजाची बहादुरी मिळवून पुण्यास आल्यावर हा लाभ झाला, म्हणून तत्सूचक त्या पुत्राचे नाव त्याने ''समशेरबहादर'' असे ठेविले. हाच पुढे बुंदेलखंडात बांड्याचा नबाब झाला. तो व त्याचे वंशज अल्लीबहादर, जुल्फिकार अल्ली वगैरे पुरुष पुढे पेशव्यास फार उपयोगी पडले, असे इतिहासांतरी लिहिले आहे.

सैन्य फार ठेविल्यामुळे बाजीरावास कर्ज बहुत झाले. सबब माळव्यातून कोकणाकडे जाताना त्याने शिंदे, होळकर यास आज्ञा दिली की, तुम्ही मोगलांच्या मुलुखांत लांबवर स्वार्‍या करून लुटीचा पैसा आम्हाकडे रवाना करावा. त्याप्रमाणे त्यांनी क्रम चालविला. तिकडून बाजीरावाकडे वकिलांची पत्रे आली त्यांत मतलब असा होता की, ''शिंदे, होळकर आपले लष्कर घेऊन लुटीत, जाळीत व खंडण्या घेत घेत आग्र्याचेही पलीकडे गेले. तेव्हा दिल्लीस बादशाहाचा वजीर खानडौरान याची पाचावर धारण बसली. तो अगदी घाबरून गेला. शिंदे, होळकर यांच्याशी सल्ला करून त्यांना कसे तरी माघारे लावून द्यावे असा त्याने विचार केला; परंतु धन्याच्या हुकुमाशिवाय तह करण्याची त्यांस स्वतंत्रता नसून ते हुकुमाचे ताबेदार. यामुळे ती गोष्ट त्यांना मान्य करता येईना. शेवटी वजिराने आपला भाऊ मुजफरखानबरोबर फौज देऊन त्यांच्यावर पाठविला. तो 'देखनेमें ढबू और चलनेमें शिवराई' होता. त्याने प्रथमदर्शनी मोठे अक्राळविक्राळ स्वरूप दाखविले. शत्रूला हां हां म्हणता नर्मदेच्या पार करून देतो, असा आव घातला. तो बाहेर निघाला त्या वेळेस त्याची कट्टी तयारी, हत्यारांचा लखलखाट, निशाणांचा फडफडाट व हांहूं पाहून हा खचीत विजयी होऊन येईल असे दिल्लीच्या लोकांस वाटले; पण 'गर्जेल ते पडेल काय आणि बोलेल ते करील काय?' खानाने सरते शेवटी डोंगर पोखरून उंदीर काढला. त्याचा तो अकटोविकट खटाटोप व्यर्थ झाला. खानसाहेब सरोंजेपर्यंत जाऊन तेथूनच भिऊन माघारे

पळाले आणि दिल्लीस जाऊन ''आम्ही यंव केले त्यंव केले, असा पराक्रम केला, मराठ्यांची अशी हबेलंडी उडविली,'' वगैरे खोट्यानाट्या गप्पा झोकून त्या फुशारकीत त्यांस चार शिव्याही हासडल्या; पण वास्तविक प्रकार होता तो निराळाच. शिंदे, होळकर मुजफरखानाबरोबर आस्ते आस्ते, धीराधीराने, आपले थोडकेसे लोक लढायास पाठवीत. ते दिवसास त्यांच्याशी सामना करून पळ काढिल्यासारखे दाखवीत आणि रात्री छापा घालून शत्रूच्या लष्करावर व डेरेरावट्यांवर निखारे पसरल्यासारखा बाणांचा वर्षाव करून त्यांस भाजून काढीत. याप्रमाणे लढाईचा बेत ठेवून मुलुखांतून खंडणीचा वसूल जमा करून व अवाचीसव्वा लूट घेऊन जमलेला पैसा बाजीरावाकडे वरचेवर पाठवीत. माळव्यांत व चंबळानदीचे दक्षिणेस मोगलांचे काही किल्ले होते, त्यांचा मराठ्यांच्या मारापुढे किल्लेदारांच्या हातून बंदोबस्त राहीना. तो सर्व मुलूख मराठ्यांच्या सैन्याने उद्ध्वस्त करून टाकिला. त्यांत आणखी रोहिले लोक मिसळून तेही मराठ्यांबरोबर स्वाऱ्या करू लागले. त्याच वेळेस होळकरास कंठाजी कदम बांडे याने गुजराथेवर स्वारी करण्यास बोलाविले. त्यासही रुकार देऊन तो गुजराथेकडे निघाला आणि अमदाबादचे उत्तरेकडेची कित्येक गावे लुटून, जाळून, पोळून व खंडणी घेऊन पुनः झपाट्याने ते दोघेही सरदार माळव्याकडे माघारे वळले.

असा त्यांचा पराक्रम ऐकून बाजीराव फार खुश झाला. मग नर्मदा नदीच्या पलीकडे जितका मुलूख काबीज केला होता तितका शिंदे, होळकर यांच्या ताब्यात त्याने ठेविला. शिंद्याच्या हाताखाली रामचंद्रपंत बाबा शेणवी यास दिवाणगिरी दिली. तो मोठा शूर आणि चतुर पुरुष होता. सावंताच्या वाडीजवळ आरोली गाव आहे तेथेचा तो कुळकर्णी. काही कारणावरून फोंडसावंताची त्यावर इतराजी झाली, म्हणून तो बाजीरावाच्या आश्रयास जाऊन राहिला. त्याच्या स्वारीत राहून त्याने कित्येक शूरत्वाची व चातुर्याची कृत्ये करून दाखविली, म्हणून त्यास दिवाणगिरी दिली. यजमान सुज्ञ असला तर गुणांची अशी परीक्षा होते.

♦♦

भाग-२२

# दिल्लीवरची स्वारी

**का**ही दिवस छोट्या छोट्या झटापटी झाल्या. कधी बादशाही फौजेस, पण बहुतांश वेळी मराठ्यांनाही यश मिळत होते. जयपुराजवळ मनोहरपूर येथे बाजीराव व जयसिंग यांची सन्मानपूर्वक भेट झाली. जयसिंगने बाजीरावास सनदा द्याव्यात ही आपली पूर्वीची सूचना दरबारापुढे विशेष करून मांडली. बादशाही दरबाराने या प्रश्नांची चालढकल करून दिरंगाई करण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे बाजीराव क्रुद्ध झाला. त्याने चढ्या आवाजात त्याची खरडपट्टी काढली. तो म्हणाला, ''एकही वचन तुम्हाकडून पाळले गेले नाही, सबब आता मागचे सर्व करारमदार रद्द आहेत असे समजावे'' असे म्हणून त्याने एक नवीन कलमबंदीची याद दिली. ''हीत लिहिल्याप्रमाणे तजवीज होत असेल तर बरे, नाहीपक्षी तुमचे कोणतेही बोलणे आम्हांस कबूल नाही,'' म्हणून साफ कळविले. त्या यादीत मागणे केले होते ते येणेप्रमाणे-

१. संपूर्ण माळवा प्रांत खालसा करून द्यावा. त्यांत रोहिले लोकांचा उपसर्ग नसावा.
२. चंबळा नदीचे दक्षिणेकडचा यच्चावत् मुलूख स्वाधीन करावा.
३. अमदाबाद, काशी, गया आणि मथुरा हा सर्व मुलूख आमच्या ताब्यात द्यावा.
४. स्वारीखर्चाबद्दल रोख पन्नास लक्ष रुपये बादशाही खजिन्यांतून द्यावे, अथवा तो पैसा फिटे तोपर्यंत बंगाल्याकडचा काही प्रांत

लावून द्यावा.

५. दक्षिण सहा सुभ्यांची सरदेशपांडेपणाची सनद द्यावी.

६. किल्ला मांडू, धार आणि रेसीन, हे तीन किल्ले स्वाधीन करावे.

या सहा कलमांपैकी सरदेशपांडेपणाचा हक्क सहा लक्ष रुपये नजराणा घेऊन देतो, असे बादशाहाने कबूल केले. बाकीच्या कलमांबद्दल साफीचा जबाब नाही, असे पाहून ८० हजार फौज बरोबर घेऊन बाजीरावाने दिल्लीकडे मोर्चा फिरविला. स्वारी नर्मदा उतरून पलीकडे चालली.

ही बातमी दिल्लीस कळताच बादशाहाचे धाबे दणाणले. त्याने निजामसाहेबास पत्रे पाठविली की, ''तुम्ही या वेळेस आमची ताबडतोब कुमक करावी.'' वजीर व मुत्सद्दी लोक यांनी अशी शक्कल काढिली की, ''बाजीराव अमर्याद मागणे मागून चेपीत चालला आहे हे ठीक नव्हे. आता मोठे प्रचंड सैन्य जमा करून त्यास भय दाखवावे; म्हणजे तो वारंवार उपद्रव देणार नाही.'' मग पोकळ डौल दाखविण्यासाठी त्यांनी दिल्ली शहराच्या आसपास शेकडो तंबू, डेरे, रावट्या व कथानी उभ्या केल्या आणि सर्व सैन्य मैदानभर पसरवून ते वायबार काढू लागले.

दिल्लीकडे मोठी गडबड आहे असे ऐकून बुंदेलखंडचा जगद्देव राजा, हा त्याचा मित्र होता, त्याजपाशी आपले अवजड सामान ठेवून बरोबर नेण्याजोगे हलके सामना होते ते घेऊन सड्या स्वारीनिशी बाजीराव तडकाफडकी पुढे निघाला. आग्र्याचे दक्षिणेस वीस कोसांवर यमुना नदीच्या काठी त्याचा तळ जाऊन पडला. त्याच्या आज्ञेवरून मल्हारराव होळकर, पिलाजीराव जाधव, विठोजीराव बोळे व दुसरे कित्येक मराठे सरदार यमुना नदी उतरून पलीकडे गेले. आणि दोआब प्रातांत शिरून त्यांनी मुसलमानांच्या राज्यांत लुटालूट आरंभिली. दिल्लीहून खानडौरान वजीर व कमरुद्दीनखान हे फौजबंद होऊन निघाले, ते नीट मथुरेकडे वळले. इकडे बाजीराव त्या प्रांतातला खंडणीचा वसूल करीत करीत चालला. बुधावरच्या राजाने मगरूरीचे काही भाषण केले, म्हणून त्याच्यावर हल्ला करून, त्याची हाडे खिळखिळी केली, आणि त्याजकडून खंडणीचा पैसा घेऊन त्याला जीवदान दिले. तिकडे मल्हारराव होळकरावर अयोध्येचा सुभेदार सादतखान मोठी फौज जमा करून एकाएकी येऊन पडला. तेव्हा मराठ्यांचे सैन्य यमुना नदी उतरून अलीकडे आले. तो सादतखान मोठा डौली आणि गप्पीदास मिय्यां

होता. मराठे यमुना नदीचे पलीकडे गेले एवढ्यानेच अस्मादिकांसारखा शूर योद्धा कोणी नाही असा त्याला गर्व झाला. त्याला स्वर्ग दोन बोटे उरला. त्याने बादशाहास खोटेनाटे लिहिले की, ''मल्हारराव होळकरास जबर जखमा लागून तो मरणोन्मुख झाला. विठोजीराव बोळे रणांगणीं ठार झाला. मराठ्यांचे दोन हजार स्वार कत्तल झाले आणि तितकेच लोक यमुना नदीत बुडून मेले. याप्रमाणे सरकारच्या कृपेने मला यश मिळाले. सर्व मराठे मी चंबळा नदीचे पलीकडे दक्षिणेत घालवून दिले.'' हे वर्तमान ऐकून दिल्लीत जो हर्ष झाला तो गगनात मावेना. जिकडे तिकडे खानाचा जयघोष चालला. खानसाहेबांवर शाबासक्यांची वृष्टी झाली. इकडे बाजीरावाचा जेथे तळ पडला होता, ती जागा समर करण्यास योग्य नव्हती, म्हणून सादतखान आग्र्यास जाऊन पोहोचल्याचे वर्तमान लागताच तो ते ठाणे सोडून ईशान्य दिशेस मोठे मैदान होते तिकडे वळला. बादशाहाच्या दरबारी वजिराच्या स्वारीबरोबर बाजीरावाचा धोंडोपंत पुरंदरे हा हुशार वकील होता. त्याने बाजीरावास सादतखानाने खोटे खोटे लिहिलेले सर्व वर्तमान कळविले. पुढे महंमदखान बंगष व खानडौरान हे दोघे एकत्र होऊन सादतखानास आग्र्यास जाऊन मिळाले. तेथे त्रिवर्गांची मसलत होऊन सादतखानाच्या सल्ल्याने वजिराने बाजीरावाचा वकील आपल्या स्वारीतून घालवून दिला. त्याने बाजीरावास ही सर्व हकीकत समक्ष विदित केली. हा अपमान बाजीरावास कसचा सहन होतो? त्याच्या तळव्याची आग मस्तकास जाऊन पोहोचली. अंगाचा तिळपापड झाला. तो म्हणाला, ''पुरंदरे, बरे आहे, काही चिंता नाही. तुम्ही तेथे माझे प्रतिनिधी या नात्याने होता; तेव्हा हा अपमान तुमचा नसून पेशव्यांचा व आमच्या महाराजांचा झाला आहे. तर आता पहा पात्यास पाते लागले नाही तोच मी आपली फौज दिल्ली शहरापुढे नेऊन मुसलमानांची घरेदारे जाळून टाकितो आणि बाजीराव अजून कोठे दूर गेला नाही, दिल्लीसच आहे, अशी त्यांची खात्री करितो.'' हे खरे वर्तमान दिल्लीस कळले तेव्हा तेथील दरबारचे लोक लटलटा कापू लागले.

खानडौरान वगैरे त्रिवर्गांचा संगम होण्याच्या पूर्वी सहा दिवस बाजीराव वायुवेगाने दिल्लीकडे निघाला. त्याने लांबची थोरली वाट सोडून जवळची आडवाट धरली. कमरुद्दीनखान उरलास तेथे सात-आठ कोसांवर सैन्यासह

होता, त्याला डावी घालून चुरामण प्रांतातील मेहेवाटच्या डोंगराला वळसा देऊन प्रत्यही वीस वीस - पंचवीस पंचवीस कोसांच्या मजला करीत, फौज घेऊन अकस्मात दिल्ली शहरापुढे प्रकट झाला. त्या प्रचंड सैन्यासह त्याने शहराबाहेर आपला डेरा दिला. दिल्ली शहरातून काही उंट व हत्ती बाहेर चालले होते ते प्रथम धरून नेले. काही तत्पक्षीय हिंदू लोक देवदर्शनार्थ बाहेर पडले होते, त्यांस लुटून सांगितले की, ''बाजीराव पेशवा बाहेर येऊन उतरला आहे, असा आपल्या बादशाहास निरोप कळवा.'' त्याला इतका जरी त्वेष आला होता, तरी रयतेस विनाकारण इजा देणे बरोबर नव्हे, असे जाणून त्याने कोणाचेही घरदार जाळले नाही व शहराची लूट केल्यास लुटीच्या ओझ्याने युद्धास अडचण पडेल, म्हणून त्याने लुटीचाही बेत रहित केला. बाजीरावाने खुद्द बादशाहास एक व राजा बखतमल्ल यास एक, अशी दोन पत्रे पाठवून विचारले की, ''शरण येऊन तह करण्याचा विचार आहे की, युद्धाची मर्जी आहे. यातून कोणते कबूल असेल ते लवकर कळवा.'' त्याचा त्यांजकडून जबाब आला की, ''आपला वकील मेहेरबानी करून इकडे पाठवावा म्हणजे त्याजवळ आम्ही आपले सविस्तर बोलणे बोलतो.'' त्याचे बाजीरावाने प्रत्युत्तर पाठविले की, ''आमच्या वकिलाच्या जिवाचा जिम्मा घेतल्याखेरीज आम्ही त्यास तुम्हाकडे पाठविण्यास कबूल नाही.'' आणखी कळविले की, ''आमची फौज नजीक असल्यामुळे शहराच्या लोकास व शहरास विनाकारण उपद्रव लागेल. एतदर्थ तूर्त झीलतलावाजवळ मैदान आहे तिकडे आम्ही आपला तळ हालवितो.'' या त्याच्या सौजन्याचा त्यांनी भलताच अर्थ काढिला, 'बाजीराव आम्हांस भितो म्हणून तो पलीकडे सरला, असा त्यांनी कुतर्क केला आणि युद्धाची कडेकोट तयारी चालविली. वजिराचा भाऊ मुजफरखान, मीर हुसेन कोका, राजा शिवसिंग व आणखी कित्येक सरदार व मानकरी, आठ-दहा हजार फौज घेऊन बाहेर पडले. शिंदे, होळकरांचा मागे खरपूस मार खाऊन मीच त्यास मारिले असे म्हणणारे जे गप्पीदास तेच हे मुजफरखान होत. मीर हुसेनखान हे एक दुसरे खान कोऱ्या दमाचे होते. त्यांचा यासमयी महामृत्यू नसला तरी अपमृत्यू जवळ आला होता. तिसरे शिवसिंग राजे, यांची तर शंभर वर्षे पुरी भरली होती. असो. हे सैन्य धैर्याने व शौर्याने बाजीरावावर चालले. त्याची हालचाल कशी काय आहे, याचा तपास काढण्यासाठी

बाजीरावाने सयाजीराव जाधव बिनीवर पाठविला. 'दिल्लीवाले बंदोबस्ताने चालून येत आहेत,' अशी त्याने खबर देताच बाजीरावाचे होळकर, शिंदे वगैरे सरदार चिलखते चढवून, शस्त्रास्त्रे घेऊन व स्वार होऊन सज्ज झाले. त्यांना बाजीराव बोलला ''यार हो, चला, त्वरा करा, उशीर करू नका.'' असे म्हणण्याबरोबर प्रथम मल्हारराव होळकर व त्याच्या मागोमाग राणोजीराव शिंदा हे दोघे दोहीकडून चक्रासारखे गरके घेऊन शत्रुसैन्यावर मोठ्या वेगाने चालून गेले. पहिल्या सपाट्याबरोबर त्यांनी दिल्लीवाल्यांचे सहाशे-सातशे लोक लोळविले. शिंद्याचा सरदार इंद्राजीराव कदम जरा जखमी झाला व काही शिपाई जायां झाले. तिकडे बिचारा मीर हुसेनखान कोका अंगावर शतश: जखमा घेऊन लोळागोळा होऊन समरभूमीवर पडला. राजा शिवसिंग धारातीर्थी देहविसर्जन करून ''शिव शिव'' म्हणत शिवलोकास गेला. मुजफरखानाने तर मागच्यामागेच पोबारा केला. अशी सरदारांची त्रेधा झालेली पाहून मोगलांच्या स्वारांनी घोड्यावरून धडाधड उड्या टाकून शत्रूस पाठ दाखवून दिल्लीकडे पलायन आरंभिले. याप्रमाणे शत्रूचा पराजय झाला आणि बाजीरावाचा जय झाला. याप्रसंगी मोरोपंतांच्या या वीररसपर आर्यांची स्फूर्ति होते!

**शक्ति असेल तरि तुम्ही रक्षा मी आपुली प्रतिज्ञा ती ।।**
**संरक्षितों कराया स्वर्गीं संतृप्त संप्रति ज्ञाती ।।१।।**
**जे जे लोकीं असती रस त्यांची ती न माधुरी थोडी ।।**
**परि अरिच्या रक्तरसीं जम बहु त्यांहून लागली गोडी ।।२।।**
**ऐसें वदोनि ओष्ठप्रांत जिभेने पुनः पुन्हा चाटी ।।**
**अवलंबी अत्युग्रा भीम अतृप्त द्विपारिची धाटी ।।३।।**
**धांवति अन्योन्यावरि ते दोघे आठवूनि अपकार ।।**
**जाणों ते मदमत्त क्रोधोद्धत दंपतीच अपकार ।।४।।**
**रिपु शूर दूर तेथुनि ते दारुण कर्म पाहतां पळती ।।**
**किति पडती किति दडती कितिएकांची धृतायुधें गळती ।।५।।**

असा या लढाईत चमत्कार झाला. शत्रूचे काही हत्ती व दोन-तीन हजार उत्तम घोडे आयते बाजीरावाच्या हाती लागले. याप्रमाणे बाजीरावाची सरशी आणि मोगलांची धूळधाण झाली.

असा या युद्धाचा शेवट होऊन बाजीरावाचे सैन्य जरा विश्रांती घेत

बसले होते, इतक्यात तिसऱ्या प्रहराच्या सुमारास कमरुद्दीनखान नव्या उमेदीचे काही सैन्य घेऊन नजीक येऊन भिडला. बाजीरावाने लगेच त्याच्याबरोबर लढाईस सुरुवात केली. त्या झटापटीत मराठ्यांकडील तीस लोक मेले. पुढे तोंडास तोंड दिसेनासे झाल्यावर लढाईचे काम तहकूब राहिले. शहराकडून खानडौरान आणि सादतखान यांच्या फौजा कमरुद्दीनाचे कुमकेस येत आहेत अशी बाजीरावास बातमी लागली. तेव्हा आपल्या लोकांस थोडी विश्रांती मिळाली पाहिजे असा विचार करून त्याने रातोरात कूच करून फटफटित उजेडण्याच्या आत आपले ठाणे तेथून पश्चिमेस चार कोस मागे हटविले. दुसरे दिवशी प्रात:काळी संकेताप्रमाणे वजीर व सादतखान कमरुद्दीनास जाऊन मिळाले; परंतु बाजीरावाचा पाठलाग करण्याची किंवा त्याच्या अंगावर एकदम चालून जाण्याची त्यांची छाती होईना. इकडे रेवारी व मंदावराकडचे गाव लुटीत तो नीट ग्वालेरीकडे चालला. आता यमुना नदी ओलांडून पावसाळ्याचे आत सर्व दोआब प्रांत लुटून फस्त करायचा, असा त्याने बेत केला. तिकडे माळवा प्रांतात वसुलाच्या कामी निजाम आडवा येऊन कदाचित अडथळा करील, म्हणून त्याने बंधूस लिहिले की, ''अप्पा, निजामसाहेबाची हालचाल व तयारी यांजवर चांगले लक्ष ठेव. तो नर्मदा उतरून आलीकडे येण्याचा इलाज करील तर त्याचा ताबडतोब पाठलाग करून त्याच्या अंगावर स्वार घालून त्याच्या आघाड्यापिछाड्यांचे दोर त्याच्या गळ्यांत घालून त्याला मागच्यामागे उताणा पाड.'' इकडे बाजीराव तसाच पुढे यमुना नदीकडे चालला, इतक्यात कोकणचे गडबडीचे वर्तमान ऐकून राजाने बाजीरावास दक्षिणेत ताबडतोब निघून जाण्याबद्दल आज्ञापत्र लिहिले. यामुळे बादशाहाने सल्ल्याचे बोलणे लाविले होते ते कबूल करून, 'माळवा प्रांताचे सर्व आधिपत्य व तेरा लक्ष रुपये स्वारीखर्चाबद्दल रोख देतो' असे त्याजकडून करार लिहून घेतला. मग पूर्वीचाच वकील धोंडोपंत पुरंदरे यास बादशाहाच्या दरबारी पुन: ठेवून व दोआबच्या स्वारीचा बेत रहित करून बाजीराव दक्षिणेकडे वळला. इ.स. १७३६ मध्ये सातारा मुक्कामी प्रथम महाराजांची भेट घेऊन मग शनिवार वाड्याचे काम पुरे झाले होते ते पाहण्यास तो पुण्यास गेला.

♦♦

भाग-२३

# पोर्तुगीज लोकांवर स्वारी

**इ.**स. १७२१ पासून बाजीराव पुण्यास राहू लागला. तेव्हापासून ते राजधानी शहर बनत गेले. तेथे हळूहळू वस्ती वाढत चालली. सरकारच्या आश्रयाने व्यापारास उत्तेजन मिळू लागले. नवीन मोठमोठ्या इमारती तयार झाल्या. मुळा नदीच्या काठी 'बड्या आरबाचा किलसार' या नावाचा कोट होता, तो पाडून ती बखळ जागा दिवाण पुरंदरे व चिटणीस यांस राहावयास बक्षीस दिली. तेथे त्यांनी इ.स. १७२८ मध्ये आपापले वाडे बांधिले.

गावात पाण्याची फार टंचाई होती, तिकडेही बाजीरावाचे लक्ष पोहोचले. पुण्याचे दक्षिणेस तीन कोसांवर कात्रजचा घाट आहे, तेथे एक मोठा तलाव बांधून त्यात डोगरांतले पाणी अडवून घेतले. त्यात पाण्याचा पुरवठा कसा आहे हे पाहण्यासाठी तो एकदा त्या तलावाच्या काठीच जाऊन राहिला आणि अकरा दिवस अहोरात्र तेथे त्याने दहा मोटा चालविल्या, तरी त्यातले एक तसूभरही पाणी कमी झाले नाही. अशी परीक्षा करून तेथून त्याने गावात एक मोठा खापरी नळ बांधून आणिला आणि जिकडे तिकडे हौद बांधून गावात ते पाणी खेळविले. तेणेकरून शहरास स्वच्छता व शोभा येऊन लोकांची पाण्याची ददात मिटली.

पुढे खुद्द पेशव्यांस राहण्याकरिता एक मोठा वाडा बांधण्याचा बेत ठरला. त्या कामासाठी कसब्यांत मावळवेशीजवळ मुळा नदीच्या काठी किरकोळ वस्ती होती ती उठविली. त्या जागेवर इ.स. १७२९ मध्ये

वाड्याच्या कामास आरंभ झाला. ते काम सतत सात वर्षे चालून इ.स. १७३६ मध्ये समाप्त झाले. त्या वाड्याने एकंदर औरस चौरस पाच बिघे जमीन व्यापिली. त्याच्या सभोवती चार हात रुंदीचा भक्कम तट बांधिला. तो तट मात्र अद्यापि कायम आहे. त्याला नऊ बुरूज आणि पाच दरवाजे केले. पहिला दिल्ली दरवाजा, दुसरा गणेश दरवाजा, तिसरा मस्तानी दरवाजा, चौथा जांबूळ दरवाजा आणि पाचवा विजापूर दरवाजा; अशी पाचास पाच नावे दिली. दिल्ली दरवाजा हा सगळ्यात मोठा. त्याचे तोंड दिल्लीकडे उत्तराभिमुख आहे, म्हणून त्याला 'दिल्ली दरवाजा' हे नाव दिले. याजवरच पेशव्याचा चौघडा झडू लागला. या वाड्याला मजबूत आणि नक्षीदार असे चौक, दिवाणखाने व महाल पुष्कळ केले. त्या प्रत्येकास निरनिराळी नावे होती. चौकांच्या जोत्याचे दगड घोटून इतके गुळगुळीत केले होते की, त्यात आरशासारखे तोंड पाहावे. जांबूळ दरवाजाजवळ एक विस्तीर्ण गणपतीचा रंगमहाल केला. त्याची बांधणी फार सुरेख झाली. त्यातील नक्षीदार लाकडी छताचे रोगण व सोनेरी मुलाम्याचे काम इतके उत्कृष्ट झाले की, ते पाहताच डोळे दिपून जावेत. दिवाणखान्यात सुरूचे मोठमोठे खांब व त्यांजवर मेहेरपदार कमानी केल्या. त्यांजवर हिरवेगार मिन्याचे रोगण चढविले. हिरव्या अस्मानी, केशरी, जांबळ्या, तांबड्या व पांढऱ्या रंगाच्या हांड्या आणि झुंबरे छतास टांगिली. त्यात पाऊणपाऊणशे शंभर मेणबत्त्या लागण्यासारखे एकेक बिलोरी झाड होते. चालताना सरासर पाय घसरावे अशा गुळगुळीत जमिनी केल्या. भिंतींना तजेलदार रोगण करून, त्यांजवर नाना प्रकारची सुरेख चित्रे व बेलबूट काढिले. दरएक दालनात भारत, रामायण यातले अनेक युद्धप्रसंग, देवदानवांच्या लढाया, क्षीरसागरी तरंगत असलेली वटपत्रशायी नारायणाची मूर्ती, देवदैत्यांचे समुद्रमंथन, अमृतकुंभ हाती घेऊन उभयताच्या पंक्तीना वाढीत असलेली मोहिनी, रामलक्ष्मण व सीता यांचा वनवास, कृष्णजन्म, स्वयंवरे व कचेऱ्यांचे थाट काढिले होते. सुरूची झाडे इतकी हुबेहूब रेखिली की, जणू ती खरोखरच चुनेगच्ची पेल्यांतून उगवली आहेत, असा भास होई. मोठमोठ्या कचेऱ्या व दरबार या गणपती महालातच भरत असत. भाद्रपदमासी गणपतीचा उत्साह याच महालात होत असे. त्यासमयी मखराच्या दोन्ही बाजूस मेणबत्त्या लावीत. त्या केळीच्या खुंटाएवढ्या जाड असत, असे

बखर लिहिणारांनी लिहिले आहे.

दुसरा हस्तिदंती महाल, त्यात हस्तिदंताचे उत्तम प्रकारचे काम केले होते. सहाव्या भागात आम्ही जी बाजीरावाची उपस्त्री मस्तानी सांगितली तिचा हा महाल होय. तिच्या नाजूक तनूची व शरीरकांतीची एका बखरीत अशी गोष्ट लिहिली आहे की, विडा खाताना त्याचा रंग तिच्या गळ्यात दिसे. याचे नाव सौंदर्य!

तिसरा अयने महाल. तो खाली-वर व सर्व बाजूंनी आरशांनी मढविला होता. त्यात जाऊन दार बंद केले म्हणजे बाहेर पडण्याची वाट सापडत नसे. बाजीरावाची पट्टराणी काशीबाईसाहेब तिचा हा दिवाणखाना. सर्व चौकांमध्ये फडाचा चौक मोठा होता. तटाच्या आतल्या बाजूस एक गोड्या पाण्याची मोठी विहीर होती. तिचे निर्मल पाणी सर्व वाड्याभर खेळविले होते. त्या पाण्याचा एक मोठा हौद फडाच्या चौकांत असून, त्यामध्ये एक हजारी कारंजे बसविले होते. त्याचे उंच फवारे अहोरात्र थुईथुई चौफेर उडत असत. त्या ठिकाणी दु:खी कष्टी प्राणी गेला असता त्याच्या अंगावर थंडगार तुषार उडून कसलेही महद्दु:ख असले तरी ते तो तेथे क्षणभर विसरून जाई!

या वाड्यांतच एक सातमजली मनोरा होता. तेथून सहा कोसांवरचे आळंदीचे ज्ञानदेव मंदिराचे शिखर दिसे.

याशिवाय कोठी, मुदपाक, जामदारखाने, जवाहीरखाने, फरासखाने, स्नानाच्या जागा इत्यादी पुष्कळ सायी केल्या होत्या. तो भुईकोट किल्ल्याच्याच तोडीचा नऊ बुरजी वाडा होता. त्याला एकंदर खर्च किती लागला तो नक्की आकडा कोठे मिळाला नाही. त्याला 'शनिवारचा वाडा' असे म्हणत. ते नाव अद्यापि प्रसिद्ध आहे.

वाड्याच्या सभोवती एक 'चिमणबाग' होता. त्यात अनेक रंगांची व अनेक जातींची फुले, झाडे, केळी, नारळी, पोफळा, इत्यादी होत्या. त्यांची हिरवीगार पाने उन्हामध्ये पाचूसारखी चकाकत. तो एक हिरवागार इराणी गालिचाच पसरला आहे की काय असे वाटे. त्या बागेत मधून मधून रुप्याच्या साखळीसारखे पाण्याचे निरुंद पाट काढले होते. ते झुळुझुळु वाहत असत. अशी त्या वाड्याची अंतर्बाह्य शोभा तोंडाने कितीही सांगितली, लेखणीने कितीही लिहिली व कलमाने कितीही रेखाटली तरी बस होणार नाही.

पक्ष्यांस चारापाणी घालण्यासाठी गावाबाहेर नदीच्या कांठी बाजीरावाने एक मोठा कबुतरखाना बांधविला. ब्राह्मणांच्या वार्षिक दक्षिणेचा रमणा येथेच होत असे.

बाजीरावाचा भाऊ चिमणाजी अप्पा याने पुण्यास नदीच्या काठी ओंकारेश्वराचे अष्टपैलू सुंदर शिवालय बांधविले. त्याच्या आतल्या बाजूस जागजागी कमानी देऊन वर घुमट केले आहेत. त्याला दोन दरवाजे आणि नऊ कळस आहेत. मधला कळस सर्वांत उंच आहे. हे कळस दुरून काहीसे डोंगराच्या शिखरासारखे दिसतात. त्यांजवर त्रिपुरी पौर्णिमेच्या दिवशी दिवे पाजळतात, तेव्हा दुरून तो उजेड डोंगराला वणवा लागल्यासारखा दिसतो. गोरगरीब, पांथस्थ, तडीतापडी, संन्यासी यांस राहण्यासाठी व उतरण्याकरिता देवळाच्या दोही बाजूस एकेक खणाच्या दगडी ओऱ्या केल्या आहेत. देवळाच्या बाहेर नदीच्या पात्रापर्यंत घाट बांधला आहे. त्याच्या वरच्या अंगास लहानसा बेलतुलसीफुले यांचा एक मजेदार बाग केला होता. या देवळाच्या कामास अजमासे एक लक्ष रुपये खर्च लागला असे लिहिले आहे. चितराव म्हणून एक चतुर कारागीर ब्राह्मण होता, त्याच्या हातून हे काम करविले.

बाजीरावाची धाकटी बहीण भिऊताई ही बारामतीचे सावकार जोशी यांचे घरी दिली होती. तिने पुण्यास एक अमृतेश्वराचे सुंदर देवालय बांधविले. ते लहानच आहे; पण त्याची बांधणी फार सुरेख आहे.

अशा अनेक ठिकाणी अनेक इमारती होऊन पुणे शहरास शोभा येत चालली.

बाजीरावाचा सगळ्यात धाकटा मुलगा जनार्दनबाबा याला इ.स. १७३६ मध्ये सातवे वर्ष लागले. या नव्या वाड्यांतच बाजीरावाने त्यावर्षी त्याची मुंज मोठ्या समारंभाने केली. एक दिवस बाजीराव भोजनोत्तर दिवाणखान्यात विडा खात बसला होता. जवळ कुलपुरोहित बाळंभटजी दादा कर्वे, दिवाण पुरंदरे वगैरे, चार आश्रित व स्नेही मंडळी इकडच्या तिकडच्या गोष्टी सांगत बसली होती. वडील मुलगा नाना आणि मधला मुलगा रघुनाथ हे बापाच्या शेजारी दोहो बाजूस दोघे बसले होते. जनू, समशेर आणि सदाशिव ही तीन मुले बाजीरावाच्या पाठीशी लोडाजवळ खेळत बागडत होती. त्या मुलांची त्यासमयी वये होती ती येणेप्रमाणे- वडील मुलगा बाळाजीपंत नाना, वर्षे चौदा; मधला रघुनाथराव दादा, वर्षे दहा; धाकटा जनार्दन

बाबा, वर्षे सात आणि चौथा मस्तानीपासून झालेला समशेर बहादर वर्षे तीन; चिमाजी अप्पाचा मुलगा सदाशिवराव भाऊ, वर्षे पाच. ही मुले, तोंडाकडे निरखून पाहील कोण असा ज्यांचा दरारा त्या बाजीरावाच्या अंगावर निर्धास्तपणे लोळत होती व त्याची शेंडी, मिशा, नाक, कान धरून ओढीत होती. कसा चमत्कार आहे पाहा! रामदास स्वामी म्हणतात की-

व्याघ्रसिंह भयानक! देखोनि भयचकित होती लोक ।।
परी त्यांचीं पिलं नि:शंक । तयांपुढे खेळती ।।
- दासबोध

असा देवाच्या घरचा खेळ आहे! असो. बोलता बोलता बाजीराव पुरोहितास म्हणाला, ''दादा, गोपिका (भिकोबा नाईक रास्ते यांची कन्या) ही मनाजोगी नवरी मिळाली. रघुनाथाला गुहागरकर ओकांची मुलगी सांगून आली आहे. तिचा बाप राघोपंत याने मनस्वी गळ घातली आहे. त्याचा आमचा फार स्नेह, यामुळे आमच्याने ना म्हणवत नाही. पण त्या मुलीच्या स्वभावावरून ती आपल्या आईच्या थळीवर जाईल असे वाटते. रघुनाथ काय आपला भरारी मुलगा, त्याच्या गळ्यात असली घोरपड पडली तर तिच्या नादाने तो कोणीकडे भरकटेल याचा नेम नाही. यासाठी तुम्ही व आबा असे दोघे एकदा स्वत: जाऊन मुलीच्या गुणांची परीक्षा करा. ती बरीशी न वाटली तर आम्हाला कर्तव्य नाही. तिला सोडून दुसरी करता येईल.'' असे बोलणे चालले आहे तो पाठीशी समशेर आणि जनू यांचे झोंबट लागले होते तिकडे बाजीरावाचे लक्ष गेले. जनूच्या जानव्यांत डोके अडकवून दोन्ही मुठींनी ते समशेराने घट्ट धरिले आणि ते तो सोडीना. गळ्यातून जानवे निघायला झाले म्हणून ते संभाळण्याकरिता जनूचे दोन्ही हात जानव्याला अडकून राहिले. अशी दोघांची ओढाताण चालली असता जनू मोठ्याने ओरडला. तेव्हा बाजीराव म्हणाला, ''उपाध्येबोवा, हे समशेराचे भांडण कशासाठी चालले आहे पाहिलेत ना? काढा एखाद्या ऋषिवचनाचा आधार असला तर म्हणजे अप्पाच्या मुलाबरोबर याच्याही गळ्यात जानवे घालून टाकू.'' असे यजमान आणि उपाध्ये यांचे विनोदपर बोलणे चालले आहे, इतक्यात सांडणीस्वाराबरोबर साताऱ्याहून एक जरूरीचा सरकारी लखोटा आला. तो गुलाबसिंग जमादाराने वर आणून दिवाणांच्या हाती

दिला. त्यांत मानाजी आंग्र्याच्या मदतीकरिता विलंब न करता कोकणात स्वारी करावी, अशी राजाची आज्ञा होती. लागलेच बाजीरावाने सैन्य तयार राहण्यासाठी हुकूम दिला. बारा हजार फौज घेऊन चिमणाजी अप्पासह तो तिकडे निघाला. कोकणात राज्यकारण उपस्थित झाले होते ते असे-

पोर्तुगीज लोकांच्या मदतीने कुलाबा किल्ला मानाजी आंग्र्याच्या हाती लागला; परंतु या कामगिरीबद्दल आंग्र्याने त्या लोकांस रेवदंड्यानजीक काही मुलूख देण्याचे कबूल केले होते. तो देण्यास मानाजी आढेवेढे घेऊ लागला. यास्तव पोर्तुगीज लोकांनी पुन: संभाजी आंग्र्याचा पक्ष स्वीकारून ते मानाजीपासून कुलाबा परतून घ्यावयास सिद्ध झाले. तेव्हा मानाजीने शाहूराजाचा आश्रय मागितला. मग पोर्तुगीज लोकांच्या निवारणार्थ राजाज्ञेवरून बाजीराव पेशवा कोकणात जाऊन पोहोचला. कुलाब्यानजीक पोर्तुगीज लोकांचे व बाजीरावाचे तुमुल युद्ध झाले. त्यांजवर त्याने गोळ्यांचा पाऊस पाडिला. शेकडो फिरंगी तलवारीने चराचरा कापून काढिले आणि आपल्या लोकांस उत्तेजन देत देत बाजीराव पुढे पुढे सरत चालला. तेव्हा पोर्तुगीज लोक भयभीत होऊन रणांगण सोडून पळाले व बाजीरावास जय मिळाला.

कुलाबा मानाजीचे स्वाधीन झाला. त्याचा इष्ट हेतू सिद्धीस गेला. याजबद्दल त्याने दरसाल रोख सात हजार रुपये व तीन हजार रुपये किमतीचे बिलोरी वगैरे सामान (काही विलायती व काही चिनई) द्यावे, असा करार केला. याशिवाय त्याने पेशव्यास काही किल्लेही दिले. हे वर्तमान इ.स. १७३४ मध्ये घडले. पुढे साष्टीकडे पोर्तुगीज् लोक हिंदू लोकांस बाटवून फार त्रास देत आहेत, असे वर्तमान समजले. तेव्हा बाजीरावाने तिकडे आपला मोर्चा फिरवून त्यांची खोड मोडिली. हा वृत्तांत आता पुढे सांगू.

♦♦

भाग-२४
# लढाईची तयारी

**इ.**स. १७३७ मध्ये कुलाबा किल्ला मानाजी आंग्र्याच्या स्वाधीन करून साष्टी प्रांतात पोर्तुगीज लोकांनी हिंदूस बाटविण्याचा तडाखा चालविला होता, त्यांस सोडविण्यासाठी बाजीराव त्या प्रांताकडे वळला. त्याच्या जवळ विसाजीपंत लेले या नावाचा एक कारकून होता. त्याने पोर्तुगीज लोकांच्या नोकरीस हिंदू लोक होते त्यांस आपल्याकडे वश करून घेतले आणि तारीख ६ एप्रिल रोजी रात्री सर्वांची निजानीज झाल्यावर छापा घालून वसईनजीक नदीच्या पलीकडचा घोडबंदर किल्ला त्याने हस्तगत केला. किल्ल्यातील शिपाई व त्यांजवरचा फिरंगा सरदार हे जिवावर उदार होऊन लढाईस उभे राहिले, तेव्हा त्या सर्वांची शिरकमळे त्याने कंठनालापासून तलवारीने छटाछट् सोडविली. दुसऱ्या दिवशी म्हणजे तारीख ७ रोजी मराठे नदीचा काठ धरून बसले, यामुळे वसईहून साष्टी प्रांतात पोटापाण्याचे सामान पोर्तुगीज लोकांकडे जावयाचे बंद पडले. येणेकरून त्या लोकांची त्रेधा उडाली. हजारो मराठे स्वार नदी उतरून ठाण्यावर चालले. ठाण्याची तटबंदी त्या वेळेस पुरी झाली नव्हती. साष्टी प्रांताचा पोर्तुगीज सुभेदार लुईस बोटेलो हा त्यासमयी ठाण्यास होता. त्याने भयभीत होऊन लागलेच कारंज्याकडे पलायन केले. ठाण्यास कप्तान पेरिरा आणि वांद्र्यास कप्तान फिराझ हे दोन सरदार मात्र दोन ठिकाणी राहिले होते. त्या दोघांमध्ये पेरिरा खरा शूर होता. त्याने मराठ्यांचे दोन हल्ले मागे हटविले. दुसऱ्या हल्ल्याच्या वेळेस त्याला चिमणाजी अप्पाची गोळी लागून तो जखमी

झाला. त्याच्या जागेवर दुसरा एक सरदार चढला. तो शेंदाड शिपाईच होता. त्याने उगीचच्या उगीच भयभीत होऊन अल्पधीर बायकोप्रमाणे पलायन केले. यामुळे ठाण्याचा किल्ला बाजीरावाच्या हाती सहज लागला. पुढे नीट वांद्र्यावर स्वारी चालली. तेथे इंग्रज लोकांनी पोर्तुगीज लोकांस गुप्त रीतीने दारूगोळ्याची मदत केल्याचे समजल्यामुळे मराठ्यांस पुन: म्यानातून तलवारी उपसाव्या लागल्या. त्याच सुमारास दिल्लीहून वर्तमान आले की, मराठ्यांच्या नाशार्थ बादशाहा व निजाम यांचे आतून सूत जमत चालले आहे. मग बाजीरावाने कोकणचे युद्ध चालू ठेवण्यास व मुलुखाच्या बंदोबस्तास काही नवीन अरब व पुष्कळ मावळे व हेटकरी लोक चाकरीस ठेवून सैन्याचा मोठा भाग हिंदुस्थानच्या स्वारीकरिता बरोबर घेऊन तो पुण्याकडे गेला.

तिकडे दिल्लीस बादशाहास वाटले की, बाजीराव पेशव्यास जो जो मऊ लागत चालले तो तो तो कोपराने खणीत चालला. आता हे विघ्न, त्याच्याशी मोठा युद्धप्रसंग केल्यावाचून टळावयाचे नाही. पण तसे करण्यास स्वत:च्या अंगी कुवत नव्हती, म्हणून त्याने निजामास लिहिले की, ''तुम्ही ताबडतोब इकडे येऊन आमची कुमक करावी. आता आमची सर्व भिस्त तुम्हांवर आहे. या समयी उपेक्षा कराल तर मराठे अधिक प्रबळ होऊन आपले मुलसमानांचे सर्व राज्य रसातळास जाईल. बाजीराव पेशव्याचा पराक्रम व चढती कळा पाहून हिंदू लोक बेफाम होत चालले आहेत. आम्हास ते रात्रंदिवस पाण्यात पाहतात. त्यांच्या कुराणात अटकेची अटक आहे तीही त्यांनी आता गाशात गुंडाळून ठेविली. पंजाबाकडचे शीक वगैरे हिंदू लोक उघड उघड बोलू लागले आहेत की,

**'सब् भूमि गोपालकी, ज्याके मनमे भटक उसकू अटक,**
**हम तो गोपलके दास, हमकूं काहेकी अटक.'**

बाजीराव मोठे सैन्य बरोबर घेऊन दिल्लीवर लौकरच स्वारी करणार अशी खबर आहे, तर तुम्ही निघून येण्यास दिरंग करू नये.'' असा बादशाहाचा निरोप पोहोचताच निजाम मोठी फौज बरोबर घेऊन दिल्लीस गेला. तेथे त्याचा बहुमान करून बादशाहाने त्यास खुश केले. त्याचा वडील पुत्र गाजीवदीन यास गुजराथ व माळवा या प्रांताचा अधिकार दिला. बुंदेलखंड व राजस्थान येथील सर्व मांडलिक राजांनी आपल्या फौजेनिशी

निजामाच्या ताब्यात राहून त्यास कुमक करावी, असे हुकूम दिले. निजामाचा तोफखाना उत्कृष्ट प्रतीचा होता आणि त्याच्या जवळ एकंदर पस्तीस हजार फौज जमली.

इकडे बाजीरावानेही आपली कडेकोट तयारी चालविली. स्वार, पायदळ, तोफखाना, डंके, निशाणे, हत्ती वगैरे चतुरंग दलावरच्या सरदारास सिद्ध होण्याविषयी त्याने हुकूम दिला. सेनापती यशवंतराव दाभाडे, समशेर बहादूर दमाजीराव गायकवाड, विठोजीराव कदम बांडे, फत्तेसिंग भोसले अक्कलकोटकर, शंभूसिंग जाधव, सेनासाहेब सुभे रघूजी भोसले नागपूरकर व सरलष्कर दावलशी सोमवंशी या सर्व सरदारांकडे फौजबंद होऊन आमच्या स्वारीत सत्वर दाखल व्हावे, अशी पत्रे रवाना झाली. बाजीरावाच्या सन्निध असणारे सरदार, चिमणाजी अप्पा व ज्वालाप्रसादसिंग, राणोजीराव शिंदे व अमरसिंग, मल्हारराव होळकर व पृथूसिंग, पिलाजीराव जाधव व ठाकूरसिंग, सयाजीराव गुजर व मंडूपसिंग, यशवंतराव पवार व चंद्रसिंग हे सर्व आपापल्या सैन्याभागांचे आधिपत्य घेऊन सज्ज झाले. सर्व पुणे प्रांत किंबहुना दक्षिण प्रांत या स्वारीच्या थाटाने गजबजून गेला. लढवय्ये लोकांच्या मुखावर वीरश्री चमकू लागली. दुसऱ्या दिवशी म्हणजे दसऱ्याच्या दिवशी स्वारीचा कूच होण्याचा बेत ठरला. सर्व व्यवस्था लावून बाजीराव आपल्या अयने महालाकडे रात्री गेला. तेथे त्याची प्रिय पत्नी काशीबाईसाहेब झोपाळ्यावर बसली होती.

संसारामध्ये पुरुषांचे सुखदु:ख बहुतांशी स्त्रियांवर अवलंबून असते. एखाद्या कजाग बायकोशी गाठ पडली म्हणजे पुरुष मोठा सुज्ञ पंचहत्यारी असला तरी त्याला त्राहि त्राहि होते, मग तो जर भोळासांब असला तर त्याच्या फजितीस सीमाच नाही. ती बया त्याचे दु:ख दुणावयास कारण होते आणि तो प्राणी संसारास त्रासून त्रागा करण्यास तयार होतो. तीच सुंदर, सुस्वभाव आणि सद्‌गुणी स्त्री सुदैवकरून वाट्यास आली असता ती आपल्या प्रिय पतीच्या दु:खास वाटेली होते. आपल्या सौजन्याने त्याचा शीण दूर करिते, आपल्या मित, मोहक व मधुर भाषणाने त्याचे मन सन्मार्गाकडे वळविते, आपल्या सुस्वभावसलिहाने त्याच्या तापत्रसंतापाचे शमन करिते आणि आपल्या सान्निध्याने त्याचे सर्वांग हर्षरोमांचित करिते. तिच्या स्मितललितमुखावलोकनाने त्याच्या सर्व चिंता अस्तंगत होतात आणि आपल्याला आनंद देण्याकरिताच ही

उत्पन्न झाली आहे असे त्याला वाटते.

अशा उत्तम कुलीन स्त्रियांत काशीबाईसाहेब शिरोभाग होती. तिच्या जवळ हिरी दासी उभी होती. तिने बाजीरावाला पाहून, पाहारेवाल्यास गैरराबत्याची वर्दी दिली आणि आपण दुसऱ्या द्वाराने निघून गेली. इकडे बाजीरावाची व त्या शीलसंपन्न कांतेची गाठ पडल्यावर तिचे व त्याचे भाषण झाले ते असे -

बाजीराव - (तिने मोतियाचा गजरा हाती दिला तो घेऊन) का, आता आम्हाला निरोप देता ना?

काशीबाई - पण मी मागे राहीन तर ना? मला नाही बाई इथे एकटीला करमायचे. स्वारीवर जाणे झाले म्हणजे मला एकेक दिवस वर्षासारखा जातो. बरोबर नेतो असे म्हटल्याशिवाय ती आता भाषणच करावयाची नाही. (जरा रुसल्यासारखे करिते).

बाजीराव - अबब! काय रागाचा फटकारा हा! काय बुवा या बायकांच्या रुसण्याला बुडखा ना शेंडा. स्वाऱ्या शिकाऱ्यांस बायकांना कधी कोणी नेले आहे का? तेथे बायकांचे लटांबर काय कामाचे? उगीच भलताच आग्रह धरू नये. चला आता आम्हांला निरोप द्या. या बायकांपाशी काय मोहिनी ठेविली आहे कोण जाणे? हे तोंड पाहिले की, आमची तहान भूक हरून जाते, थकवा आलेला नाहीसा होतो आणि पुन्हा नव्या स्वारीस ताजी उमेद येते.

काशीबाई - पुरे, पुरे! आहे ठाऊक काल्पी साखर! माणसांनी वाटेकडे टक लावून बसावे, रात्री झोपेत जरा आंग उघडे पडले की, हळूच शाल घालावी, जरा शिंक आली की काढे करावे; पण इथे त्याची ओळखसुद्धा नाही. म्हणतात तशी गत, 'शेळी जाते जिवानिशी नी खाणारा म्हणतो वातड.'

बाजीराव - शर्त आहे, या बायकांना बुवा नमस्कार असो! त्यांच्यासाठी आम्ही अरण्यवास करावे, थंडीवाऱ्यांतून फिरावे, उन्हाचे ताप सोसावे, असे शरीराचे रान करून घ्यावे, तरी आमच्या कपाळी त्यांचे टोमणे आहेतच! आम्ही लग्नात शपथच वाहिली आहे की, तुमच्या मर्जीबाहेर चालावयाचे नाही. निजाम आमचा येवढा दुस्मान; पण त्याचीसुद्धा आम्ही कैक वेळा भीड ऐकिली. मग तुम्ही तर आमची भरली लक्ष्मी, पट्टराणी.

मर्जी असल्यास स्वारीवर चला, आमची ना नाही.

काशीबाई - पुरे! राग, लोभ मला सगळा कळतो. मी या पायांजवळ इतके दिवस असून अजून मला बोलण्यातले छक्केपंजे नाही कळले तर माझ्या तोडीची अजागळ बायको कोणी नसेल. दुसऱ्याला हरभऱ्याच्या झाडावर कसे चढवावे, ही विद्या कोणाला पाहिजे तर इथून शिकून जावे. एवढे छत्रपती महाराज; पण तेसुद्धा अगदी मुठीत राहिले आहेत. मग आमचा बायकांचा पाड किती? पण काय करावे? स्वारी गेली म्हणजे ज्याचे नाव ते करमत नाही, स्वस्थ झोप येत नाही, खाणे नको, पिणे नको, काही नकोसे होते. विडा, पलंग, उटणे, अलंकार नकोसे होतात. जोगेश्वरी आईपुढे नाकधुऱ्या काढून माझे तिला नेहमी हेच मागणे असते की, आई, मी आपल्या कुळात धुतल्या तांदळासारखे निर्मळ राहावे आणि मला जन्मोजन्मी हेच पाय मिळावेत. आता या स्वारीच्या वेळेस मात्र मी आग्रह धरत नाही; पण पुढे मात्र ऐकावयाची नाही. वाटेत प्रकृतीस बाई चांगले जपले पाहिजे. जेव्हा जेव्हा म्हणायचे की, करीन तर अमिरी नाही तर फकिरी, असे म्हटल्याने कुठे चालत असते? 'शीर सलामत तर पगड्या पंचायशी.'

बाजीराव - मिळाला बुवा एकदा निरोप. आम्ही इतक्या लढाया मारल्या, एवढे राज्यकारभार पाहिले; पण या कामासारखे कोणतेच काम अवघड वाटले नाही.

याप्रमाणे काशीबाईचे व त्याचे भाषण होऊन दुसरे दिवशी बाजीरावाची स्वारी उत्तरेकडे निघाली. नर्मदेवर जाऊन पोहोचेपर्यंत त्याच्या जवळ निजामसाहेबाच्या तिप्पट म्हणजे सुमारे एक लक्ष सैन्य जमले. तरी या प्रचंड सैन्यात रघूजी भोसले, सेनापती दाभाडे, गायकवाड वगैरे वीर येऊन मिळाले नव्हते. वीर हजार फौजेनिशी नर्मदेवर चिमणाजी अप्पास बंदोबस्तास ठेविले आणि तो आपल्याबरोबर ऐंशी हजार फौज घेऊन नर्मदा ओलांडून पलीकडे मुलुखात शिरला. भोसल्याने काही सबब सांगून येण्याची टाळाटाळच केली. पुढे दोन्ही सैन्याची गाठ पडून भोपाळजवळ बाजीरावसाहेब व निजामसाहेब या दोघांमध्ये घनघोर युद्ध झाले. तो सुरस कथाभाग आता पुढच्या भागी कथन करू.

♦♦

भाग-२५

# ताल भोपाळची लढाई

**मा**गच्या भागात सांगितल्याप्रमाणे इ.स. १७३८ मध्ये बाजीराव नर्मदा उतरला. त्या वेळेस निजामसाहेब सरोजेस येऊन पोहोचला होता. तो पुढे बाजीरावावर चालून न जाता भोपाळच्या किल्ल्याजवळ मजबूतशी जागा पाहून तेथे सैन्याचा तळ देऊन राहिला. त्याच्या पुढच्या अंगास ओढा व पाठीशी तलाव होता. भोपाळ हे हल्ली तीस-चाळीस लक्षाचे एक मुसलमानी राज्य आहे. तेथे गादीची मालक राणी असून तिला 'भोपाळची बेगम' असे म्हणतात. किल्ल्याच्या आश्रयाने निजामसाहेब ती जागा धरून बाजीरावाची वाट पाहत बसला. त्याच्या आसपास बाजीरावाचा सैन्यसमुद्र पसरत चालला. प्रतिपक्षी बळकट स्थळ धरून बसला आहे, असे पाहून बाजीरावाने लगेच आपल्या सैन्याच्या मोठमोठ्या टोळ्या निजामाच्या लष्कराभोवती ठेवून त्याला वेढा दिला, असे काही दिवस लोटले. बाजीरावाने निजामाच्या सैन्यास दाणा, चारा, पाणी याचा इतका दुष्काळ पाडिला की, तेणेकरून तो अगदी गोगलगाय होऊन गेला. एक जागा धरून बसलो ही आपली मोठी चूक झाली असे म्हणून, तो संतापाने दाढीचे केस उपटू लागला. त्याचे लोक अत्यंत व्याकूळ झाले. 'अन्न रे, पाणी रे' असे तडफडत, शेकडो लोक पटापट मरू लागले. जीव जगतील कसे अशी सर्वांस काळजी पडली. दुष्काळात तेरावा महिना, याप्रमाणे त्यामध्ये काही आजारही उत्पन्न झाला. मग काय विचारावे? त्या लोकांच्या विपत्तीची परमावधी झाली. विक्राळ स्वरूप धारण करून आपल्यापुढे साक्षात मृत्यूच उभा आहे की काय असे प्रत्येकास वाटू लागले. वरिष्ठ-कनिष्ठ हा भेदाभेद राहिला नाही. खुद्द

निजामास कोणी ढुंकून पुसेना. ज्याला जसे भावेल तसे त्याने करावे, अशी धांदल उडाली. जो तो आपापल्या जिवाच्या फिकिरीत पडला. श्रम, तहान, ऊन यांच्या योगाने अतिशय व्याकूळ होऊन रस्त्यावरचे रस्त्यावर कितीएक पटापट प्राण सोडू लागले. प्राणोत्क्रमणसमयी आळेपिळे देऊन ते हातपाय झाडीत, तेव्हा त्यांजकडे कोणाच्यानेही पाहवेना. ही सर्व हकीकत, धावडशीचे महापुरुष श्रीब्रह्मेंद्रस्वामी, शाहूराजा व चिमाजी अप्पा यांस बाजीरावाने रणांगणांतून स्वदस्तूरची पत्रे लिहून कळविली. त्यात त्याने लिहिले की, ''म्हातारपणी निजामसाहेबाच्या बुद्धीस भ्रंश झाला असे खास वाटते. तो एवढा अनुभवशीर योद्धा असून त्याची बेसावधपणाची स्थिती पाहून मला मोठे नवल वाटते. दिल्लीकडे बातमी आहे की, निजामसाहेब आता वाचत नाही, त्याचा फडशा उडतो.'' निजाम जागा सोडून हालेना तेव्हा राणोजीराव शिंदे, पिलाजीराव जाधव व सयाजीराव गुजर या त्रिवर्ग सरदारांस त्याच्या अंगावर चालून जाण्यास बाजीरावाने इशारा केला. त्यांच्यावर निजामाने तोफांचा भडिमार सुरू केला. राजा जयसिंग याचा पुत्र, दहा हजार बुंदेलखंडी रजपूत शिपाई बरोबर घेऊन, मराठ्यांच्या अंगावर त्वेषाने चालून गेला. दोहीकडचे सरदार जिवाची पर्वा न करिता एकमेकांवर चवताळून उठले. दोघांची गोळागोळी व चकमक सुरू झाली. धुळीने, धुराने व गोळीबाराने दशदिशा धुंद होऊन दणाणून गेल्या. प्रथमच्याच झटापटीत निजामाकडचे सातशे घोडे व पाचशे रजपूत पतन पावले. बाजीरावाकडचे दोनशे शिपाई ठार व सुमारे तीनशे लोक जखमी झाले. शत्रू आपले ठाणे सोडून बाहेर पडेल तर त्याच्यावर मोठा हल्ला करून त्यास चोपून काढावे अशी मसलत करून तेथून जवळच दोन बाणांच्या टप्प्यावर एक चांगली बळकट व माऱ्याची जागा होती, तेथे निवडक फौज घेऊन बाजीराव उभा राहिला; परंतु त्याच्या मनात होते तसे घडून आले नाही. जयसिंगराजाच्या पुत्राचा पराजय होताच पराङ्मुख होऊन तो किल्ल्याकडे धूम पळत सुटला. इकडे मराठ्यांचे सैन्य बाहेरून निजामाला जो जो आत कोंडीत चालले तो तो त्याच्या खाण्यापिण्याचे अधिकाधिक हाल होऊ लागले. निजामाच्या गोटात अन्नाचा इतका दुष्काळ पडला की, त्याचे सैन्य एकमेकांस चावण्याच्या बेतात आले. बाजीरावाने आपले जखमी लोक नेववून त्याच्या औषधपाण्याचा व खाण्यापिण्याचा बंदोबस्त ठेवविला. कोणास कोठे जखम लागली याची

त्याने पूसतपास केली. निजामाच्या मागच्या अंगास जे सैन्य होते, त्याचे आधिपत्य अब्दुल मनसूरखान सफदरजंग व कोट्याचा राजा यांजकडे होते. हा अब्दुल मनसूरखान पुढे अयोध्येचा नबाब झाला व हाच प्रसिध्द सुजाउद्दवला याचा बाप होय. हे दोघे सरदार आपली फौज घेऊन दुसऱ्या वाटेने हळूच बाहेर पडले. तिकडे नजर पोहोचताच होळकर व पवार यास बाजीराव हाक मारून म्हणाला, ''गडेहो, चला, आता तुमची पाळी आहे. उठा, ते चोर तुमचा डोळा चुकवून पळत आहेत. त्यांच्या अंगावार पडून, भाले तरवारी यांचे शेलके हात काढून त्यांस आपले बाहुबळ दाखवा.'' अशी धन्याची आज्ञा होताच ते शूर सरदार शत्रूवर लागलेच बाणासारखे चालून गेले. एकदम चाळीस हजार स्वारांची मांड उठली. बंदुकांच्या बारांनी, घोड्यांच्या टापांनी व खिंकाळण्यांनी दशदिशा दणाणून गेल्या. आकाशपाताळ एक झाले. ''हरहर महादेव'' असा सिंहनाद करीत करीत ते योद्धे शत्रूच्या तोफांवर जाऊन भिडले. त्यासमयी निजामाचे १,५०० शिपाई जागच्याजागी चीत झाले. अशा धांदलीत कोठचे खानसाहेब आणि कोठचे राजेसाहेब! ना कोणी कोणाचा धनी, ना कोणी कोणाचा चाकर. जो उठला तो बाजीरावाला भिऊन निजामाकडे धूम पळत सुटला. घोडा एकीकडे, मंदील दुसरीकडे आणि खान भलतीकडेच, अशी अब्दुल मनसूरखानाची त्रेधा झाली. उरलेसुरले लोक पळत पळत जाऊन निजामाकडे रडगाणे गात उभे राहिले. बाजीरावसाहेब स्वार होऊन आपल्या सैन्यासमोर विजेसारखा चमकत होता आणि ''शाबास! होळकर, शाबास! पवार,'' असे वारंवार उत्तेजन देत होता. यामुळे मराठ्यांस वीरश्रीचा जास्तीच चेव येऊन ते शत्रूच्या सैन्यास आणखी आणखी आवळीत चालले. एक प्रसंगी मोरोपंताने म्हटले आहे की-

**जाणों त्या अत्युग्रा मूर्त श्रीनारसिंहमंत्रास ।**
**पाहोनि पावले ते रिपुभट भूपाळ भूत संत्रास ।।१।।**
**म्हणति मनुष्य नव्हे हा राक्षस की काळ हा खवळलाहो**
**कीं आमुची कराया मूर्त प्रळयाग्नि राख वळला हो ।।२।।**

असे प्रतिपक्षी निजामाच्या सैन्यास वाटले.

वेढ्यात सापडलेल्या हतभाग्य लोकांत एकच हाहाकार झाला. मुष्टीभर आटा व कटोराभर पाणी मिळण्याची त्यांस मुश्कील पडली. बाहेर बाजीरावाच्या

दास्तानांत शेकडो खंड्या गल्ला व शेकडो हौद पाणी भरलेले होते. त्याचे लोक कोणत्या वेळेस कोणत्या अंगाने आपल्या अंगावर तुटून पडून मृत्युमुखात टाकतील याचा शत्रूस भरवसा लागेना. यामुळे निजामाचे शिपाई डोळ्यांत तेल घालून खडा पहारा करीत होते. त्यांचे कित्येक दिवस अहोरात्र पात्यास पाते लागले नाही. मनुष्यास जिवापेक्षा प्यारी वस्तू कोणतीही नाही, हे खरे आहे. आता कसेतरी आपले प्राण वाचोत असे मनात आणून आम्ही तुमच्या पक्षास येऊन मिळतो, आमचा अंगीकार करावा, असे निजामाच्या रजपूत शिपायांनी बाजीरावाकडे बोलणे लाविले; परंतु वेढ्यात शत्रूची संख्या जितकी जास्त असेल तितका तो जेरीस लवकर येतो हे एक आणि जो आपले इमान खाचीत घालून पूर्वीच्या धन्याला सोडून दुसऱ्यास मिळतो तो दुसऱ्या धन्याबरोबरही बेइमानी करणार नाही कशावरून? हे दुसरे, अशा कारणांनी ते रजपुतांचे म्हणणे बाजीरावाने कबूल केले नाही. निजामाने दिल्लीस गुप्त पत्रे पाठविली की, ''मी मोठ्या संकटांत पडलो आहे. मला लौकर येऊन सोडवा, नाहींपेक्षा माझी धडगत नाहीं.'' तेव्हा त्याच्या मुक्ततेसाठी दिल्लीत वरकांती तयारी चालविली; परंतु वास्तविक प्रकार असा होता की, दिल्लीच्या दरबारात निजामाचा उत्कर्ष सहन होत नसे, यामुळे बाजीरावाने त्याची अशी हबेलंडी उडविलेली पाहून सर्व दरबारी लोकांच्या नेत्रातून आनंदाश्रूंच्या धारा चालल्या. हा प्रकार बाजीरावास पूर्वीच इत्थंभूत कळला होता, यामुळे दिल्लीची हालचाल पाहून तो अगदी डगमगला नाही. निजामाने आपला पुत्र नासीरजंग याजकडेही गुप्त पत्रे पाठविली. त्याजवरून जंगाची फौज औरंगाबादेनजीक फुलमर्डीजवळ जमत चालली व तो शूर पुत्र आपल्या बापास सोडविण्यासाठी मोठी फौज बरोबर घेऊन निकडीने हैदराबादेहून निघाला. बाजीरावास ही खबर कळली, तेव्हा त्याने सेनासाहेब सुभा रघूजी भोसला यास पत्रांवर पत्रे पाठविली. त्यात कित्येक आर्जवाची व कित्येक धमकीचीही लिहिली, तरी तो कुमकेस आला नाही. येथे रघूजी भोसल्याचा थोडा पूर्वापर संबंध सांगणे अवश्य आहे; म्हणजे त्यांचे न येण्याचे कारण लक्षात येईल.

बाजीराव पेशवा स्वारीवर गेला तेव्हा सेनासाहेब सुभा कान्होजी भोसला नागपूरकर याने राजाची आज्ञा मानली नाही, यास्तव शाहूने त्यास साताऱ्यास कैद केले आणि त्याचा भाऊबंद बेंबाजी भोसला याचा मुलगा रघूजी

भोसला यास ती पदवी दिली. हा रघूजी पूर्वी गोंडवनाच्या राज्यात एका मुसलमान सरदाराच्या व कान्होजीच्या हाताखाली काही दिवस थोड्या लोकांनिशी चाकरी करीत होता. रघूजी हा चतुर पुरुष असून काही कामगिरी सांगितली असता ती तो चांगली बजावी. लहान कामावर असल्यामुळे तो विशेष प्रसिद्धीस आला नव्हता. तो शिकारीच्या कामात प्रवीण आणि धीट असे. यास्तव शाहूराजा त्याला आपल्याबरोबर शिकारीस घेऊन जाई. राजा त्याला फार चाहत असे. त्याने आपली मेहुणी (शिरक्यांची कन्या) रघूजीस देवविली आणि इ.स. १७३४ मध्ये वऱ्हाडच्या सुभेदारीची त्यास सनद करून दिली. त्याजबद्दल नेहमी त्याने पाच हजार स्वार ठेवून सरकारची चाकरी करावी, वर्षास नऊ लक्ष रुपये सरकारपोत्यास रोख जमा करावे, शिवाय बाहेरची मोहीम येईल तेव्हा दहा हजार फौजेनिशी बाजीराव पेशव्यास कुमक करावी असे ठरले. याप्रमाणे तो राजाचा साडभाऊ झाल्यापासून त्याचे प्रस्थ वाढले. तो श्रीपतराव प्रतिनिधीचा परम मित्र होता. अर्थातच त्याला बाजीरावाचा उत्कर्ष सहन न होऊन तो त्याचा द्वेष करू लागला. नाकापेक्षा मोती जड होऊन ठरावाप्रमाणे भोपाळच्या लढाईस त्याने पेशव्यास अगदी कुमक केली नाही. बाजीरावाच्या पत्रास त्याने उडवाउडवीचीच उत्तरे दिली. अशी रघूजीची हकीकत आहे.

भोपाळच्या समरभूमीवरून बाजीरावाकडून महाराजास जरूरीने एक विनंतीपत्र गेले, त्यावरून यशवंतराव दाभाडे सेनापती सोनगडास गुजराथेत होता, त्यास ''पेशव्यांच्या कुमकेस जरूर निघून जाणे'' असे राजाने स्वदस्तूरचे पत्र लिहून निक्षून आज्ञा केली. बाजीरावाचा भाऊ चिमणाजी अप्पा फौजबंद होऊन नासीरजंगाच्या फौजेस प्रतिबंध करण्यासाठी तापी नदीच्या काठी दबा धरून बसला. त्याला बाजीरावाने लिहिले की, ''अप्पा, या वेळेस तुला जितकी फौज मिळेल तितकी जमा कर. फत्तेसिंग भोसले, शंभूसिंग जाधव, सरलष्कर वगैरे सरदारांस दक्षिणेकडून तुझ्या मदतीस बोलाव. सेनापती दाभाडे, गायकवाड व बांडे हे सरदार अद्यापि तापी नदी उतरले नसल्यास त्यांना आपल्याजवळ ठेवून घे आणि सर्वजण मिळून नासीरजंगाच्या फौजेवर नजर ठेवा. त्याला आलीकडे येऊ देऊ नका. निजामसाहेबाची तुम्ही काळजी सोडा. मी त्याची खबर घेतो. या वेळेस सर्व मराठे एकचित्त होऊन झटून मला मदत देतील तर दक्षिणेत मुसलमान होता

की नव्हता असे करून टाकीन.''

वर सांगितल्याप्रमाणे निजाम मोठ्या अडचणीत सापडला. तेथेच राहून आता उपयोग नाही असे जाणून ती जागा सोडून हळूहळू पलीकडे सरकत तो पीछेहाट करीत चालला. त्याच्या लष्कराबरोबर तोफा वगैरे अवजड सामान फार होते, यामुळे त्यास जलदीने मागे हटता येईना. सबब पुन: भयभीत होऊन माघारा वळून तो किल्ल्याच्या कोटांत शिरला. आतली जागा एवढ्या जगड्वाळ सैन्यास पुरेशी नव्हती; म्हणून काही लोक तटाच्या बाहेरच्या अंगासच राहिले. तट पाडण्याजोग्या मोठ्या तोफा बाजीरावाबरोबर नव्हत्या. तथापि, त्याने बाणांचा आणि चापांच्या व तोड्यांच्या बंदुकांनी, श्रावणझडीप्रमाणे शत्रुसैन्यावर गोळ्यांचा वर्षाव चालविला. त्या योगाने निजामाचे धाबे इतके दणाणले की, त्याला ताळ ना तंत्र. शेवटी त्याने 'मारीन किंवा मरेन' असाच निश्चय केला. मग जड जड सामान होते तितके सारे भोपाळ व इसलामगड येथे टाकून काही तोफा व उंटांवरचा जेजाला मात्र बरोबर घेऊन निजामाची स्वारी एकदाची बाहेर पडली. तेव्हा एकदम हल्ला करून शत्रूच्या तोफा हस्तगत करून घ्याव्यात अशी शिंदे, होळकर यांनी बाजीरावास सल्लामसलत दिली, ती त्याच्या पसंतीस आली आणि मराठ्यांनी तो उद्योग आरंभिला; परंतु निजामाच्या तोफांच्या मारापुढे त्यांचा यत्न सिद्धीस जाईना. हा मजकूर बाजीरावाने अप्पास स्वत: लिहून कळविला. तोफखान्याच्या आश्रयाने दररोज एक कोसाची किंवा दीड कोसाची मजल करीत करीत धीम्या चालीने सरोजेनजीक दुराई सुराई म्हणून दोन गाव आहेत तेथपर्यंत निजाम जाऊन पोहोचला. तरी मराठ्यांचे त्याच्या सभोवती कडे पडले होते ते कमी झाले नाही. इ.स. १७३८ च्या जानेवारीच्या १८ व्या तारखेस प्रथम वेढा पडला तो ११ फेब्रुवारीपर्यंत तसाच होता, चोवीस दिवस गुजरले तरी निजामास मुक्त होण्याची आशा दिसेना. मग तो शरण येऊन राणोजीराव शिंद्याच्या मार्फत त्यांने बाजीरावाकडे तहाचे बोलणे लाविले. ही गोष्ट होळकराच्या पसंतीस आली नाही. त्यासमयी निजामापाशी बाजीरावाने जे जे मागितले ते ते मुकाट्याने त्याने कबूल केले. ''सर्व माळवा प्रांत व नर्मदा आणि चंबळा या दोहो नद्यांच्या मधला सारा मुलूख बादशाहाकडून देववितो, शिवाय लढाईच्या खर्चाबद्दल रोख पन्नास लक्ष रुपये देतो,'' असा तारीख ११ फेब्रुवारी सन

१८३८ इसवीचा निजामाकडून स्वदस्तूरचा तहनामा लिहून घेऊन त्याच्या भोवतालचा गराडा उठविला.

या प्रकारेकरून मोठा जय मिळवून तो विजयध्वज पेशवा

**'ऐसें बोलत हांसत शत्रुरुधिरदिग्धपाणि मुख विकट ।**

**प्रकट महा भैरवसा नाचत गेला जयाच्युता निकट ।।'** मोरोपंत

अशा थाटाने प्रभू छत्रपती शाहूमहाराज व कनिष्ठ बंधू चिमाजी अप्पा यांच्या भेटीस तो दक्षिणेकडे निघाला.

♦♦

भाग-२६

# नादिरशाहावर स्वारीची तयारी

**इ.**स. १७३८ मध्ये निजामाने बाजीरावास तहनामा लिहून दिल्यावर भोपाळची लढाई समाप्त झाली. मग बाजीराव चंबळा नदीच्या दक्षिणेकडच्या मुलुखाची खंडणी घेत घेत पुण्यास परत आला.

भोपाळच्या लढाईच्या वेळेस ठरावाप्रमाणे सेनासाहेब सुभा रघूजी भोसला याने पेशव्यास मदत केली नाही. कोकणात मराठ्यांचे आणि पोर्तुगीज लोकांचे युद्ध चालले असता त्याने कोणाची आज्ञा वगैरे न घेता कटक प्रांत लुटला आणि हिंदुस्थानात अलाहाबादेपर्यंत स्वाऱ्या करून त्याने गडगंज लूट आणिली. अशी त्याची अमर्याद वर्तणूक पाहून बाजीरावास फार राग आला आणि तो पुण्याहून फौज घेऊन त्याजवर चालला. बिनीची फौज अवजी कावऱ्याबरोबर देऊन त्याला अग्रभागी वऱ्हाड प्रांत लुटण्यास पाठविले. त्याची व रघूजीची लढाई होऊन कावऱ्याचा पराजय झाला. पूर्वी सेनापती दाभाड्याबरोबर डभईजवळ जी लढाई झाली, त्याप्रसंगीही बिनीवर जात असता या अवजीबोवाचा असाच बोजवारा झाला होता. तरी बाजीरावाचा तो प्यारा सरदार असे. त्याचा पराजय झाला म्हणजे बाजीरावाला दुप्पट वीरश्री चढे. कावऱ्याच्या पराभवाचे वर्तमान समजल्याबरोबर तो कावराबावरा होऊन मोठ्या त्वेषाने दरकूच दरमुक्काम करीत भोसल्यावर मोठ्या दौडीने चालला.

मार्गात त्याला एक नवीन वर्तमान कळले की, इराणचा बादशाहा नादिरशाहा हा दिल्लीपर्यंत येऊन त्याने मोगलांचा पराजय केला व शहरात

जाऊन तो खंडणी गोळा करीत आहे. तेथील वजीर खानडौरान लढाईत पतन पावला. अयोध्येचा नबाब सादतखान शत्रूच्या हाती सापडून कैद झाला. आणखी पुढे गेला तो नसराबाद मुक्कामी त्याला आणखी ताजे वर्तमान समजले की, नादिरशाहाने महंमदशाहा बादशाहाससुद्धा कैद केले. दिल्ली शहर लुटून फस्त केले. सुमारे आठ हजार लोकांची सपासप डोकी उडविली. तेव्हा बाजीरावाने असा विचार केला की, हा एक मोठा शत्रू एकाएकी उद्‌भवला आहे, याचा अगोदर समाचार घेतला पाहिजे. घरची भांडणे तूर्त कानामागे टाकली पाहिजेत. या कार्यापेक्षा रघूजी भोसल्याचे पारिपत्य करण्यास जाणे हे कनिष्ठ कार्य होय, पोर्तुगीज लोकांशी चाललेले युद्ध तूर्त बंद केले पाहिजे. नादिरशाहा कदाचित महंमदशाहास ठार मारून आपणच दिल्लीचे तक्त बळकावून बसेल आणि पुढे सगळ्यांच्याच माना मुरगाळून माझ्या हिंदू लोकांस राज्यहीन करून त्यास धुळीचे दिवे खावयास लावील, सबब अगोदर त्याच्यावर स्वारी केली पाहिजे. पुढे आणखी बातमी आली की, सुमारे एक लक्ष इराणी सैन्य दक्षिणेवर चालून येत आहे. तरीदेखील त्याला भय कसले ते शिवले नाही. पुढे पुढे तसाच दिल्लीवर तो तडक चालला ''कोकणची लढाई तूर्त तहकूब ठेवून सैन्यासह ताबडतोब स्वारीत येऊन दाखल व्हा?'' असे त्याने चिमाजी अप्पास कोकणाकडे पत्र पाठविले. ''नादिरशाहा हा तुमचा व आमचा दोघांचाही शत्रू आहे, याकरिता तुम्ही आपली फौज घेऊन आम्हास लवकर कुमक करावी,'' असे निजामाचा मुलगा नासीरजंग यासही त्याने दक्षिणेकडे पत्र पाठविले. हिंदुस्थानाच्या एकंदर सर्व जातीच्या लोकांस त्याने असे जाहीर केले की, ''या आणीबाणीच्या प्रसंगी हिंदू व मुसलमान असा दुजाभाव मनात न आणिता सर्वांनी माझे साह्य केल्यास मी नादिरशाहास हां हां म्हणता हिंदुस्थानांतून हाकून लावीन. माझे मराठे या महत्कार्यासाठी नर्मदेपासून चंबळ नदीपर्यंत मी मुंग्यांसारखे पसरणार आहे.'' बाजीरावाने याप्रमाणे मोठी कडेकोट तयारी मार्ग चालता चालता चालविली. कोकणचे युद्ध बहुतेक संपले होते, सबब आज्ञेप्रमाणे चिमणाजी अप्पाने शिंदे व होळकर यास फौजेसह पेशव्याकडे पाठविले. पोर्तुगीज लोकांशी कोकणात घनघोर युद्ध झाले. त्याचे थोडक्यात वर्णन लिहून अप्पाने बाजीरावाकडे पत्र पाठविले, ते येणेप्रमाणे-

''श्री''

''वडिलांचे सेवेसी अपत्येसमान आप्पाने दोनी कर जोडून त्रिकाळ चरणांवर मस्तक ठेवून शिरसाष्टांग नमस्कार विज्ञापना तागाईत छ. ९ पावेतो किल्ला वसई, प्रांत कोकण, येथे स्वारीत वडिलांचे आशीर्वादेकरून वर्तमान यथास्थित असे, विशेष. आज्ञेप्रमाणे वीस हजार फौज बरोबर देऊन शिंदे व होळकर यास नादिरशाहावर स्वारी करण्यासाठी वडिलांकडे पाठविले आहे. इकडील हकीकत कळवीत आहे तिजवरून आज्ञेप्रमाणे पूर्वीच फौज का रवाना केली नाही ते विदित होईल. थोडे काम अद्यापि इकडे उरले आहे, ते आटपून मीही वडिलांच्या चरणांपाशी लवकरच हजर होतो.

''इकडे येण्याबरोबर एकेका सरदाराची एकेका स्वारीवर योजना केली. चिरंजीव व्यंकटराव घोरपडे यास काही स्वार देऊन गोव्यावर पाठविले. त्याने तिकडे गेल्यावर पोर्तुगीज् लोकांचा खूप धुवा उडविला. उत्तरेकडे खंडोजी माणकर याची योजना केली. त्याच्याशी शत्रू बहुत निकराने लढला, परंतु आमच्या पराक्रमी सैन्यापुढे त्याच्याने टिकाव धरवला नाही. बहुत किल्ले माणकराच्या हाती लागले. राणोजीराव व दुसरे कित्येक सरदार यांनी कतलवाडी, ढाणू, शिरगाव, केळवे आणि तारापूर हे सर्व किल्ले लढून सर केले. केळवेमाहीम व तारापूर येथे शिंद्याने फारच मर्दुमकी केली. तारापुराजवळ मोठे तुमुल युद्ध झाले. शिंद्याने तटाखाली चार सुरुंग पाडले. त्यापैकी दोन चांगले उडून तटास मोठे हत्तीच्या अंगाएवढे भोक पडले.

''बाजी भिवराव, रामचंद्र हरी, यशंवतराव पवार आणि तुकोजीराव पवार हे आपापले ध्वज घेऊन 'तू आधी की मी आधी' अशा स्पर्धेने व इर्षेने एकदम किल्ल्याकडे धावले. फिरंगीही या समयी जिवावर उदार होऊन लढला. काही वेळपर्यंत जय कोणास मिळतो याचा निश्चय होईना. शेवटी आमचा रणशूर सरदार सेनासाहेब सुभा राणोजी भोसला उमरावतीकर हा खंदकात उडी टाकून पोहत तटाजवळ गेला. त्याच्या मागून शिपायांनीही उड्या टाकल्या. पलीकडे तटावर चढण्यास त्यास वाट नव्हती. मग भिंतीस शिड्या लावून हाती नंगी तलवार घेऊन भोसला एकटाच वर चढून तटावर उभा राहून म्हणाला, ''गडेहो, चला, वर या, भिऊ नका. आता किल्ला आपलाच आहे. जलदी करा म्हणजे एका क्षणांत फिरंग्याचा चेंदामेंदा करून

टाकू.'' हे शब्द कानी पडताच शेकडो शिपाई ईर्षेने वर चढले. शत्रूकडचे लोकही फार शूरत्वाने लढले. त्या बहुतेकास आमच्या शूर शिपायांनी मृत्यूची वाट दाखविली. काही फिरंगी जिवाच्या भयाने टोप्या काढून, दाती तृण धरून, आम्हास शरण आले. त्यात त्यांचा मुख्य सरदार अलारकेओ हाही होता.

''पुढे आम्ही वसईच्या किल्ल्याजवळ लढण्यास आरंभ केला. तोही किल्ला आम्ही सर केला. या युद्धात दोन्ही पक्षांकडे लढण्याच्या कसबाची पराकाष्ठा झाली. खुष्कीचे बाजूने बिनीवाला शंकराजी नारायण याजकडून वेढा देवविला. आणि पाण्याचे आंगास लढाऊ जहाजे ठेववून मानाजी आंग्र्याकडून वेढा पुरा करविला. आतील किल्लेदार अगदी मट्ट्यास आला. ''जंजिऱ्याच्या शिद्दीबरोबर जसा तह झाला तसा मीही करारनामा लिहून देऊन किल्ल्यासकट आपल्या स्वाधीन होण्यास कबूल आहे, असे त्याने बहुत आर्जवाचे बोलणे लाविले. ते त्याचे म्हणणे कबूल करावेसे मला वाटेना. कारण वसईसारखे बळकट स्थळ त्याच्या हाती राहिले तर आम्ही निघून गेल्यावर पुनश्च तो आसपासचा मुलूख बळकावून बसेल व सर्व काम पाऊसकाळाच्या आधी शेवटास नेले पाहिजे, असा विचार करून किल्ला सर करण्याविषयी हरप्रयत्न चालविले. ते असे- शत्रूच्या तोफांचा मार चुकविण्यासाठी मैदानांत मोर्च्यांमागे मोर्चे बांधिले. जमिनीत मोठे मोठे चरक खणून खालून जाण्यास वाटा केल्या. तेथून जाताना किल्ल्यावरून कुलपी गोळ्यांचा भडिमार सुरू होता, त्याने आमचे बहुत लोक ठार झाले. मग आम्ही त्यांच्या दुप्पट तोफा जमविल्या. ह्या आम्ही डागू लागलो तेव्हा त्यांचा तोफखाना बंद पडला. तटाला एक मोठें खिंडार पडले. ते लहान असल्यामुळे राणोजीराव शिंद्याच्या शिपायांना आत शिरता येईना. पुढे मोठे भगदाड करण्यासाठी होळकराने जंगी सुरुंग पाडिले. त्याच्या सुमाराने किल्लेकऱ्यांनीही आतून सुरुंग पाडिले. यामुळे आमचा प्रयत्न फुकट गेला. शेवटी आम्ही सर्वांनी एकवटून अशी मसलत काढिली की, एका शेजारी एक असे पाच मोठे सुरुंग पाडून पाचही एकदम उडवावे, म्हणजे तटास मोठ्या वेशीसारखे भगदाड पडून आत शिरता येईल, त्याप्रमाणे केले. पाचापैकी चार सुरुगांस एकदम सरबत्ती दिली. पैकी दोन चांगले उडून मोठी वाट पडली. मग ''हरहर'' शब्दाचा जयघोष करीत आमचे मराठे शिपाई

एकदम त्या खिंडाराजवळ गेले. इतक्यात दुर्दैवाने चौथा सुरुंग अकस्मात् उडाला. त्यांत आमचे शिपाई उगीचच्या उगीच जाया झाले. उरलेल्या लोकांस शत्रूने गरनाळा व बंदुका यांनी फार हैराण केले. एक गोळा जोराने निघाला तो धोधो करीत माझ्या पायाजवळ येऊन फुटला. आमचे लोक निरुपाय होऊन शेवटी माघारे हटले. किल्लेकऱ्यांनी ते खिंडार फार त्वरेने बंद करविले. मग आणखी एक सुरुंग शिलक राहिला होता त्याला आम्ही सरबत्ती दिली. त्याने मात्र चांगले काम केले. किल्ल्याचा अर्धा अधिक बुरूज धाडकन कोसळला. त्या समयी मी पुढे होऊन बरकंदार लोकास हाक मारून हल्ला करण्याचा इशारा दिला. पोर्तुगीज लोकांनी लगेच आतून चिखलाच्या पाट्या रचून तेथे तोफा डागून आपला जीव वाचविला. त्यांच्या अंगाशी भिडून लढण्याचा काही इलाज चालेना. शत्रूकडे बाहेरचा दाणागोटा, पाणी, चारा, न जाऊ देण्याविषयी आम्ही खूब बंदोबस्त ठेविला. त्यांच्या सभोवती वेढा घालून तीन महिने बसलो. आतील लोकांच्या पोटास अन्नपाणी नाहीसे होऊन खडखडीत उपास पडू लागले. 'आधी अनाना मग तनाना' असा विचार करून फिरंग्यांनी शेवटी तहाचे बोलणे लाविले. आम्ही त्यास एकच सांगितले की, ''तुम्ही आपली मुलेंमाणसे काढून किल्ला आठ दिवसांत खाली करून द्याल तर बरी गोष्ट आहे.'' शेवटी त्यांनी किल्ला आमच्या स्वाधीन केला. या समरभूमीवर आमच्याकडचे सुमारे पाच हजार मनुष्य पडले, ही मोठी दुःखाची गोष्ट आहे. फिरंग्याचेही सुमारे एक हजार माणूस जायबंदी झाले. इंग्रज लोकांनी तहाप्रमाणे या समयी आम्हास दारुगोळ्याची बरीच मदत केली.

''खंडोजी माणकरावर पोर्तुगीज लोकांनी तारापुराजवळ पाच हजार सैन्यानिशी हल्ला करून ते ठाण्याकडे नीट चालले. तेव्हा होळकराने त्यांच्या आंगावर तुटून पडून त्यास माघारे हटविले. त्यांचा फोईस नामक सरदार मोठ्या शौर्याने होळकराशी लढला. होळकराने त्याच्यावर नेम धरून एक गोळी सोडिली ती सूंसूंसूं करीत त्याचे शिरकमळ फोडून पार निघून गेली. त्याबरोबर तो सरदार गतप्राण झाला. मालवण प्रांतातले हेटकरी व गडकरी या स्वारीत फार उपयोगी पडले. आमच्या बरकंदाज बेहेड्यांत बहुतकरून हेच लोक फार आहेत. याप्रमाणे वडिलांच्या आशीर्वादेकरून आमच्या तरवारीस यश आले. आमच्या श्रीवर्धन गावाच्या आसपास

एकंदर सुमारे दीडशे कोस लांब आणि पंचवीस-तीस कोस रुंद इतकी कोकणपट्टी आहे. एवढ्या प्रदेशात मुसलमान, शिद्दी, फिरंगी वगैरे परदेशस्थांचे चिलटपाखरू सुद्धा फिरकू देऊ नये असे मी करणार आहे. या कोकणच्या मोहिमेत एकंदर मेलेल्या लोकांची संख्या सुमारे चौदा-पंधरा हजार होईल. त्याच्या तपशीलवार यादी तयार करण्याचे काम चालले आहे. जी माणसे सरकारकामी पडली त्यांच्या मुलामाणसांस सरकारातून बाळपरवेशा चालविणे अवश्य आहे.

''या समराची इत्थंभूत हकीकत श्रीगुरू महाराज महापुरुष यास मी धावडशीस पत्राद्वारे विदित केली आहे. सेवेशी श्रुत होय. हे विज्ञापना.''

शिंदे, होळकर यांनी हे पत्र बाजीरावाकडे आणिले. त्याच वेळेस त्याला दिल्लीहून वर्तमान लिहून आले की, नादिरशाहा हा महंमदशाहास पुनः दिल्लीस तक्तावर बसवून आपले लष्कर घेऊन स्वदेशाकडे गेला. जाताना त्याने हिंदुस्थानांतील मोठमोठ्या राजेरजवाड्यांस पत्रे लिहिली, त्यात बाजीराव पेशव्यासही एक बहुमानपूर्वक पत्र लिहिले. त्याजवरून तो निघून गेल्याची खात्री झाली.

पुढे बाजीरावाने दिल्लीच्या बादशाहास संतोषप्रदर्शक एक पत्र लिहिले, व तिकडून त्यास उत्तराबरोबर भरगच्ची पोषाख वगैरे नजराणा आला. हा मजकूर आता पुढील भागात येईल.

♦♦

भाग-२७

# वैभवोन्नती

इराण देशाचा महाक्रूर नादिरशाहा बादशाहा दिल्लीहून निघून परत गेल्यावर बाजीरावाने दिल्लीचा बादशाहा महंमदशाहा यास एक गौरवाचे पत्र पाठविले व त्याजबरोबर मामुल वहिवाटीप्रमाणे १०१ मोहरा नजर पाठविल्या. त्या पत्रातला आशय असा होता की, ''आपल्यावर जो नुकताच मोठा शत्रू चालून आला होता त्याचे पारिपत्य करण्यास्तव शिंदे, होळकर इत्यादि वज्रदेही सरदार व जैयत फौज बरोबर घेऊन आम्ही जलदी जलदीने नर्मदेपर्यंत येऊन पोचलो. तेथे तो आपल्या देशाकडे निघून गेल्याची बातमी कळली, यामुळे आम्ही पुढे येण्याचे तहकूब केले. आपले व आमचे वाकडे असले तरी बाहेरचा कोणी शत्रू आपल्यावर चालून आला तर तो आमचाही शत्रू आहे असे आम्ही समजतो.'' या पत्रास बादशाहाकडून बहुमानसूचक व मोठे अदबशीर उत्तर आले. त्यात त्याने लिहिले की, ''आपले पत्र पोचून बहुत संतोष झाला. आपण आमच्याशी हमेषा स्नेहभावाने असावे अशी या दरबारची फार इच्छा आहे. आपले पूर्वीपासून चालत आलेले मानपान, जहागिरी, मुलूख वगैरे यास इकडून अगदी बाध येणार नाही. त्यात किमपि अंतर होणार नाही. इकडून शिरपेच वगैरे वस्त्रालंकार पाठविले आहेत त्याचा मेहेरनजरेने स्वीकार व्हावा.'' या खलित्याबरोबर पोशाख वगैरे जिन्नस आले ते येणेप्रमाणे-

**(साडेतीन वस्त्रे)**

१. पागोटे (यास पागोटे अथवा मंदिलही म्हणतात. याजवर कलाबतूचे

पट्टे असतात.)

१ झगा, किनखाबी.

१ पायजमा, किनखाबी.

॥ दुपेटा भरजरीचा. (कंबरेस बांधण्याचा)

**(अलंकार)**

१ मोत्यांचा तुरा. (हा पागोट्यांत किंवा मंदिलात उजव्या अंगास खोवितात.)

१ शिरपेच कलगी. रत्नजडित. (हा पागोट्याचे पुढचे बाजूस वरच लावितात.)

१ मोत्यांची कंठी. (करवंदाएवढाल्या पाणीदार मोत्यांची)

**(हत्यारे)**

१ एक उत्कृष्ट पाणीदार तलवार. (हिचे पान चांगले, म्यान उंची किनखाबाने मढवून त्याजवर सोनेरी काम केले होते. मूठ रत्नजडित.)

१ घोडा. कानकळाशीत सुरेख व बांधेसूद असून तीन वर्षे उमरीचा, चलाख, उमदा शिंगा, रंग अबलग, सोन्या-रुप्याचे अलंकार व सरंजामासहित.

१ हत्ती. चांगला देखणा सर्व प्रकारच्या अलंकारांनी व वस्त्रांनी शृंगारलेला.

याचे नाव गजान्त लक्ष्मी! शनवारच्या वाड्यापुढे बाजीराव पेशव्याचे शेकडो हत्ती रोज झुलत होते. पागेत हजारो घोडे हिंसत होते. जामदारखान्यांत जरतार, कलाबतू व किनखाब पुष्कळ झळकत होता. शिलेखान्यात बलम, इटे, बंदुका, तलवारी वगैरे उत्तम प्रतीची हजारो हत्यारे चमकत होती. जवाहीरखान्यात जडजवाहिराच्या पेट्यांच्या पेट्या गच्च भरल्या होत्या; परंतु बादशाहा म्हणविणाराकडून जी देणगी आली तिच्या योगाने बाजीरावास जी धन्यता वाटली असेल ती अजब आहे. हा बाजीराव हिंदुपदपादशाहाचा मुख्य वजीर. त्याचा बहुमान सार्वभौम मोगल बादशाहाने केला. तेव्हा तेणेकरून त्यास अप्रतिम संतोष होणे हे साहजिकच आहे. हे वर्तमान इ.स. १७३९ मध्ये घडले.

हे सर्व ठीक झाले; पण माळवा प्रांताबद्दल बादशाहाकडून सनदा यावयाच्या होत्या त्या आल्या नाहीत. ‘‘हे कपट नि:संशय निजामाचे

असावे, काही चिंता नाही. त्याची दक्षिणेतली सर्व सत्ता अजीबाद नाहीशी करून टाकितो,'' असे बोलून बाजीरावाने तिकडे स्वारी करण्याचा निश्चय केला. त्या वेळेस निजामसाहेब व त्याची फौज हिंदुस्थानातच होती. दक्षिणेकडे परतली नव्हती. बाजीरावाचे कित्येक जिवास जीव देणारे सरदार व फौज कोकणात गुंतून राहिली होती. ती त्यास येऊन मिळाली नव्हती. सबब तो काही दिवस माळवा प्रांतातच बंदोबस्त करीत राहिला. बुंदेलखंडाच्या छत्रसाल राजाकडून त्यास जहागीर मिळाली होती, तिचा झांशी प्रांताशिवाय पाच लाख रुपये वसूल येई. तिकडचे एकंदर वार्षिक उत्पन्न तीस लक्षांचे होते. राजाचे दोघे मुलगे जगद्देव आणि हरदेव यांजबरोबर त्याने पूर्वीपेक्षा जास्ती स्नेहभाव जोडून ठेविला. आणखी चंबळा नदीच्या पश्चिमेस कोटापासून अलाहाबादेपर्यंत जितके रजपूत राजे होते त्यांच्याकडून आणा शपथा वाहून घेतल्या की, यमुना व चंबळा या दोन नद्यांच्या पलीकडे मुसलमान लोकांवर ज्या तुम्ही स्वाऱ्या कराल त्याजबरोबर आम्ही आपापले सैन्य घेऊन मदतीस येत जाऊ. आमच्या फौजेच्या मानाने आम्हास नवीन मुलुखांची वाटणी मिळत जावी. पुढच्या संकेतानुरूप उत्तरेकडचा असा बंदोबस्त करून निजामाचा पुत्र नासीरजंग दहा हजार फौजेनिशी औरंगाबादेजवळ तळ देऊन उतरला होता त्याची तळी उचलण्यासाठी बाजीरावसाहेब अगोदर तिकडे वाघासारखा वळला. तेथे जाण्याबरोबर फौजेकडून त्याच्या सभोवती झटकर गराडा घातला. शत्रूस वेढा देऊन कोंडण्याचे काम त्याला हाताच्या मळासारखे झाले होते. मग वेढ्यांत सापडलेल्या सैन्यावर त्याने तोफांचा आणि बंदुकांचा भडिमार सुरू केला. इतक्यात सुदैवाने नासीरजंगाच्या कुमकेस दुसरे एक मोठे सैन्य आले, त्यामुळे तो मराठ्यांच्या हातातून निसटून गोदावरी उतरून अहमदनगरच्या वाटेने मुलूख जाळीत चालला. त्याच समयास चिमाजी अप्पा आपले लष्कर घेऊन कोकणातून निघून मोठमोठ्या मजला मारून बाजीरावास येऊन मिळाला. तेव्हा मराठ्यांस पुन: नवा दम आला. नासीरजंगाशी लढा करून त्याला गोदावरीच्या पलीकडे पुन: पिटाळून लाविले. असे या दोघा मल्लांचे पवित्रे व डावपेच बरेच महिने चालले, तरी त्यापासून एकासही म्हणण्यासारखा अर्थलाभ झाला नाही. दोघांच्या कुस्त्यांनी रयत मात्र विनाकारण जिगजिग झाली. शेवटी नासीरजंगाने तहाचे बोलणे लाविले. तो तह बाजीरावाने मुंगीपैठणास कबूल केला. त्यात

असे ठरले की, इत:पर रयतेस कोणीही उपद्रव देऊ नये. मोगलाने त्यासमयी बाजीरावास नर्मदेच्या काठी हिंदिआ आणि किरकोण हे दोन प्रांत जहागीर दिले. हे तहाचे काम पुरे होण्याचे संधीस बाजीरावाचा थोरला मुलगा बाळाजीपंत ऊर्फ नानासाहेब, वय सुमारे १८, याजकडून कोकणातून सांडणीस्वाराबरोबर जरूरीने पत्र आले ते असे-

''श्री''

''वडिलांचे सेवेशी आपत्ये नानाने दोन्ही कर जोडून त्रिकाळ चरणी मस्तक ठेवून शिरसाष्टांग नमस्कार विज्ञापना विशेष. किल्ला कुलाबा, प्रांत कोकण येथे वडिलांच्या आशीर्वादेकरून स्वारीतील वर्तमान यथास्थित असे, विशेष. आमची कोकणची बरीच फौज उत्तरेकडे हिंदुस्थानाच्या मोहिमेवर गुंतली आहे अशी संधि पाहून संभाजी आंग्र्याने मानाजी आंग्र्यावर पुन: स्वारी केली. मानाजीचा काही प्रांत सर करून त्याने कुलाब्यालाही वेढा दिला. किल्ल्यांतील शिबंदीचे गोडे पाणी बंद केले. अशा संकटात असता मानाजीने मजजवळ मदत मागितली. मी त्या वेळेस साताऱ्यास महाराजांच्या सन्निध होतो. सरकारची आज्ञा घेऊन त्याला सोडविण्यासाठी मी ताबडतोब ५०० स्वार घाटाखाली पाठविले. आणि मुद्दाम सांडणीस्वार पाठवून त्या मोहिमेवर खुद्द जातीने जाण्याविषयी मी वडिलांची आज्ञा मागितली. ती हाती पडताच मोठमोठ्या मजला मारून पाचवेच दिवशी रणांगणावर येऊन दाखल झालो. हिराकोटचा आश्रय धरून संभाजी आंग्र्याच्या शिपायांची एक टोळी तयार होऊन बसली होती. तिजवर संभाजीचा भाऊ तुळाजी प्रमुख होता. त्याजवर मी एकदम हल्ला केला व त्याचा अगदी मोड करून टाकिला. या झटापटीत संभाजीकडचे पंचवीस तीस शिपाई ठार झाले. तुळाजी आमच्या हाती जिवंत सापडला. बाकीचे लोक संभाजीकडे पळून गेले. वडिलांच्या सूचनेवरून इंग्रज शिपायांनीही आम्हास बरीच मदत केली. मी इकडे निघालो तेव्हा पुण्याच्या लोकांनी लढाईचा बाऊच करून सोडिला होता, परंतु अनुभवांती मला भीति मुळीच वाटली नाही. याहून एखादा मोठा प्रसंग पाहण्यास लौकरच मिळावा अशी आता उमेद आली आहे. रेवदंडा अद्यापि आमच्या हाती लागला नाही. तिकडे संभाजीचे लोक मोठी फळी धरून बसले आहेत. तर या बाबतीत जशी वडिलांची आज्ञा होईल तशी तजवीज ठेवितो.

''मी पुण्याहून निघताना बरोबर येण्यासाठी रघुनाथाने भारी थयथयाट केला. त्याचे पाहून जनूबाबा, सदूभाऊ, समशेर हेही अंगरखे टोप्या चढवून कंबरा बांधून तयार झाले. त्यांना थोपविता थोपविता पुरे वाट झाली. शेवटी आईसाहेब व काकूसाहेब त्यास म्हणाल्या, 'बाळांनो, तुम्ही अजून चिमुकले आहा. स्वाऱ्या शिकाऱ्या करण्याजोगे अजून तुमचे वय झाले नाही. त्याच जन्माला आला आहा. तुम्ही जरा मोठे झाला म्हणजे सगळ्यांना हौद्यात बसवून मोठ्या स्वारीबरोबर तुम्हांस पाठवू. तोवर घोड्याचा फेरफटका शिका.' अशी त्यांची समजूत पाडली तेव्हा ते खुषी होऊन काठ्यांचे घोडे उडवीत खालच्या चौकाकडे निघून गेले.

''याप्रमाणे इकडचे वर्तमान श्रुत केले आहे. पुण्याकडची सर्व मंडळी सुखरूप आहे. सेवेशी श्रुत होय हे विज्ञापना.''

हे चिरंजीवाचे पत्र पाहून बाजीराव व चिमाजी अप्पा यास परम संतोष झाला. पत्राच्या शेवटी मुलांबद्दलचा लिहिलेला मजकूर वाचून दोघे बंधू पोट धरधरून हसले. मुले होतकरू असली म्हणजे वडील माणसांस किती आनंद होतो तो पाहा! ''खाली कोकणांत बखेडा चालला आहे तो तुमच्याखेरीज मोडणार नाही. नानाचे अजून पोरवय आहे. तिकडे तो भलतेच काही तरी करून बसेल,'' असे सांगून बाजीरावाने अप्पाची कोकणाकडे रवानगी केली. इकडे उत्तरेकडची कार्ये मनोदयानुरूप शेवटास गेली नाहीत म्हणून बाजीराव मनात फार खिन्न झाला. मग सातारा, पुणे इकडे परत न जाता चाळीस-पन्नास हजार फौज बरोबर घेऊन मुसलमानांचे पुरते पारिपत्य करण्यासाठी मोठ्या आवेशाने तो उत्तर दिशा धरून चालला. नर्मदा नदीपर्यंत जाऊन पोहोचला. तेथे त्याच्या प्रकृतीस एकाएकी विकृती झाली. रात्री ज्वरांशाची भावना झाली. तरी त्याने नर्मदेची थंड पाण्याची स्नाने सोडली नाहीत. दिवसेंदिवस बेआरामी जास्तीजास्तीच वाढत चालली. अन्न तुटत चालले. मग त्याने तेथेच काही दिवस मुक्काम केला. त्या धूर्त पुरुषाने पुढे जाणले की, हे माझे परिणामाचेंच दुखणे आहे. यातून मी पार पडत नाही. मग त्याने आपल्या बिछान्याजवळ शिंदे, होळकर वगैरे सरदारांस बोलावून मुसलमानांच्या पारिपत्याबद्दल बराच वेळ उपदेश केला आणि राज्यकारभारप्रकरणी अप्पास निरोप कळविण्याचे ते सर्व सांगून ठेविले. त्या वेळेस सर्वांच्या डोळ्यांतून दु:खाश्रूंच्या धारा चालल्या. पुढे

नेहमीप्रमाणे चांगले बोलत चालत असता नर्मदेच्या काठी मुक्काम काकडे, प्रांत रावेर येथे मिती वैशाख शुद्ध १३ शके १६६२ म्हणजे, तारीख २८ माहे एप्रिल सन १७४० इसवी रोजी सकाळी अकरा वाजण्याच्या सुमारास तो मरण पावला. तेव्हा त्याचे सारे ४५ वर्षांचे वय होते. त्या मानाने पाहिले तर त्याच्या आयुष्याचाही तो अकरांचाच अम्मल होता. याप्रमाणे हा अद्वितीय पराक्रमी पुरुष अल्पवयात या जगातून नाहीसा झाला. शंभर वर्षांपैकी त्याच्या वाट्याला पुरती ४५ वर्षेसुद्धा आली नाहीत. त्याच्या अकालिक व आकस्मिक मृत्यूचे वर्तमान ऐकून सर्व हिंदुस्थान देश अत्यंत शोकाकुल झाला. आबालवृद्ध हिंदू प्रजेत हाहाकार झाला. फार काय सांगावे? निजामसाहेब त्याचा कट्टा शत्रू असून त्याच्यादेखील डोळ्यांस पाणी येऊन तो म्हणाला, ''अस्तग्फरुल्ला, सुनिये साहेब, इस् मुल्कमें एक बाजी और सब् पाजी. फील हाल मेरी छान्नबे बरसकी उमर है, इस्के दरमियान्, बाजीरावके मुवाफिक, अहलेअदल, रेहेमदिल्, और जवामर्द, ऐसा कोइ सरदार मेरे दुश्मनोमें नजर नहि आया. बाद उसके कजाके, अगरचे: तुमने मराठे लोगोको शिकस्त दिया, तो तुमने कुच मर्दुमी कीई ऐसा नहीं.''

याप्रमाणे त्या भुजबलगर्विष्ठ निजामाला जो साक्षात् मृत्यूसारखा भासत होता, जो चोहीकडे सिंहाप्रमाणे गर्जना करीत फिरत होता, ज्याच्या नावाने वीस वर्षांपर्यंत दशदिशा दणाणून गेल्या होत्या, ज्याच्या पुढे पोर्तुगीज, इंग्रज, शिद्दी, मुसलमान, वगैरे परधर्मी पराक्रमी राजेही थराथरा कापत होते आणि ज्याच्या अंत:करणाला भय कधीही शिवले नव्हते, तो बाजीराव बल्लाळ पेशवा एकाएकी विश्वभक्षक काळाच्या जबड्यात जाऊन पडला. मनीमानसीसुद्धा नसता आपला धनी एकाएकी मरण पावला, असे त्याच्या भोवतालच्या सैन्यांत वर्तमान पसरून जिकडे तिकडे आकांत झाला. त्याचे जिवलग मित्र व सरदार राणोजीराव शिंदे व मल्हारराव होळकर वगैरे सरदार अतिशय शोकाकुल होऊन त्याच्या प्रेताभोवती गराडा घालून बसले. त्याने केलेल्या उपकारांचे स्मरण होऊन, त्यास हुंदका येऊन, जे रडे कोसळले ते काही केल्या त्यास आवरेना. पुढे काय करावे हे त्यास काही सुचेना. कुडीतून प्राण निघून गेलेल्या प्रेताप्रमाणे ते सर्व सैन्य निस्तेज दिसू लागले. ती नर्मदा नदीही त्या दिवशी दु:खदाशी भासली. ही दुष्ट वार्ता

शाहूराजाला साताऱ्यास कळताच तो घटकाभर मूर्च्छना येऊन पडला. जो मेला तो बाजीराव नव्हे, तर ती माझ्या हातची भवानी तलवार साक्षात मृत्यू येऊन हिसडा देऊन घेऊन गेला असे त्यास वाटले. कोकणात चिमाजी अप्पा व नानासाहेब हे चुलते-पुतणे रेवदंडा किल्ला घेण्याची मसलत करीत बसले होते, त्या ठिकाणी त्या दोघांमध्ये हा भयंकर विजेचा लोळ अकस्मात् जाऊन आदळला. ही आकाशाची कुऱ्हाड अप्पाच्या डोक्यावर येऊन पडण्याबरोबर तो धाडकन जमिनीवार निश्चेष्ट पडला. त्याचा चेहरा ढवळागवळा होऊन सर्वांग घामाने डवडवून गेले. ही दुष्ट वार्ता एकाएकी कोसळेल व निरोप घेऊन कोकणात निघून आलो तेव्हा तीच दादांची व माझी अखेरची भेट, असे त्याच्या मनीमानसीसुद्धा आले नव्हते. अंगावर जरा स्मृती आल्याबरोबर तो गुरासारखा आक्रोश करू लागला. ओरओरडून त्याचा घसा कोरडा पडला व सर्व गात्रे विकळ झाली. शोकशंकूंनी अत्यंत व्याकूळ होऊन तो आपले डोके भुईवर दणादण आपटू लागला. जमिनीवर सव्यापसव्य गडबडा लोळू लागला. चिमाजी अप्पा एवढा शूर व सुज्ञ पुरुष खरा; पण बंधुवियोगाने सन्निपात झालेल्या मनुष्याप्रमाणे तो मनास येईल तसे बरळू लागला. यासमयी धरित्री माता दुभंग होऊन मला आपल्या पोटात घेईल तर बरे, असे त्यास झाले. ''दादा, दादा, काहो रागावला? मी आपली कधी तरी आज्ञा मोडिली आहे का? मी नेहमी आपल्या अर्ध्या वचनात असे! अप्पा घोटभर पाणी पी म्हटले तर तितकेच मी पिऊन होतो, अप्पा माझा पाठीराखा आहे. असे आपण हमेशा सर्वांपाशी वदत असा. इतके मजवर आपले बंधुप्रेम असून, मला फसगतीने इकडे कोकणात खाली पाठवून, अंतकाळी आपल्या अप्पाला दर्शनलाभ न देता तिकडे एकटेच आपण एकाएकी स्वर्गसुख घेण्यास वर निघून गेला. हे तुम्हासारख्या सुज्ञ वडील बंधूस उचित कसे वाटले बरे? असा मजकडून अपराध तरी कोणता घडला? अहो दादा, दादा तुम्हांला आता वर मजवाचून एकट्याला करमावयाचे नाही व मलाही आता येथे तुम्हांवाचून चैन पडावयाचे नाही. येथे तुमच्या हातच्या आशीर्वादपत्राचीसुद्धा आता मला आशा राहिली नाही. माझ्याने हे वियोगजन्य दुःख सहन होत नाही. मागे बच्चाकच्चांचा बंदोबस्त करून मीही आपल्या चरणांकडे लौकरच निघून येतो.'' हा त्याचा हृदयस्फोट करणारा विलाप ऐकून कोणास दुःख होणार नाही? पुढे ते

बंधुवियोगजन्य दु:ख त्यास अति दु:सह होऊन बाजीरावसाहेब कैलासवासी होऊन आठ-नऊ महिने झाले नाहीत तोच चिमाजी अप्पाही निवर्तला. बाजीरावाच्या मृत्यूचे वर्तमान ऐकून पुण्यास शनिवारवाड्यांत काशीबाई वगैरे अबलाजनावर जे दु:खाचे पर्वत कोसळले, त्याचे यथार्थ वर्णन करण्यास खरोखर आमच्या 'एकमती' लेखणीच्या अंगी सामर्थ्य नाही. आमचे 'बारामतीकर' कविश्रेष्ठ मोरोपंत त्यासमयी मोठे असते तर त्यांनी आपल्या सरळ, गोड, प्रेमळ आणि प्रासादिक आर्यावाणीने करुणारसाची दु:खार्त मूर्ती प्रत्यक्ष उभी केली असती! असो. आता त्या अपरिमार्जनीय दु:खाची वाचणारांनी मनातच कल्पना करावी, असे आमच्या अल्पमतीस वाटते. येथे बाजीरावाचे हे गोड व चटकदार कथानक समाप्त झाले.

तथापि, अशा प्रकारचे लेख असतात त्यांच्या शेवटी आदिनायकाच्या संबंधाचे सिंहावलोकन गोळाबेरजेने करण्याची ग्रंथकारांची चाल आहे, त्या पद्धतीस अनुसरून बाजीरावाच्या स्वभावदिकांविषयी पुढील भागात सामान्यत: चार शब्द बोलून वाचकांची रजा घेऊ.

♦♦

भाग-२८

# उपसंहार

**बा**जीराव सातारच्या गादीचा मुख्य प्रधान झाल्यापासून त्याची वीस वर्षे स्वाऱ्या शिकाऱ्या करण्यात गेली. परमेश्वर त्याला आणखी बरेच आयुष्य देता तर त्याच्या हातून याहूनही मोठमोठी कार्ये झाली असती. कार्यबाहुल्यामुळे राज्यव्यवस्था करण्यास त्यास पाहिजे इतकी फुरसत मिळाली नाही. त्याचा स्वभाव दयाशील असल्यामुळे निजामासारखे प्रबळ शत्रू कैक वेळा हस्तगत झाले असून, त्याने त्यास सोडून दिले, हा त्याजकडून मोठा प्रमाद घडला. जसे 'एक बाजी और सब पाजी' असे बाजीरावाविषयी निजाम म्हणत असे, तसेच 'एक निजाम और सब हजाम' असे निजामाविषयी बाजीरावही म्हणत असे. याप्रमाणे ते दोघे वीर एकमेकांचा पराक्रम ओळखून होते. एवढा मोठा शत्रू अनेक वेळा सपाट्यात आला असून, शरणागताचे संरक्षण करण्याचे वेड त्याच्या डोक्यात भरले होते, यामुळे स्वदेशस्वातंत्र्याचा जो त्याचा मूळ हेतू तो सिद्धीस गेला नाही. तो शत्रूंचे पुरे पारिपत्य करिता तर ते वारंवार आपले डोके वर उचलते ना! तसेच त्याच्या उशाशी प्रतिनिधी व रघूजी भोसले यासारखे जे कित्येक मोठमोठे नाग फडा पसरून त्याला दंश करण्याची संधी पाहत होते त्यांची त्याने उपेक्षा केली. त्याचे प्राबल्य मोडण्याचा त्याने वक्तशीर यत्न केला नाही, यामुळे त्याच्यावर वारंवार संकटे येत. ती निवारण करण्याकडे त्याचा बराच वेळ फुकट केला. त्यासमयी सर्व मराठे एकचित्त होऊन द्रव्यद्वारा, शरीरद्वारा व बुद्धिद्वारा त्याचे साह्य करिते तर एकंदरीने सर्व हिंदू

लोकांचे बहुत हित झाले असते.

शिवाजीराजाच्या पाठीमागे नाव घेण्यासारखा शहाणा व पराक्रमी पुरुष एक बाजीराव मात्र झाला. असा स्वदेशहिताचे ब्रीद धारण करणारा, इभ्रतदार, शहाणा आणि शूर मोहरा अर्वाचीन काळी कोणी झाला नाही. सर्व हिंदुस्थानांत हिंदू लोकांमध्ये अलीकडच्या काळात जे कोणी पराक्रमशाली पुरुष होऊन गेले त्यामध्ये बाजीरावाची श्रेष्ठवाने गणना आहे. तो उपजत बुद्धिमान होता आणि त्यास उणे उत्तर कोणाचे बिलकूल सोसत नसे. बुद्धिकौशल्यामध्ये त्याने आपणावर कोणाचीही कधी छाप बसू दिली नाही. स्वपित्याच्या पदी आरूढ झाल्यावर इतर श्रीमंत लोकांप्रमाणे त्याने आपले आयुष्य ऐषआरामात, चैनबाजीत आणि विषयसुखात घालविले नाही.

त्याच्या वयाला बारावे वर्ष लागले नाही तोच तो बापाबरोबर स्वदेश विदेश फिरू लागला. महान महान संकटांच्या कसोटीस लागला आणि पेशवाईची वस्त्रे मिळताच अनुभविक पुरुषाप्रमाणे मोठे सैन्य जमा करून तो एकदम स्वराज्य वाढविण्याच्या कामास लागला व तोच क्रम त्याने मरणकाळापर्यंत एकसारखा अंखड चालविला.

दुसऱ्यांची राज्ये छिनावून आपण अपार संपत्ती मिळवावी आणि तिजवर मजा मारावी ही कल्पना त्याच्या स्वप्नीही आली नाही. शौर्य, साहस आणि शहाणपण, यांच्यापेक्षा अधिक श्रेष्ठ त्याला काहीच वाटत नसे.

बाजीराव मनाचा मोकळा आणि खरोखर थोर होता. त्याच्यामध्ये जे उत्तम गुण होते त्यामध्ये एक गुण फारच वर्णनीय होता. तो हा की, त्याने ज्यास एकदा आपला मित्र म्हटले त्यास तो आपले सर्व विचार अगदी मोकळ्या मनाने सांगत असे. आधी पारख केल्याखेरीज तो कोणासही मित्र म्हणत नसे व मित्र म्हटल्यावर तो त्याच्या उच्चनीच स्थितीकडे लक्ष देत नसे. त्याच्या म्हणण्याचा तो योग्य विचार करी. तो आपल्या मित्रास आणि शिपायांस संतुष्ट करण्याकरिता योग्य प्रसंगी वेळोवेळी मोठमोठ्या देणग्या देई, मेजवान्या करी आणि त्यांच्या पंक्तीस बसून जेवणखाण करी. त्याने एकदा स्वारीवर जाताना सावकाराकडून कर्ज काढून सर्व शिपायांना ऋणमुक्त केले व तो सर्व पैसा बक्षीसखाते खर्च लिहून दिला. त्याचे खाणेपिणे साधारण मनुष्याप्रमाणे अगदी साधे असे. त्याला मंडळीत बसणे उठणे फार आवडे. त्यास विनोदपर आणि समयोचित भाषण फार आवडे. तो जातीने

मोठा मार्मिक आणि रसिक पुरुष होता. जसे आपण खातो, पितो आणि आनंद करितो तसे जवळच्या लोकांनाही करावे अशी त्याची इच्छा असे. तो आपल्या तैनातीत चार किंवा पाच याहून अधिक चाकरमाणसे ठेवीत नसे. उगाच फाजील अदबीने आणि हांजीहांजी करून कोणी त्याजपाशी बोलू लागला तर त्याचा तो तिरस्कार करी. सर्वांनी आपल्याशी मोकळ्या मनाने बोलावे, चालावे आणि वर्तावे अशी त्याची हमेशा इच्छा असे. त्याने राजसुख कधी भोगिले नाही. इतकेच नव्हे, पण स्वसंरक्षण आणि स्वसुख याविषयींचा विचार त्या बापड्याने दूर ठेविला होता. तो थोर लोकांची अदबी ठेवी आणि गरीब व अनाथ माणसांवर त्याची पित्याप्रमाणे दयामाया असे. अति आहार, अति निद्रा आणि अति सुखेच्छा, यांची शिवाशीव त्याला कधीही झाली नाही.

बाजीरावाच्या सैन्यातील व्यवस्था, टापटीप आणि बंदोबस्त चांगला असे. शिपाई, शिलेदार, मानकरी, सरदार आणि इतर कामगार हे सर्व लोक त्याला वचकून असत. त्यांनी त्याच्या आज्ञेचे उल्लंघन केले नाही. तो आपली सेना शस्त्रास्त्रविद्येत कशी तरबेज आहे हे नेहमी स्वत: पाहत असे. शिपायांस जी संकटे व दु:खे भोगावी लागतात त्यात तो स्वत: वाटेकरी होई. दोन्हीकडच्या सैन्याचे तुमुल युद्ध चालत असता तो आपल्या सैन्यास स्वत: उत्तेजन देत असे. तेणेकरून शिपायांस अधिक स्फुरण चढून शत्रूशी लढताना ते आपल्या जीवाकडे पाहत नसत. त्याचे सरदार एकचित्त असून, युद्धाच्या कामी त्यांचा हातखंडा असे. 'सबसे जीव प्यारा' असे जरी आहे, तरी आपल्या प्याऱ्या जीवाची पर्वा न करिता शूर पुरुष समरांगणावर उभे राहतात हे सामान्य कर्म नव्हे, असे जाणून खरा योद्धा, कोणत्याही पक्षाचा असला तरी, त्यास तो फार मान देई. शिपायांस खुश ठेवण्याविषयी तो नेहमी सिद्ध असे. फार काय सांगावे, त्यांच्यापायी तो बहुत सावकारांचा लक्षावधी रुपयांचा देणेदारही झाला होता. तरीही दोन-चार वेळा रोजमुरा थकल्यामुळे शिपाई लोकांनी मोठी गडबड केली होती. ती अशी की, दुसरा एखादा ढिला, अल्पधैर्याचा भित्रा पुरुष असता तर तो त्या वेळेस गांगरून जाता. परंतु कधी आर्जव करून, कधी धमकी देऊन, कधी पोटात शिरून व कधी नि:स्पृहता दर्शवून आपल्या बिथरलेल्या शिपायांची मने कशी वळवावी हे काम तो उत्तम प्रकारे जाणत होता, म्हणूनच तो तगला. ज्याला

देश काबीज करावयाचे असतात त्याला आपले लष्कर अर्ध्या वचनात राखावे लागते, हे अवघड काम त्याला चांगले साधले होते. ते त्यास जर न साधते तर एखाद्या प्रसंगी तो पटकन प्राणासही मुकता. आपल्याला लहानशा संसाराचा गाडा सुरळीत हाकता येत नाही, यावरून विचार करून पाहा की, बारा मुलूखचे लोक ज्या सैन्यामध्ये भरले होते आणि ज्यांस स्वदेशाहून शेकडो कोस दूर नेले होते, त्या अवघ्या लोकांस आवर घालून आपलेसे करून घेऊन शत्रूच्या बलाढ्य सैन्याशी त्यांच्या हातून त्याने मोठमोठी तुमुल युद्धे करविली हे काम साधारण शहाणपणाने किंवा अकलेने साध्य होणारे आहे का? नाही! पण ही विद्या त्याला उत्तम साधली होती, म्हणूनच इतिहासकारांनी इतिहासात त्याला महाशूर ही पदवी दिली आहे.

अंगामध्ये राज्याधिकाराचे, संपत्तीचे आणि मकरध्वजाचे वारे शिरले म्हणजे बाळपणात झालेले सगळे बोध एका बाजूस राहतात आणि अंत:करणात स्वेच्छाचाराचे प्राबल्य होते. तसे बाजीरावाचे झाले नाही. त्याला त्याच्या बापाने लहानपणी जे स्वदेशोन्नतीचे बाळकडू पाजिले ते त्याच्या अष्टांगी पक्के भिनून गेले होते. स्वदेश हा त्याचा देव आणि त्या देवाचा तो नि:सीम भक्त बनला होता. महान महान संकटे भोगून, अनेक लढाया मारून व नवीन मुलूख काबीज करून, हिदू लोकांत त्याने स्वदेशाभिमान, स्वदेशबंधुप्रीती आणि स्वधर्मश्रद्धा ही वाढविली. मुसलमान इत्यादी परधर्मी राजे एतद्देशीयांस गांजीत असल्याचे त्याला वर्तमान कळले की, त्यास सोडविण्यासाठी तो अर्धे तर अर्धेचे जेवण टाकून तिकडे धावत जाई. क्रूरपणा आणि जुलूम या दोन गोष्टी राज्यास अत्यंत कल्याणछेदक आहेत असे समजून तो त्याजपासून दूर राहत असे. आशा ही एक मनुष्यास मोठी उचल आहे. स्वदेशमातेस परकी राजांच्या हातून सोडवून स्वराज्याचा जरीपटका हिमालयावर नेऊन उभा करावयाचा अशी त्याने सर्वमान्य व स्तुत्य महत्त्वाकांक्षा धरिली होती आणि ती तृप्त होण्याकरिता तो लढाया देत देत पुढे चालला तो त्याच्या आयुष्यदीपच मालवला. ही निरुपायाची गोष्ट आहे. श्रीपतराव प्रतिनिधी, रघूजी भोसले, त्र्यंबकराव दाभाडे, पिलाजीराव गायकवाड वगैरे मोठमोठ्या मराठे सरदारांनी वरचेवर त्याच्या इच्छेच्या आड येऊन त्यास हरकत केली व त्याचा द्वेष आणि छळ नाहक केला, असे कोणीही प्रांजल बुद्धीने कबूल

करील. हाडाचा खरा हिंदू असेल, तो या स्वदेशाभिमानी पुरुषाचे हाल झालेले पाहून विव्हलांत:करणाने खरोखर दु:खाश्रू गाळल्यावाचून राहणार नाही.

सारांश, बाजीरावाने स्वदेशहितार्थ जे परिश्रम केले ते ऐकून आळशी, विषयी, मूर्ख व अजागल असे या पृथ्वीवर जे सरदार व राजेरजवाडे असतील त्यास शरम वाटल्यावाचून राहणार नाही. साधारणत: पाहिले तर मनुष्याचा सगळा ओढा स्वसुखाकडे असतो; परंतु त्यास एकीकडे ठेवून त्याने स्वदेशसुखार्थ अचाट परिश्रम केले, ही गोष्ट त्यास अत्यंत भूषणप्रद होय.

नीतिशास्त्रदृष्ट्या अमूक गोष्ट चांगली आणि अमूक गोष्ट वाईट असे तारतम्य पाहून तो हरएक प्रकरणाचा निवाडा करी. दाभाडे सेनापती याने त्याचा इतका द्वेष केला तरी त्याच्या मागे बाजीरावाने त्याची गादी कायम राखिली. याप्रमाणे तो न्याय निष्पक्षपाताने करी. तेणेकरून सर्व प्रजा त्यांजवर अत्यंत लोभ करी. तो अपराध्यांवरही कधी कधी दया करीत असे. म्हणून सर्व लोक त्याच्या कृपेची आशा करीत. राज्यसंरक्षणास जे कायदेकानून पूर्वजांनी करून ठेविले होते, त्यांचा तो नेहमी विचार करी. राज्ये बुडण्यास कोणकोणती कारणे झाली व होतात याविषयी तो पुष्कळ चौकशी करी. लबाड, तोंडपुजे व कार्यवाद, अशा लोकांच्या संगतीस तो कधी लागला नाही आणि त्याने आपले मूळ हेतू लोकांच्या नादी लागून कधी सोडिला नाही. पोहणारा कच्चा असला म्हणजे तो प्रवाहाच्या हवाली होतो आणि प्रवाह नेईल तिकडे जातो; परंतु तोच पक्का पोहणारा असला म्हणजे प्रवाहाच्या धारेस न जुमानिता पाणी तोडीत नेमिल्या ठिकाणी परतीरास जाऊन लागतो. असा बाजीराव होता. संकट म्हटले की, आधी मी आणि मग तू, असा त्याचा बाणा असे. आता, तो अल्पवयात वारला, यामुळे त्याचा मुख्य हेतू जावा तितका तडीस गेला नाही, ही गोष्ट स्वतंत्र आहे; परंतु सर्व दिवस सारखे नसतात, या न्यायाने पाहिले तर तो अल्पवयस्क असून हिंदुस्थानाच्या या टोकापासून त्या टोकापर्यंत त्याचे नाव गाजले, तो ऐश्वर्यगिरीच्या शिखरावर जाऊन बसला, त्याने हिंदूंची बाजी राखून आपल्यास गाजी म्हणवून घेतले, अखेरीस हिंदुस्थानाच्या मध्यभागी सहस्त्रावधी स्वदेशबांधवांमध्ये उभा राहून नर्मदातटाकी त्याने स्वदेशप्रीतीची सुस्वर

मुरली वाजविली व आपल्यास पाजी म्हणवून न घेता मागे अजरामर कीर्ती ठेवून, सर्वांच्या जीवास चटका लावून तो निघून गेला, हे त्याच्या सुदैवाचेच फल होय. छी थू होऊन म्हातारपणी मरावे त्यापेक्षा अब्रूने तारुण्यविकासात मरावे हे फार चांगले, अशा अर्थाचा महापुरुष एका ठिकाणी बोध करितात तो सांगून हा विषय आता समाप्त करितो.

**काया बहुत कष्टवावी । उत्कट कीर्ति उरवावी ।।**
**चटक लावूनि सोडावी । कांहीं एक ।।**

**रामदास**

♦♦

**RAO BAHADUR LUXUMANRAO JAGANNATH VAIDYA,**

LATE ASSISTANT REVENUE COMMISSIONER, NORTHERN DIVISION, AND NOW SIR SUBHA, BARODA TERRITORY

AND

**RAO BAHADUR DHONDU KRISHNA KANETKAR,**

LATE DEPUTY COLLECTOR AND MAGISTRATE, RATNAGIRI, AND KARBHARI, JAMKHINDI STATE, S. M. COUNTRY,

**THIS WORK IS DEDICATED**

**In token of high esteem, sincere regards and gratitude,**

BY

THE AUTHOR.

Report of the Secretary of the Dakshina Prize Committee on this work.

This is a large-sized book, containing about 216 quarto pages. It is divided into thirty* parts, having a subject stated at the beginning of each. After having given a short geographical description of the Maharashtra, a nice picture is drawn of the conditions of the Mavales before and after they found a leader and a patron in Shivaji.

About 200 years ago, the story relates, there lived in the villages of Srivardhana, near Jinjira, in the territories of the Siddi, a gentleman named Visajipant. He was the Desamukha of that place. He had a son known as Balakrishna or Balajipanta, who was a clever clerk and a man of general information. The wife of Balaji was Radhabai, a lady faithful to her husband and very expert in household matters. When Radhabai was in seventh month of her pregnancy, (as is natural and usual with a loving husband) an interesting conversation takes place between her and Balaji, who is extremely anxious about the safe delivery of his wife. From the nature of her

* Now reduced to twenty-eight.

replies to his questions, he is led to believe that she is to deliver an extraordinary son, who is to be a great warrior, a patriot and a redeemer of his country. Radhabai, on being asked what her wishes were resulting from her pregnancy, replies, "I desire to ride on a horse and go on a hunting party. I wish to give Dakshina to learned Brahmanas and destroy the Mlenchhas (Mahomedans) that oppress my nation, establish the sovereignty of the Brahmanas, project the cows from the butchery of the Musalmans and make every one of my countrymen happy." This was an auspicious omen. It foretold the good fortune of the nation and the supremacy of a new power. Transported with joy, Balaji fervently thanked the Almighty for this wondrous revelation. At last when full nine months and nine days had passed, Balaji heard the joyful news of a son being born to him. 1695 was the year in which this resplendent star appeared on the firmament of human existence. After two or three years Balaji bore another son who is known by the appellation of Chimanaji Appa and who, in history, stands second in point of valour and abilities only to his distinguished brother. Bajirava, the hero of this life, had also two sisters, Bhivutai and Anutai.

The author then gives us a fine description of the early days of the two brothers. This history of Bajirava's childhood is highly romantic and charming. These two highly intelligent boys were the children of a poor Desapandya. The comforts of wealth were denied to them. The wandered and played in the narrow domains of their father. The climbed up on palm trees and mango trees. They jumped and frolicked in the company of their follows. The thought of the morrow never disturbed the peace of their simple hearts. Like withered leaves in a windy summer, they went mad with their boyish sports. Strong and healthy, they were happy in the state in which they were; they never thought of anything higher or better. They loved each other most passionately. Bajirava formed an army of his play-fellows and became their leader. The children of the Mahomedan inhabitants of that village were submissive to him. Chimanaji Appa helped his brother in every one of his little concerns. At first they were placed under the tuition of the village school-

master. But when his scanty means were at an end, Balaji was compelled to give them home-instruction. He has a large number of old records and manuscripts, usually called Bakhars, from which he taught them some of the most important portions of the Maratha History. He told them the old Pauranik legends from the ramayana and the Bharata. He taught them the geography of India and made them familiar with all the towns and places of historical fame. A most lively picture of all the battles, previously fought, was presented to their inquisitive and wondering minds. They always listened with attention and admiration to the lectures of their father. Thus enthusiasm was created in their infant breasts and a spirit of enterprize was early infused into them. Seeing that

"An idle hand, some mischief still,
"Will ever find to do."

the father was anxious to keep his sons under the tuition of a learned Guru. He, therefore, thought of leaving his village and removing to a town like Poona or Satara. But for a time various circumstances prevented him from doing so. At last some political quarrels between Angria and the Siddi, who had been on bad terms with each other and whose reciprocal enmity had gone on increasing until it reached a crisis, compelled him to leave his dear native home. The ear of the Siddi was poisoned against Balaji by a malicious and treacherous man, who spread a rumour, that Balaji was a deserter and a traitor, and through his machinations, Angria was induced to wage a war with the Siddi, his own master. This circumstance placed Balaji in a very critical position. For, he was sure that the Siddi would take vengeance on him and by a summary trial or even without it, convict him of treachery and disloyalty and condemn him and his supportless family to a severe punishment. He resolved, therefore, to stay no longer in the territories of an oppressive and a vile despot. With tears in his eyes, he gave his parting visit to his friends and relatives, bade farewell to his home, and with his family came to Sasvada, where through the kindness of a gentleman, named Abaji Purandhare, he was enabled to settle there. Soon after this, they went to Satara. Not long after, the two boys were married. Bajirava,

who was at this time about 12 years of age, was married to the daughter of Josi of Chas, and Chimanaji to the daughter of Visvanathpanta Pethe. The great powers which he possessed raised Balaji gradually to posts of honour and responsibility, the duties of which he discharged with ability and integrity. After a few months, Balaji Visvanatha breathed his last, whose death was looked upon as a severe and irreparable loss of Sahu. Finally by dint of his winning manners and his high intellectual worth Bajirava succeeded in becoming the Peshva. Bajirava has a preceptor as Sivaji had his Ramadasa. This divine saga lived in a village near Satara called Dhavadasi. A most graphic description is given of the hermitage of this saint and its surroundings. The language and thoughts are eminently suited to the occasion. There is something in this portion of the narrative that elevates the mind above itself, and fills it with a noble pride. It is a picture which is simple, magnificent and grand, and in which the literary artist has achieved a success worthy of his high endeavours. There are no flagrant exaggerations, no hyperboles, no high-toned metaphors. The advice given by the sage to his disciples is highly spiritual, succient and convincing. The whole appears perfectly romantic and yet the mind does not hesitate at all to accept and believe it as true. In the portion that follows, a brief account is given of the political condition of India at that time. We are told how the English first came to this country under the disguise of commerce and how after a time, partly for self-defence and partly for the sake of aggrandizement, they formally involved themselves into the quarrels of the different chiefs and how they were brought in contact with Bajirava and his sovereign Sahu Maharaja. Bajirava is represented as a great orator. There are* speeches delivered by him in the full Darbar of Sahu Maharaja extending over about three* nights. The author makes Panta Pratinidhi speak against Bajirava's proposal to wage a war at once with the Nizam to which Bajirava gives a most thundering report. The language is full of life and spirit. It was no wonder that Sahu and his Darbaris were stirred by the

*Now reduced to one

high-toned advice of their Prime Minister, to run instantly to their arms, and with one unanimous voice exclaim in the height of their anger and exasperation "Death, death to the enemy!" Uncultivated as our language is said to be, there fine pieces of composition show what the pen of an able writer can achieve in this direction. The following chapters are devoted to the various expeditions of Bajirava. Interesting and trustworthy accounts of the original founders of the great families of Seindiah, Holkar, Povar, Bhosle and others, who were at that time but insignificant soldiers in the army of Bajirava, are interspersed throughout the narrative. The origin of Fattesinga of Akkalkota as given by the author is very striking.

Part 20. This part is devoted to the administrative powers of Bajirava. He administered the affairs of his kingdom very skilfully and ably. He was a great politician and a man of universal knowledge. He examined the various public Departments and whereever he found faults and defects, he attempted to remove them and made improvements where he found them necessary. He was very careful to observe that Government Officers performed their duties with regularity and integrity. Public roads, buildings, tanks, canals etc were executed wherever they were required. In order that commerce may be conducted with ease and advantage, and in order that travellers and passengers may be free from all the difficulties and hardships incident to them, he constructed Ghats and erected Dharmasalas. He caused equal distribution of justice, impartiality of judicial tribunals and the timely collection of all duties and taxes. At this time, Sanivara Vada was about to be completed. In the same way the work of many other splendid buildings, which we now see in Poona, was carried on vigorously. Encouragement was given to the cultivation of such arts and sciences as medicine, music, agriculture, painting, poetry, weaving etc. Schools were opened for teaching the Vedas and other ancient lore. In fine, with the solicitude of a merciful, wise and affectionate ruler he tried every means to make his people wise, heroic and happy.

Balasaheb alias Nanasaheb was the eldest son of Bajirava. He was at this time about 14 or 15 years old. Bajirava took his son to

the Darbar in order to make him thoroughly acquainted with the state affairs. We are here presented with a beautiful extract from the writings of Bajirava who is said to have prepared a draft of advice for the future conduct of his then young and inexperienced son. The sentiments expressed therein and attributed to the pen of this great warrior and politician, are no doubt, worthy of the man and the country in which he lived. Some of the most important moral qualities, such as patriotism, industry, liberality, prudence, duty, responsibility etc are earnestly recommended by the father to the sole attention of the son. It is a piece of practical wisdom, fit to be read and studied by every one of our native rulers; may fit to be written on the tablet of every one's heart.

In the last chapter called Upasamhara or the Conclusion, Bajirava's character is very beautifully painted in a, language at once forgive and correct. The author's remarks about the remote consequences resulting from the untimely death of this great man are very true. It was the will of Heaven, says he to cut off Bajirava's life, while he was in the height of his glory. He breathed his last on the bank of the Narmada on the 28th April 1740. A short time before his death he called Seindiah and Holkar and other Chiefs to his bed and like a true soldier and a patriot solicited them with his dying breath to prosecute the designs which were left unexecuted after he was no more. He advised them to persecute the Mlenchhas (Mahomedans) and free his country from the yoke of the foreigners. We are here naturally reminded of the great Hamilear and his valiant son Hannibal. We are put in mind of the spirit of a Spartan mother, whose maternal advice to her son always was, "With your shield or upon it!" Bajirava is described to be a great favourite of his soldiers. For them he was ready to sacrifice even his own life. When war and other incidents involved them in debt, he borrowed large sums of money from the wealthy subjects and distributed them amongst his soldiers. His own living was extremely frugal. He was free from the vices of the rich and powerful. He had a noble heart and he participated in the miseries and sufferings of those who fought with him on the battle field. Ever and anon, even in the thickest fight,

he spoke words of encouragement to his army and continually moved by their side. A true warrior, even though he belonged to the party of his enemies, was his joy. He was a thorough politician and a consummate leader. He knew all the arts of persuasion and all the ways of winning the hearts of a discontented soldiery. Sometimes he praised them, sometimes he threatened them, sometimes he pacified them and at other times he showed them all signs of indifferences and lethargy. He mixed with all and talked with all. He was accessible to every one. But he hated from his heart flattery and double-dealing. He was fond of literature and he had a considerable knowledge of the Sanskrit tongue. Power, wealth, influence and position had no evil effect on the moral tone of his character as is generally the case. He was proud of his country and proud of his religion. The whole of his magnanimous soul burst with the fire of patriotism; nay, the rays of that fire were scattered in all directions and communicated their general warmth to everything and every one that came across it.

The writer in his concluding para justly holds forth this sweet, admirable and interesting character of the notice of those ignorant, licentious fools that rule this earth, and exhorts them to covet it and imitate it. What mortal is indifferent to his own happiness? And yet we are told that Bajirava was one! Kalidasa says of Dushyanta "स्वसुखनिरभिलाष: खिद्यसे लोकहेतो:." And this is exactly applicable in the case of our hero. India, no doubt, must be looked upon as a very unfortunate country, inasmuch as Providence was pleased to cut off the life of one of her most worthy and illustrious sons, while he was in the height of his power and glory. This admirable sketch of Bajirava's life and its lovely, charming and chaste style are not only superior to those of the other competitors, but stands, I venture to say, unsurpassed in our language by any other work of this kind during the last twenty years. That the writer possesses a rich imagination and a good power of delineating natural scenes and human passions, that he has a great command over language to express his sentiments which are at once chaste and noble, that his descriptions are elegant and striking and his images dignified and natural and that

his manner of narrating events is pleasing and instructive, may be seen in almost every chapter. The performance on the whole, is very beautifully conceived and executed in a manner that reflects immense credit on the author, who, if duly encouraged to go on in his literary pursuits, would, I believe, turn out a most able historical writer in our langunge.

(signed) RAOJI S. GODBOLE,
Secretary, Dakshina Prize Committee.

---

## Extracts from the Secretary's Report and the Opinion of the Members of the Committee.

Out of the * Manuscripts A.* alone is in my humble opinion a meritorious book. It has the simplicity of Addison or Washington Irving and at the same time possesses the charms of Macaulay.

The speeches in A. eminently suit both the character and times.

I would humbly beg to propose that A. be awarded the full prize* and be strongly recommended to the Director of Public Instruction for publication. I have no doubt that the book, if published, would be a valuable addition to the scanty stock of original books in Marathi.

(Signed) RAOJI S. GODBOLE.
Secretary, Dakshina Prize Committee.

In regard to their merits as literary compositions I agree with the Secretary in holding that the author of A. deservedly occupies the first place. A.'s style is more natural and racy* and it has no bombast or affectstion about it.

* A. is the significant mark given to this work, all the rest being called by other letters or marks.

This description [of the Dhavadast Hermit] is really splendid.

He certainly possesses first-rate power of descriptive narrative.

(Signed) M. G. RANADE.

I agree with the Secretary in voting the whole prize to A.

(Signed) KRISHNA SHASTRI CUIPLONKAR.

I * am of opinion that A. stands much higher in many respects such as its language, its plot, its execution of it & c. and deservedly ranks the first. I, therefor, agree with Mr. K. S. Chiplonkar and the Secretary in assigning the whole prize to it.

(Signed) SHRIKRISHNA SHASTRI TALFKAR.

I also agree with the Secretary in voting the whole prize* to A.

(Signed) KERU L. CHHATRE.

I agree with the Secretary and * the whole prize * should now be given to the auther of A. He may at the same time be informed by the Secretary that if he resubmits his work * it will be recommended by the committee to the Director of Public Instruction.

(Signed) F. KIELHORN,
President of the D. P. Committee.

**एकंदरीने या ग्रंथाविषयी :–**

''हे चरित्र स्तुतीस पात्र आहे. या चरित्राची भाषासरणी सुंदर, शुद्ध व पाणीदार आहे. इतर ग्रंथकारांपेक्षा या ग्रंथकर्त्याची वर्णन करण्याची शैली अधिक श्रेष्ठ आहे; इतकेच नव्हे; पण आमच्या भाषेत गेल्या वीस वर्षांत या प्रकारचे जे ग्रंथ झाले त्यापैकी कोणत्याही ग्रंथाच्याने याची बरोबरी करवणार नाही, असा आमचा अभिप्राय आहे.''

**ग्रंथकर्त्याच्या वर्णनशक्तीविषयी :–**

''या ग्रंथकर्त्यांच्या आंगी कल्पनाशक्ती सर्वोत्कृष्ट आहे. राग, भय,

प्रीती, उत्साह इत्यादी मनोविकार आणि सृष्टिरचना यांचे हुबेहुब वर्णन करण्याची ह्याची हातोटी उत्तम आहे. या ग्रंथकर्त्याचे विचार मोठे गहन आणि शुद्ध असून ते स्पष्ट करून दाखविण्यास भाषाही त्याच्या अगदी मुठीत आहे. त्याची वर्णने मोठी सुरेख आणि चटकदार आहेत. त्याने उभे केलेले पुतळे स्वभावसिद्ध आणि भव्य आहेत. त्याची गद्यरचना मन रमण्याजोगी आणि बोधप्रद आहे. हे सर्व गुण त्याच्या प्रत्येक भागात बहुधा नजरेस पडतात. एकंदरीत ग्रंथरचनेची उत्कृष्ट योजना त्याने मनात आणून ती सिद्धीसही चांगल्या रीतीने नेली आहे. ही गोष्ट ह्या ग्रंथकर्त्यास अत्यंत भूषणप्रद आहे. याला अशा विद्वत्तेच्या परिश्रमाच्या कामी योग्य उत्तेजन मिळत जाईल तर आपल्या भाषेत हा एक उत्कृष्ट इतिहासकर्ता बनणार आहे, असे आम्ही खात्रीने सांगतो.

(सही) **रावजी शास्त्री गोडबोले,**
दक्षिणा प्राइझ् कमिटीचे चिटणीस.

# श्री महाराणी जमनाबाई साहेब
# यांचे चरित्र



**श्री महाराणी जमनाबाई साहेब**

## अनुक्रमणिका

१. रहिमतपूर/२५३
२. माहेरघर/२५५
३. कुंवारपण/२५७
४. लग्न/२६०
५. खंडेराव महाराज/२६२
६. शिक्षण वगैरे/२६४
७. संकटाचे दिवस/२६६
८. एथे जे जे वाढे तितुके मोडे.../२७३
९. दत्तविधान/२७६
१०. युवराज प्रिन्स ऑफ वेल्स/२७९
११. दिल्लीचा बडा दरबार/२८३
१२. क्रौन ऑफ इंडिया/२८७
१३. गुणांची पारख/२९०
१४. ताराबाबाचे लग्न/२९४
१५. सयाजीराव महाराज यांचा विवाह/२९६
१६. स्फुट/२९९
१७. राज्याधिकार सोपवला/३०१
१८. श्री तारकेश्वर/३०४
१९. गोकर्ण यात्रा/३०७
२०. गोष्टी वगैरे/३११
२१. उपजे तितुके काळदाढे/३१४
२२. वाईतील दानधर्म/३१७
२३. वाई-सार्वजनिक सभेचे मानपत्र/३२१
२४. हृदयमार्दव/३२४
२५. प्राणोत्क्रमण/३२७
२६. दुखवटा/३३०
२७. गोषवारा/३३४
२८. आमचे दोन शब्द/३३९

## रा. रा. विठ्ठल लक्ष्मण कवठेकर, बडोदे राज्यातील नायब सुभे यांचा अभिप्राय

श्री. महाराणी जमनाबाईसाहेब यांचे चरित्र - हा लहानसा ग्रंथ रा.सा. नागेशराव बापट यांनी लिहिलेला आहे. रावसाहेब नागेशराव यांचा मराठी वाचकांशी पुष्कळ परिचय आहे. म्हणून त्यांच्या हल्लीच्या लहानशा कृतीतील भाषासौंदर्य, सुंदर व चटकदार वर्णने वगैरेबद्दल फारसे वर्णन करण्याची जरूर नाही.

थोर पुरुषांची चरित्रे कशा पद्धतीने लिहिलेली असावीत व ती तशी का असावी अशाबद्दल नियमन करणे हे सर्वांस ग्राह्य होणार नाही. मनुष्यमात्रात जसे गुण असतात तसेच अवगुणही असतात. चरित्रलेखनाचे मुख्य दोन हेतू असतात. एक चरित्रनायकाचे जन्मवृत्त लिहून ठेवल्याने त्याचे स्मरण चिरस्थाई होते व दुसरे थोर पुरुषांच्या कृतीचा कित्ता पुढच्या पिढीच्या डोळ्यासमोर ठेवल्याने अनुकरण करण्यास उदाहरण मिळून मनावर उत्तम संस्कार होतात. पहिल्या हेतूविषयी येथे फारसे लिहिण्याची जरूर नाही. दुसरा हेतू प्रस्तुतचे चरित्रात किती साध्य झाला आहे, हे पाहणे राहते. थोर पुरुषांचे गुणवर्णन केल्यापासून जसा फायदा आहे तसेच त्यांचे अंगी जे दोष असतील, अगर त्यांचे हातून ज्या चुका अथवा प्रमाद घडले असतील त्यांचेही दिग्दर्शन होणे अत्यंत जरूरीचे आहे. अपरिचित प्रदेशात प्रवास करणे असेल तर मार्गात उतरण्याच्या उत्तम सोयी कोठे-कशा आहेत, रत्यात पाणी, वाहने, नेहमी लागणारे सामानसुमान वगैरे कोठे कसे मिळते हे सांगण्याची जशी जरूर आहे, तशीच कोठे वाट अवघड आहे, चोराची भीती कोठे आहे, भयंकर अरण्य अथवा क्रूर पशूंचा उपद्रव कोठे होण्याचा संभव आहे, ती टाळण्यास कसे वागले पाहिजे वगैरे हकीकतही समजण्याची जरूर राहते. एकच भागाचे वर्णन करून दुसऱ्या भागाबद्दल काहीच न सांगणे हे खऱ्या वाटाड्याचे काम नव्हे असे कती एकाचे मत आहे. आपण लिहिलेल्या चरित्रावर सदरहू आक्षेप उत्पन्न होण्यास जागा आहे, ही गोष्ट चरित्र लेखकांच्या लक्षातून गेली आहे असे नाही. त्यांनी हा आक्षेप चरित्राचे

शेवटी पान १३० मध्ये नमूद करून त्याचा जबाबही दिला आहे. त्याअर्थी त्याविषयी येथे पुन्हा वाद उत्पन्न करण्यात काही हशील नाही.

आता चरित्र नायिकेच्या अंगी चरित्रलेखकांनी जे जे गुण असल्याचे वर्णन केले आहे ते किती अंशाने यथार्थ आहे एवढेच पाहण्याचे राहते. या दृष्टीने चरित्रलेखकांनी आपले काम फारच सुंदर रीतीने उत्तमप्रकारे बजाविले आहे यात संशय नाही. महाराणी जमनाबाईसाहेब यांचे अंगचे थोर व अलौकिक गुणांविषयी मुंबई गव्हर्नर सर रिचर्ड टेंपल, बडोद्यातील गव्हर्नर जनरलचे एजंट सर रिचर्ड मीड व मेलविल, तसेच राजकार्यधुरंधर राजे सर टी. माधवराव बडोद्याचे दिवाण यांच्यासारख्या थोर पुरुषांनी अनेक वेळा आपले विचार नमूद करून ठेवले आहेत, यापेक्षा विशेष मजबूत पुरावा शोधण्याची काही जरूर आहे असे दिसत नाही.

श्री महाराणी जमनाबाईसाहेब यांचे आयुष्यक्रमापैकी बाल्यपण वजा केले असता बाकी काळाचे चार मुख्य भाग आहेत. पहिला भाग लग्नापासून श्री. खंडेराव महाराजांचा काल होईपर्यंत. या भागाविषयी चरित्रकारांनी काही लिहिलेले दिसत नाही.

दुसरा भाग संकटकाल. हा खंडेराव महाराजांचे मृत्यूपासून श्री. जमनाबाईसाहेब पुन्हा बडोद्यास येईपर्यंतचा. प्रथम लहानपण असून पुढे ऐश्वर्य प्राप्त होते ही ईश्वरी कृपा आहे; पण मुनष्यास प्रथम ऐश्वर्य असून पुढे संकटकाळ येणे हे पूर्व पापाचे फल होय. अशा वेळी मनुष्याचे मनाची कशी स्थिती होते ती नुसत्या कल्पनेने समजणे कठीण आहे. अनुभवाशिवाय या स्थितीचे खरे ज्ञान होणे अशक्य आहे. स्त्रीजाती, अल्पवय, राज्यवैभव भोगलेले, गरोदर स्थिती, प्राणहानी होण्याची रात्रंदिवस भीती अशा संकटात दिवसाचे दिवस, महिन्याचे महिने, किंबहुना वर्षाची वर्षे काढणे हे लहानसान धैर्याचे व बुद्धिमत्तेचे लक्षण नव्हे. मातोश्री जमनाबाईसाहेब अशा संकटांतूनही पार पडून पुन्हा वैभवास चढल्या. यावरून त्यांचे दृढनिश्चयाचे व बुद्धिवैभवाचे जितके वर्णन करावे तितके थोडेच. या काळात त्यांना दुसऱ्या अनेक लोकांचे साहाय्य झाले असेल हे खरे आहे; पण उत्तम बुद्धिमान, दूरदर्शी मुत्सद्यास संग्रही राखण्यास तरी माणसांची परीक्षा लागते व स्वत:चे अंगी तसले गुण असल्याशिवाय चांगली माणसेही संग्रही राहत नाहीत. श्री. छत्रपती शिवाजी महाराजांचे अंगी अलौकिक गुण होते याबद्दल कोणासही

शंका नाही. यांचे संग्रही जी जी माणसे होती तीही सर्व तशाच गुणांनी परिपुरीत होती. तेच संभाजी महाराज राज्यावर बसल्याबरोबर त्या माणसांस देशोधडी जाण्याची पाळी येऊन हलक्या माणसांचा संग्रह झाला. त्याचा परिणामही सुप्रसिद्धच आहे. तसेच पुढे शाहू महाराजांचे कारकीर्दीत पुन्हा मुत्सद्दी व शूर लोकांचे हाती राज्यसूत्रे आली. तात्पर्य, सलाकारांचे उत्तम मसलतीने मासाहेब संकटकालातून पार पडल्या ही गोष्ट मान्य केली. तथापि तसले उत्तम लोक संग्रही राखण्याइतके शहाणपण, मानसिक स्थिरता, धूर्तता, निश्चय वगैरे मासाहेबांच्या अंगी होती ही लहानसहान गोष्ट आहे असे नाही. गुणी लोक संग्रही राहण्यास यजमानही गुणीच लागतो. असो. या कालात ज्या ज्या मनुष्यांचा उपयोग मासाहेबास झाला असे चरित्रकारांनी लिहिले आहे त्यात एका ठळक पुरुषाचा नामनिर्देश झालेला दिसत नाही. हा पुरुष अण्णासाहेब किबे हा होय.

मासाहेबांच्या आयुष्यातील तिसरा भाग- पुन्हा राज्यप्राप्ती. आपत्तीकाल काढणे जितके कठीण आहे, त्यापेक्षाही वैभवकाळात मनाची समता राखून स्वैर वर्तनावर अंकुश राखणे आणि तारुण्य, सत्ता, संपत्ती इत्यादींचा मद चढू न देता अहंपणाचा त्याग करून सर्व क्रिया योग्यरीतीने करणे फार कठीण आहे, आणि असले प्राणी फारच विरळा सापडतात. या काळात श्री महाराणी साहेबांच्या आंगचे सौजन्य, सत्कार, राज्यकारभारात योग्य सल्लामसलत व मदत करण्याची शैली, श्रीमंत महाराज साहेब यांचे शिक्षणाविषयी दक्षता वगैरे गुणांचा विकास झाला. एकंदर देशकाल स्थितीमुळे या गुणांचा पूर्ण विकास होण्यास अवकाश नव्हता, त्यामुळे महाराणी जमनाबाई साहेब यांचे नाव अधिक चिरस्थायी होण्यास मार्गच नव्हता, त्यास उपाय नाही. जर तसा अवकाश मिळता तर या राजस्त्रीच्या आंगचे लोकोत्तर गुण सर्वतोमुखी स्तुतीचा एक विषयच होऊन बसले असते यात संशय नाही.

चौथा व शेवटचा भाग पुन: संकटकाल. या काळात मासाहेबांची एकुलती एक परमप्रिय कन्या वारली. त्यांची स्वत:ची शरीर प्रकृती क्षीण झाली. तसेच दुसऱ्या काही कारणांनी त्यांची वृत्ती उदास होत चालली आणि उत्तरोत्तर त्यांचे लक्ष पारलौकिक साधनाकडे वळत चालले. या काळातही तसल्या स्थितीस अनुरूप असाच वर्तनक्रम त्यांचे हातून झाला.

तीर्थयात्रा, देवालये बांधणे, पूजाअर्चा, देवसेवा, अन्नसंतर्पण, भूतदया, दानधर्म वगैरे कृत्ये याकाळी मासाहेबांच्या हातून पुष्कळ झाली. त्यांचे वर्णन चरित्रकारांनी थोडक्यात फार चटकदार केलेले आहे व ही सर्व बडोद्यातील लोकांच्या डोळ्यांपुढे मूर्तिमंत अद्यापि उभी आहेत.

शेवटी इतकेच म्हणणे बस आहे की, चरित्रकारांनी मांसाहेबांचा जो गुणानुवाद गायला आहे, त्यात किंचितही अतिशयोक्तीचा भाग नाही. इतकेच नव्हे तर जेवढे वर्णन त्यांनी केले आहे त्यापेक्षा फारच अधिक स्तुतीस मांसाहेब पात्र होत्या यात संशय नाही. अशा उत्तम राजस्त्रीचे चरित्र रा.सा. नागेशराव यांनी थोडक्यात उत्तम रीतीने लिहिले, यामुळे त्यांचे मराठी वाचकांवर फार उपकार झाले आहेत असे म्हटले पाहिजे.

बडोदे　　　　　　　　　　**विठ्ठल लक्ष्मण कवठेकर**

ता. १०.१२.१९००

## महाराष्ट्र स्त्रियांच्या चरित्रांबद्दल दोन शब्द

सर मोनियर उइल्यम्स यांनी इ.स. १८८३ मध्ये हिंदुस्थानातील चरित्रग्रंथासंबंधाने लिहिताना एके ठिकाणी असे लिहिले आहे की, 'हिंदुस्थानातील प्रख्यात पुरुषांची चरित्रे अद्यापि लिहिली गेली नाहीत, ही दुर्दैवाची गोष्ट आहे! हिंदू अथवा मुसलमान लोक यांना अशा चरित्रग्रंथाची गोडी आहे असे दिसत नाही!' हे उद्‌गार साहेबबहादुरांनी काढल्यास आज सतरा वर्षे होऊन गेली. तितक्या अवधीत ही स्थिती पालटली जाऊन, हिंदू व मुसलमान या दोन्ही जातीतील विद्वान लोकांचे लक्ष कमी-जास्त प्रमाणाने प्रसिद्ध पुरुषांच्या चरित्र लेखनाकडे लागत चालले आहे, असे म्हणण्यास हरकत नाही. एतद्देशीय भाषेमध्ये या सतरा वर्षात पुष्कळ चरित्रग्रंथ निर्माण झाले असून, तो क्रम पुढे जोराने चालू आहे, ही संतोषाची गोष्ट होय. प्रसिद्ध व कीर्तिमान पुरुषांच्या चरित्रांकडे ज्याप्रमाणे एतद्देशीय ग्रंथकारांचे लक्ष लागले आहे, त्याप्रमाणे हिंदुस्थानातील सुप्रसिद्ध स्त्रियांच्या चरित्र प्रकाशनासंबंधानेही त्यांचा अल्पसा प्रयत्न चालू आहे. इंग्रजी भाषेमध्ये काही विद्वान युरोपियन ग्रंथकारांनी हिंदुस्थानातील इतिहासप्रसिद्ध अर्वाचीन व प्राचीन स्त्रियांची चरित्रे प्रसिद्ध केली आहेत. त्यांच्या आधाराने एतद्देशीय भाषेत स्त्री चरित्रग्रंथ थोडे थोडे तयार होऊ लागले आहेत, ही समाधानाची गोष्ट होय. बंगाली ग्रंथकार बाबू मन्मथनाथ दत्त यांच्या इंग्रजी पुस्तकाच्या आधारे 'भारतवर्षीय युवतिरत्नमाला' नामक एक चांगला ग्रंथ मराठी भाषेत काही महिन्यापूर्वी प्रसिद्ध झाला आहे व तो सुशिक्षित स्त्री-पुरुषांस वाचनाभिरुची उत्पन्न करण्यास अंशतः कारण होईल अशी आशा आहे. तथापि रणशूर, राजकारणी, नीतिसंपन्न व सद्‌गुणी अशा खुद्द महाराष्ट्र स्त्रियांची चरित्रे अद्यापि महाराष्ट्र वाचकास चांगलीशी उपलब्ध झाली नाही. त्यामुळे महाराष्ट्र

स्त्रियांचे अलौकिक गुण चरित्ररूपाने जसे प्रकाशित व्हावयास पाहिजेत तसे झाले नाहीत, असे मोठ्या दु:खाने म्हणावे लागते. अशी चरित्रे प्रसिद्ध झाल्यावाचून महाराष्ट्र स्त्रियांची खरी योग्यता कधीही व्यक्त होणार नाही व त्यांच्या राजकारणचातुर्य, शौर्य, तेजस्विता, स्वाभिमान, पातिव्रत्य इत्यादी मूल्यवान गुणांचे खरे तेज कधीही प्रकाशित होणार नाही.

आजपर्यंत सुप्रसिद्ध महाराष्ट्र स्त्रियांपैकी कीर्तिशालिनी महासाध्वी राणी अहिल्याबाई होळकर व झाशीची रणशूर राणी लक्ष्मीबाई या दोन स्त्रियांची चरित्रे काय ती मराठी भाषेत प्रसिद्ध झाली आहेत; परंतु याशिवाय अनेक चरित्रवर्णनयोग्य अशा प्रख्यात स्त्रिया इतिहासाच्या अभावामुळे गाढ अंधकारात लपून गेल्या आहेत! त्यांची चरित्रे प्रसिद्ध करून, त्यांच्या अंगच्या अद्वितीय गुणांना कीर्तिमंदिरात चिरप्रकाशित करून ठेवणे हे काम एतद्देशीय ग्रंथकारांचे आहे; परंतु इकडे त्यांचे लक्ष जितके जावे तितके जात नाही, ही शोचनीय गोष्ट आहे! **'अकरणान्मंदकरणंश्रेय:'** या न्यायाने अल्पसा प्रयत्न होत आहे किंवा झाला आहे, तेवढ्यावर समाधान मानून स्वस्थ बसणे कधीही रास्त होणार नाही. इंग्लंडातील विविध गुणसंपन्न स्त्रियांच्या चरित्रमाला झपाट्याने प्रसिद्ध होत आहेत. एवढेच नव्हे तर तेथील इतिहासप्रसिद्ध वीरमाता व वीरपत्नी यादेखील तद्देशीय चरित्र लेखकांच्या प्रयत्नाने कीर्तीच्या अढळ मंदिरात विराजित झाल्या आहेत; परंतु आमच्याकडे त्या मानाने पाहिले तर अगदी उलट प्रकार आहे! अहिल्याबाई होळकर हिच्यासारखी लोकोत्तर स्त्री सर्व जगाच्या इतिहासात एक देखील सापडणे कठीण; परंतु तिचे साद्यंत, साधार व सविस्तर चरित्र अद्यापि मराठी भाषेत प्रसिद्ध झाले नाही! सर जॉन माल्कम या परदेशीय ग्रंथकाराने या स्त्रीची थोडीबहुत माहिती 'मध्य हिंदुस्थानच्या इतिहासात' लिहून ठेवली आहे. तिच्या आधारे 'हिंदुस्थान कथारस' वगैरे मराठी पुस्तकात तिचा अल्पसा वृत्तांत प्रसिद्ध झाला आहे व चार-पाच वर्षांपूर्वी 'केसरी' 'धनुर्धारी' व पुण्याचे रा. देव यांनी तिची दोन स्वतंत्र चरित्रे प्रसिद्ध केली आहेत; परंतु अहिल्याबाईच्या विशाल कीर्तीच्या मानाने ही चरित्रे फारच अपूर्ण व संक्षिप्त आहेत, असे म्हणणे भाग पडते! खरोखर, या साध्वींचे विस्तृत व मनोरंजक चरित्र अस्सल कागदपत्रांच्या माहितीने प्रसिद्ध झाले, तर त्यास 'सद्‌गुणगाथा' असेच नाव शोभेल, यात शंका नाही. अहिल्याबाईसंबंधाने टॉरेन्स, म्यालेसन,

वालबेझेन, सर लिपेल ग्रिफीन् वगैरे अनेक इंग्रज ग्रंथकारांनी फारच स्तुतिपर उद्‌गार काढिले आहेत, एवढेच नव्हे तर मिसेस 'जोना बेली' नामक एका आंग्ल युवतीने तिजवर एक इंग्रजी काव्यही रचिले आहे; परंतु या स्त्रीचे विस्तृत चरित्र प्रसिद्ध करण्याची इच्छा अद्यापि महाराष्ट्र ग्रंथकारास उत्पन्न होत नाही हे दुर्दैव होय!! एका इंग्रज ग्रंथकाराने काही वर्षांपूर्वी अहिल्याबाईंच्या चरित्राबद्दल असे म्हटले आहे :-

"It is strange that so great a name as that of Ahilyabai should have no mention in the pages of Modern Indian History. Mill, perhaps, has purposely suppressed any account of her to guard himself against inconsistency and prevent the latter part of his work from contradicting the statements in earlier chapters. Thornton has passed over her name in utter silence, while he has taken prominent notice of the profligata Tulsibai. The late East India Company wasted a good deal of money upon a work that grossly misrepresents the Indians, and that is nothing more than "a war's rattle throughout." India has not her historian yet, and to this circumstance may be traced much of that wrong impression which prevails respecting her sons. It is good that the Hindus of Bombay are zealous in the cause of Hindu Female education; it is good that they have given a warm response to the suggestions of Miss Mary Carpenter, it is good that Dr. Bhau Daji presides at the head of female institution, but traveller and antiquarian he is, he should undertake to make proper resarches and cotapile a Boswellian biography of the great Mahratta lady who affords the noblest example of wisdom, goodness and virtue. That which Akbar is among male sovereigns, is Ahilyabai among female sovereigns."

याचा भावार्थ असा की :- 'हिंदुस्थानच्या अर्वाचीन इतिहासामध्ये अहिल्याबाईसारख्या प्रसिद्ध व नामांकित स्त्रीचा नामनिर्देश नसावा ही आश्चर्याची गोष्ट आहे. मिल्ल या इतिहासकाराने कदाचित काही असंबद्ध माहिती देण्यात येऊ नये म्हणून तिची हकीकत मुद्दाम गाळली आहे. थॉर्नटन या इतिहासकाराने तिच्या नावाचा नुसता मागमूसही ठेविला नाही आणि विषयलंपट तुळसाबाईचा वृत्तांत विस्तृत रीतीने प्रसिद्ध केला आहे! माजी कंपनी सरकाराने, हिंदुस्थानातील लोकांविषयी कलकलता गैरसमज उत्पन्न करणाऱ्या या ग्रंथाकरिता, पुष्कळ पैसा खर्च केला; परंतु त्यात अथपासून इतिपर्यंत लढाईचे चऱ्हाट लावलेले आहे. हिंदुस्थानचा खरा

इतिहासकार अद्यापि निपजला नाही. त्यामुळे हिंदुस्थानातील लोकांविषयी जो गैरसमज प्रचलित आहे तो नाहिसा होत नाही. मुंबई इलाख्यातील हिंदू लोकांस स्त्रीशिक्षणाची विशेष आस्था आहे ही चांगली गोष्ट आहे. त्यांनी मिस मेरी कार्पेन्टर या बाईच्या सूचनांचा अगत्यपूर्वक स्वीकार केला हीही चांगली गोष्ट आहे. डॉ. भाऊ दाजी यांच्यासारखे विद्वान गृहस्थ स्त्री शिक्षणार्थ अवतीर्ण झालेल्या एका संस्थेचे अध्यक्ष आहेत हीही चांगली गोष्ट आहे; परंतु त्यांच्यासारख्या प्रवासप्रिय व पुराणवस्तुसंशोधक गृहस्थांनी बरोबर रीतीने जुन्या कागदपत्रांचा शोध लावून, या प्रख्यात महाराष्ट्र स्त्रीचे एक जंगी चरित्र तयार करणे अवश्य आहे. या स्त्रीचे चरित्र म्हणजे शहाणपणा, सौजन्य आणि सद्‌गुण यांचे अत्युत्कृष्ट उदाहरण होय. हिंदुस्थानातील राजे लोकांत ज्याप्रमाणे अकबर हा मुकुटमणी, त्याप्रमाणे स्त्री वर्गामध्ये अहिल्याबाई ही होय.'

अर्थात युरोपियन लोक जिच्या चरित्राची इतक्या कौतुकाने प्रशंसा करतात, त्या स्त्री रत्नाचे तेज अद्यापि अंधकारात गुप्त असावे यापेक्षा आमच्या स्वाभिमानशून्यतेचे निदर्शक उदाहरण दुसरे काय असणार? अहिल्याबाईंच्या चरित्राची अनास्था फक्त मराठी ग्रंथकारांकडूनच झाली आहे, असाच केवळ अर्थ नाही. खुद्द तिचे वंशजही तिच्या भव्य यशाची योग्यता अद्यापि जाणत नाहीत व तिच्या पवित्र चरित्राची मुळीच पर्वा करीत नाहीत, याबद्दल जितका खेद मानावा तितका थोडाच आहे. अहिल्याबाईंचा अल्प वृत्तांत लिहून तिची कीर्ती कायम ठेवण्यास सर जॉन माल्कम साहेब जसे निर्माण झाले, त्याप्रमाणे दुसरा कोणी **युरोपियन** गृहस्थ निर्माण होऊन हे चरित्र सविस्तर लिहिण्याचे काम स्वीकारील तरच ते सिद्धीस जाईल! एरव्ही आशा करण्यास दुसरा मार्ग नाही!!

खुद्द महासाध्वी अहिल्याबाई हिच्या चरित्राची ही स्थिती, मग इतर इतिहासप्रसिद्ध मराठी स्त्रियांच्या चरित्रांची याहूनही शोचनीय स्थिती असावी यात आश्चर्य ते काय?

नेपोलियन बोनापार्टच्या आईंचे 'Mother of Napolean' म्हणून जंगी चरित्र फ्रेंच व इंग्रजी भाषेमध्ये प्रसिद्ध आहे; परंतु नेपोलियनच्या गुणांवर ताण करणारे महाराष्ट्र राज्यसंस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांच्या मातुश्री जिजाबाई यांचे चरित्र अद्यापि कोणास श्रुत नाही! जिजाबाईंचे चरित्र

इतके महत्त्वाचे आहे की, ते वाचून कोणासही परमावधीचा आनंद वाटल्यावाचून राहणार नाही! न्यायमूर्ती रानडे यांनी मराठ्यांच्या इतिहासाचा जो एक भाग नुकताच प्रसिद्ध केला आहे, त्यात त्यांनी शिवाजी महाराजांच्या साहाय्यकारी मंडळामध्ये जिजाबाईंची अग्रस्थानी गणना केली आहे व प्रांजळपणे असे म्हटले आहे की :-

" If ever great men owed their greatness to the inspiration of their mothers, the influence of Jijabai was a factor of prime imprpotance in the making of Shivaji's career, and the chief source of his strength. " (Page 63).

हे अगदी अक्षरश: खरे आहे. राजमाता जिजाबाई हिच्याच योग्यतेप्रमाणे राजपत्नी सईबाई हिची योग्यता होती. या उभय स्त्रीरत्नांची माहिती चिटणिसी वगैरे बखरीत थोडीशी आलेली आहे. ती वाचून कोणाचेही चित्त हर्षभरित झाल्यावाचून राहणार नाही. या स्त्रियांच्याच योग्यतेच्या दुसऱ्या स्त्रिया राजारामाची पत्नी सुप्रसिद्ध ताराबाई, तिची सून जिजाबाई, थोरले शाहू महाराज यांच्या राण्या सकवारबाई व विरूबाई या होत. यांची चरित्रे निरनिराळ्या दृष्टीने महत्त्वाची असून फार मननयोग्य आहेत. वर निर्दिष्ट केलेल्या शाहू महाराजांच्या दोन राण्या मराठी राज्याच्या अभ्युदयास इतक्या साहाय्यभूत झाल्या आहेत की, सांगता सोय नाही. छत्रपतींच्या राण्यांनी मोठमोठ्या राजकारणात मन घालून नाजूक मनसबे सिद्धीस नेल्याची माहिती कोणास ठाऊक देखील नसेल! परंतु महापुरुष ब्रह्मेंद्रस्वामी धावडशीकर यांचा जो पत्रव्यवहार उपलब्ध झाला आहे, त्यावरून मनास थक्क करून टाकणाऱ्या या स्त्रियांच्या राजकारणांचा बराच प्रकाश बाहेर येतो. या खुद्द छत्रपतींच्या घराण्यातील स्त्रिया झाल्या. याप्रमाणेच पेशव्यांच्या घराण्यातही काही चरित्रलेखनयोग्य स्त्रिया होऊन गेल्या.

बाळाजी विश्वनाथाची बायको राधाबाई हिचे चरित्र तर फारच अपूर्व आहे. हिच्यासारखी दूरदर्शी, राजकारणकुशल, प्रसंगावधानी आणि सुसंस्कृत मनाची स्त्री इतिहासात क्वचित सापडेल. शिवाजी उत्पन्न होण्यास ज्याप्रमाणे जिजाबाई कारण झाली, त्याप्रमाणे बाजीराव उत्पन्न होण्यास राधाबाई कारण झाली, असे मोठ्या गर्वाने म्हणता येईल. या स्त्रीची माहिती मराठी बखरीमध्ये नुसत्या नामोल्लेखापेक्षा अधिक मिळत नाही. बाजीरावाच्या व चिमाजीआपाच्या पराक्रमातिशयाचे वर्णन करण्यापूर्वी या स्त्रीचे चरित्र

अवश्य ध्यानात घेतले पाहिजे, इतके ते महत्त्वाचे आहे. तिच्या शिक्षणाचा परिणाम या दोन रणशूर महाराष्ट्र वीरांवर कसा झाला हे समजले, तर मराठी राज्य तयार करण्यास जिजाबाई व राधाबाई या स्त्रियाच कारण झाल्या, असे साश्चर्य व सानंद कबूल केले पाहिजे. राधाबाईच्या खालच्या वर्गात गोपिकाबाईची गणना करिता येईल. हिने थोरले माधवराव व नारायणराव यांना चांगला उपदेश केला होता. थोरल्या माधवरावांनी कर्नाटकच्या मोहिमेमधून आपल्या मातुश्रीस अनेक महत्त्वाची पत्रे पाठविली आहेत व नाजूक राजकारणात तिची सल्लामसलत घेतली आहे, हे ऐकून कोणास कौतुक वाटणार नाही? हिने सवाई माधवरावास पाठविलेले एक उपदेशपत्र काव्येतिहाससंग्रहामध्ये मागे प्रसिद्ध झालेलेच आहे. ते वाचून तिच्या थोर मनाची चांगली कल्पना करता येईल.

छत्रपती व पेशवे या दोन घराण्याशिवाय महाराष्ट्रातील इतर सरदार घराण्यातही चरित्रलेखनास योग्य अशा अनेक स्त्रिया निपजल्या आहेत. तळेगाव दाभाडचे सेनापती त्र्यंबकराव यांची पत्नी उमाबाई ही प्रति रणशूर झाशीची राणीच होती, असे म्हटले असता अतिशयोक्ती होणार नाही. हिची गणना धनुर्धारिणी 'रणशूर अबला' मध्ये केली आहे, ती अगदी यथार्थ आहे. हिची योग्यता शाहू महाराज व बाजीराव पेशवे हेदेखील जाणून चुकले होते. शाहू महाराजांसारख्यास स्वत: तळेगावास जाऊन जिची समजावणी करावी लागत असे व जिला बहुमानपुरस्सर पालखीत बसवून आपल्या राजधानीत न्यावी लागत असे व बाजीरावासारख्या बाणेदार वीरास जिच्या पायावर आपले डोके नम्र करून वारंवार क्षमा मागावी लागत असे, तिची योग्यता काही अपूर्ण असलीच पाहिजे यात शंका नाही. या मानधन स्त्रीने अहमदाबादेवर स्वारी करून तेथील बाबी नामक मुसलमान सुभेदाराचा हत्तीवरून लढून जो पराभव केला तो इतिहासकारांनी कौतुकानेच वर्णन केला पाहिजे असा आहे.

सुभेदार थोरले मल्हारराव होळकर यांना बिकटप्रसंगी युद्धनीती शिकविणारी त्यांची पत्नी गौतमाबाई, पानिपतच्या मोहिमेमध्ये भाऊसाहेबास आपल्या तेजस्वितेने व वीर्यशालित्वाने थक्क करून सोडणारी बळवंतराव मेहेंदळ्याची आई, भीमाशंकराच्या उन्मत्त कोळी लोकांस आपल्या तरवारीच्या तीक्ष्ण धारेने स्वर्ग दाखवून त्यांच्या कपाळास सौभाग्यतिलक लावणारी व पालखीत

बसून वाजत गाजत पुण्यनगरात प्रवेश करणारी कृष्णराव महादेव चासकर यांची विधवा स्त्री रखमाबाई, बळवंतराव रास्त्यास रावबाजीच्या कैदेतून सोडवून एका रात्रीत साठ कोस घोड्याचा प्रवास करणारी धैर्यशालिनी कृष्णाबाई, सर जॉन मॉल्कम यांच्यासारख्या रणपटू आंग्ल योद्ध्यासही आश्चर्यचकित करणारी यशवंतराव होळकराची मुलगी भीमाबाई या स्त्रिया कितीतरी लोकोत्तर असल्या पाहिजेत. यांची चरित्रे वीररसाने ओथंबलेली असून ती वाचली असता महाराष्ट्र स्त्रिया किती तेजस्वी होत्या, त्यांच्या अंगी किती सद्‌गुण होते, आणि त्यांची योग्यता 'न स्त्री स्वातंत्र्यमर्हति' या श्रुतीसही कशी हरताळ लावीत होती, हे चांगले व्यक्त होईल यात शंका नाही; परंतु इतिहासाभावामुळे त्यांची माहिती व महिमा सामान्य वाचकास समजणे अगदी दुरापास्त झाले आहे. अशा स्त्रिया इंग्लंडसारख्या देशात जन्मल्या असत्या तर तेथील स्वाभिमानी लोकांनी त्यांचे फार-फार पोवाडे गायले असते व चरित्रकारांनी त्यांची सुंदर सुंदर वर्णने लिहून त्यांच्या रसमय गोड कथांनी स्वभाषेचे ग्रंथभांडार सजविले असते!!

वरील स्त्रियांच्या केवळ बरोबरीच्या नसल्या तरी त्यांच्या वर्गात गणण्यास योग्य अशा इतर स्त्रियाही आणखी पुष्कळ मराठे घराण्यात निपजल्या आहेत; परंतु चरित्राच्या अभावामुळे त्यांची माहिती विशेष प्रसिद्ध नाही. ग्वाल्हेरची बायजाबाई शिंदे, धारची मैनाबाई पोवार, चिंतामणराव अप्पा पटवर्धनांची बाणेदार पत्नी आणि इंदूर येथील प्रख्यात किबे घराण्यातील दानशूर व राजकारणी रखमाबाई यांची चरित्रे कमी महत्त्वाची होतील काय? लिहिण्यास आनंद वाटतो की, श्रीमती रखमाबाई साहेब किबे यांचे संक्षिप्त चरित्र किबे घराण्यातील एका सुशिक्षित युवतीने 'ग्रंथमाले'मध्ये नुकतेच प्रसिद्ध केले आहे.

वर सांगितलेल्या प्रसिद्ध स्त्रिया महाराष्ट्रामध्ये शौर्यपराक्रमादी गुणांनी विख्यात झालेल्या ऐतिहासिक घराण्यातील असल्यामुळे त्यांची माहिती निदान नाममात्र तरी महाराष्ट्रवाचकांस असण्याचा संभव आहे; परंतु महाराष्ट्रापासून दूर असलेल्या अशा इतिहासप्रसिद्ध मराठे घराण्यात ज्या कित्येक लोकोत्तर स्त्रिया होऊन गेल्या, त्यांची नाममात्रही ओळख असण्याचा महाराष्ट्र वाचकांस संभव नाही. या स्त्रियांची चरित्रे फार अपूर्व, मनोरंजक व वाचनयोग्य आहेत. छत्रपती शिवाजी महाराज यांचे सापत्न बंधू व्यंकोजी महाराज

यांचा वंश, लॉर्ड डलहौसी साहेबांची गदा एतद्देशीय संस्थानावर फिरेतोपर्यंत, तंजावर येथे सुखाने नांदत होता. या तंजावरच्या राजघराण्यात खुद्द व्यंकोजी महाराजांची पत्नी दीपाबाई व त्यांचीच नातसून सुजानबाई या फार चतुर व राजकारणी स्त्रिया होऊन गेल्या. यापैकी पहिलीने आपल्या यजमानास उपदेश करून त्यांचे व शिवाजी महाराजांचे सख्य करून दिले. बायकोच्या योगाने बंधूबंधूमध्ये वैमनस्य उत्पन्न होते असा जगात साधारण अनुभव आहे; परंतु बायकोने नवऱ्यास ताळ्यावर आणून, त्याचेच नव्हे तर त्याच्या सर्व राज्याचे कल्याण केल्याचे उदाहरण मराठ्यांच्या इतिहासात हेच पहिले असेल. या स्त्रीच्या शहाणपणाची तारीफ खुद्द शिवाजी महाराज यांनी केली असून, तिच्या चोळीपातळाकरिता एक लाखाची स्वतंत्र जहागीर त्यांनी तोडून दिली. अर्थात पुण्यश्लोक शिवनृपतीने जिचा इतका गौरव केला व जिच्या शहाणपणाची प्रशंसा केली, तिची थोरवी कितीतरी असामान्य असली पाहिजे? दीपाबाईप्रमाणेच सुजानबाई हीही फार राजकारणपटू व चतुर स्त्री होती. हिने आपला नवरा मृत्यू पावताच त्याच्या पश्चात आलेल्या संकटपरंपरेस न जुमानता, तंजावरचे राज्य काही दिवस उत्तम रीतीने चालविले; परंतु इतिहासाच्या अभावामुळे ही सर्व दिव्य रत्ने विस्मृतीच्या घट्ट आवरणाने झाकून गेली आहेत. ती लोकांपुढे चरित्ररूपाने प्रकाशित झाली तर केवढी बहार होईल?

तंजावरच्या राण्यांप्रमाणे गुत्तीकर मुरारराव घोरपड्याच्या बायकोची विशेष कीर्ती ऐकण्यात येते. तिचेही चरित्र उपलब्ध होणे अवश्य आहे. महाराष्ट्रापासून अलग झालेल्या दक्षिणेतील महाराष्ट्र घराण्याप्रमाणे उत्तर हिंदुस्थानातील विशेषकरून बुंदेलखंडातील महाराष्ट्रीय घराण्यातही काही लोकोत्तर स्त्रिया निपजल्याचे दृष्टोत्पतीस येते. इ.स. १८५७ च्या बंडाने झाशींच्या राणीची कीर्ती अजरामर करून ठेवली आहे; परंतु त्याच घराण्यात आणखीही कित्येक स्त्रिया चरित्रलेखनयोग्य सापडतील. झाशीच्या घराण्याबरोबरचे दुसरे घराणे गोविदपंत बुंदेल्यांचे होय. त्यातील राणी रखमाबाई ही सागर प्रांतात अद्यापि प्रसिद्ध आहे. या सर्व स्त्रियांची माहिती उपलब्ध होऊन ती चरित्ररूपाने वाचकास सादर झाली, तर महाराष्ट्र लोकांच्या स्त्रियाही राजकारणात व इतर उत्तम गुणात काही कमी योग्यतेच्या नव्हत्या असे मोठ्या गर्वाने म्हणता येईल.

असो. वर निर्दिष्ट केलेल्या सुप्रसिद्ध महाराष्ट्र स्त्रियांच्या मालिकेवरून इतके सिद्ध होते की, महाराष्ट्र स्त्रियांच्या अंगी शौर्य व राजकारणचातुर्य वगैरे अनेक गुण पूर्वी चांगल्या तऱ्हेने वसत होते व महाराष्ट्र स्त्रियांची योग्यता महाराष्ट्र राज्यवैभवाच्या भव्य कीर्तिप्रमाणे विशेष होती. सर जॉन माल्कम यांनी महाराष्ट्र स्त्रियासंबंधाचे एके ठिकाणी यथायोग्य वर्णन दिले आहे ते संग्राह्य व वाचनीय असल्यामुळे त्यांचे अवतरण येथे घेतल्यावाचून राहवत नाही. ते लिहितात :-

" The females, both of the Brahmin and Shudra Mahrattas have generally speaking, when their husbands are Princes and Chiefs, great influence, and mix not only by their power over individuals, but some times, as has been shown, personally in affairs of the State. If married to men of rank, they have usually a distinct provision and estate of their own; enjoy as much liberty as they can desire; seldom, if ever, wear a veil, and give feasts and entertainments on birth and mariages, and on particular anniversaries. The power which the Mahratta ladies of the familes of Scindia, Holkar and the Puwar enjoy, has been described. They have always had great influence in their secret councils; and usage has latterly given them a considerable and increased shares in the Government and in some cases they have been the acknowledged heads. They are ususally instructed in reading, working and arthimetic. The management of the horse arways constitutes part of their deuction, which is directed to qualify them for the duties to which their condition makes them liable to be called. In a long conference I had with Bheema Bai, the daughter of Jesvantrao Holkar. She expatiated with much eloquence on the duties inccrcated as those of a Mahratta Princess when the interests of her family and nation were at stake. It was, she said, an obligation for such in extreme cases (where she had neither husband nor son) to lead her troops in person to battle. Bheema Eairode with grace and a few excelled her in the management of the spear. The Mahratta ladies of rank may be generally described as deficient in regular beauty, but with soft features and expression that marks quickness and intelligence. They have almost all when called forth, shown energy and courage, and some of them great talent."

हे माल्कम साहेबांनी लिहिलेले महाराष्ट्र राजघराण्यांतील स्त्रियांचे वर्णन

अगदी यथार्थ आहे. यावरून या स्त्रियांची योग्यता विशेष असून, त्यांची चरित्रे स्त्री-पुरुषास चांगल्या गुणांचा उत्तम कित्ता घालून देतील यात शंका नाही. ही सर्व चरित्रे अत्यंत मनोरंजक व महत्त्वाची असल्यामुळे ती महाराष्ट्र वाचकास प्रेमपूर्वक सादर करावीत असा प्रकृत लेखकाचा हेतू आहे. तो ईश्वरकृपेने लवकरच सिद्धीस जावो.

सांप्रतकाली महाराष्ट्र संस्थाने व त्यांचे स्वातंत्र्य हे बहुतेक संपुष्टात आले असल्यामुळे त्यातील प्रख्यात स्त्रियांच्या अद्वितीय गुणांचे प्रदर्शन होण्यास अवकाश राहिला नाही, असे म्हटले तर ते असत्य होणार नाही. अर्थात राजकारणपटुत्व व्यक्त करण्याचे प्रसंगच नसल्यामुळे महाराष्ट्र संस्थानात अशा स्त्रिया निपजण्याचा संभव अगदीच कमी झाला आहे. त्यामुळे स्त्रियांच्या बुद्धिचातुर्याचे तेज वनपुष्पांच्या सुगंधाप्रमाणे किंवा सागराच्या अंतर्भागी लपलेल्या रत्नकांतीप्रमाणे लोकांच्या नजरेस आले नाही, तर त्यात आश्चर्य ते काय? तात्पर्य, गुणांचे प्रकटीकरण होण्यास अवश्यक जे प्रसंग ते नसल्यामुळे ते व्हावे तसे होत नाही. त्यामुळे निसर्गतःच उत्पन्न झालेले सद्‌गुणांचे अंकुर जागच्या जागीच करपून जाऊन निष्फळ होतात. यदाकदाचित त्यातील एखादी सद्‌गुणवेली जोमदार होऊन ती वाढू लागली, तर आसमंताच्या काटेरी झाडात गुरफटून जाण्याची भीती असते. तात्पर्य, महाराष्ट्र संस्थानातील अथवा राजघराण्यातील स्त्रिया गुणसंपन्न व कीर्तिसंपन्न निपजण्याची आशा दिवसेंदिवस कमी कमी होत चालली आहे व त्यांचे स्वाभाविक तेज राजवाड्यातील विलासमंदिरात बहुतेक मंद होत चालले आहे, असे म्हटले असता अतिशयोक्ती होणार नाही. या मंद तेजाची एखादी लहानशी प्रकाशलहरी राजवाड्यातून चुकून देखील बाहेर पडू नये, म्हणून गोषाने अथवा पडद्याने चांगलीच खबरदारी घेतली आहे!! अर्थात अशा परिस्थितीत, आपल्या सद्गुणांनी सर्व जनांस वंदनपात्र होऊन, कीर्तीच्या अढळ मंदिरी सन्निविष्ट होणाऱ्या महाराष्ट्र स्त्रिया, विस्तीर्ण अशा वालुकामय प्रदेशात चमकणाऱ्या सुवर्णरजाप्रमाणे किंवा मौक्तिककणाप्रमाणे अत्यंत दुर्मिळ होत चालल्या आहेत यात शंका नाही. अशा स्त्रिया क्वचित दृष्टीस पडल्या तर त्यांचे अत्यल्प गुणदेखील कौतुकास्पद वाटून, विविध सद्गुणमंडित स्त्रीरत्नांच्या चरित्रमालेच्या अभावी त्यांचे पोवाडे प्रेमभावाने गाण्यास, कोणास स्फूर्ती उत्पन्न झाली तर त्यात नवल ते काय?

श्रीमंत महाराणी जमनाबाईसाहेब गायकवाड यांचे चरित्र हे राजकुलीन मराठी स्त्रियांच्या शेवटच्या वर्गापैकी होय. गायकवाड सरकारचे घराणे हे शिंदे, होळकर, भोसले यांच्याप्रमाणेच इतिहासप्रसिद्ध आहे. या घराण्यात पूर्वी काही प्रख्यात स्त्रियाही होऊन गेल्या असतील; परंतु त्यांची माहिती नसल्यामुळे त्यासंबंधाने काही लिहिता येत नाही. तथापि नुकत्याच निधन पावलेल्या महाराणी जमनाबाई साहेब यांनी गायकवाड घराण्यातही कीर्तिसंपन्न, परोपकारी, दानशूर अशा स्त्रिया निपजल्या असतील हे सिद्ध करून दाखविण्याकरिता, स्वत:चे उदाहरण जगापुढे ठेविले आहे असे म्हणण्यास हरकत नाही.

या एकाच उदाहरणावरून अद्यापही महाराष्ट्र राजघराण्यातील स्त्रियांमध्ये नावलौकिक प्राप्त करून घेण्यासारखे विशेष गुण उत्पन्न होतात किंवा दृष्टोत्पत्तीस येतात, असे मानिले तरी चालण्यासारखे आहे. अर्थात अशा स्त्रियांची ही चरित्रे प्रसिद्ध करून त्यांच्या गुणांचे पोवाडे गायले असता, चालू पिढीवर स्त्रीजातीच्या योग्यतेविषयी व त्यांच्या शिक्षणाविषयी अल्पसा तरी अनुकूल संस्कार होण्याचा संभव आहे. असाच उद्देश मनात आणून प्रस्तुत चरित्रग्रंथ महाराष्ट्र भाषेतील प्रख्यात ग्रंथकार रा.सा. नागेशराव विनायक बापट यांनी लिहिण्याचे योजिले असावे.

महाराणी जमनाबाईसाहेब यांच्या नैसर्गिक बुद्धिवर्चस्वाची किंवा राजकारणपटुत्वाची दिगंत कीर्ती होण्यासारखे प्रसंग देशकालवर्तमानाप्रमाणे येण्याचा संभवच नसल्यामुळे त्यांना अहिल्याबाईंच्या किंवा सुजानबाईंच्या वर्गात गणता यावयाचे नाही. तथापि मल्हारराव महाराजांच्या कारकीर्दीत जी अव्यवस्था झाली व तद्नंतर बडोदे संस्थानात जी राज्यक्रांती झाली, त्याप्रसंगी जमनाबाई साहेबांनी फार चांगले वर्तन केले हे सर्वश्रुतच आहे. यावेळी ब्रिटिश सरकारनेही जमनाबाईसाहेबांचा योग्य मान ठेवून त्यांना विशेष महत्त्व दिले व बडोदे संस्थानास कल्याणप्रद अशाच गोष्टी केल्या हे प्रांजलपणे कबूल करणे भाग आहे. यावेळी हिंदुस्थानचे गव्हर्नर जनरल लॉर्ड नार्थब्रूक साहेब हे होते. यांनी त्रावणकोर व इंदूर येथील राज्यव्यवस्थेत अत्युत्तम सुधारणा करून प्रसिद्धीस आलेले मुत्सद्दी राजे सर टी. माधवराव यांची बडोदे संस्थानच्या दिवाणगिरीवर योजना केली; आणि महाराणी जमनाबाईसाहेब यांच्या पसंतीने सध्याचे महाराज श्रीमंत सयाजीराव यास

बडोदे संस्थानचे अधिपती करून, संस्थानचा राज्यकारभार उत्तम रीतीने चालेल अशी तजवीज केली. यावेळी बडोद्याचे रेसिडेंट सर रिचर्ड मीड हे होते. हेही मध्य हिंदुस्थानातील बहुविध संस्थानांत अनेक वर्षे राजकारण खेळविल्यामुळे चांगले अनुभवी बनले होते. या तिघांनी मिळून बडोदे संस्थानची फार चांगली सुधारणा केली. या सुधारणेत महाराणी जमनाबाईसाहेब यांच्या यशाचा स्वतंत्र भाग किती होता हे ठरविण्यास काही मार्ग नाही; परंतु सर टी. माधवराव व सर रिचर्ड मीड यांनी ज्या अर्थी महाराणी जमनाबाईसाहेब यांचे राज्यव्यवस्थेत उत्कृष्ट साहाय्य झाल्याबद्दल स्तुतिवाद गायले आहेत, त्याअर्थी बडोद्याच्या राजकारणात जमनाबाईसाहेबांचे बरेच चातुर्य प्रकट झाले असावे, असे मानण्यास हरकत नाही.

महाराणी जमनाबाई साहेब यांच्या हाती स्वतंत्र राज्यकारभार नसल्यामुळे व सर टी. माधवराव व सर रिचर्ड मीड यांच्यासारखे राज्यव्यवहारदक्ष, चतुर व सर्वसूत्रचालक असे मंत्री राज्यकारभार व्यवस्थित रीतीने चालवीत असल्यामुळे त्यांच्या राजकीय गुणांचे खरे तेज पूर्णपणे प्रदीप्त होण्यास अवकाश नव्हता, असे म्हटले तरी चालण्यासारखे आहे; परंतु या राज्यक्रांतीत त्यांना 'राजमाता' म्हणून जो अधिकार प्राप्त झाला होता, तो त्यांनी कशा रीतीने बजावला हे पाहणे विशेष अगत्याचे आहे. महाराणी जमनाबाई साहेब यांनी जर काही विशेष अभिनंदनीय, विशेष अनुकरणीय व विशेष स्मरणीय अशी गोष्ट केली असेल, तर ती त्यांनी 'राजमाते'चे कर्तव्य उत्तम रीतीने बजाविले हीच होय. याबद्दल त्यांचे नाव बडोद्याच्या इतिहासात सुवर्णाक्षरांनी लिहून ठेवण्यासारखे आहे यात शंका नाही. हे 'राजमाते'चे कर्तव्य म्हणजे श्रीमंत महाराज सयाजीराव यांचे सुशिक्षण हे होय. सर टी. माधवराव किंवा सर रिचर्ड मीड* यांनी महाराजांच्या शिक्षणाबद्दल कितीही काळजी घेतली असली तरी त्याचे बहुतेक किंवा सर्व श्रेय महाराणी

---

*बडोद्याचे रेसिडेंट सर रिचर्ड मीड यांनी बडोदे संस्थानचा शेवटचा निरोप घेताना, इ.स. १८७५ साली महाराणी जमनाबाई साहेब यांचे राज्यकारभारात जे उत्कृष्ट साहाय्य झाले त्याबद्दल महाराणी व्हिक्टेरिया यांच्या वतीने संतोष प्रदर्शित केला आहे. त्यात मुख्यत्वेकरून महाराज सयाजीराव यांच्या शिक्षणाबद्दल, सुसंगतीबद्दल आणि एकंदर कल्याणाबद्दल

जमनाबाई साहेब यासच दिले पाहिजे. त्यांनी श्रीमंत सयाजीराव महाराज यांच्या शिक्षणाबद्दल इतकी काळजी घेतली की, त्याबद्दल त्यांची स्तुती करावी तितकी थोडी आहे. श्रीमंत महाराज सयाजीराव यास दुर्गुणाचा यत्किंचित देखील स्पर्श होऊ न देण्याबद्दल व त्यास सद्‌गुणसंपन्न व सुशिक्षित करण्याबद्दल जे काही प्रयत्न झाले आहेत, ते सर्व फलद्रूप होण्यास 'राजमाता' महाराणी जमनाबाई साहेब यांचेच साहाय्य मुख्यत्वेकरून कारण झाले, असे आम्हीच म्हणतो असे नव्हे, त्याबद्दल खुद्द बडोद्याचे रेसिडेंट सर रिचर्ड मीड यांनी त्यांचे अनेक वेळा धन्यवाद गायले आहेत व हिंदुस्थानच्या सार्वभौमिनी महाराणी व्हिक्टोरिया यांनीही आपला संतोष प्रदर्शित केला आहे. तेव्हा त्याबद्दल आम्ही अधिक ते काय लिहावे?

महाराणी जमनाबाईसाहेब या 'राजमाता' या अधिकारास व महत्पदास खचित पात्र होत्या व त्यांनी आपल्या मुलास व मुलीस उत्तम शिक्षण देण्याबद्दल चांगली कळकळ व आस्था बाळगिली होती असे दिसून येते. त्यांनी महाराज सयाजीराव यांस ज्याप्रमाणे सुशिक्षित व सुसंस्कृत केले, त्याप्रमाणे त्यांनी आपली कन्या ताराबाबा हिच्याही शिक्षणाची काळजी घेण्यात अंतर केले नाही. या संबंधाने सर टी. माधवराव यांनी विजयानगर

---

जमनाबाई साहेब यांनी व्यक्त केलेली सदिच्छा व अश्रांत परिश्रम याचेच अभिनंदन केलेले आहे. या संबंधाने सर रिचर्ड मीड यांच्या चरित्रात पुढील उल्लेख दृष्टीस पडतो:-

" In all these matters, as in others, Sir Richard Meade received the most cordial assistance from the Maharani Jamnabai, herself a lady of strong and cultivated intellect and, as such, able to appreciate the proper training of the future Ruler of Baroda and thanks to her co-operation and unceasing visilance, the young Chief was kept perfectly free from the contaminating influences which usually surround an Oriental Prince.

Before leaving Baroda Meade had the pleasure of conveying to Her Highness the expression of Her Majesty the Quean's sense of the Maharani's judicious conduct during these eventful days as well as her Sincere good wishes for the well doing and prosperity of the young gaekwar.

General Sir Richard -------- P. 226.

महाराजांच्या कन्याशाळेमध्ये, एकेप्रसंगी राजमातेचे कर्तव्य सांगताना, महाराणी जमनाबाई साहेब यांची फार-फार प्रशंसा केली आहे. अर्थात सर टी. माधवराव यांच्या सारख्या नामांकित मुत्सद्यांनीही ज्या सद्‌गुणांचा गौरव केला आहे व आनंदभराने मान डोलविली आहे, त्या सद्‌गुणांनी विभूषित असणारी 'राजमाता' कोणास पूज्य वाटणार नाही?*

---

* सर टी. माधवराव यांच्या भाषणाचा सारांश मागे विविधज्ञानविस्तार या मासिक पुस्तकांत प्रसिद्ध झाला होता. त्याचा उतारा रा.सा. बापट यांनी या चरित्रामध्ये दिला आहे. तथापि मूळचे भाषण अवश्य वाचण्यासारखे असल्यावरून त्यातील इंग्रजी उतारा येथे सादर केला आहे :-

"There is Her Highness the Maharani Jamnabai of Baroda, Compartion of the Order of the Crown of India-the adoptive mother of the reigning Gaekwar of that important Native State. I cannot mention the name of this eminen lady without recalling a train of the most pleasant associatioes of my Baroda life. I had the privilege of seeing Her Highness often, and of holding long and easy conversations, with her on verious topics. Her telents and acquirements, her sound sense, her sagacity, her good temper, her exquisite sensibility, and her refined manners inspired me with high respect and esteem. Had it not been for her steady sympathy and support as the head of the Gaekwar House, my administration of the Baroda State during the minority of the Maharaja would have proved much more difficult than it did well. Her Highness has an only daughter---- interesting giri, hare with beaming with beauty and inteeletigence.

This little Princess's name is Tara. It is singularly appropriate name, for Tara means a star. and truly is she the star of that princely family. Now just mark what has happened. The mother being herself educated, gave very early and very earnest attention to the education of the daughter. It was not at all the result of any external pressure or even persuation. It was a spontaneous movement from the Zenana itself. I watched little Tara's rapid progress in her studirs, with equal surprise and pleasure. The proud mother used to invite the Agent to the Governor-General and myself at intervals to examine the young Princess, and we found the daughter already in a fair way of surpassing the mother in respect of regular aducation."

महाराणी जमनाबाई साहेब यांनी आपल्या पुत्राच्या शिक्षणाबद्दल विशेष काळजी घेतल्यामुळे बडोदे संस्थानास विद्यालंकृत व प्रजाहिततत्पर नृपती प्राप्त झाला असे म्हणण्यास हरकत नाही. सयाजीराव महाराज यांच्या ठिकाणी नैसर्गिक बुद्धितेज अगोदर असाधारण असल्यामुळे त्यात सुशिक्षणांची भर पडताच ते अत्यंत प्रकाशमान झाले व त्याने गायकवाड सरकाराच्या राजकुलाची कीर्ती उज्ज्वल केली, असे म्हटले असता अतिशयोक्ती होणार नाही. सर टी. माधवराव यांनी महाराज लहान असताच एकेवेळी असे उद्‌गार काढिले होते की, 'या अल्पवयी महाराजांची असाधारण बुद्धिक्षमता हळूहळू चांगली व्यक्त होत चालली असून, परमेश्वराच्या कृपेने हे त्यांच्या गळ्यातील बहुमूल्य व तेजस्वी रत्नहारापेक्षाही अनंतपटीने अधिक मूल्यवान व अधिक देदीप्यमान असे सद्गुण संपादन करतील आणि पुन:संस्थापित राज्याचे एक चतुर व नीतिसंपन्न नृपती निपजतील अशी आशा करण्यास सबळ कारण आहे.'* हे उद्‌गार किती खरे झाले व महाराणी जमनाबाई साहेब यास ते किती आनंदावह व भूषणास्पद झाले हे शब्दांनी व्यक्त करण्याची आता आवश्यकता राहिली नाही.

असो. बडोद्यासारख्या महाराष्ट्र संस्थानातील एका राजस्त्रीच्या सुशिक्षणाने, हिंदुस्थानास ललामभूत होणारा असा एक नृपती निर्माण झाला, यावरून स्त्रियांच्या मनावर सुशिक्षणाचे महत्त्व पूर्णपणे बिंबले तर केवढे अलौकिक कार्य होते, हे चांगले मनन करण्यासारखे आहे व त्यावरून अनेक प्रकारचा बोध घेण्यासारखा आहे. या दृष्टीने पाहिले असता, अगदी अलीकडच्या काळातही होऊन गेलेल्या या महाराष्ट्र स्त्रीचे चरित्र वाचकवृंदास आदरणीय वाटेल, अशी उमेद बाळगण्यास हरकत नाही.

प्रस्तुत चरित्रग्रंथ महाराष्ट्र भाषेतील सुप्रसिद्ध ग्रंथकार रा.सा. नागेशराव विनायक बापट यांनी लिहिला असून तो बडोदे येथील 'ग्रंथसंपादक व

---

* " There is every reason is feel the aanguins hope that the young Maharaja who has already given indication of ---- capacity, will there in, under God's blessing, make acquisitions infinitely more precious than the gems shining resplandent on his breast- that he will realise the ideal of a wise and verious ruler of a regenerated Kingdom.

**Sir T. Madhavrao**

प्रसारक' मंडळीचे व्यवस्थापक रा.रा. दामोदर सावळाराम यांनी प्रकाशित केला आहे. या ग्रंथाच्या अंतर्बाह्य सौंदर्याबद्दल वाचकास विशेष काही सांगणे जरूर आहे असे वाटत नाही. ग्रंथकार रा.सा. बापट यांचे अनेक चरित्रग्रंथ महाराष्ट्र वाचकांच्या डोळ्यासमोर असल्यामुळे त्यांच्या सुंदर व गोड भाषासरणीबद्दल सर्वांची खात्री झालेलीच आहे. तेव्हा त्याबद्दल पुन: नवी शिफारस करणे अगदी अप्रयोजक होईल. रा.सा. नागेशराव विनायक बापट यांची ऐतिहासिक चरित्ररचना, कार्लाइल या इंग्रजी ग्रंथकाराने म्हटल्याप्रमाणे "Biography is the only true history", म्हणजे 'चरित्र हा फक्त खरा इतिहास होय' या सशास्त्र व शुद्ध नियमाने सर्वस्वी बद्ध झालेली नसून, ती ऐतिहासिक कथानकाच्या सुंदर पटावर कल्पनेच्या हृदयाल्हादक रंगात खुलविलेली असते, हेही महाराष्ट्र वाचकवृंदास पूर्णपरिचित झालेले आहे. तेव्हा त्याबद्दल अनुकूल अथवा प्रतिकूल टीका करण्याची विशेष आवश्यकता राहिलेली नाही. सहृदय व मार्मिक वाचक वास्तविक गुणांचा रसास्वाद घेण्यास पूर्ण समर्थ आहेत. असो.

शेवटी महाराष्ट्र स्त्रियांच्या चरित्रमहात्म्यासंबंधाने व पर्याये करून महाराणी जमनाबाई साहेब यांच्या चरित्रासंबंधाने दोन शब्द लिहावेत, अशी प्रकाशकांनी आग्रहपूर्वक इच्छा दर्शविल्यावरून वरील दोन शब्द लिहिले आहेत, त्यांचा रसिक वाचक कृपा करून स्वीकार करतील अशी उमेद बाळगून हा लेख पुरा करतो.

**दत्तात्रय बळवंत पारसनीस**

खंड-१

# रहिमतपूर

**श्री** महाराणी जमनाबाई साहेब ऊर्फ मासाहेब या श्री. खंडेराव ऊर्फ अप्पासाहेब महाराज गायकवाड यांचे तृतीय कुटुंब होय. त्यांचे जन्मस्थान रहिमतपूर या गावाची थोडीशी माहिती अगोदर येथे देतो.

रहिमतपूर गाव सातारा जिल्ह्यात कोरेगाव तालुक्यात आहे. येथील लोकवस्ती व घरांची संख्या साधारण बेताचीच आहे. हा पेठेचा गाव आहे. गावाला एक बारमाही वाहणारा ओढा आहे. त्याचे पाणी गोड आहे. ओढ्याच्या काठाला एक श्रीराधाकृष्णाचे मंदिर आहे. हवापाणी बऱ्यापैकी आहे. नावावरून पूर्वी मुसलमानी कारकीर्दीत कोणी मुसलमान अधिकाऱ्याने तो गाव वसविला असावा. छत्रपती शाहू महाराज यांच्या वेळेस रहिमतपुरास चांदीचे नाणे पाडण्याची एक टंकसाळ होती. हा गाव पूर्वी मिरजेचे पटवर्धन सरदार यांच्या ताब्यात होता. साताऱ्याच्या पूर्वेस सुमारे ६ कोसावर हा गाव आहे. तेथे आता रेल्वे स्टेशन झाले आहे.

या गावी माने या अडनावाचे एक मराठ्याचे प्राचीन घराणे आहे. पूर्वी हे सरदार घराणे विजापूर दरबाराच्या ताब्यात होते. पुढे महाराष्ट्रात स्वराज्याची स्थापना झाल्यावर ते सातारकर छत्रपती यांचे अंकित झाले व त्या गादीच्या मानकरी मंडळात मोडू लागले.

या माने कुळातील कित्येक पुरुषांनी विजापूर दरबारासाठी व पुढे मराठेशाहीतही तलवार चांगली गाजविली होती, असे इतिहासावरून दिसून येते.

कित्येकांनी आपली राजनिष्ठा, शौर्य व क्षात्रतेज ढळू दिले नाही. पूर्वीपासून हे लष्करी पेशाचे घराणे असल्यामुळे अस्सल लष्करी तेज त्यांच्या अंगी झळकत होते. त्याच्याच जोरावर त्यांनी रहिमतपूरचे पाटीलकीचे

वतन मिळविले. पुढे कालगतीने महाराष्ट्रातील इतर मराठ्यांची घराणी निस्तेज झाली, त्याचप्रमाणे माने घराण्याचीही मूळची तेजस्विता नाहीशी झाली. पूर्वजांनी आपल्या मर्दुमकीवर पाटीलकीसारखी वतने व जहागिऱ्या मिळविल्या होत्या.

मासाहेबांचा पणजा-विठोजी, आजा-रामराव व पिता-विश्वासराव ऊर्फ अप्पासाहेब हे रहिमतपुरात राहून वडिलोपार्जित पाटीलकीचे वतन खाऊन अब्रूने दिवस काढीत होते. अप्पासाहेबांच्या वेळेस हे माने घराणे मध्यम स्थितीत होते. मासाहेबांचा बाप अप्पासाहेब हा लष्करी बाण्याचा पुरुष होता. मासाहेबांची मातुश्री बजूबाई या बडोद्याचे सरदार काळे या थोर घराण्यापैकी होत्या. त्या स्वरूपाने चांगल्या होत्या.

बजूबाईच्या पोटी चार अपत्ये झाली, ती येणेप्रमाणे :-

१. खाशीबाई

२. आनंदराव, ऊर्फ अण्णासाहेब

३. तान्हीबाई

४. गणपतराव ऊर्फ तात्यासाहेब

यापैकी तिसरे अपत्य तान्हीबाई यांचा वृत्तांत या लेखात दिला आहे.

तान्हीबाई हे त्यांचे लहानपणचे माहेरचे नाव. पुढे लग्न झाल्यावर सासरचे नाव यमुनाबाई असे ठेविले. गुजराथी पद्धतीप्रमाणे 'य' चा 'ज' होऊन 'जमनाबाई' असे त्या नावाचे रूपांतर झाले. नंतर त्या आश्रित जनाला व प्रजाजनाला मातृस्थानापन्न होऊन सर्व लोक त्यांना 'मासाहेब, मासाहेब' असे म्हणू लागले. मासाहेबांचा जन्म रहिमतपुरास शके १७७५ (इ. स. १८५३) साली श्रावण शुद्ध १० रोजी झाला. त्यांची वडील बहीण खाशीबाई बडोद्याचे हरपळे सरदार यांच्या घराण्यात दिली आहे.

♦♦

खंड-२

# माहेरघर

**आ**ता मासाहेबांचा माहेरघरचा लहानपणचा थोडासा वृत्तांत मिळाला तो येथे सांगून ठेवितो. म्हणजे पूर्वी बाल्यदशेत घडलेल्या गोष्टींचा संस्कार पुढच्या रहाणीवर कसा घडतो किंवा स्थित्यंतर व्हावयाचे असले म्हणजे पुढे घडणाऱ्या गोष्टींची चिन्हे पूर्ववयातच कशी दिसू लागतात, हे चांगले लक्षात येईल.

मासाहेबांच्या जन्मकाळी अप्पासाहेब माने हे रहिमतपूरचे पाटील होते. पाटीलकीच्या उत्पन्नाशिवाय त्यांचा कुणबावा बराच मोठा होता. पाटस्थळ व मोटस्थळ बागाईत जमीन बरीच होती. घरच्या मळ्यात भाजीपाला व फळफळावळही होत असे. रहिमतपुरास मान्यांचा तीनचौकी जुना वाडा आहे. त्यांना अक्कलकोट संस्थानातून काही रोकड नेमणूक मिळत आहे, असे समजते.

हल्ली गावच्या पाटलाला पूर्वीच्या इतका अधिकार व प्रतिष्ठा नाही व पूर्वीइतका कामाचा बोजाही त्याच्या अंगावर पडत नाही. सुमारे पाऊणशे वर्षांपूर्वी विठोजी माने, रामराव माने व अप्पासाहेब माने पाटीलकी करीत होते. त्या वेळी पाटलाचा रुबाब मोठा होता. पाटील म्हणजे गावचा छोटासा राजा व गावचे लोक ही त्याची प्रजा, असा त्यांचा परस्पर संबंध होता. गावची देखरेख पाटलाकडे असे. लहानसान गुन्ह्यांचा इन्साफ पंचांच्या विद्यमाने तोच करी. गावच्या वसुलाची जबाबदारी त्याच्या शिरी असे. गावात पाटलाचे वजन फार असे. प्रत्येक लहान-मोठ्या बाबतीत गावकरी त्याचा सल्ला घेत. गावकीचे तंटे, जातीच्या संबंधाचे बखेडे व गावच्या दुसऱ्या भानगडी यांचा निकाल पंचाशी सल्लामसलत घेऊन आपल्या घरी, चावडीत किंवा मारुतीच्या देवळात बसून करावा लागे. राजकीय, सामाजिक व धर्मसंबंधी कामांची तजवीज त्याला लावावी लागे. पूर्वीच्या धामधुमीच्या वेळी ही संघशक्ती व जूट गावकरी लोकांच्या फार

पथ्यावर पडे. तिच्या जोरावर शत्रूचे हल्ले सुद्धा निवारण करिता येत असत. गावावर आलेली विघ्ने टळत. चिल्लर खर्चातून पाटलाला आल्या-गेल्यांची बडदास्त ठेवावी लागे. ती नेमणूक खुटली तर त्यांची वर्दळ पाटलाला सोसावी लागे. गावातली देवालये, धर्मशाळा, तलाव, विहिरी व दुसरी सार्वजनिक कामे यांचा जीर्णोद्धार करण्यासाठी वर्गणीने पैसा जमा करून ती पाटलाला अंगावर घेऊन करावी लागत. गावात वाखा सुटला किंवा दुसरी एखादी साथ उद्‌भवली, अवर्षण पडले किंवा दुसरी काही दैविक अरिष्टे आली तर होमहवन, बळी वगैरेसाठी पाटलालाच पुढाकार घ्यावा लागे. गावची ग्रामसंस्था ही एक लहानशी राजसंस्थाच होय. या संस्थेचे काम चालविण्यासाठी पाटलाच्या हाताखाली सुतार, लोहार, गुरव, जोशी, सोनार, शिंपी, तेली, तांबोळी, गोंधळी, रामोशी, महार वगैरे अलोतदार व बलोतदार असत. ते पाटलाच्या ताब्यात राहून वेळच्या वेळी आपली कामे करीत असत. लिहिण्याच्या कामासाठी पाटलाच्या हाताखाली कुलकर्णी असतो. अशा व्यवस्थेच्या योगाने पाटील व कुलकर्णी यांच्या कुलांमध्ये कधी कधी राज्यकार्यधुरंधर, तेजस्वी, सत्ताधारी आणि पराक्रमी पुरुष व स्त्रिया निपजत. इतर जातींमध्येही त्यांच्या त्यांच्या धंद्याप्रमाणे बुद्धी, कला, चातुर्य इत्यादी गुणांनी युक्त असे कुशल कारागीर निपजत असत. ग्रामसंस्थेच्या नेमणुका वंशपरंपरेने चालत. यामुळे त्या त्या वर्णामध्ये आनुवंशिक गुण निरनिराळ्या प्रकारचे दिसून येत.

गावकीचा इतका तपशील येथे देण्याचे कारण हे आहे की, मासाहेबांचा जन्म झाला त्यावेळेस अप्पासाहेब माने यांच्या वाड्यात पाटीलकीची कामे कशी चालत होती हे कळावे. त्या जसजशा वाढीस लागल्या तसतशी ती कामे त्यांच्या नजरेत भरू लागली. अनाथसंरक्षण, दुर्बलरक्षा, अतीतअभ्यागताचा समाचार ही कामे नित्य वडिलांच्या हातून घडत, ती त्या आपल्या डोळ्यांनी पाहत. मोठेपणी त्या थोर पदवीला पोहोचल्यावर तेच वळण त्यांना लागले. साधने व संधी मिळाली म्हणजे कोणाचाही उपजत अंगस्वभाव दडून राहत नाही. देवब्राह्मणांच्या ठिकाणी भक्ती, औदार्य, चातुर्य वगैरे त्यांचे अंगचे गुण त्या माहेरी असतानाच दिसू लागले होते. त्या गुणांचा अंकुर पांचव्या-सहाव्या वर्षांपासूनच दिसू लागला. तोच पुढे वाढीस लागला.

♦♦

खंड-३

# कुंवारपण

तान्हीबाई ऊर्फ मासाहेब यांच्या माहेरच्या गणगोताकडून त्यांच्या बाल्य दशेतल्या काही गोष्टी कळल्या त्या आता येथे नमूद करितो.

मासाहेब आपल्या मातुश्री व बहिणीप्रमाणेच सुस्वरूप होत्या. किंबहुना त्यांच्याहून त्या कांकणभर अधिकच स्वरूपवान होत्या. त्यांचे शरीर जन्मापासूनच जरा कृश व प्रकृती नाजूक होती. जी माणसे जन्मत: कृश व नाजूक असतात त्यांची बुद्धी तीव्र व मन निग्रही असावयाचे असा साधारण नियम आहे. त्या नियमास अनुसरून त्यांची चलाख बुद्धी व निग्रही स्वभाव लहानपणापासूनच दिसू लागला होता.

त्यांचा गोजिरवाणा चेहरा, बालक्रीडा व बोबडे बोल ऐकून आई-बाप व घरातील सर्व मंडळीला मोठे कौतुक वाटे. त्यांच्या लीला पाहून सर्वांना आनंद होत असे.

मासाहेबांचा औदार्यगुण त्यांच्या पाचव्या-सहाव्या वर्षापासूनच दृष्टीस पडू लागला होता. कोणाच्याही दाराशी कोणी भणंगभिकार आले तर त्याला मूठ पसा धान्य किंवा पीठ घालण्याची चाल आहे. त्याप्रमाणे मान्यांच्या घरीही भिकाऱ्यांना भिक्षा घालीत. गोसावी, बैरागी, साधुसंत, लुळा, पांगळा कोणी दाराशी येऊन ओरडू लागला म्हणजे त्याला पाहून मासाहेबांचे मन द्रवे. मग घरात धान्य किंवा पीठ जे हातास लागेल ते त्यांच्या झोळीत त्या टाकीत. भिकाऱ्यांची मुले उघडीनागडी पाहिली म्हणजे आपली साडी, चोळी, परकर जे हाती लागेल ते त्यास देत. 'भिक्षा थोडी घालावी, घरातले चिरगुट पांघरूण कोणाला देऊ नये, हात आखडून धर्म करावा' असे घरातले लोक त्यांना सांगत. ती खोड टाकण्यासाठी कित्येक वेळा त्यांनी आपल्या आई-बापांच्या हातचा मारही खाल्ला, तरी त्यांची ती

खोड कमी झाली नाही. घरचे लोक रागे भरतात म्हणून त्यांचा डोळा चुकवून चिपटे मापटे धान्य किंवा पीठ भिक्षेकऱ्याच्या पदरात टाकून त्याला लागलेच जा म्हणून खुणेने सांगत. ही त्यांची भूतदया व देवनिष्ठा शेवटपर्यंत कायम होती.

मान्यांच्या वाड्यात बरोबरीच्या मुली खेळावयाला आल्या म्हणजे त्या बाहुलाबाहुलीचे खेळ खेळत. त्यात या राजाची राणी होऊन दुसऱ्या पोरींना आपली कामे करावयास लावीत. आईकडून भातुकलीचे पदार्थ मागून घेऊन आपण भाजीपाला चिरून देत व मुलींना पाणी भरण्याला व स्वयंपाक करावयास लावीत.

मान्यांच्या वाड्यात एक गावठी शाळा होती. तेथेच मासाहेब धुळाक्षर व बाराखड्या शिकल्या. मोडी व बालबोध अक्षरांची त्यांना थोडीथोडी ओळख झाली. त्यांची स्मरणशक्ती तीव्र असल्यामुळे पंतोजीने काही शिकविले तरी ते त्या जलद ग्रहण करीत.

औंधचे संस्थानिक पंत प्रतिनिधी यांचे हत्ती रहिमतपुरावरून साताऱ्याकडे कधी कधी जात येत असत. तेव्हा त्यांनी हत्ती पाहिले होते. शिवाय बडोद्याचे काळे सरदार हे त्यांचे आजोळघर. तेथे आपल्या मातुश्रीबरोबर त्या कधी कधी अजोळी जात तेव्हा त्यांना हत्तीवर बसण्याचा प्रसंग येई व घोडेही नजरेस पडत. त्यांना हत्ती, घोड्यावर बसण्याची फार हौस असे. रहिमतपुरास घोडे मिळत; पण हत्ती बसावयास कोठून मिळणार? मग त्या आपली हत्तीची हौस अशी पुरवून घेत की, वाड्याच्या मागील चौकात एक तुळशी वृंदावन आहे. त्याला लागून एक उंच ओटा आहे. त्याजवर चिरगुटाची घडी टाकून तिची त्या झूल करीत. काळ्या फडक्याची एक सोंड करून त्याला लावीत आणि आपण त्याजवर बसून आपल्या माणसांना माहुताचे काम करावयास लावीत. हे त्यांचे गजांत लक्ष्मीचे भावी चिन्ह आधीच दिसू लागले.

रहिमतपूरगावी एक श्रीराधाकृष्णाचे मंदिर आहे. तेथे विष्णूबावा या नावाचा एक साधू होता. त्याच्या व देवाच्या दर्शनास गावचे लोक जात असत. मासाहेबांची मातुश्री बजूबाई आपली मुलेबाळे घेऊन कधी कधी देवदर्शनास व त्या साधूपुरुषाच्या भेटीस जात. त्यावेळेस तान्हीबाईचे वय सरासरी सात-आठ वर्षांचे होते. बजूबाई आपल्या मुलांना त्यांच्या पायांवर

घालून बोवांशी बोलत बसल्या म्हणजे तान्हीबाईची शांतवृत्ती, आनंदी स्वभाव व मोहक बालभाषण ऐकून ते बजूबाईला म्हणत - 'ही तुमची मुलगी भाग्यवान निघेल. ही एखाद्या राजाची राणी होईल.' ही त्यांच्या मुखातून निघालेली वाक्ये पुढे अक्षरशः खरी ठरली. तान्हीबाई सकाळी मळ्यात जाऊन तुळशी फुले गोळा करून आणत आणि घरी आल्यावर ती परडीत घालून श्रीराधाकृष्णाच्या पूजेसाठी विष्णू महाराजांना नेऊन देत असत.

♦♦

खंड-४

# लग्न

**मा**न्यांच्या घरचा खटला मोठा होता. गुरेढोरे पुष्कळ होती. शेतावर जाणारी गडीमाणसेही पाच- पंचवीस होती. तरी बजूबाईला घरची कित्येक कामे स्वत: करावी लागत. त्याकामी मासाहेबही मातुश्रीला करवेल तितकी मदत करीत. याप्रमाणे त्यांची निरलस व निरभिमान वृत्ती त्यांच्या लहानपणीच दिसू लागली होती.

पुढे बजूबाई तान्हीबाईला बरोबर घेऊन आपल्या माहेरी बडोद्यास काळे यांजकडे गेल्या. त्यावेळेस तान्हीबाईचे वय सरासरी तेरा-चौदा वर्षांचे होते. तेथे गेल्यावर काळे सरदार यांजकडून मान्यांच्या मुलीला वर पाहण्याचा उद्योग चालू होता.

त्या समयी बडोद्यास खंडेराव महाराज गायकवाड हे विधूर स्थितीत होते. अंबाबाईसाहेब व सावित्रीबाईसाहेब ही त्यांची दोन कुटुंबे होती. अंबाबाईसाहेब शिरक्यांची कन्या व सावित्रीबाईसाहेब पोवारांच्या घराण्यापैकी होत्या. सावित्रीबाईसाहेब प्रथम वारल्या. नंतर अंबाबाईसाहेब संवत् १९२० (सन १८६५) साली मृत्यू पावल्या. दोघी स्त्रियांच्या पोटी पुत्रसंतान नव्हते. खंडेराव महाराज पुढे वर्ष-दीड वर्षे विधुरावस्थेतच होते. दरम्यान मोहिते, कदम वगैरे आपापल्या मुलींसाठी खटपट करीत होते; पण त्या मुली त्यांना पसंत पडल्या नाहीत. चांगली सुरेख, सुस्वभावाची, कुलीन व हुशार वधू मिळाली तरच पुन्हा लग्न करावयाचे, नाही तर करावयाचे नाही, असा त्यांचा संकल्प होता. त्यांची मातुश्री चिमणाबाईसाहेब त्यावेळेस हयात होत्या. त्या व भाऊ शिंद्याची मातुश्री या दोघी बायांचा लग्नाबद्दल त्यांना तगादा लागला. तेव्हा मुलगी सुरेख असल्यास लग्न करतो असे महाराजांनी कबूल केले.

काळे सरदार यांच्या घरी रहिमतपूरकर अप्पासाहेब माने यांची उपवर झालेली

सुस्वरूप कन्या आहे असे त्यांना कळले. ती रूपाने चांगली; पण उफाड्याची नव्हती. वयाने जरा लहान म्हणून ती करावी न करावी अशा विचारात ते होते; परंतु शेवटी तिच्याबरोबर लग्न करण्याचा त्यांचा निश्चय झाला.

पण त्यावर्षी लग्नाचे मुहूर्त नव्हते. सबब पुढील सालच्या वैशाख मासापर्यंत लग्न लांबणीवर टाकावे लागले. लग्नाचा निश्चय झाल्यावर अप्पासाहेब माने रहिमतपुराहून आपली कुटुंबाची माणसे घेऊन बडोद्यास आले. त्यांना राहण्यासाठी सरकारातून नजरपागेची जागा खाली करून देण्यात आली. तेथे ते सर्व माणसांना घेऊन राहिले. त्यांच्या खर्चासाठी सरकारातून दरमहा रुपये ५०० चालू झाले. एक वर्षापर्यंत रहिमतपूरचे पाटील माने यांना लग्न घटकेची वाट पाहत बसावे लागले.

शेवटी मान्यांच्या आनंदाचा दिवस आला. खंडेराव महाराजांचा हा तिसरा संबंध, सबब चालीप्रमाणे प्रथम अर्क विवाह होऊन नंतर संवत् १९२१ (सन १८६६) च्या साली वैशाख शुद्ध १२, शुक्रवार या दिवशी संध्याकाळी गोरज मुहूर्तावर नजरपागेच्या लग्नमंडपांत वधू-वरांचे लग्न लागले. लग्न समारंभ १८ दिवस चालू होता. विठ्ठल मंदिरात ब्राह्मण भोजने झाली. इतर जातींचीही अन्न संतर्पणे झाली. शिष्ट संभावना झाल्या. कैक ब्राह्मणांना शालजोड्या, धोतरजोडे व शेलापागोटी देऊन सत्कार झाले. आतषबाजी पुष्कळ सुटली. समारंभ मोठा प्रेक्षणीय झाला. या लग्नाप्रीत्यर्थ अजमासे चार लक्ष रुपये खर्च झाला. याप्रमाणे माने पाटील यांची मुलगी महाराणीपद पावली. मासाहेबांचे सासरचे नाव यमुनाबाई (जमनाबाई) ठेविले. त्यांच्या दिमतीला कैक दास-दासी राहू लागल्या.

मासाहेबांचा वर्ण अगदी गोरापान होता असे म्हणता येणार नाही. डोळे मोठे व पाणीदार होते. कपाळ रुंद व तेजस्वी होते. नाक सरळ व बांधा मध्यम उंच होता. अंगाने सडपातळ होत्या. चेहऱ्यावर राजतेज असल्यामुळे सुंदर सुंदर स्त्रियांतही त्या ठळक दिसत. स्वभाव शांत होता, तसाच तल्लखही होता. मन फार मोकळे व सदय होते. भाषणचतुर व समजूत उत्तम होती. सारांश मासाहेबांचे गुण, खंडेराव महाराजांचे प्रेम जडेल असेच होते. महाराज गादीवर बसून सुमारे १० वर्षे झाली होती. त्यांचे वय त्यासमयी चाळीशीच्या घराला पोहोचले होते.

आता खंडेराव महाराजांचा थोडासा वृत्तांत पुढील खंडात सांगण्यात येईल.

♦♦

खंड-५

# खंडेराव महाराज

**खं**डेराव महाराजांचे शरीर पिळदार व तेजस्वी होते. त्यांचे हात लांब व दंड फिरलेले होते. चेहरा जरा उग्र व कपाळ मोठे होते. रंग गोरा, डोळे मोठे व दृष्टी तीव्र होती. दाढी व मिशांचे केस मधून मधून पांढरे होऊ लागले होते. पोशाख साधा करीत. चड्डीवजा सफेद मांडचोळणा, मलमलीचा सदरा व डोकीला दिल्लीशाई सफेत टोपी किंवा कानटोपी. अशा साध्या व स्वच्छ पोशाखाने ते चौरंगावर बसत. थंडीच्या वेळेस छिटाची दुलई पांघरीत. गादी-लोडच्या बैठकीवर ते फारसे बसत नव्हते. सणावारी व मोठ्या स्वारीच्या दिवशी मात्र ते गळ्यांत हिरे पाचूचा कंठा घालीत व भपकेदार जामानिमा करीत. ते कधी हत्तीवर व कधी घोड्यावर बसून वाघ, रानडुक्कर वगैरे जनावरांची शिकार करीत. उन्हाच्या वेळेस जंगलात शिकारीला फिरत तेव्हा ते छत्रीचीही गरज बाळगीत नसत. एकदा ते जंगलात शिकारीला गेले असता त्यांच्या अंगावर एक वाघ चालून आला. तेव्हा घोडा पुढे व वाघ मागे असे झाले. इतक्यात रस्त्यावर एक मोठे झाड लागले. त्याची फांदी धरून ते चटदिशी उलटी उडी मारून झाडाच्या फांदीवर जाऊन बसले. म्हणूनच त्यांचा बचाव झाला. त्यांचे शरीर तालिमबाजीने कसलेले होते. ती कसरत त्यावेळेस त्यांच्या उपयोगी पडली. पुन: अशा रीतीने वाघावर चालून जाण्याचे धाडस करू नये असा रेसिडेंटाने त्यांस सल्ला दिली. महाराजांना तालिमबाजीचा शोक फार होता. ते कधी कधी स्वत: मल्लांबरोबर कुस्त्या धरीत.

फौज खात्याकडेही त्यांची नजर चांगली होती. त्यांनी काही पायदळ पलटणे व घोड्याचे रिसाले चांगले तयार लेश ठेविले होते. त्यांचा फेरफटका व कवाईतीचे काम पाहून पागातील स्वारांस व अंमलदारात कधी कधी मंदिल, दुपेटे, सोन्याची कडी, कंठ्या वगैरे बक्षीस देत. आषाढी एकादशी, अनंतचतुर्दशी

व दसरा या दिवशी त्यांच्या स्वाऱ्या मोठ्या थाटाने निघत.

ते दिसण्यात उग्र होते, तरी मनाचे फार कनवाळू होते. त्यांच्या औदार्याची कीर्ती चोहीकडे फाकली होती. ते सत्यप्रिय व निर्व्यसनी होते. ते मद्याला कधी शिवले नाहीत. मद्यपी व लबाड लोक त्यांच्या समोर जाण्याला भीत असत. आपली प्रजा आनंदात व सुखात असावी, अशी त्यांची नेहमी इच्छा असे. दुष्काळाच्या वर्षी लाखो रुपयांचा दानधर्म करून त्यांनी लोकांचे प्राण वाचविले. कैक देवस्थानांकडे त्यांनी लाखो रुपयांच्या नवीन नेमणुका व वर्षासने बांधून दिली. सर्व खात्यांच्या कामदारांना त्यांचा मोठा वचक असे. औदार्य, शौर्य, भूतदया वगैरे कैक चांगले चांगले गुण त्यांच्या अंगी वसत होते.

मकरपुऱ्याचा वाडा त्यांनी बांधविला. चांदीच्या दोन तोफा त्यांनी ओतविल्या. त्या अद्यापि दसरा वगैरेच्या स्वाऱ्यांपुढे चालवितात. मुंबईस गोऱ्या खलाशी लोकांसाठी इंग्रज सरकारने बराका बांधविल्या. त्या कामाकडे महाराजांनी दोन लाख रुपये दिले. मुंबईस व्हिक्टोरिया राणीचा पुतळा उभा केला आहे. त्या कामाकडे एक लक्ष ऐंशी हजार रुपये रोख दिले.

सन १८५७ च्या बंडाच्या साली खंडेराव महाराजांनी दोस्त इंग्रज सरकाराला पैशाची व फौजेची उत्तम मदत केली व राज्यात कोठेही गडबड होऊ न देता शांतता राखली. हे उपकार स्मरून सरकारने त्यांना मोर्चले धरण्याचा अधिकार दिला. 'जी. सी. एस. आय.' हा मानास्पद किताब दिला. गायकवाडांना तीन लाख रुपये इंग्रज सरकारात खंडणी द्यावी लागे, ती माफ झाली. गायकवाडांचे घराण्यात औरस संतती नसल्यास दत्तक घेण्याची सनद तारीख ११ मार्च सन १८६२ साली राणी सरकाराकडून मिळाली. ही सनद मिळाल्यावर पुढे चार वर्षांनी मासाहेबांचे लग्न झाले.

बडोदे राज्यात हिंदू धर्माप्रमाणे दानधर्म चालू होताच. शिवाय खंडेराव महाराजांच्या वेळेस मुसलमानी धर्मालाही विशेष उत्तेजन मिळाले.

खंडेराव महाराजांनी पैमाषखाते सुरू करून राज्याचा वसूल वाढविला. मुंबईहून अहमदाबादेकडे बडोदे राज्यातून आगगाडीचा रस्ता चालू झाला, त्या कामाला लागणारी जमीन देऊन साह्य केले. पोलिस खाते त्यांच्याच वेळेस स्थापन झाले.

♦♦

खंड-६

# शिक्षण वगैरे

लग्न होऊन मासाहेब जरा वयात आल्यावर त्यांचे सौजन्य, सौकुमार्य, सुस्वभाव व विनय पाहून खंडेराव महाराजांचे प्रेम वाढत गेले. महाराजांनी मासाहेबांना शिक्षण देण्याचीही तजवीज ठेविली. माहेरी धुळाक्षरे, बाराखड्या वगैरे शिकल्या होत्या. पुढे काही संस्कृत व मराठी लिहिणे आणि वाचणे यांचा अभ्यास केला. रुपावली, समाश्चक्र व स्तोत्रे शिकल्या. गणित, जमाखर्चाची माहिती, मोडी व बालबोध वाचन आणि लेखन यांत त्या बऱ्याच प्रवीण झाल्या. मोडीचा पडला कागद त्या धडाधड वाचीत. आलेले कागद वाचून स्वत: उत्तरे लिहीत, अगर कारकुनाकडून लिहवून सही करीत. त्यांनी लिहिलेली काही पत्रे मिळाली. त्यावरून त्यांचे मोडी अक्षर बरेच वळणदार होते, असे दिसले. छापील पोथ्या, पुस्तके व वर्तमानपत्रे त्या स्वत: अस्खलित वाचीत किंवा दुसऱ्यांकडून वाचवीत. त्यांना प्राकृत पोथ्या सार्थ कळत होत्या. गायन व कशिद्याचे कामही त्या शिकल्या होत्या. त्यांचे स्पष्ट वाचन, अक्षर व कशिद्याचे काम पाहून महाराजांना फार संतोष वाटे. त्यांना घोड्यावरही चांगले बसता येत होते.

राजस्त्रियांना शोभणारे गुण त्यांच्यात होतेच. शिवाय गृहिणी या शब्दाचीही सार्थकता त्यांजकडून झाली होती.

महाराजांना आवडणारे खाण्याचे पदार्थ स्वत: आपल्या हाताने कधी कधी करण्याची त्यांना हौस असे. स्वत: केलेले पदार्थ महाराजसाहेबांना त्या स्वत: वाढीत. आचारी स्वयंपाक करू लागला म्हणजे जवळ बसून त्यांजकडून पदार्थ करवीत. अशी त्यांची टापटीप, दक्षता, मर्यादा व हौस असे.

नित्य कथा, कीर्तन, पुराणश्रवण, पूजाअर्चा, दानधर्म यात त्यांचा बराच वेळ जात असे.

खंडेराव महाराजांपाशी दोन उत्तम जातिवंत कुत्रे होती. त्यांपैकी एकाचे नाव मोत्या व दुसऱ्याचे नाव जड्या होते. त्या कुत्र्यांच्या शुश्रूषेकरिता व खुराकीसाठी दरमहा बरीच मोठी नेमणूक होती. मोत्या कुत्रा मासाहेबांना फार आवडे. तो महाराजांनी त्यांना दिला होता. त्या कुत्र्याला त्यांचा फार लळा असे. या मोत्या कुत्र्याच्या स्वामिनिष्ठेविषयी थोडीशी हकीकत आहे ती पुढे सांगण्यात येईल.

खंडेराव महाराजांचे मासाहेबांबरोबर लग्न झाल्यावर त्यांनी एक सोन्याची अंबारी करविली. त्या अंबारीत बसून मासाहेब नागपंचमीच्या दिवशी नागाच्या पूजेला जात असत.

♦♦

खंड-७

# संकटाचे दिवस

**खं**डेराव महाराजांच्या औदार्याच्या अनेक आख्यायिका लोकांच्या तोंडी आहेत. त्या सर्व येथे देण्यास अवकाश नाही. त्या गोष्टी मासाहेबांच्या नजरेपुढे वरचेवर घडत होत्या, यामुळे ते वळण त्यांनाही लागत चालले होते.

पती-पत्नीत्वाचा संबंध दीर्घकाळपर्यंत भोगावयास मिळावा अशी सर्व दाम्पत्यांची इच्छा असते व तद्नुरूप सर्वत्र उद्योग चालू असतो; पण तसे घडून येणे मात्र कोणाच्या स्वाधीन नसते. या राजदाम्पत्याचे प्रेम दिवसेंदिवस वाढत्या प्रमाणावर होते; पण तो सौख्याचा काळ फार दिवस टिकला नाही. पाच- सहा वर्षे गेली न गेली तोच त्या सौख्याला खो आला. तारीख २८ नोव्हेंबर सन १८७० (संवत् १९२१, मार्गशीर्ष शु. ६) या दिवशी मकरपुऱ्याच्या राजमहालात खंडेराव महाराज एकाएकी कैलासवासी झाले. त्यांचा कुलस्वामी श्री खंडेराय याचा जयंतीचा दिवस चंपाषष्ठी, त्याच दिवशी त्यांना मरण आले. त्यावेळेस खंडेरावांची उमर सुमारे ४५ वर्षांची होती आणि मासाहेबांचे वय विसाच्या आतच होते. अशा अल्पवयात त्यांजवर हा दारुण प्रसंग ओढवला. एका इंग्लिश कवीने म्हटले आहे की, मनुष्यप्राणी हा घड्याळातल्या आंदोलकासारखा आहे. त्याच्या एका बाजूला सुख आणि दुसऱ्या बाजूला दुःख आहे. आतील यंत्र चालू असेपर्यंत ती त्याला आळीपाळीने भोगावी लागतात. ती टाळण्याचे कोणाच्या हाती नाही. या म्हणण्याची सत्यता घडोघडी सर्वांच्या अनुभवास येते.

खंडेराव महाराजांना पुत्रसंतान नसल्यामुळे गादीचा वारसा त्यांचे कनिष्ठ बंधू मल्हारराव महाराज यांजकडे आला. सबब इंग्रज सरकारच्या संमतीने ते लागलीच राज्यकारभार पाहू लागले. त्यावेळेस बडोद्यास कर्नल बारसाहेब

रेसिडेंट होते.

मासाहेबांना त्यावेळेस काही दिवस गेले होते. सुमारे दोन महिन्यांच्या त्या गरोदर होत्या. सहा महिने गर्भाला होईपर्यंत त्या राजवाड्यातच होत्या. त्यांना पुत्र होता तर गादीचा हक्क मल्हारराव महाराजांना मिळण्यासारखा नव्हता. खंडेराव महाराज व मल्हारराव महाराज या उभयतांमध्ये वैमनस्य होते. यामुळे मासाहेबांच्या जीवाला अपाय होण्याची भीती होती. गरोदर स्थितीत वाड्यात त्यांना पुष्कळ संकटे भोगावी लागली. विरुद्ध पक्षाकडून विषप्रयोग, गर्भपात प्रयोग इत्यादी भयंकर प्रयोगाचे यत्न चालू होते. त्या मुळी गरोदरच नाहीत अशाही कंड्या रेसिडेंटापर्यंत गेल्या. दुसरेही कित्येक भलभलते आरोप व नीच कुभांडांची कृष्णकारस्थाने बाहेर पडू लागली. तेव्हा मासाहेबांच्या खास तैनातीला मनुष्ये होती त्यांचाही भरवसा वाटेना. अशा प्रसंगी पैशाच्या लालचीने मागचा पुढचा विचार न करिता कोण कसे वर्तन करील याचा नेम राहत नसतो. खरे पाहिले तर पैसा हा मातीचेच सख्खे भावंड आहेत. त्याला बोलता येत नाही व चालता येत नाही. त्याला बुद्धी नाही, ज्ञान नाही, काही नाही. तरी तो आपला अंमल पृथ्वीवर किती गाजवितो पाहा ! त्याची सत्ता सर्वत्र ईश्वरासारखी चालते. आता सर्व व्यक्ती त्याला भुलणाऱ्या आहेत असे नाही. त्याला लाथ मारणाऱ्याही काही विभूती आढळतात; पण अशा सत्यनिष्ठ विभूती फार विरळा. तशी काही स्वामीनिष्ठ माणसे मासाहेबांच्या सन्निध होती, म्हणूनच त्यांचा निभाव लागला. आता त्या कृष्णकारस्थानांची सगळी हकीकत कळल्यापासून कोणाचा काही फायदा नाही व विषयांतर होते, सबब ती येथे गाळून टाकितो. त्यावेळेस मासाहेबांच्या जिवाला जपणारा एक मुका प्राणी होता. तो मागे सांगितलेला मोत्या कुत्रा होय. तो त्यांना सोडून एक पळभरही एकीकडे राहत नसे.

त्याची मासाहेबांना रात्रंदिवस करमणूक असे. तो त्यांच्यापासून कधीही दूर राहत नसे. खंडेराव महाराज कै. झाल्यावर त्यांचा मुक्काम सुमारे चार महिने राजवाड्यातच होता. मल्हारराव महाराज राज्यकारभार पाहू लागले होते. मासाहेबांच्या गर्भाला सहा महिने झाले होते. रात्री त्यांच्या निजावयाच्या पलंगाजवळ मोत्या कुत्र्याचा खडा पहारा असे. तो सर्व रात्रभर जागा असे. रात्री दिवाणखान्यात कोणाची चाहूल लागली की, तो मोठ्याने गुरगुरून

भुंकू लागे. अनोळखी मनुष्य पलंगाकडे येऊ लागला की, तो त्याच्या अंगावर वाघासारखा धावे. झोपेत मासाहेबांचा हात किंवा पाय उघडा पडलेला दिसला की, त्याजवर तो तोंडाने हळूच पांघरून घाली. हात किंवा पाय पलंगाखाली घसरलेला पाहिला की, तो तो हळूच तोंडाने वर उचलून ठेवी. मांजरे आपली पिले तोंडात धरून कशी नेतात हे सर्वांनी पाहिलेच आहे. तशीच माया कुत्र्याच्या जातीलाही असते. मोत्या कुत्रा आपल्या धनिणीची चाकरी इतक्या शिताफीने करी की, मासाहेबांना ती कळू देत नसे व त्यांची झोपमोडही होत नसे. त्याची धनीण त्याच्या अंगावरून ममतेने हात फिरवी, आंजारून गोंजारून मोत्या, मोत्या करी, त्याचे मुके घेई व वेळच्या वेळेस त्याच्या पोटाला भाकर घाली, एवढेच उपकार स्मरून तो आपली लांब जीभ बाहेर काढून आपल्या धनिणीपाशी शेपूट हलवीत बसे. संकटकाळी त्याने आपल्या धनिणीची अशी इमाने इतबारे नोकरी बजाविली. चालत्या काळी गोंडा घोळणारी माणसे पुष्कळ असतात; पण अशी एकनिष्ठ सेवा करणारी माणसे थोडीच सापडतील. हा इमानी कुत्रा मासाहेबांजवळ पुण्यासही काही दिवस होता. पुढे त्याने त्यांच्या पायाजवळच देह ठेवला. ही मोत्या कुत्र्याची गोष्ट मासाहेबांच्या सन्निध राहणाऱ्या एका गृहस्थाकडून कळली.

मासाहेब गरोदर असताना कापांत जाऊन राहिल्या होत्या. त्यासमयी त्यांचे चुलते दौलतराव काका माने मुंबईकडे होते. त्यांच्यामार्फत मुंबई सरकाराशी त्यांचा खासगी पत्रव्यवहार सुरू होता. त्यापैकी त्यांची स्वदस्तुरची दोन अस्सल पत्रे मिळाली ती याखाली देतो :-

।।श्री।।

**तीर्थस्वरूप राजश्री दौलतराव काकासाहेब माने,**
**वडिलांचे सेवेशी**

बाळके जमनाबाईसाहेब गायकवाड बडोदकर, कृतानेक दंडवत विज्ञापना ता. ज्येष्ठ शु. १४ शके १७९३ पावेतो मुक्काम बडोदे येथे यथास्थित असो विशेष-इकडील मजकुराचे पत्र तारीख २७ माहे मेचे पोस्टपेड डाकमार्गे पाठविले आहे. ते पावून मजकूर सविस्तर कळला असेल. त्याचा जबाब काही न आल्याकारणांनी पुन्हा या पत्राबरोबर आमचे सहीची यादी पाठविली आहे, ती तुम्ही समक्ष नामदार गव्हर्नरसाहेब बहादूर यांस द्यावी

आणि तोंडी मजकूर खाली लिहिल्याप्रमाणे कलमवार कळवावा, तो येणेप्रमाणे :-

मेहेरबान कोलसाहेब यांस आमचेकडील सर्व हकीकतीचे कलमांची माहिती असून त्यांस अधिकार नसल्याकारणांनी त्यांच्यानी काही कमी जास्त करवत नाही.

तारीख २७ माहे मे रोजी मातोश्री आईची प्रकृती बिघडली म्हणून शहरात गेल्या. त्याच रोजी मल्हारराव यांस खोटी खबर लागली. तेव्हा त्यांची स्वारी फार जलदीने येत असता रस्त्यात चार मनुष्ये फार जखमी झाली. ती वाचतील असे वाटत नाही, तेव्हा त्या समयास कोठे तुफान होईल ते सांगवत नाही.

हल्ली मल्हारराव राज्यावर असून लोकांस देणग्या व इनाम पालख्या वगैरे देण्याचे स्वाधीन असल्याने व अधिकारामुळे प्राणांत नुकसानीचे भीतीने राहिले पाहिजे. तो बनावटीचा प्रकार उभा करण्यास मनुष्ये अनुकूल असून चालू आहे. आमचेवरही कोणी गरभार बायका उभ्या करून काही खोटे तुफान आणावे असे त्यांचे इलाज चालले आहेत आणि मेहेरबान रेसिडेंटसाहेब सर्व गोष्टी त्यांच्या कबूल करितात. वरील कारणाने आम्ही निराधार असल्याने आमचे काही चालत नाही.

या सर्व हकीकती आपण नामदार गव्हर्नरसाहेब यांस तोंडी जाहीर कराव्या. आता आमच्या या सर्व हकीकती खऱ्या आहेत; परंतु मल्हारराव राज्यावर असल्यामुळे आमच्या खोट्या करून दाखवितील व त्यांच्या बनावटी खोट्या त्या खऱ्या करून दाखवितील. तथापि चांगले हुशार व भरवसेदार मनुष्याकडून बारीक रीतीने तपास कराल तर सर्व खात्री होऊ शकेल.

आम्हापाशी कोणी रेसिडेन्सीचे वाक्‌बगार मनुष्य नाही. साधारण आहेत. त्यांजला व आमचे बंधूवरसुद्धा मेहेरबान रेसिडेंटसाहेब खप्पा होतात. त्यापासून त्यांची मने बेआदबीचे कारणांनी दुखवून गेली आहेत. त्यांचे समोर जाण्यास कोणी हिंमत धरीत नाहीत. बेहिमतीने गेल्यापासून नुकसान होते. याजकरिता नामदार साहेबांची आज्ञा घेऊन तूर्त काम चालविण्याकरिता राजश्री वामनराव मोरेश्वर सोहनी पुण्यास शनिवारच्या वाड्याजवळ राहतात. त्यांस अगर आपले भरवशाचा कोणी हुशार इंग्रजी व मराठी चांगले

जाणणारा असा पाठविण्याची लवकर तजवीज करावी व त्याजला रेसिडेंटसाहेब यांनी कामकाजात वागविण्यास हरकत करू नये अशा बंदोबस्तासह पाठवून द्यावा.

इकडील आमचे सर्व उपाय थकल्यामुळे सर्व आमची हिंमत गेली; परंतु आपण नामदार साहेबांपाशी माफी मागून तोंडी अर्ज करून लवकर खुलासे कराल. इकडेस लक्ष लागून राहिले आहे. इन्साफी राज्यात या हकीकती एकदम खऱ्या मानण्यास अडचण पडावयाची; परंतु मल्हारराव आल्यापासून आजपर्यंत केलेली कामे मनात आणिल्याने विशेष खात्री होईल.

पूर्वी आपल्यास आणावयाकरिता इकडोन रावजी केशव सांभारे यांस पाठविला, असे असून त्या आदावतीमुळे त्याजवर खोटी तक्रार चालून रेसिडेंटसाहेब यांनी मल्हारराव यांचे स्वाधीन करून दिला. त्याजवर सर्व खोटे झाले. ते सर्व कागदपत्र तयार बनावटीचे केले आहेत. आता या कारणाने मजला बडोदे येथील कोणी मनुष्य जीवाच्या भीतीस्तव अनुकूल होत नाहीत व हल्ली मजजवळ आहेत तेही बेदील झाले आहेत. या ठिकाणी केवळ मोगलाई झाली आहे. याजकरिता सदर रावजी यास लवकर सोडण्याची तजवीज आपले अंगावर न येता करावी. यापासून आपला लौकिक होणार आहे. याचप्रमाणे अजम बाकरअल्ली मीरसाहेब यांचाही प्रकार आहे. तसाच हरी वैद्य माहोलीकर याचाही प्रकार सर्व आपल्यास कळलाच आहे.

येणेप्रमाणे सात कलमी मजकूर ध्यानात आणून याचा तोंडी बंदोबस्त नामदार साहेबांकडून करून घ्यावा. दिवस गत होऊ नये. विशेष लिहून कळविले पाहिजे असे नाही. सेवेशी श्रुत होय हे विज्ञापना.

**- जमनाबाई साहेब गायकवाड**

यादी मेहरबान गव्हर्नरसाहेब बहादूर, जंजीरे मुंबई याजकडे जमनाबाईसाहेब राणी, संस्थान बडोदे यांजकडून लिहून जाते ऐसाजे-पूर्वी आमचे तर्फेने सर्व मजकूर सरकार जाहीर केल्यावरून सरकारांनी विचार करून आम्हास कापांत आणून ठेऊन बंदोबस्त केला. त्यावरून मल्हारराव दादासाहेब यांनी आपल्या तर्फे राधाबाई व रेवूबाई यास ठेविल्या आहेत, असे असून हल्ली दादासाहेब स्वत: फौजेसुद्धा तोफा वगैरे सरंजाम घेऊन आम्ही ज्या बागेत

आहोत त्याच्या खाडीच्या पलीकडे अदमासे दहा हातांवर राहिले आहेत. हे आम्हास फार त्रासदायक आहे. कारण इंग्रज सरकारांनी सर्व बंदोबस्त ठेवून त्यांचे भरवशाच्या रावाबाई व रेवूबाई असा हरदूकडील पक्का बंदोबस्त असून पुन्हा स्वत: फौजेसहित येऊन राहतात. हे लोकांत अपकीर्तीस कारण होऊन लोकांत उपहास होण्याची गोष्ट आहे व बाळंतपणाचे वेळेस अशा तजविजी कधीच झाल्या नाहीत, आणि दादासाहेब तोफा व लष्कर घेऊन राहिले, तेव्हा त्यांचे मनात येथे राहून काय कर्तव्य आहे हे समजत नाही. यांजकरिता सरकारांनी याचा अवश्य विचार करून बंदोबस्त झाला पाहिजे. नाहीपेक्षा महाराज येथे राहिल्याने कोणता घात व काय तुफान होईल हे समजत नाही. याजकरिता मजकूर हा सरकारांस कळविला आहे. याबद्दल सत्वर तजवीज करणे साहेबांकडे आहे. ता. १ माहे जुलै सन १८७१ रोजी बडोद्याहून रवाना झाली आहे. आषाढ शु. १४ शके १९२७.

**-जमनाबाई साहेब गायकवाड**

या पत्रावरून मासाहेब गरोदर स्थितीत असताना किती संकटात होत्या हे चांगले कळून येईल असो.

मासाहेबांना कंवठ फार आवडे. गर्भारपणी एकदा एकाने एक इरसाल पिकलेले कंवठ आणून नजर केले. ते नाराळाएवढे मोठे होते. ते वरून सबंध दिसत असून फुटल्याची निशाणी नव्हती. त्यावेळेस जवळ एक भरवंशाचा मनुष्य बसला होता. त्याला त्या कंवठाचा संशय आला. फोडून पाहिले तो खरोखर त्यात विषप्रयोग झाला होता असे दिसून आले. तेव्हापासून त्यांच्या जिवाला अपाय करण्याचे इलाज चालू असल्याची खात्री झाली. यापुढे राजवाड्यात राहणे सुरक्षित नाही, धोक्याचे आहे असे समजून ही गोष्ट रेसिडेंटाच्या कानावर घालून त्या कापाच्या हद्दीत रेसिडेंटाच्या आश्रयाखाली सन १८७१ च्या मार्च महिन्यात जाऊन राहिल्या. कापांत पूर्ण मास भरताच संवत् १९२८ आषाढ वद्य ६ (तारीख ५ जुलै १८७१) या दिवशी प्रात:काली मासाहेब प्रसूत झाल्या; पण इच्छिल्याप्रमाणे त्यांस पुत्र न होता कन्या झाली. त्या कन्येचे नाव ताराबाई असे ठेविले. पुत्र होता तर खंडेराव महाराजांच्या मागे तोच गादीचा वारस झाला असता; पण तसा योग घडून न आल्यामुळे मल्हाररावांना गादीचा पुरा अधिकार मिळाला.

अशा स्थितीत यापुढे बडोद्यास राहून आपला निभाव लागावयाचा नाही. बडोद्यापासून दोन पावले दूर राहावे, असा विचार करून ताराबाबाला सुमारे ६ महिने झाल्यावर रेसिडेंटाच्या संमतीने तिला बरोबर घेऊन त्या पुण्यास जाऊन राहिल्या. पुण्यास चालत्या झाल्या त्यावेळेस त्यांच्या अंगावर होता तेवढाच दागदागिना त्यांजपाशी राहिला. दुसरे जडजवाहीर त्यांस काही मिळाले नाही. त्यांना लाख रुपये स्त्रीधनाबद्दल मल्हारराव देण्यास तयार झाले होते; पण ते त्यांनी घेतले नाहीत. पुण्याचा चालू खर्च पुरा पाडण्यासाठी त्यांना सावकाराचे घर बघावे लागले. शेवटी एजंटमार्फत पत्रव्यवहार चालून त्यांना सालींना छत्तीस हजार रुपये बडोद्याच्या खजिन्यातून मिळावे असे ठरले. पुण्यास गेल्यावर इंदूरचे महाराज तुकोजीराव होळकर मासाहेबांचा चांगला परामर्ष घेत होते.

तिकडे गेल्यावर पुनः आपले पाय बडोद्याला लागतील, पुनः आपल्या वंशाकडे राज्याधिकार येईल, असे मासाहेबांच्या स्वप्नीही आले नसेल; पण ईश्वरी सूत्र काही निराळेच असते. ते कोणाला आधी कळत नाहीत. पुण्यास त्यांना सुमारे चार वर्षे मोठ्या कष्टात काढावी लागली. तेथे त्यांना ताराबाबाशिवाय करमणुकीला दुसरे साधन नव्हते. वडील अप्पासाहेब माने व मातुश्री बजूबाई ही अगोदरच मरण पावली होती. चुलते दौलतराव काका माने, बाळासाहेब घाटगे, अण्णासाहेब व तात्यासाहेब माने हे दोघे बंधू व दुसरी चाकरमाणसे इतकीच काय ती त्यांच्याजवळ होती. वडील बंधू अण्णासाहेब बरेच प्रौढ होते. धाकटे तात्यासाहेब माने अद्यापि वयात आले नव्हते. दासदासींचा भरणा बडोद्यातच राहिला. काही बाळमैत्रिणी होत्या त्यासुद्धा बरोबर नेता आल्या नाहीत. अशा स्थितीत पुण्यात गद्र्यांच्या वाड्यात राहून मासाहेब दिवस लोटीत होत्या. ताराबाबा मातुश्रीच्या सौंदर्याची हुबेहूब प्रतिमा होती. ती अंगापिंडाने बरीच गुटगुटीत होती. पुण्यास जाऊन राहिल्यावर मासाहेबांना बडोदे रात्रंदिवस डोळ्यापुढे दिसत होते. स्वग्राम, स्वजन व स्वकीय यामध्ये जो मोहकपणा असतो तो सांगता येत नाही. तो बडोदे सोडल्यापासून बऱ्याच अंशी नाहीसा झाल्याने त्यांच्या मनाला वारंवार दुःख होत असे.

♦♦

खंड-८

# एथे जे जे वाढे तितुके मोडे...

'एथे जे जे वाढे तितुके मोडे ।
साचे त्याचा वेच घडे ॥'

**पु**णे मुक्कामी ताराबाबाला मांडीवर घेऊन व थोपटून थोपटून मासाहेब निजवीत असतील व ती झोपी गेल्यावर तिच्या मुखाकडे पाहून त्यांच्या मनात आपल्या गतवैभवाचे विचार उभे राहत असतील. त्यावेळचे त्यांचे चित्र एका कवीच्या कवनात चांगले वठले आहे. ते असे :-

*बाळकाचे पाहे मुख ।*
*केवळ चित्सुखाचे निजसुख ।*
*कैवल्य प्राप्तीचा जो हरिख ।*
*त्याहून संतोष पावली ॥१॥*
*हनुवटी धरूनि पाहे वदन ।*
*क्षणक्षणा गल्लस्पर्शन ।*
*सप्रेम उचलोनी दे चुंबन ।*
*कलभाषिणी रंजविते ॥२॥*
*कज्जले माखले नेत्र पुशी ।*
*कुंतल, कुंची, टोपी, सरसी ।*
*करूनी आलिंगी हृदयेशी ।*
*चुंबी वदनासी क्षणक्षणा ॥३॥*

ही सहृदय रचना चतुर चितार्‍यालासुद्धा हुबेहूब चितारता येणार नाही, असो.

ताराबाबाचे गोजिरवाणे मुख, बोबडे बोल व बाललीला पाहून मासाहेबांना हर्षवायू होत असेल. कन्या सरासरी साडेचार वर्षांची होऊन चांगली चालू

बोलू लागली होती.

आता पुण्याकडचे वर्तमान एकीकडे ठेवून मासाहेबांचे पाय पुन: बडोद्याला कसे लागले हे कळण्यासाठी मल्हारराव महाराजांची थोडीशी हकीकत अगोदर सांगतो.

थोरले सयाजीराव महाराज यांचे तिसरे चिरंजीव मल्हारराव महाराज, खंडेराव महाराजांच्या मागे सन १८७१ साली गादीचे मालक झाले. ते उतावळ्या स्वभावाचे; पण साधेभोळे व भाबडे होते. औदार्य गुणांत गणपतराव महाराज व खंडेराव महाराज यांना ते मागे सारण्यासारखे होते. त्यांना छक्के पंजे व राजकीय डावपेच माहीत नव्हते. ते शिक्षण त्यांना कधीच मिळाले नव्हते. कोण काही सांगेल तेच खरे मानून चालणारे होते. ते गादीनशीन झाल्यावर राज्यात घोटाळे झाले. स्वार्थसाधू लोक त्यांच्या सभोवती गोळा झाले. निकट सहवासाने त्यांच्यावर त्यांचा पगडा बसला. राज्यकारभार पाहणाऱ्या बारभाईवर कोणाचा दाब राहिला नाही. हीच व्यवस्था त्यांना घातुक झाली. इंग्रज सरकाराकडे त्यांचे बोभाटे जाऊ लागले. हलकट लोक दूर करून चांगला हुशार पुरुष दिवाणाच्या जागी नेमून त्याच्या धोरणाने व साह्याने राज्यकारभार चालवावा, अशा तिकडून सूचना झाल्या. शेवटी सुधारणा करण्यासाठी सार्वभौम सरकाराने त्यांना अठरा महिन्यांची मुदत दिली. सरकाराने, कधी गोंजारून, कधी धमकी देऊन, कधी तारीफ करून, कधी दरडावून, कधी रागे भरून लिहिलेल्या खलित्यावर खलिते एजंटमार्फत पाठविले, तरी त्या सूचनांकडे त्यांनी द्यावे तसे लक्ष दिले नाही. युक्तीने, प्रयुक्तीने व शिताफीने इंग्रज सरकारच्या सूचना अमलात न आणण्याचा क्रम कारभारी मंडळीने चालू ठेविला. ते बोलण्यात व लिहिण्यात मात्र गोड शब्दांची योजना करीत. आपल्या सूचनांप्रमाणे सर्व सुधारणा चालू केल्या आहेत, लवकरच सर्व घोटाळे नाहीसे होतील असे जबाब पाठवून इंग्रज सरकारचे मन नरम पाडण्याचे इलाज चालले होते. पुढे मल्हारराव महाराजांचा व कर्नल फेयरचा जम बरोबर बसेना. नंतर कर्नल फेयर बदलून सर लुईस पेली हे स्पेशल कमिशनर होऊन आले. त्यांनी तारीख ३० नोव्हेंबर सन १८७४ रोजी बडोदे राज्याचा चार्ज घेतला. नंतर त्याच साली विषप्रयोगाचे प्रकरण उपस्थित झाले. विषारी सरबत कर्नल फेयरच्या पोटात शिरले. या कृत्यात

मल्हारराव महाराजांचे अंग असावे, असा संशय येऊन त्यांना कापांत नेऊन प्रतिबंधात ठेविले व गायकवाडांच्या राज्यावर इंग्रज सरकारची जप्ती बसली. या प्रकरणाची चौकशी करण्याकरिता हिंदुस्थान सरकाराने एक जंगी कमिशन नेमले. त्याची साद्यंत हकीकत कळविण्याची ही जागा नाही. ते त्या आरोपातून अगदी मुक्त झाले, तरी एकंदरीने ते राज्याधिकार चालविण्यास लायक नाहीत असे ठरवून त्यांना कायमचे पदच्युत केले. त्यांच्या औरस वंशाकडेसुद्धा गादीचा हक्क न ठेवता त्यांना ता. २२ एप्रिल १८७५ रोजी बडोद्याहून अचानक उचलून मद्रासेस नेऊन ठेविले. मल्हाररावांचे चार वर्षांचे शिराळ-शेटी राज्य संपले. नंतर सर लुईस पेली जाऊन सर रिचर्ड मीड ता. १० एप्रिल १८७५ रोजी एजंट होऊन आले.

खंडेराव महाराजांनी सन १८५७ च्या बंडाच्या साली इंग्रज सरकारला उत्तम मदत केली होती व काही चळवळ न करता त्यांनी दोस्तीचे नाते कायम ठेविले, म्हणून सन १८६२ साली त्यांना राणी सरकारकडून एक सनद मिळाली, तीत त्यांना दत्तक घेण्याची परवानगी दिली होती. गादी रिकामी पडल्यावर सार्वभौम सरकारला त्या सनदेचे स्मरण झाले.

महाराणी जमनाबाईसाहेब त्यावेळी पुण्यास राहत होत्या. त्यांच्या मांडीवर मुलगा दत्तक देऊन बडोद्याचे राज्य चालवावे असा विलायत सरकार व हिंदुस्थान सरकार यांचा विचार ठरला. मग तिकडून सूचना मिळताच मासाहेब पुण्याहून ता. ३ मे १८७५ रोजी बडोद्यास येऊन त्यांनी मोठ्या समारंभाने राजवाड्यात प्रवेश केला. होळकर सरकारचे दिवाण सर टी. माधवराव यांस इंग्रज सरकारने मागून घेऊन सगळ्या बडोदे राज्याची कुलमुखत्यारी देऊन त्यांना दिवाण नेमिले. त्याप्रमाणे त्यांनी दिवाणगिरीचा चार्ज तारीख १० मे १८७५ रोजी घेतला. दिवाणगिरीची वस्त्रे तारीख १६ मे १८७५ रोजी मिळाली. नंतर दत्तकाची निवड करण्याचे नाजूक काम मासाहेबांकडे आले. बडोद्यास गायकवाडांच्या वंशापैकी काही कुमार होते, शिवाय काही कुमार नाशिक, खान्देश वगैरे जिल्ह्यांतही होते. पुढे दूरवर दृष्टी पोचवून मुलगा निवडण्याचे अवघड काम त्यांनी किती धूर्ततेने, धोरणाने व कुशलतेने पार पाडले हे आता पुढच्या खंडात सांगू.

♦♦

## खंड-९
# दत्तविधान

**खा**न्देश जिल्ह्यापैकी कवळाणे गावी काशीराव दादा गायकवाड राहत होते. ते त्यावेळेस गरीब स्थितीत होते. त्यांना आनंदराव, गोपाळराव व संपतराव असे तिघे मुलगे होते. त्यांना मासाहेबांनी पाहण्यासाठी एजंट साहेबांच्या मार्फत बडोद्यास बोलाविले. तुम्ही 'बडोद्यास कशाला आला आहात?' असे तिघांना एका थोर गृहस्थाने विचारले. त्याला थोरले आनंदराव यांनी काहीच उत्तर दिले नाही. संपतराव म्हणाले, मला माहीत नाही, मधले गोपाळराव यांनी चटदिशी उत्तर दिले. मी राजा होण्यासाठी आलो आहे. हाच मुलगा सर्वांमध्ये चलाख व धूर्त दिसला. त्याच्या तोंडातून जी अक्षरे निघाली तीच पुढे खरी ठरली. मासाहेब व सर रिचर्ड मीड यांना तोच मुलगा पसंत पडला. याचे वय त्यावेळेस सुमारे १३ वर्षांचे होते. या मुलाला मासाहेबांनी तीन वेळा पाहावयास बोलावले होते, नंतर गोपाळरावालाच मांडीवर घेण्याचे त्यांनी ठरविले.

मुलाची निवड झाल्यावर दत्तविधान रीतीप्रमाणे होऊन तारीख २७ मे १८७५, गुरुवार या दिवशी मोठ्या समारंभाने पट्टाभिषेक झाला. मुलाचे नाव गोपाळराव होते ते बदलून 'सयाजीराव' असे ठेविले. मल्हारराव महाराज यांस मद्रासेकडे नेल्यावर बडोदे राज्यात बरीच अस्वस्थता झाली होती ती राज्याभिषेक झाल्यावर नाहीशी झाली. आता गायकवाडांच्या गादीवर बसलेल्या पुरुषाचा व काशीरावदादा गायकवाड यांच्या वंशाचा थोडा इतिहास देतो -

गायकवाड घराण्याचा वंशवृक्ष बडोदा 'ग्याझेटियर' व 'रूलर्स ऑफ बडोदा' या पुस्तकांत दिला आहे. शिवाय एक वंशवृक्ष ऐन्याच्या चौकटीत बसवून श्री. सयाजी लायब्ररीत मधल्या दिवाणखान्यात लावून ठेविला आहे. तो पाहिला असता या जुन्या वृक्षाची काशीराव शाखा अलीकडे

खंडेराव शाखेत मिसळून जाऊन तिला नवीन पालवी फुटून जोमात येत चालल्याचे दिसून येईल.

पिलाजीराव गायकवाडाचे पुत्र प्रतापराव यांचे वंशज कालगतीने कवळाणे गावी राहत होते. त्यांचेच वंशिक काशीराव दादा हे होत. गायकवाडांच्या गादीवर आजपर्यंत -

| | |
|---|---|
| १. दमाजी (पहिला) | २. पिलाजी |
| ३. दमाजी (दुसरा) | ४. गोविंदराव (पहिला) |
| ५. सयाजीराव (पहिला) | ६. फत्तेसिंग (पहिला) |
| ७. मानाजी | ८. गोविंदराव (दुसरा) |
| ९. आनंदराव | १०. फत्तेसिंग (दुसरा) |
| ११. सयाजीराव (दुसरा) | १२. गणपतराव |
| १३. खंडेराव | १४. मल्हारराव |

१५. सयाजीराव (तिसरा)

असे पंधरा पुरुष बसले. प्रस्तुतचे सयाजीराव हे पंधरावे पुरुष आहेत. पहिले दमाजीराव गायकवाड यास शाहू राजाने सन १७२१ साली 'समशेरबहादर' हा किताब दिला. गायकवाड सरकारची गादी स्थापन होऊ आजच्या मितीला सुमारे १८० वर्षे झाली. सयाजीराव या नावाचे यापूर्वी दोन पुरुष होऊन गेले. पहिले सयाजीराव यांनी सन १७७१ ते १७७८ पर्यंत सात वर्षे राज्य केले. त्यांना सन १७७१ साली 'सेनाखासखेल' हा किताब सातारच्या राजाकडून मिळाला. तेव्हापासून त्यांच्या नावाला 'सेनाखासखेल समशेर बहादर' हा किताब कागदोपत्री लागू लागला. दुसरे सयाजीराव म्हणजे प्रस्तुतच्या महाराजांचे आजे, यांनी सन १८१९ ते १८४७ पर्यंत २८ वर्षे मोठ्या नेकीने राज्य केले आणि मासाहेबांनी दत्तक घेतलेले तिसरे सयाजीराव महाराज हल्ली राज्य करीत आहेत. याप्रमाणे 'सयाजी' हे नाव धारण करणारे आजपर्यंत तीन पुरुष गादीवर बसले.

दत्तविधानाच्या वेळेस सर रिचर्ड मीड हे एजंट, गव्हर्नर जनरल होते. ते जाऊन ता. १६ नोव्हेंबर १८७५ मे रोजी मि. मेलव्हिल् साहेब एजंट होऊन आले.

पुढे थोडक्याच दिवसांनी विलायतच्या व्हिक्टोरिया राणी यांचे ज्येष्ठ पुत्र प्रिन्स ऑफ वेल्स मुंबईस येणार असे वर्तमान कळले. तेव्हा जमनाबाई

साहेब यांच्या भेटीसाठी मोठा लवाजमा बरोबर घेऊन आपल्या पुत्रासह तारीख २४ ऑक्टोबर १८७५ रोजी बडोद्याहून मुंबईस गेल्याबरोबर दिवाण सर टी. माधवराव वगैरे बडे बडे कामदार, दरकदार, सरदार व मानकरी मंडळही नेले होते. या मुंबईच्या स्वारीची हकीकत सर टी.नी आपल्या वार्षिक रिपोर्टात दिली आहे. बरोबरच्या काही दरकदार वगैरे लोकांनी यापूर्वी मुंबई शहर मुळीच पाहिले नव्हते, गजबजलेले व माणसांनी फुललेले शहर पाहून ते आश्चर्याने चकित झाले. एकदा मासाहेब जहाजात बसून मुंबई जवळची घारापुरीची कोरीव लेणी पाहावयास गेल्या. त्यावेळेस दरकदार व मानकरी मंडळीही बरोबर होती. ती लेणी यापूर्वी त्यांनी कधी पाहिली नव्हती. ती कशासाठी कोणी केली, हे त्यांस कळेना. त्या लेण्यांचे शिल्पपाटव पाहून सर्वांची मती गुंग होऊन गेली. वेरूळ व कान्हेरीची अद्भुत लेणी ते पाहाते तर किती आश्चर्यात बुडाले असते कोण जाणे? तेथील भव्य, विशाल सभामंडप व स्थूल शिलास्तंभ फारच वर्णनीय व प्रेक्षणीय आहेत. असो.

मासाहेब व सयाजीराव महाराज मुंबईचे कारखाने, इमारती व बागबगीचे पाहावयास निघाले म्हणजे दरकदार वगैरे मंडळी बरोबर असावयाचीच. शहरातील उंच उंच हवेल्या, सुंदर इमारती, जागोजागचे चित्रविचित्र व रमणीय बाग, विस्तीर्ण व स्वच्छ रस्ते, कपडाच्या गिरण्या, लोखंडाचे व आगगाडीचे अवाढव्य कारखाने, घोडे जोडलेल्या धावणाऱ्या औमनी बसगाड्या, सुशोभित दुकाने व त्यातील पदार्थांची उत्कृष्ट मांडणी, रस्त्याने जात येत असलेल्या गाड्या घोड्यांची गर्दी, धंदे व उद्योग हे प्रकार पाहून त्यावेळी सर्वांना मोठे आश्चर्य व धन्यता वाटली.

♦♦

खंड-१०

# युवराज प्रिन्स ऑफ वेल्स

**प्रि**न्ससाहेबांच्या भेटीसाठी मासाहेब मुंबईस गेल्याचे मागे कळविले. त्यांचा मुक्काम मलबार हिलवर एका विस्तीर्ण बंगल्यात होता. ही मुंबई सुमारे १०० वर्षांपूर्वी कोणाला विशेष माहीत नाही असे एक लहानसे बेट होते. ते पोर्तुगीज लोकांनी व्यापाराकरिता पेशव्यांकडून मागून घेतले होते. पुढे ते पोर्तुगाल देशाच्या राजाने आपल्या मुलीच्या लग्नाच्या वेळेस आपला जावई इंग्लंडचा राजा याला आंदण दिले होते. नंतर इंग्रज राष्ट्राच्या कारकीर्दीत ते नावारूपाला आले, अशी मुंबईची पूर्वपीठिका आहे. कोणाची मुंबई, कोणाला कोण आंदण देतो; याचा विचार केला म्हणजे मन चकित होते. गुलिस्तानचा कर्ता शेखसादी याने म्हटले आहे की-

'दुनियेकी मज्जा हरदम चली है, अफसोस यही है की, एक दिन हम नही है.'

(म्हणजे दुनियेतील मज्जा नेहमी चालूच आहे; पण दुःखाची गोष्ट एवढीच, की आम्ही मात्र एक दिवस नाहिसे होणार.) असो.

युवराजांच्या स्वागतासाठी कलकत्त्याचे लाटसाहेबही मुंबईस आले होते. त्यांच्या व मासाहेब आणि सयाजीराव यांच्या तेथे प्रथमच मुलाखती झाल्या. पुढे तारीख ९ नोव्हेंबर १८७९ रोजी युवराज मुंबईस येऊन दाखल झाले. त्यांच्या व सयाजीरावांच्या शिरस्त्याप्रमाणे भेटी व परत भेटी झाल्या. परस्परांचे आगतस्वागत चांगल्या प्रकारे झाले. तो समारंभ मोठा भव्य व प्रेक्षणीय होता. प्रिन्ससाहेबांच्या आगमनानिमित्त मुंबई शहरात अप्रतिम रोषणाई झाली. आतषबाजीचे कामही अजब रीतीचे सुटले. मुंबईस मासाहेबांचा पंचवीस दिवस मुक्काम होता, तोपर्यंत मुंबईच्या गव्हर्नरांनी त्यांचा व बरोबरच्या मानकरी मंडळीचा मानमरातब फार चांगला ठेवला होता.

मुंबईस प्रिन्ससाहेबांना बडा खाना झाला. त्यावेळेस ते म्हणाले, 'हिंदुस्थान देश पाहण्याचे माझ्या मनात फार वर्षांपासून होते, ते स्वप्न आज खरे ठरले.'

तारीख १० नोव्हेंबर रोजी प्रिन्ससाहेब गायकवाडांच्या भेटीस त्यांच्या मुक्कामी आले होते. बैठकीची जागा वरच्या मजल्यावर केली होती. भेटीची वेळ संध्याकाळची असल्यामुळे रोषणाई उत्तम प्रकारची करण्यात आली होती. सयाजीरावांशी बरेच भाषण झाल्यावर त्यांनी मासाहेबांचीही निराळी भेट घेतली. त्यांजकडे काही वेळ बसून प्रिन्स साहेब परळच्या बंगल्यावर परत गेले.

मुंबईस राजेरजवाडे आले होते, त्याचे नजर नजराणे तारीख १७ नोव्हेंबर १८७५ रोजी झाले. जरीचे, रेशमाचे व सुताचे मौल्यवान कपडे, मौल्यवान हत्यारे, जडजवाहीर, सोने, रुपे व दुसऱ्या धातूंचे कलाकुशलतेचे पदार्थ, तलवारी, कट्यारी, सतरंज्या वगैरे नजराणे कोल्हापूरचे महाराज, कच्छचे राव, हैदराबादचे निजामसाहेब इत्यादी राजेलोकांनी केले. कित्येकांनी प्रिन्ससाहेबांच्या स्मरणार्थ त्यांच्या नावाने इस्पितळे वगैरे इमारती बांधण्यासाठी काही रकमा निराळ्या काढून ठेविल्या.

गायकवाडांनी मद्रास येथे बनविलेली एक चांदीची सुरेख चाहादाणी व रेशमाने गुंफलेल्या ढाला नजर केल्या. मासाहेबांनी आपल्या जवाहीर खान्यापैकी दोन जुने अलंकार युवराजांच्या पत्नीस देण्याकरिता नजर केले. एक मौल्यवान मोत्यांचा हार (यातील मोत्यांचा रंग व घाट फारच वर्णनीय असून त्यात हिरेही जडलेले होते.), दुसरा दागिना स्त्रियांनी गळ्यात घालण्याचा जडावाचा कंठा, हे दोन्ही अलंकार गायकवाड घराण्यातील बऱ्याच राण्यांनी वापरले होते. प्रिन्ससाहेबांना एकंदर ४०० हून अधिक नजराणे आले.

पुढे प्रिन्ससाहेबांची स्वारी बडोद्यास येण्याचे ठरले, यामुळे मासाहेबांना फारच समाधान वाटले. मग त्या तारीख १८ नोव्हेंबर रोजी बडोद्यास परत आल्या. दुसऱ्याच दिवशी, म्हणजे तारीख १९ नोव्हेंबर रोजी प्रिन्ससाहेब युरोपियन मंडळीसह बडोद्यास आले. स्टेशनावर मासाहेबांनी आपले चिरंजीव सयाजीराव महाराज, सर टी. माधवराव, दरकदार, सरदार, मानकरी, मुलकी व लष्करी अधिकारी सामोरे पाठविले होते. मि. मेलव्हिलसाहेब

एजंटही स्टेशनावर हजर होते. त्या सर्वांचे आदरातिथ्य मासाहेबांनी सर टी. कडून उत्तम प्रकारचे करविले. प्रिन्ससाहेबांकरिता राजवाड्यात मोठा दरबार भरविला. सयाजीराव महाराज सामोरे जाऊन प्रिन्ससाहेबांना वरच्या दिवाणखान्यात घेऊन गेले. तेथे सर्वांचे नजराणे झाले. हार, तुरे, गजरे, पानसुपारी झाली. नंतर प्रिन्ससाहेब मासाहेब बसल्या होत्या, त्या दिवाणखान्यात त्यांच्या भेटीस गेले. तेथे क्षेमकुलतेचे भाषण होऊन प्रिन्ससाहेब आपल्या मुक्कामावर गेले. ही बडाद्योत मासाहेबांची व त्यांची पहिली भेट झाली.

दुसरी भेट झाली तिजबद्दल रसेलसाहेबांनी युवराजांच्या प्रवास वर्णनात हकीकत दिली आहे ती अशी :-

'जमनाबाईसाहेबांचे लावण्य अप्रतिम आहे. त्यांचे वय तेविशीच्या आतच आहे. त्यांचा हसतमुख चेहरा असून डोळे पाणीदार आहेत. हातापायाची ठेवण सुरेख आहे. बोटात अंगठ्या घातल्या होत्या. पायात सोन्याचे तोडे व जोडवी होती. त्यांच्या भाराने चालताना त्यांना बरेच श्रम होत असतील. प्रिन्ससाहेबांची व त्यांची भेट झाली त्यावेळेस पडदा नव्हता व तोंडावर बुरखाही नव्हता. खुल्ल्या रीतीने कोंचाच्या बैठकीवर त्या बसल्या होत्या. अंगावर एक बारीक शाल होती. ती त्या वरचेवर सावरून घेत होत्या. ताराबाबाला त्यांनी आपल्या मांडीवर घेतले होते. तिजकडे बोट करून त्या म्हणाल्या 'ही माझी तारा पुरुषाच्या जन्माला आली असती तर आज तीच गायकवाडांच्या गादीची वारस झाली असती. मुंबई शहर पाहून मला फार आनंद झाला. आमचे बडोदे आपल्याला आवडेल अशी आशा करिते. आपल्या शिकारीचा बंदोबस्त करून ठेविला आहे.'

इतके भाषण झाल्यावर युवराज मासाहेबांचा निरोप घेऊन साठमारीचे खेळ पाहण्यासाठी अगडाकडे निघून गेले. ही मासाहेबांची व त्यांची बडोद्यास दुसरी भेट झाली.

तारीख २१ नोव्हेंबर रोजी रात्री मोतीबाग बंगल्यात प्रिन्ससाहेबांना बडा खाना झाला. नंतर मंडळीसह ते राजवाड्यात मासाहेबांच्या भेटीस गेले. खंडेराव महाराजांनी एक घागरी पलटण तयार केली होती. ती पलटण सलामीकरिता राजवाड्यापुढे उभी केली होती. सलामी होऊन वर गेल्यावर तेथेही कॉफीची व फलाहाराची तजवीज ठेविली होती. फलाहार झाल्यावर नाच, रंग, जलतरंग, गायन वगैरे समारंभ झाला. दारूकामही फार चांगले

सुटले. तोपर्यंत रात्रीचे अकरा वाजण्याचा सुमार झाला होता. नंतर प्रिन्ससाहेब मासाहेबांच्या दिवाणखान्यात भेटीस गेले. तेव्हा ते मासाहेबांना म्हणाले- 'आपल्या आगत स्वागताने मी फार खुश झालो. बडोद्याच्या पाहुणचाराचे मला निरंतर स्मरण राहील. अगडांतील साठमाऱ्यांचे खेळ पाहून मला फार संतोष झाला', वगैरे भाषण ऐकून मासाहेब खुश झाल्या. नंतर प्रिन्ससाहेबांना पोहोचविण्याकरिता त्या खालच्या मजल्यापर्यंत गेल्या होत्या. ही त्यांची व प्रिन्ससाहेबांची बडोद्यास तिसरी भेट झाली.

यांप्रमाणे मेजवान्या, नाच, आतषबाज्या, दरबार, भाषणे, शिकार वगैरे आगतस्वागताचे सर्व शिष्टाचार व पाहुणचार घेऊन पाच दिवसांनी म्हणजे तारीख २३ नोव्हेंबर रोजी युवराज प्रिन्स ऑफ वेल्स यांची स्वारी रात्रीच्या गाडीने मुंबईकडे चालती झाली. ही माहिती प्रिन्स ऑफ वेल्स यांचे 'प्रवासवर्णन' नावाच्या पुस्तकातून घेतली आहे.

♦♦

खंड-११

# दिल्लीचा बडा दरबार

**स**याजीराव महाराजांचे दत्तविधान होताच राज्यकर्त्याला आवश्यक शिक्षण देण्याचा बोजा मासाहेब व त्यांचे दिवाण सर टी. माधवराव यांच्या शिरी पडला. पुत्राच्या शिक्षणाची योग्य व्यवस्था लावून राज्यकारभार सुयंत्र चालण्याच्या कामी दिवाणास योग्य सल्लामसलत देण्याचा भारही मासाहेबांवर पडला; पण ही दोन्ही कामे त्यांनी सुरेख रीतीने पार पाडली.

मि. इलियटसाहेब यांची योजना राजपुत्राच्या शिक्षणाच्या कामावर झाली. त्यांच्या देखरेखीखाली सयाजीराव यांचा मराठी, इंग्रजी व गुजराथी भाषांचा अभ्यास झाला. त्यांची बुद्धी तरतरीत असल्यामुळे सर्व विषयात लवकरच त्यांना बरीच प्रवीणता येत चालली. तरुण गायकवाडांच्या शिक्षणाविषयी लिहिताना सर टी.माधवराव व त्या वेळचे एजंटसाहेब यांनी आपल्या सन १८७५-७६ च्या रिपोर्टात मासाहेबांच्या दक्षतेविषयी असे लिहून ठेविले आहे :-

सर टी. माधवराव म्हणतात, 'महाराजांच्या शिक्षणासंबंधाने महाराणी जमनाबाईसाहेब अत्यंत काळजी घेतात. हे त्यांना फार भूषणावह आहे. त्यांच्या शिक्षणाच्या ज्या सोयी त्यांनी करून दिल्या त्याहून जास्त चांगल्या सोयी कोणत्याही देशी संस्थानात आढळावयाच्या नाहीत. महाराणीसाहेब फार बुद्धिवान व धोरणी असल्यामुळे बडोद्याच्या भावी राज्यकर्त्याला चांगले शिक्षण देणे अत्यंत महत्त्वाचे आहे, हे त्या पूर्णपणे जाणून आहेत, ही मोठ्या सुदैवाची गोष्ट होय.' पुन: ते दुसरे ठिकाणी म्हणतात, 'तरुण गायकवाडांच्या शारीरिक व नैतिक शिक्षणावर महाराणीसाहेबांची देखरेख पूर्ववत चांगली आहे. तसेच कारभारी मंडळीला कारभारांचे काम सुयंत्रपणे चालविण्यास त्यांचे चांगले पाठबळ आहे. हल्ली त्यांच्या देखरेखीखाली

जी खाती आहेत त्यांच्या खर्चाचा प्रश्न त्यांच्यापुढे आलेला आहे. अशा वेळी त्यांच्या हातून शहाणपणाने योग्य काटकसर होईल अशी आम्हास उमेद आहे.'

राज्यकारभारात नवीन शिस्त घालून देण्याच्या कामी मासाहेबांनी सर टी. माधवराव यास जी मदत केली तिजबद्दल त्यांनी पुढे लिहिल्याप्रमाणे उल्लेख केला आहे. 'आमच्या कारभारातील तत्त्वे आणि त्यांची अंमलबजावणी महाराणीसाहेबांस पसंत पडल्यामुळे आम्हाला मोठी उमेद आली आहे. त्यांची बुद्धिमत्ता, शहाणपण आणि सौजन्य कोणत्याही देशी संस्थानिक राजाला किंवा राणीला शोभण्यासारखे आहे.'

मि. मेलव्हिलसाहेब, एजंट गव्हर्नर जनरल सी. आय.ई. यांनी हिंदुस्थान सरकारास सन १८७५-७६ सालचा वार्षिक रिपोर्ट केला. त्यात त्यांनी म्हटले आहे की, 'महाराणी जमनाबाईसाहेब यांचे शहाणपण, प्रेमळ विचार आणि साह्यतत्परता या गुणांची राज्यकारभारात अत्यंत मदत झाली आहे. त्यांच्या सल्लामसलतीकरिता त्यांच्या पुढे नेलेल्या कामांचा योग्य दृष्टीने विचार करण्यात त्या नेहमी तत्परता दाखवितात.'

सर टी. माधवराव राज्यकारभार पाहू लागले, त्यावेळेस राज्यव्यवस्थेत बरेच घोटाळे होते, हे मोडून टाकून त्यांचे काम सुरळीत चालण्याच्या बाबतीत मासाहेबांकडून दिवाणास जी मदत मिळत गेली, त्यासंबंधाने सर टी. नी असे लिहून ठेविले आहे- 'राज्यकारभारात योग्य फेरफार करण्याच्या कामी महाराणीसाहेबांकडून आम्हास पूर्ववत साह्य मिळत आहे. राज्यकारभारात सुधारणा झाली तर पुढे राज्याचे हित होणार आहे, ही गोष्ट त्यांच्या शहाणपणामुळे व सदसद्विवेकबुद्धीमुळे त्यांना कळून चुकली आहे. त्या निग्रही व धोरणी असल्यामुळे त्यांचे आप्त, स्वकीय, मित्र किंवा नोकर यांना राज्यकारभारात ढवळाढवळ करण्यास फावत नाही. तरुण गायकवाडांच्या शिरावर पुढे जी जबाबदारी पडणार आहे ती नीटपणे बजाविण्यास ते तयार राहतील अशा तऱ्हेचे शिक्षण त्यांना मिळाले पाहिजे, हे नेहमी मासाहेबांच्या हृदयात घोळत असते. तसेच श्रेष्ठ प्रेरक शक्तीचा राज्यकारभारात जरी कदाचित योग्य उपयोग झाला नाही तरी राज्यरूपी यंत्राची रचना सर्व गोष्टी पुढे सुरळीत चालतील अशा घाटाची करून ठेविण्याविषयी त्यांची उत्कट इच्छा आहे.'

अशा रीतीने बडोद्याचा राज्यकारभार चालत असता, सन १८७७ च्या जानेवारीच्या पहिल्या तारखेस विलायतच्या महाराणी, विक्टोरिया या दिल्ली येथे हिंदुस्थानच्या सार्वभौम बादशाहिणीचा किताब धारण करणार, त्या समयी या दरबारास पुत्रासह यावे, अशा मतलबाचा खलिता हिंदुस्थान सरकाराकडून मासाहेबांना आला. त्यावरून मासाहेब, तरुण गायकवाड सयाजीराव महाराज व कन्या ताराबाबा यांना बरोबर घेऊन, तारीख ७ डिसेंबर १८७६ रोजी बडोद्याहून दिल्लीस जाण्याकरिता निघाल्या. समागमें मे. एजंट गव्हर्नर जनरल मि. मेलव्हिलसाहेब, सर टी. माधवराव व राज्यातील मोठमोठे सरदार, दरकदार, मानकरी व अधिकारी होते. या स्वारीबरोबर मोठाच लवाजमा घेतला होता. एकंदर १०७६ माणसे, १७२ घोडे, १० हत्ती, शिवाय उंट व बैलही पुष्कळ होते. तारीख १४ डिसेंबर रोजी मासाहेबांची स्वारी दिल्लीस पोहोचली. तारीख २९ डिसेंबर रोजी कलकत्त्याच्या लाटसाहेबांनी तरुण गायकवाडाच्या छावणीत जाऊन परत भेट दिली. जाताना त्यांनी मासाहेबांचीही भेट घेतली.

तारीख १ जानेवारी १८७७ रोजी दिल्लीस टोलेजंग दरबार झाला. सर्व राजेरजवाड्यांसमक्ष सयाजीराव महाराज यांना विलायतच्या महाराणीसाहेबांनी लाटसाहेबांच्या हस्ते 'फर्जंदे-खास-दौलते-इंग्लिशिआ' हा किताब व एक बावटा नजर केला.

तारीख २ जानेवारी १८७७ रोजी ताराबाबाला समागमें घेऊन मासाहेबांनी व्हाइसरायांच्या पत्नी लेडी लिटन् यांची भेट घेतली व त्यांनीही दुसऱ्या दिवशी मासाहेबांना परत भेट दिली.

दरबाराला आलेल्या सर्व राजेरजवाड्यांचे व राजस्त्रियांचे फोटोग्राफ घेण्यात आले. त्याचप्रमाणे मासाहेब व राजकन्या ताराबाबा यांचे फोटोग्राफ* घेण्यात आले. ते पुढे सचित्र 'इलस्टेटेड लंडन न्यूस' या पुस्तकांत छापून

---

* आता एकोणीसावे शतक संपत आले आहे. या शतकात पुष्कळच अघटित गोष्टी घडल्या. हिंदुस्थानात इंग्रजांचे सार्वभौम राज्य स्थापित झाले, त्याबरोबरच युरोप खंडात पुष्कळ नवीन नवीन शोध लागून त्यांचा आपल्याइकडे फायदा होऊ लागला आहे. या शंभर वर्षांच्या अवकाशात एकंदर महत्त्वाचे शोध लागले ते खाली लिहिल्याप्रमाणे.

१) छायालेखन कला (फोटोग्राफ)

प्रसिद्ध झाले होते. त्यावेळेस हिंदुस्थानातील सर्व राजकुलातील स्त्रियांमध्ये मासाहेब फार रूपवान आहेत असे सर्वांना कळले. मासाहेबांचे वय तेवीस वर्षांहून अधिक नव्हते व ताराबाबाला सहावे सरून सातवे वर्ष लागले होते. यापूर्वी त्या पडद्यात असल्यामुळे फारशा बाहेरच्या लोकांच्या दृष्टीस पडत नसत. नजीक असणाऱ्या लोकांच्या मात्र दृष्टीस पडत, त्यामुळे त्यांच्या सौंदर्याची दूरच्या लोकांना फारशी कल्पना करता आली नव्हती.

पुढे दिल्लीहून निघाल्यावर मासाहेब आग्र्यास गेल्या. तेथून मथुरा, गोकुळ, वृंदावन ही पुराणप्रसिद्ध क्षेत्रे पाहून त्या प्रयागास गेल्या. तेथे तीन दिवस मुक्काम करून तीर्थविधी व दानधर्म सारून काशीस गेल्या. काशी क्षेत्रात दहा दिवस वास करून तेथेही त्यांनी आपल्या नावलौकिककाप्रमाणे दानधर्म पुष्कळ केला. विद्वान ब्राह्मणांची संभावना केली. याप्रमाणे उत्तरेकडची यात्रा संपवून त्या तारीख ९ फेब्रुवारी १८७७ रोजी बडोद्यास येऊन पोहोचल्या.

♦♦

---

२) वाफेचे यंत्र (आगगाड्या)

३) एक्स किरणे, (म्हणजे सूर्याचे किरण पडून कातडीवर पडलेले चट्टे वगैरे रोग बरे करण्याची कला. फक्त १०-२० मिनिटापर्यंत एक्स किरण पाडल्याने रोगाची जागा बरी होते.)

४) तारायंत्र (टेलिग्राफ)

५) ध्वनिवाहक यंत्र (टेलिफोन)

६) विद्युत प्रकाश (इलेक्ट्रिक लाईट)

७) ध्वनिलेखन यंत्र (फोनोग्राफ)

८) शिवण्याचे यंत्र

९) धुराचे व रॉक ऑईलचे दिवे.

१०) दुर्बीण, (दूरचे पदार्थ व ग्रहमालेतील ग्रह पाहण्याचे दूरदर्शक यंत्र)

११) लोखंडाचे दोन चाकी व तीन चाकी घोडे (बायसिकल वगैरे).

या शिवाय लहानसहान यंत्रे पुष्कळच झाली आहेत. ती येथे लिहिली नाहीत. आता येत्या विसाव्या शतकात बुद्धिसामर्थ्याने तिकडे आणखी काय काय नवीन विलक्षण शोध लागतात न कळे.

खंड-१२

# क्रौन ऑफ इंडिया

**मा**साहेबांना (क्रौन ऑफ इंडिया) हिंदुस्थानचा मुगुटमणी हा किताब विलायतच्या राणीसरकारने ता. ६ जुलै १८७८ रोजी बडोद्यास एजंटसाहेबांच्या मार्फत दिला. त्या समारंभाची हकीकत सर टी. माधवराव यांनी आपल्या वार्षिक रिपोर्टात दिली आहे, तिचा सारांश असा.

सर टी. म्हणतात : तारीख ६ जुलै सन १८७८ रोजी आकाश अगदी निरभ्र होते. तिसऱ्या प्रहरी नजरबागेच्या वाड्याजवळ फौजेचे लोक उभे केले होते. रस्त्यात प्रेक्षकांची गर्दी झाली होती. राजवाड्यात दरबारचा दिवाणखाना सरकारी कामदार व नोकर यांनी गच्च भरून गेला होता. दिवाणखान्याच्या मागच्या अंगाला महाराणी जमनाबाईसाहेब बसल्या होत्या. त्याजपाशी मेलव्हिल साहेबांची पत्नी लेडी मेलव्हिल व कापांतील इतर युरोपियन स्त्रिया बसल्या होत्या. मि. मेलव्हिलसाहेब एजंट व कापांतील इतर युरोपियन गृहस्थ यांच्या गाड्या लहरीपूर दरवाजाजवळ येऊन पोहोचल्या. तेथे दिवाणानी सर्वांचे स्वागत केले. तेथून मंडळी हत्तीवर आरोहण करून राजवाड्याजवळ येऊन पोहोचताच तोफांची सलामी झाली. बँडबाजा वाजत होता. महाराजसाहेब सामोरे जाऊन एजंटसाहेबास दिवाणखान्यात घेऊन गेले. नंतर असिस्टंट एजंटसाहेब लाटसाहेबांचा खलिता व किताबाचा चांद घेऊन आले. त्यांना महाराजसाहेब व एजंटसाहेब सामोरे जाऊन महाराणी जमनाबाईसाहेब यांजकडे घेऊन गेले. तेथे गेल्यावर मेलव्हिल साहेबांनी लेडी मेलव्हिल यांच्या हातून राणीसरकारचा चांद मासाहेबांना अर्पण केला. त्यासमयी राणीसरकारच्या खलित्याचे भाषांतर सर टी. माधवराव यांनी वाचून दाखविले. त्याबद्दल मासाहेबांनी राणीसरकारचे आभार मानिले. त्यावेळेस पुन: तोफांची सरबत्ती झाली. सर्व मंडळी मग थोरल्या दिवाणखान्यात आल्यावर मेलव्हिल साहेबांनी उभे राहून आलेला खलिता दरबारात वाचून

दाखविला. त्यावेळी सर्व मंडळी उभी राहिली होती. खलित्याचा सारांश मराठीत काजी शहाबुद्दीन यांनी सर्वांना कळविला. नंतर महाराजसाहेबांनी इंग्रजीत थोडेसे भाषण केले, ते असे:-

'मेलव्हिल व इतर गृहस्थ हो, आजचा आम्हाला मोठा सुदिन प्राप्त झाला आहे. माझ्या परमपूज्य प्रिय मातुश्रीसाहेबांना आज जे सन्मानचिन्ह मिळाले आहे ते एक मोठे बहुमोल भूषण आहे, असे आमच्या घराण्यात नेहमी मानिले जाईल. गेल्या तीन वर्षात आम्हाला जी मानचिन्हे मिळाली त्यांच्या योगाने आम्ही राणीसरकारच्या पाशाने पूर्वीपेक्षा अधिक बद्ध झालो आहो. ज्या ज्या वेळेस जरूर लागेल त्या त्या वेळेस दयाळू महाराणी व्हिक्टोरिया यांची सेवा परमभक्तीने करण्यास आम्ही तयार आहो.'

इतके झाल्यावर पानसुपारी, अत्तर गुलाब घेऊन दरबार बरखास्त झाला. त्याच रात्री मोतीबाग बंगल्यात युरोपियन लोकांचा बडाखाना झाला. त्यावेळेस मेलव्हिल साहेबांनी मासाहेबांचे फार फार आभार मानिले. नंतर सर टी. नी मासाहेबांच्या वतीने भाषण केले ते असे:-

'मेलव्हिलसाहेब, इतर सद्गृहस्थहो, आपण सर्वांनी महाराणी जमनाबाई साहेबांचे क्षेमकुशल चिंतिले, त्याबद्दल आभार मानण्याचे काम मजकडे आले याचे मला फार भूषण वाटत आहे. महाराणी साहेबांचे अंत:करण अत्यंत संस्कारक्षम असून आपल्या ममताळूपणाचा त्यांच्या मनावर संस्कार झाल्याशिवाय राहणार नाही. दुर्दैवाने महाराणीसाहेबांना सौख्य पर्वतावरून दु:ख गर्तेत एकदम कसे फेकून दिले होते, हे आपल्यास विदीतच आहे. त्यांचा छळ करणाऱ्या अन्याय मूर्तीला कालगतीने शासन मिळून त्या पूर्ववत् उच्च पदाला पावल्या. या गोष्टीला तीन वर्षे झाली. ज्या राजवाड्यातून त्या निराशायुक्त अंत:करणाने निघून गेल्या होत्या त्याच राजवाड्यात त्यांनी ज्या दिवशी मोठ्या समारंभाने पुन:प्रवेश केला, तो दिवस अद्याप मला चांगला स्मरतो. ती प्रभातकालची अति रमणीय व शांत वेळा मला आठवते. त्या दिवशी मोठ्या पहाटेस अंतरिक्षात मला एक विलक्षण व क्वचित दृष्टीस पडणारा असा देखावा दिसला. तो देखावा मी मोठ्या उत्कंठेने पाहत राहिलो. त्या मनोरम देखाव्यात महाराणीसाहेबांच्या दैवदुर्विलासिताचे प्रतिबिंब पडलेले मला दिसले. नीलवर्ण व निरभ्र आकाशांत शुक्राची चांदणी आपल्या अत्यंत उज्ज्वल तेजाने चमकत होती. ती

चंद्रबिंबाच्या आड जाऊन ग्रस्त झाली. तेव्हा आकाश निष्प्रभ व उदास दिसू लागले; पण ही भयाण स्थिती फार वेळ टिकली नाही. थोड्याच अवकाशांत ती ग्रस्त झालेली शुक्राची चांदणी तेजहीन चंद्रबिंबातून बाहेर पडून पूर्ववत प्रकाशमान दिसू लागली. ती जशी चंद्रबिंबातून मुक्त झाली, तशीच आमच्या महाराणीसाहेब राजकीय ग्रहणातून मुक्त होऊन ब्रिटिश सरकाराविषयी कृतज्ञता बुद्धी ठेवून हल्ली आपला काळ आनंदात घालवीत आहेत. त्यांना एकामागून एक आनंदाचा दिवस येत आहे व सन्मानावर सन्मान मिळत आहेत. आजच्या त्यांच्या स्वर्गीय आणि प्रौढप्रताप सार्वभौम राज्यकर्तीकडून त्यांना 'क्रौन ऑफ इंडिया' या किताबाचा अत्यंत श्रेष्ठ मान मिळून त्या मानाचा अलंकार वंशपरंपरेने होत असलेल्या रत्नोपचयाबरोबर राणीसाहेबांच्या गळ्यात चमकत राहील. आज मिळालेल्या मानाने त्यांच्या अलंकरण विधीची परिपूर्णता झाली, असे म्हणण्यास हरकत नाही. हे भूषण मासाहेब चिरकाल धारण करोत.'

हे सर टी. चे अलंकारिक भाषण किती सुंदर आहे पाहा! या भाषणात मासाहेबांचे स्थित्यंतर कसे झाले होते, आणि पुढे सार्वभौम चक्रवर्तिनीकडून त्यांचा कसा बहुमान होत गेला, याचे त्यांनी हुबेहूब चित्र उभे केले आहे.

पुढे त्याच इंग्रज सरकारला अफगाणिस्थानच्या अमीराशी लढण्याचा प्रसंग येऊन चोहीकडून सरहद्दीवर फौजा रवाना होऊ लागल्या, तेव्हा जो प्रसंग इंग्रज सरकारावर तोच आपल्यावर असे समजून मासाहेबांनी एजंटमार्फत कलकत्त्याचे लाटसाहेब यांजकडे एक खलिता पाठविला, त्यात कापातील पलटणे सरहद्दीकडे पाठविण्याची जरूर असल्यास पाठवावी. इकडे कापांतील तिजोरी व रेसिडेन्सीचा बंदोबस्त आमच्या लोकांकडून ठेवू, असे मोठ्या आदराने लिहिले होते. ही मासाहेबांची राजनिष्ठा व प्रेम पाहून तिकडून उत्तर आले की, आपल्या सूचनेबद्दल आम्ही आभारी आहोत, जरूर लागल्यास आपल्यास कळवू.

♦♦

खंड-१३

# गुणांची पारख

**मा**साहेबांच्या शरीरसौंदर्याप्रमाणेच त्यांचा सुस्वभाव, शिक्षण, भाषण, धूर्तता, विनय, दयाळूत्व, पोक्त समजूत व तीव्र बुद्धी हे चित्ताकर्षक गुण होते. अशी गुणी मनुष्येही कदाचित पुष्कळ असतील; पण ज्यांना परगुणांची खरी पारख आहे अशी मनुष्ये फार थोडी आढळतात. गुणांची पारख जेथे चांगली असते तेथे गुणी मनुष्याच्या गुणांची बूजही चांगली होते. सर टी. माधवराव हा एक अलौकिक बुद्धिमान पुरुष होता. याचे अंगवर्चस्व व बुद्धिवर्चस्व समसमान होते. त्या वेळेस हिंदुस्थानात नेटिव लोकांमध्ये सर सालारजंग, सर दिनकरराव राजवाडे, सर जंग बहादूर व सर टी. माधवराव हे साडेतीन शहाण्यात गणले गेले होते. अशा असाधारण मनुष्यापैकी एका पुरुषाच्या हाती बडोद्याचा राज्यकारभार इंग्रज सरकारने सोपवला होता. त्यांच्या गुणांची पारख मासाहेबांनी बरोबर केली होती. सर टी. यांनाही गुणांची पारख चांगली होती. त्यांनी आपल्या हाताखाली चांगली गुणी मनुष्ये निवडून घेतली होती व मासाहेबांच्या गुणांविषयी त्यांनी कैक ठिकाणी व कैक प्रसंगी स्तुतिपर लेख व भाषणे केली, ती योग्यस्थळी वाचण्यात येतील. आता त्यावेळेस ते दिवाणगिरीवर असल्यामुळे ती कदाचित विशेष वजनदार मानली जाणार नाहीत; पण दिवाणगिरी सोडून गेल्यावर पुढे सुमारे चार वर्षांनी, म्हणजे सन १८८४ साली, त्यांनी विजयानगर येथे मुलींच्या शाळेत बक्षीस समारंभाच्या वेळी सभेचे अध्यक्ष या नात्याने जे सुंदर भाषण केले ते विविध ज्ञानविस्ताराचे पुस्तक १६, अंक ७ यात प्रसिद्ध झाले आहे. त्यातील मासाहेबांच्या संबंधाचा जेवढा भाग आहे तेवढ्याचाच उतारा या खाली देतो-

‘बडोदे राज्याच्या श्री. महाराणी जमनाबाईसाहेब, प्रस्तुतच्या महाराजांच्या

मातुश्री, यांचीच गोष्ट ऐका. त्या महाराणीसाहेबांचे नाव घेतले की, बडोदे संस्थानात माझ्या आयुष्याचा जो काळ गेला त्या काळात घडलेल्या अनेक गोष्टींची आठवण होऊन चित्तास आल्हाद व समाधान झाल्यावाचून नाही राहत. त्याजला वारंवार भेटून अनेक विषयांवर त्याजपाशी पुष्कळ वेळपावेतो मोकळेपणाने संभाषण करण्याचे पुष्कळ प्रसंग माझ्या अधिकाराच्या संबंधाने मला नेहमी येत. त्यांची ती नैसर्गिक तीव्र बुद्धी व त्यांनी संपादन केलेले अनेक विषयांचे ज्ञान, त्यांची पोक्त समजूत, त्यांचे चातुर्य, त्यांचा उत्तम स्वभाव, त्यांचे पराकाष्ठेचे कोमल अंत:करण आणि त्यांचे विनयसंपन्न वर्तन, ही पाहून माझ्या मनात त्यांच्याविषयी अतिशय प्रेम व पूज्य बुद्धी उत्पन्न झाली. त्या तेथील राजघराण्यात प्रमुख आहेत व महाराजांच्या अज्ञानावस्थेत मी संस्थानचा कारभार पाहत होतो. त्यावेळी जर त्या माझ्या कृतीस मान देऊन माझे साह्य न करत्या, तर तेथे काम करणे मला पुष्कळच जड जाते, असो. त्या महाराणीसाहेबास एकुलते एक कन्यारत्न आहे. खरोखरच ती मुलगी मोठी मनोरम आहे. फारच सुंदर व सुबुद्ध आहे. त्या राजकन्येचे नाव तारा! किती सार्थ नाव आहे पाहा! तारा म्हणजे नक्षत्र ! आणि खरोखरच त्या राजघराण्यात ताराबाई केवळ नक्षत्रासारख्याच आहेत. असो, आता पहा काय प्रकार घडला तो! मातुश्री स्वत: सुशिक्षित असल्यामुळे कन्येच्या शिक्षणाकडे अगदी लहानपणापासूनच त्यांचे लक्ष लागले व त्याही मोठ्या आस्थेने त्या कामास उपक्रम केला. या कामाविषयी म्हणजे बाहेरून कोणी तिऱ्हाईत सत्तेने किंवा सामोपचाराने त्याजला काही सांगावयास गेले होते असे मुळीच नाही. स्वयमेव अंत:पुरापासूनच त्याला आरंभ झाला.' अशा अल्पवयात देखील ताराबाईच्या अभ्यासाचा झपाटा कसा चालला होता म्हणाल! मला तर ती त्वरा पाहून मोठा चमत्कार वाटला व फार आनंदही झाला. अशा कन्येविषयी मातेला मोठी धन्यता वाटणे साहजिक आहे. महाराणीसाहेबही तशाच अभिमानाने मधून मधून मला व गव्हर्नर जनरल साहेबांचे एजंट यांजला राजकन्येची परीक्षा घेण्याकरता बोलवावे, तेव्हा फार दिवस लोटले नाहीत तोच आम्हास असे वाटू लागले की, पायाशुद्ध शिक्षणाविषयी कन्या आईपेक्षा कांकणभर सरस होणार! धर्म करण्याची बुद्धी, विनय, मर्यादा, सहनशीलपणा आदिकरून जे अति थोर व अगत्याचे सद्‌गुण आमच्या स्त्रियांच्या अंगी स्वभावत: वास करतात,

त्यापैकी एकालाही धक्का न लागू देण्याविषयी फारच खबरदारी ठेवली पाहिजे.'

आधीच स्त्री शिक्षणासारखा सुंदर विषय, आणि त्यात सर टी. माधवरावासारखे श्रीमंत, प्रसिद्ध, विद्वान, राज्यकारणपटू व स्वत: अनुभविक भाषण करणारे, तेव्हा 'आधीच सोन्याचे, वरी जडावाचे, लेणे श्रीमंताचे शोभिवंत' ही उक्ती मासाहेब व दिवाणसाहेब या दोघांनाही सारखीच लागू पडते. ते दिवाणगिरीवर असताना त्यांनी मासाहेबांचे गोडवे गाईले आहेत, तेथे कदाचित 'ज्याची खावी पोळी त्याची वाजवावी टाळी' ही म्हण लागू करता येईल; पण दिवाणगिरी सोडून घरी बसल्यावर त्यांच्या मुखांतून ही अक्षरे निघाली आहेत, तेव्हा त्यांची पारख मासाहेबांविषयी कशी होती हे ध्यानात येईल.

मासाहेबांना गुणीजनाच्या गुणांची पारख चांगली असल्यामुळे त्यांनी मान डोलविली म्हणजे हाजिरी देणाराला मूठभर मास आल्यासारखे होई. त्यांना स्वत:ला चांगले गाता येत नव्हते व वादनकलेतही विशेष प्रवीणता नव्हती, तरी रागदारीचे ज्ञान त्यांना चांगले असल्यामुळे, गायन-वादनपटूंचा सन्मान त्यांजकडून चांगला होत असे. एकदा म्हैसुराकडची एक उत्तम गाणारी स्त्री आली होती. ती दोन्ही डोळ्यांनी अंध होती; परंतु तिच्या अंगी गाण्याचा गुण उत्तम होता. तिचे श्री तारकेश्वरी मासाहेबांपुढे एकदा गाणे झाले. त्या मजलसीला दरकदार व कित्येक चांगले चांगले गवईही हजर होते. तिचे गाणे मासाहेबांनी कान देऊन ऐकिले. तिचे गायन-कला-नैपुण्य पाहून मासाहेब फार खुश झाल्या. तिला शाबासकी दिल्याने तिचे गाणे अधिकच खुलत गेले. का नाही खुलणार? रोकड बिदागीपेक्षा गुणांची पारख होऊन जी शाबासकी मिळते तिची किंमत अधिक मानली जाते. श्रोत्यांकडून टाळ्यांचा गजर जास्त झाला की, सभेत उभा राहून भाषण करणारा वक्ता, किंवा हरिदास याला दोन जास्त मजेदार गोष्टी सांगावयास हुरूप येतो. पदार्थ चांगले झाले आहेत असे म्हटले की, आपण नको नको म्हणत असता स्वयंपाक करणारा आचारी आग्रहाने जास्त दोन जिलब्या आपल्या पानात आणून टाकतो. तसेच गवयाला शाबासकी मिळाली की, तो दोन ताना अधिक मारतो. ही माणसांची कृती झाली; पण मुक्या जनावरालासुद्धा शाबासकी आवडते. पाठीवर बसलेल्या स्वाराने पुठ्ठ्यावर

थाप मारून, जरा लगामीचा इशारा करण्याबरोबर घोडा वेगाने धावू लागतो! असो.

त्या गाणारणीला त्यांनी एक उंची शालू व रोकड रक्कम देऊन तिची बिदागी केली. अशा रीतीने शास्त्री, दशग्रंथी, गवई, अष्टावधानी, बहुरूपी, खेळकरी, नाटककार, तमाशेवाले वगैरे सर्व प्रकारचा गुणी-जन केव्हा केव्हा येऊन मासाहेबांपुढे हजेरी देत असे. त्याला त्याच्या गुणाप्रमाणे बिदागी देऊन पाठवणी करीत. कित्येकांना त्याच्या गुणाबद्दल आपल्या सहीचे दाखलेही देत.

गुजरातेत प्रतिवर्षी नवरात्रात देवीच्या नावाने रचलेले गर्भे आळोआळी बायकांचे मेळे जमून चांदण्यात घेरे घेऊन तालासुरावर सुस्वर म्हणण्याची चाल आहे. तीच चाल बडोद्यासही चालू आहे. तसले गर्भे सरकारी कन्याशाळांतही गायक मास्तरांकडून मुलींना शिकवले जातात. सरकारात गर्भे रचणाराकडून गर्भ्यांची पुस्तके तयार करवून ठेवली आहेत. दरसाल नवरात्राचे दिवस आले म्हणजे मासाहेब गर्भे गाणाऱ्या स्त्रियांना मुद्दाम बोलावून त्यांजकडून गर्भे गाववीत असत व काही गर्भे त्यांनी स्वत: तोंडपाठ केले होते. ते स्त्रीसमाजामध्ये त्या कधी कधी गळ्यावर म्हणत असत, असे समजते.

त्यांना लोकरीचे, जरीचें, रेशमाचे, विणकरीचे आणि कशिद्याचे कामही येत होते. लोकरीचे विणलेले कपडे, कबजे, टोप्या, गळपट्टे वगैरे त्या तयार करीत. ते जिन्नस मग आपल्या आप्तस्वकीयांना व नोकरास त्या देऊन टाकीत.

श्रोता बहुश्रुत व रसिक असला म्हणजे वक्त्याने आपले काम फार जपून करावे लागते. एकदा एक घाटाखालचा हरदास बडोद्यास आला होता, त्याचे श्री तारकेश्वरी कीर्तन झाले. मासाहेब कीर्तन-श्रवणास नेहमीप्रमाणे पडद्याच्या आंत बसल्या होत्या. बुवांनी कीर्तनारंभी अध्यात्म निरूपण विशेष न करता भाकड कथांचे गुऱ्हाळ चालविले. ते काही केल्या आटपेना, तेव्हा त्या जवळच्या एका जाणत्या गृहस्थाला किंचित हसून म्हणाल्या- 'बुवा का लेक्चर देण्याला उभे राहिले आहेत, की कथा करीत आहेत!' हे त्यांचे मार्मिक शब्द लक्षात ठेवण्यासारखे आहेत.

♦♦

खंड-१४

# ताराबाबाचे लग्न

दत्तविधान झाल्यावर मासाहेबांची सहा वर्षे महाराजांच्या व ताराबाबाच्या संवर्धनात व सन्मार्ग-शिक्षण देण्यात गेली. त्यासमयी एका प्रसंगी एक थोर गृहस्थ महाराजांच्या संबंधाने म्हणाला- 'त्यांना चांगल्या तऱ्हेचे शिक्षण मिळत असून त्यांजवर मासाहेबांच्या तोडीची देखरेख ठेवणारी थोर स्त्री दुसऱ्या कोणत्याही राजवाड्यात सापडणार नाही.' शिक्षणालयाच्या बाहेर तरुण महाराजांचा बहुतेक वेळ मासाहेबांच्या सहवासात जात होता. कोणताही दुर्गुण त्यांना लागू नये म्हणून मासाहेब फार काळजी घेत असत. सर टी. माधवराव व त्यांचे सहयोगी यांनी राज्यकारभारात ज्या सुधारणा चालविल्या होत्या त्यात त्यांनी कधीही ढवळाढवळ केली नाही. पक्षाभिमानी, कारस्थानी, खुशामती व महत्त्वाकांक्षी मसलतगारांना त्यांनी आपल्याजवळ कधी थारा दिला नाही.

महाराजांना सत्रावे संपून अठरावे वर्ष लागले व ताराबाबांना आठ सरून नववे वर्ष लागले, तेव्हा दोघांच्या लग्नांचा विचार मासाहेबांच्या मनात घोळू लागला.

महाराजांचा अभ्यासक्रम संतोषकारक चालला होता. ताराबाबांचा इंग्रजीचा व मराठीचा अभ्यासही ठीक चालला होता. त्यांना घोड्यावर बरेच चांगले बसता येऊ लागले होते. स्वरूपाने त्या आपल्या मातुश्रींच्या प्रतिबिंबच होत्या. त्यांची वरयोजना सावंतवाडीचे राजेबहाद्दर रघुनाथराव बाबासाहेब सरदेसाई यांच्याशी झाली. तंजावरच्या राजघराण्यातील कन्येबरोबर महाराजांचा विवाह करण्याचे नक्की ठरले. जामात व स्नुषा कसे मिळतात त्याबद्दल मासाहेबांना मोठी काळजी होती, ती दूर होऊन त्यांचा जीव भांड्यात पडल्यासारखा झाला.

दोन्ही लग्नसमारंभांची पूर्वव्यवस्था मासाहेब व दिवाण सर टी. माधवराव यांजकडेच मुख्यत्वाने होती. वधू-वरांचे रास-कूट, गण-मैत्री, एकनाड

वगैरे बाबतीत दोहीकडच्या ज्योतिषांमध्ये बराच वादविवाद झाला. काही केल्या त्यांचे एकमत होईना. शेवटी शुभाशुभ ग्रह, लग्नकुंडल्या व राशिकुंडल्या पातड्यांतल्या पातड्यांत राहून उपाध्येबाबा व जोशीबाबा यांनी लग्नाचे मुहूर्त काढून दिले.

या लग्नसमारंभांच्या पूर्वीची व नंतरची हकीकत सर टी. माधवराव यांनी आपल्या वार्षिक रिपोर्टात चटकदार भाषेने दिली आहे. ती हकीकत व त्या समयी हजर असलेले लोक यांजकडून माहिती मिळाली त्यांच्या आधाराने समारंभाचा सारांश येथे देतो.

बडोदे शहरातील रस्ते व सरकारी इमारती दुरुस्त केल्या. राजमार्गाच्या नाक्या-नाक्यांवर कमानी उभ्या करून शृंगारल्या होत्या.

सावंतवाडीचे राजेबहाद्दर व तंजावरच्या राणीसाहेब आपल्याला सरंजाम घेऊन बडोद्यास दाखल झाल्या. शिवाय राजपिंपळ्याचे ठाकूरसाहेब, कोल्हापूरच्या राणीसाहेब, मुंबईचे कमांडर-इन-चीफसाहेब, मुंबईचे हायकोर्टाचे जज्ज, बडे बडे कामदार व इतर थोर गृहस्थ मासाहेबांच्या आमंत्रणावरून लग्नसमारंभ साजरा करण्याकरिता बडोद्यास आले होते.

ताराबाबांचे लग्न राजेबहाद्दर यांजबरोबर तारीख ३१ डिसेंबर १८७९ रोजी नजरपागेंत मोठ्या समारंभाने झाले, जी ताराबाबा नऊ वर्षेपर्यंत मासाहेबांनी प्राणापलीकडे जनत करून ठेवली होती आणि जी केवळ त्यांच्या पंचप्राणांची अंशभूत होती त्या प्रिय कन्येचा देह, किंबहुना जीवित्वाचे साफल्य, दुसऱ्यांच्या स्वाधीन करण्याचा प्रसंग आला, तेव्हा मासाहेबांना काय वाटले असेल याची कल्पना करा. कन्यादानाच्या वेळेस मातापितरांच्या मनाची, विशेषत: मातेच्या मनाची स्थिती कशी होत असते हे सांगावयास नकोच. त्यावेळेस डोळ्यातून अश्रू गळाले नाहीत अशी मातापितरे कोठे आढळतील की नाही याची शंका आहे. मुक्या जनावरांची तुटातूट झाली तर त्यांना सुद्धा वियोगजन्य दु:ख सहन होत नाही. त्यांना ते तोंडाने व्यक्त करून दाखविता आले नाही, तरी त्यांच्या हालचालीवरून ते स्पष्ट कळते, असो.

ताराबाबांचे लग्न झाल्यावर पुढे सातव्याच दिवशी महाराज साहेबांचे लग्न लागले. त्याची हकीकत आता पुढच्या खंडात देऊ.

♦♦

खंड-१५

# सयाजीराव महाराज यांचा विवाह

**ता**रीख ६ जानेवारी सन १८८० या दिवशी सयाजीराव यांचे लग्न तंजावरची राजकन्या चिमणाबाईसाहेब यांजबरोबर नजरपागेत मोठ्या थाटाने झाले. वधूच्या वयाला पंधरावे सरून सोळावे वर्ष लागले होते.

रात्री दारूकाम पुष्कळ सुटले. रंगारंगाच्या चंद्रज्योती, तारे, बाण व हवया सुटल्या. मोठमोठ्या फुलबाजांतून तेज:पुंज फुलांच्या माळा गळाल्या. त्यांचा प्रकाश पडून जिकडे तिकडे लख्ख दिसत होते. त्यांच्या तेजापुढे मशालीचा प्रकाश फिका पडला होता. हजारो तारे बाण आकाशात सोंसावत जाऊन फाड फाड आवाज होऊन त्यातील निळे, पारवे, हिरवे, पिवळे व लाल गोळे यांची वृष्टी झाली. तो मनोरंजक देखावा पाहण्यासाठी हजारो लोकांचे डोळे आकाशाकडे लागून राहिले होते.

वाड्यात अंत:पुरांतही दिव्यांचा चकचकाट होता. हंड्या झुंबरांची आरास केली होती. चांदीच्या समया तेवत होत्या. सुवासिक पुष्पांच्या माळा कमानीसारख्या लटकविल्या होत्या. दास-दासी, अलंकार-भूषणे घालून फिरत होत्या.

मुख्य मुख्य मानकरणी बाया भरगच्ची पोशाख करून व दागिने घालून मासाहेबांच्या भोवती बसल्या होत्या. त्यांचे हिरव्या, पिवळ्या, तांबड्या, काळ्या, जांभळ्या, पोपटी वगैरे रंगांचे उंची रेशमी शालू व हिऱ्या मोत्यांचे दागिने दीपप्रकाशात चकाकत होते. वारांगनांचे नाचरंग चालू होते. फुलांचा, गुलाबपाण्याचा, अत्तरांचा व उटण्यांचा घमघमाट, दिव्यांचा प्रकाश, हिरे, माणिक, मोती व सोने यांची चकाकी व स्त्रियांच्या नेत्रांचे तेज या सर्व तेजांची व सुगंधाची तेथे एकच गर्दी झाली होती, त्यातच लग्नाच्या वेळची सुस्वर व मधुर गाणी चालू होती.

लग्नमंडपात कुलदेवतांच्या पूजाअर्चा होत होत्या. एकदा वधू व वर अग्नीपुढे हात जोडून लग्नविधीत गुंतले होते. एकदा वधूला बाया शृंगारीत होत्या. एकदा सुवर्णकलशांतील पाण्याने वधूकडच्या बाया वराचे पाय धूत होत्या. लग्नाची घटका भरण्याबरोबर उपाध्ये, जोशी व इतर मंडळी यांनी मंगलाष्टके म्हणून वधू-वरांच्या मस्तकांवर मंत्राक्षता टाकल्या. दोन्ही लग्ने शिरस्त्याप्रमाणे नजरपागेंत लागली. मासाहेबांच्या मनोदयानुरूप दोन्ही लग्नसमारंभ यथासांग शेवटास गेले.

राजघराण्यातील स्त्री-पुरुषांचे फोटोग्राफ घेण्याकरिता मुंबईहून मुद्दाम एक फोटोग्राफर आणला होता. त्याकडून सर्वांचे फोटो घेतले.

लग्नमंडपाच्या व राजवाड्यांतील अंत:पुराच्या बाहेर बडोदे शहरात तारीख १५ डिसेंबर १८७९ पासून तारीख १६ जानेवारी १८८० पर्यंत एक महिनाभर रोज नवे नवे समारंभ चालू होते. भेटीच्या, परत भेटीच्या व दरबारच्या स्वाऱ्याबरोबरच शहरात फिरत होत्या. केव्हा केव्हा तोफांच्या सलामी होत होत्या. शृंगारलेले हत्ती, घोडे, गाड्या, पालख्या व मेणे जेथे तेथे दिसत होते. देशी वाजंत्री व परदेशी बँडबाजे वाजत होते. पलटणी शिपाई व पोलिसचे शिपाई राजरस्त्यावर बंदोबस्तासाठी व शोभेकरिता उभे केले होते. रात्री रोषणाई व चिराकदाने, वारांगनांचे नाचरंग, मेजवान्या, आतषबाज्या व मिरवणुकी जात होत्या. दिवसा अगडांतल्या साठमाऱ्या, शेतकीची प्रदर्शने, सार्वजनिक बागेतले नाना तऱ्हेचे तमाशे व खेळ आणि वाराशाच्या मैदानात लष्करी लोकांच्या परेडी, रव्या व कवायती मधून मधून होत होत्या. शहराच्या लोकांना व बाहेरच्या पाहुण्यांना हा सबंध महिना मोठ्या थाटाचा, मजेचा व आनंदाचा गेला.

तारीख १२ जानेवारी १८८० या दिवशी लक्ष्मी-विलास राजवाड्याच्या पायाचा दगड बसविण्याचा विधी मि. मेलव्हिलसाहेबांच्या हाताने झाला. त्याच रात्री मोतीबागेत युरोपियन पाहुण्यांचा बडा खाना व बडा नाच झाला. त्या मंडळीत युरोपियन स्त्रियाही पुष्कळ होत्या. त्यासमयी मेलव्हिलसाहेब म्हणाले, 'महाराज साहेबांची वर्तणूक आजपर्यंत चोख राहिली याचे कारण मासाहेब होत व त्याजबद्दल आम्ही त्यांचे आभारी आहोत. राजवाड्यात त्यांची नजर महाराजसाहेबांच्या वर्तणुकीवर नसती तर त्यांना वाईट गुण लागल्यावाचून राहतेना. त्यांना कोणताही वाईट गुण लागला नाही, हे

त्यांच्या दक्षतेचे व काळजीचे फळ होय.'

नंतर महाराज साहेबांनी भाषण केले ते असे :- 'आपले स्वागत करण्याला मासाहेबांची मला आज्ञा झाली आहे. मासाहेबांच्या संबंधाने जे आपण म्हणाला त्याबद्दल त्या आपल्या फार आभारी आहेत.'

यानंतर मुंबईचे गव्हर्नर सर रिचर्ड टेंपल यांनी बरेच मोठे भाषण केले. ते सर्व देण्याचे हे स्थळ नाही. शेवटी ते म्हणाले, 'मासाहेबांच्या आदरातिथ्याने बडोद्यास आलेल्या सर्व युरोपियन स्त्रिया व पुरुष खूश झाले आहेत. सर्वांच्या मुखातून मासाहेबांचे गुणानुवाद ऐकू येतात. पूर्वीचे इतिहास पाहिले तर कैक राजघराण्यातील राण्या व कन्या मुत्सद्दीपणात व लढायांच्या मसलती करण्यातही पुढारी होत्या. त्या केवळ आपल्याला जनानखान्यातच कोंडून घेऊन राहत नसत. प्रस्तुतच्या शांततेच्या वेळी त्या गुणांचे कारण राहिले नाही; परंतु पूर्वी प्रसिद्धीस आलेल्या स्त्रियांच्या अंगी मुत्सद्दीपणा, वगैरे जे गुण होते ते मासाहेबांच्या अंगीही वसत आहेत. त्यांच्याच योग्यतेच्या त्या आहेत.' इत्यादी भाषण झाल्यावर उत्तम प्रकारची आतषबाजी सुटली व युरोपियन लोकांचा बडा नाच झाला.

ताराबाबा व महाराजसाहेब यांच्या लग्नाप्रीत्यर्थ लाखो रुपये खर्च झाले. असा मोठा समारंभ बडोद्यात फार वर्षे झाला नव्हता.

♦♦

## खंड-१६
# स्फुट

**या** खंडाचा स्फुट हा मथळा दिला, त्याचे कारण असे आहे की, मासाहेबांच्या संबंधाची जितकी माहिती मिळाली तितकी त्यांच्या चरित्रात अवश्य आली पाहिजे. त्यांचे आप्तस्वकीय, मानकरी, माहेरची माणसे, आश्रित, मैत्रिणी व सन्निध असणारे सेवक याजकडून ही साधने मिळावयाची, म्हणून आम्ही मधुमक्षिकेची मधुकरवृत्ती स्वीकारली. फुलातला एक एक मधुबिंदू जमा करून ती आपले संचयाचे काम करिते, तशी ज्यांकडून जी थोडीबहुत माहिती मिळाली ती व पुस्तकात मिळालेली दिली आहे. 'थेंबे थेंबे तळे साचे.' प्रयत्न करिता करिता संग्रह होत गेला त्याचा निरनिराळ्या खंडात उपयोग केला. बाकी राहिलेल्या गोष्टींना या खंडात जागा दिली आहे.

(क)

मासाहेबांना आपली स्तुती केलेली आवडत नसे. एक चांगला सुशिक्षित गृहस्थ एकदा त्यांच्या समोर त्यांच्या स्तुतिस्तोत्राचा धूप जाळीत बसला. बराच वेळ गेल्यावर त्या त्याला रागाने म्हणाल्या, 'शास्त्रीबोवा, तुम्हाला दुसरा काही उद्योग नाही की काय? मजपुढे माझ्या नावाचा धूप जाळीत बसला आहात, यापेक्षा श्री तारकेश्वरासन्निध पोथी-पुराण वाचून त्याचे गुणानुवाद गाल तर त्यांत तुमचे व माझे दोघांचेही कल्याण आहे. मी जिवंत असेपर्यंत मला तुमची मुखस्तुती नको. माझ्या पश्चात मला कोणी काही म्हणो, त्याची मी पर्वा करीत नाही.'

(ख)

मासाहेबांच्या कारकीर्दीत बडोद्यास कर्नल बारपासून मि. मेलव्हिलपर्यंत

पाच एजंट होऊन गेले. या एजंट पंचकाच्या नावावरून बडोद्याच्या लोकांनी एक श्लेषार्थसूचक गद्यरचना केली, ती अशी :- 'कर्नल बारने बार उडविला, कर्नल फेयरने फिरविले, सर पेलीनें पिरगळून टाकले, सर मीडने मिटविले, आणि मि. मेलव्हिलने मिळवून घेतले.' ही आख्याईका अद्यापि पुष्कळ लोकांच्या तोंडी आहे. बार कसला उडविला? फिरविले काय? पिरगळले काय? मिटविले काय? आणि मिळवून घेतले काय? याचा गूढार्थ बडोद्याची स्थित्यंतरे ज्यांनी पाहिली होती त्यांच्या लक्षात ती सहज येण्यासारखी आहेत.

(ग)

मासाहेबांनी पुष्कळ पोथ्यापुराणे ऐकिली होती. त्यावरून त्यांची अशी समजूत झाली होती की, संपूर्ण जग हे एक प्रचंड नाटक आहे. त्याचा सूत्रधार परमेश्वर आहे. इकडच्या नाटकात कोणी राजा होतो, कोणी राणी बनते, कोणी दिवाण होतो, कोणी चोपदार बनतो, कोणी अपराधी बनून न्यायासनापुढे हात जोडून उभा राहतो, अशी रंगभूमीवर नाना तऱ्हेची सोंगे येतात. ती सूत्रधाराच्या आशेत असतात. खेळ आटोपला की, ती पडद्याच्या आंत जातात, असे आपण प्रचारातले नाटकांत पाहतो. तशी सर्व माणसे देवाच्या वरची नाटकपात्रे आहेत. ऐहिक व्यापार संपला की, जड देह येथेच ठेवून लिंगदेहाच्या रूपाने जगाच्या सूत्रधाराकडे जाऊन घेतलेल्या सोंगाची झडती द्यावी लागते. सोंग पडद्याच्या आड गेले की, त्याला आपल्या वस्त्राभरणांचा हिशेब द्यावा लागतो. त्याचप्रमाणे जीवात्म्याला पापपुण्याची झडती द्यावी लागते. त्याच्या कर्माप्रमाणे त्याला फळे भोगावी लागतात, असे आपली हिंदू शास्त्रे सांगतात. त्यांजवर त्यांचा पूर्ण भरवसा होता. त्यांनी आपल्या महाराणी पदाचा अत्याचार कधी केला नाही. त्या सदासर्वदा सर्वांशी निरभिमान वृत्तीने राहत असत.

♦♦

खंड-१७

# राज्याधिकार सोपवला

**ता**राबाबांचे व महाराजांचे लग्न झाल्यावर महाराजांना राज्याधिकार मिळावा असे मासाहेबांच्या मनात आले. महाराजांना अठरावे सरून एकोणीसावे वर्ष लागले होते. त्यांचा इंग्रजी, मराठी व गुजराथी भाषांचा अभ्यास बराच चांगला झाला होता. मुखत्यारी देण्याची गोष्ट त्यांनी एजंटसाहेबांच्या कानावर घातली. एजंटसाहेबांची संमती मिळून तिकडून हिंदुस्थान सरकारकडे लिहून गेले. त्यांनी महाराणी सरकारची परवानगी घेऊन सयाजीराव महाराजास राज्याचा अधिकार देण्याचे मंजूर केले.

तारीख २८ डिसेंबर १८८१ या दिवशी बडोद्यास मोठा दरबार भरून मुंबईचे गव्हर्नर यांच्या हातून महाराज साहेबांस राज्याचा पूर्ण अधिकार मिळाला. राज्याधिकार स्वाधीन झाल्यावर महाराजसाहेबांनी दरबारात भाषण केले, ते असे :-

'आज मित्तीपासून बडोदे राज्याचा अधिकार आम्ही आपल्या हाती घेतला आहे. आमची प्रजा सुखी राहावी व दिवसेंदिवस तिच्या सुखाची वृद्धी व्हावी अशी आमची अंत:करणापासून इच्छा आहे. हा आमचा हेतू सिद्धीस नेण्याच्या कामी आमचे सर्व कामदार, दरकदार व प्रजा अत्यंत राजनिष्ठेने आमच्याशी वर्तन ठेवतील असा आम्ही भरवसा ठेवितो. आज आरंभलेले कार्य ईश्वरकृपेने सफल होवो.'

हे शब्द लक्षात ठेवून राज्यकारभाराचे धोरण सुमारे अठरा वर्षांपासून त्यांनी चालू ठेविले आहे.

अधिकार-दान-समारंभ झाल्यावर कर्नल मीड यांस मासाहेबांनी एक पत्र लिहिले, त्यात त्यांनी कळविले की, 'हिंदुस्थान सरकारने मेहेरबान होऊन चिरंजीव बाळासाहेब (सयाजीराव) यास बडोदे गादीचा अधिकार दिला. हा

सुयोग लवकर पाहावा अशी माझी इच्छा होती ती आज पूर्ण झाली आहे.'

एकंदरीने विचार केला तर महाराजांचे सादृश बऱ्याच अंशी अकबर बादशहाशी जुळते. अकबर आपल्या वयाच्या तेराव्या वर्षी दिल्लीच्या गादीवर बसला. सयाजीरावही तेराव्या वर्षीच बडोद्याच्या गादीचे मालक झाले. अकबराने एकोणीसाव्या वर्षी बादशाहीचा कारभार आपल्या शिरी घेतला. त्याच वयात महाराजसाहेबांस बडोदे राज्याचा पूर्ण अधिकार मिळाला. अकबराने जाहीरनामा प्रसिद्ध करून आपल्या प्रजेला आश्वासन दिले. तसेच महाराजांनीही राज्याधिकार मिळाला त्या दिवशी भर दरबारात आपल्या प्रजेस लेखी व तोंडी आश्वासन दिले. यापुढे मासाहेबांच्या मागे सयाजीरावांची कीर्ती अकबराप्रमाणे चिरकाल राहो अशी गायकवाड प्रजेची इच्छा आहे ती परमेश्वर परिपूर्ण करो; व मासाहेबांनी बांधून दिलेल्या नवीन 'लक्ष्मी-विलास' राजवाड्यात महाराजसाहेब, त्यांच्या राणीसाहेब व अपत्ये सुखाने नांदोत.

लक्ष्मी-विलास राजवाड्याचे सगळे काम दगडी आहे. आत मासाहेबांच्या सांगण्याप्रमाणे राजकुटुंबाला लागणाऱ्या सर्व सोयी करून दिल्या आहेत. असा उत्तम वाडा सगळ्या हिंदुस्थानात कोठेही नाही, असे म्हणतात. वाड्याच्या पायाचा दगड बसविण्याचा समारंभ तारीख १२ जानेवारी १८८० साली मि. मेलव्हिल साहेबांच्या हाताने झाला. त्यावेळेस ते म्हणाले- या राजवाड्यात कोणकोणत्या सोयी असल्या पाहिजेत याजबद्दल अगोदर मासाहेबांचा सल्ला घेऊन नकाशा तयार केला. तो त्यांनी पसंत केल्यावर वाड्याच्या कामाला सुरुवात करण्यात आली. त्यात एक मोठा दरबार हॉल केला आहे. त्यांची लांबी ९३ फूट व रुंदी ५४ फूट ठेविली आहे. त्याच्या खालच्या व वरच्या मजल्यावर मिळून एक हजार मनुष्ये बसू शकतील, एवढा मोठा हॉल केला आहे. या वाड्यामध्ये अजमासे वीस लाख रुपये खर्च झाला आहे.

सर टी. माधवराव यांनी मासाहेबांचे नजरेखाली सुमारे साडेसहा वर्षे दिवाणगिरीचे काम केले. बाप व गुरू यांना पुत्र व शिष्य यांजकडून पराभव झालेला आवडतो, असे म्हणतात. सर टी. ना साम्राज्य चालविण्याचा अभ्यास झालेला. मुखत्यारी मिळेपर्यंत ते महाराजांना वेळेची किंमत पढवीत होते; परंतु उतारवयाच्या कारणाने राज्यकारभाराची कामे वेळच्या

वेळेस न सुटली तर उलट आपल्याला वेळेची किंमत आपल्या शिष्याकडून पढवून घेण्याचा प्रसंग येईल, असा दूरवर विचार करून लवकरच दिवाणगिरी सोडून ते आपल्या देशी चालते झाले.

सर टी. माधवराव दिवाणगिरी सोडून गेले तरी महत्त्वाच्या कामी सल्ला-मसलत विचारण्याला महाराजांच्या शिरी मासाहेबांचे छत्र होतेच. एका ग्रंथकर्त्याने म्हटले आहे की, राजा व उत्तम बागवान यांची कामे बऱ्याच अंशी सारखी असतात. बागवान आपली कामे अशी करितो की, पडलेल्या झाडांचे तो पुन: प्रतिरोपण करतो. झाडावरची फळे, पाने व फुले झाडाला धक्का न लाविता हलक्या हाताने उतरून घेतो. लहान झाडे व रोपे यांना खताचे व पाण्याचे पोषण देऊन वाढीला लावितो. काटेरी झाडे उगवली असलीत ती उपटून टाकतो. भोवतालच्या कुंपणाची वरचेवर मरामत करतो. झाडांची गर्दी झाली असेल तेथून काही झाडे काढून दूर दूर लावतो. जी झाडे उंच वाढली असतील त्यांना छाटून खच्ची करतो. जी जमिनीला टेकली असतील त्यांना टेके देऊन उभी राहतील असे करतो. औषधी झाडे कायम ठेवून त्यांच्या मुळ्या, पाने व साली युक्तीने काढून घेऊन त्यांची औषधाच्या कामी योजना करतो. वठलेली झाडे तोडून इमारतीच्या कामाकडे लावितो, इत्यादी. याचप्रमाणे महाराजांनी आपल्या राज्यकारभाराचे धोरण ठेविले आहे. सुशिक्षित राजाने आपली कामे ज्या धोरणाने करावी लागतात त्याच दिशेने राज्यव्यवस्था चालू आहे.

♦♦

## खंड-१८
# श्री तारकेश्वर

**मा**साहेबांची श्री शंकराच्या ठिकाणी अनन्य भक्ती होती. त्यांनी बडोदे शहराच्या मध्यभागी सुरसागर तलावाच्या काठी मोठ्या खर्चाने एक श्रीशंकराचे सुरम्य देवालय बांधले आहे. त्याजकडे सुमारे लाख-दीड लाख रुपये खर्च झाला असावा. हे शिवालय त्यांचे एक उत्तम स्मारकच होऊन राहिले आहे. प्रिय कन्या ताराबाबा हिचे नाव त्या देवाला दिले आहे. श्रीतारकेश्वर या नावाने हे देवालय प्रसिद्ध असून मोठे भव्य व पाहण्यालायक आहे. बडोदे शहराला ते ललामभूत झाले आहे.

मासाहेबांनी श्री द्वारका मठाचे शंकराचार्य राजराजेश्वरानंद स्वामी यांचा अनुग्रह घेतला होता. त्यांच्याच हातून त्यांनी सन १८८६ च्या सुमारास श्री तारकेश्वराची स्थापना केली. त्यांनी श्रीला एक मौल्यवान मुकुट, एक मौल्यवान भरगच्ची पालखी व बहुमोल अलंकार भूषणे व भरगच्ची पोषाख अर्पण केले आहेत. अलीकडे मासाहेबांची वस्ती बहुतकरून याच मंदिरात असे; त्यामुळे या देवालयाला सर्वकाळ मोठी रमणीयता आली होती. गवयांचे गाणे, हरिदासांचे कथाकीर्तन, पुराण, पूजाअर्चा, अन्नसंतर्पण, अभिषेक, नैवेद्य वगैरे प्रकार चालू होते. श्रीशंकराची मूर्ती पालखीत बसवून मंदिरातून संध्याकाळी बाहेर निघाली म्हणजे दारूकाम सुटत होते.

मासाहेब पक्षप्रदोष, महाशिवरात्र, महाएकादशा या दिवशी उपोषणे करीत. श्रीतारकेश्वर मंदिरात प्रदोषाच्या दिवशी व सोमवारी, प्रदोषकाली, स्नान करून पांढरी वस्त्रे परिधान करून कपाळाला भस्म लावून गळ्यात व हातात रुद्राक्षमाला धारण करून श्रीशंकरापुढे त्या ध्यानस्थ होऊन बसत, तेव्हा त्या कोणी तपस्विनी आहेत असे वाटे. त्यांच्या कंठातील मुक्ताहारापेक्षा दया, दाक्षिण्य, औदार्य, ईश्वरभक्ती इत्यादी गुणांनी त्यांच्या शरीराला

अधिक शोभा दिसे. मंदिरातील हंड्या-झुंबरांची व दीपावलीची रोषणाई, गायन, भजन व कीर्तन याचे आलाप; सुगंधी पुष्पांच्या व पल्लवांच्या लटकणाऱ्या माळा; केळीची मखरे, मंत्रपुष्पाचा गजर; सूरसनयाचे मंजूळ आवाज; देवदर्शनासाठी आलेल्या लोकांची दाटी; हे सर्व देखावे बडोद्यातील पुष्कळ लोकांच्या स्मरणातून पुष्कळ दिवस नाहीसे होणार नाहीत.

एकदा तारकेश्वरी भोजनास पंक्ती बसविल्या होत्या. त्यांचे वाढप बरोबर झाले आहे की नाही, हे त्यांनी स्वत: जाऊन पाहिले, तो पुढच्या पंक्तीला सर्व पदार्थ बरोबर वाढले असून दुसऱ्या बाजूच्या किरकोळ पंक्तीला पंक्तिप्रपंच केलेला दिसला, तेव्हा ज्याची कसूर होती त्याला त्यांनी दंड केला आणि सर्वांना सारखे वाढप होईपर्यंत त्या तेथून हालल्या नाहीत. अशी त्यांची सर्वांविषयी सारखी नजर होती. मासाहेब कैलासवासी झाल्याचे वर्तमान शहरात कळले तेव्हा त्यांचे प्रेम आठवून 'गेली आमची अन्नदाती मातुश्री' फसे लोकांच्या तोंडून उद्‌गार निघाले.

शरीराप्रमाणेच मासाहेबांचे अंत:करणही फार कोमल होते. कोणी दीन, अनाथ, पंगू, थोटा, व्याधिग्रस्त मनुष्य दृष्टीस पडला म्हणजे त्याचा त्यांना कळवळा येत असे. तो कळवळा त्यांच्या मुखांतून दु:खाने ओलेचिंब झालेल्या शब्दांच्या रूपाने बाहेर पडे, इतकेच नाही; पण त्यांचे साह्य करण्यास त्यांचे मन द्रवून धर्म करण्यासाठी हातांची बोटे शिवशिवू लागत. अनाथाचा समाचार घेऊन त्याला वाटेला लावीत. त्यांची भूतदया पुष्कळांना माहीत आहे. भूतदयेच्या व उदारपणाच्या गोष्टी सांगायला व ऐकायला सोप्या असतात; पण स्वत: करण्याची पाळी आली म्हणजे फार कठीण जाते. अहिल्याबाईसारखी जी असाधारण उदार माणसे आपल्याकडे होऊन गेली, त्यांचा औदार्य हा गुण उपजतच स्वभाव होता. मात्र त्याला सतत अभ्यासाने पुष्टी आली होती. जोपर्यंत पदराला खार लागत नाही तोपर्यंतच औदार्यबुद्धीचे प्रवाह वाहतात; परंतु स्वत: देण्याचा प्रसंग आला म्हणजे ते प्रवाह आटून जाऊन त्याचे उगमही नाहीसे होतात!

मासाहेब सयाजीराव महाराजांना 'बाळा, बाळा' म्हणत. बाळासाहेब मातुश्रीसाहेबांच्या दानधर्माच्या आड कधी आले नाहीत. त्या मागतील तो पैसा ते त्यांना उदार हस्ताने पुरवीत असत. मासाहेबांच्या हातखर्चासाठी सालीना पन्नास हजार रुपये मिळत होते. शिवाय इतर कच्चा खर्च चालत

होता. हिंदू धर्माप्रमाणेच त्यांची देव-ब्राह्मणांच्या ठिकाणी निष्ठा फार असे. यामुळे दानदक्षिणा, भोजने, पूजा, अर्चा, अभिषेक, अनुष्ठाने यात त्यांचा श्रीतारकेश्वर मंदिरात पैशाचा सर्व व्यय व कालक्षेप होत होता. व्रते, वैकल्य, उपोषणे, दानधर्म, धर्मश्रद्धा व पूज्यबुद्धी ही पूर्वापार चालत आलेली पद्धत त्यांच्या हाडामासांत खिळून गेली होती. तोच अभ्यास दृढ होऊन त्यांच्या हातून नित्य दानधर्म घडत होता व तोच क्रम त्यांच्या हयातीपर्यंत चालू राहिला.

♦♦

खंड-१९

# गोकर्ण यात्रा

**स**न १८७७ साली मासाहेब दिल्लीच्या दरबारास गेल्या होत्या. तेथून परत येताना त्यांनी काशी, प्रयाग वगैरे उत्तर हिंदुस्थानच्या तीर्थयात्रा केल्या. पुढे श्रीरामेश्वर व गोकर्ण महाबळेश्वरच्या यात्राही करण्याचा त्यांचा मानस होता. श्रीरामेश्वर यात्रेचा योग घडून आला नाही; पण सन १८९६ साली त्यांनी गोकर्ण महाबळेश्वरची यात्रा केली. प्रथम त्या रेल्वेमार्गाने गोव्याच्या हद्दीतील मार्मे गाव स्टेशनावर उतरल्या. तेथून पुढे आगबोटीत बसून जलमार्गाने गोकर्णास जाऊन पोहोचल्या. या गोकर्ण क्षेत्रांविषयी स्कंध पुराणांपैकी ब्रह्मोत्तरखंडात विस्तारपूर्वक वर्णन दिले आहे, ते मासाहेबांनी ऐकिले होते. त्या नेहमी शिवलीलामृत वाचीत असत. त्यात श्रीधरांनी गोकर्णाचे महात्म्य व माहिती अशी दिली आहे :-

*'गौतम म्हणे परम पवित्र ।*
*भूकैलास गोकर्ण क्षेत्र ।*
*तेथूनी मी आलो अपार ।*
*महिमा तेथीचा न वर्णवे ॥१॥*
*त्या गोकर्णीचे शिवदर्शन ।*
*ब्रह्मादिका दुर्लभ जाण ।*
*तेथे इंदिरासहित जनार्दन ।*
*तप गहन आचरित ॥२॥*
*ते अति उत्तम स्थान ।*
*तेजोमय प्रकाशगहन ।*
*नानावृक्ष लागले सघन ।*
*कैलासभुवन प्रत्यक्ष ॥३॥*

*वरकड क्षेत्री लक्ष वरूषे जाण ।*
*तप आचरले निर्वाण ।*
*गोकर्णी एक दिन ।*
*होय प्रसन्न सदाशिव ।।४।।*
*अमावास्या, संक्रांत, सोमवार ।*
*प्रदोष, पर्वकाल, शिववासर ।*
*समुद्रस्नान करिता समग्र ।*
*फळ होय सकळ तीर्थाचे ।।५।।*
*रावण कुंभकर्ण बिभीषण ।*
*त्याही पूर्वी केले तेथे अनुष्ठान ।*
*ते निर्वाणलिंग दशानने जाण ।*
*कैलासाहूनी आणिले ।।६।।*
*लिंग उपटिता डळमळे कुंभिनी ।*
*महाबळ देशमुख पाहे उपटोनी ।*
*परी न उपटे तया लागुनी ।*
*अखंड अभंग जाहले ।।७।।*
*गुप्त झाला गजानन ।*
*गाई पृथ्वीत जाती लपोन ।*
*रावणे एक गाईचा कर्ण ।*
*धावोनिया धरियेला ।।८।।*
*तो ही न उपटे तयालागून ।*
*मग तेथेच केले लिंगपूजन ।*
*गोकर्ण महाबळेश्वर तेथून ।*
*नाम जाण पडियेले ।।९।।'*

हे वर्णन वाचून गोकर्ण महाबळेश्वराचे दर्शन कधी होईल असे त्यांना झाले होते. या वर्णनावरून हे देवस्थान फार प्राचीन म्हणजे रामावताराच्या अगोदरपासून प्रसिद्ध होते असे अनुमान निघते.

मासाहेब गोकर्णास जाऊन पोहोचल्या त्यावेळेस माघ वद्य १४ ची महाशिवरात्रीची पर्वणी नजीक येऊन पोहोचली होती. जलदीचा प्रवास करून ती संधी त्यांनी साधली. गोकर्णास त्यांचा मुक्काम तारीख १३

पासून तारीख २५ फेब्रुवारी १८९६ पर्यंत तेरा दिवस होता. या अवकाशात त्यांनी तेथे पुष्कळ दानधर्म केला. शिवरात्रीच्या दिवशी त्यांनी श्री महाबळेश्वराची महापूजा करविली. रात्रौ पूजा झाल्यावर संप्रदायाप्रमाणे वाजत गाजत श्रीचा रथ मोठ्या समारंभाने निघाला. रथापुढे ब्राह्मणांचा वेदघोष व वारांगनांचे नृत्य होत होते.

मासाहेबांनी सोन्या-रुप्याची एक शालुंका करवून श्री शंकराला अर्पण केली. शिवरात्रीच्या पारण्याला मुक्तद्वार मिष्टान्न भोजन घालून ब्रह्मवृंद तृप्त केला व इतर अनाथ, पंगू, दरिद्री, साधुसंत वगैरे यांसही मिष्टान्न भोजन घालून सर्व वर्णास संतृप्त केले. श्रीला नंदादीप व पूजा नैवेद्याबद्दल त्यांनी वर्षासन बांधून दिले. त्याप्रमाणे दरसाल त्यांजकडून देवस्थानाकडे रक्कम जात होती. स्वारीचा मुक्काम गोकर्णास होता तोपर्यंत रोज अन्नसंतर्पण चालू होते.

ही गोकर्णाची यात्रा फार कष्टप्रद आहे असे त्यांना पूर्वीच कळले होते. तरी श्री शंकराच्या ठिकाणी त्यांची अत्यंत निष्ठा असल्यामुळे वाटेत शरीराला कितीही कष्ट सोसावे लागले तरी ते त्यांनी शांत वृत्तीने सहन केले. कॅसलरॉकपासून गोव्यापर्यंत पोर्तुगीज सरकारची हद्द आहे. मार्गात दाट जंगल लागले. काही ठिकाणी भयंकर किर्र झाडी होती. दुतर्फा गगनचुंबी वृक्ष लागून गेले होते. कोठे कोठे सूर्याचे किरण आंत शिरण्यालाही फट नव्हती. अशा भयंकर अरण्यातून लहान-मोठ्या नद्या वाहत होत्या. आसमंतात हिरवीगार दाट छाया असल्यामुळे ते सर्व अरण्य शांत वनश्रीचे निवांत स्थान बनून राहिले होते. त्या वनभूमीचे अप्रतिम सौंदर्य पाहून मासाहेबांना पराकाष्ठेचा आनंद वाटला. तिचे नाना तऱ्हेचे पोशाख पाहून त्या फार चकित झाल्या. त्यांनी बाणभट्टाची कादंबरी, सुबंधूची वासवदत्ता, गीतगोविंद वगैरे काव्ये व कादंबऱ्या वाचल्या होत्या. त्यांचे स्मरण होऊन त्या आपल्या बरोबरच्या मंडळीला म्हणाल्या, 'कादंबरीकारांनी आपल्या पुस्तकात जी अरण्यांची वर्णने दिली आहेत ती खरी असल्याची प्रचीती आज या ठिकाणी मला आली.'

गोव्याकडे मासाहेबांचा मुक्काम होता तोपर्यंत त्या सरकाराने त्यांचा मानमरातब फार चांगला ठेविला होता. पोर्तुगीज लोकांचा मूळ पुरुष वास्को दी गामा याचा वृत्तांत त्यांनी वाचला होता. या ऐतिहासिक साहसी पुरुषाचे

थडगे जुने गोवे येथे आहे. ती जागा त्या पाहावयास गेल्या होत्या, त्यावेळेस त्यांचे भयंकर चरित्र त्यांच्या डोळ्यापुढे उभे राहून त्या क्षणभर चकित झाल्या. त्याचे साडेतीन हात लांबीचे शांत थडगे* पाहून त्यांना फार आश्चर्य वाटले.

मासाहेबांचा गोकर्णाकडे मुक्काम असताना सावंतवाडीहून ताराबाबाकडून काही मानकरी त्यांस बोलवावयास आले. त्याप्रमाणे त्यांनी तिकडे जाण्याचे कबूल केले. नंतर रेल्वे मार्गाने बेळगावापर्यंत जाऊन अंबोलीच्या घाटाने त्या सावंतवाडीस गेल्या. स्वारीबरोबर सुमारे २०० मनुष्य होते. तेथे गेल्यावर मोठ्या थाटाने स्वारीचा शहरात प्रवेश झाला. जावई व कन्या यांच्या घरी सुमारे एक महिनाभर मासाहेबांचा मुक्काम होता. तेथे जामाताकडून मासाहेबांचे चांगले आदरातिथ्य झाले. सावंतवाडीहून बेळगावाकडे पायरस्त्याने. परत येताना त्या अंबोली घाटात हवा खाण्यासाठी सुमारे एक महिनाभर राहिल्या होत्या. तेथून बेळगावास जाऊन रेल्वे मार्गाने पुण्यास गेल्या. तेथे उन्हाळा घालविण्याकरिता सरासरी एक महिनाभर राहून जुलै १८९५ महिन्यांत बडोद्यास परत आल्या. या यात्रेच्या स्वारीनिमित्त त्यांनी मोठा खर्च केला.

♦♦

---

* गोव्यापासून तहत दमणपर्यंत हिंदुस्थानचा बहुतेक पश्चिम किनारा फिरंगी लोकांनी व्यापून टाकिला होता. तेथे त्यांनी हिंदू लोकांना बाटविण्याचा मोठा सपाटा चालविला होता. त्यांनी जुलमाने लोकांचे धर्मांतर करविले. हजारो हिंदू भ्रष्ट केले. हजारो ब्राह्मण व मराठे यांना देशोधडीस लाविले. गावोगावचे लहान-मोठे तलाव व विहिरी यांत थुंकून व हाडे टाकून त्या भ्रष्ट केल्या. असे अत्याचार करून वास्को दी गामाने हिंदू लोकांस 'त्राहि भगवान' करून सोडले होते. ही सर्व हकीकत मासाहेबांनी इतिहासात वाचली होती.

धर्माचा मूळ इतिहास पाहिला तर अगदी मूळचा वेद धर्म किंवा हिंदू धर्म होय. या धर्मापासूनच परंपरेने; परंतु थोड्याबहुत विपर्यासाने 'झरथ्रुष्ट' म्हणजे पारशी धर्म व बौद्ध धर्म निपजले. बौद्ध धर्मापासून ख्रिस्ती धर्म प्रसवला आणि ख्रिस्ती धर्मापासून इस्लाम म्हणजे मुसलमानी धर्म निपजला. अशा क्रमाने पृथ्वीवरचे निरनिराळे धर्म पसरले. अशी परंपरा असून ख्रिस्ती धर्मानुयायी फिरंगी यांनी गोव्याकडे त्यासमयी धर्माभिमानाने फारच कहर करून सोडला होता.

खंड-२०

# गोष्टी वगैरे

**मा**साहेबांच्या तैनातीत एक गोष्टी सांगणारा होता. त्याला रावजी गोष्टी हे नाव पडले होते. राजे लोक व राजस्त्रिया यांच्या तैनातीला असे गोष्टी सांगणारे लोक असतात. त्यांचे काम इतकेच की, त्यांना करमेनासे झाले किंवा झोप येत नसली तर पलंगाजवळ बसून करमणुकीच्या काही गोष्टी सांगाव्या आणि झोप लागली की निघून जावे. अलीकडे ताराबाबा वारल्यापासून मासाहेबांची झोप उडाली होती. यामुळे रावजीच्या चटकदार गोष्टी ऐकता ऐकता थोडीशी झोप लागली तर लागे. असे सांगतात की, त्याच्या गमतीच्या गोष्टी ऐकताना कसलेही दु:ख क्षणभर विसरून जात असे, असा रावजीच्या अंगी गुण होता. अशा गोष्टी सांगणाऱ्याच्या तोंडी बहुश: बिरबल बादशहाच्या गोष्टी असतात. तसले एक दोन चुटके येथे देतो.

एकदा अकबर बादशहाने बिरबलाला विचारिले, 'मी मोठा की तुमचा इंद्र मोठा?' बिरबलाने उत्तर दिले, 'आपण मोठे, इंद्र अगदी हलका.' बादशहा म्हणाला, 'मी मोठा कसा ते सांग.' बिरबल म्हणाला, 'ब्रह्मदेवाने आपल्याला उत्पन्न केल्यावर एक मोठा तराजू हाती घेऊन एका पारड्यात इंद्राला व दुसऱ्या पारड्यात आपल्याला ठेवून तराजू उचलला, तो इंद्राचे वजन आपल्या पासंगालाही पुरले नाही. आपले पारडे जड असल्यामुळे ते खाली बसून राहिले आणि इंद्राचे पारडे हलके म्हणून ते वर उडाले. मग इंद्र वरच्या वरच राहिला.'

एका कवीने एकदा एका श्रीमंत गृहस्थाला स्तुतीपर कवनाने खुश केले. मग तो गृहस्थ म्हणाला, 'कविराज, उद्या तुम्ही मजकडे या म्हणजे मी तुम्हाला खुश करीन.' दुसऱ्या दिवशी तो कवी मोठ्या आशेने त्याजकडे जाऊन संभावना मागू लागला. तेव्हा तो श्रीमंत गृहस्थ म्हणाला, 'तुम्हाला

द्यावयाचे ते मी कालच देऊन चुकलो आहे. तुम्ही कवनात माझी स्तुती करून मला खुश केले, तसे तुम्ही उद्या या असं सांगून मीही तुम्हाला खुश केले. झाले, खुशीने खुशी उडाली. आता द्यायचे घ्यायचे काही राहिले नाही,' हे ऐकून कविराज मुकाट्याने चालते झाले.

मासाहेबांना गोड पदार्थ फारसे आवडत नव्हते. त्यांची आंबट पदार्थांवर भक्ती फार असे. आंबा, महाळुंग, लिंबू यांची लोणची त्यांना फार आवडत. कवठावर त्यांचे प्रेम फारच असे. पुरणाची पोळी व श्रीखंड त्या विशेष आदराने खात. कोणी त्यांना मेजवानी केली तर कवठाची चटणी, खुसखुशीत थालिपीठ, बाजरीची भाकर, वाटाण्याचे सांभारे व चक्का-दही हे पदार्थ ताटात वाढलेले पाहिले म्हणजे त्यांची मर्जी सुप्रसन्न असे, म्हणून मेजवानी करणारे इतर मिष्टान्नांबरोबर त्यांना आवडणारे पदार्थ करून वाढण्याची अगोदर तजवीज ठेवीत. ते पदार्थ ताटात वाढलेले असले म्हणजे त्या दिवशी त्या दोन घासांनी जेवण अधिक जेवीत.

सुगंधी अत्तरांमध्ये हीना अत्तरावर त्यांची भक्ती विशेष असे. दुसरी अत्तरे त्या फारशी वापरीत नसत. रंगामध्ये मोतिया, प्याजी, अस्मानी, तुरंजी, खसखसी, पोपटी हे रंग त्यांना आवडत. दागिन्यांमध्ये हिरा-मोत्याचा दागिना विशेष आवडे.

सर टी. माधवरावांनी आपल्या कारकीर्दीत 'जमनाबाई हॉस्पिटल' या नावाची मासाहेबांच्या स्मरणार्थ एक दवाखान्याची इमारत जीत हल्ली सेनापती कचेरी आहे ती बांधविली. तिजकडे दीड लाख रुपये खर्च झाले. ती इमारत सन १८८२ साली पुरी झाली, असे तिजवरील स्मारक लेखावरून समजते. तिची हकीकत दिवाणांनी सन १८८० सालच्या वार्षिक रिपोर्टात दिली आहे. तेव्हापासून मासाहेबांच्या नावाचा धर्मार्थ दवाखाना उघडून त्याजकडे दरसाल सुमारे दहा हजार रुपये खर्च होत आहेत. ही इमारत फारच सुंदर आहे. या स्मारकाच्या योगाने हजारो अनाथ व गरीब मनुष्यांना धर्मार्थ दवा व पोटाला अन्नही मिळत आहे.

मासाहेबांचे आता प्रत्यक्ष दर्शन होणे नाही; परंतु प्रसिद्ध चित्रकार राजा रविवर्मा याने त्यांच्या व ताराबाबांच्या ऑइलपेंटिंगच्या मोठ्या सांध्याच्या सर्वांगसुंदर तसबिरा काढल्या आहेत, त्या लक्ष्मीविलास व मकरपुरा राजवाड्यात ठेविल्या आहेत. त्या पाहिल्या असता त्यांचे दर्शन घडल्यासारखे वाटते.

त्यात त्यांची हालचाल मात्र नाही. चित्रात व तसबिरात हालचाल उत्पन्न करण्याचा यत्न हल्ली युरोप खंडात चालू आहे. नुसते हूबेहूब चित्र करणे किंवा काढणे यात तिकडे काहीच वाटेनासे झाले आहे!

संपतराव गायकवाड यांनी बडोद्यास 'सयाजी लायब्ररी' या नावाची एक मोठी लायब्ररी स्थापन करण्याचा विचार केला; पण शहराच्या मध्यभागी ती स्थापन करण्याजोगी प्रशस्त इमारत मिळेना. मासाहेब ज्या राजवाड्यात राहत होत्या तो वाडा खाली होता. कारण मासाहेब अलीकडे तारकेश्वरच्या मंदिरात अगर मोतीबाग वगैरे बंगल्यात राहत होत्या. तो वाडा लायब्ररीच्या कामाला मिळावा म्हणून संपतरावांनी मासाहेबांकडे विनंती केली. ती मान्य करून तो वाडा ताबडतोब त्यांनी लायब्ररीकरिता खाली करून दिला. सार्वजनिक हिताच्या कामाकडे त्यांचे किती लक्ष असे, हे यावरून स्पष्ट दिसून येते. सन १८८९ साली ही प्रसिद्ध लायब्ररी त्या वाड्यात स्थापन झाली. तेव्हापासून तेथील पुस्तकांचा अमूल्य लाभ बडोद्याचे सर्व लोक घेत आहेत. याच लायब्ररीत एक मोठा 'आल्बम' (फोटोग्राफांचा संग्रह) आहे. त्यात खंडेराव महाराज, जमनाबाईसाहेब, ताराबाबा व राजघराण्यातील दुसरी इतर मंडळी यांच्या उत्तम तसबिरा घालून ठेविल्या आहेत.

♦♦

खंड-२१

# उपजे तितुके काळदाढे

**‘उपजें तितुकें काळदाढें ।**
**पडें अवघडें अवचितें ।।’**

**मा**साहेबांनी राज्यकारभाराची मोठी कामगिरी बजाविली, ती एजंट गव्हर्नर जनरल, हिंदुस्थान सरकार व विलायतचे राणी सरकार या सर्वांना पसंत पडली. बडोद्यास जनरल मीडसाहेब एजंट होते. त्यांच्या चरित्र लेखकाने एके ठिकाणी लिहिले आहे की, ‘ऐन आणीबाणीच्या प्रसंगी मासाहेबांनी मोठ्या शिताफीने राज्यकारभार चालविला, असा राणी सरकारचा अभिप्राय असून, तरुण गायकवाडांची भरभराट व्हावी अशी त्यांची इच्छा आहे, असा निरोप मासाहेबांना कळविण्याचा आनंदाचा प्रसंग एकदा मीडसाहेब यांस आला होता.’

महाराजसाहेब राज्यकारभार पाहू लागल्यापासून मासाहेबांना तिकडे विशेष लक्ष देण्याचे कारण राहिले नाही. मग देवधर्माकडे त्यांचे जास्त लक्ष लागले. गोकर्ण-महाबळेश्वरची यात्रा करून आल्यावर काही दिवसांनी ताराबाबांची प्रकृती बिघडल्याची तार सावंतवाडीहून बडोद्यास आली. सबब त्यांना आराम पडण्याकरिता तारकेश्वरी अनुष्ठाने बसवून व एक-दोन चांगले डॉक्टर बरोबर घेऊन त्या ताबडतोब सावंतवाडीस गेल्या. तेथे गेल्यावर ताराबाबांची प्रकृती हळूहळू सुधारत गेली. मग त्यांना घेऊन त्या बडोद्यास आल्या. येथे आल्यावर त्यांची प्रकृती बरीच चांगली सुधारली. याच साली दिवाळीच्या सुमारास जामात वाडीकर सरदेसाई बडोद्यास आले. त्यांना दिवाळीचा सण देऊन ताराबाबा व सरदेसाई यांची सावंतवाडीस रवानगी केली.

पुढे काही दिवसांनी मासाहेबांची प्रकृती एकाएकी फारच बिघडली.

उन्हाळ्याचे दिवस असून, हवापालट करण्यासाठी त्या नर्मदातटाक कर्नाळी येथे सन १८९७ च्या मे महिन्यात जाऊन राहिल्या. त्याच मुक्कामी ताराबाबांवर सावंतवाडी येथे मृत्यूने एकाएकी झडप घातल्याची दुष्ट तार आली. त्यांना कन्या वारल्याचे वर्तमान कळले तेव्हा विषाने माखलेली तीक्ष्ण कट्यार जोराने छातीत खुपसल्यासारखी वेदना झाली. पोटात चुन्याची भट्टी पेटल्यासारखी आग भडकली. प्रिय कन्येवर मृत्यूचा घाला पडल्याची खबर कळताच त्यांचे पंचप्राण कासावीस झाले. शांती, समाधान व आनंद यांची अमृतवल्ली एकदम उपटून टाकल्यासारखे झाले. ज्या झऱ्यातून सुखाचा ओघ वाहत होता तो झरा एकाएकी आटून कोरडा ठणठणीत पडला. 'जैशी मृतवत्सका गाय, हंबरडा हाणोनी बोभाय । हृदय फुटोनी मोकली धाय, म्हणे काय करू आता,' अशी त्यांची अवस्था झाली. त्यासमयी ताराबाबांचे वय सरासरी २५ वर्षांच्या आतबाहेर होते. अशा अल्पवयात त्यांचा अंत झाला. महाराजसाहेब मुद्दाम कर्नाळीस जाऊन मातुश्रीसाहेबांचे शांतवन करून त्यांना बडोद्यास घेऊन आले. तेव्हापासून मासाहेबांच्या शरीर प्रकृतीला धक्का बसला तो बसला. अतिआग्रह करून महाराजांनी त्यांना आपल्याजवळ बडोद्यास आणिले; पण त्यांना येथेही चैन पडेना. रात्रंदिवस ताराबाबा डोळ्यांपुढे दिसत होती, झोप उडाली. त्यांच्या मूळ स्वरूपात पुष्कळच फरक पडला. कन्यावियोगाने शरीर होरपळल्यासारखे झाले. अंगतेजस्विता नाहीशी होऊन अकाली वृद्धावस्थेची कळा आली. मी महापापिणी म्हणून मला वैधव्य आले, नाना प्रकारची दुःखे भोगावी लागली आणि माझी एकुलती एक ताराबाबा होती तीही मला लाभली नाही. मागल्या जन्मी महापातके केली असतील त्यांची फळे या जन्मी मी दोन्ही हातांनी गोळा करीत आहे, असे त्यांना वाटू लागले.

हे विचार मनात उभे राहून शंकराचे पूजन, भजन, स्मरण, उपोषणे, दानधर्म, पुराणश्रवण यामध्ये त्यांचा बहुतेक काळ जाऊ लागला. रात्री बिछान्यावर निखारे पसरलेले व पोटात आगीचा भडका मग झोप यावी कशी?

पुढे बडोद्यास प्लेगचा आजार चालू झाला. सबब डॉक्टरांच्या सांगण्यावरून बडोद्याहून चार कोसावर केळणपूर म्हणून गाव आहे, तेथील बंगल्यात

त्यांनी स्थलांतर केले. ते कन्यागताचे साल होते. म्हणून त्या ठिकाणी त्यांनी काही गरीब ब्राह्मण मुलींची सालंकृत कन्यादाने केली व काही गरीब मुलांच्या धर्ममुंजी केल्या. धर्मकृत्यांकडे त्यांचे जास्तीत जास्त लक्ष लागत चालले.

केळणपुरासही चैन पडेना. मग हवा पालटण्याकरिता दक्षिणेकडे प्रयाण करावे म्हणजे प्रकृतीस आराम पडेल असा कित्येकांनी सल्ला दिली तो त्यांना पसंत पडला. कन्यागतानिमित्त क्षेत्र वाई येथे जावे म्हणजे हवापालट होऊन श्रीकृष्णाबाईची स्नाने व दानधर्म घडेल असा विचार होऊन त्यांचा वाईकडे जाण्याचा बेत ठरला.

मासाहेबांची स्वारी केळणपुराहून वाईकडे जाण्याकरिता तारीख २५ मे सन १८९८ रोजी निघाली. वाईच्या पश्चिमेस एका कोसावर नाना फडणविसांचे लहानसे मेणवली गाव आहे. तेथे कृष्णेच्या काठी नानांचा टुमदार वाडा आहे. त्या वाड्यात त्यांनी आपला मुक्काम ठेविला. मासाहेबांचा मेणवलीस मुक्काम होता तोपर्यंत मेणवली व वाई ही दोन गावे एक होऊन गेली होती. मेणवलीला मोठ्या गावाची कळा आली. त्या दोन गावांमध्ये अंतर आहे असे वाटेनासे झाले, इतका तो रहदारीचा हमरस्ता होऊन गेला.

महाबळेश्वरापासून धोम-वाईच्या पंचक्रोशीत शिवालये अगणित आहेत. त्यामध्ये मुख्य मुख्य म्हटली म्हणजे महाबळेश्वर, धौमेश्वर, सिद्धेश्वर, काशीविश्वेश्वर, काळेश्वर, कोटेश्वर, हरिहरेश्वर ही होत. या शिवाय वाई क्षेत्रात फरसावरचे विष्णुमंदिर, लक्ष्मीमंदिर, ढोल्या गणपती, कसब्यांतील मोरया इत्यादी अनेक देवस्थाने आहेत. यापैकी बरीच शिलामंदिरे रास्ते सरदार यांनी बांधलेली फार प्रेक्षणीय आहेत. कृष्णेच्या काठालाच रास्त्यांनी एका शिलामय मंदिरात गणपतीची स्थापना केली आहे. ती गजाननाची मूर्ती फारच भव्य आहे. एवढी मोठी मूर्ती कोठेही नसेल. तिची पूजा शिडी लावून करावी लागते! म्हणूनच त्या मंगल मूर्तीला ढोल्या गणपती असे म्हणतात. असो.

आता वाईकडे गेल्यावर मासाहेबांनी कन्यागतानिमित्त काय काय दानधर्म केला याची हकीकत पुढच्या खंडात देऊ.

♦♦

खंड-२२

# वाईतील दानधर्म

**मा**साहेब वाईकडे गेल्यावर मे महिन्यापासून ऑक्टोबरपर्यंत सुमारे पाच महिने त्यांचा मुक्काम तिकडे होता. ते कन्यागताचे साल असून, शिवाय चातुर्मासाचेही दिवस होते व त्यातच अधिक आश्विनमास आला होता, यामुळे कृष्णातीरी त्यांचे राहणे लांबत गेले. अलीकडे ताराबाबांच्या ताज्या ताज्या वियोगानलाने त्यांचे मन पोळत होते. त्यायोगाने त्यांची स्वत:ची शरीरप्रकृती जो जो ढासळत चालली तो तो देवधर्माकडे त्यांची प्रवृत्ती अधिकाधिक वळत चालली, हे साहजिक आहे.

वाईस गेल्यावर श्रीकृष्णाबाईंची स्नाने, कृष्णोदकाचे पान, लिंगार्चन, तीर्थविधी, वृषोत्सर्ग, अभिषेक, ब्राह्मण समाराधना, सुवासिनीपूजने, दानदक्षिणा इत्यादी प्रकार चालू होते. एक-दोन दिवसापुरताच हा दानधर्म असता तर त्यांचा इतका लौकिक झाला नसता. वाईकडील शास्त्री, वैदिक व इतर यांना दानदक्षिणा व भोजने यांचा असा हंगाम पेशवाई बुडाल्यापासून आला नव्हता. यामुळे हे पांच महिने त्यांना दिवाळी-दसऱ्याप्रमाणे गेले. सहस्त्र-भोजनाचे मिष्टान्न जेवण जेवल्याशिवाय एकही ब्राह्मण राहिला नसेल. वाईच्या आसपास वीस-वीस कोसांत राहणाऱ्या भिक्षुक व इतर ब्राह्मणांचे कैक वेळा हात भिजल्याशिवाय राहिले नाहीत, असे समजते. पाटरांगोळ्या घातलेल्या ब्राह्मणांच्या पंक्ती जेवावयास बसल्या म्हणजे पानांवर पदार्थ वाढविण्याची पैरवी मासाहेब स्वत: तेथे उभ्या राहून ठेववीत असत. मग त्या बेताला काय विचारावे? त्यावेळेस जो भाजीपाला वाईकडे मिळत नव्हता तो बडोदे, मुंबई व पुणे येथून रेल्वे मार्गाने आणविण्याची तजवीज ठेवविली होती, असे स्वारीबरोबर गेलेले लोक सांगतात. अशा भोजनाचा बेत किती सुरेख राहत असेल हे आम्ही सांगण्यापेक्षा द्रौपदीने

दुर्वास ऋषी व त्यांचे शिष्य यांना अरण्यात इच्छाभोजन दिल्याचे भारतात सांगितले आहे. त्याचे मुक्तेश्वरांनी रसभरित वर्णन केले आहे. त्याचाच थोडासा उतारा येथे देतो, म्हणजे मासाहेबांच्या भोजन समारंभाची कल्पना करिता येईल.

(जेवणार मंडळी कशा प्रकारची होती)

*'संबळिया देव धोत्रें,*
*शाळिग्राम तर्पणपात्रें,*
*आसने रुद्राक्षमाला सूत्रे,*
*कमंडलू हस्तकी.'*

*(भोजनाचा बेत कसा होता).*

*'ऐशीं लोणची चाखतां ओठीं,*
*अरुची पळे बारा वाटीं,*
*जैसे धन्वंतरी याचे दृष्टीं,*
*रोग पळती दशदिशा.'*

*'गाळूनि चंद्रकळांचा रसू,*
*माजीं मेळविला सुवासू,*
*ते कथिकेचा घेतां ग्रासू,*
*परते म्हणती अमृतां.'*

*'फलशाका पत्रशाका,*
*कंदशाका पुष्पशाका,*
*यांचा स्वाद सेवितां मुखां,*
*शाकंबरी स्वयें जाणे.'*

*'लवणशाकांचिया श्रेणी,*
*दध्योदनाच्या सांगातिणी,*
*दधितक्राचिये मिळणी,*
*ब्रह्मानंद भोक्तयां.'*

*(भोजन करणारे यांची स्थिती व ते काय म्हणाले).*

*'अमर्याद फुगली पोटें,*
*धोत्रे ढिलाविती बोटें,*
*रिता ठाव नाही कोठे,*

*उदकांतेही घ्यावया.'*
*'भोजन करितां गेला प्राण,*
*पुढती मिळेल हो जनन,*
*परंतु ऐसे मिष्टान्न,*
*जन्मोजन्मी न देखो.'*
*'भोजनी तृप्ति जाहाली मोठी,*
*चंद्रमंडळा लागली दृष्टी,*
*धोत्रे न दिसती तळवटी,*
*फिटली की राहिली.'*
*'म्हणती माथां असती मुखे,*
*तरी होतें की बहुत निकें,*
*ग्रास उचलूनि हस्तके,*
*ऊर्ध्ववदनी टाकितों.'*

असो, इतकाच उतारा बस आहे. याप्रमाणे भोजनप्रिय ब्राह्मणांना वरचेवर यथेष्ट मिष्टान्नभोजने मिळू लागली तेव्हा त्यांना गोडाचा वीट येऊन ते म्हणू लागले, घरची शिळी भाकर बरी; पण हे सहस्त्रभोजनी गोड लाडू आतां नकोत. या हकीकतीवरून मासाहेबांनी फक्त ब्राह्मणांना जेवू घातले आणि दुसऱ्या जातींना त्या विसरल्या असे मात्र कोणी समजू नये. अतीत, अभ्यागत, अनाथ, पंगू, गोसावी, बैरागी, साधू, संत, कुळंबी, माळी, महार, पोर या सर्वांच्या पंक्तीच्या पंक्ती मेणवलीच्या घाटांवर बसवून पंक्तिप्रपंच न करिता कैकवेळा मेजवानीच्या थाटाची मिष्टान्नभोजने त्यांनी आपल्या देखरेखीखाली दिली. अन्नदानाने, वस्त्रदानाने व रोकड देणग्यांनी हजारो अनाथांचे अंतरात्मे त्यांनी तृप्त केले. कन्यागतानिमित्त त्यांनी कृष्णातटाकी फारच मोठा खर्च केला.

वाईकडे असताना मासाहेबांनी धौममहाबळेश्वरचीही यात्रा केली. तेथेही दानधर्म, ब्राह्मणभोजने व ब्राह्मणेतरांना मिष्टान्न भोजने दिली. वाईच्या व वाईच्या आसपासच्या विद्वान ब्राह्मणांना शालजोड्या, पीतांबर, धोतरजोडे व रोकड संभावना देऊन त्यांचा गौरव केला व क्षेत्रस्थ संन्याशांना पुडीला बोलावून छाट्या व कौपिने दिली.

वाई व मेणवली येथील सुखवस्तू, सावकार, इनामदार, गृहस्थ व

सरकारी कामदार यांनाही एक दिवस अगत्यपूर्वक आमंत्रण करून मिष्टान्न भोजनाची मेजवानी दिली.

अलीकडे वाईस मासाहेबांच्या प्रकृतीला स्वास्थ्य वाटेनासे झाले होते. म्हणून बडोद्यास लवकर निघून येण्यासाठी महाराजसाहेबांचे निरोपावर निरोप जाऊ लागले. बडोद्याकडे जाण्याचे ठरल्यावर वाईकर श्रीमंत रास्ते यांनी मासाहेबांना आपल्या मोतीबागेच्या बंगल्यात पान-सुपारीचा समारंभ केला. श्रीमंत नानासाहेब फडणीस मेणवलीकर यांनी आपल्या मेणवलीच्या वाड्यात त्यांना जेवणाची मेजवानी दिली. बडोद्याचे खानगी कारभारी केशव बाबूराव पंडित व पेन्शनर जज्ज जनार्दन सखाराम गाडगीळ वगैरे मंडळी वाईची राहणारी होती. त्यांनीही आपापल्या घरी मासाहेबांना मोठ्या आदराने बोलावून मेजवान्या दिल्या.

♦♦

खंड-२३

# वाई-सार्वजनिक सभेचे मानपत्र

**वा**ईहून निघण्याच्या अगोदर वाई व मेणवली येथील सरकारी व गावठी शाळांतील मुला-मुलींस व पाद्र्यांच्या शाळेतीलही मुलांस मासाहेबांनी मेवामिठाई वाटण्याचा समारंभ केला. त्याने शाळांवरील मास्तर, पंतोजी व मुले यांना मोठा आनंद झाला.

मासाहेबांचे वाईप्रांती आगमन झाल्याने त्यांची ईश्वरनिष्ठा, विप्रभक्ती, दानशूरता, अनाथांवर दया हे गायकवाड कुलातील परंपरागत चालत आलेले गुण तिकडील लोकांच्या निदर्शनास आले. 'गोब्राह्मणप्रतिपालक' या विशेषणाची त्यांनी सार्थकता केली.

मासाहेब वाईकडे होत्या तोपर्यंत ब्राह्मणमंडळी वाईच्या व मेणवलीच्या घाटावर संध्याकाळी संध्येला बसली म्हणजे संध्या झाल्यावर जेठे मारून मासाहेबांच्या अन्नदानाविषयी व दानधर्माविषयी प्रत्यही शिळोप्याच्या गोष्टी बोलत व कोणाला काय मिळाले याचीही चर्चा करीत. वेदपुरुषाच्या कृपेने अलीकडे पोटभर मिष्टान्नभोजन व हातभर दक्षिणा मिळू लागली तेव्हा वैदिक ब्राह्मणांच्या क्रमाच्या व संहितेच्या वरचेवर आवृत्त्या होऊ लागल्या. मासाहेबांच्या दातृत्वाच्या गोष्टी कृष्णाबाईच्या घाटांवर व घरोघर यापुढे काही वर्षे अशाच चालू राहतील व त्यांचे स्मरण वाईच्या आसपास पंचवीस - तीस कोसांत बरेच दिवस राहील.

वाईहून निघताना वाईच्या सार्वजनिक सभेने वाईकरांच्या वतीने मासाहेबांना मित्ती आश्विन शुद्ध १३, गुरुवार, शके १८२० चे एक मानपत्र दिले, त्याचा जरूरीपुरता उतारा याखाली देतो.

'महाराणीसाहेबांची स्वारी येथे येऊन आज पाच महिने झाले व हे सर्व दिवस वाई क्षेत्राला आणि असपासच्या पंचक्रोशीला असीबत आनंदांचे

गेले, हे  कळविण्यास आम्हांस फार संतोष वाटत आहे. ईश्वरभक्ती, सनातन धर्माविषयी पूर्णनिष्ठा, दानशूरता, गोब्राह्मणांविषयी वात्सल्य, विद्वज्जनांविषयी प्रेम इत्यादी जे अलौकिक गुण मातुश्रींच्या अंगी वसत आहेत, त्यांच्या योगाने सर्व लोकांना आनंद झाला आहे. श्रीमती महाराणीसाहेबांनी सुवासिनी पूजा, ब्राह्मणसंतर्पण, ब्राह्मणेतरांनाही यथेष्ट पक्वान्नभोजन, सर्व बालकांना मिष्टान्नदान, विद्वज्जनांची संभावना वगैरे जी दानशूरतादर्शक कृत्ये केली, त्यांच्या योगाने महाराणीसाहेबांच्या कुलाची कीर्ती या क्षेत्रांत चिरकाल राहील यात संशय नाही' इत्यादी, इत्यादी.

वाईच्या दानधर्माचा तपशीलवार खुलासा वाईचे मोदवृत्त ता. २७ ऑक्टोबर १८९८ च्या पत्रात केला आहे. वृत्तकारांनी प्रत्यक्ष पाहिलेले मासाहेबांचे मोदवृत्त त्यात दिले आहे. ठोकळ ठोकळ गोष्टींचा गोषवारा मात्र आम्ही दिला आहे. आम्ही वाईचे राहणारे खरे, तरी त्या समयी दूर बडोद्यास असल्यामुळे त्या प्रत्यक्ष मोदवृत्तापुढे आमच्या ऐकीव माहितीची मातबरी  नाही.

याप्रमाणे वाईकडील तीर्थयात्रा व दानधर्म आटोपून तारीख २७ ऑक्टोबर १८९८ रोजी मासाहेब वाईहून बडोद्याकडे येण्यासाठी निघाल्या. त्या दिवशी रस्त्यात त्यांच्या जिवावरचे एक मोठे अरिष्ट टळले.

वाईहून वाठार स्टेशन सुमारे वीस मैल आहे. दरम्यान, शिरगावचा एक मोठा घाट आहे. तो फोडून तेथे बैलगाड्या, घोड्यांच्या गाड्या व तांगे जाण्यासारखा नागमोडी सडकेचा रस्ता केलेला आहे. तेथील चढण फार बिकट आहे. घाटात मोठमोठे नाले असून, तेथे पूल बांधलेले आहेत व कोठे कोठे सडकेच्या दोन्ही बाजूला, अगर एका बाजूला भयंकर कडे तुटलेले आहेत. सडकेच्या बाजूला लहान लहान दगड उभे केलेले आहेत. त्या ठिकाणी घोडे व बैल बिचकून जाऊन कैक घोडे, बैलगाड्या व माणसे यांना कधी कधी अपघात होतात. याच घाटातून मासाहेबांची घोड्यांची गाडी वाठाराकडे जात असता मध्यंतरी एका टप्प्याचे घोडे एकाएकी बिचकले आणि एका खोल नाल्याकडे मागे सरकत चालले; पण बरोबरच्या माणसांनी प्रसंगावधान राखून मोठ्या शिताफीने घोडे थोपून धरले. यामुळे गाडीचा व मासाहेबांचा बचाव झाला. तारीख २९ ऑक्टोबर १८९८ रोजी प्रात:काली त्या बडोद्यास येऊन दाखल झाल्या.

परत आल्यावर त्यांचा मुक्काम काही दिवस तारकेश्वरीच होता. तेथे त्यांची प्रकृती काही दिवस साधारण बरी होती; परंतु पुढे दिवाळीच्या सुमारास प्रकृतीचे मान फारच बिघडत चालले, तेव्हा मासाहेब आपल्या सन्निध असाव्या म्हणून महाराजसाहेबांनी त्यांना लक्ष्मीविलास राजवाड्यानजीक मोतीबाग बंगल्यात नेले. तेथे महाराजसाहेब वरचेवर त्यांच्या समाचारास जात होते. वैद्यांचे औषधोपचारही चालू होते.

वनस्पतीचे वर्णन लिहिणाराला वनस्पतीचे बीजारोपण, उद्गम, संवर्धन, विकास, पुष्पधारण आणि फलनिष्पत्ती इत्यादी परंपरांचे फार सूक्ष्म अवलोकन करावे लागते आणि एकीपासून दुसरी स्थिती कशी परिणत होते हे क्रमाने दाखवावे लागते. तसेच मानसशास्त्र्यानेही भिन्न भिन्न व्यक्तीची विचारपरंपरा ओळीने लक्षात आणावी लागते. त्याच रीतीने चरित्र लेखकानेही ज्याचे चरित्र हाती घेतले असेल त्याच्या जन्मकालापासून अंतकालापर्यंत ज्या ज्या गोष्टी घडल्या असतील त्या त्या क्रमशः व संगतवार टिपून ठेवाव्या लागतात. मासाहेबांच्या जीवन वृत्तांताचा क्रम येथपर्यंत आम्ही आणून पोहोचविला. आता यापुढची हकीकत याच धोरणाने पुढील खंडात येईल.

♦♦

खंड-२४

# हृदयमार्दव

**मा**साहेबांच्या हृदयमार्दवाच्या गोष्टी पुष्कळांच्या तोंडी अनेक आहेत; पण त्यापैकी काही या ठिकाणी देतो.

**गोष्ट पहिली**

मासाहेबांना सोंगट्या, बुद्धिबळे व दशावतारी गंजिफा चांगल्या खेळता येत होत्या. सुमारे तीन-चार वर्षांपूर्वी कर्नाटक देशचा कृष्णदीक्षित या नावाचा एक अष्टावधानी बोवा बडोद्यास आला होता. त्याला तीस-पस्तीसपर्यंत अवधाने एकदम चालविता येत होती. त्याचे बुद्धिसामर्थ्य व धारणशक्ती विलक्षण होती. त्याच्या अवधानांचा प्रयोग एक दिवस मासाहेबांपुढे तारकेश्वरी झाला. अवधानीबोवांचा प्रयोग सुरू झाल्यावर गंजिफा, बुद्धिबळे व सोंगट्यांचे डावही ते दुरून सांगत होते. गंजिफांची पाने मासाहेबांनी आपल्या हाती घेतली होती. त्यातून अमूक अमूक पाने टाका असे बोवा विचार करून सांगत, मग मासाहेब ती ती पाने टाकीत. शेवटी मासाहेबांनीच डाव जिंकला व सर्व प्रश्नांची उत्तरेही बरोबर पटली; पण प्रश्नांची उत्तरे बसविताना व डाव सांगताना अवधानीबोवांचे चित्त व्यग्र होऊन त्याच्या मुखचर्येवर अनेक विकार व क्लेश होत होते. ते मासाहेबांच्याने पाहवेनात. बोवाला त्रास होत असलेला पाहून त्यांना त्याचा फार कळवळा आला. मग त्या म्हणाल्या, 'बोबाचे क्लेश माझ्याने पाहवत नाहीत. काही उत्तरे अजून राहिली असली तरी आता खेळ बंद करा.' प्रयोगाचे काम सुमारे तीन तास चालले होते. मग एक शालजोडी, रोकड बिदागी व लेखी दाखला देऊन मासाहेबांनी त्याचा सत्कार केला. या हकीकतीवरून त्यांचे हृदय किती कनवाळू होते हे स्पष्ट दिसून येते. ज्याचा आत्मा सदय व बुद्धी तीव्र त्याच्या मनावर भूतदयेचा अंमल लागलीच बसतो. दुःखाची कल्पना मनात

उतरल्याबरोबर आपले व दुसऱ्याचे तादात्म्य होणे यातच परोपकार बुद्धीचे मूळ बीज आहे, हे तात्पर्य या गोष्टीतून निघते.

**गोष्ट दुसरी**

श्रावणमासातील एका सोमवारी प्रदोषकाली श्री तारकेश्वरी हंड्याझुंबरांची आरास केली होती. श्रीपुढे हरिदासाचे कीर्तन चालले होते. एका बाजूला मासाहेब श्रीशंकराची पूजा करीत बसल्या होत्या. देवदर्शनार्थ शहरातील बायका-पुरुषांचे थवे लोटले होते. तो समारंभ आटोपल्यावर काही ठळक ठळक मंडळी मुजरा करून मासाहेबांकडे बोलत बसली, तेव्हा देवदर्शनास आलेल्या लोकांच्या दाटीविषयी येथे गोष्ट निघाली. मासाहेब म्हणाल्या, आजच्या समाजात सुवासिनी बायापेक्षा माझ्यासारख्या रांडावलेल्या बायाच फार दिसल्या. हे शब्द त्यांच्या मुखातून मोठ्या कळवळ्याने बाहेर पडले. त्यांच्या भाषणात स्पष्टोक्तीचा गुण मोठा होता. स्वत:च्या अनुभवाने गतभर्तृका स्त्रियांची स्थिती किती दयाजनक असते हे त्यांनी थोडक्यात व्यक्त करून दाखविले.

**गोष्ट तिसरी**

सन १८९७ साली बडोद्यास प्लेगची भयंकर साथ आली होती. बडोद्याच्या आसपासही प्लेग फार जोराने चालू होता. कोणाचा कोणाला घटकेचा भरवसा वाटेनासा झाला होता. त्यावेळेस बडोद्याच्या एका नामांकित हरिदासाचे दोन होतकरू पुत्र प्लेगने एकाएकी मरण पावले. त्यावेळेस कुटुंबाच्या माणसांना घेऊन बुवांना रानात राहण्याचा प्रसंग आला !

मासाहेब त्यावेळेस बडोद्यापासून चार कोसांवर केळणपूर म्हणून गाव आहे तेथे राहण्यासाठी गेल्या होत्या. तेथे त्यांना बुवांवर आलेला प्रसंग कळला. हे वर्तमान ऐकून त्यांना फारच दु:ख झाले. त्यांचे आपल्याकडून होईल तितके शांतवन करावे म्हणून त्यांनी आपल्या पदरचा एक भला व पोक्त गृहस्थ बुवांस बोलावून आणण्याकरिता पाठविला. त्याने जाऊन मासाहेबांचा निरोप कळविला; पण बुवा पुत्रशोकाने फारच कष्टी असल्यामुळे ते मासाहेबांचे भेटीस जाण्यास कबूल होईनात. शेवटी एक थोर पदवीचा गृहस्थ मध्ये पडून बुवांची आगगाडीमार्गे केळणपुरास रवानगी केली. त्यांची व मासाहेबांची समक्ष भेट होण्याबरोबर दु:खाच्या अतिरेकाने बुवांचा कंठ दाटून आला. त्यांच्या डोळ्यांतून झरकन पाणी आले व तोंडातून अक्षर

निघेना. मासाहेबांचेही डोळे अश्रूंनी डबडबले. दोघांच्याही तोंडाला कुलूप ठोकल्यासारखे झाले. जिव्हा बोलण्यासाठी पुढे सरसावते तो डोळे एकमेकांशी दृष्टादृष्टीने बोलू लागले. मासाहेबांची प्रिय कन्या ताराबाबा नुकतीच सावंतवाडीस वारली होती. ते दु:ख त्यांच्या हृदयाला अद्यापि पोळत होते, तरी शेवटी मासाहेबांनीच पुढाकार घेऊन बोलण्याला आरंभ केला, तो असा - 'बोवा, यावेळेस मी तुमचे व तुम्ही माझे शांतवन करावे असे असता तुम्ही खिन्नवदन होऊन बसला तर माझे शांतवन कोण करील? सुख-दु:खाचा दुसरा कोणी वाटेकरी असला तर सुख दुणावते व दु:ख उणे होते असे म्हणतात. त्याची आता प्रचीती पाहावयाची आहे. आपण उभयता या वेळेस समदु:खी आहो. किंबहुना मी अधिक दु:खी आहे, तरी दोघांच्या दु:खाला वाटेकरी आहेत अशी मनाला शांती ठेविली पाहिजे.' असे त्यांनी समाधान केले, तरी बुवांनी मान खाली घातली होती ती ते वर करीनात. धोतराच्या पदरात मस्तक घेऊन ते हुंदके देत होते. त्यांच्या दु:खाला व शोकाला वाचा फुटेना तेव्हा मासाहेब पुन्हा म्हणाल्या, 'मी बायको मनुष्य असून, माझ्या दु:खाचे गाठोडे मी आपल्याजवळ घट्ट बांधून ठेविले आणि तुम्ही विद्वान, वेदांती व पोक्त वयाचे हरिदास असून, सामान्य जनाप्रमाणे दु:ख करता याला काय म्हणावे?' अशा दोन विवेकाच्या व समजुतीच्या गोष्टी सांगून बुवांची चित्तवृत्ती त्यांनी ताळ्यावर आणिली. मग त्यांजकडून फलाहार करवून बरोबर एक मनुष्य देऊन त्यांची त्यांनी बडोद्यास रवानगी केली. कितीतरी थोरपणा हा! आश्रित जनाची केवढी कळकळ! यालाच म्हणावे प्रसंगावधान आणि हिचेच नाव भूतदया!

असे त्यांच्या हृदयमार्दवाचे चुटके पुष्कळ आहेत; पण ते सर्व देत गेलो तर पुस्तकाचा बराच भाग त्यांनीच भरून जाईल. याकरिता एवढ्याच गोष्टी देऊन ते खंड पुरे करितो.

♦♦

खंड-२५

# प्राणोत्क्रमण

**ता**राबाबांच्या मृत्यूचे वर्तमान कळल्यापासून मासाहेबांचे शरीर क्षीण होत चालले. शक्तिपात होत चालला. क्षयाची भावना वाढत चालली. पुण्याचे बाळशास्त्री लागवणकरासारखे धन्वंतरी यांनी त्यांना बरे करण्याचे पुष्कळ उपाय केले. दान, धर्म, अनुष्ठानेही चालू होती. त्यांजकडे पुष्कळ पैसा खर्च झाला तरी काही उपयोग न होता कन्या वियोगानंतर सुमारे दीड वर्षाच्या आतच त्यांचा अंत झाला. त्यावेळेस त्यांच्या वयाला सुमारे ४५ वर्षे होती. खंडेराव महाराजही त्याच उमरीच्या सुमारास कैलासवासी झाले. शके १८२०, विलंबी नामसंवत्सर, कार्तिक वद्य १, मंगळवार (तारीख २९ नोव्हेंबर १८९८) या दिवशी संध्याकाळचे सव्वापाचच्या सुमारास पुत्राच्या अंकी मस्तक ठेवून मासाहेबांनी देह ठेविला. कदाचित त्या वाईसच असत्या तर हा सुयोग घडून आला नसता. खंडेराव महाराज तारीख २८ नोव्हेंबर १८७० रोजी वारले. इंग्रजी महिना तोच; परंतु यांच्या मृत्यूची तारीख मात्र पुढची. त्यांच्या पश्चात मासाहेब अठ्ठावीस वर्षांनी मरण पावल्या.

मासाहेब २९ ऑक्टोबर रोजी वाईची यात्रा करून आल्यावर बडोद्यास बरोबर एक महिनाभरच होत्या. शेवटपर्यंत त्या चांगल्या सावध होत्या. अंतकालचा दानधर्म त्यांनी आपल्या हाताने केला. लक्ष्मीविलास राजवाड्याजवळ मोतीबाग बंगल्यात त्यांचे प्राणोत्क्रमण झाले. कार्तिक महिन्याचा पूर्वार्ध संपताच इंग्रजी नोव्हेंबर महिन्याच्या अखेरीस व मंगळवारचा दिवस मावळण्याच्या सुमारास हा अनाथांचा आधारस्तंभ ढासळला. दिवाण, मुख्य मुख्य कामदार, सरदार, दरकदार, मानकरी वगैरे मंडळी खिन्नमुख झाली होती. राधाबाई साहेब, रेऊबाई साहेब, संतुबाई साहेब, लक्ष्मीबाई

साहेब, गोजराबाई माने, नर्मदाबाई काळे, खाशीबाई हरपळे वगैरे आप्त स्वकीय, खाशा स्त्रिया व यमुनाबाई दुगल, काशीबाई मालेगावकर वगैरे बाळमैत्रिणी सन्निध बसल्या होत्या. त्यांच्या शोकाने मोतीबाग बंगला व्यापून गेला. त्यासमयी त्यांच्या आयुष्याचा पूर्वार्धही पुरा झाला नव्हता. कबिरांनी म्हटले आहे की, :-

**'जब तुम पैदा भये, जग हासे तुम रोये,**
**अब तोभी ऐसा चलो के जग रोये तुम हासे'**

या साधू उक्तीप्रमाणे मासाहेबांनी अंतकाळी परिवार जनाला दुःखात लोटून आपण परलोकी गेल्या.

ही अशुभ वार्ता लागलीच चोहीकडे पसरली. शहरातले लोक हाय हाय करीत मोतीबागेकडे धावत सुटले. तेथे लोकांची अतिशय गर्दी झाली. स्मशान यात्रेची सर्व तयारी झाली. स्नानदानादी उत्तर क्रियेचे आद्यविधी संपल्यावर मासाहेबांचे शव पालखीत ठेविले. स्वतः महाराजसाहेबांनी काही पावले मातुश्रीच्या पालखीला खांदा दिला. पालखीच्या पुढे मोठी खासपागा, छोटी खासपागा, बॉडीगार्ड, फत्तेसिंग पलटण, हुजुरातपागा, उलट्या बंदुका धरलेली तिसरी व चौथी पलटण, खालसा शिबंदी, आरब बेहेड वगैरे सर्व कारखान्यांचे लोक मिसलीने चालले. बँडवाले व देशी वाजंत्री लोक उलटा बाज्या वाजवीत चालले.

महाराजसाहेब पालखीबरोबर पायीपायीच गेले. त्यांच्या मागून सरदार, दरकदार, कामदार वगैरे मंडळी चालली. मोतीबागेपासून केदारेश्वरच्या स्मशानभूमीपर्यंत लहान-मोठे, श्रीमंत-गरीब, बायका-पुरुष, मुले व मुली मासाहेबांच्या शवांचे दर्शन घेण्यासाठी पालखीची वाट पाहत उभी राहिली होती. रात्री नऊ वाजता स्वच्छ चांदण्यातून व मशालीच्या उजेडातून पालखी जात असता राजमार्गात दुतर्फा उभा राहिलेला प्रेक्षकजन दीर्घ सुस्कारे टाकीत होता. पालखी केदारेश्वरी दहा वाजण्याच्या सुमारास पोहोचली. तेथे राळ, कापूर, चंदनादी सुगंधी द्रव्यांनी चिता रचली होती. तिजवर शव ठेविल्यावर महाराजसाहेबांनी चितेला अग्नी दिला. त्यावेळेस एजंटसाहेब व असिस्टंट एजंटसाहेब यांनी आपल्या टोप्या काढून राणी सरकारतर्फे मृतास मान दिला. विश्वामित्रीच्या पुलाजवळ पलटणीच्या लोकांनी बंदुकांच्या तीन-तीन फैरी झाडल्या व तोफखान्याने पंचेचाळीस बारांची सलामी दिली.

नंतर सर्व लोक आपल्या घरी गेले.

बडोद्यातील सर्व कचेऱ्या, शाळा व कारखाने पाच दिवस बंद होते. शहराची दुकाने तीन दिवस बंद होती.

याप्रमाणे माने व गायकवाड या उभय कुलांना भूषविणाऱ्या मासाहेब निघून गेल्या. त्यांचे परोपकारी वर्तन, चातुर्य, औदार्य व राज्यकार्यधुरंधरता हे गुण लोक त्यांच्यामागे स्मरत आहेत.

मेलेल्याचे शरीर स्मशानात भस्म होऊन जाते. द्रव्यवानाचे द्रव्य तेथेच राहते. शूराची कीर्ती या लोकीच वास करिते. बरोबर कोणी काही घेऊन जात नाही. शेवटी लोकांची सगळी आरडाओरड व विलाप मृत झालेल्या शवासाठी त्या शवाचा ज्याच्या त्याच्या परिस्थितीप्रमाणे लागलीच निकाल लागतो. प्राण निघून गेल्यावर शवाची कशीही पाठवणी करा, अंतरात्म्याला त्याचे काहीच नाही. या प्रसंगावर एका कवीने म्हटले आहे ते असे, :-

**'चेतोहरा युवतयः स्वजनोऽनुकूलः,**
**सद्बांधवाः प्रणयनम्रगिरस्तु भृत्याः ।**
**वल्गंति दंतिनिवहास्तरलास्तुरंगाः ,**
**संमीलने नयनयोर्नहि किंचिदस्ति ।।'**

म्हणजे सुंदर स्त्रिया, आप्त इष्ट, बंधुजन, सेवक, हत्ती, घोडे हे सर्व वैभव डोळे उघडे आहेत तोपर्यंतच, डोळे मिटले की काही नाही.

तात्पर्य मागचे लोक चांगला म्हणतील असे वर्तन ठेवणे एवढेच प्रत्येकाचे काम आहे. जो आपल्या शरीराची मात्र काळजी घेतो आणि आपल्या पारलौकिक कल्याणाची हयगय करतो त्याचे नाव मागे न राहता तो पारमार्थिक सौख्याला आंचवतो. परलोकी आत्म्याला आनंदाने राहता येईल अशा रीतीने मृत्यूलोकी तयारी करून ठेवणे, याला साधुसंतांनी 'साधन' हे नाव दिले आहे. मृत्यूलोकाची अस्ती क्षणभंगुर आणि परलोकाचे राहणे निरंतरचे आहे, या करिता त्यांचे साधन येथे असताना करून ठेवणे हेच मनुष्याचे कर्तव्य होय.

♦♦

खंड-२६

# दुखवटा

**थो**र पदवीला चढलेल्या मनुष्याची चित्रे, चरित्रे, मानपत्रे, इमारती इत्यादी वस्तू त्याची स्मारके होत. तसेच मृत्यूनंतर त्याच्या वारसांकडे आलेली पत्रे व वर्तमानपत्रे आणि मासिके यांत छापून प्रसिद्ध झालेले मृत्यूलेख, हीही मृताची स्मारकेच होत. एका कवीने म्हटले आहे की, 'कीर्तिरक्षरसंबद्धा स्थिरा भवति भूतले' म्हणजे अक्षरांनी बद्ध झालेली कीर्ती भूतलावर चिरस्थायी होऊन राहते. मासाहेबांचे देहावसान झाल्याचे वर्तमान कळताच राजेरजवाडे, अमीर उमराव व बडेबडे सरदार यांजकडून महाराजसाहेब यांच्याकडे दुखवट्याची पत्रे व तारा काही दिवस येत होत्या. त्यांत सर्वांनी मासाहेबांच्या मृत्यूबद्दल दु:ख प्रदर्शित करून त्यांचे गुणानुवाद गायले होते. ग्वाल्हेर, कोल्हापूर, सावंतवाडी, देवास, इंदूर इत्यादी संस्थानांतून संस्थानचे मानकरी दुखवटे घेऊन आले होते. दुखवट्याचे सर्व लेख येथे देण्यास जागा नाही. तथापि एक-दोन लेखांचा उतारा देतो. त्यावरून इतर लेखांची कल्पना करता येईल.

बडोदे येथे सुधराई कचेरीच्या भव्य दिवाणखान्यात तारीख ६ डिसेंबर १८९८ रोजी सुधराईच्या सभासदांची एक असाधारण सभा भरली होती. त्यावेळी दु:खप्रदर्शनार्थ महाराजसाहेब यांजकडे एक दुखवट्याचे पत्र पाठविण्याचे सर्वानुमते ठरले. ते पत्र खाली लिहिल्याप्रमाणे :

**।।श्री।।**

**श्रीमंत सरकार सयाजीराव महाराज गायकवाड,**
**सेनाखासखेल समशेर बहादूर,**
**राज्य बडोदे.**

आम्ही बडोदे शहरसुधराईचे अध्यक्ष व सभासद श्रीमंत महाराज सरकारच्या

चरणाजवळ विनंती करण्याची रजा मागतो

श्रीमती मातोश्री महाराणी जमनाबाईसाहेब यांच्या अकाली मृत्यूने श्रीमंत महाराजसाहेबांच्या घराण्यावर दु:खाचा पर्वत कोसळला आहे. अशा प्रसंगी श्रीमंत महाराजांचे समस्त प्रजाजन या दु:खाचे वाटेकरी आहेत, अशी विनंती श्रीमंत महाराजांचे चरणी केल्यास श्रीमंत महाराजांना दु:खभार हलका होईल, अशी आम्हास आशा आहे.

प्रिय मातोश्री महाराणी जमनाबाईसाहेब यांचे नाव या संस्थानच्याच काय; पण सर्व हिंदुस्थानच्या इतिहासात जी राज्यधोरणी माणसे होऊन गेली त्यांच्या यादीत नोंदण्यासारखी कामगिरी त्यांनी आपल्या हयातीत बजाविली आहे आणि तिचेच फळ श्रीमंत महाराजांसारख्या सुज्ञ, सुशिक्षित व प्रेमळ राज्यकर्त्यांच्या अमलाखाली शांततेच्या व सुधारणेच्या रूपाने आम्ही अनुभवीत आहोत.

श्रीमंत मातोश्री महाराणी जमनाबाईसाहेब आपल्या अनेक सद्‌गुणांमुळे सर्व प्रजाजनास प्रत्यक्ष जननीपेक्षाही अधिक प्रिय झालेल्या होत्या व त्यांच्या अकाली मृत्यूची वार्ता समजल्यापासून समस्त प्रजाजन दु:खमग्न झाले आहेत आणि सर्व जातींचे व सर्व धर्मांचे लहान-थोर, श्रीमंत-गरीब, सर्व लोक राजघराण्यावर आलेल्या या प्रसंगाबद्दल हळहळत आहेत. श्रीमंत महाराज सरकारांवर आलेल्या या दु:खाचे वाटेकरी सर्व प्रजाजन होत आहेत, हे ऐकून श्रीमंत महाराजसाहेबांचे दु:ख हलके होईल, अशी आम्हास उमेद आहे.

शहर सुधराई कचेरी, अध्यक्ष व सभासद यांच्या सह्या
बडोदे, ता. ६-१२-९८

लंडन येथील 'इंडियन मॅगेझाइन व रेव्यू' नामक मासिक पुस्तकाचा फेब्रुवारी १८९९ चा अंक ३३८ यात दरभंग्याचे महाराज, प्रसिद्ध टिप्पू सुलतानाच्या वंशापैकी महंमद बैरामशाह, शीख सरदार गुरूमुखसिंग इत्यादी गृहस्थांबद्दल मृत्यूलेख आले आहेत. त्यातच महाराणी जमनाबाईसाहेब यांच्याबद्दल इंडियन स्पेक्टेटरातून उतारा घेतला आहे. त्यातील सारांश खाली लिहिल्याप्रमाणे आहे :-

'महाराणी जमनाबाईसाहेब या प्रस्तुत काळी एका हिंदू राज्याच्या

प्रख्यात राणीसाहेब असून, त्या परलोकवासी झाल्या. त्या जात्या बुद्धिमान होत्या. यामुळे बडोद्याच्या राज्यकारभारात त्यांच्या हाती जी साधने होती त्यांच्या साह्याने राजकीय व सामाजिक गोष्टींत त्यांनी आपले नाव करवेल तितके चिरस्थानी करून ठेविले आहे. त्यांनी राज्यकारभारातून आपले अंग काढून घेतल्यावरही पुष्कळ दिवसपर्यंत कित्येक खात्यांत त्यांची वजनदारी कायम राहिली होती. त्यांच्याविषयी लोकांची स्वाभिमानवृत्ती पुष्कळ दिवस होती. लोकांची अशी वृत्ती हिंदुस्थानात कोणत्याही राजघराण्यातील स्त्रीविषयी फारशी आढळण्यात येत नाही. त्या राणीपद पावल्यावर त्यांच्या तारुण्यदशेत त्यांच्यावर कैक संकटे कोसळली होती. त्यामुळे त्यांच्याविषयी प्रजाजनात जे प्रेम व जी पूज्यबुद्धी उत्पन्न झाली होती ती अलीकडे जरी मागे पडली होती, तरी त्या खंडेराव महाराजांच्या प्रिय राणीसाहेब या नात्याने लोकांच्या मनात जो भक्तिभाव वसत होता तो त्यांच्या अंतकालपर्यंत कायम होता.'

असो, मनुष्य गतप्राण झाल्यावर त्याच्या शरीराचा मागच्या लोकांना काही उपयोग होत नाही. त्याने जिवंत असतानाच स्वसामर्थ्यानुरूप काही सत्कृत्ये, पुण्यकर्मे व भूतदयेची कामे केली असली तर मात्र त्याची कीर्ती मागे राहते. मनुष्येतर पशुपक्षी जिवंत असताना त्यांजकडून परोपकार घडतात व मेल्यावरही अस्थी, मांस, चर्मादिकांच्या योगाने ते उपयोगी पडतात. काहींची हडके, काहींची शिंगे, काहींचे केस, काहींचे मांस, काहींचे कातडे, काहींची नखे, काहींची विष्ठामूत्र, काहींचे पंख, काहीचे वमन व उच्छिष्ट हे सर्व पदार्थ मनुष्यांना उपयोगी आहेत. हस्तिदंती फण्या, सोंगटी व बुदबळे, गव्याच्या शिंगांची अभिषेकपात्रे, हस्तिदंती देव्हारे, चाकू, सुऱ्या आणि इतर हत्यारे व छत्र्या यांच्या मुठी हे सर्व जिन्नस हडकांचे होतात. देवांच्या मूर्ती व देवांवर घातलेले सोने रुपे व मोती यांचे अलंकार ज्या कुंचल्यांनी साफ करतात ते कुंचले रानडुकराच्या केसांचे असतात. देवांवर व राजेलोकांवर वारावयाच्या चवऱ्या वनगायीच्या शेपटाच्या असतात. गंगावन, कस्तुरी, गोरोचन, कृष्णाजीन, कडासन, व्याघ्रांबर, पायातले जोडे, जीन, सांबरी टोप्या व पिशव्या, वाघनखे, किरमिजी रंग, मेण, रेशीम, मोर्चेळ, गोमय, गोमूत्र, मध, दूध इत्यादी पदार्थ आपणास कोण पुरवितात याचा विचार केला म्हणजे देहाची व आत्म्याची फारकत झाली म्हणजे मनुष्याचा मृतदेह कशाच्याही उपयोगी पडत नाही. त्याने

जिवंत असतानाच काही सत्कृत्ये करून ठेवावी लागतात. रामदासानी म्हटले आहे की :

**'देहे त्यागिता कीर्ती मागे उरावी,**
**मना सज्जना हेची क्रीया धरावी.'**

कबिरांनीही म्हटले आहे की -

**'पशूके होत पन्हया, नरका कच्छु नही होत,**
**जो नर करनी करे, तो नरका नारायण होत'**

तसेच :

**'मूरतसे कीरत वडी, वीन पंख उड जाय,**
**मूरत तो जाती रही, कीरत कभूं न जाय.'**

♦♦

खंड-२७

# गोषवारा

**मा**साहेबांचे देहावसान झाले त्यावेळेस त्या पंचेचाळीस वर्षांच्या होत्या. या पंचेचाळीस वर्षांचा आढावा काढला तर त्यांची पहिली तेरा-चौदा वर्षे माहेरी खेळण्यात व गृहशिक्षणात गेली. पुढे लग्न झाल्यावर खंडेराव महाराजांनी जमनाबाई साहेबांच्या पोटी पुत्र व्हावा म्हणून ब्यागदादच्या हजरत पीरनशा पीराला नवस करून त्याला अर्पण करण्यासाठी एक रत्नखचित चादर तयार करविली होती. तिचा मासाहेबांशी संबंध पोहोचतो म्हणून तिच्यासंबंधाची थोडीशी माहिती येथे देणे अवश्यक आहे.

ही चादर करण्याचे काम संवत १९२२ पासून चालले होते. चादरीचे मेघडंबरीचेसुद्धा भाग ७, चार बाजूंचे सोन्याचे कळस ४ व सोन्याच्या समया २ इतका चादरीचा सरंजाम होता. हिरा, पाचू, माणीक, नीळ, पुष्कराज, मोती यांनी ती गुंफलेली असल्यामुळे तेज:पुंज दिसते. हिजवर काढलेली वेलबुट्टी, सोन्याची चकाकी, मोत्यांचे पाणी व रत्नांची प्रभा नेत्राला फारच आनंद देणारी आहे. ती उघड्या मैदानात उन्हात पसरून पाहिली तर ही एक सौंदर्याची तेजोमय मूसच ओतलेली आहे, असा भास होतो. हिजवर जडावाचे कलाकुसरीचे काम केले आहे. ही तयार करण्यासाठी लाखो रुपये खर्च झाले आहेत. खर्चाचा नक्की आकडा कळला नाही.

ही चादर पूर्णतेस जाण्याच्या अगोदरच खंडेराव महाराज कैलासवासी झाले. त्या वेळेस मासाहेब गरोदर होत्या. दोन मास झाले होते. त्यांच्या देखत मासाहेबांना कदाचित पुत्र होता तर ही अप्रतिम चादर ब्यागदादच्या पीराकडे रवाना झाली असती; परंतु तसा योग बनून न आल्यामुळे तयार झालेली चादर राजवाड्यातच कायम राहिली, नाही तर आपण या चादरीला मुकलो असतो. हिचे सगळे भाग मिळून लांबी १८ फूट व रुंदी १८ फूट

असून, तिचे क्षेत्रफळ ३२४ फूट होते. ही मुंबईपर्यंत जाऊन आली आहे. बर्डवूड साहेबांनी हिचे यथातथ्य वर्णन लिहून ठेविले आहे. भडोच व अहमदाबाद येथे देशी कारागिराची प्रदर्शने झाली. त्यात ती मांडून ठेवण्यासाठी पाठविण्यात आली होती. हीत इकडच्या देशी कारागिरांनी कलाकुसरीचे काम इतके उत्तम केले होते की, ते पाहून युरोपियन शिल्पकलाभिज्ञ लोकांनी तोंडात बोटे घातली. त्यावरून हिंदुस्तानात प्राचीन काळी कलाकौशल्याचे ज्ञान शिखरास पोहोचले होते, अशी त्यांची खात्री झाली. त्याबद्दलची अद्यापि या देशात शेकडो प्रमाणे मिळतात.

ही चादर हल्ली नजरबागवाड्यात जवाहीरखान्यात ठेविली आहे. हिचे काही भाग, सोन्याचे कळस व मेघडंबरी कायम आहेत. ती तेथे पाहावयास मिळतात. सोन्याच्या समया राहिल्या नाहीत. खंडेराव महाराजांनी दोन चांदीच्या तोफा ओतविल्या होत्या. पुढे मल्हारराव महाराजांनी आपल्या कारकीर्दीत समया आटवून त्यात सोन्याची जास्त भर घालून दोन सोन्याच्या तोफा ओतविल्या, त्या अद्यापि कायम आहेत. चांदी-सोन्याच्या चार तोफा बॉडीगार्डच्या पहाऱ्यात ठेविल्या आहेत. त्या दसरा वगैरेच्या मोठ्या स्वाऱ्यांपुढे शोभेकरिता चालवितात.

असो, खंडेराव महाराज कैलासवासी झाल्यावर मासाहेबांचे स्थित्यंतर होऊन सुमारे चार वर्षे त्यांनी पुण्यास राहून काढली. तेथे त्यांना कोणत्याही प्रकारची सत्ता नव्हती. बडोद्यास राहून जी सत्ता व जे स्वातंत्र्य असावयाचे ते त्यांना तेथे नव्हते. ताराबाबाकडे पाहूनच त्यांना तिकडचे दिवस कंठावे लागले.

नंतर अनुकूल दशा प्राप्त होताच त्या बडोद्यास परत आल्या. मुलगा मांडीवर दत्तक घेऊन त्या राजसत्तेचा उपभोग घेऊ लागल्या. पतिवियोगाचे असह्य दुःख झाले होते, तरी दानधर्म, पोथीपुराण, पूजाअर्चा, ईश्वरभजन, राज्यकारभाराची सल्लामसलत यात त्यांची सात वर्षे निघून गेली. या अवधीत सयाजीराव महाराज व ताराबाबा यांचे लग्न समारंभ झाले. इंग्रज सरकारकडून 'क्रौन ऑफ इंडिया' हा बहुमानाचा चांद मिळाला. काशीयात्रा झाली, बडोद्यास श्रीतारकेश्वर देवाची स्थापना झाली इत्यादी ठळक गोष्टी घडल्या.

नंतर सयाजीराव महाराज यांस राज्याधिकार मिळाल्यावर मासाहेबांची

सुमारे १४ वर्षे ईश्वर चिंतन, भजन व तीर्थयात्रा यात गेली. पुढे त्यांच्यावर कन्या वियोगाचा घाला पडला. ताराबाबांना ऐन तारुण्यात एकाएकी काळाने ओढून नेले. या असह्य दु:खाने मासाहेबांचे शरीर क्षीण होत चालले. पुढे दीड-दोन वर्षांतच त्यांचा अंत झाला.

मासाहेब कैलासवासी झाल्यावर सयाजीराव महाराजांकडून राज्यातील गोरगरिबास कपडे वाटण्यात आले. दानधर्म बराच झाला. मासाहेबांच्या काही बालमैत्रिणी होत्या त्यांची नावे मानकरी मंडळात दाखल करून त्यांना नेमणुका बांधून दिल्या. मासाहेबांच्या ज्येष्ठ भगिनी खाशीबाईसाहेब हरपळे यांना काही नेमणुक बांधून दिली. मासाहेबांच्या श्रीतारकेश्वरच्या देवस्थानाकडे पूजा, नैवेद्य, उत्सव वगैरेबद्दल सालाची कायमची नेमणूक बांधून दिली. त्यांच्या स्मरणार्थ एक मोठी रक्कम निराळी ठेवून तिच्या व्याजातून नवीन ग्रंथांना उत्तेजन देण्याचे ठरले आहे, असे समजते.

शिवाजी महाराजांची मातुश्री जिजाबाई, तुकोजी होळकरांची मातुश्री अहिल्याबाई, थोरले माधवराव यांची मातुश्री गोपिकाबाई इत्यादी इतिहासप्रसिद्ध माता होऊन गेल्या. तशाच योग्यतेच्या मातुश्री जमनाबाईसाहेब होत्या. त्यांच्या नजरेखाली महाराजांना सर्व प्रकारचे सुशिक्षण मिळाले आहे, ते मासाहेबांच्या पश्चातही गायकवाडी प्रजेला सुखकर होईल. महाराजसाहेबांना सन १८८२ सालापासून राज्याचा पूर्ण अधिकार मिळाला आहे. त्यांच्या शिरी आजपर्यंत मासाहेबांचे छत्र होते ते नाहीसे झाले आहे. तथापि त्यांना मिळालेला शिक्षणाचा टेका आहे तो अडचण पडू देणार नाही.

**'राजमाताविरह'** या सदराखाली सयाजी विजयाच्या जादापत्रकात 'दत्त' या सहीने त्या वेळेस एक कविता प्रसिद्ध झाली. तीत मासाहेबांचे वृत्त गोषवाऱ्याने दिले आहे. ते असे -

*'थेर मानेकुलिं जन्म जिचा झाला,*
*रुप लावण्ये लाजवी लतेला,*
*वर्ष तेरावे लागतांच तिला,*
*पट्टराज्ञीअभिषेक पहा झाला ।।*
*प्रेम अनुपम पतिपदीं असे जिचे,*
*तिथे दिसले सुख तिला सुरपुरीचे,*
*अशा आनंदे सुखद पाच वर्षे,*

*पाच घटिकेसम घालविली हर्षे ॥*
*जया प्राणाधिक गणित असे राणी,*
*जया देवासम पूज्य सदा मानी,*
*तोच राजा हरपला अकस्मात,*
*अहा! झाला काळोख त्रिभुवनात ॥*
*प्रजापालनकर्तव्यदक्ष माय,*
*शोक हालाहल बळें गिळुनि जाय,*
*मंत्रिमंडलबळ घेऊन स्वहाती,*
*राज्यसूत्रे चाळीत स्वये होती ॥*
*दूरदेशी ती राजनीति जाणे,*
*राज्यतृष्णा स्वप्नीही कधी नेणे,*
*तिच्या योगे आम्हांस हा सुकाळ,*
*सुगुणमंडित हा लाभला नृपाळ ॥*
*प्रबल दुःखाची परंपरा झाली,*
*मृदुल तनुला क्षीणता फार आली,*
*अमृत वाटुनि शशिकला द्वितीयेची,*
*तशी दिसली कृश तनू त्या सतीची ॥*
*अशुभ वार्ता ऐकिली अस्तमानी,*
*दुःखशोकाकुल पौर हळहळोनी,*
*राजसदनाभोवती जमा झाले,*
*शोकसिंधूला पूर जणू आले ॥*
*राजमाता कुणी कुणी आठवीती,*
*कुणी दैवाला दोष लाविताती,*
*कुणी म्हणती रे काय यमा केले!*
*तिला ठेवुनि त्वां आम्हां का न नेले! ॥*
*दानधर्मे संतुष्ट दीन केले,*
*पुण्यकर्मे दिन जिने घालवीले,*
*तिच्या आत्म्याला तुझ्याजवळ देवा,*
*सदा सौख्यद सहवास तो घडावा ॥*
*पुत्रकन्यामुखमंडला बघून,*

*मनी मानी माय ती समाधान,*
*तोच दुर्दैवे सुताविरह झाला,*
*दिव्य तारा नयनीचा तिचा गेला ।।*
*दीन दुबळे लागले रडायाला,*
*अनाथांचा आश्रयस्तंभ गेला,*
*दानधृतमूर्ती करी विलापाला,*
*हाय देवा! हा घात कसा केला ।।*
*अरे देवा! हे काय असे केले,*
*तुझे कारे! कारुण्य लया गेले,*
*कसा दुर्दिन हा आज दाखवीला,*
*काळहस्ते सुखदीप मालवीला ।।*
*सूर्य-आत्मा जाताच सोडुनीया,*
*त्वरित झाली निस्तेज गगनकाया,*
*सृष्टीसुंदरिने मांडिला आकांत,*
*सती जाता जणु सखी स्मशानात ।।*
*विवेकोदक सिंचुनी करी शांत,*
*विरहवन्ही जो पेटला नितांत,*
*महाराजा! मनी धीर बा धरावा,*
*पत्निपुत्रांचा शोक आवरावा ।।'*

असो, कवीने आपल्या कवनात कवीचे लाघव आणिले तरच ती कविता खरी. कवींना कल्पनातुरंगमावर आरोहण करून पाहिजे तिकडे व पाहिजे तसे फेरफटके करण्याची मुभा आहे. तसे चरित्रकाराला करता येत नाही. चरित्रकाराचा स्वत:चा अनुभव, त्याला मिळालेली माहिती, दप्तरचे दाखले व प्रत्यक्ष प्रमाण हे त्यांचे साहित्य. या साहित्यप्रदेशाच्या पलीकडे त्याला जाता येत नाही. कारण त्यांचे लिहिणे लोकांच्या अनुभवाला मिळते असले पाहिजे. म्हणून त्याला आपले काम फार सांभाळून करावे लागते. ते कसे झाले आहे याचा निर्णय आता वाचकच करतील.

♦♦

खंड-२८

# आमचे दोन शब्द

**या** थोर बाईचे हे लहानसे चरित्र मागच्या खंडातच संपले. आता या खंडात आमचे काय म्हणणे आहे ते कळवून ठेवितो.

पौराणिक काली ज्या महान महान सती होऊन गेल्या त्या सोडून दिल्या तरी अर्वाचीन काली जिजाबाई, अहिल्याबाई, राधाबाई, गोपिकाबाई, लक्ष्मीबाई इत्यादी प्रसिद्ध राजस्त्रिया होऊन गेल्या. त्यामध्ये बऱ्याच अंशी या बाईची गणना करण्यासारखी आहे.

आई-बाप होण्याचे काम एकपक्षी सोपे आहे; पण आपली जबाबदारी पुरी पाडण्याचे कर्तृत्व ज्ञान थोड्या मातापितरांत असते. तसले व्यावहारिक ज्ञान असले तरी सुशील व सुजाण आई-बापांच्या पोटी नेहमी सर्वच मुले सुशील व नामांकित व वाईट आई-बापांच्या पोटी सर्वच मुले द्वाड व दुर्गुणी निपजतात असा नियम नाही. आप्पासाहेब माने व बजूबाई यांना चार अपत्ये झाली. त्यातून एक तान्हीबाई (जमनाबाई) मात्र नावारूपास आली. तिने रहिमतपूरकर मान्यांचे जुने घराणे अधिक मानास्पद केले.

भगवद्‌गीतेत श्रीकृष्णानी सांगितले आहे की, जी जी वस्तू ऐश्वर्ययुक्त, शोभायुक्त किंवा काहीतरी प्रभावाने युक्त असेल ती ती माझ्या तेजाच्या अंशापासून झाली आहे, असे जाण. आणखी दुसऱ्या ठिकाणी सांगितले आहे की, कीर्ति-लक्ष्मी-वाणी-स्मृती-मेधा-धृती आणि क्षमा हे गुण जेथे दृष्टीस पडतात तेथे माझा विशेष अंश आहे असे समज. हे गुण बऱ्याच अंशी जमनाबाईराणीत होते. सबब तिचे चरित्ररूपी चित्र काढून हा विभूतिपूजेचा अल्प यत्न केला आहे.

कधी कधी अंशभूत विभूती जन्मास येतात त्या काल, देश, वर्तमान व परिस्थिती यास अनुसरून असतात. काही अंतस्थ दैवी प्रेरणा होऊन

परमेश्वर कधी कधी काही विभूतीच्या हातून अनेक आकारांनी, प्रकारांनी व साधनांनी मानवजातीचे हित करीत असतो. अशा सर्व विभूतीच्या अंगी एकसारखेच गुण असतात असे नाही. कोणी राज्यकार्यात कुशल, कोणी दानशूर, कोणी युद्धकलानिपुण, कोणी साधू, कोणी लेखक, कोणी ईश्वरोपासक, कोणी कवी, तर कोणी सुभार्या होतात. प्रत्येक विभूतीमध्ये काही ना काही ठळक गुण दृष्टीस पडतात. स्वदेशप्रीती, भूतदया, बंधुप्रीती, राज्यकारभाराचे धोरण, परोपकार इत्यादी बरेच गुण या बाईच्या चरित्रातून घेण्यासारखे आहेत. मनुष्याची कसोटी पाहण्यासाठी कधी कधी त्याच्या मार्गात संकटे आड येतात. त्यातून धैर्याने त्यांचे कसे निवारण करावे हे यात शिकण्यासारखे आहे. अशा विभूती या जगातले तेजाचे झरे होत. या स्वाभाविक वाहणाऱ्या झऱ्यापाशीच मनुष्यपणा वास करीत असतो. त्याचा सहवास फार आनंददायक असतो.

आजपर्यंत ज्या ज्या इतिहासप्रसिद्ध स्त्रिया होऊन गेल्या त्यांना त्यांना जे काही महत्त्व देण्यात आले, अगर येत आहे ते केवळ त्यांच्या अंगच्या गुणाधिक्यामुळेच होय. ज्या मानाने जे सद्‌गुण ज्या व्यक्तीत कमीअधिक मानाने आढळतात, त्या मानाने ती व्यक्ती कमी अधिक मानाने प्रकाशात आलेली असते, अगर येते.

एखाद्याचा उत्कर्ष होण्यास चेहऱ्यावरील तेजस्विता कारणीभूत होते. प्रसिद्ध वीर पुरुष व स्त्रिया यांची चित्रे व तसबिरा काढून पाहा. ती बहुधा तेजःपुंज असावयाची. जमनाबाईराणींच्या चेहेऱ्याकडे पाहताच तिचे वर्चस्व पाहून मन सुप्रसन्न व थक्क होत असे. तिच्याबद्दल आदर व वंद्यभाव उत्पन्न होत असे. आता ती आपल्याला प्रत्यक्ष दिसावयाची नाही. तथापि तिच्या चित्राकडे पाहिले तरी तेच भाव मनात उभे राहतात. तिच्या बाल्यावस्थेतच रहिमतपूरच्या एका साधू पुरुषाने तिच्या मुखचर्येवरून व गोड भाषणावरून भाकीत केले होते की, ही मुलगी पुढे मोठ्या पदवीस चढून कीर्तिमान होईल. ते त्याचे भाकीत अक्षरशः खरे ठरले. मुखचर्या तेजस्वी, डोळे पाणीदार, कांती मनोहर आणि भाषण मधुर ही महत्त्वास चढण्याची प्रसादचिन्हे होत. ही लक्षणे या बाईमध्ये असून, शिवाय चौकसपणा, देशकालवर्तमान ध्यानात आणून तद्‌नुसार आपल्या कृतीचे धोरण बांधण्याचे सामर्थ्य, धैर्य, कर्तबगारी, कंटकपणा, साधी रीत, सरळ आणि प्रसंगास

अनुरूप असे भाषण करण्याची सवय, थोडीशी विद्या आणि बहुश्रुतपणा इतके गुण तिच्या अंगी होते.

स्टील या नावाची एक रशियन बाई होती. तिच्याशी फ्रान्स देशाचा पहिला नेपोलियन बादशहा एकदा बोलत असता तिला म्हणाला, 'काय हो, राजकीय गोष्टीत बायकांना काय समजणार आहे? त्या काय चुलीपुढच्या गोष्टी आहेत? ज्याचे आपल्याला बिलकूल गम्य नाही, अशा विषयांत बायकांनी आपले डोके घालू नये.' ती स्टील बाई मोठी हुशार व चतुर होती. तिने मोठ्या आदबीने किंचित थट्टेने लागलीच उत्तर केले की, 'होय, पण हा जो आपण बायकांचा एकदम शिरच्छेद केला. त्याचे योग्य कारण समजण्यापुरते तरी त्या विषयाचे बायकांना ज्ञान असले पाहिजे, असे मला वाटते.' या मार्मिक उत्तराने बादशहाच्या मनावर चांगलाच ठसा उमटला असेल हे सांगावयास नकोच. काही स्त्रिया प्रसंग पडल्यास राजकीय गोष्टीत कशा तरबेज होतात व कसे बुद्धिवर्चस्व दाखवितात हे या चित्रावरून कळून येईल.

या जगात कोणी श्रीमंत असो वा गरीब असो सर्व सुखसंपन्न असा प्राणी कोणीही व कोठेही आढळावयाचा नाही. श्रीमंती जरी पुष्कळ असली तरी श्रीमंतीपासूनही संपूर्ण सौख्य मिळत नाही. खाण्यापिण्याची व ऐषआरामाची ददात नसली तर तिसरीच काही उणीव असते. बरे गरिबीत सुख असेल असे म्हणावे तर त्या स्थितीतले लोकही जीवावर उदार झालेले व संसारास कंटाळलेले आढळतात. एवंच, श्रीमंत व गरीब या दोन्ही अवस्थांतील लोकांची स्थिती सारखीच भासते. प्राचीन व अर्वाचीन स्त्री-पुरुषांची चरित्रे आपणास हाच बोध करतात की, संपूर्ण सुख असे या जगात मुळीच नाही. आपापल्या वस्तुस्थितीची एकंदर हकीकत ध्यानात आणिली असता प्रथम आपल्याला असे वाटते की, अमूक साधने आपल्या स्वाधीन झाली असता पुढे आपण सुखी होऊ. त्याप्रमाणे ती साधने जरी स्वाधीन झाली तथापि मनात धरल्याप्रमाणे निग्वानेही नव्या वस्तुस्थितीपासून सुख होत नाही. ही गोष्ट मागील अनुभव, सध्याच्या स्थितीचे ज्ञान आणि एकंदर वस्तुस्थितीचे परीक्षण या पुराव्यावरून सिद्ध होते. आता हे मनात आलेले वैराग्यजनक विचार येथे नमूद केले आहेत. म्हणून हा संसार अति कष्टमय आहे व सर्व ऐहिक व्यवहार क्षणिक आहेत. याकरिता सर्वसंगपरित्याग करून सर्वांनी

अवधूत वृत्ती स्वीकारून रात्रंदिवस टाळ कुटीत बसावे व

**'धन्योहं धन्योहं तृप्तेमैकोपमा भवेल्लोके ।**
**धन्योहं धन्योहं धन्यो धन्यः पुनःपुनर्धन्यः ।।'**

**अर्थ :-** 'मी धन्यधन्य मोठा माझ्या तृप्तीस नाहिहो उपमा । कोठवरी वर्णावी आता मी पावलो स्वसुखधामा ।' अशा नित्यतृप्तस्थितीचा प्रापंचिकास उपदेश करण्याचा आमचा उद्देश नाही व तसे करण्यापासून यज्ञावत लौकिक व्यवहार बंद पडतील. जमनाबाईराणीवर पतिवियोग, राज्यधिकारवियोग, कन्यावियोग इत्यादी अवघड अवघड प्रसंग गुजरले. तशा प्रसंगी थोडासा वेळ ईश्वरचिंतनाकडे देऊन बाकीचे आयुष्य उद्योगवृद्धीची व जीवित्वाची सार्थकता करण्याचा बोध व धडा या चरित्रातून सर्वांना घेण्यासारखा आहे. सृष्टीतील एकंदर घडामोड व पदार्थमात्र आपापल्या प्रकाराने आपल्या खऱ्या स्थितीचा बोध करीत असतात. या क्षणभंगुर वीतभर आयुष्यात आपल्या हातून काय होणार आहे, असे निराशेचे विचार मनात येऊ देणे अज्ञानमूलक होय. कारण या बाईच्या हातून जी काही परोपकाराची व देशहिताची कामे झाली ती ध्यानात आणिली म्हणजे तिचे आयुष्य थोडे होते व ती अकाली मरण पावली असे मानण्याचे कारण राहत नाही. आता तिच्या दातृत्वाचा प्रवाह बहुतकरून देवस्थाने, तीर्थयात्रा, वर्षासने व अन्नसंतर्पणे अशा प्रकारच्या प्रदेशांतून वाहत होता हे खरे आहे. तिच्या धर्मादायाचा थोडासाही भाग आधुनिक शिक्षणाच्या किंवा इतर लोकहितकारक कार्याच्या वाट्यास आला नाही, असे असून तिचा उदय झाला हे त्या काळच्या स्थितीविशेषाचेच फळ होय. तिच्या नावलौकिकामुळे तिच्या गुणांचे व कर्तृत्वशक्तीचे तेज विशेष चमकले, हे तिच्या महतीचे कारण आहे.

हे चरित्र वाचून पाहिल्यावर कोणी असा आक्षेप घेतील की, काय हो, यात तुम्ही या बाईच्या बाह्य स्वरूपाकडे मात्र लक्ष दिले आहे, इंग्रजी चित्रकारांच्या प्रघाताप्रमाणे तिच्या अंत:स्थ स्वरूपाचे मार्मिक व यथार्थ वर्णन केले नाही. तुम्ही फक्त तिचे गुण घेतले आहेत, तर तिच्यात व्यंग किंवा दोष मुळीच नव्हता की काय? तिच्या हातून प्रमाद कधीच घडला नाही, असे ध्वनित केलेले भासते, तर काही दोष असले तर ते तुम्हांस सेव्यसेवक भावाच्या विकाराने दिसले नाहीत की काय? दोषराहित्य कोठेही

सापडावयाचे नाही. तेव्हा दुसऱ्या बाजूविषयी जाणूनबुजून तुम्ही मूकभाव धारण केला असे का समजू नये? यात मनुष्यत्वाचा भाग थोडा आढळतो. हे चरित्र फार दिवसांमागे होऊन गेलेल्या एकाद्या स्त्रीचे असते, तर आधार मिळाले नसतील अशी कल्पना करण्यास जागा होती; पण जी बाई नुकतीनुकती गत झाली व जिच्या सहवासाचा आणि भाषणाचा लाभ ज्यांना झाला होता, असे अनेक लोक हयात आहेत. तिचे चरित्रचित्र यथारूप निघाले पाहिजे होते. स्तुतिस्तोत्रावाचून या चरित्राला दुसऱ्या कशाचा विटाळ होऊ द्यावयाचा नाही, असा तुमचा निश्चय होता की काय? तिने जे जे केले ते सर्वोत्तम व स्तुत्य असलेच पाहिजे, असा तुमचा समज आहे की काय? या चरित्रात तिचे चित्र निघाले आहे; पण हुबेहूब तसबीर निघाली नाही व तुमच्या मनाचा समतोलपणाही तीत दिसत नाही. या आक्षेपांवर आमचे असे उत्तर आहे की, या जगात पूर्ण निर्दोष अशी एकही वस्तू नाही व सर्वगुणसंपन्न आणि सर्वदोषविवर्जित अशी एकही व्यक्ती मिळावयाची नाही. गुण व अवगुण यांची सर्वत्र भेसळ असावयाची हे निर्विवाद आहे. त्यातून तारतम्याने जेथे गुणाधिक्य आढळेल तेच मनुष्य वंदनीय व त्याचेच चरित्र अनुकरणीय होय, असा विचार मनात ठेवून लेखकाने आपले काम सांभाळून केले तरच यत्किंचित तरी लोकहित साधले तर साधेल. आम्ही जरी चरित्रनायिकेचे खासगी व दरबारी दोष गुलदस्त्यात ठेविले असले तरी तसे करणे अक्षम्य आहे असे नाही. कोणी कोणाचे खासगी वर्तनातील दोष काढताना फार विचार केला पाहिजे. यदा-कदाचित कोणी हयात असताना त्याचे छिद्रान्वेषण केले तर एकवेळ शोभेल; पण मृत मनुष्याची केलेली निंदा कोणालाही मान्य होणार नाही. आणखी एके ठिकाणी असे म्हटले आहे की, थोर मनुष्याच्या चरित्रात तीन अंगे किंवा स्वरूपे असतात. पहिले बाह्य स्वरूप, दुसरे अंतरंग स्वरूप व तिसरे गूढ स्वरूप. बाह्य स्वरूप तर सर्वप्रसिद्धच असते. ते काही दडून राहिलेले नसते. अंतरंग स्वरूपाची माहिती नजीकचे म्हणजे जिवलग व आप्त मित्र यासच असते. तिसरे गूढ स्वरूप; याचा साक्षी एक परमेश्वर. त्याच्याशिवाय दुसऱ्याला ते यथार्थ ठाऊक नसते. म्हणून गूढ स्वरूपात शिरण्याचा आम्ही यत्न केला नाही असे समजावे.

काही लेखक स्वदेशाभिमानाच्या भरी भरून आपल्या लेखांत एककल्लीपणा

आणतात. आपला देश, माणसे व पूर्वज तेवढे उत्तम असे सिद्ध करण्यासाठी काही तरी निमित्त पुढे आणतात; पण हे ध्यानात ठेविले पाहिजे की, स्वदेशप्रेम स्तुत्य खरे तरी इतर प्रेमाप्रमाणे तेही अंध आहे. त्यालाही मर्यादेतच ठेविले पाहिजे. ज्या अभिमानाने लोकांत असंतोष फैलावतो तसल्या दुराभिमानात काही अर्थ नाही. उलट तसे करण्याने स्वदेशाचा व स्वजनाचा अपमान मात्र होतो. त्याचप्रमाणे काही लोक आपल्या देशात होऊन गेलेल्या प्रसिद्ध माणसांच्या थोरवीवर आपणास विकू पाहतात व त्यांचे यश आपणाकडे ओढून घेण्याचा यत्न करतात. आमच्या मते हेही करणे बरोबर नाही, सबब हे चरित्र लिहिताना तसला दुराभिमानही आम्ही मनात वागविला नाही. जे जे यथार्थ दिसले तेवढेच घेतले आहे, अयथार्थाचे ग्रहण केले नाही.

असो, हे शेवटचे खंड बरेच लांबले, सबब आता येथेच थांबण्याची परवानगी घेतो.

♦♦

# लिक्लेअर
# चरित्र

**इ**सवी सन १८०१ च्या मे महिन्याच्या १४ व्या तारखेस एसी गावी लिक्लेअर जन्मला. आपल्या इकडे ज्या प्रदेशातून माण नदी वाहत जाते त्याला माणदेश म्हणतात. तसेच फ्रान्सच्या मध्यभागी योण नावाची नदी आहे म्हणून त्या प्रदेशाला योणदेश म्हणतात. त्या योण प्रदेशात वर सांगितलेला एसी हा गाव आहे.

लिक्लेअर हा तेथील एका रोहिदासासारख्या गरीब चांभाराचा मुलगा होता. बापाने त्याला गावातील गावठी शाळेत शिकावयास घातले होते; पण गरिबी असल्यामुळे आपल्या मुलालासुद्धा लहानपणीच त्याने कष्ट करावयास लावले. मुलगा दोन आणे चार आणे मिळवून आणील तेवढेच सही अशा समजुतीने बापाने त्याची शाळा सोडविली. त्या वेळेस लिक्लेअर लहान १० वर्षांचा बाळ होता. त्याला अक्षरवाटिकेचे ज्ञानसुद्धा बरोबर झाले नव्हते, तोच त्याची शाळा सुटली. अर्थात त्याला ताव अर्धा ताव सुद्धा कधी शुद्ध लिहिता आले नाही, म्हणून पुढे शेवटपर्यंत त्याचे मन त्याला वारंवार खात असे.

वाटर्लूची लढाई झाल्यावर तीन वर्षांनी म्हणजे इसवी सन १८१८ साली लिक्लेअरने आपल्या जन्मभूमीस सलाम करून पारिस राजधानीचा रस्ता धरला. तेथे जाऊन आपल्या प्रारब्धाची परीक्षा पाहण्याचा त्याने निश्चय केला. हा रोहिदासपुत्र आपल्या सतराव्या वर्षी आपले गाव सोडून निघाला. आपल्या इकडे घाटावरचे किंवा घाटाखालचे घाटी, कामाठी, कुणबी वगैरे लंगोटे लोक कोकणातून मुंबईत हमाली किंवा दुसरा मोलमजुरीचा धंदा करून पोट भरण्यासाठी जातात आणि दोन पैसे मागे पाडून तो पैसा आपल्या मूळ गावी शेतीभातीत घालतात. तसेच फ्रेंच लोक शेतीभाती करून उदरनिर्वाह करणारे आपले आप्त, इष्ट, मित्र यांना सोडून दोन पैसे

कमावण्याकरिता पारिस शहरी जात असत. ते पाहून आपणही त्या धनवान शहरात जाऊन तेथे दोन पैसे गाठी पडतील ते घेऊन आपल्या जन्मभूमीस फिरून एकदम परत जावे आणि एखादा जमिनीचा तुकडा विकत घेऊन पुढे आपले म्हातारपणाचे दिवस आपल्या गावी राहून सुखाने काढावे, असे लिक्लेअरच्या मनाने घेतले.

पारिस राजधानीत गेल्यावर तो इमारती रंगविण्याचे काम करणाऱ्या एका धंदेवाल्याकडे रंगाचा धंदा शिकावयासाठी, अन्नवस्त्राची व काही रोकड पगाराची बोली करून चाकरीस राहिला. सकाळची न्याहारी, दुपारचे व रात्रीचे जेवण, दर आठव्या दिवशी थोडीशी चिरीमिरी म्हणून, शिवाय सालाच्या काठी थोडासा पगार, अशा कराराने यजमानाच्या घरी राहून त्याच्या दोन मुलांबरोबर कामधंदा करावा, असे ठरवून तो त्याच्यापाशी राहिला. पहिल्या वर्षी ४०, दुसऱ्या वर्षी ८० आणि तिसऱ्या वर्षी १२० याप्रमाणे त्याचे साल वाढत गेले. तेथे चाकरीस राहून तीन वर्षे पुरी झाली. वयाला वीस वर्षे झाली व याबरोबर वेतन वाढत गेले आणि वेतनाबरोबर आशाही वाढत चालली. मग एक दिवस तो आपल्या धन्यास म्हणाला, "धनीसाहेब ! माझे एवढ्याशा सालाने भागत नाही. मला रोजी निदान १॥ रुपया तरी मजुरी मिळाली पाहिजे." हे ऐकून धनी जरा चपापला; पण करतो काय? असा मन लावून काम करणारा इमानी व होतकरू चाकर मिळतो कोठून? म्हणून मनात नव्हते, तरी चुंबत त्याला त्याचे साल वाढवावे लागले.

मग चौथ्या सालात ४५० रुपये त्याच्या खिशात पडले. त्या देशात लष्करी कायद्याचा मोठा जुलूम होता. लष्करी खात्यात जाण्याची, राहण्याची मर्जी नसेल त्याला काही पैसा भरावा लागे. तितक्यापुरती त्याने आलेल्या रकमेतून अजमासे २४० रुपयांची पुंजी मागे टाकली.

वयाच्या २२ व्या वर्षी लिक्लेअरने आपले लग्न केले. दोन हातांचे चार हात झाले. इतके दिवस एकच पोट होते, आता एकाची दोन झाली. त्या मानाने त्याला अधिक खटपट करणे भाग पडले. या दाम्पत्याला इतर सर्व प्रापंचिक सौख्ये प्राप्त झाली. मात्र एकाची वाण होती, ती पुरी झाली नाही. संसारामध्ये ज्याला सर्व सुखाचे नाक मानले आहे, आणि ज्याला संस्कृतात दोघांचा 'आनंदग्रंथी' असे नाव दिले आहे, त्या अपत्याच्या सुखाला ती

नवरा-बायको शेवटपर्यंत मुकली ! तरी पण लिक्लेअरच्या पोटातले मायेचे झरे यामुळे आटून गेले, असे झाले नाही. तिकडे त्यांना वाहण्याला मार्ग मिळेना म्हणून ती दिशा सोडून त्या झऱ्यांनी समाजहिताची दिशा धरली. सारांश, संततीच्या अभावी काया, वाचा, मनाने समाजकल्याणाकडे अधिक लक्ष देण्यास तो मोकळा राहिला.

त्याच्या कारागिरीची ख्याती होऊन पुढे त्याला रोज २ ।। रुपये मजुरी मिळू लागली. पुढे लवकरच अडीचाचे तीन, साडेतीन झाले. पुढे २६ व्या वर्षी त्याने आपल्या स्वत:च्या भांडवलावर एक स्वतंत्र रंगाचा कारखाना काढला. त्याच्याजवळ त्या वेळेस ४०० रुपयांहून अधिक भांडवल नव्हते, तरी पुढे दोन वर्षांनी सात इमारती आठ हजार रुपयाला रंगवून देण्याचा त्याने मक्ता घेतला. त्याने असा लहान तोंडाने मोठा घास घेतला म्हणून त्याच्या सोबत्यांनी त्याची पुष्कळ फजिती केली. तरी त्याने आपली हिंमत सोडली नाही. "हिंमत मर्दा मदद खुदा" ही म्हण त्याने आपल्या गळ्याशी ताईतासारखी बांधून ठेवली होती. कारागिराला थोडी मजुरी देऊन वाईट काम करून घेण्यापेक्षा मनमुराद पगार देऊन लोक खुश राहतील असे उत्तम काम करून घेणे चांगले हे धंद्याला बरकत येण्याचे मूलतत्त्व त्याच्या हृदयात बिंबवून गेले होते. त्या वेळेस म्हणजे ५० वर्षांपूर्वी फ्रान्स देशात कारागिराला रोज दीड रुपया मजुरी मिळे. मनासारखे चांगले काम होण्यासाठी तो आपल्या कारागीर मजुराला रोजचे दोन-सव्वादोन रुपये मजुरी देऊ लागला. आणखी लिक्लेअर आपल्या मजुरांबरोबर स्वत: खांदा देऊन खपत असे. यामुळे आपण कोणत्या प्रकारचे काम केले असता आपल्या धन्याला पसंत पडेल हे त्यांना चांगले कळून चुकले होते. पूर्वी कधी कोणास ठाऊक नाही, असे सुसूत्र व सुयंत्रपणाने त्याचे रंग देण्याच्या मक्त्याचे काम चालले. कामावर मजूर उशिरा आल्याची तक्रार नाही, भांडण नाही, कज्जा नाही, आळसाचे नाव नाही, जेवणाखाणात जास्ती वेळ घालवून अळंटळं केल्याचा बोभाट नाही, घंटा वाजल्याशिवाय कामावरून हालू नये म्हणून सक्तीचे नियम काढण्याची गरज लागली नाही, काही एक नाही. जो तो सोपविलेले काम म्हणजे जातीचे काम अशी भावना ठेवून कुचरपणा न करता लक्ष लावून करीत असे. अशा रीतीने पत्करलेले काम कबूल केलेल्या मुदतीत त्याने संपवून टाकले. ते काम

पाहून मक्ता देणारा व इतर लोकही खुश झाले. अखेरीस दिशेबाचे मान पाहता त्याला त्या कंत्राटात २४०० रुपये निव्वळ नफा उरला.

याप्रमाणे लिक्लेअरचा स्वतंत्र धंद्यात बराच जम बसत चालला. दोन पैसे गाठीला पडू लागले. शहरातील इतर कारागीरही त्याच्या आर्जवाने राहू लागले.

असे होता होता इसवी सन १८३४ सालात पारिस शहरातील काही सरकारी इमारती व बँकांचे काम अशी मोठमोठी बांधकामे त्याला मिळाली. थोडक्यात तृप्त राहणारा दुसरा एखादा कच्च्या छातीचा धंदेवाला असता, तर 'मिळाले इतकेच बस्स झाले, आता जास्ती आशा करण्यात मजा नाही' असा संकल्प करून मिळालेल्या नफ्यात आनंद मानून स्वस्थ बसता; पण लिक्लेअरचा खाक्या काही निराळाच होता. आपल्या पायापुरते पाहून स्वस्थ बसणारा तो पुरुष नव्हता. याहून दुसरा अलौकिक चमत्कार असा की, आपल्या भर्त्याने आपल्याच पोळीवर तूप ओढून स्वस्थ बसावे, असे त्याच्या अर्धभागिनी भार्येलाही वाटत नसे. पोटी पुत्र किंवा कन्या संतती नाही, जवळ दोन पैशांची माया, सभोवती स्वहिताचा गराडा पडलेला, अशा प्रकारच्या दाम्पत्याचे थंडीच्या दिवसात, रात्रीच्या वेळेस, शेगडीजवळ हातपाय शेकीत काही विचार चालत. अहाहा! किती त्यांचे ते थोर विचार! मजुरांना थोड्यात थोडी मजुरी देऊन पुष्कळ काम करून घेण्याचे, 'अथवा आपण कुबेर बनून कामधंद्याच्या दगदगीतून मुक्त होऊन आनंदाने आपण कधी राहू,' असले कोते ग्राम्य विचार? छे: त्यांचे नाव कशाला? 'आपल्या आश्रित मोलमजुरांची आपल्याप्रमाणेच सुखकारक स्थिती कशी होईल? त्यांना चांगली नीती व वळण कसे लागेल? व त्यांच्या गाठीला दोन पैसे कसे राहू शकतील?' अशा उपायांची योजना करण्याची वाटाघाट त्या थोर मनाच्या नवरा-बायकोच्या मध्ये रात्रंदिवस चालत असे. लिक्लेअर इतर मजुरांप्रमाणेच आपणही स्वत: एक मजूर होता. त्याच मजूर वर्गातून तो पुढे सरकला होता. प्रपंचात काटकसर कशी करावी, उद्योगाची कास कशी बळकट धरावी, हाती धरलेल्या धंद्याकडे कशी दक्षता ठेवावी, हे स्वत:च्या वागणुकीने त्याने इतर बंधूवर्गाच्या निदर्शनास चांगले आणून दिले. तो जणू त्यांच्या नजरेपुढे एक सर्वोत्कृष्ट नमुनाच ठेवला होता. फावल्या वेळात पुस्तके वाचून आपल्या बाल्यावस्थेतील कोवळ्या अभ्यासात भर घालून

त्याने आपले ज्ञानभांडारही बरेच वाढविले !

एवढ्यानेच त्याची तृप्ती झाली नाही. दहांचा पोशिंदा एवढेच म्हणवून घेण्यात त्याचे समाधान झाले नाही. हा नमुना इतर मानवी नमुन्याहून काही निराळ्याच तऱ्हेचा होता. मजुरांचा धनी होऊन राहणे व धनी म्हणवून घेणे, हाच काय तो त्यांना नीतिशिक्षण देण्याचा धोपट व खरा मार्ग आहे, असे तो समजत नव्हता. आश्रित मंडळीला धनीपणा सोपवून धनीपणाचे फायदे त्यांना मिळवून देऊन त्यांना आपली प्रतिमा बनविण्यात, किंबहुना आपल्यामध्ये मिसळून जाण्यासाठी त्यांना हात देण्यातच तो भूषण मानीत असे. याप्रमाणे समाजहिताचे मूलतत्त्व या अलौकिक पुरुषाच्या अष्टांगी भिनून गेले होते. बहुसमाजाचे हित नसून - केवळ व्यक्ती विशेषाच्याच संकुचित हिताची गोष्ट असली म्हणजे तिचा तो मनापासून तिटकारा करी. तो नेहमी म्हणत असे की, 'अपूर्ण स्वरूपाची पूर्णता असावी, असा सृष्टीकर्त्या विधात्याचा हेतू दिसत नाही. आपल्या सभोवती जे दु:खराशी व दुर्गुणसमूह दिसतात, त्यांच्या अस्तित्वाची जबाबदारी आमच्या प्रत्येकाच्या हाती त्याने ठेवली आहे.' म्हणजे व्यक्तिमात्राने ऐहिक दु:खे व दुर्गुण कमी करण्यास म्हटले पाहिजे. समाजहितासाठी समाजाने-प्रत्येकाने निरनिराळे नव्हे-झटून खपले पाहिजे. या दैविक तत्त्वावर त्याचा पूर्ण भरवसा होता. आपल्या समाजाच्याच हातात हात घालून समाजात मिळून मिसळून समाजाबरोबर तो काम करणारा होता. अशा एकवटून काम करण्यानेच बंधूप्रीतीची मोड हृदयभूमिकेत उगवतो. हे धर्माचे खरे तत्त्व त्याला चांगले कळले होते आणि हेच खरे तत्त्व दररोज हरघडीला त्याला यश:प्राप्ती करून देत होते. त्याच्या आश्रित मंडळीत इतर धंदेवाल्यांपेक्षा त्याचा नैसर्गिक हुरूप अधिकाधिक संचार करू लागला. त्याचेही कारण खऱ्या तत्त्वाची ओळख हेच होय. समाजहिताची पताका हाती घेऊन दंभ माजविण्याचे त्याला कधी आवडले नाही. आपल्या हाताखालच्या लोकांना आपल्या फायद्याचे भागीदार होऊ देण्यात किंवा आपल्यात मिसळू देण्यात आपल्या धंद्याला बरकत येणार नाही, अशी त्याची कोणतीही समजूत नव्हती. तो म्हणत असे की, "उद्योगधंद्यात चढाओढ होण्यासाठी माझ्या अल्प समजुतीप्रमाणे मी ही एक युक्ती योजिली आहे आणि याच युक्तीने मानवी आकृतीच्या यंत्रातून (पारिसच्या कारागिरांकडून) सर्वोत्तम काम निपजू लागेल, असा माझा भरवसा आहे."

लिक्लेअरच्या समाजहितासाठी विशेषकरून झटण्याचा दुसरा हेतू असा होता की, आपल्या मजुरांना वृद्धापकाळी त्यांचे हात-पाय थकले म्हणजे अन्नवस्त्राची ददात पडू नये आणि कारखान्यावरचे कारभारी नवे-जुने झाले तरी मजूर लोक उघडे पडू नयेत. ही समाजहिताची कळकळ मूळ त्याच्या डोक्यात कोणी एक फ्रेजियर या नावाच्या पुरुषाने भरली; पण ती कल्पना अखेर शेवटाला कशी न्यावी, याविषयीचा खर्डा नक्की करण्यास त्याला इसवी सन १८३५ ते १८४२ पर्यंत सात वर्षे लागली. तो म्हणाला, ''या खर्ड्याची मी अशा रीतीने रचना केली आहे. मुळारंभी मी आपल्या मनाला असे पुसले की, जर या कारखान्यात कोणी अधिक लक्ष लावून काम केले, तर तितक्याच वेळात म्हणजे एकाच दिवसात एक तासाच्या किमतीइतके चार आण्यांचे जास्त काम तो करू शकेल की नाही? शिवाय त्याला सोपविलेल्या हत्यारांची विशेष काळजीने तो जोपासना करील, तर त्यापासून रोज आणा-दोन आण्यांची बचत राहील की नाही? या प्रश्नाला होय, नफा होईल, बचत राहील असाच जबाब मिळाला. मग दररोज पाच-सहा आण्यांप्रमाणे एक सतत वर्षभर तीनशे दिवस एखाद्या धंद्यात नफा होऊ लागला, तर वर्षाच्या काठी दर मजुराकडून आजमासे शंभर रुपये किंवा कारखान्यातील तीनशे मजुरांकडून सालाच्या काठी तीस हजार रुपये निव्वळ नफा उरेलच. एवढा मोठा नफा विशेष आयास न करिता घरी बसल्या होऊन सगळ्यांना या नफ्याचे वाटेदार करावयाचे! हा ठोकळ हिशेब अगदी बरोबर आहे. यात चूकभूल नाही,'' अशी लिक्लेअरची खात्री होऊन इसवी सन १८३८ सालात एका जुटाने काम करणारी एक लहानशी सभा (मंडळी) त्याने स्थापिली. प्रथम तिला एक छोटेसे नाव दिले. मग ती वाढीस लागल्यावर ते चिमुकले नाव बदलून तिला (Mutual Aid Society) अन्योन्यसाहाय्यकारिणी असे नाव दिले. मजुरांच्या हिताचा तिने नेहमी विचार करावा, एवढाच त्या सभेचा मुख्य हेतू होता. या सभेला दरमहा दर मजुराने बारा आणे वर्गणी भरावी. या वर्गणीच्या रकमेतून आजारी पडलेल्या दुखणाईत मनुष्यास तीन महिन्यांपर्यंत दररोज बारा आणे प्रमाणे भत्ता मिळावा, तसेच औषधपाणी त्याला फुकट मिळावे, असे ठरविले. तरी हातपाय थकलेल्यांच्या पेन्शनाच्या बाबतीत अजून त्याचा नक्की विचार झाला नव्हता. सभेच्या कालमर्यादित असे एक कलम होते

की, सभासदांची मर्जी नसेल तर पंधरा वर्षांनी ही मंडळी मोडून टाकून सभेचे भांडवल असेल ते सर्वांनी सारखे वाटून घ्यावे. याच्या पुढच्या साली म्हणजे १८३९ साली त्याने तिसरी एक तजवीज काढली. कारखान्याचे काम अधिक उमेदीने व्हावे म्हणून मजुरांवरच्या मुख्य कामगाराला रोज बारा आणे, त्याच्या खालच्या मुकदमाला रोज तीन आणे आणि नोकरीस राहून ज्याला दोन वर्षे पूर्ण झाली असतील त्याला रोड दीड आणा, याप्रमाणे नेहमीच्या पगारावर रोजीना जास्ती भत्ता देण्याचे ठरवून त्याप्रमाणे देण्यास सुरुवातही केली.

पुढे इसवी सन १८४० च्या जून महिन्यात विचार करण्यासाठी अजमासे ऐंशी निवडक माणसांची सभा आपल्या खासगी घरी भरविण्याची लिक्लेअरने सरकारची लेखी परवानगी घेतली. त्या वेळेस विसाहून अधिक माणसांचा सामाजिक मेळा सरकारच्या मंजुरीशिवाय भरून एकत्र होऊ नये, असा कायदा होता. म्हणून त्याला पोलीस अधिकाऱ्यांची रजाचिठ्ठी काढावी लागली. अशी रजा कोणास फारशी मिळत नसे. ही जून महिन्याची सभा कोणत्याही प्रकारची गडबड न होता निर्विघ्नपणे पार पडली; पण इसवी सन १८४२ मध्ये आपला जमलेला नफा कशा रीतीने वाटून दिला जाईल, हे सर्वांस जाहीर करण्यासाठी जाहीर सभा भरविण्यासाठी पुन: पोलीस खात्याकडे त्याने रजा मागितली. तेव्हा अशा जुटीबंद मंडळ्या एकत्र झाल्यापासून काही अनिष्ट परिणाम निपजतील, अशी शंका घेऊन सभा भरविण्याच्या कामाला सरकारने मनाई केली व रजाचिठ्ठी देण्याचे साफ नाकारले.

मजूर लोक कोणत्याही प्रकारच्या बंधनात नसावे, त्यांना आपली मजुरी व नफा-तोटा बघण्याची पूर्ण मोकळीक असावी, या तत्त्वावर मुळी समाजसभा स्थापन केली असून, या उदार तत्त्वाला सरकारने बाधा आणली आणि आपल्या स्तुत्य उद्योगाकडे सरकारने दुर्लक्ष केले म्हणून या महात्म्याचे धैर्य खचले की काय? छे, छे, नाव कशाला? समाजसभा हे एक मजूर लोकांना आपल्या जाळ्यात पकडण्यासाठी कारखान्याच्या मालकाने एक प्रकारचे खूळ माजविले आहे. म्हणून लोकांना मदत करणाऱ्या असल्या सभा (मंडळ्या) होऊ देऊ नयेत व असे मोठा धंदा करणारे मालकही नसावेत, अशी राजपक्षाच्या लोकांची व वर्तमानपत्रांची कोल्हेकुई चालली

होती. तिजकडे त्याने बिलकूल लक्ष दिले नाही; पण त्याच्याच पक्षाचे काही लोक त्यांच्या स्वत:च्या फायद्याची गोष्ट असून, प्रथम त्याच्याविषयी भलताच संशय घेऊ लागले. म्हणून त्याला अतिशय वाईट वाटले. तरी ज्यांचा त्याच्यावर भरवसा होता आणि ज्यांनी त्याची कड घेतली होती त्यांचा टेका व आपण केवळ शुद्धबुद्धीने हे लोककल्याणाचे काम हाती घेतले आहे, अशी मनाची पूर्ण निष्ठा, या दोन गोष्टींची खात्री असल्यामुळे मध्ये कितीही विघ्ने आड आली, तरी त्याने हाती धरलेले काम दृढ निश्चयाने चालविले. मग आपला खरेपणा सिद्ध करण्यासाठी नफ्याच्या रकमेतून प्रत्येकाला भाग मिळेल, अशा आशयाचा एक खर्डा तयार केला होता. त्याप्रमाणे रोकड पैसा हाती पडला. म्हणजे लोकांचा आपल्यावर भरवसा बसेल, असे वाटून तो नफ्याची अजमासी रक्कम पाहू लागला; पण त्या सालचा हिशेब निघाला नव्हता, म्हणून गेले साल म्हणजे १८४१, त्या सालचा निव्वळ नफ्याचा आकडा काढून मंडळींपैकी चार संभावित व वाक्‌बगार लोक आपल्या घरी बोलावून त्याने रुपयांनी भरलेली थैली मेजावर आणून ठेवली. हिशेबाला निव्वळ ४७५० रुपयांच्या नफ्याचा आकडा दाखविला होता. त्या रकमेवर ४४ असामींचा हक्क पोहोचत होता. म्हणजे प्राप्तीच्या मानाने दर माणशी सरासरी १०० रुपयांहून थोडी अधिक रक्कम वाटणीस आली. ती तेव्हाच्या तेव्हा देऊन टाकण्यासाठी थैलीचे तोंड सोडून तो रुपये मोजू लागला. तेव्हा सर्वांवर त्याने जादू टाकल्याप्रमाणे झाले. त्याच्या अंत:करणशुद्धीविषयी कोणालाही संशय राहिला नाही. इसवी सन १८४३ त ४४ असामींना ४९०० रुपये आणि पुढच्या साली ८२ असामींना ७८८० रुपये नफ्याबद्दल रोकड मिळाले. याप्रमाणे सालोसाल नफ्याचा आकडा वाढत गेला आणि पुढेही तसाच जोराने वाढत चालला.

नफ्याच्या दृष्टीने व काटकसरीच्या बाजूने सन १८४२ ते १८५० पर्यंतची ९ वर्षे कारखान्याची उमेद खचण्यासारखे काही विशेष घडले नाही; पण एका गोष्टीने मात्र त्याला मोठा त्रास झाला. रंगाचा धंदा करणाऱ्या मजुरांमध्ये एका प्रकारचा आजार फैलावून त्याने कारखान्यातील बरेच लोक मरू लागले, हे पाहून त्याला फार दु:ख झाले. मग त्याने आजारी माणसांची व बेनीफिट क्लबाची नोंद बुके तपासून पाहिली. त्यावरून शेकडा तीस माणसे शिशाच्या रंगात काम करीत असल्याने

आजारी पडल्याचे दिसून आले. शिशाच्या ऐवजी दुसरा एखादा धातू योजून हा आजार कारखान्यातून समूळ नाहिसा करण्याचा त्याने प्रयत्न चालविला. एका प्रख्यात रसायनशास्त्रवेत्त्या डॉक्टराशी स्नेह जोडून त्याच्या साह्याने त्याने शास्त्रोक्त प्रयोग करून पाहिले. त्यावरून शेवटी असे ठरले की, शिशाच्या ऐवजी ऑक्साइड किंवा जस्ताचे मिश्रणही उपयोगी पडेल. हा नवीन शोध लागताच त्याने जस्ताच्या काही खाणी भाड्याने घेतल्या. मग पारिस शहरात जस्ताच्या रंगाचा कारखाना सन १८४६ साली त्याने काढला. तेव्हा तेथे २४ तासांत ८०० रतल रंग तयार होऊ लागला. या नवीन शोधाने रंगाच्या धंद्याला अगदी भिन्न प्रकारचे वळण लागले. या धंद्यात पडणाऱ्या मजुरांची निरनिराळी दोन प्रकारची स्वरूपे दिसू लागली. एक जुन्या पद्धतीचे आणि दुसरे नव्या पद्धतीचे. जुन्या पद्धतीला जे चिकटून राहिले ते अंगाने कृश, फिकट रंगाचे व दुखण्याने झुरणीस लागलेले असे दिसत आणि नवीन शोधाच्या पद्धतीने काम करणारे मजूर तजेलदार व शरीर प्रकृतीने सुदृढ असे दिसत. लिक्लेअरने हा नवीनच शोध काढला म्हणून (Encouragement Society) उत्तेजक मंडळीने त्याला उत्तेजनार्थ बहुमानाचे एक सोन्याचे पदक बक्षीस दिले. त्याप्रमाणे सरकारनेही (Cross of the Legion of Honour) हा बिल्ला देऊन त्याचा मोठा मान केला. हा मोठा मान मिळण्यासाठी फ्रेंच लोक नेहमी लाळ घोटीत असतात. तो अनायासे याला प्राप्त झाला. हल्ली पारिस शहरात शेकडा पाऊणशे रंगाच्या कारखान्यांत शिशाच्या ऐवजी जस्ताचा उपयोग करू लागले आहेत.

इसवी सन १८३८ मध्ये मजुरांच्या उत्तेजनासाठी अन्योन्यसाहाय्यकारिणी (Mutual Aid Society) या नावाची सभा काढली होती, ती पंधरा वर्षांच्या अंती म्हणजे सन १८५३ मध्ये पाहिजे तर बंद करावी, असे नियमांत एक कलम घातले होते. त्याप्रमाणे त्या साली ती सभा मोडून टाकली आणि सभेचे भांडवल नफ्याच्या रकमेतसुद्धा बाकी राहिलेल्या २९ सभासदांमध्ये वाटून दिले.

पुढच्याच वर्षी म्हणजे सन १८५४ मध्ये पुन: पंधरा वर्षांच्याच मुदतीची आणखी एक नवीन सभा अगदी निराळ्या नमुन्यावर स्थापिली. या सभेकडे मासिक वर्गणी भरण्याची शर्त ठेवली नाही. लिक्लेअरला रंगाच्या धंद्यात

जो नफा उरे तो लोकहितासाठी वर्षातून एकदा सभेकडे जमा करी. तोच पैसा त्या सभेचे मूळ भांडवल असे ठरले. याप्रमाणे सन १८६० पर्यंत सहा वर्षांत या मंडळीचे १६ हजार रुपयांचे भांडवल जमले. कलमबंदीत पुढे पंधरा वर्षांनी मंडळी मोडून पैशाची वाटणी करून जाजम झाडावे, असे एक कलम घातले होते. ही मोठी चूक झाली असे सन १८६० साली लिक्लेअरच्या ध्यानात आले. कारखान्यातले वृद्ध व पंगू पुरुष आणि विधवा बाया यांना पोटासाठी काही नियमित पेन्शन बांधून देण्याच्या कामी सदरचे कलम बाधक होऊ लागले; पण पेन्शनकडे पैसा खर्च होऊ लागला म्हणजे सभासदांचा तोटा होता. म्हणून ते लिक्लेअरची पेन्शनची गोष्ट काही केल्या कबूल करिनात. सहा वर्षांच्या थोड्या अवधीत मंडळींचे सोळा हजारांचे भांडवल जमले. या हिशेबाने पंधरा वर्षांनी निदान चाळीस हजारांचे भांडवल होईल, अशी अटकळ दिसली. ही रक्कम ऐंशी सभासदांना वाटून दिली, तर दर एकाला ५०० पासून ६०० रुपयांपर्यंत मिळाले असते. एवढी मोठी रक्कम हाताची जाऊ देण्याला खुद्द लिक्लेअरचेही नोकर लोक कबूल करेनात; पण नफ्याची रक्कम सालोसाल मंडळींकडे देण्याचा हक्क लिक्लेअरने आपल्या हाती ठेवला होता. ती रक्कम मी साफ भरीत नाही, असे तो एकाएकी म्हणाला की, सर्व परत झाले. मग सर्वच ग्रंथ आटोपला. तो म्हणाला, ''तुमची व तुमच्या मुला-बाळांची सोय निघावी म्हणून ही माझी खटपट आहे. इतक्या उपर नको म्हणाल तर माझे काही जात नाही; पण पुढे मला हात आखडून धरावा लागेल.'' हे अंजन पोहोचल्याबरोबर त्यांचे डोळे उघडले. मग सर्वांनी पेन्शनची गोष्ट लागलीच कबूल केली. आलेली अडचण पार पडली. यावर तो पुन: म्हणाला, ''तुमचा विचार फिरलेला पाहून मला आनंद झाला. मजवर तुम्ही विश्वास ठेवल्याने मी तुमचा आभारी आहे. तुमची माझी ओळख झाल्यापासून तुमच्याबरोबर बरेच वेळा मला वाद घालावा लागला. तुमचे माझे विचार भिन्न पडले व पडावे हे साहजिक आहे. भिन्न विचार पडण्याचे कारण इतकेच की, तुम्ही आपल्याच पायापुरते पाहता आणि मला एकंदर समाजहिताचाही विचार करावा लागतो. मंडळीच्या एकंदर भांडवलातून पेन्शनसाठी काही रक्कम निराळी काढून ठेवावी हे बरे, की भांडवलाचा अंश गिळंकृत करून स्वस्थ बसणे हे बरे! यातून कोणते स्तुत्य याचा

आपण खऱ्या दिलाने विचार करून सांगा. पेन्शनाची तरतूद केल्याने धनीचाकरांत बेबनाव होत नाही आणि कारखान्याला मजबुती येऊन परस्परात स्नेहभाव वृद्धिंगत होतो. तुम्ही आपापले अभिप्राय दर्शित केले त्यावरून मला वाटते की, तुमच्यातील कित्येकांच्या मनात संशय असावा. तो असा की, माझ्या पाठीमागे हा कारखाना न चालता बंद पडणार, माझ्या जोडीदार चालकांमध्ये फुटाफूट होईल, माझे मित्र एकोप्याने राहणार नाहीत, दर एकजण आपापला भाग घेऊन चालता होईल आणि अखेरीस म्युच्युअल एड सोसायटी (Mutual Aid Society) नाहीशी होईल; पण अशी शंका माझ्या मनात कधी येत नाही. माझी जोडीदार मंडळी सचोटीने वागणारी आहे. एवढी मोठी इमारत उभी करण्याला जिने मला कंबर कसून मदत केली, ती चिरकाल कायम राखण्यासाठी तिला मोठे भूषण वाटणार आहे. गृहस्थ हो! जर आपल्या हातून एखादे महत्कृत्य व्हावे अशी इच्छा असली, तर ती पार पाडण्याचेही उपाय त्याचवेळेस शोधून काढले पाहिजे. ही मंडळी माझ्या पश्चात अशीच निरंतर चालेल अशी जर लोकांची आताच खात्री न झाली तर या धंद्यातून मला आपले अंग काढून घेणे भाग आहे. कारण बुद्धी व शरीराची शाश्वती जर दिसेना, तर धैर्य तरी एकटे कितीसा टिकाव धरील? त्यालाही काही मर्यादा आहेच.''

इसवी सन १८५४ साली पुन: नव्याने (Mutual Aid Society) अन्योन्य साहाय्यकारिणी स्थापन झाली. त्या मंडळींकडे दरसाल लिक्लेअरकडून त्याच्या धंद्याच्या फायद्यातून दरसाल पैशाची मदत मिळत होती आणि ती मदत चालू ठेवणे अगर बंद करणे हे केवळ लिक्लेअरच्या इच्छेवर अवलंबून होते. पंधरा वर्षांची मुदत संपल्यावर मंडळी मोडून टाकण्याचा आपला हेका सभासदांनी सोडून दिल्याचे मागेच कळविले आहे. या कामांत त्याने स्वहितबुद्धी अगदी ठेवली नाही व सभासदांनीही मंडळी मोडून टाकण्याचा आपला हेका सोडून दिला हे उत्तम झाले. असे दर्शविण्यासाठी इसवी सन १८६३ साली लिक्लेअरने मंडळीचे भांडवल चाळीस हजारांपर्यंत वाढविले आणि तिचे नाव आपल्या भागीदारांमध्ये कायदेशीर रीतीने नोंदवून टाकले. म्हणजे त्याने आपापल्या इतर भागीदारांप्रमाणे बरोबरच्या मंडळीलाही भागीदारांचा हक्क दिला. पुढे इतर भागीदारांप्रमाणे या मंडळीच्या भांडवलापैकी शेकडा ५ टक्क्यांप्रमाणे या मंडळीला व्याज मिळू लागले. शिवाय दरसाल

वर्षा अखेरीस हिशेब झाल्यावर जो नफा उरेल त्यापैकी शेकडा २० टक्क्यांइतकी जास्तीची रक्कम मंडळीच्या भांडवलात टाकीन म्हणून त्याने कबूल केले. बाकी राहिलेल्या नफ्याच्या रकमेतून शेकडा ६० टक्क्यांप्रमाणे दरेक मजुरास मिळावयाचे. त्याशिवाय मंडळीचे सभासद या नात्याने एकंदरीत शेकडा २० टक्क्यांप्रमाणे मिळावयाचे ते निराळेच. बाकी ५० टक्के नफा राहिला तो त्याने आपल्याकरिता व दुसरा एखादा नवीन भागीदार येऊन मिळाला तर त्याकरिता ठेवला होता.

इसवी सन १८६४ मध्ये लिक्लेअर आपल्या कारखान्यातील लोकांना म्हणाला, ''सभासद हो! तुम्ही आता या कारखान्यात 'रोज बुडाला आणि मजूर उडाला,' याप्रमाणे रोज मजुरी घेऊन काम करणारे नाही आहात. सुटीची घंटा वाजली की यंत्रे बंद, अशी काम करणारी मृत यंत्रे तुम्ही नाही आहात. तुमच्याच हितासाठी तुम्ही भागीदार या नात्याने काम करणारे झाले आहात. तेव्हा कारखान्याच्या कामात तुम्ही याउपर उदासीन राहता कामा नये. कारखान्यातील यंत्रे, सामान व हत्यारे यांचे संरक्षक, मालक व वापरणारे तुम्हीच आहात. सबब प्रत्येकाने त्याजवर चांगली देखरेख अवश्य ठेवली पाहिजे.''

सृष्टीनियमानुसार लिक्लेअरचे जो जो उतार वय होत चालले तो तो या कारखान्याची अशी भरभराट कायम राहून आपल्यामागे तो कसा चालू राहील, याची त्याला रात्रंदिवस मोठी फिकीर लागली. त्याने यापूर्वी इ. स. १८६३ साली एका मित्राला लिहिले होते की, ''जे मजबरोबर कामधंदा करून म्हातारे झाले आहेत, त्यांनी माझ्या योजना बारीक नजरेने लक्षात आणल्या तर असे दिसून येईल की, ही संस्था मी नाहीसा झाल्यावर माझ्या मागे अशीच सुयंत्र चालावी, म्हणून माझ्या मनात एक सतत घोळत होते.''

इ. स. १८६५ च्या मार्च महिन्यात लिक्लेअरावर दुर्दैवाचा एक मोठा घाला पडला. त्या साली त्याच्या प्रियकर भार्येचा व त्याचा निरंतरचा वियोग झाला. तिच्या सहवासात त्याने एक सतत ४२ वर्षे आनंदात काढली होती. त्याच्या मनात जे जे हेतू होते त्यांना अनुसरून ती पडछायेप्रमाणे चालणारी बाई होती. पारिस शहराच्या मावळत्याला दोन-तीन कोसांवर हरब्ले या नावाचे एक खेडे आहे. तेथे या वृद्ध दाम्पत्याने आपल्या मावळत्या वयात एक लहानसा बंगला संपादन केला होता; पण

अजून ती त्या बंगल्यात राहण्यास फारशी गेली नव्हती. पारिस शहरात ज्या घरात त्याने इतकी वर्षे तिच्या सोबतीत सुखाने काढली, त्या घरात पुढे एकट्याने राहण्याचे त्याच्या मोठे जिवावर आले. म्हटलेच आहे की, ''भोगा: के रमणी विना क्षितितले.'' म्हणून आपल्या नवीन बंगल्यात राहिलेले दिवस काढण्याचा त्याने निश्चय केला. पारिस शहर सोडण्यात दुसरा एक त्याचा हेतू तडीस जाण्यासारखा होता. तो असा की, कारखान्यापासून जरा दूर राहिल्यासारखे होईल आणि दूर राहिल्यापासून आपल्यावाचून तो कसा चालतो हेही समजेल.

मग त्याने कारखान्याचा सर्व कारभार डिफोरनो साहेबाला सोपविला. नंतर काही दिवसांनी त्याला त्याने एकदा लिहिले की, ''मी ज्या ज्या वेळी तुम्हाला पारिस येथे येऊन भेटेन, त्या त्या वेळी मला तुम्ही विचारीत जा की, लिक्लेअरा, तू इकडे कशाला आलास? लिक्लेअरा, तू आता आपल्याच गावी राहून आनंदाने दिवस काढ. फावल्या वेळी इकडे तिकडे बंगल्याभोवती बागेत फिर. बरे वाटल्यास थोडीशी दूरचीही मुशाफरी कर. तू आता येथपर्यंत येण्याची तसदी घेतली नाहीस तरी चालेल. तुझे ६५ वर्षांचे उतारवय झाले आहे हे ध्यानात धर. आता स्वस्थ एकांतस्थळी आराम घेऊन तुझे ईश्वरनाम जपण्याचे दिवस आहेत. दगदग करण्याचे दिवस मागेच गेले. तू नसताना तुझ्याशिवाय हा कारखाना चालविण्याचे काम आम्ही शिकले पाहिजे.'' असो.

मे महिना म्हणजे वसंत कालाचा महिना. त्या वेळेस वसंत ऋतूचा ऐन बहार! वृक्ष नूतन पल्लवाने फुलून गेले होते. अनेक प्रकारची फुलझाडे व फळझाडे फुलून टवटवीत दिसत होती. पुष्परसपानाने भ्रमरसमूह मत्त होऊन झाडांच्या सभोवती गुंजारव करीत होता. त्या वनाला राजभवनाची भव्य शोभा आली होती. रात्रीच्या स्वच्छ चांदण्याने उद्यानश्रीची मुखश्री अतिमनोहर दिसत होती. अशा बहरीच्या मे महिन्यात म्हणजे माधव मासांत **''उदारचरितानांतु वसुधैव कुटुंबकम्''** अशा या विभूतीचा जन्म झाला होता. म्हणूनच जणू आमच्या चरित्रनायकाला शहरात राहण्यापेक्षा खेडेगावी राहणे फार आवडे; पण हरब्ले येथील बंगल्यात राहून ते सुख शेवटी शेवटी भोगण्याचा त्याला योग आला. तिकडे जाऊन त्याने आपली कायमची वस्ती केली, तेव्हा तो गावकरी मंडळीस म्हणे, ''मोठ्या शहरात जाऊन राहू नका बरे. तेथे

माणसांची गिचडी व गलबला फार असतो. आपल्या गावी आनंदात राहून जमिनीची मेहनत, मशागत करून सुधारणा करा. शेतकीची विद्या शास्त्रोक्त रीतीने शिकून तयार व्हा.''

यात्रमाणे लिक्लेअर तेथे आनंदसुखाचा उपभोग घेण्याकरिता राहिला खरा; पण त्याच्या कपाळी ब्रह्मदेवाने विश्रांतिसुख लिहिलेले नव्हते. त्याच साली सप्टेंबरच्या २२ व्या तारखेस सरकारने त्या गावचा (Mayor) हा मुख्य अधिकाऱ्याचा हुद्दा तो नको नको म्हणत असताना त्याच्या गळ्यात बांधला. ते काम त्याने दोन वर्षे आणि आठ महिने फारच झटून केले. त्या कामाची इतकी दगदग होती की, अशी दगदग त्याला तारुण्यातही पडली नसेल. घरी एकदा काम पत्करल्यावर मेहनत घेऊन ते करावयाचे, असा त्याचा देह स्वभावच होता. गावात ज्या ज्या सुधारणांची गरज होती, त्या त्या करण्याचे त्याने लागलीच मनावर घेतले. प्रथमतः तो गावच्या सार्वजनिक सौख्याच्या पाठीस लागला. शेतकीचे मेहनतीचे काम तेथे बायकांच्या हातून घेत असत, ते लोकांना सांगून सांगून त्याने बंद करविले. अग्निशमनाचे बंबाचे यंत्र आणून त्यावर माणसे ठेवली. एक नवीन पुस्तकालय स्थापले, ते अद्यापि चांगल्या स्थितीत आहे. गावातील शाळेची सुधारणा केली. शालागृह पुरत नव्हते, ते वाढवून मोठे केले. शाळेला एक जास्त शिक्षक दिला. हिवाळ्याच्या दिवसात गरीब लोकांस अन्नाची भ्रांती असते म्हणून शाळेतील गरीब विद्यार्थ्यांना धर्मार्थ दुपारचे एक वेळचे जेवण, पायातला जोडा व वस्त्रही मिळण्याकरिता गावकरी लोकांच्या संमतीने एक फंड उभारला. म्हणच आहे की, 'गाव करी ते राव न करी.' गावात एक धर्मोपदेशक होता. तो जरा तुसडा हिरवट व मत्सरी होता, तरी त्याच्या तंत्राने वागून त्याच्याशीही त्याने स्नेह जोडला. लिक्लेअर मनाचा थोर होता, यामुळे त्याचे कोणाशीही वाकडे पडत नसे. धर्मोपदेशक गुणांनी चांगला नव्हता, उथळ मनाचा होता, त्याच्या अंगी भटुरक्या वृत्तीची सारी लक्षणे होती. एकंदरीने फ्रान्स देशातील बहुतेक ग्रामोपाध्यायांची तऱ्हाच अशी असे. चांगली लोकहिताची कामे त्या बिचाऱ्यांच्या हातून होण्याचे दूरच; पण दुसऱ्याने केलेलेही त्यांना खपत नसे. अशा मत्सरी स्वभावाचा तो उपाध्याय होता. लिक्लेअरने त्यांच्याशी इतका स्नेह ठेवला होता, तरी तो जी जी सुधारणेची कामे करी, त्याकडे मत्सरदृष्टीने तो पाहत असे.

गावाला सीन नावाची नदी आहे. नदी किनाऱ्याला गावच्या कडेला उंच टेकाड जमिनीवर प्रार्थनेकरिता एक ख्रिस्त मंदिर बांधलेले आहे. त्याची पुढे लिक्लेअरने गावखात्याकडून दुरुस्ती केली. माणसांनी व अनेक व्यवसायांनी गजबजलेले पारिस शहर सोडून या गावी ज्या आराम बंगल्यात तो राहत असे, तो हवेशीर बंगला ख्रिस्त मंदिरापासून जवळच; पण जरा खोलगट जागेत नदीच्या काठाला बांधलेला होता. बंगल्यासभोवती लहानसा सुंदर बगीचा केला होता. त्या बागेतून नजीकच्या टेकडीवर जाण्याकरिता पायऱ्यांचा चढता नागमोडी रस्ता काढला होता. सहल करीत करीत टेकडी चढून गेले म्हणजे वरच्या सपाटीला बंगल्याच्या हद्दीतच लिक्लेअरने श्रमून भागून आलेल्या गरीब व वृद्ध माणसांच्या विश्रांतीसाठी एक बांक मांडून ठेवला होता. त्यावर बसून चहूकडे नजर फेकली म्हणजे प्रेक्षकाला नदी व तिच्या आसमंतात भागच्या प्रदेशाच्या देखाव्याची उत्तम मेजवानी मिळत असल्यामुळे वर सांगितलेल्या हेवेखोर उपाध्यायाशिवाय बाकी सर्व लहानथोर ग्रामस्थ अद्यापि लिक्लेअरची तारीफ करतात व त्यांचे स्मरण झाले म्हणजे डोळ्यातून अश्रू गाळून त्याच्या नावाचा जयघोष करतात.

त्या गावचा तो मुख्य अधिकारी (मेयर) झाल्यावर गावची सुधारणा करण्याच्या संबंधाने जे बेत योजिले होते, ते बहुतेक शेवटास नेले. एक बेत मात्र त्याच्या मनातल्या मनात राहिला. तो सिद्धीस गेला नाही. गावच्या जमिनीच्या लागवडीलाही माझे समाजतत्त्व लागू करा, असे गावच्या शेतकऱ्यास तो नेहमी कानी कपाळी सांगत होता; पण ती गोष्ट त्यांच्या मनात बिंबली नाही. तीन हजार बिघे जमिनीचे तेवीस हजार तुकडे करून सहाशे पंचवीस असामी शेतीचा धंदा करीत होते. एक-एका शेतकऱ्याचे जमिनीचे लहान-लहान तुकडे-येथे एक तर तेथे एक-असे चोहीकडे पसरले होते. यामुळे पुष्कळ जमिनीची लागवड न होता परतर पडली होती. दुसऱ्याच्या जमिनीला उपद्रव न होता आपापल्या फुटकळ नंबरापुरती शेती करण्याचे प्रत्येकास मोठे मुष्किलीचे झाले होते. ही स्थिती पाहून लिक्लेअराला फार वाईट वाटले. म्हणून सर्वांनी एकजुटीची शेती करण्यासाठी त्याने मेहेनत घेऊन एक मसुदाही तयार केला होता. असो.

आता तिकडे पारिसमध्ये डिफोरनो यांच्याकडे कारखान्याचा कारभार सोपविल्यापासून त्याची दिवसेंदिवस कशी वृद्धी होत गेली, हे सांगण्यासाठी

लिक्लेअरला हरब्लेगावीच शेतकरी मंडळीमध्ये सोडून पाटीच्या कारखान्याकडे वळू.

सन १८६९ च्या जानेवारी महिन्यात कारखान्याचे पहिले स्वरूप अगदी बदलले. त्या कारखान्यात आपल्या नावाशिवाय लिक्लेअरने दुसरा काही संबंध ठेवला नाही. त्या सालापर्यंत त्याने कारखान्याची अनीन आपल्या हाती ठेवली होती; पण पुढे त्याने त्याला अगदी मोकळे सोडून दिले. त्या वेळेस कारखान्यात एक लक्ष साठ हजारांचे भांडवल असून, त्यापैकी लिक्लेअरचे चाळीस हजार, डिफोरनोचे चाळीस हजार आणि मजुरांच्या तर्फे (Mutual Aid Society) अन्योन्यसाहाय्यकारिणीच्या नावे ऐंशी हजार याप्रमाणे रकमा होत्या. नफ्यापैकी शेकडा १० टक्के रिझर्व्ह फंड व मुद्दल भांडवलावर शेकडा ५ टक्के व्याज येणेप्रमाणे देऊन बाकी राहिलेल्या नफ्यापैकी २५ टक्के डिफोरनो याचा पगार व ७५ टक्के मजूर व मजुरावरचे कामदार यांच्या प्रीत्यर्थ असत. या ७५ टक्क्यांपैकी ५० टक्के त्यांना वाटून देण्याचे आणि २५ टक्के (Mutual Aid Society) अन्योन्यसाहाय्यकारिणीकडे वार्षिक वर्गणीबद्दल जमा करावयाचे.

या हिशेबावरून दिसून येईल की, या नवीन व्यवस्थेत लिक्लेअरने नफ्याच्या आकड्यात आपला भाग मुळीच ठेवला नाही. मुद्दल रकमेत त्याचा भाग होता, त्याजवर फक्त ५ टक्के व्याजावर त्याने आपला हक्क ठेवला होता. पुढे हा कारखाना कोणत्या पद्धतीवर चालवावयाचा, याजबद्दल भागीदार व मजूर लोक यांच्यामध्ये पुष्कळ भवती न भवती होऊन जो ठराव झाला, त्याप्रमाणे पुढे सयंत्र काम चालले. या कामाचे सवाल काढून लोकांत प्रसिद्ध केले होते. त्यापैकी २०० असामींकडून जबाब आले ते पाहून अखेरचा निर्णय बहुमताने ठरवला.

पुढे दुसरी एक त्याने नोया* या नावाची जंगी सभा स्थापली. जर्मनीचा पारिस या शहराला वेढा पडला होता, त्या वेळेस लिक्लेअर 'हरब्ले' या गावी होता. पुढे पारिस शहरात निरनिराळ्या पक्षांमध्ये लढा पडल्यावर तो तेथे गेला व तेथून त्याने आपल्या एका आप्ताला लिहिले की, ''जर्मन लोक पारिस शहर तोफा लावून उडवून टाकतील, तर आमचा कारखाना ढासळेल. त्यात मीही माझ्या मजुरांबरोबरच समाधी घेईन.'' आपल्या मरणाच्या आदल्या दिवशी लिक्लेअरने डिफोरनो याला लिहून पाठविले

होते की, ''कारखान्याची उलाढाल करताना मजबरोबर जे लोक वृद्ध झाले आहेत, त्यांना फारच श्रम झाले आहेत. त्यांच्यामध्येही विशेष करून तुम्हाला मी अतिशय त्रास दिला आहे. त्यामुळे माझ्या कुडीत प्राण आहे तोपर्यंत तर मी तुमचा ऋणी आहेच; पण मेल्यावरही तुमचे ऋण माझ्या हातून फिटण्यासारखे नाही. तुम्ही आपल्या आश्रितजनाला व आपल्याला सांभाळून राहा, असे माझे हात जोडून सांगणे आहे. जोपर्यंत खालच्या प्रतीच्या लोकांमध्ये खऱ्या ज्ञानाचा फैलाव होऊन अज्ञान नाहीसे झाले नाही, तोपर्यंत त्यांना वर काढण्यासाठी आम्ही आपला हात दिलाच पाहिजे. असे केल्याशिवाय सुखात रुळत असलेले श्रीमंत लोक आणि दु:खसागरात लोळत असलेले गरीब लोक यांच्या मधला द्वेषभाव नाहीसा होणार नाही.''

सन १८७२ च्या जुलैच्या १३ व्या तारखेस लिक्लेअर मरण पावला. त्या वेळेस त्याचे ७१ वर्षांचे वय होते.

तारुण्यात जी सुखे स्वप्नवत भासून होती, त्या सुखांचा त्याने म्हातारपणी यथेच्छ उपभोग घेतला. तो मेला त्या वेळेस त्याच्या शिलकेला चार लक्ष ऐंशी हजार रुपये होते. तो आपल्या मजुरांच्या कल्याणाकडे आपल्या पैशाचा विनियोग न करता, तर त्याजपाशी याहूनही पुष्कळच शिल्लक राहिली असती. याहून शिल्लक अगदीच थोडी असती, तर लोककल्याणाच्या भरी भरून त्याने भारी उधळपट्टी केली, असे म्हटल्यावाचून लोक राहिनात आणि पुढे त्याचा कित्ता गिरविण्यास लोकांना इच्छाही ना होती. कसेही वागा, जग नाव ठेवल्याशिवाय राहत नाही. म्हणून जग त्रिविध आहे, असे म्हटले आहे.

लिक्लेअरच्या सुदैवाने त्याच्या हयातीतच लोकांना काही वर्षांपासून पेन्शन फंडातून पेन्शन मिळू लागून ते आपल्या वृद्धापकाळाचे दिवस त्याच्याप्रमाणे एखाद्या खेड्यात वास करून आनंदात काढीत होते. त्याने लावलेल्या झाडाला त्याच्या देखत अशी फळे आलेली पाहून त्याला किती आनंद वाटला असेल बरे!!

त्याने आपल्या उतारवयात कारखान्यात मजबुतीसाठी पक्का बंदोबस्त करून ठेवला होता, त्यामुळे त्याच्या मृत्यूनंतर त्याला बिलकूल धक्का पोहोचला नाही. इतकेच नव्हे; पण त्याची एकसारखी वृद्धीच होत चालली.

इ. स. १८७७ साली म्हणजे लिक्लेअरच्या मृत्यूनंतर पाच वर्षांनी ९८४ मजुरांना नफ्याच्या रकमेतून वाटा मिळू लागला होता. त्याच साली सुमारे चार लाख रुपये पगाराबद्दल खर्च पडले.

इ. स. १८४२ सालापासूनचा हिशेब पाहता नफ्यातून एकंदर ८ लाख रुपये खर्ची पडले होते. सन १८७७ साली कारखान्याच्या भांडवलाची रक्कम चार लाखांवर झाली होती आणि एकंदर देवघेव ८ लाख रुपयांची झाली होती. सन १८६८ साली (Mutual Aid Society) अन्योन्यसाहाय्यकारिणीचे भांडवल एक लाख तीस हजार होते. पैकी ८० हजार रुपये पेढीवर जमा केलेले होते. पुढे पेढीचे भांडवल बरेच वाढून सन १८७७ साली २४ असामींना पेढीतून दरसाल रुपये ४०० व ११ विधवांना सालाचे २०० रुपये याप्रमाणे पेन्शन मिळू लागले होते.

लिक्लेअरच्या मागून तीन वर्षांनीच डिफोरनो मरण पावला. त्याच्या जाग्यावर सन १८७५ साली मारकॉट नावाच्या गृहस्थाची नेमणूक झाली.

लीक्लेअर अगदी मरावयास टेकला त्या वेळेस त्याने कारखान्याच्या आपल्या लोकांस शेवटचा निरोप पाठविला की, ''तुम्ही कारखान्यात मेहनत घेऊन काम करीत आहात, यापासून तुमची स्वत:ची स्थिती तर सुधारत चालली आहेच. शिवाय इतर लोकांपुढे तुम्ही आपला उत्तम नमुना ठेवीत आहात. तो पाहून आपले काम याहून अधिक उमेदीने करण्यास तो त्यास उपयोगी पडेल. हा माझा अंतकालचा उपदेश सतत स्मरणात ठेवा.''

ज्यांना मोलमजुरीशिवाय पोट भरण्यास दुसरे साधन नव्हते, त्यांना या कारखान्यातून मदत मिळू लागली आहे. हेच या उद्योगवृक्षाचे सुफल होय. याहून आणखी दुसरे ते काय हवे आहे!

फ्रान्स देशात समाजस्थिती बिघडून मोठी राज्यक्रांती झाल्या दिवसापासून जिकडे तिकडे निर्नायकी माजली होती. द्रव्यसंचय, देवधर्म लोकांना नकोसा झाला होता. बळी तो कान पिळी, कायदेबियदे सारे सारे गुंडाळून ठेवून लोक मन:पूत वागू लागले होते. अनीतीचे मार्ग खुले झाले होते. कोणाचा पायपोस कोणाच्या पायात राहिला नव्हता. कोण कोणाची बायको व कोण कोणाचा नवरा. अशी सर्व देशभर स्वतंत्रता हाती दिवटी घेऊन नाचू लागली होती. मद्यपानाचा तर ताळच राहिला नव्हता. गृहस्थपणाची मर्यादा व रीत अगदी सुटली होती. तरी पण लिक्लेअरच्या सतत परिश्रमाने,

अचाट बुद्धीने व कौशल्याने मजूरवर्गाची स्थिती काहीशी सुधारण्याच्या मार्गाला लागली. मजूर लोक कायदेकानूला मान देऊ लागले. ते पूर्वीची आपली पशुवृत्ती टाकून घरदार करून प्रपंच सुखाचा अनुभव घेऊ लागले. सारांश, सुधारणेचा जसजसा प्रसार होत चालला, तसतसे समाजकल्याण होत चालले. हा अमृतसिद्धियोग फ्रान्स देशाला लिक्लेअरच्या योगाने प्राप्त झाला.

पूर्वी राजे व बादशहा होऊन गेले. त्यांनी मोठमोठी राज्यकारस्थाने केली, लाखो मनुष्यांचे बळी घेऊन रणांगणी रक्ताच्या नद्या वाहावयास लावल्या व अपार संपत्ती भोगून अखेर काळाच्या जबड्यात जाऊन पडले. त्यांची वर्णने इतिहासात वाचावी, त्यापेक्षा अशा लोककल्याणकारी पुरुषांची चरित्रे लिहिली, वाचली व ध्यानात ठेवली, तर लोकसमाजाचा किती बरे फायदा होईल? म्हणून हे फ्रान्स देशातील एका रोहिदास चांभाराच्या सत्पुत्राचे अल्प चरित्र यथामती लिहून आपल्यापुढे सादर केले आहे. यापासून आमच्या विपन्न देशात समाजहिताचा अंकुर फुटून ईश्वरकृपेने थोडासा तरी फायदा होवो म्हणजे झाले.

♦♦

# लिक्लेअर चरित्र

कै. नागेश विनायक बापट यांचे लिक्लेअरचे चरित्र हातात पडले आणि फ्रान्समधील उद्योग-व्यवसाय करणाऱ्या एका विलक्षण माणसाची ओळख झाली.

मी काही उद्योगपतींची चरित्रे वाचली आहेत. त्यांनी शून्यातून आपला उद्योग-व्यवसाय उभा केला आहे. सॅम वॉल्टन हा वॉल मार्टचा निर्माता सगळ्यात आधी डोळ्यासमोर येतो. सामान्य माणसाला सर्वात स्वस्त किमतीत माल उपलब्ध करून देण्याचे स्वप्न सॅमने बघितले आणि जगभर आपल्या चेन स्टोअरची उभारणी केली. त्यांची आठवण सर्वात प्रथम झाली. काही माणसं स्वप्न घेऊन जन्माला येतात. त्यांचे एक कल्पनाविश्व असते आणि त्या कल्पनेचा पाठपुरावा करताना एक मोठा उद्योग-व्यवसाय उभा करतात. अशी स्वप्ने पाहणारी माणसेच उद्योग उभे करू शकतात. आयोकाका हा माणूस अगदी तसाच. त्याने उद्योग कसा वाढवावा हे जगाला दाखवून दिले. माणूस जेव्हा गरीब असतो तेव्हा तो कम्युनिस्ट असतो आणि एकदा त्याच्या हातात पैसा आला की तो भांडवलदारासारखा वागतो, असे आयोकाका म्हणाले होते. सामाजिक भान असलेले व गरिबीतून वर आलेली माणसंच असं करू शकतात.

१८०१ साली फ्रान्सच्या एसी ह्या खेड्यात जन्माला आलेला लिक्लेअर हा माणूस एक साधा इमारतींना रंग देणारा पेंटर होता. या माणसाने एक मोठे उद्योगविश्व उभं केलं. त्या लिक्लेअरचं चरित्र बापटांनी लिहिलं आणि एका नव्या उद्योगपतीची ओळख करून दिली. स्टीव्ह जॉब असो की बिल गेटस् असो ह्यांची पूर्वायुष्ये समजून घेताना उद्योगपती कसे निर्माण होतात

याची चांगली कल्पना येते. ही जिद्दी माणसं खूप काही सांगून जातात. लिक्लेअर हा सामाजिक भान असलेला माणूस खूप काही सांगून जातो.

लिक्लेअर हा एका चांभाराचा मुलगा. शाळा सोडावी लागली. फारसे लिहिता-वाचता येत नव्हते म्हणून मजुरीचे काम करून जगणे नशिबी आले. १८१९ मध्ये गाव सोडून पॅरिसकडे पोटा-पाण्यासाठी धाव घेतली. रंगाचा धंदा म्हणजे इमारती रंगवण्याचे काम करू लागला. त्यात मजुरी किती मिळणार? मन लावून काम करणारा एक होतकरू मजूर. मालक त्यांच्या कामावर खुश असे. २२व्या वर्षी लग्न झाले आणि प्रपंचाकरिता मोलमजुरी करणे चालूच ठेवावे लागले. संततीसुख लाभले नाही म्हणून समाजहिताचा विचार डोळ्यापुढे येऊ लागला. छोटासा रंग उद्योग सुरू केला. त्यात मजुरीचाच आधार होता. सोबतीला ८-१० मजूर असत. त्यांचा तो पोशिंदाच होता. डोक्यात पैसे कमविणे हा मूळ उद्देश असला तरी उद्योगात वाढ करणे याचाच ध्यास होता. काटकसर फार महत्त्वाची हे लक्षात आले होते. आपल्या सहकारी मजुरांचे भले कसे होईल, म्हातारपणी त्यांच्याकडे चार पैसे कसे असतील? अशा विचारांनीच तो चिंतित असे. त्यासाठी आपल्या मजुरांची Mutual Aid Society स्थापन केली आणि त्या माध्यमातून धंद्याची उभारणी केली. जमलेला नफा पुन्हा धंद्यात घालावयाचा हे मुख्य सूत्र होते. सहकाऱ्यांचा विश्वास हे प्रमुख भांडवल होते. धंद्यात उतार-चढ अनुभवाला येत होतेच. नवे नवे प्रयोग करणे चालूच होते. आपल्याकडे सहकारी तत्त्वावर कारखाने जसे सुरू झाले, अगदी तसेच सहकारी तत्त्वावर उद्योग वाढविणे त्याला आवश्यक वाटत होते. फ्रान्समध्ये पहिला सहकारी तत्त्वावर उद्योग चालविण्याचा हा प्रयत्न असावा. Mutual Aid Society ची संकल्पना त्याने अमलात आणली. मिळालेल्या फायद्यातून काही टक्के पैसा भांडवली गुंतवणुकीत घालायचा आणि उद्योग वाढवायचा हे त्याचे प्रमुख लक्ष्य. हे करीत असताना कौटुंबिक दु:खे येत गेली. प्रिय पत्नी निवर्तली. व्यवसाय एका सहकाऱ्याच्या हाती देऊन तो पुन्हा खेड्याकडे वळला. शहरात राहणे त्याला आवडत नसे. त्याचे शेतीवर विशेष प्रेम होते.

सरकारला त्याच्या उद्योगाची चांगली माहिती होती. त्याचे सहकारी तत्त्वावरचे उद्योग खूप फायदेशीर होते. त्यामुळे सरकारने त्याची Mayor

म्हणून नेमणूक केली आणि इतर सामाजिक कार्यांमध्ये त्याची वाटचाल पुढे चालू राहिली. जोपर्यंत खालच्या प्रतीच्या लोकांमध्ये खऱ्या ज्ञानाचा फैलाव होऊन अज्ञान नाहीसे होत नाही तोपर्यंत त्यांना वर काढण्यासाठी आपण मदतीचा आणि सहकार्याचा हात पुढे केला पाहिजे या विचारानेच तो झपाटलेला होता. तेच त्याचे जीवनतत्त्वज्ञान होते. तीच त्याची सामाजिक बांधिलकी होती. १८७७ साली त्याच्या मृत्यूनंतरही ९८४ मजुरांनी त्याचा उद्योग नेटाने चालविला आणि वृद्धिंगत केला.

फ्रान्समध्ये अनेक घडामोडी झाल्या, उलथापालथ झाली; पण त्यांचा कारखाना तसाच चालू राहिला. समाजहिताचा ध्यास घेऊन उद्योग व्यवसाय करणे कठीण असले तरी लिक्लेअरसारखी माणसं ही उद्योग व्यवसायाची खरी शान आहे.

नागेश विनायक बापट यांनी लिक्लेअर याचे हे छोटेखानी चरित्र लिहून खूप मोठी समाजसेवा केली आहे. सामाजिक बांधिलकी फार महत्त्वाची असते. व्यवसाय-उद्योग अवश्य उभा करावा. पैसा कमवावा. काटकसर करावी. मिळालेल्या नफ्यातून नवी भांडवली गुंतवणूक करावी. कामगारांना अधिक सोयी-सवलती द्याव्यात. पैशातून पैसा उभा करावा. या प्रमुख सूत्राच्या आधारावर उद्योग-व्यवसाय वाढवावा. हे आपण लिक्लेअरच्या चरित्रातून शिकण्यासारखे आहे.

मला हे पुस्तक खूप आवडले, त्याचे कारण म्हणजे आज ज्याला आपण Corporate Social Responsibility असे म्हणतो त्यापेक्षा अधिक चांगले रोल मॉडेल म्हणजे लिक्लेअरची Mutual Aid Society.

बिल गेट असो की नारायण मूर्ती, त्यांनी उद्योगाकडे असेच बघितले म्हणून हे सामाजिक भान असलेले उद्योगपती मला वंदनीय वाटतात. लिक्लेअर हा मला माहीत नव्हता. नागेश बापट यांच्या या चरित्र लेखनामुळे तो माहीत झाला.

**- डॉ. नरेंद्र गंगाखेडकर, मुंबई**

♦♦

# लिक्लेअर चरित्र

ब्रिटिशपूर्व कालखंडातील सर्वसामान्यपणे १८०१ ते १८७२ या काळात लिहिली गेलेली 'लिक्लेअर चरित्र' ही दीर्घकथा अथवा लघु कादंबरी. या कथेचा खरे तर प्रेरक कथा, उद्योजकतेला आणि उद्यमशीलतेला प्रेरणा देणारी कथा म्हणून उल्लेख करावा लागेल. एका गरीब चर्मकाराच्या मुलाला केंद्रस्थानी ठेवून विकसित झालेल्या आणि लिक्लेअर नाव असलेल्या मुलाचा हा गौरव इतिहास आहे. तो आयुष्यभर अशिक्षित राहिलेला मुलगा आहे; पण जगण्यासाठी जिथे संधी मिळेल तिथे जावं, संधीचं सोनं करावं हा त्याचा मूलभूत गुण, उद्योजकाला आवश्यक असणारी संधीच्या ठिकाणी जाण्याची मोबॅलिटीही त्याच्याकडे आहे. फ्रान्स देशात घडलेली कथा असा या कथानकात उल्लेख आहे. गावात आपला चरितार्थ भागणार नाही म्हणून कथेचा नायक लिक्लेअर पोट भरण्याच्या नादात राजधानी पॅरिस येथे येतो. राजधानीत आल्यावर नोकरी करावी आणि पोटापाण्याला लागावं असं ठरवितो. नोकरी करताना काहीतरी कौशल्य आत्मसात करावं म्हणून तो रंगाचा धंदा शिकण्यासाठी नोकरी पत्करतो. काही काळानंतर कौशल्य आत्मसात झाले की पगार वाढून मागितला. आपल्या हक्काची आणि कष्टाची जाणीव असलेलं व्यक्तिमत्त्व प्रारंभापासूनच बापटांनी या कथानकात उभं केलं आहे. मालकाच्या मनात नसतानाही त्याला पगार वाढवून द्यावा लागला, कारण त्या नायकानं अत्यंत अल्पावधीत कौशल्य आत्मसात केलं होतं. व्यवसाय आणि उद्योजकता विकासात भांडवल संचय वृत्तीला अनन्यसाधारण महत्त्व आहे. कॅपिटल क्युमिलेशन टेंडन्सी हा महत्त्वाचा वैयक्तिक गुण उद्योजकाजवळ असावा लागतो. लिक्लेअरजवळ

हा गुण होता असे कथानकातून दाखविण्यात लेखक बापट यशस्वी झालेले आहेत.

लिक्लेअरला आयुष्यभर मूलबाळ झाले नाही. त्याला समाजसेवेत विशेष रस होता. व्यवसाय प्रामाणिकपणे करणे म्हणजे समाजसेवा होय. हे व्यावसायिक मूल्य लक्षात घेऊन त्याने वयाच्या २६व्या वर्षी रंगाचा कारखाना काढला. गुत्तेदारी करून इमारती रंगविण्याचे काम घेतले. हे करण्यापासून त्याचा मित्र परिवार त्याला रोखत होता; पण त्याचे हे काम जबाबदारी म्हणून स्वीकारून व्यवसायासाठी आवश्यक असलेला धोका पत्करून हे काम सुरू केले. व्यवसाय आणि उद्योजकता विकासात धोका पत्करण्याच्या वृत्तीला विशेष महत्त्व असते. या कथानकातून कथेचा नायक धोका पत्करणारा म्हणजे विनियोजित धोका पत्करणारा दाखविला आहे. व्यवसाय उभारणीत आणि चालविताना व्यवसायी स्थानी निर्माण करणे व ती सांभाळणे याला विशेष महत्त्व असते. बापटांनी लिक्लेअर चरित्रामधून जो नायक उभा केला आहे तो व्यवसायाच्या ख्यातीला जपणारा, ती वाढवणारा उद्योजक म्हणून उभा केलेला आहे.

व्यवसायाच्या विकासात आणि वृद्धीत कामगारांना विशेष महत्त्व आणि मूल्य असते. कामगाराचे शोषण करून व्यवसाय वाढविण्यापेक्षा त्यांना पर्याप्त मोबदला आणि योग्य प्रतिष्ठा देऊन त्यांच्याकडून महत्तम काम करून घेता येते हे साधे व्यवसायतत्त्व लेखकाने आपल्या चरित्र नायकातून उभे केले आहे. 'मानवतापूर्ण व्यवस्थापनातून व्यवसाय वाढतो, कामगार दडपणाखाली योग्य काम करत नाहीत' या साध्या कामगार मूल्याचा वापर लिक्लेअर चरित्र उभे करताना लेखकाने केलेला आहे. कामगारांचा व्यवस्थापनात सहभाग हे अलीकडच्या काळात विकसित झालेले मूल्य बापटांनी त्या काही उद्योजकीय प्रेरक कथा मांडताना वापरलेले आहे. हा लेखक काळाच्या पुढे चालणारा लेखक आहे हे यातून स्पष्ट होते. कारण या मूल्याचा वापर अत्यंत खुबीने त्यांनी या कथानक विकासात केलेला आहे.

आपल्याकडचे म्हणजे घाटाखालचे खारी, कामासी, कुणबी लोक कोकणातून मुंबईत हमाली किंवा दुसरा धंदा करून पोट भरण्यासाठी जातात. दोन पैसे कमवून पुन्हा मूळ गावी शेतीत घालतात. लिक्लेअरलाही तसेच वाटून तो पॅरिस शहरात गेला असा उल्लेख या कथानकात आहे;

पण प्रत्यक्षात उभा केलेला लिक्लेअर एक उमलता उद्योजक म्हणून उभा केलेला आहे. लिक्लेअरला प्रभावी दाखविण्यासाठी भरपूर निवेदनशैलीचा वापर केलेला आहे. प्रत्यक्षात एका उमलत्या यशस्वी उद्योजकाला एक यशस्वी उद्योजक आणि व्यावसायिक म्हणून जीवनक्रम आणि मूल्य व्यवस्था अत्यंत सुलभ शैलीने प्रभावीपणे मांडण्याचे काम लेखकाने केलेले आहे. आपल्या कादंबरीचा वाचकावर काय परिणाम होईल याचे भान लेखक ठेवून पात्र विकसित करतात हे विशेष आहे. व्यवसाय करताना आपल्या पायापुरते पाहायचे नाही. सर्व व्यवहार लोकाभिमुख करायचे आणि व्यावसायिक पर्यावरणात आपण कुटुंबाचे नायक म्हणून वर्तन करून आपल्या कामगारावर कुटुंबवत्सल प्रेम करायचे ही महत्त्वाची मानवी व्यावसायिक मूल्ये रुजविण्याचे महत्त्वाचे काम त्या कालखंडात निश्चित केले असेल. आपल्याला मूलबाळ होत नाही, त्यामुळे आपण वारेमाप संपत्ती असल्याने मजा करावी, असे या दाम्पत्याला वाटत नाही हे कादंबरीतून ठळक लक्षात येते.

खरे तर तो कालखंड कामगार शोषण आणि कामगार क्रांती अशा दोन टोकाचा कालखंड होता. या काळात कामगारांना आश्रित म्हणून त्याचा व्यवस्थापनात सहभाग घेणे, कामगार ही आपली परंपरा आहे, ते आपले विचार पुढे चालविणारे आहेत, त्यांचा पोशिंदा आपण आहोत हे समजण्यात धन्यता न मानणे आणि 'मजुराचा धनी' ही संकल्पना मोडीत काढून नवे मूल्य रुजविण्याचा खूपसा प्रयत्न या कलाकृतीने केलेला आहे. कथेच्या नायकाची अर्थात लिक्लेअरची प्रतिमा एक लोकाभिमुख आणि प्रवर्तक अशा स्वरूपाची निर्माण करण्याचा प्रयत्न लेखकाने केलेला आहे. आश्रित मंडळींना (मजुरांना) धनीपणा सोपवून धनीपणाचे फायदे त्यांना मिळवून देऊन आपली प्रतिमा बनविण्यात किंवा आपल्यामध्ये मिसळून जाण्यासाठी त्यांना हात देण्यात तो (लिक्लेअर) भूषण मानत असे. हे एक कामगारांप्रतीचे मूल्य या कादंबरीत पेरण्याचा प्रयत्न केलेला आहे. अलीकडच्या काळात बहुजन हा शब्दप्रयोग खूपसा गुळगुळीत केला गेलेला आहे. बापटांनी अशा स्वरूपाचा म्हणजेच बहुजनाला समांतर असणारा एक शब्द १८०१ला म्हणजे जवळपास २०० वर्षांपूर्वी वापरलेला आहे. तो म्हणजे 'बहुसमाज.' बहुसमाजाच्या कल्याणासाठी झटले पाहिजे, समान हितासाठी प्रत्येकाने

निरनिराळे नव्हे तर एकत्र झटून खपले पाहिजे, म्हणजे संघटितपणे खपले पाहिजे. संघटन आणि संघटितपणातून विकास हे मूल्य मांडण्याचा खूपसा यशस्वी प्रयोग बापटांनी लिक्लेअरमधून केला आहे. धर्म ही संकल्पना देखील व्यवसाय आणि उद्योग विकासासाठी वापरता येते, याची तत्त्वमांडणी कादंबरीतून आढळते. 'एकवटून काम करण्यानेच बंधुप्रीतीचा मोड हृदय भूमिकेतून उगवतो,' हे धर्माचे तत्त्व आहे. नफा उत्तम मिळाल्यास तो सर्वांना वाटून सर्वांना नफ्याचे वाटेकरी करायचे हे मूळ व्यवसायवृद्धीचे तत्त्व बापटांनी या लघुकादंबरीच्या माध्यमातून मांडले आहे. कादंबरीचा वापर समाजप्रबोधनासाठी साधन म्हणून केला आहे. पेशवाईच्या जाण्याने भयभीत प्रजा स्थिर मानसिकतेत आणून जपण्याचा उमदा पर्याय लोकांसमोर ठेवावा या भावनेतूनच ही कादंबरी लिहिली गेली असावी. जाणारी राजेशाही लोकांची हतबलता वाढवेल हे गृहीत धरून वाचकांना आत्मविश्वास आणि दणकट उभारी यावी, उद्योग व्यापार संस्कृतीची जनतेने कास धरावी ही कादंबरी लेखनाची प्रेरणा असावी असे ही कादंबरी वाचताना जाणवते. विकासासाठी प्रेरणा देणे हे या कादंबरीचे लेखनमूल्य आहे. ढासळत जाणाऱ्या मानसिकतेला आणि हतबल स्थितीतून उभारी येऊन आत्मविश्वास निर्माण करणे, उद्योग संस्कृतीला चालणा देणे, व्यवस्थापन तंत्राचा वापर व्यवसायात करणे अशा स्वरूपाची प्रेरणा कादंबरी देते. खरे तर अशा साहित्याची निर्मिती ही काळाची गरज असते.

कारखान्यातील कामगार आपल्या कामापासून विचलित होऊ नये, ते सतत कारखान्याशी जोडून राहावेत, त्यांचा कामावरचा विश्वास वरचेवर दृढ व्हावा आणि आपण कामगार म्हणजे मालकापेक्षा वेगळे अशी भावना त्यांच्या मनात निर्माण होऊ नये यासाठीचे विशेष संवाद, घटना आणि विश्लेषण या कादंबरीतून येते. व्यापार, व्यवहार आणि उद्योग याचे महत्त्व या काली वाचकांना पटावे यासाठी विशेष प्रयोजन कादंबरीत केलेले आढळते. असे असले तरी तिच्या कथानकात आणि प्रवाहीपणात कुठेच बाधा आलेली नाही. कामगार संघटित व्हावे, त्यांच्यात चैतन्य राहावे यासाठी कारखान्याचा मालक हितकारिणी सभेचे आयोजन करतो आणि संघटन करतो हा वेगळेपणा या कादंबरीत आहे. कामगारासाठी अन्योन्य सहाय्यकारिणी (Mutual Aid-Society) निर्माण करण्याचे काम लिक्लेअर

करतो. कामगार संघटना केवळ कामगारांसाठी काम करतील. कामगार वर्गणी भरून त्याच्यातून तयार होणाऱ्या निधीतून कामगारांच्या कुटुंबाच्या औषध-पाण्याचा खर्च भागविण्यासाठी ही अन्योन्य हितकारिणी काम करेल असे लिक्लेअर नमूद करतो. कामगार कल्याण, कामगारांचा व्यवस्थापनात सहभाग, त्यांचा एकूण नफ्यात हिस्सा या आधुनिक म्हटल्या जाणाऱ्या आणि आजच्या औद्योगिक युगात प्रामुख्याने चर्चिल्या जाणाऱ्या बाबींचे मनोरे त्या काळी म्हणजे १८३८च्या दरम्यान कागदावर लिक्लेअर चरित्र या कादंबरीच्या माध्यमातून लेखक मांडताहेत ही फार मोलाची बाब यातून लक्षात येते. लेखकांची विचारशैली आणि दूरदृष्टीचे उमदेपण आपल्याला आज जाणवते.

कादंबरी लेखनाचा कालखंड लक्षात घेतल्यास त्या काळातील सामाजिक आणि राजकीय पर्यावरणाची जाणीव प्रखरतेने होते. राजकीय स्थित्यंतरातून निर्माण झालेला लोकमानसातील संभ्रम दूर व्हावा, एक रचनात्मक औद्योगिक वातारण निर्माण व्हावे, लोकांच्या मनातील भांबावलेपणा दूर व्हावा, उमदे जगण्यासाठी औद्योगिक पर्यावरण तयार व्हावे या व्यापक दृष्टिकोनातून मनोरंजन या हेतूनेच ही कादंबरी लिहिली गेली असावी. जसजसे वय वाढत जाते तशी माणसे थकत जातात, तसे मजूरही थकतात. हे लक्षात घेऊन कामगारांच्या वृद्धापकाळासाठीच्या सुविधांचा भक्कम विचार लिक्लेअर करतो अशी कादंबरी दर्शविते.

लिक्लेअर चरित्र या कादंबरीने त्या काळी दिलेले महत्त्वाचे व्यावसायिक मूल्य म्हणजे सार्वजनिक व्यवहाराला आवश्यक असणारी पारदर्शकता लिक्लेअर संचित नफा सर्वासमोर आमसभेत टेबलावर थैली मांडून त्याची वाटणी करत असे. त्याच्या व्यवहाराने सहभागी कामगाराचे आर्तिक मनोधैर्य आणि मनोबल वाढून ते अधिक वेगाने आणि निष्ठेने काम करत असत. व्यवसाय चालवत असताना व्यवसाय अथवा उद्योगास आवश्यक असणारे नवनिर्मितीचे तत्त्व (Innovation) मोठ्या खुबीने लेखकाने कादंबरीत वापरले आहेत. नवनिर्मिती ही उद्योगासाठी एक प्रेरणा मूल्य असते. त्याच्यावरच व्यवसायाची सामाजिक स्वीकृती अवलंबून असते. नवनिर्मिती या मूलगामी उद्योजक मूल्याचा वापर मोठ्या खुबीने बापटांनी केला आहे. उद्योगाच्या उभारणीत लिक्लेअरने नव्या उत्पादन तंत्राची, तसेच कच्चा

माल वापरातील पर्यायी नव्या कच्च्या मालाची चाचणी व प्रयोग केल्याचे या कलाकृतीत दर्शविले आहे. जुन्या कच्च्या मालाच्या वापरातून कामगार आजारी पडतात असे लिक्लेअरच्या लक्षात आले तेव्हा आजारी कामगारांना न बदलता पर्यायी कच्चा माल वापरण्याचा निर्णय घेण्यात आला असा महत्त्वाचा निर्णय ही कादंबरी दाखविते. 'शिशाच्या ऐवजी ऑक्साईड आणि जस्ताचे मिश्रण उपयोगी पडेल' अशी चाचपणी करून त्याच्या यशस्वी वापरातून कामगार सुधारले. या नावीन्यपूर्ण निर्णयाचा सकारात्मक परिणाम होऊन आलेल्या यशामुळे इनकरेजमेंट सोसायटी आणि सरकार यांनी लिक्लेअरला गौरविले. कादंबरीतील ही घटना सकारात्मक व्यावसायिक प्रेरणा प्रदान करणारी आहे (Innovation, appreciation and saction). नवनिर्मिती त्याला स्वीकृती आणि मान्यता देऊन उद्योग-व्यवसाय वाढविले जातात. हे उद्योजकता मूल्य कादंबरीच्या माध्यमातून पोहोचविण्याचा आणि रुजविण्याचा मोठा प्रयास या लघुकादंबरीतून लेखकाने केलेला आहे.

व्यवसाय-उद्योगवृद्धीसाठी सतत निर्णय घ्यावे लागतात. लिक्लेअरने १८३८ मध्ये स्थापन केलेली अन्योन्य सहाय्यकारी सभा १५ वर्षांनी बंद करावी असे स्थापनेतच ठरले होते. त्यानुसार त्याने सभेचे भांडवल आणि नफ्याची रक्कम २९ सभासदांना वाटून टाकली. हा एक महत्त्वाचा व्यवसायिक निर्णय घेतल्याचे कादंबरीत दर्शविले आहे. आपल्या सहकाऱ्यांना विश्वासात घेऊन निर्णय कसे घेतले जातात याची उमेदप्रद मांडणी कादंबरीत आहे. घेतलेला निर्णय चुकला असेल तर त्याची दुरुस्ती कशी केली जाते याची मांडणीही उमेदी आहे. पहिली अन्योन्य सहाय्यकारणी बंद करून दुसरी स्थापन करणे, भांडवल वाटून टाकणे, चुकलेले निर्णय कुशलतेने दुरुस्त करून नव्याने घेणे, विरोध करणाऱ्या सभासदांना महत्त्व पटवून देऊन विश्वासात घेऊन पुन्हा निर्णय घेणे आदी निर्णय दर्शविले आहेत. व्यवसायात सातत्य राहावे, लोकांचा कायम सहभाग राहावा आणि आपल्या नंतरही पुन्हा हा उद्योग चालावा यासाठी लिक्लेअर आपले चरित्र पारदर्शी आणि लोकाभिमुख करताना दिसतो. सभासदांना पेन्शन द्यावी ही साधी गोष्ट सभासदांच्या गळी उतरविण्यात त्याला करावी लागणारी कसरत कादंबरीतून अत्यंत रंजक पद्धतीने लेखकाने मांडलेली आहे.

आपल्या पश्चात हा उद्योग चालावा यासाठीचे तत्त्वज्ञान आणि धडपड लिक्लेअर चरित्र या कलाकृतीत अत्यंत मर्मग्राही पद्धतीने आलेले आहे. बुद्धी आणि शरीराची एकी जर दिसेना तर धैर्य एकटे कितीसा टिकाव धरेल? त्यालाही मर्यादा आहे. शरीराची क्षमता आणि धैर्याची सांगड घालून व्यवसाय उद्योग वृद्धिंगत करणारे हे तत्त्वज्ञान आधुनिक व्यवसायाच्या पर्वात १८०१च्या दरम्यान मांडले.

व्यवसाय-उद्योगात नफा या तत्त्वाला अन्योन्यसाधारण महत्त्व असले तरी व्यवसायपरत्वे नफा संकल्पना भिन्न असते. या लघुकादंबरीत बापटांनी नफ्याच्या बदलणाऱ्या स्वरूपाचे सुंदर विवेचन दिलेले आहे. 'आपल्या इतर बरोबरीच्या मंडळींना भागीदारीचा हक्क दिला,' म्हणजेच जेवढी रक्कम भागीदारांना मिळे तेवढीच राशी आपल्या उद्योगात काम करणाऱ्या मजुरांना मिळावी यासाठीची 'लिक्लेअरची धडपड' कादंबरीत अतिशय रंजक पद्धतीने आलेली आहे.

पेट्रीक टेलर यांनी शास्त्रीय व्यवस्थापन हे १८८० या काळात मांडले. शास्त्रीय व्यवस्थापनावर निर्णयतेचा आरोप व्हायचा या काळाच्याही आधी नागेश बापट हे व्यवस्थापनातील मानवतावादी तत्त्वज्ञानाचा पुरस्कार करताना या कादंबरीच्या माध्यमातून दिसतात. उदा. १८६४ साली लिक्लेअर आपल्या कारखान्यातील लोकास म्हणाला, 'सभासद हो! तुम्ही आता या कारखान्यात 'रोज बुडाला आणि मजूर उडाला' याप्रमाणे रोज मजुरी घेऊन कामे करणार नाहीत. सुटीची घंटा वाजली की यंत्रे बंद असे काम करणारे तुम्ही नाही आहात. तुमच्याच हितासाठी तुम्ही भागीदार या नात्याने काम करणारे झाले आहात. तेव्हा कारखान्याच्या कामात तुम्ही या उपर उदासीन राहता कामा नये. कारखान्यातील यंत्रे, सामान व हत्यारे यांचे संरक्षक, मालक व वापरणारे तुम्हीच आहात. सबब प्रत्येकाने त्यावर चांगली देखरेख ठेवली पाहिजे.' कामगाराप्रती बरोबरीची वागणूक, त्यांचा व्यवस्थापनात सहभाग आणि मिळणाऱ्या नफ्यात बरोबरीचा वाटा या बाबी आधुनिक व्यवस्थापनात अलीकडे चर्चेत आल्या; पण बापट याची चर्चा १८६४च्या कालखंडातच करतात. वर्तमान, दूरदृष्टी आणि विकास याची सांगड घालून कादंबरी विकसित केलेली आहे.

'आपण जाणारच आहोत, कशाला पसारा वाढवायचा?' या परंपरागत

परालतावादी तत्त्वज्ञानाला छेद देऊन कामाचे आणि कार्याची अजरामरता सांगणारे तत्त्वज्ञान बापट या कादंबरीतून मांडतात. आपण उभी केलेली व्यवस्था अथवा कारखाना आपल्या पश्चातही उत्तम चालावा अशी भक्कम धारणा घेऊन लिक्लेअर काम करत होता. १८६५ला त्याच्या पत्नीचे निधन झाले असे लेखकाने दर्शविले आहे. त्याची पत्नी त्याच्या इच्छेला बळ देणारी होती, असे निवेदनात लेखक नमूद करतात. पत्नीबरोबर ४२ वर्षे काढल्यानंतर पत्नी गेल्यानंतर त्या घरात राहायचे नाही, उभ्या केलेल्या कारखान्यापासून तीन कोस दूर असणाऱ्या खेड्यात जाऊन राहायचे. 'भोगा: के रमणी विना क्षितातले' म्हणजे कारखान्यापासून दूर राहता येईल आणि कारखाना कसा चालतो (आपल्याविना) हेही समजेल.

योग्य वेळी आपले अधिकार आपल्या सहकाऱ्यांना द्यावे, या व्यवस्थापनातला अधिकार हस्तांतरणाच्या सिद्धांताचा ऊहापोह जो आज मांडला जातो त्याचे प्रात्यक्षिक नागेश बापट यांनी लिक्लेअरच्या माध्यमातून या कादंबरीद्वारे त्या काळीच मांडलेले आढळते. मग त्याने कारखान्याचे सर्व कारभार डीफोरनो साहेबांना सोपविला.

**लिक्लेअर आणि शेती**

कारखान्याच्या भरभराटीनंतर योग्य आणि जबाबदार व्यक्तीला कारखान्याचे हस्तांतरण करून लिक्लेअर हरब्ले या खेड्यात जाऊन स्थिरावला. आपल्या पत्नीविना तो आपले जीवनमान तो येथे कंठत होता. निसर्गाशी समरस होणे, झाडा-पानाफुलांचा आनंद घेणे आणि तेथील गावकऱ्यांशी एकरूप होणे आदी दिनक्रम लिक्लेअरचे होते. मोठ्या शहरात जाऊन राहू नका, तेथे माणसांची गिचडी व गलबला फार असतो. आपल्या गावी आनंदात राहून जमिनीची मेहनत-मशागत करून सुधारणा करा, शेतीची विद्या शास्त्रोक्त शिकून तयार व्हा, अशा आशयाची विधाने लिक्लेअर चरित्रामधून येतात. यामधून लेखकाचे निसर्गप्रेम, शेतीविषयीचे प्रेम व्यक्त होते. शेती करताना शेती व्यवसाय एक विद्या आहे आणि ती विद्या शास्त्रोक्त पद्धतीने मिळविली पाहिजे असा लिक्लेअरचा सल्ला बापटांचे शेतीविषयीचे प्रेम दर्शवितो. शेती केवळ विद्येवर नाही तर मेहनत आणि मशागतीची तिला गरज असते असे ते स्पष्ट करतात.

राजकारण हा लिक्लेअरच्या व्यक्तिमत्त्वाचा भाग नाही; परंतु ते अपरिहार्यपणे

करावे लागले तर ते झटून म्हणजे जीव लावून आणि निष्ठेने केले पाहिजे. एकदा काम स्वीकारल्यानंतर ते मेहनतीने करावयाचे असा त्याचा देह स्वभाव दर्शविलेला आहे. कार्याबद्दल अर्थात कामाबद्दल, म्हणजे कार्य संस्कृतीबाबत आदर आणि निष्ठा दर्शविणारे संवाद या लघुकादंबरीत जागोजागी येतात.

लहान लहान तुकड्यांनी शेती परवडत नाही, म्हणून ती सामूहिक करावी. सामूहिक शेतीचे समर्थन आणि योजना ही कादंबरी देते. एकूण गावची जमीन लहान लहान तुकड्याने कसल्यामुळे खूप जमीन पडीक पडते. शेती नांगरताना त्रास होतो. म्हणून लिक्लेअर महापौर असताना त्या समग्र गावच्या शेतकऱ्यांसाठी 'एकजुटीने शेतकी' असा श्रेष्ठ मसुदा तयार केला होता. अलीकडच्या काळातील सामूहिक शेतीचे समर्थन आणि प्रयोग याच स्वरूपाचे आहेत. बायकांना करावयाची शक्तीची कामे बंद करून पुरुषांना दिली. त्या गावासाठी नवीन पुस्तकालये (लायब्ररी) स्थापली. थोडक्यात, नगराध्यक्षाने गावासाठी कोणकोणती कामे केली पाहिजे याचे सुंदर विवेचन या वाचनीय आणि उमद्या शैलीत केले आहे. वाईट माणसांच्या अंगी 'भटूरकी' वृत्ती असते असे लेखक स्पष्ट करतात. वाईट अर्थाने धर्मोपदेश करून 'भटूरकी' वृत्तीने वागणाऱ्या माणसांचा निषेध त्या काळीही लेखकाने कादंबरीच्या माध्यमातून केलेला आहे. लेखकाचा सुधारणावादी दृष्टिकोन आणि पाखंडाचा निषेध करण्याची वृत्ती ही कादंबरी वाढविते हे निर्विवादपणे मान्य करावे लागते. 'धर्मोपदेशक गुणांनी चांगला नव्हता, उथळ मनाचा होता. त्याच्या अंगी भटूरक्या वृतीची सारी लक्षणे होती,' अशी वाक्ये लेखकाच्या निवेदनातून कादंबरीत येतात, जो या कथानकाचा अविभाज्य भाग आहे. ग्रामोपाध्याय, उपाध्याय अशा लोकांसाठी 'मत्सरी स्वभावाचे' हे विशेषण लेखकाने वापरले आहे.

लिक्लेअरची मृत्यूपूर्वीची सुधारणांची तगमग ठळक लक्षात येणारी आहे. आपल्या नंतर कारखान्याचे कसे व्यवस्थापन चालावे या बाबतच्या सूचनाही या कादंबरीत येतात. पुरोगामीत्व आणि आधुनिक शिक्षणाचे समर्थन करणारा पसारा कादंबरीतून आढळतो. 'जोपर्यंत खालच्या प्रतीच्या लोकांमध्ये खऱ्या ज्ञानाचा फैलाव होऊन अज्ञान नाहीसे झाले नाही तोपर्यंत त्यांना वर काढण्यासाठी आम्ही आपला हात दिलाच पाहिजे,'

असा एक सुधारणावादी विचार त्या काळी कादंबरी देते. खरे तर त्या काळातील सामाजिक, राजकीय आणि आर्थिक स्थितीची वर्णने आणि मते कादंबरीतून ठळकपणे येतात. ही मते मांडण्यासाठी लघुकादंबरी या कॉमचा वापर लेखकाने केला आहे. गरीब-श्रीमंत भेद अशी सामाजिक वर्गवारी लेखक स्वीकारतात. गरीब-श्रीमंतातील भेद खरे दु:खाचे कारण समजून तो दूर करण्यासाठी प्रयत्न करण्याची गरज कादंबरी व्यक्त करते. लिक्लेअरच्या मृत्यूनंतरच्या अराजकतेचे वर्णनही कादंबरीत त्या काळातली अराजकता दर्शविते.

**- डॉ. प्रभाकर हरकळ, परभणी**

♦♦

# परिशिष्ट

दक्षिणा प्राईझ

# दक्षिणा प्राईझ

**दक्षिणा प्राईझबद्दलचे लेख कशासाठी?**

या पुस्तकात दक्षिणा प्राईझबद्दल सविस्तर माहिती असलेले लेख प्रकाशित करीत आहोत. याचे विशेष कारण असे की, नागेश विनायक बापट यांच्या **'श्रीमंत बाजीराव बल्लाळ'** या पहिल्या पुस्तकाला त्यावेळी **दक्षिणा प्राईझचे पारितोषिक** मिळाले होते. या दक्षिणा प्राईझबद्दल वाचकांना सविस्तर माहिती मिळावी हा यामागे हेतू आहे.
दक्षिणा फंडातून उभारलेले त्यावेळचे पूना कॉलेज हे भारतातील पहिले कॉलेज होते. या कॉलेजात बापटांचे शिक्षण झाले होते, हेही या दक्षिणा प्राईझची माहिती देण्यामागे दुसरे कारण आहे.

# आभार

श्री. काशीकर, डॉ. श्रीकांत तांबे, श्री. होळंबे, कै. उषा हस्तक, श्री. जोगदेव, ग्रंथपाल, डॉ. बा. आं. मराठवाडा विद्यापीठ, श्री. गं. दे. खानोलकर, लतिका जोशी, मुंबई, श्री. वि. डोंगरे, डॉ. तांबे यांनी लेखन वाचून अनेक मौलिक सूचना केल्या, त्याबद्दल त्यांचा मी आभारी आहे.

दक्षिणा या विषयावर लेखन करण्याच्या या शुभकार्यात अनेकांचा सहभाग आहे. सर्वप्रथम माझे पणजोबा कै. नागेश विनायक बापट यांचे मी आभार मानले पाहिजे. त्यांच्या 'पहिले बाजीराव पेशवे यांचे चरित्र' या पुस्तकाला याला मिळालेले दक्षिणा प्राईझ व दक्षिणा फंडातून उभारलेल्या पूना कॉलेजचे त्यांचे विद्यार्थीपण यामुळे दक्षिणा ही संकल्पना काय आहे याची मला उत्सुकता लागली व त्या प्रेरणेमुळे हे लेखन झाले आहे, असे मी मानतो. त्यासाठीचे संशोधन मी गेली वीस वर्षे करीत आहे. कै. बापट यांच्या विषयीची माहिती माझे काका कै. अप्पासाहेब आपटे व बहीण कै. सौ. मंदा वेलणकर विसाळ यांच्याकडून मिळाली. त्यांनी या पुस्तकातील लेखन प्रकाशनापूर्वी वाचले व अधिक लिहिण्यास प्रोत्साहन दिले. त्याचप्रमाणे माझी पत्नी सौ. सुलभा, माझे भाऊ श्री. विनायक बापट व श्री. विलास बापट व बहीण सौ. निर्मला दामले व मुली सौ. अश्विनी कुंटे व डॉ. सौ. गौरी वैष्णव, श्री. सीताराम कुंटे, डॉ. मकरंद वैष्णव यांच्या सहकार्य व प्रोत्साहनाबद्दल त्यांचा आभारी आहे.

दक्षिणा या विषयासंबंधीची माहिती दोनशे वर्षांपूर्वीची आहे. ती माहिती उपलब्ध असणारी प्रकाशने, पुस्तके, मासिके इत्यादी व ती कुठे उपलब्ध असण्याची संभाव्यता आहे, याविषयी अनेकांचे मार्गदर्शन लाभले. विशेषत: डॉ. स. ग. मालशे, श्रीमती दुर्गाबाई भागवत, चित्रकार द. ग. गोडसे, डॉ. अरुणा ढेरे, डॉ. पंढरीनाथ रानडे, डॉ. रा. श्री. मोरवंचीकर, डॉ. सुधीर रसाळ, डॉ. माधव बापट, डॉ. एस. बी. गोगटे, डॉ. मोरखंडीकर, डॉ. कृष्ण अर्जुनवाडकर यांचा मी आभारी आहे. महाराष्ट्रातील व महाराष्ट्राबाहेरील अनेक ग्रंथालयांनीही ही माहिती दिली व साधनसामग्री प्रत्यक्ष उपलब्ध करून दिली. विशेषत: दिल्ली, कोलकाता, मद्रास व मुंबई येथील नॅशनल लायब्ररीज, मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय, मुंबई, डेक्कन कॉलेज, पुणे,

विश्रामबागवाडा, पुणे येथील शासकीय ग्रंथालय, पुणे विद्यापीठ, एशियाटिक लायब्ररी, मुंबई, मुंबई विद्यापीठ, एस.एन.डी.टी. विद्यापीठ, मुंबई, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद, एस.बी. कॉलेज, औरंगाबाद, महाराजा सयाजीराव गायकवाड विद्यापीठ, बडोदे, रत्नागिरी, बेळगाव, सावंतवाडी येथील सार्वजनिक ग्रंथालये, भारत इतिहास संशोधन मंडळ, पुणे, राजवाडे इतिहास संशोधन मंडळ, धुळे, इन्स्टिट्यूट ऑफ एज्युकेशन, पुणे, यांचा मी आभारी आहे. दक्षिणा या विषयावर अनेक कोशवाङ्मयात माहिती मिळाली. विशेषतः संस्कृतिकोश, चरित्रकोश, ज्ञानकोश, वाङ्मयकोश यातून काही माहिती उपलब्ध झाली. मुंबई येथील महाराष्ट्र शासनाच्या पुराभिलेख विभागात एकोणिसाव्या शतकातील ब्रिटिश अधिकाऱ्यांचा पत्रव्यवहार उपलब्ध आहे. त्यावरून दक्षिणा या विषयावरील मते कळतात. ही पत्रे डॉ. कै. आर.व्ही. परुळेकर यांनी प्रसिद्ध केली आहेत. ती दक्षिणा या विषयासाठी फारच उपयुक्त ठरली.

त्याचप्रमाणे गणेश त्र्यंबक बापट यांच्या ‘विश्रामबागवाड्याचा इतिहास’ पुस्तकाचा उपयोग झाला. दक्षिणा या पुस्तकातील काही मजकूर केसरी, अपूर्व, नवभारत, लोकसत्ता, साप्ताहिक सकाळ यामध्ये प्रसिद्ध झाला आहे. त्यांचाही मी आभारी आहे.

**- डॉ. नीलकंठ बापट**
औरंगाबाद

## अनुक्रमणिका

**१. दक्षिणा** /३८५
हेतू, उद्देश, इतिहास, रक्कम, नियम, पात्रता,
विनियोग, समाजाचा दृष्टिकोन, दक्षिणा फेलोशिप

**२. दक्षिणा प्राईझ** /३९८
उद्देश, स्वरूप, पुस्तकाची पात्रता, लेखकाची पात्रता,
वेळापत्रक, परीक्षण, वितरण, मानधन, बक्षीस मिळालेले,
दक्षिणा प्राईझ समिती व सभासद समितीचा अहवाल

**३. हिंदू तथा पूना कॉलेजची स्थापना :** /४१२
चॅपलिनची योजना, स्थापनेविषयी वाद, अभ्यासक्रम,
व्यवस्थापन, उत्सव

**४. पूना कॉलेज : अभ्यासक्रम** /४२३
शिकवले जाणारे विषय, अभ्यासक्रमातील बदल
विद्यार्थी प्रसिद्ध विद्यार्थी साधनसामग्री

**५. पूना कॉलेज : व्यवस्थापन** /४३९
प्रिन्सिपॉल व शिक्षक व्यवस्थापन,
कचेरी व्यवस्थापन, पूना कॉलेजातील प्राध्यापक

१.

# दक्षिणा

हिंदू समाजात दान देणे, विशेषतः विद्वान ब्राह्मणांना दान देणे हे पुण्यकर्म समजले जाते. असे दान देणे ही प्राचीन परंपरा आहे. ज्याला दान दिले त्याच्याकडून दान देणारा कोणतीही सेवा अपेक्षित नसतो. रूढीप्रमाणे ब्राह्मणाने ज्ञानार्जन व ज्ञानाचे संवर्धन व ज्ञानप्रसार करण्यात आपले आयुष्य व्यतीत करायचे असते. तो स्वतः कोणत्याही उत्पादन साधनांचा मालक नसल्याने समाजाने त्याच्या उपजीविकेची व्यवस्था करावी लागते. यासाठी ब्राह्मणाला दिलेल्या दानास दक्षिणा असे म्हणतात. दक्षिणा हा संस्कृत शब्द आहे व त्याचा अर्थ विद्वान ब्राह्मणास दिलेले दान.

महाराष्ट्रात छत्रपती शिवाजीराजे यांनी त्यांच्या राज्यारोहणप्रसंगी, म्हणजे १६७४ मध्ये श्रावण महिन्यात विद्वान ब्राह्मणांना दान दिल्याची नोंद आहे. पुढे महाराजांच्या मृत्यूनंतर संभाजीराजांनीही ही प्रथा चालू ठेवली. तसेच राजाराम महाराज व थोरले शाहू महाराज यांच्या काळातही दक्षिणा दिली जात असे. एका वेदग्रंथाचा अभ्यास केलेल्यास एक मण धान्य व दहा रुपये दिले जात, तर दशग्रंथी ब्राह्मणास दहा मण धान्य व शंभर रुपये दिले जात, यासाठी पंडितराव या प्रधानाची नेमणूक केली जाई.

थोरल्या शाहू महाराजांनी दक्षिणा देण्याची जबाबदारी त्यांचा सेनापती खंडेराव दाभाडे यांजकडे दिली. खंडेराव दाभाडे यांचा मुलगा त्र्यंबकराव याजकडे पुढे हे काम देण्यात आले. पुण्याजवळील तळेगाव हे दाभाडे कुटुंबाचे मूळ गाव व त्या ठिकाणी दाभाडे कुटुंबाकडून छत्रपतींच्या वतीने दरवर्षी श्रावण महिन्यात दक्षिणा वाटली जात असे. पुढे पेशवे व दाभाडे यांचे डभई येथे युद्ध झाले व त्यात त्र्यंबकराव याचा मृत्यू झाला. त्यामुळे दक्षिणा देण्याची जबाबदारी पेशव्यांकडे आली. त्यामुळे इ.स. १७३१

पासून पहिला बाजीराव पेशवा श्रावण महिन्यात पुणे येथील आपल्या निवासस्थानी - शनिवारवाड्यात दक्षिणा देऊ लागला. बाजीरावानंतर इतर पेशव्यांनीही श्रावण महिन्यात दक्षिणा वाटण्याची प्रथा चालूच ठेवली. त्यावेळी पुण्यातील पर्वतीच्या पायथ्याशी असलेल्या रमण्यात दक्षिणा वाटप होत असे. इ.स. १८१८ मध्ये दुसऱ्या बाजीरावाचा ब्रिटिशांशी झालेल्या युद्धात पराभव झाला. त्यानंतर दक्षिणा वाटपाची जबाबदारी ब्रिटिशांकडे आली. ब्रिटिश काळात दक्षिणेचे स्वरूप बदलले. नव्याने उघडलेल्या कॉलेजमधील विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीरूपाने दक्षिणा दिली जाऊ लागली. स्वातंत्र्योतर काळातही दक्षिणा शिष्यवृत्ती दिली जात आहे. छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळात (१६७४ इ.स.) सुरू झालेली ही प्रथा आजपर्यंत गेली ३३२ वर्षे अखंडित चालू आहे. या तीनशे वर्षांच्या काळात विशेषत: ब्रिटिश काळात दक्षिणा वाटप पद्धतीत कोणकोणते प्रश्न निर्माण झाले व त्यावर काय उपाय योजले गेले याचा अभ्यास उद्‌बोधक ठरेल. विशेषत: दक्षिणेची रक्कम, दक्षिणा मिळणाऱ्यांची पात्रता, दक्षिणा वाटण्याची पद्धत, दक्षिणा वाटपाचे उद्देश, त्यासंबंधात निर्णय घेणाऱ्या व्यक्ती व अधिकारी याबाबत काळाच्या ओघात अनेक बदल झाले. त्याचा अभ्यास करणे हा या लेखाचा उद्देश आहे.

**दक्षिणा रक्कम :**

श्रावण महिन्यात विद्वान ब्राह्मणांना दक्षिणा वाटली जात असे. १६७४ मध्ये छत्रपती शिवाजी महाराजांच्या राज्याभिषेकानिमित्त दक्षिणा वाटण्याची सुरुवात झाली. या स्वरूपात दक्षिणा वाटण्याची प्रथा १९०५ पर्यंत चालू राहिली. त्यानंतर तिचे स्वरूप बदलले. या सव्वादोनशे वर्षांच्या काळात एक वेद शिकलेल्या ब्राह्मणास एक मण धान्य व दहा रुपये दिले जात, तर दशग्रंथी ब्राह्मणास १० मण धान्य व १०० रुपये दिले जात. पुढे संभाजीराजे व राजाराम महाराज यांनीही ही प्रथा चालू ठेवली. छत्रपती शाहू महाराजांनी त्यांचे सेनापती खंडेराव दाभाडे यांना आपल्या उत्पन्नातून श्रावण महिन्यात दोन ते तीन लाख रुपये दक्षिणा वाटण्याची आज्ञा दिली. संबंधित वर्षीच्या उत्पन्नानुसार या रकमेत बदल होत असे. १७३१ मध्ये ही जबाबदारी पहिल्या बाजीराव पेशव्यांकडे आली व त्यांनी सुरुवातीला १६,००० रुपये दक्षिणारूपाने वाटले. पुढे ती रक्कम पन्नास हजारांपर्यंत

वाढली. नानासाहेब पेशव्यांच्या काळात मराठी सत्तेचा अधिक विस्तार झाला व त्यांची आर्थिक सुबत्ताही वाढली. इ.स. १७५२ मध्ये त्यांनी अडीच लाख रुपये दक्षिणा वाटली आणि ती रक्कम पुढे अठरा लाखपर्यंत वाढली. दुसऱ्या बाजीरावानेही सढळ हाताने रक्कम वाटलेली आढळते. सन १८१८ मध्ये पेशवाई समाप्त झाली. त्यावर्षी दहा लाख रुपये दक्षिणा वाटल्याची नोंद आहे. त्यासाठी सर्व हिंदुस्थानातून ६०,००० ब्राह्मण आले होते.

मराठी साम्राज्याच्या काळात आजच्यासारख्या सार्वजनिक शाळा, महाविद्यालये नव्हती व फी आकारून शिक्षण देण्याची पद्धत नव्हती. शिक्षण देण्याचे कार्य हे ब्राह्मण वर्गाचे होते. अनेक जण हे शिक्षण आपल्या घरी देत वा त्यासाठी पाठशाळा चालवत. फी आकारण्याची पद्धत नसल्याने दक्षिणारूपाने मिळणारी रक्कम हेच त्यांचे उत्पन्न होते. त्यामुळे एका अर्थाने मराठी साम्राज्य काळात शासनाने शिक्षणावर केलेला खर्च हा दक्षिणारूपाने केला जाई. १८१८ मध्ये मराठी साम्राज्याचा अस्त झाला व ब्रिटिश साम्राज्याची महाराष्ट्रात मुहूर्तमेढ रोवली गेली.

ब्रिटिश काळात मात्र या 'दक्षिणा' प्रथेला छेद दिल्याचे आढळून येते. पेशव्यांचा पराभव झाल्यानंतर व ब्रिटिश सत्तेवर आल्यावर लोकांमध्ये असंतोष निर्माण होऊ नये म्हणून ब्रिटिश सत्तेचा संस्थापक माऊंट स्टुअर्ट एल्फिन्स्टनने जाहीर केले की, पेशवे काळात लोकांचे जे अधिकार होते ते आम्ही अबाधित ठेवू. लोकांकडे असलेली वतने व अन्य उत्पन्नाची साधने आपण काढून घेणार नाही. त्यामुळे तत्कालीन लोकक्षोभ टाळता आला. आपण दोन लाख रुपये दक्षिणारूपाने वाटू असे त्याने जाहीर केले. पण प्रत्यक्षात पन्नास हजारच वाटले. त्याच्या दृष्टीने हा धार्मिक खर्च होता व तो सरकारी तिजोरीतून देऊ नये, असे त्याचे मत होते. अर्थात व्यावहारिकदृष्ट्या असे करणे हिताचे नव्हते. कारण तसे झाले असते तर, असंतोष वाढला असता. पुण्यातील ब्राह्मण वर्ग त्याच्या विरोधात होता व दक्षिणेचा उपयोग ब्राह्मण समाजातील असंतोष मोडून काढण्यासाठी करता येईल हे त्याने जाणले. अर्थात, ब्रिटिश अधिकाऱ्यांतही दोन मतप्रवाह होते. काहींच्या मते दक्षिणा वाटल्यामुळे असंतोष भडकवणारे शांत होतील, तर इतरांच्या मते पुण्यातील ब्राह्मण वर्ग ब्रिटिशांविरोधी आहे, तेव्हा त्यांना कोणत्याही प्रकारे

आर्थिक मदत करू नये व लवकरात लवकर दक्षिणा प्रथा बंद करावी.

एल्फिन्स्टनची पुण्याहून मुंबईला गव्हर्नर म्हणून बदली झाली व १८१९ मध्ये विल्यम चॅपलिन हा पुण्याचा कमिशनर म्हणून रुजू झाला. चॅपलिनने पाच शास्त्रींची समिती नेमली व दक्षिणा मागण्यासाठी आलेल्या ब्राह्मणांची परीक्षा घेऊन लायक उमेदवारांची निवड करण्यास सांगितले. समितीने ७५,६७१ रुपये दक्षिणारूपाने द्यावेत, अशी शिफारस केली; पण चॅपलिनने ते मान्य केले नाही व फक्त २,६७५ ब्राह्मणांना ४५,४०४ रुपये वाटले. पुढच्या वर्षी म्हणजे १८२१ मध्ये ही रक्कम आणखीन कमी केली. १८२२ मध्ये अंदाजे सदतीस हजार रुपये वाटले आणि इ.स. १८२४ मध्ये तर दक्षिणेची रक्कम फक्त तीस हजार रुपयांवर आली. इ.स. १८४९ मध्ये तर दक्षिणेची रक्कम १८,००० रुपयांवर आली. इ.स. १८५७ मध्ये दक्षिणारूपाने फक्त १२,००० रुपये दिले. दरवर्षी ही रक्कम अशीच कमी कमी होत, शेवटी १९०५ मध्ये फक्त २७ रुपये दक्षिणा दिलेली आढळते. त्यानंतर दक्षिणा प्रथाच बंद झाली. कारण ब्रिटिशांनी दक्षिणा रक्कम कमी करण्यासाठी वेळोवेळी विविध कारणे दिलेली आढळून येतात; पण सर्वांच्या मागे जे प्रमुख सूत्र होते ते म्हणजे लोकांचे जुन्या राज्यव्यवस्थेशी असलेली बांधिलकी तोडणे व ब्रिटिश राज्यव्यवस्थेशी बांधिलकी प्रस्थापित करणे हे होते.

दक्षिणेची जबाबदारी कमी करण्यामागील एक क्लृप्ती म्हणजे दक्षिणा मिळण्यास पात्र असणाऱ्यांना विविध कारणांनी अपात्र ठरवणे. संस्थाने खालसा करतानाही ब्रिटिशांनी ही नीती अवलंबली. ब्राह्मणांना द्यावयाच्या एकूण दक्षिणा रकमेतून काही रक्कम वजावट करून त्या रकमेतून संस्कृत कॉलेज तथा संस्कृत पाठशाळा सुरू करण्याचा प्रस्ताव मांडण्यात आला आणि त्यासाठी मूळ ५० हजार दक्षिणा रकमेतून २० हजार रुपये बाजूला काढण्यात आले व फक्त ३० हजार रुपये वाटण्यात आले. सुरुवातीला पाठशाळेत शिक्षण घेणाऱ्यांना दक्षिणा फंडाच्या वाचलेल्या रकमेतून शिष्यवृत्ती देण्यास प्रारंभ झाला. पुढे कॉलेजात शिकवणाऱ्या शास्त्री व प्राध्यापकांचा पगारही दक्षिणा फंडातून देण्यास सुरुवात झाली. कॉलेजातील अशिक्षकी कर्मचाऱ्यांचा पगार व काही अन्य गोष्टीवरील खर्चासाठी दक्षिणा फंडाचा उपयोग होऊ लागला. उदाहरणार्थ १८३८ मध्ये तीन कारकून ६५ रुपये,

शिपाई १६ रुपये व तात्कालीन खर्च १७.४ आणि हा खर्च दक्षिणेतून दिला गेला. कारकून व शिपाई लोकांनाही दक्षिणा देण्यात आली. पूर्वीच्या काळी दक्षिणेसाठी काशीपासून रामेश्वरपर्यंतचे ब्राह्मण येत. दक्षिणेची शिक्षणाचा प्रसार भारतभर होण्यास मदत होत असे. नव्या पद्धतीने पुण्यात सुरू झालेल्या संस्कृत पाठशाळेपुरताच शिक्षणाचा प्रसार मर्यादित राहिला व शिक्षणसेवेचे केंद्रीकरण झाले.

दक्षिणेचे वाटप करण्यासाठी काही नियम बनवण्याचा प्रयत्न ब्रिटिश शासनाने केला. दक्षिणा वाटपात अनेक दोष आढळून आले व अपहार झाल्याच्या, अपात्र ब्राह्मणांना दान दिल्याची चर्चा होऊ लागली. दक्षिणा वाटणाऱ्या शास्त्रींवर टीका होऊ लागली. तेव्हा दक्षिणा वाटपासंबंधित नियम करण्यासाठी कलेक्टर, मराठा सरदारांचा प्रतिनिधी, रेव्हेन्यू व ज्युडिशियल कमिशनर इत्यादी सभासदांची एक समिती स्थापन करण्यात आली. १८३८ मध्ये स्थापन झालेल्या या समितीने सोळा नियम केले. त्यातील महत्त्वाचे असे होते - दक्षिणा मिळणाऱ्या सर्व ब्राह्मणांची एक यादी तयार करण्यात यावी व त्यात प्रत्येकाची ओळख पटणारी सर्व माहिती ठेवावी. दक्षिणा वाटपाच्या वेळी या यादीप्रमाणे ओळख पटवून मगच दक्षिणा देण्यात यावी.

ओळख पटवणाऱ्यासाठी स्वतंत्र माणसे नेमली. दक्षिणा मिळणाऱ्या माणसाचा अधिकार त्याच्या आयुष्यापुरताच मर्यादित राहील. त्याच्या मृत्यूनंतर त्याच्या वारसांना हा हक्क मिळणार नाही. दक्षिणा घेण्यासाठी ब्राह्मणाने समक्ष येणे आवश्यक आहे. तो न आल्यास त्याच्या प्रतिनिधीला दक्षिणा मिळणार नाही व त्याचा अधिकारही संपुष्टात येईल. दक्षिणा मिळण्यासाठी नव्या अर्जाचा विचार केला जाणार नाही. १९३६ मध्ये जी यादी झाली तीच अंतिम यादी ठरली. त्यात कोणतीही वाढ झाली नाही. उलट मृत्यू वा गैरहजेरीमुळे ती यादी छोटी होत गेली.

वैदिक ब्राह्मण पुण्यात अशांतता निर्माण करतात. ते प्रतिगामी आहेत व ते ब्रिटिश सरकार विरोधी आहेत, ही भूमिका ब्रिटिश अधिकाऱ्यांनी घेतल्याने वैदिक ब्राह्मणांची नावे दक्षिणेस पात्र असणाऱ्यांच्या यादीतून गाळण्यात आली. काही काळाने संस्कृत शिकलेल्यांना वगळण्यात आले. कारण संस्कृत शिकणाऱ्यांचा ब्रिटिश शासनास काही उपयोग नव्हता.

त्यांना वेद अध्ययनाशिवाय अन्य शास्त्रांची व स्किल्सची माहिती नाही, त्यामुळे त्यांचे जीवन अस्थिर झालेले आहे, अनेकांना कर्जे झालेली आहे, असा अर्ज करण्यात आला. अर्जदारांचा विचार करण्यासाठी पाच शास्त्रींची समिती नेमण्यात आली. त्यासाठी त्यांना दक्षिणा फंडातून परीक्षक म्हणून मिळणारे प्रत्येकी शंभर रुपये असे मानधन त्यांनी नाकारले व आपल्याला दक्षिणा फंडातून मानधन न देता स्वतंत्र मानधन द्यावे, अशी विनंती केली; पण सरकारने ते मान्य केले नाही. वैदिकांना दक्षिणा मिळण्यास पात्र असणाऱ्यांच्या यादीतून वगळण्यात आले व नव्या अर्जदारांचा विचार न करण्याचे ठरले. ब्राह्मणांना देण्यात येणाऱ्या दक्षिणा रकमेत विविध कारणांस्तव घट झालेली दिसते. त्यातले १८३३ मध्ये रामचंद्र नाना पुणेकर यांचे प्रकरण वादळी ठरले. रामचंद्र नाना या ब्राह्मणास दरसाल ९५ रुपये दक्षिणा मिळत असे; पण रामचंद्र नानाने मिचेल या मिशनऱ्याकडून ख्रिश्चन धर्म स्वीकारला. तेव्हा अन्य ब्राह्मणांना दक्षिणा ही फक्त हिंदू धर्मीयांनाच दिली जाते, म्हणून रामचंद्र नानास या वर्षीपासून दक्षिणा देऊ नये व ती रक्कम अन्य ब्राह्मणांना द्यावी ही भूमिका घेतली. यावर रामचंद्र नानाने अर्ज केला की, ब्राह्मणाने अभ्यासायचे सर्व ग्रंथ मी अभ्यासले आहेत. मला ९५ रुपये वर्षासन म्हणून मिळत आहेत. तरी ते वर्षासन चालू ठेवावे. ब्रिटिश कलेक्टर सदरलँड व गव्हर्नर क्लेअर यांनी रामचंद्र नानाचे म्हणणे ग्राह्य धरले व त्यास त्याच्या हयातीपर्यंत वर्षासन द्यावे, असा निर्णय घेतला, ही रक्कम दक्षिणा फंडातून द्यावी, तेवढ्या प्रमाणात दक्षिणेची एकूण रक्कम ९५ रुपयांनी कमी करावी (३० हजार रुपयांऐवजी २९,९०५ रुपये यापुढे वाटावेत). या निर्णयावर अन्य ब्राह्मण मंडळाने विरोध दर्शविला. यानिमित्ताने निर्माण झालेला असंतोष शमविण्यासाठी ब्रिटिश सरकारने मध्यम मार्ग अवलंबिला. ख्रिश्चन झालेल्या रामचंद्र नानास शासकीय पाठिंबा मिळालाच पाहिजे; परंतु त्यानिमित्ताने होणारा असंतोषही टाळला पाहिजे असे वाटल्यावरून सरकारने असा निर्णय घेतला की, रामचंद्र नानाची दक्षिणा चालू ठेवावी, पण ते पैसे दक्षिणा रकमेतून वजा न करता सरकारी खजिन्यातून द्यावेत.

अशा रीतीने ब्रिटिश काळात विविध कारणांनी दक्षिणा घेण्यास हजर होऊ न शकणाऱ्या ब्राह्मणांची संख्या दरवर्षी वाढतच गेली आणि नव्या अर्जांचा स्वीकार न केल्यामुळे दरवर्षी दक्षिणेतील काही रक्कम शिल्लक

पडू लागली. १८३९ ते १८४६ या काळात एकूण रक्कम अंदाजे २५,००० रुपये जमली. पुढे १८४६, १८४७, १८४८ व १८४९ यावर्षी अनुक्रमे अंदाजे ३,३२७, ५,१४१, ६,२३८, ६,८९४ रुपये वाचले. तेव्हा १८५० पर्यंत न वाटलेली दक्षिणा ५०,००० रुपये जमली. या रकमेचा विनियोग कसा करावा याविषयी नवे-नवे प्रस्ताव येऊ लागले. या बचत झालेल्या रकमेचा उपयोग विश्रामबागवाड्यात सुरू झालेल्या हिंदू तथा पूना कॉलेजसाठी करावा, कॉलेज प्राध्यापकांना पगार, कॉलेजातील विद्यार्थ्यांचे विद्यावेतन, कॉलेजसाठी येणारा व्यवस्थापकीय खर्च, पुस्तके इत्यादीसाठी करावा असे ठरले, तसेच मराठी भाषेत पुस्तके लिहिण्यासाठी प्रोत्साहनपर बक्षिसे ठेवावीत, असे वेगवेगळे प्रस्ताव पुढे आले व काही प्रमाणात मान्यही झाले.

१८५० मध्ये नवी पुस्तके लिहिणाऱ्या लेखकांसाठी दोनशे रुपयांची दोन, एकशे पन्नास रुपयांची चार व शंभर रुपयांची पाच बक्षिसे, अशी एकूण १,५०० रुपयांची अकरा बक्षिसे फंडातून देण्याचे ठरले. पण नव्या अर्जदारांचा विचार व वैदिकांचा विचार दक्षिणेसाठी परत कधीही झाला नाही.

**दक्षिणेसाठी पात्रता :**

दक्षिणा कोणाला द्यायची व किती द्यायची याविषयी काळानुसार वेगवेगळे विचार पुढे आले. सुरुवातीला संस्कृतमधील विद्वानांना दक्षिणा दिली जाई. छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळात एका शास्त्रात पारंगत असणाऱ्यास १ मण धान्य व दहा रुपये दिले जात व दशग्रंथी ब्राह्मणास १० मण धान्य व शंभर रुपये दिले जात. अष्टप्रधानांपैकी पंडितराव यांच्याकडे ब्राह्मणाची पात्रता ठरवणे व त्याच्या योग्यतेनुसार त्यास दक्षिणा देणे हे काम दिले जाई.

दक्षिणा मिळणे हे एका अर्थाने संस्कृत अध्ययनात मिळवलेल्या प्रावीण्याचे प्रमाणपत्र होते. मराठी राज्याचा अठराव्या शतकात जसा विस्तार झाला, तसतशी दक्षिणेची रक्कम वाढू लागली. पेशवे स्वत: ब्राह्मण असल्यामुळे नानासाहेब पेशव्यांच्या काळात काही लाख रुपये दक्षिणारूपाने वाटण्यात आले. त्यामुळे भारतातील कानाकोपऱ्यातून ब्राह्मण श्रावण महिन्यात पुण्यात दक्षिणेच्या आशेने जमत असत. त्यांना मिळणाऱ्या दक्षिणेची रक्कम ब्राह्मणाच्या अध्ययनाच्या प्रावीण्यावर अवलंबून असे. शृंगेरी, कांची, श्रीरंगपटणम, कुंभकोणम, तंजोर आणि रामेश्वर ही दक्षिणेकडील केंद्रे होती.

तिथून विद्वान ब्राह्मण आल्याची नोंद आहे. यामध्ये वेद जाणणारे वैदिक, ज्योतिषी, व्याकरण, न्याय, धर्मशास्त्र, अलंकार, आरोग्य (वैद्य) या शास्त्रांतील पारंगत विद्वान जमलेले असत. दक्षिणा देणे हे एक धार्मिक पुण्यकर्म आहे, असे समजले जात असे. जे ब्राह्मण विशिष्ट शास्त्रात पारंगत होते त्यांची परीक्षा पेशव्यांच्या निवासस्थानी म्हणजे शनिवारवाड्यावर घेतली जाई व शास्त्रींच्या योग्यतेनुसार दक्षिणा दिली जाई. १७७० मध्ये ४०,००० ब्राह्मण पुण्यात जमा झाले होते व त्यातील १,६०० जणांची परीक्षा घेण्यात आली. जास्तीत जास्त १,००० रुपये दक्षिणा एका ब्राह्मणास दिल्याची नोंद आहे.

जे ब्राह्मण परीक्षा देत नसत, त्यांच्यासाठी स्वतंत्र व्यवस्था केली जाई. पुण्यातील पर्वती टेकडीच्या पायथ्याशी पटांगणात ते एकत्र येत, त्यास रमणा असे म्हणत. श्रावण महिन्यातील नागपंचमीनंतर दहा दिवस रमण्यात दक्षिणा वाटली जाई. दक्षिणा वाटण्यासाठी पेशवे व त्यांचे नातेवाईक स्वत: हजर असत.

ब्राह्मणांचे दर्शन घेण्यासाठी गावातील लोक रमण्याच्या बाहेर मोठ्या प्रमाणावर जमत. रमण्यास प्रदक्षिणा घालणे हे एक पुण्यकर्म समजले जाई.

सुरुवातीला दक्षिणा ही फक्त ब्राह्मणास दिली जाई; पण पुढे त्यास दानधर्माचे स्वरूप आले व त्या काळात सर्व जाती-जमातीतील, धर्मांतील गरीब, अपंग, अनाथ यांनाही दानधर्म केला जाई. अशांची संख्या हजारात असे. पेशवाई संपुष्टात आल्यानंतर दक्षिणा देण्याची जबाबदारी ब्रिटिशांवर आली. ब्रिटिशांनी सुरुवातीच्या काळात जुन्या प्रथेप्रमाणे दक्षिणा वाटली, पण अशा रीतीने दक्षिणा वाटणे म्हणजे हिंदू धर्माला प्रोत्साहन देण्यासारखे होते आणि ख्रिश्चन राज्यकर्त्यांना हे मानवणारे नव्हतेच. तेव्हा कमिशनरने याबाबत नव्याने विचार करायला सुरुवात केली व हिंदू धर्मशास्त्रांत प्रावीण्य मिळवणाऱ्यांना आर्थिक मदत न देता शिक्षणामध्ये प्रावीण्य मिळविणाऱ्यांना दक्षिणा द्यायचे त्याने ठरवले. संस्कृतमधील प्रावीण्याचा ब्रिटिश शासनास उपयोग नव्हता. त्यांना येथील लोकांवर राज्य करायचे होते. त्यासाठी राज्यकारभार करण्यासाठी उपयुक्त ठरण्याऱ्या विद्या लोकांना याव्यात ही त्यांची इच्छा होती. वेद, वेदांत, धर्मशास्त्र, न्याय, व्याकरण, ज्योतिष याच्या अभ्यासाशी त्यांना काहीच देणे-घेणे नव्हते. प्रजाजनांनी

त्यांची संस्कृती व भाषा विसरणे व राज्यकर्त्यांची भाषा अवगत करणे जरूरीचे होते. यासाठी इंग्रजी शिक्षणाची व्यवस्था करण्यात आली व ते शिक्षण घेणाऱ्यांना विद्यावेतन देण्याची व्यवस्था करण्यात आली. दक्षिणा फंडातील जवळजवळ निम्मी रक्कम त्यांनी नव्या पद्धतीने शिक्षण घेणाऱ्यांवर खर्च करावयास सुरुवात केली.

ब्रिटिशांनी दक्षिणा मिळण्यासाठी उमेदवाराची जी पात्रता ठरवली ती दोन प्रकारची होती. एक शैक्षणिक व दुसरी व्यवस्थापकीय. शैक्षणिक पात्रता दोन प्रकारची होती. एक अभ्यासासाठी निवडलेले विषय आणि निवडलेल्या विषयातील प्रावीण्य, ज्योतिष, व्याकरण, न्याय, धर्मशास्त्र, अलंकार व वैद्यशास्त्र हे विषय शिकलेले ब्राह्मण दक्षिणेसाठी पात्र धरले गेले. त्यातल्या त्यात ज्योतिष व धर्मशास्त्र असणाऱ्यास दान दिले, पण वेदांचा अभ्यास करणारे वैदिक यांना अपात्र ठरवण्यात आले. वैदिक हेच संख्येने जास्त होते. त्यांनाच अपात्र ठरवल्यामुळे दक्षिणारूपाने द्यावयाची रक्कम आपोआपच कमी झाली. वैदिकांनी या निर्णयाविरुद्ध लंडनला कोर्ट ऑफ डायरेक्टर्सकडेही अपील केले, पण उपयोग झाला नाही. एखाद्या विषयात पारंगत नसणाऱ्यांनाही दक्षिणा दिली जाते, अशा अनेक तक्रारी येऊ लागल्या. त्यामुळे ब्रिटिश सरकारने विद्वान ब्राह्मणांची समिती नेमली. नारायणशास्त्री, त्र्यंबकशास्त्री, मोरशास्त्री साठे, विनायकशास्त्री, रामचंद्रशास्त्री, धोंडशास्त्री यांनी त्यांच्या विषयातील विद्यार्थ्यांची परीक्षा घ्यावयाची असे ठरले. ही परीक्षा विश्रामबागवाड्यात घेतली जाई व राघवाचार्य हे समितीप्रमुख होते.

दक्षिणा घेण्यास लायक ठरलेल्या ब्राह्मणांची यादी करण्यात आली व प्रत्येकास पात्रतेचे प्रमाणपत्र देण्यात आले. १८३७ मध्ये १,९१९ ब्राह्मण दक्षिणेस पात्र ठरवण्यात आले आणि त्यांना २७,६६५ रुपये वाटण्यात आले.

दुसरा प्रशासकीय निर्णय असा होता की, कोणाही नव्या उमेदवाराचा दक्षिणेसाठी विचार होऊ नये, दक्षिणा फक्त पंडितांना देणे पण वैदिकांना दक्षिणा न देणे, परीक्षेत अयशस्वी झालेल्यांना दक्षिणा न देणे, दक्षिणा फक्त उमेदवाराच्या हयातीपर्यंत देणे, वारसाहक्क नामंजूर करणे व नव्या उमेदवाराचा विचार न करणे या नियमांमुळे दक्षिणा मिळण्यास पात्र असणाऱ्यांची यादी दरवर्षी छोटी होऊ लागली आणि १९०५ च्या सुमारास

यादी पूर्णपणे संपुष्टात आली. अशा रीतीने पात्रतेच्या अटींद्वारे ब्रिटिश सरकारने दक्षिणा वाटण्याची आपली जबाबदारी संपवली.

हिंदू धर्मात वेदांच्या अभ्यासास विशेष महत्त्व होते. ऋग्वेद, यजुर्वेद, सामवेद व अथर्ववेद या चार वेदांचा अभ्यास केला जाई. छपाईचे तंत्र उपलब्ध नसल्यामुळे ज्ञानाचे संरक्षण व जतन हे पाठांतराद्वारे केले जाई. ब्राह्मण वर्गातील बऱ्याच जणांचा आयुष्यातील बराच काळ वेदांचे पठण करणे व नव्या पिढीस वेद शिकवणे यात जात असे. चारही वेदांचा अभ्यास पूर्ण करण्यास वयाची जवळजवळ तिशी ओलांडली जाई. यामुळे वेदपठणाशिवाय अन्य कौशल्ये त्यांच्याकडे नसत. वेदपठण हेच त्यांचे जीवन, त्यावर जगणे कठीणच होते. राज्यप्रमुखांकडून वैदिक ब्राह्मणांना दान दिले जाई. या दानास दक्षिणा म्हटले जाई. दक्षिणा म्हणजे ज्ञानार्जन, ज्ञानवर्धन व ज्ञानप्रसारण करणाऱ्यास प्रोत्साहन देणे हा आहे, काळानुसार त्याचे स्वरूप मात्र बदलत गेलेले दिसते.

छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळात वेदविद्येचा प्रसार व्हावा हा उद्देश होता व त्यामुळे वैदिक ब्राह्मणांना दक्षिणा दिली जाई. त्यांच्या वंशजांनीही हा उद्देश पुढे ठेवून दक्षिणेची प्रथा पुढे चालू ठेवली. संभाजी महाराज, राजाराम महाराज व शाहू महाराज यांनी दक्षिणा वाटण्याची प्रथा चालू ठेवली. पेशव्यांच्या काळातही पुढील ८० वर्षे ही प्रथा चालू होती. वैदिकांबरोबर न्याय, ज्योतिष, धर्मशास्त्र यातील पंडितांनाही दक्षिणा दिली जाई. पेशवाईच्या काळात दक्षिणा वाटप ब्राह्मणांपुरतेच मर्यादित राहिले नाही. त्याला दानधर्माचे रूपही प्राप्त झाले. सर्व जातीधर्मांतील गरीब, आश्रित, अपंग, भिकारी यांनाही दान देण्यात येऊ लागले.

ब्रिटिश काळात सर्वांना सरसकट दानधर्म करणे ही प्रथा बंद झाली. दक्षिणा देण्याच्या उद्देशातही बदल झाले. वैदिकांना दक्षिणा देण्याचे थांबविण्यात आले व व्यवहारात उपयोगी पडणारी शास्त्रे शिकणाऱ्यांना दक्षिणा देण्याचे ठरवण्यात आले. ब्रिटिश शासनाची गरज व दैनंदिन व्यवहारात उपयोगी पडणाऱ्या शास्त्रांचा पाठपुरावा करणे हा नवा उद्देश पुढे आला. शिक्षणाचा उद्देश जीवनासाठी उपयुक्तता हे आहे हा नवा विचार अधिक प्रबळ झाल्याचे आढळते. त्यामुळे संस्कृतऐवजी इंग्रजी व मराठी भाषांच्या अभ्यासास प्रोत्साहन मिळाले. दक्षिणा रकमेचा उपयोग नव्याने सुरू केलेल्या संस्कृत

पाठशाळा तथा हिंदू कॉलेज म्हणजेच पूना कॉलेजमधील विद्यार्थी, शिक्षक व व्यवस्थापकीय कर्मचारी यांच्यासाठी होऊ लागला. पूना कॉलेजसाठी आवश्यक असणारे 'इन्फ्रास्ट्रक्चर' ही दक्षिणा रकमेतून उभारण्यात आली. कॉलेजला आवश्यक असणारा छापखाना उभारणे हाही दक्षिणेचा एक प्रमुख उद्देश झाला. पूर्वीच्या काळी पाठांतराला महत्त्व होते. नव्या युगात म्हणजे एकोणिसाव्या शतकात शिक्षण ब्राह्मणांपुरतेच मर्यादित न राहता समाजाच्या सर्व स्तरांपर्यंत ते पोहोचवणे हा नवा उद्देश पुढे आला. या नव्या उद्देशाच्या पूर्ततेसाठी नवी साधने आवश्यक झाली. यामुळे एकोणिसाव्या शतकात छापील पुस्तकांना अनन्यसाधारण महत्त्व आले व दक्षिणेचा नवीन उद्देश मान्यता पावला. ब्रिटिश काळात पुस्तकनिर्मितीसाठी बक्षिसे ठेवण्यात आली व त्यासाठी परीक्षकांची समिती नेमण्यात आली. आजही वेगळ्या स्वरूपात विद्यार्थ्यांना विद्यावेतन, शिक्षकांचे पगार, पुस्तके प्रकाशित करण्यासाठी बक्षिसे यावर शासनाकडून खर्च केला जातो.

दक्षिणा देण्याची व्यवस्था राज्यकर्ते व त्यांचे सरदार करीत. ते दक्षिणा वाटत असत. राज्यकर्त्यांनी दक्षिणेचे वाटप करण्यासाठी स्वतंत्र व्यवस्था केल्याचे आढळून येते. छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळात दक्षिणा वाटप करण्यासाठी पंडितराव या अधिकाऱ्याची नेमणूक केली जाई. राजांच्या मंत्रिमंडळातील तो एक मंत्री होता. संभाजी महाराजांचे पुत्र थोरले शाहू महाराज यांनी दक्षिणा वाटपाचे काम त्यांचा सरसेनापती खंडेराव दाभाडे यांच्याकडे दिले. पेशव्यांच्या काळात दक्षिणा पेशव्यांच्या वाड्यावर वाटली जाई. सुरुवातीला ब्राह्मणाच्या पात्रतेनुसार त्याची दक्षिणा रक्कम ठरवली जाई. त्यामुळे पात्रता ठरवण्यासाठी परीक्षक नेमले जात व त्यांच्यामार्फत दक्षिणा दिली जाई.

सामान्य ब्राह्मणांना दक्षिणा देण्यासाठी वेगळी व्यवस्था होती. विशेषतः त्यांची संख्या चाळीस - पन्नास हजार झाल्यावर त्यांच्यासाठी पुण्यातील पर्वतीच्या पायथ्याशी रमण्यात दक्षिणा वाटपासाठी व्यवस्था करण्यात आली. पेशवे स्वतः, त्यांचे कुटुंबीय व त्यांचे सरदार काही काळ स्वतः दक्षिणा वाटत.

पेशवाईच्या अस्तानंतर आणि ब्रिटिश सत्तेची सुरुवात झाली तेव्हा, १८१८ मध्ये दक्षिणेसाठी पूर्वीप्रमाणे १० लाख जरी नाही, तरी ५०,०००

रुपये वर्ग करण्यात आले; पण त्यानंतर या रकमेचे दोन भाग करण्यात आले. त्यातील ३०,००० रुपये दक्षिणा देण्यासाठी ठेवण्यात आले, तर उर्वरित २०,००० रुपये अन्य योजनांसाठी बाजूला ठेवण्यात आले. पूना कॉलेजातील विद्यार्थ्यांना त्यातून विद्यावेतन, पूना कॉलेजमधील प्राध्यापकांना पगार व मराठी भाषेत लिहिलेल्या पुस्तकांना पारितोषिक या व अशा अन्य कार्यक्रमांसाठी खर्च करण्यात येऊ लागला.

१८५८ मध्ये मूळ दक्षिणा फंडातील न वाटलेली बरीच रक्कम जमा झाली. दक्षिणा ही प्रामुख्याने प्रावीण्य प्राप्त झालेल्यांना दिली जाई. एल्फिन्स्टन व पूना कॉलेजसारख्या नव्याने सुरू झालेल्या इंग्रजी शिकवणाऱ्या संस्थेतील विद्यार्थ्यांना उच्च शिक्षण घेण्यासाठी विद्यावेतन द्यायचे ठरले. त्यासाठी दक्षिणा फंडातील पडून राहिलेल्या रकमेचा वापर करण्यात आला. एल्फिन्स्टन कॉलेजातील रामकृष्ण गोपाळ व जव्हेरीलाल उमाशंकर व पूना कॉलेजमध्ये बाबा गोखले यांना दक्षिणा फेलोशिप देण्यात आली. पुढे सरकारी कॉलेजबरोबर खाजगी कॉलेजमधील विद्यार्थ्यांनाही फेलोशिप देण्याचे ठरले. त्याप्रमाणे फर्ग्युसन कॉलेजमध्ये दक्षिणा फेलोशिप देण्यात आली. १८९६ मध्ये रघुनाथ पी. परांजपे यांना फेलोशिप दिली. श्री. परांजपे पुढे इंग्लंडमधील केम्ब्रिज विद्यापीठात गणित शिक्षणासाठी गेले. सीनिअर रँग्लर ही पदवी मिळवणारे ते पहिले भारतीय होत. फेलोशिपसाठी स्वतंत्र नियमावली तयार करण्यात आली.

स्वातंत्र्यानंतरही या फेलोशिप चालू ठेवण्यात आल्या. १९५० मध्ये एल्फिन्स्टन (६), इस्माईल युसूफ (२), विल्सन (३), सेंट झेविअर्स (३), गुजरात (४), फर्ग्युसन कॉलेज (३) या सहा कॉलेजांत मिळून २१ दक्षिणा फेलोशिप निर्माण करण्यात आल्या. प्रत्येक शिष्यवृत्ती दरमहा ५० रुपयांची होती. मूळ संस्कृत, वेद,धर्म शास्त्र इत्यादीसाठी देण्यात येणाऱ्या दक्षिणेचे रूप बदलत बदलत आज सहा कॉलेजमधील विद्यार्थ्यांना विद्यावेतन या स्वरूपात राहिले आहे. आजही शिक्षण खात्यामार्फत महाविद्यालयात शिक्षण घेणाऱ्यास दक्षिणा फेलोशिप उपलब्ध आहे.

१८३८ ते १८५१ या काळात ब्राह्मणांनी दक्षिणेसंदर्भात अकरा निवेदने सादर केलेली आढळतात. ब्रिटिश सरकारने दक्षिणा वाटपासंबंधी नवे नियम केले. त्याविरोधात ही निवेदने केलेली आढळतात. पुणे, वाई,

सातारा, पंढरपूर, कऱ्हाड, माहुली, कर्नाटक, कोकण, खान्देश इत्यादी ठिकाणच्या ब्राह्मणांनी २० डिसेंबर १८३८, ४ फेब्रुवारी १८३९ व २० सप्टेंबर १८३९ रोजी मुंबईच्या गव्हर्नररांना तीन निवेदने दिली. तसेच ७ जानेवारी १८४१ रोजी पुणे येथील परशुराम भट बिन गोविंदपंत घोरपडे यांनीही गव्हर्नरला वैदिकांच्या वतीने दक्षिणेसंबंधी निवेदन दिले. १८ ऑक्टोबर १८४९ रोजी ३६० वैदिक ब्राह्मणांनी आपल्याला दक्षिणा मिळावी म्हणून डब्ल्यू. जे. हंटर या 'एजंट टू सरदार' मार्फत मुंबई सरकारकडे अर्ज केला. २२ जून १८५० रोजी पुणे येथील विष्णू भट साने याने ३,००० वैदिक ब्राह्मणांच्या सहीचा अर्ज गव्हर्नरला सादर केला. मूळ अर्ज मराठीत होता. दोन प्रतींसह त्याचे इंग्रजी भाषांतर अर्जासोबत जोडले होते. या सर्व अर्जात साधारणपणे 'दक्षिणे' संबंधी ऐतिहासिक माहिती, त्यांचे सामाजिक व सांस्कृतिक जीवनातील महत्त्व, पेशवाईच्या अंतकाळात ब्रिटिशांनी दिलेली आश्वासने व सद्य:स्थिती यांचा ऊहापोह केलेला दिसतो. वैदिक ब्राह्मणांची बंद केलेली दक्षिणा परत सुरू करावी, नव्या अर्जदारांचा दक्षिणेसाठी विचार व्हावा, संस्कृत भाषेचे अध्यापन बंद न करता ते चालू ठेवावे, या प्रमुख मागण्या या निवेदनात केलेल्या आढळतात.

तीनशे वर्षांच्या दक्षिणासंदर्भात केलेल्या अभ्यासावरून हे दिसून येते की, ज्ञानार्जन, ज्ञानवृद्धी व ज्ञानप्रसार ही प्रत्येक समाजाची गरज असते आणि त्यामुळे या कार्यात गुंतलेल्यांचा योग्य तो आदर ठेवला जातो. दक्षिणा या संकल्पनेचा उदय व प्रसार याच जाणिवेतून झालेला दिसतो. काळानुसार दक्षिणेची वाटप व्यवस्था, त्यासंबंधीचे नियम, दक्षिणेची रक्कम यात अनेक बदल होत गेले. बदल म्हणजे संघर्ष, या बदलत्या परिस्थितीचे सर्वांनाच सारखे आकलन होत नाही. अनेकांना आकलन होऊनही त्यांचे वय, त्यांची आर्थिक स्थिती यामुळे नवे ज्ञान व कौशल्य त्यांना प्राप्त करून घेता येत नाही व मग त्यांच्यात असंतोष फैलावतो वा नैराश्य येते. नवे स्वीकारताना जुन्याचे काय करायचे हा नुसता वैयक्तिक प्रश्न नसून तो एक सामाजिक प्रश्न आहे, हे या अभ्यासातून लक्षात येते.

♦♦

२.

# दक्षिणा प्राईझ

छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळापासून सुरू झालेल्या व पेशवाईत विकसित झालेल्या 'दक्षिणा' या संकल्पनेला ब्रिटिश काळात नवे रूप प्राप्त झाले. छपाई यंत्राचा उदय आणि लिखित साहित्याचा शिक्षणासाठी आधार ही ब्रिटिश काळाची वैशिष्ट्ये. यातूनच मराठीसारख्या देशी भाषेचा विकास व्हावा म्हणून अनेक प्रयत्न झाले. 'दक्षिणा प्राईझ' हा त्यातीलच एक उपक्रम. त्याचा हा वृत्तांत.

हिंदू समाजात 'दक्षिणा' ही संकल्पना फार प्राचीन काळापासून चालत आलेली आहे. त्याचा संदर्भ वेदकाळातही सापडतो.

''यज्ञादिसम्पादकतदन्त विहितदानम्''

म्हणजे यज्ञाचे फल प्राप्त व्हावे म्हणून यज्ञाच्या अंती दिलेल्या दानाला दक्षिणा म्हणतात. निरुक्तात दक्षिणा शब्दाची व्युत्पत्ती दिली आहे. दक्ष म्हणजे समद्ध करणे जे रुद्ध किंवा पूर्ण नसेल ते दक्षिणेने पूर्ण होते.

आधुनिक काळात दक्षिणा वाटण्याचा संदर्भ छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळात आढळून येतो. शिवाजी महाराजांनी आपल्या राज्याभिषेकाच्या निमित्ताने (१६७४) ब्राह्मणांना दान दिल्याचे नमूद आहे. एका शास्त्राचा अभ्यास केलेल्यास एक मण धान्य व १० रुपये आणि दहा शास्त्रांचा अभ्यास केलेल्यास दहा मण धान्य व १०० रुपये अशी दक्षिणा दिली जाई. पुढे संभाजीराजे, राजाराम महाराज व शाहू महाराज यांनीही ती प्रथा चालू ठेवली. शाहू महाराजांच्या काळात सुरुवातीला दक्षिणा वाटपाचे काम हे सेनापती दाभाडे यांच्याकडे होते व त्यानंतर ते काम पेशव्यांकडे आले. पहिल्या बाजीरावाच्या काळात काही हजार रुपये दक्षिणारूपाने विद्वान ब्राह्मणांना वाटण्यात आले. ही रक्कम शासनाचे उत्पन्न वाढल्यावर नानासाहेब

पेशव्यांच्या काळात १५ लक्ष रुपयांपर्यंत वाढली. दुसऱ्या बाजीरावाच्या कारकीर्दीतील शेवटच्या वर्षी त्याने दहा लाख रुपये दक्षिणारूपाने वाटले.

पेशवाई १८१८ साली संपुष्टत आली व ईस्ट इंडिया कंपनीचे राज्य सुरू झाले. त्यावेळचा ब्रिटिश एजंट माऊंट स्टुअर्ट एल्फिन्स्टनने असे जाहीर केले की, पेशवे काळात लोकांचे जे अधिकार व वतने होती ती आपण पुढेही चालू ठेवू. त्यामुळे पेशवाई बुडाल्यामुळे आपले काय होईल व आपले अधिकार चालू राहतील की नाही याविषयी साशंक असलेल्या व धास्तावलेल्या समाजाला सुरक्षिततेचे आश्वासन मिळाले व काही काळ शांतता प्रस्थापित झाली. १८१९ सालाकरिता दक्षिणेसाठी दोन लाख रुपये उपलब्ध करून देण्याचे त्याने कळवले, परंतु प्रत्यक्षात फक्त ५० हजार रुपयेच उपलब्ध झाले.

दक्षिणा वाटपासंबंधी ब्रिटिशांनी केलेल्या नियमांमुळे दक्षिणेची मान्यताप्राप्त रक्कम खर्ची न पडल्यामुळे त्याचा अनुशेष बराच साठला. तो रु. २५,००० इतका होता. या रकमेचा विनियोग कसा करायचा हा प्रश्न उभा राहिला आणि त्यातूनच जन्म झाला दक्षिणा प्राईझ या संकल्पनेचा.

पुणे संस्कृत पाठशाळेचे रूपांतर पूना कॉलेजमध्ये झाल्यावर या नव्या कॉलेजातील विद्यार्थ्यांना अभ्यासासाठी मराठीत पुस्तके उपलब्ध नव्हती. आजपर्यंत शिक्षण हे संस्कृतमधून दिले जात असे. ब्रिटिशांनी संस्कृतबरोबर इंग्रजी व मराठी या विषयांच्या अभ्यासास प्राधान्य देण्याचे ठरवले. त्याचे एक प्रमुख कारण म्हणजे त्यांच्या नोकरशाहीस मनुष्यबळ उपलब्ध व्हावे हे होते. संस्कृत शिकणाऱ्यांचा ब्रिटिशांना उपयोग नव्हता, संस्कृत व इंग्रजी ग्रंथांचे मराठीत भाषांतर होणे जरूरीचे होते. तसेच मराठीत स्वतंत्र लेखन करणाऱ्यांची जरूरी होती.

ब्रिटिश शासनाने जो दक्षिणेचा अनुशेष होता त्याचा उपयोग मराठीत साहित्य निर्मितीसाठी करण्याचा प्रस्ताव मांडला व त्यासाठी लंडन येथील ईस्ट इंडिया कंपनीच्या कोर्ट ऑफ डायरेक्टर्स यांची परवानगी मिळवली (१८५०). मराठीत साहित्य निर्मितीसाठी दोन उपाय योजले. एक : पूना कॉलेजच्या प्राध्यापकांवर भाषांतरित व स्वतंत्र मराठी पुस्तक निर्माण करण्याची जबाबदारी टाकली व दोन : मराठीत भाषांतरित वा स्वतंत्र लिहिण्यासाठी बक्षिसे ठेवली.

मराठी पुस्तक लेखकांस एकूण अकरा बक्षिसे जाहीर करण्यात आली. ती अशी-

| | |
|---|---|
| २०० रुपयांची | २ बक्षिसे ४०० रु. |
| १५० रुपयांची | ४ बक्षिसे ६०० रु. |
| १०० रुपयांची | ५ बक्षिसे ५०० रु. |
| **एकूण** | **११ बक्षिसे १,५०० रु.** |

या बक्षिसास 'दक्षिणा प्राईझ' या नावाने ओळखले जाई.

सुरुवातीच्या काळात शाळा-कॉलेजातील विद्यार्थ्यांना उपयुक्त ठरतील अशा पुस्तकांना प्राधान्य देण्यात आले; पण पुढे क्रमिक पुस्तकांऐवजी ललित साहित्याला प्राधान्य देण्यात आले.

एल्फिन्स्टनला १८१९ मध्ये मुंबईचा गव्हर्नर म्हणून बढती मिळाली व पुण्यात कमिशनर म्हणून विल्यम चॅपलिन रुजू झाला. चॅपलिनने शासनाला कळवले की, विद्वान ब्राह्मणांना दक्षिणारूपाने जी रक्कम दिल जाते त्यामुळे ब्राह्मण वर्गास पारंपरिक पध्दतीचे शिक्षण घेता येते; परंतु या प्रकारचे शिक्षण घेतलेले ब्राह्मण क्वचितच ब्रिटिश सरकारच्या सेवेत दाखल होतात. त्यांना मिळणाऱ्या शिक्षणाचा ढाचा वेगळा होता. पारंपरिक शिक्षण मुख्यत: संस्कृतमध्ये होते व त्यामुळे स्वदेशाभिमान अधिक जागृत होतो. हे शिक्षित ब्राह्मण ब्रिटिशांविरोधी आहेत व ते असंतोष पसरवतात, त्यामुळे चॅपलिनने व त्यानंतरच्या कमिशनरांनी परंपरागत पद्धतीने दक्षिणा वाटण्यांस विरोध दर्शविला. त्यांनी असे सुचवले की, शिक्षण हे अधिक व्यवहारोपयोगी असावे व त्याचा ब्रिटिश शासनास उपयोग व्हावयास पाहिजे. नव्या राज्यकर्त्यांना राज्यकारभार करण्यासाठी देशी नोकरशाही हवी होती आणि ती पारंपरिक संस्कृत भाषा आधारित शिक्षण घेतलेली नको होती. म्हणून सूचना करण्यात आली की, दरवर्षी जे पन्नास हजार रुपये दक्षिणारूपाने वाटले जातात ते न वाटता त्याचे दोन भाग करावेत व त्यातील तीस हजार रुपये दक्षिणा म्हणून वाटावेत व वीस हजार रुपये नव्या पद्धतीने खर्च करावेत. एक म्हणजे शासनास उपयोगी होईल असे शिक्षण देणारी नवी संस्था सुरू करावी. याच सूचनेमुळे महाराष्ट्रातील पहिले कॉलेज 'हिंदू कॉलेज' तथा 'पूना कॉलेज' हे पुण्यात १८२१ साली सुरू झाले. नव्या

कॉलेजात संस्कृतबरोबरच इंग्रजी व मराठीतही विषय शिकवण्यात येऊ लागले, परंतु मराठी भाषेत पुस्तके उपलब्ध नव्हती. ब्रिटिशपूर्व काळात शिक्षण हे प्रामुख्याने तोंडी स्वरूपात व पाठांतर आधारित होते. छपाई तंत्र उपलब्ध नव्हते. ब्रिटिश राजवटीत छपाई तंत्र उपलब्ध झाले आणि शिक्षण हे छापील पुस्तकाच्या आधारे होऊ लागले. दक्षिणा ही केवळ जुन्या शास्त्रांसाठी मर्यादित न ठेवता नव्या शास्त्राच्या शिक्षणासाठीही खर्च व्हावी हा मुद्दा प्रकर्षाने पुढे आला आणि यातूनच 'दक्षिणा प्राईझ' ही संकल्पना पुढे आली आणि मराठीत लिहिलेल्या, स्वतंत्र वा भाषांतरित पुस्तकांना बक्षीस देण्याचे ठरले.

एजंट फॉर सरदार यांनी पुणे येथे ७ नोव्हेंबर १८५१ रोजी दरबार भरवला व दहा मराठी लेखकांना सन्मानपूर्वक रुपये १,५०० वाटले. अशा रीतीने मराठीत साहित्य निर्मितीस चालना मिळाली. आजही दीडशे वर्षांनंतर महाराष्ट्र शासन मराठी लेखकांना प्रोत्साहनपर बक्षिसे जाहीर करते. त्याचा पाया १८५१ मध्ये पुणे येथे घातला गेला. पूर्वी ब्राह्मणांना जी दक्षिणा वाटली जात होती त्यातील काही रक्कम मराठी साहित्य निर्मितीसाठी उपयोगात येऊ लागली आणि म्हणून या बक्षिसांना 'दक्षिणा प्राईझ' असे संबोधण्यात येऊ लागले.

पुस्तक परीक्षणासाठी नानाशास्त्री आपटे यांना नेमण्यात आले. स्पर्धेसाठी सुरुवातीलाच माठ्या प्रमाणावर अर्ज आले. १८५१ ते १८५५ या पाच वर्षांत ९९ पुस्तके बक्षिसासाठी सादर करण्यात आली आणि त्यातील ४६ पुस्तके बक्षिसासाठी स्वीकारण्यात आली. त्याचा वर्षवार तपशील असा होता.

| **वर्ष** | **सादर करण्यात आलेली पुस्तक संख्या** | **मान्यताप्राप्त पुस्तके** |
|---|---|---|
| १८५१ | १७ | ११ |
| १८५२ | ६६ | २४ |
| १८५३ | ४ | ३ |
| १८५४ | ५ | ४ |
| १८५५ | ७ | ४ |
| **एकूण** | **९९** | **४६** |

पाच वर्षांत दक्षिणा प्राईझनिमित्त रुपये ११,००० खर्च झाले. मान्यता मिळालेल्या सर्वच पुस्तकांचे प्रकाशन मात्र लगेच झाले असे नाही. त्यातील फक्त आठच पुस्तके पाच वर्षांत छापून झाली. अन्य पुस्तकांचे प्रकाशन विविध कारणांनी मागेच राहिले. याचे प्रमुख कारण देखरेख करणारी दक्षिणा प्राईझ कमिटी आकाराने फारच मोठी होती. त्यातील पदसिद्ध सभासदांना पुस्तक परीक्षणाच्या कामात रस नव्हता व त्यांच्यात आवश्यक ते कौशल्यही नव्हते. परीक्षणासाठी योग्य शास्त्री मिळत नसत. दक्षिणा प्राईझ कमिटीचे पुस्तक प्रकाशनाचे काम यशस्वी होणे कठीणच होते, कमिटीची पुनर्घटना करण्याची जरूरी होती. पण त्याबाबत सरकारने तातडीने निर्णय घेतला नाही. पुढे कमिटीच्या सभाही नियमित होईनाशा झाल्या.

मराठी भाषेवर प्रेम करणाऱ्यांपैकी पूना कॉलेजचा प्रिन्सिपल मेजर कँडी हा एक होता. मेजर थॉमस कँडीला पुस्तक निर्मितीत खूप रस होता. बराच काळ तो कमिटीचा अध्यक्ष म्हणून कार्यरत होता. त्याने पुस्तक निर्मितीत खूपच काम केले. विशेषत: बक्षिसाचे नियम ठरवले. १८६६ मध्ये तो इंग्लंडला गेला, त्याच्याऐवजी प्रो. ब्युहलर हे समितीचे अध्यक्ष झाले. ब्युहलर एल्फिन्स्टन कॉलेजमध्ये प्रोफेसर होते. त्यांच्या कारकीर्दीत एक महत्त्वाचा निर्णय घेण्यात आला. सुरुवातीच्या काळात शालेय पुस्तकेही बक्षिसास पात्र होती. परंतु त्यासाठी शासनाने स्वतंत्र व्यवस्था केल्याने १८६६ नंतर दक्षिणा प्राईझ हे प्रामुख्याने ललित साहित्य, चरित्र, कथा, कादंबरी, काव्य, प्रदेशवर्णन अशा विषयांवरील पुस्तकांना देण्याचे ठरले. छत्रपती शिवाजी महाराजांवरील काव्य व मराठीतील सामाजिक कादंबरी हे दोन विषय पुरस्कारासाठी निवडले गेले व तसे जाहीर करण्यात आले. गणेशशास्त्री लेले व म.मो. कुंटे यांना त्यांच्या शिवाजी महाराजांवरील काव्यासाठी व रिसबूड यांचा ग्रंथ मंजूघोषा यांची बक्षिसासाठी निवड झाली. याच काळात इतर अनेक पुस्तकांचीही निवड झाली. त्यावेळी एखाद-दुसरे पुस्तक मान्य होई. १८६६-६७ मध्ये आठ पुस्तकांना मान्यता मिळाली. पुढील तीन वर्षांत आणखीन १४ पुस्तके पसंत करण्यात आली आणि त्यासाठी अंदाजे १,८०० रुपये बक्षीसरूपाने देण्यात आले. एकोणिसाव्या शतकाच्या अखेरपर्यंत दक्षिणा प्राईझ स्वतंत्र्यरीत्या दिले जात असे; पण

विसाव्या शतकात दक्षिणा फंडाचे स्वतंत्र अस्तित्व संपलेले दिसते. दक्षिणेचे पैसे शिक्षण खात्यातील सर्वसाधारण निधीत जमा करण्यात आले. अर्थात, पुस्तकांसाठी पुरस्कार देण्यासाठी प्रथा पुढेही चालू राहिली; पण मूळ 'दक्षिणा प्राईझचे' अस्तित्व नाहीसे झालेले दिसते.

**'दक्षिणा प्राईझ'साठीचे नियम :**

असिस्टंट एजंट टू सरदार हंटर आणि पूना कॉलेजचे सुपरिन्टेण्डन्ट थॉमस कँडी यांनी दक्षिणा प्राईझ वाटपासंबंधी ३० जानेवारी १८५० रोजी काही नियम सुचवले व त्याला पुढे ८ फेब्रुवारी १८५१ रोजी मुंबई शासनाने मान्यता दिली. ते नियम असे -

**१. बक्षिसाची रक्कम :**

दरवर्षी पुस्तकांना बक्षीस देण्यासाठी १,५०० रुपये उपलब्ध करून देण्यात आले होते. त्यातून दरवर्षी ११ बक्षिसे देण्याचे ठरले. त्याचे विभाजन दोनशे रुपयांची दोन बक्षिसे, दीडशे रुपयांची चार बक्षिसे व शंभर रुपयांची पाच बक्षिसे असे होते.

**२. बक्षिसाचे स्वरूप :**

बक्षीस हे वर्षापुरते मर्यादित होते. ते वर्षासन स्वरूपाचे नव्हते. ते लेखकालाच मिळे, वारसाला मिळत नसे. लेखकाने लिहिलेल्या पुस्तकाचा पुरस्कार म्हणून ते दिले जाई.

**३. बक्षीस पुस्तकाची पात्रता :**

बक्षिसासाठी जे पुस्तक सादर केले जाईल ते मराठीत असेल व ते भांषातरित वा स्वतंत्र असू शकेल, पुस्तक शास्त्रीय विषयावर असेल वा ती मराठी साहित्यकृती असेल. दोनशे रुपयांचे पहिले बक्षीस मिळण्यास पात्र होण्यासाठी पुस्तक किमान १५० ऑक्टेव पृष्ठांचे असावे, दुसऱ्या क्रमांकाचे बक्षीस मिळण्यासाठी किमान १०० ऑक्टेव पृष्ठांचे असावे व तिसऱ्या क्रमांकाचे पुस्तक किमान ७५ ऑक्टेव पृष्ठांचे असावे, असे ठरवण्यात आले.

**४. लेखकाची पात्रता :**

लेखक हा भारतीय असावा व तो कोणत्याही वर्गातील वा जातीचा असला तरी चालेल.

**५. बक्षिसाचे वेळापत्रक :**

दरवर्षी एजंट टू सरदार हे बक्षिसाच्या अटी व विषय शासकीय

गॅझेटमध्ये जाहीर करतील. लेखकाने आपले हस्तलिखित १ सप्टेंबरपूर्वी परीक्षणासाठी सादर केले पाहिजे. त्याचा निकाल परीक्षक १ नोव्हेंबरपूर्वी एजंट टू सरदार यांना सादर करतील. लेखकाचे नाव, पुस्तकाचे नाव, बक्षिसाचा क्रमांक व रक्कम गॅझेटमध्ये व अन्यत्र जाहीर केले जाई.

**६. पुस्तकाचे परीक्षण व परीक्षा समिती :**

बक्षिसासाठी सादर झालेली सर्व पुस्तके दक्षिणा प्राईझ समितीकडे परीक्षणासाठी सादर केली जातील. परीक्षक त्यांचा निकाल एजंट टू सरदारकडे पाठवीत.

पुस्तक परीक्षणासाठी 'दक्षिणा प्राईझ कमिटी' स्थापन करण्यात आली. कमिटीचा अध्यक्ष व सेक्रेटरी हा युरोपियन असेल व त्यांना मदतीसाठी देशी सेक्रेटरी असेल. एजंट टू सरदार, कलेक्टर (पुणे), असिस्टंट एजंट, पूना कॉलेजचे प्रमुख, सदर अमिन, शास्त्री, सेक्रेटरी नेटिव्ह लायब्ररी, असे अन्य तीन देशी सभासद हे कमिटीचे सभासद होते.

**७. पुस्तक लिखाणासाठीचा कालावधी :**

सर्वसाधारणपणे पुस्तक एक वर्षात लिहून पूर्ण व्हावयास पाहिजे; पण त्यापेक्षा अधिक काळ लागणार असेल, तर लेखकांचे बक्षीस पुस्तक लिहून पूर्ण झाल्यावर दिले जाईल. आपल्याला पुस्तक पूर्ण करण्यास वेळ लागणार असल्याचे लेखकाने कळवणे जरूरीचे आहे.

**८. हस्तलिखितांचा सांभाळ :**

ज्या पुस्तकांना बक्षीस मिळाले आहे, त्या पुस्तकांचे हस्तलिखित समितीचे अध्यक्ष जतन करतील. ज्यांना बक्षीस मिळाले नाही त्यांचे हस्तलिखित लेखकाला परत केले जाईल.

**९. बक्षिसांचे वितरण :**

दरवर्षी बक्षिसे जाहीर केली जातील व बक्षिसे पुण्यात नोव्हेंबर महिन्यात वाटली जातील. बक्षीस घेण्यास लेखकाने पुण्यात समारंभाला यावे, अशी अपेक्षा आहे; पण तो न आल्यास त्याचे बक्षीस बुडणार नाही. लेखकाला वा त्यांच्या प्रतिनिधीला ते दिले जाईल.

**१०. समितीच्या सभासदांचे मानधन :**

समितीच्या सभासदांना सुरुवातीस कोणतेही मानधन नव्हते. सभासद हे मानद सभासद म्हणूनच कार्य करीत. सचिवांचे काम वाढल्यास मात्र त्यांना

मानधन देण्याविषयी तरतूद केली होती.

**११. बक्षीस वाटपाच्या नियमातील बदल :**

मराठीतील पुस्तकांना द्यावयाच्या बक्षीस वाटपासंबंधीचे नियम जर बदलावेसे वाटले, तर ते बदलण्याचा अधिकार समितीला असेल.

**१२. न वाटलेली बक्षीस रक्कम :**

दरवर्षी अकरा पुस्तकांना बक्षिसे देण्याची व्यवस्था करण्यात आली; पण एखाद्या वर्षी योग्य अकरा पुस्तके निवडता आली नाहीत, तर न वाटलेली रक्कम ही जनरल फंड फॉर नेटिव्ह लिटरेचर व एज्युकेशनमध्ये जमा होईल.

**दक्षिणा प्राईझ मिळालेली काही पुस्तके**

| क्र. | सन | लेखकाचे नांव | पुस्तकाचे नाव |
|---|---|---|---|
| १ | १८५३ | कृष्णशास्त्री राजवाडे | अलंकार विवेक |
| २ | १८५७ | गोडबोले | वेणीसंहार |
| ३ | – | गोडबोले प.ब. | शाकुंतल |
| ४ | १८६३ | माडगावकर गो.ना. | मुंबईचे वर्णन |
| ५ | १८६३ | बाबा पदमजी | शब्दकोष |
| ६ | १८६६ | ओक विनायक कोंडदेव | लघुनिबंधमाला |
| ७ | १८६७ | प्रधान ब.रा. | दैवसेनी |
| ८ | १८६८ | कुंटे म.मो. | राजा शिवाजी |
| ९ | १८६८ | रिसबूड नारो सदाशिव | मंजूघोषा |
| १० | १८६९ | राजवाडे कृष्णशास्त्री | अभिज्ञान शाकुंतल |
| ११ | १८७२ | गोडबोले प.ब. | पार्वती परिणय |
| १२ | १८७४ | राजवाडे कृष्णशास्त्री | विक्रमोर्वशीय |
| १३ | १८७२ | मराठे का.बा. | नावल व नाटक |
| १४ | १८७३ | लेले गणेशशास्त्री | शिवाजी चरित्र |
| १५ | १८७४ | पेठकर चिंतामणी | गंगावर्णन |
| १६ | १८७४ | राजवाडे कृष्णशास्त्री | उत्सव प्रकाश |
| १७ | १८७४ | कुरुंदवाडकर गणपतराव | गंगावर्णन |
| १८ | १८७५ | पटवर्धन वि.ज. | हंबीरराव व पुतळाबाई |

| | | | |
|---|---|---|---|
| १९ | १८७८ | बापट नागेश विनायक | पहिले बाजीरावसाहेब पेशवे |
| २० | १८८४ | आष्टमकर आहोराम | शिमशोन दु:खिताश्रुमार्जन |
| २१ | १८८६ | पारख बळावंत खंडुजी | ज्ञानेश्वर महाराजांचे चरित्र |
| २२ | १८८८ | गोडबोले कृ.ब. | अनाथ पांडुरंग |
| २३ | १८८९ | दामले वि.भा. | अवलिया |
| २४ | १८९१ | करकंबकर | मल्हारराव होळकर |
| २५ | १८९३ | गोगटे चिंतामण गंगाधर | शाहू महाराजांचे चरित्र |

**दक्षिणा प्राईझ कमिटी :**

मराठी भाषेत लेखन व्हावे, शाळा, कॉलेजसाठी क्रमिक पुस्तके, ललित साहित्य, कथा, कादंबऱ्या, काव्य निर्माण व्हावे यासाठी मराठी लेखकांना प्रोत्साहनपर बक्षिसे देण्याचे ब्रिटिश सरकारने ठरवले. बक्षिसासाठी सादर केलेल्या पुस्तकांचे परीक्षण करणे व बक्षिसांचे वाटप करणे ही महत्त्वाची कामे होती. यासाठी कंपनी सरकारने एक समिती नेमली हीच 'दक्षिणा प्राईझ कमिटी' (डीपीसी) या नावाने ओळखली जाऊ लागली. समितीचे अध्यक्ष व सचिव युरोपियन असतील असा नियम करण्यात आला. समितीत काही पदसिद्ध अधिकारी होते, तर काही समाजातील इतर मान्यवर यांना सहभागी करून घेण्यात आले होते. समितीत पुस्तक परीक्षणासाठी एका शास्त्रीचा समावेश असे. सुरुवातीला नानाशास्त्री आपटे यांना समितीत घेण्यात आले, परंतु अनेक वेळा पुस्तक परीक्षणासाठी शास्त्री उपलब्ध होत नसत आणि परीक्षणाच्या कामास विलंब होत असे. अनेक पदसिद्ध अधिकाऱ्यांना वेळ उपलब्ध नसे व या प्रकारच्या कामात रस नसे. त्यामुळे अनेक वेळा समितीच्या बैठका घेता आल्या नाहीत. समितीतील सभासदांची जागा रिकामी झाल्यास नवा सभासद घेण्यास विलंब होई. सुरुवातीस (१८५१) जी दहा जणांची समिती गठित झाली, त्यात खालील सभासद होते.

१. एजंट टू सरदार
२. असिस्टंट एजंट
३. कलेक्टर
४. परीक्षक - शास्त्री

५. प्रिन्सिपल पूना कॉलेज
६. प्रिन्सिपल सदर अमिन
७. सेक्रेटरी, नेटिव्ह लायब्ररी
८. तीन एतद्देशीय सभासद

अनेक युरोपियन व मराठी सद्गृहस्थांनी कमिटीवर काम केल्याचे आढळून येते. त्यातील काही नावे अशी - मेजर थॉमस कँडी, कृष्णशास्त्री चिपळूणकर, मिचेल हॉग, डॉ. किलहॉर्न, डॉ. ब्युहलर, रसेल, केरोपंत छत्रे, भा. दा. पाळंदे, मोका, विजयकर, न्यायमूर्ती म. गो. रानडे, डॉ. भाऊ दाजी लाड, श्रीकृष्णशास्त्री तळेकर इत्यादी. दक्षिणा प्राईझ कमिटीचे मुख्य काम बक्षिसासाठी मराठीत लिहिलेल्या पुस्तकांची निवड करणे. कै. नागेश विनायक बापट यांनी १८७७ मध्ये लिहिलेल्या 'श्रीमंत बाजीराव बल्लाळ ऊर्फ पहिले बाजीरावसाहेब पेशवे' या पुस्तकाला दक्षिणा प्राईझ मिळाले. त्याच्या अनुषंगाने कमिटीचे काम प्रत्यक्षात कसे होत असे हे अभ्यासणे उद्बोधक ठरेल. सुदैवाने या पुस्तकाच्या शेवटी कमिटीचा अहवाल दिला आहे तो मोठा बोलका आहे.

डॉ. एफ. किलहॉर्न हे कमिटीचे अध्यक्ष होत, तर रावजीशास्त्री गोडबोले हे कमिटीचे चिटणीस होते. एम.जी. रानडे (महादेव गोविंद रानडे), कृष्णशास्त्री चिपळूणकर, श्रीकृष्णशास्त्री तळेकर, केरूनाना एल. छत्रे हे सभासद होते. हे सर्वच जण त्या काळात विद्वान व मराठी साहित्यात अमोल भर घालणारे होते. किलहॉर्न हे जर्मन गृहस्थ लाईपझिक विद्यापीठातून पीएच.डी. झालेले होते. सुरुवातीला पूना कॉलेज व त्यानंतर डेक्कन कॉलेज व एलफिन्स्टन कॉलेजात ओरिएंटल लँग्वेजेस्चे प्राध्यापक होते. संस्कृत व मराठीचे उत्तम जाणकार होते. ब्रिटिश नोकरशाहीत विशेषत: शिक्षण क्षेत्रात ब्रिटनशिवाय अन्य युरोपियन व्यक्तींनाही नोकरीत घेत असल्याचे दिसते. डॉ. ब्युहलर हेही असेच जर्मन गृहस्थ डेक्कन कॉलेजात प्राध्यापक (संस्कृत व मराठी) होते.

कमिटीच्या नियमांत एक महत्त्वाचा नियम होता की, अध्यक्ष हा युरोपियन असेल. तो ब्रिटिशच पाहिजे, असा आग्रह दिसत नाही. सुरुवातीच्या काळात सेक्रेटरी, कलेक्टर, एजंट टू सरदार इत्यादी सभासद युरोपियन्स असत. फक्त तीन शास्त्री व असिस्टंट सेक्रेटरी हे मराठी असत; पण

१८७७ च्या सुमारास कमिटीचे मूळ स्वरूप बदलले व फक्त अध्यक्ष युरोपियन राहिलेला दिसतो. मेजर कँडी हाही काही काळ कमिटीशी संबंधित होता. तो संस्कृत व मराठीचा प्रेमी व तज्ज्ञ होता. मोल्सवर्थच्या साहाय्याने त्याने मराठी शब्दकोश तयार केला होता. त्याने मराठी शुद्धलेखनाचे नियम प्रस्थापित केले. त्याने मराठीत नसलेली अनेक चिन्हे विशेषत: प्रश्नचिन्ह, उद्‌गारवाचक, स्वल्प व अर्धविराम चिन्हे आणि इतर विरामचिन्हे याविषयी नियमावली तयार करून ती प्रसिद्ध केली. तसेच भाषांतराविषयी पुस्तक लिहिले. दक्षिणा प्राईझसाठी जी पुस्तके परीक्षणासाठी सादर होत त्यातील भाषा व शुध्दलेखन तो स्वत: सूक्ष्मपणे पाहत असे. प्राईझ दिलेली पुस्तके भाषेच्या दृष्टीने उच्च दर्जाची असावीत हा त्याचा आग्रह असे.

दक्षिणा प्राईझ समितीचे सचिव रावजीशास्त्री गोडबोले हे होते (१८३० ते १८९१). पुणे पाठशाळेत ते शिकले. इंग्रजी शिकणाऱ्या महाराष्ट्रातील सुरुवातीच्या पिढीतील ते एक विद्वान गृहस्थ. लघुव्याकरण हा मराठी भाषेच्या व्याकरणावरही त्यांनी ग्रंथ लिहिला होता. संस्कृत, मराठी व इंग्रजी भाषेवर त्यांचे प्रभुत्व होते. दक्षिणा प्राईझ हे बक्षीस मराठी भाषेत लिहिलेल्या पुस्तकास होते; पण परीक्षकांचा अहवाल मात्र इंग्रजीत असे, हा मोठा विरोधाभासच होता आणि तोही मराठी माणसाने लिहिलेला असल्यामुळे तर विचित्रच वाटतो; पण स्वराज्य जाऊन परकीय राज्य आले होते. लोक जे लिहीत होते ते इतरेजनांसाठी नव्हते, तर राज्यकर्त्यांसाठी होते. त्यामुळे ते इंग्रजीत असणे अपेक्षितच होते. रावजीशास्त्रींनी इंग्रजीत लिहिलेला अहवाल मात्र वाचनीय आहे. नव्याने आलेल्या या भाषेवर मराठी माणसांनी मिळवलेले प्रभुत्व पाहून निश्चितच अचंबा वाटतो. रावजीशास्त्री बराच काळ समितीचे सचिव राहिल्यामुळे त्यांना विविध विषयांवरची अनेक पुस्तके वाचावी लागली आणि त्यावरची आपली मते परीक्षण अहवालरूपाने मांडावी लागली. आधुनिक काळातील टीका वाङ्‌मयाचा हा आरंभ म्हणायला पाहिजे. पुस्तकाचे परीक्षण कसे असावे याचा आदर्श त्यांनी घालून दिला. त्याचे मानकदंडही ठरवले, परीक्षणाचा ढाचा ठरवला.

कृष्णशास्त्री चिपळूणकर (१८२४-१८७८) हे प्राईझ कमिटीचे काही काळ सचिव होते व सभासदही होते. कृष्णशास्त्रींचे शिक्षणही पुणे पाठशाळेत झाले. पुढे ते पाठशाळेत (प्राध्यापक) गुरू म्हणूनही कार्यरत होत, पण

त्यांनी बराच काळ अनुवादक म्हणून काम केले. या काळात त्यांनी सिंदबादच्या सफरींपासून पदार्थविज्ञान शास्त्रावरील पुस्तके लिहिली; पण त्यातील बहुतेक भाषांतरे होती. संस्कृतचे प्रकांड पंडित म्हणून ते ओळखले जात. त्यांना लोक कौतुकाने आधुनिक बृहस्पती म्हणत. भाषांतरामुळे त्यांना अनेक इंग्रजी शब्दांचे मराठी प्रतिशब्द निर्माण करावे लागले. विशेषत: शास्त्रीय विषयात जरूर पडणाऱ्या नव्या शब्दांना त्यांनी जन्म दिला. ट्रेनिंग कॉलेजचेही ते प्राचार्य होते. श्रीकृष्णशास्त्री तळेकर हे दक्षिणा प्राईझ सोसायटीचे आणखी एक सभासद. त्यांचे शिक्षण पण पाठशाळा तथा पूना कॉलेजमध्ये झाले. पुढे त्यांनी इंग्रजी शिक्षणही घेतले. मोल्सवर्थच्या मराठी-इंग्रजी कोश निर्माणकार्यात त्यांचा मोठा सहभाग होता. त्यांनी इंग्लिश-मराठी कोश तयार केला. व्याकरणाचा त्यांचा दांडगा अभ्यास होता. विशेषत: अलंकारशास्त्रावर त्यांनी पुस्तकही लिहिले होते. पुणे पाठशाळेत ते शिकवत असत. शालापत्रक या मासिकाचे ते पहिले संपादक होत.

केरो लक्ष्मण छत्रे (१८३४ - ८४) तथा केरूनाना छत्रे हे एल्फिन्स्टन कॉलेज, पूना कॉलेज व डेक्कन कॉलेजात गणिताचे प्राध्यापक होते. एल्फिन्स्टन इंग्रजी शाळेतून शिक्षण घेतलेल्या पहिल्या काही विद्यार्थ्यांपैकी ते एक होते. गणित व ज्योतिषशास्त्रावर त्यांनी पुस्तके लिहिली. गणिताचे नामांकित प्राध्यापक म्हणून ते प्रसिद्ध होते.

महादेव गोविंद रानडे (१८४८ ते १९०१) हे महाराष्ट्राच्या सामाजिक व शैक्षणिक जीवनात समरस झालेले गृहस्थ. अनेक चळवळी व उपक्रमांचे ते निर्माते होते. मुंबई विद्यापीठाच्या पहिल्या पदवीधरांपैकी ते एक. मुंबई प्रांताच्या न्यायखात्यात न्यायमूर्ती म्हणून त्यांनी दीर्घकाळ काम केले. मुंबई हायकोर्टाचे ते पहिले मराठी न्यायाधीश. मराठी साहित्य निर्मितीत त्यांचा मोठा वाटा होता. विविध विषयांवर मराठीत लेखन व्हावे यासाठी त्यांनी खूपच प्रयत्न केले. मराठी साहित्याचा चिकित्सक आढावा, मराठ्यांचा इतिहास इ. विषयांवरील त्यांची पुस्तके नव्या पिढीला मार्गदर्शक ठरली. नागेश विनायक बापट यांच्या बहुतेक सर्व पुस्तकांना त्यांनी प्रस्तावना लिहिल्या आहेत.

समितीचे सचिव पुस्तक वाचून आपला अभिप्राय तयार करीत असत. बक्षिसासाठी ज्यांनी पुस्तके सादर केली आहेत, त्या सर्व पुस्तकांवर

अभिप्राय तयार केला जाई व ते एकत्रित करून समितीपुढे ठेवले जात. ए, बी, सी असे पुस्तकांना क्रमांक दिले जात. प्रत्येक सभासद त्या क्रमांकाच्या संदर्भात आपले मत नोंदवत असे. त्यातील एक स्पष्टीकरणार्थ दिलेली नोंद अशी. 'A' is the significant mark given to this work, all the rest being called by other letters or marks.

काही जणांनी आपले मत संक्षिप्त स्वरूपात नोंदले आहे. उदारहणार्थ, छत्रे व चिपळूणकर यांनी

I agree with the secretary in voting the whole prize to A.

तळेकर लिहितात "I am of the opinion that A stands much higher in many respects such as to language, plot, its execution of it & hit deservedly ranks the first. I therefore agree with Mr.Chiplonkar & the secretary in assigning the whole prize to it."

यात त्यांना पुस्तकातील भावलेले दोन मुद्दे १. भाषा व २. प्लॉट यांचा तळेकर मुद्दाम उल्लेख करतात व पहिले बक्षीस बापटांच्या पुस्तकास द्यावे या सेक्रेटरींच्या मतास दुजोरा देतात.

महादेव गोविंद रानडे यांनी सविस्तर अहवाल दिलेला असावा; पण पुस्तकात त्यातील काहीच भाग उद्धृत केलेला आहे. This description (of the Dhavadeshi Hermit) is really splendid. असे ते लिहितात. पुस्तकात This discription मात्र दिलेले नाही. ते असेही लिहितात की, A's style is more natural & racy and it has no bombast or affectation about it.

आपण सचिवांच्या मताशी सहमत आहोत व 'ए' ला पहिले पारितोषिक द्यावे, असे त्यांनी नोंदवले आहे.

समितीचे अध्यक्ष डॉ. किलहॉर्न हे होते. आपण सचिवांच्या मताशी सहमत आहोत व संपूर्ण बक्षीस बापटांच्या पुस्तकासच द्यावे अशी त्यांनी शिफारस केली होती. अर्थात, त्यांनी काही सुधारणा सुचविलेल्या आहेत आणि सुधारित पुस्तकास बक्षीस द्यावे अशी शिफारस ''डायरेक्टर ऑफ पब्लिक इन्स्ट्रक्शन'' ला आपण करू असे ते आश्वासन देतात. सुधारणा कोणत्या कराव्यात त्या सचिवांनी आपल्या विस्तृत अहवालात दिलेल्या आहेत. सचिवांचा परीक्षण अहवाल हा महत्त्वाचा असे आणि तो इतरांपेक्षा अधिक विस्तृत असे. त्यामुळे तो अभ्यासणे योग्य होईल.

सचिवांचा रिपोर्ट आठ पानांचा आहे. त्यात २८० ओळी असून, अंदाजे

तीन हजार शब्द आहेत. रिपोर्ट इंग्रजीत आहे. सचिवांच्या परीक्षण अहवालाची तारीख उपलब्ध नसली तरी ती १८७७-७८ या काळातील असावी. सुरुवातीला परीक्षक पुस्तकाची सर्वसाधारण माहिती सांगतात की, पुस्तक २८ भागांत विभागलेले आहे. त्यानंतर लेखक ज्या क्रमाने चरित्रनायकाची पुस्तकात ओळख करून देतो त्याच क्रमाने परीक्षक आढावा घेतो. पेशव्यांचा पूर्वेतिहास, त्यांचे कोकणातून परागंदा होणे व देशावर येणे, बाजीराव पेशवा व त्याचा भाऊ चिमणाजी यांचा जन्म व त्यांचे शिक्षण, त्यावेळची हिंदुस्थानची स्थिती, बाजीरावास पेशवेपद मिळणे, त्यावेळी उदयाला आलेली शिंदे, होळकर, पवार यांसारखी नवी घराणी व त्यांची माहिती, बाजीरावाचा राज्यकारभार व त्याची लोकाभिमुखता, मुलांचे संगोपन इतक्या गोष्टींचा पुस्तकाच्या अनुषंगाने ऊहापोह केला आहे. अहवालाच्या शेवटी त्यांनी बापटांनी बाजीरावाचे केलेले मूल्यमापन मांडले आहे. लेखकाच्या भाषाशैलीची वैशिष्ट्ये सांगितली व त्यांचे कौतुकही केले आहे.

" The admirable Sketch of Bajirao's life, end its lovely, charming and chaste style are not only superior to those of the other competitors but stands, I venture, to say, unsurpassed in our language by any other work of this kind during the last twenty years. It has the simplicity of Addison or Washington Irving and at the same time possesses the charms of Macaulay - I have no doubt that the book, if published, would be a valuable addition to the scanty stock of original books in Marathi."

ज्ञानार्जन, ज्ञानसंवर्धन व ज्ञानप्रसार यासाठी देण्यात येणारे दान म्हणजे दक्षिणा. तिचे मूळ रूप काळानुसार बदलत गेले. मराठी साहित्यात भर घालणारी पुस्तके लिहिणाऱ्या लेखकांना प्रोत्साहनपर देण्यात येणारे बक्षीस हेही मूळ 'दक्षिणा' संकल्पनेचेच एक रूप. त्याचा उदय व विस्तार कसा झाला त्याचा हा वृत्तांत.

♦♦

३.

# हिंदू तथा पूना कॉलेजची स्थापना

पुण्याचा पहिला ब्रिटिश कमिशनर माऊंट स्टुअर्ट एल्फिन्स्टन याच्या प्रेरणेने हिंदू साहित्य व संस्कृती यांच्या अभ्यासासाठी स्थापन झालेल्या हिंदू कॉलेज तथा पूना कॉलेजच्या संदर्भात निर्माण झालेले वाद व प्रतिवाद याचा हा वृत्तांत.

मुंबई विद्यापीठ स्थापनेला यावर्षी १५३ वर्षे पूर्ण होत आहेत. त्यापूर्वी मुंबई प्रांतात फक्त दोनच कॉलेजेस् होती. एक - एल्फिन्स्टन कॉलेज, मुंबई व दोन - पूना कॉलेज, पुणे. या पार्श्वभूमीवर पूना कॉलेजचा अभ्यास मोठा अर्थपूर्ण आहे.

१९ व्या शतकातील प्रसिद्ध साहित्यिक कै. नागेश विनायक बापट (१८३९-१९०२) यांनी त्या काळात दहा ऐतिहासिक व चरित्रात्मक कादंबऱ्या लिहिल्या. त्यातील पहिल्या बाजीरावचे चरित्र (१८७८) व पानिपतची मोहीम (१८९७) ही पुस्तके विशेष गाजली. बाजीरावच्या चरित्रास त्यावेळचे मानाचे 'दक्षिणा प्राईझ' मिळाले. बापट यांचे शिक्षण पूना कॉलेजमध्ये झाले. बापट यांचे चरित्रलेखनाचे काम करताना या दोन महत्त्वाच्या नोंदी मला मिळाल्या. तेव्हा मनात एक उत्सुकता निर्माण झाली की, दक्षिणा प्राईझ काय आहे व पूना कॉलेज कुठे आहे? कारण ही दोन्ही नांवे आज प्रचलित नाहीत. शोध घेतला तेव्हा कळाले की, या दोन्ही संकल्पना मूळ दक्षिणा या संकल्पनेशी जोडलेल्या आहेत.

१८२१ साली स्थापन झालेले पूना कॉलेज तथा हिंदू कॉलेज हे आजच्या शिक्षण संस्थांची आद्य व पायाभूत संस्था. शिक्षणव्यवस्थेत शिक्षक, विद्यार्थी व ज्ञान हे प्रमुख घटक. आधुनिक शिक्षण क्षेत्राशी निगडित असलेले अनेक प्रश्न प्रथमत: तेव्हा निर्माण झाले होते व त्या

प्रश्नांची सोडवणूक करताना अनेक  वाद-प्रतिवाद निर्माण झाले. त्याचा हा संशोधित वृत्तांत. आजच्या प्रश्नांशी त्याची तुलना करणे उद्‌बोधकच ठरेल. महाराष्ट्रातील अनेक प्रसिद्ध विचारवंतांचे या कॉलेजशी विद्यार्थी, शिक्षक वा व्यवस्थापक म्हणून घनिष्ठ संबंध आले.

**पूना कॉलेजची स्थापना :**

छत्रपती शिवाजी महाराजांपासून चालत असलेली श्रावण महिन्यात 'दक्षिणा' वाटण्याची प्रथा पेशवाईच्या अस्तापर्यंत म्हणजे १८१८ पर्यंत चालू होती. दुसऱ्या बाजीराव पेशव्यांच्या काळात पाच लाख रुपये 'दक्षिणा' रूपाने वाटले होते. तेव्हा ब्रिटिशांच्या ताब्यात पुणे आल्यानंतर दक्षिणासंदर्भात ब्रिटिशांनी निर्णय घेणे जरूरीचे झाले. पुण्याचा पहिला कमिशनर एल्फिन्स्टनने दोन लाख रुपये 'दक्षिणा' वाटण्यासाठी मंजूर केले. लोकांनी नैतिक उन्नती करायची असेल तर त्यांना चांगले शिक्षण देणे आवश्यक आहे व तेही त्यांच्या धार्मिक श्रद्धांना धक्का न देता दिले पाहिजे, असे एल्फिन्स्टनचे मत होते आणि जेत्यांची ही जबाबदारी आहे याची त्याला जाणीव होती. त्याने सुरुवातीला जरी दोन लाख दक्षिणेसाठी मंजूर केले, तरी प्रत्यक्षात ५० हजार रुपयेच दिले व त्यातून हिंदू लोकांसाठी त्यांच्या संस्कृती व परंपरांना प्रोत्साहन देणारे शिक्षण दिले पाहिजे व त्यासाठी वेगळी संस्था स्थापन करावी ही कल्पना पुढे आली. इंग्रजी शिक्षण व संस्कृती आधारित शिक्षण देण्यासाठी मुंबईस शिक्षण संस्था सुरू करावी, अशीही एल्फिन्स्टनची संकल्पना होती. शिक्षणासाठी आवश्यक पुस्तके जरी सहज उपलब्ध नसली तरी कोलकात्याच्या छापखान्यातून ती छापून घेता येतील. हिंदू साहित्य संपन्न आहे, त्यामार्गे सुसंस्कृत नागरिक तयार करता येतील, असाही त्याचा विचार होता. १८१९ मध्ये एल्फिन्स्टनला मुंबईचा गव्हर्नर म्हणून बढती मिळाली व पूना कॉलेजची योजना राबविण्याचे काम पुण्याचा नवा कमिशनर विल्यम चॅपलिनकडे आले. त्याने २४ नोव्हेंबर १८२० रोजी पुणे येथे सुरू करावयाच्या नव्या कॉलेजसंबंधी योजना तयार केली व ती फ्रान्सिस वॉर्डन, चीफ सेक्रेटरी, मुंबई प्रांत यांना पाठविली व त्यांच्यामार्फत पुढे मुंबईच्या गव्हर्नरला त्यांच्या संमतीसाठी पाठविली. अर्थात, या महत्त्वाच्या निर्णयाला कोलकात्यातील सुप्रीम गव्हर्नमेंट व शेवटी कोर्ट ऑफ डायरेक्टर्स, लंडन यांची संमती घेणे

आवश्यक होते. पुण्यात इंग्रजांचे नव्यानेच राज्य प्रस्थापित झाले होते आणि पुण्यातील ब्राह्मणांचा या नव्या राजाला विरोध असल्याची राज्यकर्त्यांना विशेषतः मुंबईच्या गव्हर्नर एल्फिन्स्टनला जाणीव होती. त्या मानाने कोलकाता व लंडनमधील दूरच्या अधिकारी वर्गाला ती समज कमी होती. ही योजना पुणे, मुंबई, कोलकाता व लंडन, असा उलटसुलट प्रवास करीत शेवटी मंजूर झाली.

या प्रवासातील विविध 'स्टेशनां'चा अभ्यास मोठा मनोरंजक आहे. पुण्यासारख्या एका गावात शिक्षण संस्था सुरू करण्यासाठी आणि त्यासाठी दरमहा हजार-पंधराशे रुपये खर्च करण्यासाठी त्या योजनेला पश्चिम (मुंबई) ते पूर्व (कोलकाता) असा हिंदुस्थानात प्रवास करावा लागला, एवढेच नव्हे तर सातासमुद्रापार लंडनची ही वारी करावी लागली; पण त्या काळातील रस्ते, बस, रेल्वे, विमान इत्यादी वाहतूक साधने नसतानाही प्रवासासाठी घेतलेला वेळ आजच्या मानाने फारच 'फास्ट' म्हणायला पाहिजे. ऑक्टोबर १८२१ रोजी मुंबईच्या फोर्टातील कार्यालयाकडून तात्पुरती का होईना, पण संमती मिळाली व ६ ऑक्टोबर १८२१ रोजी दसऱ्याच्या शुभमुहूर्तावर पुण्यातील विश्रामबागवाड्यात दरबार भरवण्यात आला. गावातील प्रतिष्ठित व्यक्तींना आमंत्रित करण्यात आले. चॅपलिनच्या योजनेचे मराठी भाषांतरही उपस्थितांना वाटण्यात आले. १८१८ साली पेशवाईचा अंत झाला आणि विश्रामबागवाड्याला कुलूप घालण्यात आले होते. या नव्या कॉलेजच्या निमित्ताने वाड्याचे कुलूप काढण्यात आले व मृत झालेला पेशव्याचा राजवाडा परत जिवंत झाला व त्यात कॉलेजसारखी एक पवित्र संस्था कार्यान्वित झाली. एका अर्थाने ही क्रांतिकारक संस्था पुढील शिक्षणधोरणाची नांदी होती. आतापर्यंतचे शिक्षण विकेंद्रित होते. ते जास्त करून कुटुंबाशी निगडित होते. पूर्वी गुरू शिष्याला गुरूच्या घरी शिकवत. नव्या योजनेत शिक्षण हे व्यक्तिसापेक्ष न राहता संस्थासापेक्ष झाले, शिक्षण जिथे दिले जाणार ते स्थान गुरूचेही घर नव्हते की विद्यार्थ्यांचेही घर नव्हते, गुरू व शिष्य हे दोघेही आपापले घर सोडून तिसऱ्याच ठिकाणी एकत्र येऊ लागले. शिष्याला एकाच ठिकाणी वेगवेगळ्या गुरूंकडून शिकण्याची सोय झाली व गुरूलाही विविध शिष्यांना एकत्रित शिकवण्याची संधी मिळाली. शिक्षण देणारे अनेक गुरू एकत्र आले आणि

त्यांच्या सांघिक कार्याला महत्त्व आले. त्याचप्रमाणे विद्यार्थीही एका ठिकाणी एकत्र येऊ लागले. त्यामुळे त्यांच्या प्रश्नांना सामूहिक स्वरूप आले. नियमांचे पालन वा नियम नाकारणे हे सामूहिक रूपात होऊ लागले. शिक्षण हे संस्थामय (Institutionalization) झाले. शिक्षक व विद्यार्थ्यांशिवाय एक स्वतंत्र व्यक्तिमत्त्व त्या संस्थेला प्राप्त झाले. शिक्षक येतील वा जातील संस्था पुढे चालूच राहते. या संस्थेचा हिंदू कॉलेज, संस्कृत कॉलेज, संस्कृत पाठशाळा, पूना कॉलेज व शेवटी डेक्कन कॉलेज, असा उल्लेख केलेला आढळतो.

**हिंदू कॉलेज - विल्यम चॅपलिनची योजना**

लोकभावना संतप्त होऊ नये, नव्या ब्रिटिश राज्याशी लोक, विशेषत: ब्राह्मणवर्ग एकनिष्ठ राहील व सद्‌भावना बाळगेल या आशेने पुण्याचा कमिशनर विल्यम चॅपलिन याने पुण्यात हिंदू कॉलेज सुरू करण्याची योजना गव्हर्नरला सादर केली. हिंदूंच्या महत्त्वाच्या सर्व शास्त्रांसाठी गुरू (प्रोफेसर्स) नेमले व विद्यार्थ्यांसाठी त्यांच्या शास्त्राभ्यासातील प्रगतीनुसार दक्षिणा देण्याचे सुचवले. पेशव्यांची लायब्ररी व पेशव्यांचा राहता वाडा कॉलेजसाठी उपलब्ध करून दिला. युरोपियन शास्त्रेही पूना कॉलेजात शिकवावीत असे चॅपलिनला वाटत होते; परंतु त्यामुळे लोक आपल्याबद्दल साशंक होतील, असे वाटल्यावरून चॅपलिनने तो मोह टाळला. व्याकरण, अलंकार, न्याय, धर्मशास्त्र, ज्योतिष, वेदांत, वैद्य, यजुर्वेद व ऋग्वेद शिकवण्यासाठी त्याने गुरू नेमले. विद्यार्थ्याने कोणतेही शास्त्र निवडावे; परंतु फक्त वेदांचा अभ्यास न करता इतर शास्त्रेही शिकली पाहिजेत, अशी अट होती. शिक्षक आणि विद्यार्थ्यांनी आपापल्या भूमिका शिस्तशीर व प्रामाणिकपणे राबवल्या पाहिजेत व विद्यार्थ्यांच्या परीक्षा वेळोवेळी घेतल्या पाहिजेत, हेही नमूद करण्यात आले. वॉर्डन, केनडी, अर्सकाईन व टेलर यांच्या समितीनेही चॅपलिनची योजना उचलून धरली; पण युरोपियन शास्त्रे शिकवण्यासाठी पुण्याचे वातावरण अनुकूल नाही, असेच त्यांचेही मत झाले. त्यासाठी मुंबई अधिक सोयिस्कर आहे व मुंबईत कॉलेज उघडून युरोपियन शास्त्रे शिकवावीत असे ठरले. पुण्यात हिंदूंची शास्त्रे शिकवण्यासाठी कॉलेज काढावे, असे समितीनेही मत मांडले.

**हिंदू कॉलेज - मुद्दे - प्रतिमुद्दे, वाद, प्रतिवाद :**

हिंदू कॉलेजची स्थापना होण्यापूर्वी व स्थापना झाल्यावरही ब्रिटिश अधिकाऱ्यांच्या मनात विचारांची आंदोलने निर्माण झालेली दिसतात. युद्धात पेशव्यांचा पराभव झाला हे खरेच; पण आता पुढे काय? पुणे ताब्यात आल्यावर निर्माण झालेल्या समस्या या नागरी स्वरूपाच्या होत्या. लष्करी विजय मिळविलेल्यांवर नागरी जबाबदाऱ्या आल्या. पराजित झालेले काय क्षमतेचे आहेत, ते सुसंस्कृत आहेत का रानटी आहेत? त्यांना समृद्ध परंपरा आहेत का? याविषयी अधिकाऱ्यांची द्विधा मन:स्थिती झाल्यासारखी दिसते. काही अधिकाऱ्यांना परिस्थितीचे चांगले आकलन होते, तर काही जण युरोपियन संस्कृतीविषयी जाज्वल्य अभिमानी होते. एल्फिन्स्टनसारख्या राजकारणी व योद्ध्याला आपण जनतेला दिलेल्या आश्वासनांची जाण नव्हती. पुण्याचा कमिशनर विल्यम चॅपलिन लिहितो, "I have proposed the appointment of teachers in almost all their branches of learning although many of them are perhaps worse than useless." हिंदूंचे बरेचसे साहित्य हे त्याच्या दृष्टीने टाकाऊ होते. त्याचप्रमाणे जी.एल. प्रेण्डरगार्ट लिहितो की, 'The expense is very heavy as a seminary for brahmins exclusively.' ज्युनिअर प्रिन्सिपल कलेक्टर ऑफ पूनाच्या मते, "with the greatest difference I think the establishment might be made more useful by reducing the number of professors for Hindu literature."

कलेक्टरच्या मते हिंदू लिटरेचर शिकवणे बंद करावे. कारण ब्रिटिश शासनास त्याचा काही उपयोग नाही. पूना कॉलेज स्थापन झाल्यानंतर १४ वर्षांनी म्हणजे ऑक्टोबर १८३४ मध्ये कलेक्टर जे.एच.डब्ल्यू. बाबरही स्पष्ट शब्दात आपले असमाधान व्यक्त करतात. ते लिहितात की, 'Instead of furnishing useful learning it has had the effect of perpertuating their own erroneous system of education, they are taught nothing that is useful and the science professed to be taught, locked up as they are, in the ignoto regions of Sanscrit, afford neither scope to enlarge the understanding or improve the heart, neither sound learning, improved habits of virtue & morality or recreated feeling of respect of our Government and for the principles of English rule, have been promoted thereby.'

थोडक्यात, आपण (इंग्रज) या देशी लोकांसाठी इतके करतो तरीही

आपल्या शासनाबाबत त्यांच्या मनात आदर निर्माण झालेला नाही. कलेक्टर खेदाने नोंद करतात की, गेली १४ वर्षे आपण लोकांसाठी ही संस्था समाजातील प्रतिष्ठित, विशेषत: ब्राह्मण समाजासाठी चालवत आहोत; पण आतापर्यंत पुण्यातील एकाही प्रतिष्ठित व्यक्तीने आपल्या पाल्याला शिक्षणासाठी या कॉलेजात पाठवले नाही किंवा या कॉलेजातून शिक्षण घेऊन बाहेर पडलेल्यांपैकी, एक गोविंदशास्त्रीचा अपवाद सोडता, अन्य कोणीही ब्रिटिश सरकारच्या कचेरीत नोकरी केली नाही. तेव्हा अशी ही निरुपयोगी संस्था चालू ठेवावी की नाही, हा प्रश्नच आहे. यापूर्वी बनारस व कोलकाता येथेही असेच कॉलेज सुरू केले होते; परंतु अनुभव वाईट आल्याने ती दोन्ही कॉलेजेस् बंद करावी लागली; पण त्याचबरोबर चॅपलिनसारख्या इंग्रजाला वाटे की, अन्य समाजातील कोणास शिक्षणाची आस नाही आणि शिक्षणाची आवड असणाऱ्या या ब्राह्मणांना पारंपरिक का होईना; पण शिक्षण देणारी पूना कॉलेजसारखी संस्थाच बंद केली, तर इंग्रजी शिक्षण देण्यासाठी पुढे प्रयत्नच करता येणार नाहीत. तेव्हा पुणेरी ब्राह्मणांचे शिक्षणाशी असलेले संबंध तोडू नयेत. त्यांची मते हळूहळू बदलतील, अशी आशा काहींना होती.

सदरलॅण्डने पूना कॉलेजविषयी आपले मत नोंदवले की, हे कॉलेज बंद करू नये; पण त्याबरोबर असेही सुचवले की, कॉलेजचे व्यवस्थापन एकाच व्यक्तीच्या हातात केंद्रित न करता त्यासाठी एखादी समिती नेमावी. सरकारनेही एक समिती स्थापन केली आणि त्यात एजंट टू सरदार्स, डिव्हिजनल कमिशनर व ज्युडिशियल कमिशनर यांचाही सभासद म्हणून समावेश केला. हिंदू कॉलेज तथा पूना कॉलेजचा कारभार चौघांची समिती पाहू लागली (२४ नोव्हेंबर १८३४). बाबर जे. सदरलॅण्ड, आयर्नसाईड व आर. ग्रॅन्ट हे समितीचे सभासद म्हणून काम करू लागले. त्यांनी सामुदायिक व व्यक्तिश: वेळोवेळी मत प्रकट केली.

२९ ऑक्टोबर १८३५ ला समितीने आपला अहवाल दिला. त्यांच्या मते कॉलेजवर होणारा खर्च आणि त्यापासून मिळणारा फायदा यांचे प्रमाण व्यस्त आहे. कॉलेजवरील खर्च अनाठायी आहे व त्यामुळे तो बंद करावा पण बंद केल्यामुळे असंतोष होईल म्हणून कॉलेज एकदम बंद न करता त्यास हळूहळू मरू द्यावे. या अहवालाबरोबर काही सभासदांनी आपले

व्यक्तिगत मतही मांडले.

कमिशनर आर. ग्रॅन्टने आपले स्वतंत्र टिपण दिले आहे. हिंदू कॉलेजचा आपल्याला काही उपयोग नाही, या कलेक्टर बाबरच्या मतास त्याने पाठिंबा दिला, त्याच्या मते हिंदू कॉलेज ब्राह्मण हितसंबंधाचे संरक्षण करते व प्रोत्साहन देते आणि हे ब्रिटिशांविरोधी आहे. याशिवाय आणखीनही कारणासाठी हे कॉलेज चालू ठेवण्यात त्यांना अडचण वाटते. ब्रिटिश सरकारने इंग्रजी शिक्षण देणारी शाळा पुण्यात सुरू केली. सरकारचा इस्डेल यांच्या इंग्रजी शाळेस पाठिंबा होता. त्याच गावात हिंदू कॉलेज असल्याने सरकारला ते अडचणीचे होते. प्रत्येक वेळेस दोघांची तुलना होईल. शासनाला मुक्तपणे इंग्रजी शाळेला मदत करता येत नसे. हिंदू कॉलेजातील धर्मवादी व हटवादी प्राध्यापकांच्या मनात मत्सराची भावना निर्माण होते. वातावरण निर्मितीसाठी गव्हर्नरची संस्थेला देण्यात येणारी भेट म्हणजे चेष्टाच ठरेल. हिंदू कॉलेज गव्हर्नरकडे चहाड्या करतील. तेव्हा समितीने जरी कॉलेजच्या विलंबित मृत्यूचा सल्ला दिला असला, तरी त्यामुळे प्रश्न सुटण्याऐवजी तो अधिकच अवघड होईल, तेव्हा विद्यार्थ्यांना त्यांच्या मासिक पाच रुपये विद्यावेतनाऐवजी एखादी विशिष्ट रक्कम द्यावी. प्राध्यापकांना निवृत्तिवेतन द्यावे किंवा सरकारी यंत्रणेत सामावून घ्यावे व हे प्रकरण तातडीने कायमचे संपवावे. दुसरा पर्याय म्हणजे अर्थात घाईगर्दीने हे करू नये; पण ती योग्य वेळ आल्यास या संस्थेचा गळा दाबावा.

एवढेच नव्हे तर ग्रॅन्ट असेही दिवास्वप्न पाहतो की, कॉलेज बंद झाल्यामुळे हिंदू धर्मीयांतील काही गट आनंदित होतील. त्याची अपेक्षा होती की, कॉलेजचा मुख्य गुरू व त्याचे धर्मवेडे सहकारी हे वैष्णव आहेत व पुण्यातील बहुसंख्य ब्राह्मण हे शिवपूजक आहेत. तेव्हा पुण्यातील शैवपंथीय would rather rejoice than weep at the downfall of their rivals- काहींनी असेही सुचवले की, कॉलेज पूर्ण बंद न करता दुसऱ्या संस्थेत सामील करावे; पण ग्रॅन्टला ते पटले नाही. त्याचे म्हणणे दुसऱ्या (इंग्रजी प्रभाव असणाऱ्या) संस्थेत हिंदू कॉलेज सामील करणे म्हणजे अग्नी आणि पाणी यांचा संयोग करण्यासारखे आहे.

जेम्स सदरलॅण्ड या समितीच्या एका सभासदाने सुचवले की, हिंदू कॉलेजात हळूहळू इंग्रजी विद्याही शिकवण्याची व्यवस्था करावी. ग्रॅन्टच्या

मते हे कलम जगणार नाही. कारण संस्कृत व इंग्लिश शिक्षण पद्धती पूर्णत: भिन्न आहेत. जेम्स सदरलॅण्डने असेही सुचवले की, संस्कृत साहित्य, व्याकरण व धर्मशास्त्र हे विषय शिकवणे बंद करावेत.

रेव्हरंड जेम्स स्टिव्हन्सन याने पुढाकार घेऊन २८ नोव्हेंबर १८३६ रोजी गव्हर्नर मुंबई यास पत्र लिहिले. पूना कॉलेज चालू ठेवावे का आणि ठेवायचेच असल्यास त्यात कोणते विषय शिकवावेत याविषयी आपले मत मांडले. स्टिव्हनसनच्या मते कॉलेजात विद्यार्थ्यांना संस्कृत शिकवणे आवश्यक आहे. कारण या प्रदेशातील कायदा, साहित्य व धर्म यासंबंधीचे ज्ञान संस्कृतमध्ये आहे. मराठी भाषा अजून प्रगत झालेली नाही व इंग्रजी शिकवण्याची आपली कितीही इच्छा असली तरी सर्व व्यवहार इंग्रजीतून करणे शक्य नाही. इंग्रजीसारखी परकी भाषा शिकण्यासाठी विद्यार्थ्यांना त्याच्या प्रादेशिक भाषेची चांगली जाण असली पाहिजे. मराठी भाषा ही संस्कृत आधारित आहे आणि संस्कृत शब्द मराठी भाषेत सहज रुजतात. तेव्हा इंग्रजी व मराठी भाषा या दोन्हींच्या अभ्यासासाठी विद्यार्थ्यांना संस्कृत शिकणे हितावह आहे. त्याच्या मते न्याय व धर्मशास्त्र, ज्योतिष व गणित, अलंकार व व्याकरण हे विषय शिकवावेत. संस्कृत भाषेची जाण असल्यामुळे व त्यातील ज्ञानसंपदा विद्यार्थ्यांना मिळाल्यामुळे इंग्रजी भाषेतून ज्ञान दिले जाईल तेव्हा विद्यार्थ्यांना दोन्ही ज्ञानसंपदांची तुलना करता येईल. शासनाने हे मान्य केले व न्याय, व्याकरण, धर्मशास्त्र, ज्योतिष, अलंकार इ. विषयांचे शिक्षण चालू ठेवण्यास संमती दिली.

मुंबई सरकारने शेवटी निर्णय घेतला की, पूना कॉलेज बंद करू नये. त्याच्या व्यवस्थापनात सुधारणा करून ही संस्था लोकांच्या नैतिक व शास्त्रीय प्रगतीसाठी उपयुक्त ठरू शकेल.

पूना कॉलेजचे व्यवस्थापन युरोपियन माणसाच्या ताब्यात देण्याचे ठरले; पण ज्याला भारतीय भाषा व संस्कृतीची जाण आहे व युरोपियन शास्त्राचीही माहिती आहे, असा माणूस मिळणे कठीण आहे, याची शासनाला जाणीव होती. कारण ही यादी दोन-चार जणांच्या पलीकडे जाईना. शेवटी चीफ सेक्रेटरी वादेन याने पुणेवासीय लेफ्टनंट थॉमस कँडी याचे नाव सुचवले. कँडी याने कॅप्टन मोल्सवर्थच्या साहाय्याने मराठी शब्दकोश तयार केला होता व त्याला प्रादेशिक संस्कृतीची ओळख होती.

कँडीची धर्म व शिस्तीसंबंधी कडक मते होती असे दिसते. कारण त्याच्या नेमणुकीच्या वेळी सेक्रेटरी वादेन साहेबाने याची नोंद घेतलेली आहे. देशी रीतिरिवाज, धर्मसंकल्पना यात त्याने ढवळाढवळ करू नये ही शासकीय अपेक्षा त्याला कळविण्यात आली व लोकक्षोभ होणार नाही याची काळजी घ्यावी असे सुचविले. ९ फेब्रुवारी १८३७ रोजी कँडीची पूना कॉलेजचा सुपरिन्टेंडन्ट म्हणून नेमणूक झाली. या नेमणुकीने कॉलेजव्यवस्थापनात महत्त्वाचा बदल झाला. कॉलेजव्यवस्थापन सुरुवातीला (१८२१) कलेक्टरकडे होते. पुढे (१८३४) ते व्यवस्थापन समितीकडे देण्यात आले. १८३७ ला समितीऐवजी सुपरिन्टेंडन्टकडे देण्यात आले. कँडीकडे कॉलेजबरोबरच त्या भागातील शाळांच्या पर्यवेक्षणाचे कामही देण्यात आले. त्याला कामात पुष्कळच स्वातंत्र्य देण्यात आले. त्याच्या कामाचे स्वरूपही स्पष्ट करून सांगण्यात आले. पुणे हेच त्याचे मुख्य कार्यालय ठरले. त्याला मदत करण्यासाठी एका पंडिताची निवड करण्याचे त्याला अधिकार देण्यात आले. समितीलाही पूना कॉलेजच्या व्यवस्थापनातील बदल कळविण्यात आले; पण असेही सुचवले की, समितीने कँडीस सहकार्य करावे, अधूनमधून सभा घ्यावी व प्रगतीची माहिती करून घ्यावी व त्यांना प्रोत्साहन द्यावे.

पूना कॉलेज सुरू झाल्यानंतर दुसऱ्या वर्षापासून म्हणजे १८२२ पासून पूना कॉलेजात हिंदूंचे काही धार्मिक उत्सव साजरे करण्यात येऊ लागले होते. गणेशोत्सव, दिवाळी, संक्रांत, गुरुपौर्णिमा-व्यासपूजा व होळी हे सण कॉलेजात उत्साहाने साजरे होत. त्यावर झालेल्या खर्चाचे टिपण उपलब्ध आहे ते असे.

| **दिनांक** | **सण** | **खर्च रु.** |
|---|---|---|
| ३ जुलै १८२२ | व्यासपूजा | १५० |
| २८ डिसेंबर १८२६ | होळी | ४०० |
| २६ ऑगस्ट १८२४ | गणेश चतुर्थी | १२५ |
| २१ ऑक्टोबर १८३१ | संक्रांत | २५ |
| १७ ऑक्टोबर १८२४ | दिवाळी | ६० |
| | **एकूण** | **७६०** |

**रिचर्ड मिल, प्रिन्सिपल**

कलेक्टरने २६ जुलै १८३६ रोजी तयार केलेले हे टिपण आहे व ते मुंबई सरकारच्या सेक्रेटरी टू गव्हर्नमेंट जे.पी. विलोबी याला पाठवलेले आहे. त्यातील होळी व संक्रांतीची तारीख बरोबर वाटत नाही; पण या पत्रावरून हे सण साजरे होत होते हे खरे. पुण्याचा कमिशनर विल्यम चॅपलिन याने पूना कॉलेजची जी योजना केली होती त्यात या उत्सवांच्या संदर्भात काही आश्वासन दिलेले नव्हते वा एल्फिन्स्टनच्या जाहीरनाम्यातही त्याचा अंतर्भाव नव्हता. पेशवाईच्या काळात हे सण विश्रामबागवाड्यात साजरे होत असावेत व १८१८ च्या पेशवाईच्या अंतानंतर वाड्याला कुलूप असल्याने हे सण साजरे होत नव्हते. याच वाड्यात पूना कॉलेजची तेथे स्थापना झाल्यावर पुण्यातील नागरिकांचे सहकार्य मिळवण्याच्या आशेने हे उत्सव परत सुरू झाले असावेत. कॉलेज पंधरा वर्षे सुरळीत काम करू लागल्यावर १८३६-३७ च्या सुमारास ब्रिटिश अधिकाऱ्यांच्या मनात वेगळेच विचार येऊ लागले. याच काळात कॉलेज बंद करावे हाही विचार अधिकाऱ्यांनी शासनापुढे मांडला होता. सुरुवातीला परिस्थितीशी जुळवून घेण्यासाठी ब्रिटिश शासनाने सुरू केलेले हे हिंदूंचे धार्मिक सण, पुढे ब्रिटिश अधिकाऱ्यांच्या डोळ्यात खुपू लागले. अधिकाऱ्यांना हे सण म्हणजे धांगडधिंगा व एंटरटेन प्रोग्राम वाटत होते. हिंदूंच्या मनात त्या सणांचे पावित्र्य किती असते याची परकीय व परधर्मीय अधिकाऱ्यांना जाण असणे कठीणच होते. तेव्हा कॉलेजच्या नव्यानेच सुपरिन्टेंडन्ट म्हणून नेमलेला लष्करी अधिकारी मेजर कँडी याने १४ ऑक्टोंबर १८३८ रोजी ई.एच. टाऊनसेंड, सेक्रेटरी टू गव्हर्नमेंट यांना या उत्सावांविषयी आपले मत कळवले ते असे.

" The discontinuance of these allowances seems to me highly desirable not only on account of the objection common to them with other Government allowances to Native festivals but from their rival effect on the College as a Seminary or learning. They form no incentive to study nor operate as a reward for good conduct but merely furnish to the student occasions of excitement and mental dissipation and for the time prevent the collect from the proper use." गुरुपौर्णिमा वा दिवाळी हे सण Occasions of mental dissipation असे वाटत असेल तर त्याने हे

सण बंद करावेत हे म्हणणे अपेक्षितच आहे. तसेच गणेशोत्सवाविषयी मेजर कँडी लिहितो- "An idol is set up."

तेव्हा गणेशोत्सव म्हणजे एक set up करणे, मग तिची पूजा करणे व काही दिवसांनंतर त्यास dismiss करणे आणि नदीत throw करणे. एवढ्यापुरतेच कँडीसाहेबाचे आकलन असेल, तर ते सण पूना कॉलेजातून हद्दपार होणे स्वाभाविकच म्हणावे लागेल. पुण्यावर दहा-पंधरा वर्षेच राज्य करायला लागलेल्या ब्रिटिशांना व कँडीसारख्या अधिकाऱ्यास हे वाटणे साहजिकच आहे; पण 'दर्पण'सारख्या देशी मासिकालाही तसेच वाटणे हे दुर्दैवच म्हणायला पाहिजे. त्याने या सणांचे उद्देश काय आहेत व त्यांचे हिंदू धर्मीयांच्या जीवनात काय महत्त्व आहे व त्यात सुधारणा काय कराव्यात हे लिहिण्याऐवजी सरकारच्या धोरणास पाठिंबा दिला हे अजबच म्हटले पाहिजे.

कॉलेजात साजरे होणारे उत्सव बंद झाल्यामुळे वाचलेले पैसे हे असिस्टंट प्रोफेसरांचे पगार वाढवण्यासाठी वापरावेत, असे मेजर कँडीने सुचवले. असिस्टंट प्रोफेसरांना पूर्वी द.म.रु. वीस पगार होता. त्या वेळेस एकूण आठ असिस्टंट प्रोफेसर्स होते. कॉलेजमधील ज्येष्ठ मंडळींचा कँडीस विरोध होता. त्याने प्राध्यापकांच्या कार्यात हस्तक्षेप करू नये असेच त्यांचे मत होते. तेव्हा आपल्या बाजूने एक फळी उभारणे हे कँडीस जरूरीचे होते. त्याला ही संधी मिळाली, असि. प्रोफेसरांचे पगार वाढवून. तो लिहितो.

"The proposed changed would be hailed as a great boon by the Asst. Professors."

कँडीने ज्या बॉसला हे कळवले त्या गव्हर्नर रॉबर्ट ग्रॅन्टनेही नोंदवले की The proposed improvement being one which can't fail to be popular with a very influential body in the College.

ब्रिटिश अधिकाऱ्यांची प्रशासनाची एक पद्धत होती की, त्यांना जे करायचे ते ते करतात व त्यामुळे जे दुखावले जातात व जी अशांतता निर्माण होते त्याला शह देण्यासाठी ते दुसऱ्या एखाद्या गटाला favour करतात व दुखावलेल्यांच्या विरुद्ध एक गट उभा करतात.

♦♦

४.

# पूना कॉलेज - अभ्यासक्रम

पेशवाईच्या काळात पुणे हे नुसतेच एक राजकीय केंद्र नव्हते, तर ते महाराष्ट्राचे सांस्कृतिक व शैक्षणिक केंद्र होते. १८१८ मध्ये पेशवाई संपुष्टात आली व ज्या ठिकाणी संपूर्ण हिंदुस्थानातून पन्नास हजारांपेक्षा जास्त विद्वान आपली विद्वत्ता दाखवण्यासाठी श्रावणात जमत ते गाव ओसाड पडले. या परिस्थितीची जाणीव पुण्याचा पहिला कमिशनर माऊन्ट स्टुअर्ट एल्फिन्स्टनला झाली व त्याने पुण्यात हिंदू शास्त्राचे शिक्षण देण्यासाठी १८२१ मध्ये कॉलेज सुरू केले. या नव्याने सुरू केलेल्या कॉलेजात कोणाला प्रवेश द्यायचा, त्यांना काय शिकवायचे व किती काळ शिकवायचे, विद्यार्थ्यांना शिक्षण मोफत द्यायचे, की फी आकारायची, विद्यावेतन द्यायचे तर किती द्यायचे व किती काळ द्यायचे, परीक्षा कशा व केव्हा घ्यायच्या, अभ्यासासाठी पुस्तके व इतर सामग्री कोणती असावी असे असंख्य प्रश्न निर्माण झाले. त्यांची सोडवणूक कशी झाली व महाराष्ट्रातील आधुनिक शिक्षणाचा पाया कसा उभारला याचा संशोधन आधारित वृत्तांत देण्याचा लेखकाचा हा एक प्रयत्न आहे.

मुंबई विद्यापीठ (१८५७) सुरू होण्यापूर्वी महाराष्ट्रातील शिक्षणव्यवस्था कशी होती? याची उत्तरे या लेखात शोधता येतील.

**पूना कॉलेजातील अभ्यासक्रम :**

माऊंट स्टुअर्ट एल्फिन्स्टनने जेव्हा पुण्यात कॉलेज काढण्याची संकल्पना मांडली (१८१९) तेव्हा ते हिंदू लोकांसाठी व हिंदूंच्या संस्कृतीला धरून असेल, असे त्याच्या मनात होते. त्याच्यानंतर आलेल्या पुण्याचा कमिशनर विल्यम चॅपलिनला संस्कृत आधारित शास्त्रे व इंग्लिश शास्त्रे यांचे शिक्षण

पूना कॉलेजात देण्याची व्यवस्था व्हावी असे वाटले; पण इंग्रजी शास्त्रांचे स्वागत कितपत होईल व लोकांना किती रुचेल याविषयी त्याच्या मनात शंका होती म्हणून त्याने सादर केलेल्या योजनेत फक्त हिंदू शास्त्रांचाच समावेश होता व तीच योजना मुंबई सरकारने स्वीकारली.

चॅपलिन योजनेत एकूण दहा विषय शिकवण्याची व्यवस्था करण्यात आली. व्याकरण, अलंकार, न्याय, धर्मशास्त्र, ज्योतिष, वेदांत, वैद्यक, ऋग्वेद व यजुर्वेदाच्या दोन शाखा हे दहा विषय निवडण्यात आले.

कोणते विषय अभ्यासासाठी निवडावेत याचे स्वातंत्र्य विद्यार्थ्यांना देण्यात आले; पण अशीही अट घातली की, विद्यार्थ्याला फक्त वेदांचाच अभ्यास निवडता येणार नाही. त्याला वेदांबरोबर अन्य विषयही अभ्यासासाठी निवडावे लागतील. वेदांशिवाय अन्य शास्त्रांना अभ्यासक्रमात प्राधान्य दिले जाईल. वेदांविषयी व वैदिकांविषयी ब्रिटिशांच्या मनात पहिल्यापासूनच अढी होती. बहुसंख्य हिंदूंना वेद म्हणजे काय आणि त्याचा अभ्यास करायचा म्हणजे काय हे माहीत नसते, तर ब्रिटिशांना त्याची माहिती असण्याची शक्यता कमीच. त्यात पेशवाईच्या काळात वैदिकांना सन्मानपूर्वक वागणूक मिळत असे आणि सर्व हिंदुस्थानातून वैदिक श्रावण महिन्यात पुण्यात जमा होत असत व त्यामुळे ते एका अर्थाने पेशव्यांना मानणारे होते, ब्रिटिशांशी फटकून वागणारेही तेच होते. शिवाय वैदिक हे पढतमूर्ख आहेत, त्यांना वेदांचा अर्थ समजत नाही, वेदशिक्षणामुळे कोणतेही दैनंदिन व्यवहारात उपयोगी पडणारे शिक्षण मिळत नाही, असे ब्रिटिश अधिकाऱ्यांचे मत होते.

चॅपलिन योजनेत कायदा, गणित, वैद्यक यांना प्रोत्साहन देण्याचे ठरले. हे विषय शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना इतर विद्यार्थ्यांपेक्षा जास्त रकमेची बक्षिसे जाहीर करण्यात आली. या विषयाच्या विद्यार्थ्यांना धर्मशास्त्र व न्याय यासंबंधात न्यायालयात निर्माण होणारे प्रश्न त्यांच्या मतासाठी पाठवले जातील व विद्यार्थ्यांना आपले प्रांजळ मत द्यावे लागेल असे ठरले. अन्य विषय बंद करावेत. ग्रॅन्टला हाही पर्याय मंजूर नव्हता. त्याच्या म्हणण्याप्रमाणे आजपर्यंत शंभरपेक्षा अधिक विद्यार्थी या कॉलेजातून शिकून बाहेर पडलेले आहेत आणि त्यापैकी फक्त एकच जण शासकीय सेवेत रुजू झाला आणि कॉलेजच्या बाहेर धर्मशास्त्र अनेक ठिकाणी शिकवले जाते. तेव्हा न्यायालयांना

जेव्हा जरूर पडेल तेव्हा धर्मशास्त्री मिळण्यात अडचण आलेली नाही. नागरी व फौजदारी न्यायनिवाडे करताना हिंदू धर्मशास्त्राच्या माहीतगाराची जरूरी भासत असली तरी ते नेहमीच मिळाले आहेत आणि दोन-चार धर्मशास्त्री मिळवण्यासाठी एवढा मोठा खर्च हिंदू कॉलेजवर करण्याची जरूरी नाही. शिवाय ब्रिटिश शासन स्वत:चा फौजदारी व नागरी कायदा अंमलात आणणार आहे, त्यामुळे हिंदू धर्मशास्त्र्यांची जरूरीच भासणार नाही. ग्रँट व सदरलँड या दोन ब्रिटिश सनदी अधिकाऱ्यांमध्ये मतभेद होते. एकाला वाटे फक्त धर्मशास्त्रच शिकवावे. कारण न्यायदानात त्याची जरूरी आहे. का धर्मशास्त्राबरोबर व्याकरण व साहित्यही शिकवावे? ग्रँटचे मत होते की, फक्त धर्मशास्त्राची जरूरी आहे तेव्हा फक्त तेवढेच शिकवावे, सदरलँडच्या मते व्याकरण व साहित्याच्या अभ्यासाशिवाय धर्मशास्त्राचा अभ्यास पूर्ण होणार नाही.

समितीचा तिसरा सभासद ई. आयर्नसाईड यांनी काही फारसा वाद-प्रतिवाद केलेला दिसत नाही. आपण सदरलँडच्या मताचेच असल्याचे तो नोंदवतो.

**पूना कॉलेजमध्ये शिकवले जाणारे काही विषय व पुस्तके**

| **विषय** | **पुस्तके** |
|---|---|
| १. न्याय - तर्कशास्त्र | गदाधरी अवयव, व्युत्पत्ती, गदाधरी सुव्यभिचार, सत्प्रुति प्रकाश ग्रंथ, प्रामाप्य वाद, गागादेशी, गदाधरी, चतुर्दश लक्षणि, सामान्य निरुक्ति, दिनकरि, मथुरानाथि, तर्कसंग्रह मुक्तावलि |
| २. खगोलशास्त्र | गुरुलाघव, लीलावति, बीजगणित सिद्धांत शिरोमणी गोलाध्याय, गुणाध्याय, सुबाजी बापूकृत ज्योतिषशास्त्र व कोपर्निकसचे ग्रंथ लघुचिंतामणी, सूर्यसिद्धांत, मॅकलेनकन |
| ३. धर्मशास्त्र | मिताक्षरी, व्यवहार मयूरव, मनुस्मृति, निर्णयसिंधू |
| ४. व्याकरण | सुबोधरत्न, कौस्तुभ, मनोरमा, कौमुदि |

| | |
|---|---|
| ५. अलंकार | किरात, माघ, भारत चंपु, वेणीसंहार, प्रतापरुद्र, निषध, रामायण चंपु, रघुवंश, कुमार |
| ६. आयुर्वेद | माधवनिदान, वाग्भटाध्याय, शार्ङ्गधर, वैद्यजीवन, शरीराध्याय, भग्नहाडावर |

**पूना कॉलेजमध्ये शिकवल्या जाणाऱ्या विषयांची थोडक्यात ओळख आणि त्याविषयीची अधिकाऱ्यांची मते -**

**१. कायदेशास्त्र :**

या विषयाचा अभ्यास विशेष महत्त्वाचा होता. कारण हिंदू लोकांचे वारसा, मालमत्ता इत्यादीविषयीचे नियम शास्त्रींकडूनच मिळत. इंग्रज न्यायाधीशांना हिंदूंची मालमत्ता व त्याची वाटणी यासंदर्भातील माहिती नव्हती. संस्कृतमध्येच याविषयीचे कायदेकानून होते. हा विषय उपयुक्त होता.

**२. व्याकरण :**

भाषेवरचे प्रभुत्व मिळवण्यासाठी व्याकरणाचा अभ्यास आवश्यक होता. संस्कृत हीच ज्ञानभाषा होती. त्यामुळे संस्कृतमधील कोणतेही लिखाण अभ्यासावयाचे असेल तर व्याकरणाचा अभ्यास आवश्यक होता. व्याकरणाची फार प्राचीन परंपरा आहे. त्या काळात लिखित साहित्य फार अल्प प्रमाणात उपलब्ध असल्यामुळे विद्यार्थ्याला विषयाची मूळ संहिता पाठ करावी लागे व त्यानंतर त्या विषयावरील टीकांचा अभ्यास करावा लागे. हा अभ्यास पूर्ण करण्यासाठी बारा वर्षांचा कालावधी लागत असे. ब्रिटिश अधिकाऱ्यांना हे समजत नसे की, हिंदू लोकांना हा साधा विषय अभ्यासण्यासाठी इतकी वर्षे का लागतात. त्यांना वाटे की, हिंदूंनी हा विषय अकारण अवघड करून ठेवला आहे.

**३. धर्मशास्त्र :**

यात मुख्यत्वेकरून स्मृती ग्रंथांचा अभ्यास केला जाई. विशेषकरून मनुस्मृती ग्रंथाचा अभ्यास होई. विल्यम जोन्सच्या भाषांतरामुळे ब्रिटिशांना या पुस्तकाची व विषयाची ओळख झालेली आढळते.

रेव्हरंड जे. स्टिव्हन्सनच्या मते ही तीन शास्त्रे फक्त उपयुक्त आहेत. अन्य शास्त्रे ही निरुपयोगी व हानिकारक आहेत.

**४. वेदांत :**

हिंदूंचे तत्त्वज्ञान वेदांतात शिकवले जाई. रे. स्टिव्हन्सन लिहितो की वेदांती लोक हे जग वास्तव नसून मिथ्या आहे आणि ते अद्वैताचा पुरस्कार करतात; परंतु प्रत्यक्षात हिंदू द्वैतही व अद्वैतही आहेत.

**५. ज्योतिष :**

ज्योतिषशास्त्रात ज्योतिर्विज्ञान व फलज्योतिष शिकवले जाई. हिंदूंच्या सर्व समारंभांसाठी योग्य शुभ काळ शोधून देणे हे या शास्त्राचे काम. भास्कराचार्यांच्या पुस्तकाचा अभ्यास होई. हे शास्त्र विशेषत: शास्त्रीय व युरोपियन पद्धतीने शिकवले तर अधिक फायदेशीर होईल, असे बहुतेकांचे मत होते.

**६. अलंकार**

उत्तम साहित्य निर्मितीसाठी अलंकार विषयाचा अभ्यास आवश्यक आहे असे हिंदू समजत. मात्र युरोपियन्सना ते निरर्थक वाटे.

**७. वैद्यक :**

यात मानवी आरोग्याविषयीच्या ग्रंथांचा अभ्यास होई. देशी औषधोपचार पद्धतीवर युरोपियन मंडळींचा विश्वास नव्हता व त्यामुळे आयुर्वेदाऐवजी युरोपियन वैद्यकशास्त्र शिकवावे, असे अधिकाऱ्यांचे मत होते.

**८. वेद :**

ऋग्वेद व यजुर्वेद शिकवला जाई; पण वेदांविषयी युरोपियन मंडळीच्या मनात तुच्छता दिसून येते व ती शास्त्रे गोदामात ठेवण्याच्या लायकीची आहेत, असे त्यांना वाटे.

**९. न्याय :**

या विषयात कायदा शिकवला जाई. विशेषत: तर्कशास्त्राचा अभ्यास अंतर्भूत आहे. वेदांतीच्या विरुद्ध मताचे ते आहेत. जग मिथ्या नसून वास्तव आहे, असे ते मानत.

**अभ्यासक्रमातील महत्त्वाचे बदल**

पूना कॉलेज १८२१ मध्ये जेव्हा सुरू झाले तेव्हा संस्थापकांच्या मनात हिंदूंच्या साहित्याच्या अभ्यासासाठी एक कॉलेज सुरू करावे असे होते. संस्कृत ही त्यावेळची मुख्य ज्ञानभाषा होती. त्यामुळे संस्कृत भाषेत उपलब्ध असलेली शास्त्रे व वेद यांचे शिक्षण देण्याची व्यवस्था करण्यात आली.

एकूण १०० विद्यार्थी कॉलेजात शिकत होते व प्रत्येक गुरूकडे १० विद्यार्थी, अशी विभागणी करण्यात आली. पहिली दहा-पंधरा वर्षे शिक्षणाची व्यवस्था झाल्यावर व अनुभव आल्यावर या शिक्षणाविषयी समाज, कॉलेजव्यवस्थापन व मुंबई सरकार यांच्या मनात हे शिक्षण योग्य का अयोग्य, यात काय सुधारणा कराव्यात याविषयी वेगवेगळे विचार येऊ लागले.

त्यातला एक विचार म्हणजे वेद शिक्षण बंद करावे. कारण त्या शिक्षणाचा लौकिक जीवनात काही उपयोग नाही. वेद शिक्षणाचे वर्ग हळूहळू बंद करण्यात आले. त्याऐवजी लौकिक जीवनात जी शास्त्रे उपयुक्त आहेत अशांचे शिक्षण द्यावे असे ठरले. मेजर कँडी या ब्रिटिश माणसाची कॉलेजचा सुपरिन्टेंडन्ट म्हणून नेमणूक झाली व त्याने अभ्यासक्रमात महत्त्वाचे बदल सुचवले. दैनंदिन लोकजीवनात संस्कृत भाषेचा उपयोग होत नाही, तर मराठीचा उपयोग केला जातो; पण कॉलेजातील विद्यार्थ्यांनी दहा वर्षे शिक्षण घेतल्यावरसुद्धा त्यांना त्यांच्या मातृभाषेत म्हणजे मराठीत चार ओळींचेही पत्र लिहिता येत नाही, ही फार शरमेची गोष्ट आहे. तेव्हा कॉलेजात मराठी हा विषय शिकवण्याची व्यवस्था करण्यात आली. त्यासाठी मराठी प्राध्यापकाचीही नेमणूक करण्यात आली.

मराठीबरोबरच इंग्रजी शिक्षणाचीही व्यवस्था कॉलेजात व्हावी, अशी मागणी येऊ लागली. सुपरिन्टेंडन्ट कँडीने १८३८ मध्ये शासनाकडे इंग्रजी शिक्षणाची योजना मांडली. नव्या काळाचा विचार करता संस्कृत ही ज्ञानभाषा म्हणून उपयुक्त राहिली नाही. नवीन युगाची शास्त्रे शिकायची असतील तर इंग्रजी शिकणे आवश्यक आहे हे लोकांना पटू लागले. शिवाय इंग्रजी ही राज्यकर्त्यांची भाषा. त्यामुळे अनेकांना ती शिकण्याची ओढ लागली; पण प्रश्न होता की शिकवणार कोण? त्यासाठी पुण्यातून मुंबईला इंग्रजी शिकवण्यासाठी एका शिक्षकाला पाठवण्यात आले; परंतु तो प्रयोग यशस्वी झाला नाही. ब्रिटिश अधिकाऱ्यांनाही त्या प्राध्यापकाची तयारी पुरेशी वाटली नाही.

त्या वेळेस पुण्यात बुधवारवाड्यात रे. इस्डेलची इंग्रजी शाळा होती व शुक्रवारवाड्यात रे. स्टिव्हन्सनची इंग्रजी शाळा होती, तेव्हा पूना कॉलेजात एक इंग्रजी वर्ग सुरू करण्यात आला (१८४२) व त्या विद्यार्थ्यांना इंग्रजी

शिक्षणासाठी बुधवारवाड्यात पाठवण्यात येऊ लागले. या विद्यार्थ्यांना प्रोत्साहनपर विशेष विद्यावेतन देण्यात येऊ लागले. १८५० मध्ये इंग्लिश विभागात पाच वर्ग कार्यरत होते. एकाच शहरात अशा दोन स्वतंत्र संस्था असण्याची जरूरी नाही हा विचार शासनात प्रबळ झाला व १८५० मध्ये इस्डेलची इंग्रजी शाळा व हिंदू कॉलेज यांचे एकत्रीकरण झाले व कॉलेजचे संस्कृत कॉलेज हे स्वरूप राहिले नाही. त्यास पूना कॉलेज असे संबोधण्यात येऊ लागले. पूना कॉलेजात आता चार मुख्य विभाग झाले. १. संस्कृत विभाग, २. इंग्रजी विभाग, ३. मराठी विभाग, ४. नॉर्मल विभाग. नव्या योजनेत संस्कृत हा फक्त अनेक विषयांपैकी एक विषय राहिला. विद्यार्थी संस्कृत, मराठी व इंग्रजी असे तिन्ही विषय शिकू लागले. नॉर्मल विभागात चांगले पंतोजी तयार होण्यासाठीचे शिक्षण देण्यात येऊ लागले.

पूना कॉलेजच्या कारकीर्दीत एक महत्त्वाची घटना १८५६ मध्ये घडली. ती म्हणजे मुंबई विद्यापीठाची स्थापना. मुंबई विद्यापीठ सुरू करण्याचा निर्णय १८५६ मध्ये घेण्यात आला व विद्यापीठ प्रत्यक्षात १८५७ मध्ये सुरू झाले. मुंबई विद्यापीठ सुरू होण्यापूर्वी जी दोन महाविद्यालये मुंबई प्रांतात अस्तित्वात होती ती म्हणजे मुंबईतील एल्फिन्स्टन कॉलेज व पुण्यातील पूना कॉलेज. पूना कॉलेजला एक संलग्न कॉलेज म्हणून मुंबई विद्यापीठाची परवानगी १८६० मध्ये मिळाली.

**पूना कॉलेज : विद्यार्थी**

एल्फिन्स्टनने हिंदू कॉलेजचा जेव्हा प्रस्ताव मांडला तेव्हा त्यातील प्रमुख उद्देश हा पेशवाई बुडाल्यामुळे ज्यांच्यावर सर्वांत जास्त परिणाम झाला, ज्यांच्यासमोर जीवन-मरणाचा प्रश्न निर्माण झाला व ज्यांच्यात त्यामुळे नैराश्य व अशांतता निर्माण झाली, त्या ब्राह्मणांच्या विद्येचे पुनरुज्जीवन करणे हा होता. सुरुवातीच्या काळात विद्यार्थी वर्ग हा मोठ्या प्रमाणावर ब्राह्मण समाजातला होता.

एल्फिन्स्टनच्या मूळ सूचनेनुसार, पुण्याचा कमिशनर चॅपलिनने कॉलेजचा जो आरखडा तयार केला त्यात या कॉलेजात कोणाला प्रवेश द्यावा, त्यांचे वय व शैक्षणिक पात्रता काय असावी, त्यांच्याकडून अपेक्षा काय आहेत, त्यांच्या वर्तणुकीसंबंधी नियम काय असावेत, त्यांच्या राहण्याची व्यवस्था, त्यांनी द्यावयाचे शुल्क व त्यांना मिळणारी आर्थिक मदत याविषयीचे

नियम यांचा समावेश होता. काळानुसार त्यात अनेक बदलही होत गेले.

व्याकरण, अलंकार, न्याय, धर्मशास्त्र, ज्योतिष, वेदांत, वैद्य आणि वेद (ऋग्वेद व यजुर्वेद) या विषयांचे-शास्त्रांचे शिक्षण देण्याची व्यवस्था कॉलेजात करण्यात आली. यापैकी कोणत्याही एका शास्त्राचे प्राथमिक शिक्षण झालेल्या विद्यार्थ्याला प्रवेश दिला जाई. अगदीच कोरी पाटी असलेल्या विद्यार्थ्यास प्रवेश मिळत नसे. त्याची काहीतरी पूर्वतयारी झालेली असली पाहिजे. सुरुवातीला एकूण शंभर विद्यार्थ्यांना प्रवेश देण्याचे ठरले. कॉलेजात दहा शास्त्री नेमण्यात आले व प्रत्येकाकडे दहा विद्यार्थी देण्यात आले. विद्यार्थ्याला कोणत्याही एका शास्त्राची निवड करण्याची संधी देण्यात येई. एकापेक्षा अधिक शास्त्रांतही विद्यार्थ्याला पारंगत होता येत असे. वेद हा विषय शिक्षणासाठी निवडायला परवानगी होती; पण फक्त वेदच शिकायला विद्यार्थ्याला परवानगी नव्हती. वेदांबरोबर अन्य शास्त्रांचाही विद्यार्थ्याने अभ्यास करणे अपेक्षित होते. सर्वसाधारणपणे दहाव्या वर्षी विद्यार्थ्याला कॉलेजात प्रवेश दिला जाई व शास्त्राभ्यास पूर्ण करण्यासाठी विद्यार्थ्याला सात ते १२ वर्षे लागत असत, गरीब व होतकरू विद्यार्थ्यांना दरमहा पाच रुपये विद्यावेतन देण्यात येई, एकूण शंभर विद्यार्थ्यांना विद्यावेतन देण्याची व्यवस्था करण्यात आली. विद्यावेतनासाठी एकूण वार्षिक सहा हजार रुपयांची योजना जाहीर झाली. मूळ जी वार्षिक रक्कम रु.५०,०००/- दक्षिणारूपाने वाटली जाई, त्यातीलच काही रक्कम बाजूला काढून तिचा विनियोग कॉलेजातील विद्यार्थ्यांसाठी करायचा ठरले. मासिक पाच रुपयांशिवाय विद्यार्थ्यांना वार्षिक बक्षिसेही देण्यात येत. विद्यार्थ्यांची वार्षिक परीक्षा घेतली जाई व परीक्षेतील गुणवत्तेनुसार बक्षीस रक्कम ठरवली जाई. दरवर्षीच्या विद्यार्थ्यांच्या प्रगतीनुसार त्यांना द्यावयाच्या बक्षिसाची रक्कम वाढवली जाई व अभ्यासक्रम पूर्ण झाल्यावर शेवटच्या वर्षाची बक्षीस रक्कम हीच दक्षिणा रक्कम ठरवली जाई व ती विद्यार्थ्याला तहहयात वर्षासन म्हणून मिळत राही. नंतर मासिक रुपये पाच हे विद्यावेतन बंद होई.

कॉलेजात प्रवेशासाठी वयोमर्यादा दहा ते सतरा, अशी ठेवली होती आणि वयानुसार शिक्षणाचा कालावधी सात ते दहा वर्षे ठरवण्यात आला. शिक्षण संपल्यावर त्यांचे विद्यावेतन बंद होई व कॉलेजातून उत्तीर्ण होणाऱ्या

विद्यार्थ्यांना शासकीय कार्यालयात प्राध्यान्याने नोकरी दिली जाई.

विद्यार्थ्यांनी शिस्त, नियमितपणा, गुरूंचे आज्ञापालन, संस्थेच्या नियमांचे पालन करणे अपेक्षित होते. नियमांचे उल्लंघन केल्यास दंडात्मक कारवाई केली जाईल, हे विद्यार्थ्यांना कळवले गेले होते. १८३४ साली असाच एक प्रश्न निर्माण झाला. पुण्याचा कलेक्टर बाबर याने १६ विद्यार्थ्यांचे दरमहा पाच रुपये मिळणारे विद्यावेतन बंद केले. विद्यार्थ्यांनी त्याविरुद्ध अपील केले; परंतु निर्णयात बदल झाला नाही. हे विद्यार्थी नियमित येत होते व त्यांची परीक्षाही घेण्यात आली होती व त्यात ते उत्तीर्णही झाले होते. कलेक्टरांच्या मते हे विद्यार्थी जास्त वयाचे होते. ते २४-२५ वर्षांचे होते आणि विद्यावेतन हे गरीब विद्यार्थ्यांसाठी आहे. अर्जदार हे २४-२५ वर्षांचे प्रौढ गृहस्थ आहेत आणि ते स्वतंत्रपणे आपली उपजीविका करू शकतात. अर्थातच त्या विद्यार्थ्यांना त्यांचे मासिक विद्यावेतन मिळाले नाही.

१८३८ मध्ये कॉलेजचे व्यवस्थापन थॉमस कँडी याच्याकडे देण्यात आले. त्याने कॉलेजचा सुपरिन्टेण्डन्ट म्हणून कार्यभार स्वीकारला आणि त्याने व्यवस्थापनात नवे बदल सुचवले. विद्यार्थ्यांची वार्षिक परीक्षा घेतली जाईल. ती परीक्षा सार्वजनिक स्वरूपाची असेल. त्यात गावातील विद्वान अतिथी असतील, तसेच युरोपियन अधिकारी असतील. परीक्षा उत्तीर्ण होणाऱ्यांच्या तीन श्रेणी ठरवल्या. उत्तम, मध्यम व कनिष्ठ. ज्यांनी नावलौकिक होईल असे यश संपादन केले आहे ते उत्तम, ज्यांचे यश मोठा नावलौकिक होईल इतके उत्तम नाही; पण त्यांचे काम स्तुतीस पात्र आहे ते मध्यम व ज्यांना प्रशंसनीय यश मिळवता आले नाही ते कनिष्ठ. उत्तम श्रेणी मिळवणाऱ्यांना प्रशस्तिपत्र, भेटवस्तू व रोख बक्षीस, मध्यम श्रेणी मिळवणाऱ्यांना प्रशस्तिपत्र व भेटवस्तू देण्यात येई. कनिष्ठ परीक्षार्थींना कोणतेही बक्षीस नव्हते.

या नव्या नियमांप्रमाणे ऑगस्ट १८३८ मध्ये २७ विद्यार्थ्यांची परीक्षा घेण्यात आली. त्यातील १० जणांना उत्तम श्रेणी मिळाली, १४ जणांना मध्यम श्रेणी मिळाली आणि ३ जणांना कनिष्ठ श्रेणी मिळाली. उत्तम श्रेणीसाठी ६० रु., मध्यम श्रेणी मिळालेल्यांना ४० रु. व कनिष्ठांना काही नाही, असे बक्षीस वाटप झाले.

विद्यार्थ्यांचा कल ऋग्वेद व यजुर्वेद शिकण्याकडे अधिक होता. त्यामानाने

धर्मशास्त्र, न्याय, व्याकरण, अलंकार हे विषय शिकणारे फारच थोडे होते. सत्तावीस परीक्षार्थींपैकी १९ जणांनी अभ्यासासाठी वेद निवडले होते, दोघांनी प्रत्येकी वेदांत, धर्मशास्त्र, न्याय हे विषय घेतले होते. व्याकरण व अलंकार शिकणारा प्रत्येकी एकच होता. उत्तम श्रेणी मिळवणाऱ्यांत वेद शिकणाऱ्यांची संख्या जास्त होती (दहापैकी आठ), धर्म व न्याय शिकणारा प्रत्येकी एक होता, तर व्याकरण व अलंकार शिकणारा कोणीच नव्हता. व्याकरण व अलंकार ही शास्त्रे वेदांपेक्षा अवघड होती. पुढे एक-दोन महिन्यांत वेद प्राध्यापकांना निवृत्त करण्यात आले आणि वेदशिक्षणही कायमचे बंद झाले.

दरमहा पाच रुपये विद्यावेतन मिळणारे शंभर विद्यार्थी होते; परंतु विद्यावेतन न मिळणारेही अनेक विद्यार्थी कॉलेजात शिकत होते. त्यांना कोणतेही शुल्क नव्हते; पण उद्या विद्यावेतन मिळणारे विद्यार्थी अभ्यासक्रम पूर्ण करतील व त्यांची रिकामी झालेली जागा आपल्याला मिळेल, या आशेने कॉलेजात प्रवेश घेतलेले ८२ उमेदवार होते. कॉलेजातील शिक्षणाची विद्यार्थ्यांना ओढ लागलेली होती न्याय (१२) व अलंकार (४५) शिकू इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या जास्त होती. या विद्यार्थ्यांना शिक्षण फुकट होते; परंतु उपजीविकेसाठी अनेकांना माधुकरी मागूनच जगावे लागे. (मेजर कँडीच्या लिखाणात ते विद्यार्थी भीक मागून जगत होते असा उल्लेख केला आहे. त्याला 'माधुकरी' या संकल्पनेची माहिती नव्हती म्हणून त्यांचा उल्लेख भिकारी असा केला आहे.)

विद्यावेतन बंद करावे, अशीही एक सूचना शासनासमोर होती, हा खर्च अनाठायी आहे, असा ब्रिटिश अधिकाऱ्यांचा विचार होता; पण हे विद्यावेतन दक्षिणा फंडातून दिले जात होते आणि त्यामुळे ते बंद करणे म्हणजे असंतोषाला आमंत्रण होते. तसेच शासनाच्या हेही लक्षात आले की, शिक्षण घेणाऱ्यांची कौटुंबिक परिस्थिती गरिबीची आहे. त्यामुळे हा कार्यक्रम पूर्णपणे बंद काही झाला नाही; पण त्याचे पुनर्नियोजन झाले.

सर्वांना सारख्याच रकमेची शिष्यवृत्ती द्यावी हे सुपरिन्टेंडन्ट कँडी याला काही पटले नाही. त्यांनी त्रिस्तरीय योजना मांडली व ती मंजूरही झाली. या नव्या योजनेनुसार परीक्षेत उत्तम गुण मिळवणाऱ्यास साडेचार रुपये, मध्यम गुण मिळवणाऱ्यास साडेतीन रुपये व कनिष्ठ विद्यार्थ्यांना तीन रुपये

देण्याचे ठरले. 'कनिष्ठ' पेक्षा कमी श्रेणी मिळवणाऱ्यांना कॉलेजातून काढून टाकावे, अशी शिफारस करण्यात आली.

कॉलेजात तीन वर्षांपेक्षा अधिक काळ अभ्यास करणाऱ्यांना, ते कॉलेज सोडून जाताना, त्यांच्या गुणवत्तेनुसार ७५ ते २५० रुपयांपर्यंतची बक्षिसे देण्यात येत. विशेष बाब अशी की, ज्यांना शिष्यवृत्ती मिळत नव्हती त्यांनाही बक्षिसासाठी पात्र ठरवण्यात आले. अपेक्षा अशी होती की, यामुळे विद्यार्थ्यांची कॉलेजातील उपस्थिती चांगली राहील. शासनाची इच्छा शिष्यवृत्ती पद्धत लवकरात लवकर बंद करावी अशी होती. कारण त्यामुळे खर्चात बचत होईल व ते पैसे अन्यत्र वापरता येतील. ज्या दक्षिणा फंडातून शिष्यवृत्ती दिली जात होती, त्याच्या मागच्या मूळ विचारापासून अर्थातच हे दूर जाणे होते.

पेशव्यांचा राहता वाडा जो विश्रामबागवाडा, त्याला पेशवाई संपुष्टात आल्यावर १८१८ साली ब्रिटिशांनी कुलूप लावले. पूना कॉलेज सुरू झाल्यावर म्हणजे १८२१ साली ते उघडण्यात आले व विश्रामबागवाडा कॉलेजला देण्यात आला. त्यात विद्यार्थी व प्राध्यापक यांच्या राहण्याचीही व्यवस्था करण्यात आली. अशा तऱ्हेने कॉलेजसाठी इमारतीची व्यवस्था झाली.

**पूना कॉलेजचे शैक्षणिक वर्ष :**

पूना कॉलेजच्या सुरुवातीला पहिली तीस वर्षे (१८२१-१८५१) कॉलेज जूनमध्ये सुरू होत असे. एप्रिलमध्ये विद्यार्थ्यांच्या परीक्षा घेतल्या जात व त्यानंतर सुटी असे. पुण्यामध्ये एप्रिल महिन्यात उन्हाळा फार असे व वार्षिक परीक्षा त्या काळात घेणे त्रासदायक होत असे. म्हणून वार्षिक परीक्षा डिसेंबरमध्ये घेण्याचे ठरले आणि नवीन वर्ष जानेवारी ते एप्रिल व जून ते नोव्हेंबर, अशा दोन विभागांत विभागले गेले.

### पूना कॉलेजातून उत्तीर्ण झालेल्या सत्तावीस विद्यार्थ्यांची यादी इ.स. १८३८

| | नाव | शाखा-शास्त्र | श्रेणी |
|---|---|---|---|
| १ | नरसिंहाचार्य गुलगुलेकर | अश्वालयन शाखा ऋग्वेद | उत्तम |
| २ | गोपाळभट दांडेकर | अश्वालयन शाखा ऋग्वेद | मध्यम |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ३ | विष्णुभट पानभुना (प्रभुणे) | अश्वालयन शाखा | ऋग्वेद | मध्यम |
| ४ | नरसिंहभट फडके | अश्वालयन शाखा | ऋग्वेद | मध्यम |
| ५ | गणेशभट वझे | अश्वालयन शाखा | ऋग्वेद | उत्तम |
| ६ | गणेशभट शिवणकर | अश्वालयन शाखा | ऋग्वेद | मध्यम |
| ७ | रघुनाथभट केळकर | अश्वालयन शाखा | ऋग्वेद | मध्यम |
| ८ | लक्ष्मणभट गांगल | अश्वालयन शाखा | ऋग्वेद | मध्यम |
| ९ | विष्णुभट दाते | अपस्तंभ | यजुर्वेद | उत्तम |
| १० | बाळम्भट खरे | अपस्तंभ | यजुर्वेद | मध्यम |
| ११ | सखाराम भट आपटे | अपस्तंभ | यजुर्वेद | मध्यम |
| १२ | सदाशिवभट दाते | अपस्तंभ | यजुर्वेद | मध्यम |
| १३ | गोपाळभट यवतेश्वरकर | अपस्तंभ | यजुर्वेद | उत्तम |
| १४ | विष्णुभट दातार | अपस्तंभ | यजुर्वेद | उत्तम |
| १५ | गोपाळभट बुलकोडेकर | अपस्तंभ | यजुर्वेद | उत्तम |
| १६ | पांडुरंगभट अभ्यंकर | अपस्तंभ | यजुर्वेद | मध्यम |
| १७ | रघुनाथभट वंकळेकर | वाजसनी | यजुर्वेद | उत्तम |
| १८ | गणेशभट पुरंदरे | वाजसनी | यजुर्वेद | उत्तम |
| १९ | नारायणभट फुलगावकर | वाजसनी | यजुर्वेद | मध्यम |
| २० | द्वैपायनाचार्य | वेदांत (द्वैत) | | मध्यम |
| २१ | कृष्णाचार्य वसेकर | वेदांत (द्वैत) | | मध्यम |
| २२ | कृष्णाचार्य हुबळीकर | धर्मशास्त्र | | उत्तम |
| २३ | मोरशास्त्री मेरेकर | न्यायशास्त्र | | मध्यम |
| २४ | नारायण लेले वसेकर | धर्मशास्त्र | | कनिष्ठ |
| २५ | निवसाचार्य हुबळीकर | न्यायशास्त्र | | उत्तम |
| २६ | दामोदराचार्य राघोहस भुवनकर | व्याकरण | | कनिष्ठ |
| २७. | शंकर गोखले | अलंकार | | कनिष्ठ |

परीक्षक - १. प्रिन्सिपल व सरपंच राघवाचार्य

२. त्रिंबकशास्त्री शाळीग्राम

३. नारायणशास्त्री थत्ते

४. रामचंद्रशास्त्री जानवेकर

५. विष्णुशास्त्री

**पुणे पाठशाळा व पूना कॉलेजचे काही प्रसिद्ध विद्यार्थी :**

१. महादेवशास्त्री गोविंदशास्त्री कोल्हटकर (१८२२-१८६५)
२. कृष्णशास्त्री राजवाडे (१८२०-१९०५)
३. बाबाजी कृष्ण गोखले ( - १८८३)
४. कृष्णशास्त्री पांडुरंगशास्त्री गोडबोले (१८३९-१८८६)
५. कृष्णशास्त्री चिपळूणकर (१८२४ - १८७८)
६. कृष्णाजी परशुराम गाडगीळ (१८४७-१८९६)
७. विष्णुशास्त्री कृष्णशास्त्री चिपळूणकर (१८५०-१८८२)
८. श्रीकृष्णशास्त्री तळेकर (१८२६-१८८०)
९. विष्णुशास्त्री परशुरामशास्त्री पंडित (१८२७-१८७६)
१०. रावजीशास्त्री गोडबोले (१८३४-१८९१)
११. नागेश विनायक बापट (१८३९ - १९०२)

**कॉलेज शिस्त :** कॉलेजात बेशिस्तीचे वातावरण आहे व कॉलेजवर युरोपियन माणसाचे नियंत्रण पाहिजे म्हणून कॅप्टर कँडी यास सुपरिन्टेंडन्ट म्हणून नेमण्यात आले. गैरशिस्त विद्यार्थ्यांना कॉलेजातून काढून टाकण्यात येत असे. अशा तीन घटना घडल्याची नोंद आहे. घुगवे नावाच्या विद्यार्थ्याने चोरी केल्याचा आरोप होता, म्हणून त्यास काढून टाकले, तर नारायण पंडित याने दुसऱ्या विद्यार्थ्यांवर चोरीचा आळ घेतला; पण चौकशीअंती तो खोटा ठरल्याने पंडितला कॉलेजातून काढले. तसेच आळशी, निष्काळजी, मंदबुद्धीचा आहे या सबबीवर बलदेव पिंप्लसकर या विद्यार्थ्याला कॉलेज सोडावे लागले.

**पूना कॉलेज : साधनसामग्री**

पूना कॉलेज ही संस्था शंभर विद्यार्थ्यांसाठी सरू झाली. विद्यार्थ्यांना शिकवण्यासाठी दहा-पंधरा प्राध्यापक व कार्यालयीन कर्मचारीही नेमण्यात आले. अशा या शैक्षणिक संस्थेसाठी आवश्यक ती साधनसामग्री जमा करणे आवश्यक होते. त्यासाठी इमारत, पुस्तके, शैक्षणिक साधने इत्यादीची जरूरी होती.

जागेचा प्रश्न विश्रामबागवाड्याने सोडवला. विश्रामबागवाडा हे पेशव्यांचे निवासस्थान, राहते घर दुसऱ्या बाजीरावास पदच्युत केल्यावर त्यास उत्तरेत कानपूरजवळ ब्रह्मावर्त येथे नेऊन ठेवले. त्यामुळे वाडा रिकामाच होता; पण

ब्रिटिशांनी त्याला कुलूप लावले होते ते १८२१ मध्ये पूना कॉलेजच्या स्थापनेनिमित्त उघडण्यात आले व ही इमारत कॉलेजला देण्यात आली. विश्रामबागवाडा हा दोनशे वर्षांपूर्वी शेवटचा पेशवा दुसरा बाजीराव याने स्वत:च्या निवासासाठी बांधला. तो तीन चौकी दुमजली वाडा होता. राजवाड्यांची लांबी २६० फूट व रुंदी ९० फूट आहे. ही जागा पूर्वी सरदार हरिपंत फडके यांची होती व तेथे मोठी बाग होती. इ.स. १७९९ मध्ये ती बाजीरावाने विकत घेतली. इ.स. १८०३ ला बांधकाम सुरू झाले व १८०९ मध्ये पूर्ण झाले. त्यासाठी अंदाजे दोन लाख रुपये खर्च आला. पाणी व गटारव्यवस्थेसाठी विशेष व्यवस्था करण्यात आली होती. हा वाडा कॉलेजातील शिक्षणव्यवस्था, त्यासाठी कचेरी, दहा-बारा वर्ग इत्यादींसाठी पुरेशी जागा होती. कॉलेजचे प्राध्यापक व विद्यार्थी यांच्या निवासाचीही त्यात व्यवस्था करण्यात आली. या राजवाड्याची शिक्षण संस्थेसाठी उपयोग होणे हे प्रशस्तच होते व लोकांनाही ते आवडले.

पूना कॉलेज या वाड्यात १८६४ पर्यंत होते. कॉलेजातील विद्यार्थ्यांची संख्याही वाढली. कॉलेजची इमारत अपुरी पडू लागली. शिवाय गावातच, भरवस्तीत कॉलेज असणे अनेक दृष्टींने गैरसोयीचे वाटू लागले. तेव्हा ब्रिटिश सरकारने मुळा-मुठेच्या संगमापलीकडे नवीन इमारत बांधण्याचे ठरवले. सुदैवाने मुंबईचे धनाढ्य व्यापारी सर जमशेटजी जिजीभॉय यांनी त्यासाठी एक लाख रुपयांची देणगी दिली. इ.स. १८६४ मध्ये कॉलेज नव्या जागेत गेले. सर्व विद्यार्थ्यांना राहण्यासाठी कॉलेजमध्ये जागा उपलब्ध झाली व शहरातील आकर्षणांपासून ते दूर गेले. विद्यार्थ्यांना त्यांना मिळालेल्या 'गाऊन' मुळे वेगळेपण व स्वतंत्र व्यक्तिमत्त्व प्राप्त झाले.

१८६८ मध्ये नवीन जागेत कॉलेज गेल्यावर कॉलेजचे नाव बदलण्यात आले व डेक्कन कॉलेज हे नवे नाव देण्यात आले. डेक्कन कॉलेज म्हणून ते १९३३ पर्यंत कार्यरत होते; परंतु विद्यार्थी संख्या कमी झाल्यामुळे कॉलेजच्या व्यवस्थापनाने कॉलेज बंद करण्याचे ठरवले, कॉलेजच्या बिल्डिंगचा लिलाव करण्याचे ठरवले; पण जनतेने त्याला विरोध केला व एक नवीन व्यवस्थापन समिती नेमली. कॉलेज बंद झाले; पण भाषाशास्त्र व मानवशास्त्र या शास्त्रांचे पदव्युत्तर शिक्षण देणारी संस्था म्हणून ती आजही कार्यरत आहे.

नव्या कॉलेजसाठी ग्रंथालयाची व पुस्तकांची जरूरी होती. कॉलेज सुरू झाले तेव्हा पेशव्यांची ग्रंथसंपदा होती ती कॉलेजला देण्यात आली. तसेच सरकारने स्वत:ची पुस्तकेही कॉलेजसाठी दिली. अर्थात, १८२१ मध्ये पुण्यामध्ये छपाईव्यवस्थाही नव्हती. छापील पुस्तके उपलब्ध नव्हती. कोलकात्यात छापखाना होता व तेथून आपण देवनागरीत छपाई केलेली पुस्तके आणू, असे कमिशनरने सुचवले. जे काही ग्रंथ होते ते हस्तलिखित स्वरूपात, गुरूजवळ असत. त्यातून विद्यार्थ्यांना मजकूर लिहून द्यावा लागे, बहुतेक शिक्षण पाठांतराधित होते. त्यामुळे छापिल पुस्तकांची उपलब्धी कमीच होती.

मेजर कँडीची पूना कॉलेजचा सुपरिन्टेंडन्ट म्हणून नेमणूक झाल्यावर त्याने इंग्रजी व मराठी या विषयांचाही अभ्यासक्रमात समावेश केला. मराठी भाषेत तर कोणतीच पुस्तके उपलब्ध नव्हती. खाजगी क्षेत्रात प्रकाशक, मुद्रक, छापखाना या संस्थाच नव्हत्या, त्यामुळे कॉलेजने स्वत:च पुस्तके प्रकाशित करायचे ठरवले व त्यासाठी छापखान्याची उभारणी करायचे ठरवले. त्यासाठी द.म. ६५ रु. सुपरिन्टेंडन्ट खर्चाची योजना केली. त्यासाठी प्रेसमन, कॉपिस्ट, करेक्टर ही माणसे व शाई व अन्य सामग्रीसाठी खालीलप्रमाणे योजना केली.

| **पद** | **दरमहा खर्च** |
|---|---|
| १. हेड प्रेसमन | ०८ रु. |
| २. सहाय्यक प्रेसमन (३) | १५ रु. |
| प्रत्येकी द.म. | ०५ रु. |
| ३. कॉपिस्ट | २० रु. |
| ४. करेक्टर व पर्यवेक्षक | २० रु. |
| ५. शाई इ. स्टेशनरी | ०७ रु. |
| **एकूण** | **६५ रु.** |

यासाठी जो खर्च होणार होता त्यासाठी वैदिक (वेद शिकवणारे) ब्राह्मणांना सक्तीची निवृत्ती घ्यायला लावली. वेद शिकवणे बंद केले व त्यातून वाचलेले ६५ रु. छापखान्यासाठी वापरायचे ठरवले.

पुढील दोन वर्षांत काही पुस्तके छापून तयार झाली. मराठी विभागासाठी

'हितोपदेश' व 'अंकगणित' व संस्कृत कॉलेजसाठी 'रूपावली', 'महाराष्ट्राचा इतिहास' व 'भूगोल' व 'शेतीवरील जागती ज्योत' हे ग्रंथ छापखान्यात छापले.

कॉलेजात ज्योतिषशास्त्र शिकवले जाई; पण ते भारतीय पद्धतीने. त्यातील फलज्योतिष भाग अभ्यासक्रमातून काढून टाकण्यात आला व फक्त खगोलशास्त्र शिकवण्याचे ठरले; पण त्यासाठी पृथ्वीगोल व नकाशांची जरूरी होती. त्या वस्तू उपलब्ध करण्यात व पुण्यातील प्राध्यापकाला त्याचा उपयोग कसा करावा हे शिकायला मुंबईला पाठवण्यात आले.

♦♦

५.

# पूना कॉलेज : व्यवस्थापन

१८१८ साली पुण्यातील पेशवाईचा अस्त झाला आणि ब्रिटिश सरकारने पुण्यातील जनतेशी सुसंवाद व सौख्य राहण्याच्या उद्देशाने, पुण्यातील सुशिक्षित ब्राह्मण समाजाच्या शिक्षणाची संस्थात्मक व्यवस्था करण्यासाठी हिंदू कॉलेज तथा पूना कॉलेज १८२१ मध्ये सुरू केले. आता त्याला १९० वर्षे झाली. संस्थात्मक शिक्षणाची ही सुरुवात होती. तिच्या व्यवस्थापनाविषयी अनेक प्रश्न निर्माण झाले. त्याची एक चिकित्सक मांडणी करण्याचा हा प्रयत्न. शैक्षणिक संस्थेच्या व्यवस्थापनात संस्थेचा प्रमुख - म्हणजे प्रिन्सिपल एक आणि शिक्षक हे दोन मुख्य आधारस्तंभ. त्यांच्या संदर्भात निर्माण झालेले प्रश्न व त्यांची सोडवणूक हा या लेखाचा प्रमुख विषय.

मुंबई विद्यापीठ (१८५७) सुरू होण्यापूर्वी मुंबई प्रांतात शिक्षण कसे होते याची सर्वांनाच उत्सुकता असते. या लेखाने त्यावर थोडा प्रकाश टाकण्याचा प्रयत्न केला आहे.

**पूना कॉलेजचे प्रिन्सिपल**

१८२१ मध्ये पुण्यातील विश्रामबागवाड्यात हिंदू तथा संस्कृत कॉलेज सुरू करण्याचे ठरले. त्यामागील प्रमुख उद्देश हिंदू लोकांची शास्त्रे शिकवण्याची व्यवस्था करणे हा होता. हिंदूंची सर्व शास्त्रे संस्कृतमध्ये होती. त्यामुळे कॉलेजला संस्कृत कॉलेज असेही म्हणू लागले. सुरुवातीचे प्रोफेसर व कॉलेजचे प्रमुख प्रिन्सिपल हे संस्कृतमध्ये ज्ञानी होते व विशिष्ट शास्त्रात पारंगत होते. कॉलेजची पहिली टीम संस्कृतज्ञानींची होती आणि टीम लीडर हे न्यायशास्त्रात प्रवीण होते. राघवाचार्य रामानुज यांना पहिल्या प्रिन्सिपलचा मान मिळाला. ते १७ वर्षे प्रिन्सिपल म्हणून कार्यरत होते. त्यांना द.म. दीडशे रुपये पगार मंजूर झाला. ते न्यायशास्त्राचे प्रोफेसर म्हणूनही काम

करीत. त्याचे त्यांना वेगळे रु. ९० मिळत.

प्रिन्सिपलवर कॉलेज व्यवस्थापनाची संपूर्ण जबाबदारी टाकण्यात आली. प्राध्यापक व विद्यार्थी यांचे व्यवस्थापन व कॉलेजात सर्व व्यवहारांत शिस्त बाळगणे त्यांच्याकडून अपेक्षित होते. विद्यार्थ्यांची प्रवेश परीक्षा घेणे, प्रवेश देणे, त्यांची हजेरी ठेवणे, वेळोवेळी परीक्षा घेणे, वार्षिक परीक्षा, विद्यावेतन व बक्षीस जाहीर करणे, विद्यार्थ्यांच्या प्रगतीची नोंद ठेवणे इत्यादी कॉलेजव्यवस्थापनाची सर्व कामे प्रिन्सिपलला देण्यात आली. त्याचप्रमाणे कॉलेजमधील सर्व घटनांची सरकारला माहिती देणे, सरकारशी योग्य तो संपर्क ठेवणे हेही अपेक्षित होते. १८२१ ते १८३८ अशी कॉलेज जीवनातली पहिली १७ वर्षे त्यांनी काम केले. अधूनमधून ते रजेवर जात त्यावेळेस अन्य प्राध्यापकांची प्रिन्सिपल म्हणून नेमणूक होई.

१८३५ मध्ये रजेवर गेले असता प्रिन्सिपलचे पद त्यांच्या मुलाकडे देण्यात आले. नरसिंहाचार्य हे त्या काळात प्रिन्सिपल होते. १८३६ व १८३७ मध्ये ते रजेवर गेले असता कोणाला प्रिन्सिपल करावे, हा प्रश्न निर्माण झाला. त्यांच्या मुलगा नरसिंहाचार्य याला प्रिन्सिपल म्हणून नेमावे, अशी राघवाचार्यांची इच्छा होती; पण तसे काही झाले नाही. १८३६ मध्ये अनंताचार्य व १८३७ मध्ये नारायणाचार्यांची नेमणूक झाली. नारायणाचार्यांच्या काळात कॉलेजात बेशिस्त वर्तणुकीची प्रकरणे उद्‌भवली. प्रिन्सिपल नारायणाचार्य व इतर दोन प्राध्यापकांनी बंडखोरी केली. नव्याने सुपरिन्टेंडन्ट म्हणून नेमलेल्या मेजर कँडीबाबत त्यांचा विरोध होता. शेवटी १८३८ मध्ये नारायणाचार्य प्रिन्सिपल व इतर दोन सहप्राध्यापकांना नोकरीतून काढून टाकण्यात आले. प्रिन्सिपल नारायणाचार्य यांना निवृत्तीवेतनही देण्यात आले नाही. प्रिन्सिपल राघवाचार्य १८३८ मध्ये निधन पावले. त्यांच्या जागी कॉलेजातील एक संस्कृत पंडित विष्णुशास्त्री बापट यांना तातडीने नेमले. ते काही काळ सुरतला आय.एस. लॉ या इंग्रज अधिकाऱ्याकडे संस्कृत पंडित म्हणून काम करीत होते. त्यांनी 'नीतिदर्पण' व इतर पुस्तकेही लिहिली होती. सुरुवातीला मेजर कँडी याचे त्यांच्याविषयी मत चांगले होते. कॉलेजमध्ये अनेक सुधारणा करण्याच्या कँडीच्या योजना होत्या. त्यासाठी त्याने बापटांना 'असिस्टंट सुपरिन्टेंडन्ट' म्हणून मुंबई शासनाकडून मुद्दाम मागून घेतले. बापटांनीही कँडीना ह्या सुधारणांबाबत मदत केली. विष्णुशास्त्री

सुधारक गटातले होते. एका विद्यार्थ्याला त्यांनी छडीने मारले. त्यामुळे कॉलेजव्यवस्थापनाकडे अनेक तक्रारी आल्या. कँडीचे आणि त्यांचे मतभेद झाले. त्यांच्यावर ठपका ठेवून त्यांना काढण्यात आले व त्यांना त्यांचा पगारही दिला नाही.

बापटांच्या जागी मोरेश्वरशास्त्री साठे यांना १८३९ साली प्रिन्सिपल म्हणून नेमण्यात आले. मोरेश्वरशास्त्री धर्मशास्त्राचे, अलंकारशास्त्राचे विद्वान पंडित म्हणून प्रसिद्ध होते. मोरेश्वरशास्त्री साठे यांना प्रिन्सिपल व प्राध्यापक म्हणून नेमण्यात आले. पण पूर्वी प्रिन्सिपलचा पगार १५० रु. होता. मोरेश्वशास्त्रींना १०० रु. पगार निश्चित केला. वाचवलेल्या दरमहा ५० रुपयांचा विनियोग छापखान्याच्या वाढीसाठी करण्यात आला. मोरेश्वरशास्त्री यांनी १८३९ ते १८५२, अशी १३ वर्षे प्रिन्सिपल म्हणून काम केले. १८५३ मध्ये त्यांना सुरतला मुनसफ म्हणून नेमणूक मिळाल्याने त्यांनी प्रिन्सिपल पदाचा राजीनामा दिला आणि त्याचबरोबर १८२१ ते १८५२ या तीस वर्षांच्या देशी प्रिन्सिपल परंपरेचा अंत झाला. या काळात सहा प्रिन्सिपलनी काम केले. अर्थात, राघवाचार्य व मोरेश्वरशास्त्री यांनाच फक्त दीर्घकाळ प्रिन्सिपल म्हणून काम करता आले. राघवाचार्यांच्या काळात प्रिन्सिपल हाच सर्वाधिकारी होता. त्याच्यावर कलेक्टर, कमिशनरचे आधिपत्य होते; पण ते दुरूनच. दैनंदिन कारभारात त्यांची फारशी ढवळाढवळ नव्हती. कारण त्यांना इतर कामे बरीच होती. १८३८ मध्ये मेजर कँडी या ब्रिटिश अधिकाऱ्यास सुपरिन्टेंडन्ट म्हणून नेमण्यात आले. त्या नेमणुकीचा स्पष्ट उद्देश हा कॉलेजव्यवस्थापन देशी माणसाकडून युरोपियन माणसाकडे ठेवणे हाच होता. कँडीने दैनंदिन कारभारात लक्ष घालू नये, असे प्रिन्सिपल व प्राध्यापकांना वाटे. काही काळ त्यांनी असहकार केला; पण ते धोरण यशस्वी झाले नाही.

तेव्हा कॉलेजचा सर्वाधिकारी कोण? प्रिन्सिपल का सुपरिन्टेंडन्ट हा कळीचा प्रश्न बनला. सत्ता-सिंहासन एक व राजे दोन ही व्यवस्था काही कायम चालू शकणारी नव्हती. तिचा शेवट नेहमी होतो तसाच झाला. सुपरिन्टेंडन्ट कँडी स्वत:च प्रिन्सिपल झाला. कँडीला संस्कृतचे ज्ञान मर्यादित होते. तो विद्यापीठीय शिक्षण घेतलेला शिक्षित प्राध्यापक नव्हता. तो मूलत: लष्करी अधिकारी होता; पण त्याला शिक्षणात रस होता एवढेच.

त्याने प्रयत्नपूर्वक मराठीत प्रतिष्ठा मिळविली. मोल्सवर्थबरोबर मराठी शब्दकोश तयार केला. मराठीत स्वतंत्र पुस्तके लिहिण्यास व इंग्रजी भाषांतर करण्यास प्रोत्साहन दिले. संस्कृत भाषेचे आचार्य कँडीला वर्गात येऊ देत नसत. संस्कृत भाषा व ग्रंथ पवित्र आहेत व त्यांचे पठण परकीयांच्या देखत करणार नाही, असा पवित्रा देशी प्राध्यापकांनी घेतल्याने कँडीस स्वत:च प्रिन्सिपल व्हावे लागले. अर्थात, काही दिवसांनंतर काळ बदलला. जे प्राध्यापक त्याला वर्गात येऊ देत नव्हते, ते त्याचे स्वागत करू लागले. कँडी १८५३ ते ५७ या काळात प्रिन्सिपल होता. १८५७ मध्ये तो रजेवर इंग्लंडला गेला. कँडीने कॉलेजात शिस्तीचे वातावरण निर्माण केले.

कँडी रजेवर गेल्यावर मुंबई येथील इंजिनिअरिंग कॉलेजातील प्राध्यापक मॅकडुगल यांना हंगामी प्रिन्सिपल म्हणून नेमले (१८५७ जानेवारी १). वर्षाच्या शेवटी डिसेंबर १८५७ ला कायमस्वरूपी प्रिन्सिपलची नेमणूक करण्यात आली. ॲरनॉल्ड कामावर रुजू झाले. दोन वर्षांनी त्यांनीही राजीनामा दिला व ऑक्स्फर्ड विद्यापीठातून एम.ए. झालेले डब्ल्यू.ए. रसेल यांनी नोव्हेंबर १८६० मध्ये प्रिन्सिपल पदाचा पदभार स्वीकारला. पुढे १८६२ मध्ये वर्डस्वर्थ हे प्रिन्सिपल झाले. त्यांच्या कारकीर्दीत कॉलेजने खूपच शैक्षणिक प्रगती केली; पण १८६७ मध्ये कॉलेजचे नाव बदलण्यात आले व त्यानंतर डेक्कन कॉलेज म्हणून अस्तित्वात आले. या कॉलेजातून टिळक, आगरकर यांसारखे प्रसिद्ध साहित्यिक, तत्त्ववेत्ते, राजकारणी, संशोधक शिक्षण घेऊन बाहेर पडले. १९३३ साली डेक्कन कॉलेज बंद करण्यात आले व १८२१ साली स्थापन झालेले हे कॉलेज १११ वर्षांनंतर बंद झाले व महाराष्ट्राच्या शिक्षण क्षेत्रातील हा वटवृक्ष जमीनदोस्त झाला.

**पूना कॉलेजचे प्रिन्सिपल**

१. राघवाचार्य रामानुज (१८२१ ते १८३८)
२. नरसिंहाचार्य राघवाचार्य (१८३५) राघवाचार्यांच्या रजेच्या काळात.
३. अनंताचार्य (१८३६)
४. नारायणाचार्य (१८३७) ॲक्टिंग प्रिन्सिपल
५. विष्णुशास्त्री बापट (१८३९) ॲक्टिंग प्रिन्सिपल
६. मोरेश्वरशास्त्री साठे (१८३९ ते १८५२)

७. मेजर थॉमस कँडी (१८५३ ते १८५७) मेजर कँडी रजेवर इंग्लंडला गेला (१८५७)

९. मॅकडुगल (१ जानेवारी १८५७ ते ७ डिसेंबर १८५७)

१०. ॲरनॉल्ड एडविन (७ डिसेंबर १८५७ ते १८६०)

११. डब्ल्यू. ए. रसेल (१८६० ते १८६२)

१२. वर्डस्वर्थ (१८६२ ते १८६७)

'पूना कॉलेज' चे नाव 'डेक्कन कॉलेज' झाले व त्याचे पहिले प्रिन्सिपल वर्डस्वर्थ होते (१८६८).

१८३५ मध्ये कॉलेजवर युरोपियन अधिकाऱ्याचे नियंत्रण असावे असे ठरल्यामुळे मेजर कँडीस सुपरिन्टेंडन्ट म्हणून नेमले.

**पूना कॉलेज : शिक्षणव्यवस्थापन**

पूना कॉलेज स्थापन झाल्यावर महत्त्वाचा प्रश्न म्हणजे शिक्षणव्यवस्थापन. कोणत्या विषयासाठी शिक्षक नेमायचे, त्यांचे वेतन किती असेल, त्यांच्या जबाबदाऱ्या कोणत्या, शिस्तभंगाची कारवाई कशी कराल, त्यांची निवृत्ती व त्यांचे निवृत्तीवेतन याविषयी शासनाला निर्णय घेणे जरूरीचे झाले.

कॉलेजव्यवस्थापनाची योजना सादर करताना प्रोफेसर, असिस्टंट प्रोफेसर या श्रेणी सुचवल्या गेल्या. मराठीत गुरू व उपगुरू अशी श्रेणीची नावे होती. शास्त्री, पंडित, आचार्य, वैदिक ही पदनामेही त्याच्या पत्रात आढळतात. आचार्य म्हणजे प्रोफेसर, शास्त्री हे पदनाम सर्वसाधारणपणे शिक्षक या अर्थाने वापरले आहे. न्याय, व्याकरण, वेदांत, धर्मशास्त्र, अलंकार ही शास्त्रे आणि ते शिकवणारा तो शास्त्री, वेद शिकवणारा तो वैदिक. आचार्यांना दहमहा १०० रु. व पंडितांना दरमहा ६० रु., ऋग्वेद शिक्षकांना ४१-१/४ रु. व यजुर्वेद शिकवणाऱ्यास रु. ३३-५ आणे, असा पगार ठरविण्यात आला.

१८३८ मध्ये सुपरिन्टेंडन्ट मेजर कँडीने जी योजना सादर केली, त्यात प्रोफेसर, असिस्टंट प्रोफेसर, ज्युनिअर प्रोफेसर व टीचर ही पदनामे वापरली आहेत. हळूहळू देशी उपाध्या न वापरता इंग्रजी उपाध्या वापरण्यास सुरुवात झालेली दिसते. प्रोफेसरला द.म. रु. ६० व असिस्टंट प्रोफेसरला रु.३० वेतन ठरले. या सर्व पदांना शासनाची म्हणजे गव्हर्नरची परवानगी घ्यावी लागे.

नवीन पद निर्माण करणे किंवा पगार वाढवणे म्हणजे नवा खर्च; पण यासाठी मुंबई सरकार वेगळी रक्कम उपलब्ध करून देत नसे. उदाहरणार्थ कॉलेजव्यवस्थापनासाठी योजलेले पहिले अंदाजपत्रक पेशवे काळापासून चालू असलेल्या दक्षिणा फंडातून निर्माण झाले. पन्नास हजार रुपये दक्षिणेच्या रकमेतील वीस हजार रुपये दक्षिणा म्हणून न वाटता दक्षिणा प्राईझ व पूना कॉलेजसाठी वापरण्यात आले. पुढे वेद शिकविण्यासाठी नेमलेल्या वैदिकांची पदे रद्द करण्यात आली आणि त्याच बचतीतील पैसे अन्य शास्त्रांच्या प्राध्यापकांच्या वेतनात वाढ करण्यासाठी वापरले. पूना कॉलेजमध्ये दिवाळी, गणपती, गुरूपूजा इत्यादी सण साजरे केले जात ते बंद करण्यात आले व बचत झालेले पैसे प्राध्यापकांचे पगार वाढविण्यासाठी वापरले. विद्यार्थ्यांना द्यावयाच्या विद्यावेतनात अशाच प्रकारे बचत करण्यात आली. प्राध्यापकांचे पगार जसे या पद्धतीने वाढविले तसेच छापखानाही अशाच तऱ्हेने बचत झालेल्या पैशातून उभारला गेला.

प्राध्यापकांना काही प्रमाणात निवृत्तीवेतन देण्यात येत असे. उदाहरणार्थ पूना कॉलेज बंद करण्याचा प्रस्ताव मांडतानाही निवृत्तीवेतन देऊन प्राध्यापकांना कामावरून दूर करावे, म्हणजे कॉलेज आपोआपच बंद होईल हा पर्याय विचारात घेतला गेला होता.

१८३८ मध्ये वेद शिकविणाऱ्या पाच प्राध्यापकांना निवृत्त करण्यात आले. कारण वेद शिकवणे बंद करण्यात आले. ज्या प्राध्यापकांचा पगार ४१ रु. २ आणे होता, त्यांना रु.१२ निवृत्तीवेतन देण्यात आले व त्याद्वारे महिना ७१ रु. ची बचत झाली. यातूनच दरमहा ६५ रु. कारखान्यातील कामगारांच्या पगारासाठी वापरण्यात आले.

**हिंदू कॉलेजातील प्राध्यापकांचे पगार**

१८२० साली पुण्याचा कमिशनर विल्यम चॅपलिन याने हिंदू कॉलेजची जी योजना मांडली त्यात कॉलेजमध्ये कोणते विषय शिकवावेत, त्यासाठी किती प्राध्यापक नेमावेत, त्यांचे पदनाम व त्यांचा पगार काय असावा याविषयीही शिफारस केली. प्राध्यापकांच्या पदानुसार वेतनाचा ढाचा तयार करण्यात आला.

१. आचार्य (न्याय, अलंकार, वेदांत, धर्मशास्त्र, वैद्य व ज्योतिष) :१०० रु., २. वैदिक (प्रत्येकी सहा पंडित) : ६० रु., ३. ऋग्वेद शिक्षक

(प्रत्येकी दोन शिक्षक) : ४१ रु. ४ आणे, ४. यजुर्वेद शिक्षक (एक शिक्षक) : ३३ रु. ५ आणे, ५. सहायक शिक्षक (एकूण आठ) : २० रु., ६. विद्यार्थी (१००) ५ रु.

**पूना कॉलेजातील कर्मचाऱ्यांची वेतनश्रेणी**

१८३८ मध्ये मुंबई गव्हर्नर आर. ग्रॅन्ट याने पूना कॉलेजातील प्राध्यापक व अन्य कर्मचाऱ्यांची वेतन श्रेणी निश्चित केली. या वेतनश्रेणीप्रमाणे ठरलेले वेतन खालीलप्रमाणे होते.

१. प्रोफेसर (गुरू) : ६० रु., २. असिस्टंट प्रोफेसर (उपगुरू) : व्याकरण, ज्योतिष, धर्मशास्त्र, न्याय, अलंकार, वेदांत, वैद्यक या शास्त्रांतील प्राध्यापकांनाच फक्त ही श्रेणी उपलब्ध होती (वेदाच्या प्राध्यापकांना दुय्यम श्रेणी होती). ३० रु., ३. ऋग्वेद, यजुर्वेद व अपस्तंभ यांच्यासाठी प्रोफेसर (उपगरू) : ३२ रु., ४. प्रिन्सिपल विशेष भत्ता : ९० रु., ५. कारकून (१) ३० रु., ६. विद्यार्थ्यांना विद्यावेतन १०० विद्यार्थी : ५ रु., ७. मराठी शाळेतील शिक्षक : २० रु., ८. सादिलवार खर्च : २० रु.

प्रत्येक विषयासाठी सर्वसाधारणपणे एक प्रोफेसर व एका असिस्टंट प्रोफेसरची नेमणूक करण्यात आली. अलंकारशास्त्रात मात्र १ ज्युनिअर पद जादा देण्यात आले आणि त्यांचा पगारही ४० रु. ठरविला गेला.

प्राध्यापकांची कर्तव्येही ठरवण्यात आली. शिकवणे हे प्राध्यापकांचे प्रमुख काम. त्या काळात पाठांतरावर भर जास्त असे. तेव्हा चॅपलिन व कँडी या दोघांच्याही सूचनांत नुसत्या पाठांतरावर भर न देता विषयातील संकल्पना समजण्यावर अधिक भर दिलेला आढळतो. जे पाठ केले आहे त्याचा अर्थ समजला पाहिजे, शिकण्याबरोबर विद्यार्थ्यांना शिस्त लावणे अपेक्षित होते. शिवाय परीक्षा घेणे हेही शिक्षकाकडून अपेक्षित होते. परीक्षा वेळोवेळी तरी घेतल्याच पाहिजेत; पण वर्षाच्या शेवटी युरोपियन अधिकाऱ्यांसमोर घ्याव्यात, अशी अपेक्षा होती. सुरुवातीच्या काळात कलेक्टर, कमिशनर हे परीक्षेच्या वेळी हजर असत. पुढे सुपरिन्टेंडन्ट म्हणून थॉमस कँडीची कायमस्वरूपी नेमणूक झाल्यावर कँडी स्वत: परीक्षेच्या वेळी हजर राहत असे.

धर्मशास्त्रासारखे विषय कॉलेजात शिकवले जात असल्याने न्यायदानातही त्यांचा सहभाग अपेक्षित होता. न्यायालयाने जर शास्त्रार्थसंदर्भात धर्मशास्त्राच्या

प्राध्यापकांकडे विचारणा केली, तर प्राध्यापकांनी योग्य तो सल्ला देणे अपेक्षित असल्याचे चॅपलिनने नोंदवले आहे.

शास्त्रींची नेमणूक ही त्यांच्या विशिष्ट शास्त्रातील कौशल्यावर अवलंबून होती. शास्त्रींनी प्राप्त केलेल्या कौशल्याची चाचणी घेतली जाई. १८४० साली ज्योतिष विषयासाठी प्राध्यापक नेमायचा होता. त्यासाठी अनेक उमेदवारांना मुलाखतीसाठी बोलावण्यात आले व त्यांची खुली परीक्षा घेण्यात आली. लॅन्सेलॉट, विल्किन्सन, प्रोफेसर ओर्लेबार, मुंबई व इस्टेल, पुणे यांना निवड समितीत घेऊन ज्योतिषशास्त्राची रिकामी जागा भरण्यात आली.

काही वेळा प्राध्यापकांवर शिस्तभंगाची कारवाई करावी लागली. पूना कॉलेजच्या सुरुवातीच्या काळात कॉलेजचे प्रिन्सिपल हेच सर्वाधिकारी होते. कॉलेजमधील विद्यार्थी व शिक्षक या दोघांवर नियंत्रण ठेवणे, शिस्त राखणे हे काम व त्याचे अधिकार प्रिन्सिपलला होते. कमिशनर व नंतर कलेक्टर यांच्या सर्वसाधारण अधिकार कक्षेत प्रिन्सिपल राघवाचार्य हे एक संस्कृत पंडित होते व त्यांनी १८२१ ते १८३८, अशी १७ वर्षे कार्य केले. कॉलेजातील आचार्य मंडळी जुन्या मताची होती व ब्रिटिश अधिकाऱ्यांशी त्यांचा सुसंवाद नसे. उदाहरणार्थ ब्रिटिश अधिकाऱ्यांना बूट बाहेर काढल्याशिवाय वर्गात येऊ देत नसत. शिवाय सोवळेओवळे प्रकार तर होतेच, ब्रिटिशांनी दिलेली दक्षिणा पाण्याने धुऊन घेणे, ब्रिटिशांच्या संपर्कात आल्यास घरी जाऊन अंघोळ करणे, इंग्रजी अधिकाऱ्यादेखत वेदपठण न करणे व ते आल्यास आचार्यांनी शिकवणे बंद करणे. कारण संस्कृतमधील शब्द परकीयांच्या कानावर पडता कामा नयेत इत्यादी. इंग्रज अधिकारी - राज्यकर्त्यांना हे पटणे कठीणच होते. त्यांनी वरिष्ठांकडे अनेक वेळा तक्रारी केल्या; परंतु वरिष्ठांची भूमिका जमवून घेण्याकडे होती. प्राध्यापक व विद्यार्थ्यांच्या असहकार तथा बेशिस्तीमुळे कॉलेज बंद करावे, अशीही कमिशनर, कलेक्टर यांनी शिफारस केली; परंतु प्रत्यक्षात तसे न घडता एवढे मान्य झाले की, या हिंदू कॉलेजावर युरोपियन अधिकाऱ्याचे नियंत्रण असावे व कॅप्टन थॉमस कँडीची सुपरिन्टेंडन्ट म्हणून नेमणूक करण्यात आली. कॉलेजमधील प्राध्यापकांचे आणि कँडीचे वेळोवेळी खटके उडत असत व वातावरण असहकाराचे असे. कँडीच्या रूपाने अधिकार व

नियंत्रणाचे नवीन केंद्र निर्माण झाले. देशी प्रिन्सिपल व इंग्लिश सुपरिन्टेंडन्ट ही व्यवस्था चालवणे कठीण होते. कँडीचा पगार रु. १२० ठरला. तो प्रिन्सिपलपेक्षा जास्त होता. शिवाय हा पगार ब्राह्मणांना वाटायच्या दक्षिणा रकमेतून द्यायचा ठरला. यालाही लोकांचा विरोध होता. काही शास्त्रींनी कँडीविरुद्ध वातावरण निर्माण केले व त्याने शिक्षकांच्या कामात ढवळाढवळ करू नये, अशी भूमिका घेतली. आमची शास्त्रे कशी शिकवावीत ते आम्ही आमचे पाहून घेऊ, कँडीने आचार्य शिकवत असताना येऊ नये, त्याला रीतिरिवाज माहीत नाहीत, त्याच्यामुळे आमच्या संस्कृतीचा अपमान होतो इत्यादी.

एकदा कँडीने कॉलेजच्या दिवाणखान्यात आचार्यांना उपयोगी पडावे म्हणून टेबल पाठवले; परंतु आचार्यांनी ते स्वीकारण्यास नकार दिला व टेबलासारख्या इंग्रजी वस्तूमुळे आमच्या सांस्कृतिक मूल्यांचा भंग होतो, अशी शास्त्री मंडळींनी भूमिका घेतली. तेव्हा दिवाणखान्यात टेबल ठेवायचे की नाही, हा दोन्ही गटांना मानबिंदू झाला. शेवटी कँडीने प्रिन्सिपल नारायणाचार्य व अन्य तीन शास्त्रींविरुद्ध शिस्तभंगाची कारवाई केली आणि त्यांना काढून टाकले. काही शास्त्रींनी नंतर कँडीशी जुळवून घेतले व माफी मागितली. त्यामुळे त्यांच्याविषयी शिक्षा सौम्य करण्यात आली. अर्थात, त्यांना परत कामावर घेतले नाही; पण त्यांना निवृत्तीवेतन देण्यात आले. प्रिन्सिपल नारायणाचार्यांना मात्र नोकरी गमवावी लागली व त्यांना निवृत्तीवेतनही देण्यात आले नाही. त्यांच्यानंतर विष्णुशास्त्री बापट यांना प्रिन्सिपल म्हणून नेमण्यात आले; पण त्यांचेही कँडीशी जमले नाही.

**पुणे पाठशाळा व पूना कॉलेजमधील काही प्रसिद्ध प्राध्यापकांची यादी.**

१. कृष्णशास्त्री चिपळूणकर (१८२४-१८७८), भाषांतरकर्ते, मराठी साहित्यिक, २. श्रीकृष्णशास्त्री तळेकर (१८२६-१८८०), कोषकार व व्याकरणकार, अलंकारशास्त्र, ३. कृष्णशास्त्री राजवाडे (१८२०-१९०५), अलंकार विवेक, शाकुंतल नाटकाचे भाषांतर, ४. महादेवशास्त्री गोविंदशास्त्री कोल्हटकर (१८२२- १८६५), ज्योतिष व व्याकरण, मराठीचे प्राध्यापक, ५. कृष्णशास्त्री पांडुरंगशास्त्री गोडबोले, व्याकरण, गणित, ज्योतिष, ६. परशुराम बल्लाळ गोडबोले (१७९९-१८७४), भाषांतरकर्ते, ७. विष्णुशास्त्री कृष्णशास्त्री चिपळूणकर (१८५०-१८८२), राजकीय पुढारी, निबंधमालेचे

लेखक, ८. केरो लक्ष्मण छत्रे (१८२४-१८८४), गणित, ज्योतिष, सृष्टीविज्ञान, पंचांग, भूमापन विषयांवर पुस्तके, ९. रामकृष्ण गोपाळ भांडारकर (१८३७-१९२७), मुंबई विद्यापीठाचे पहिले पदवीधर, संस्कृत थोर अभ्यासक, १० विष्णू मोरेश्वर भिडे (१८२७-१९०१), भाषांतरकार, इनाम कमिशनर, ११. रे. डॉ. मिचेल जे. मरे (१८१४-१९०४), मराठी व संस्कृत विभागाचे प्रमुख, १२. महादेव मोरेश्वर कुंटे, संस्कृत व मराठीचे प्राध्यापक, १३. एम. रुनन्, १४. व्ही. ग्रीन, १५. जॉर्ज मिलर, १६. जॉ. ब्युहलर, प्रोफेसर ऑफ ओरियंटल लँग्वेजेस्, १७. थॉमस कँडी, प्रिन्सिपल, भाषांतरकार, मराठी व्याकरणकार, कोषकार, १८. नारायणशास्त्री अभ्यंकर, संस्कृत व अलंकार प्रोफेसर, १९. विष्णुशास्त्री बापट (१८०४-१८६५) प्रिन्सिपल, संस्कृत व्याकरण, न्याय, वेदांत, २०. प्रिन्सिपल वर्डस्वर्थ, २१. राघवाचार्य रामानुज, प्रिन्सिपल, न्यायशास्त्राचे प्रोफेसर, २२. नरसिंहाचार्य, प्रिन्सिपल, धर्मशास्त्राचे प्रोफेसर, २३. मोरेश्वरशास्त्री जोशी, ज्योतिषशास्त्राचे प्रोफेसर, २४ अनंताचार्य, प्रिन्सिपल, २५. बाबाजी कृष्ण गोखले, पुढे स्वत:ची शाळा सुरू केली, २७. डॉ. किलहॉर्न, पौर्वात्य भाषांचा प्रोफेसर.

♦♦

---

**संदर्भ :** ज्ञानकोश, विश्वकोष, वाङ्मयकोश, संस्कृती कोश, विश्रामबागवाडा : गणेश त्र्यंबक बापट, मुंबई प्रांताच्या शिक्षण खात्यातील पत्रव्यवहार : आर. व्ही. परुळेकर.

**मुद्रणस्थळ : शासकीय फोटोझिंको मुद्रणालय, पुणे-१.**

'श्रीमंत बाजीराव बल्लाळ ऊर्फ पहिले बाजीराव साहेब पेशवे' हे बापटांचे पहिले पुस्तक आणि तेही 'दक्षिणा प्राईझ' या त्यावेळच्या अग्रगण्य पुरस्काराने सन्मानित झालेले. त्यामुळे या पुस्तकाने बापटांच्या पुढच्या साहित्य प्रवासाची दिशा ठरवली. बापटांनी बाजीरावाच्या चरित्राद्वारे 'स्वभाषा, स्वधर्म, स्वदेश' या त्रिसूत्रीचे महत्त्व लोकांपर्यंत पोहोचवण्याचा प्रयत्न केला.

'श्री महाराणी जमनाबाई गायकवाड, बडोदा' हे बापटांचे शेवटचे पुस्तक. जमनाबाई गायकवाड ह्या बडोदा संस्थानच्या राणीसाहेब. यशस्वी संस्थानिक महाराजा सयाजीराव गायकवाड यांच्या त्या मातोश्री. अशा या जागतिक कीर्ती लाभलेल्या यशस्वी राजाच्या जडणघडणीत आईचा वाटा हा निश्चित मोठा होता. मोठ्या यशस्वी राजाच्या आईचे चरित्र लोकांपुढे मांडावे या हेतूने बापटांनी जमनाबाई गायकवाड यांचे चरित्र लिहिले आहे.

'लिक्लेअर चरित्र' ही दीर्घकथा अथवा लघु कादंबरी असून या कथेचा खरे तर प्रेरक कथा, उद्योजकतेला आणि उद्यमशीलतेला प्रेरणा देणारी कथा म्हणून उल्लेख करावा लागेल.

मुद्रणस्थळ : शासकीय फोटोझिंको मुद्रणालय, पुणे